मा. १३०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव — मराठी ज्ञानप्रकाश

संपादक —

मासिक क्रमांक — सन — १९०१

अंक —

(महिने) १-१२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

[illegible]

मा - ३५१२

शाळाखात्याच्या आश्रयाखालीं चाललेलें मासिक पुस्तक.

# मराठी शालापत्रक.

# MARATHI SCHOOL PAPER.

पुस्तक बारावें.

सन १९०१.

येथें शब्द नाहीं शिष्यांसी । हें अवघें सद्गुरूपाशीं।
सद्गुरू पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळां जनां ॥

रामदास.

व्यवस्थापक व प्रकाशक—शंकर नरहर जोशी.

'चित्रशाळा' प्रेस पुणें.

आगाऊ वार्षिक वर्गणी टपालखर्चासह १॥२.

मागाहून किंमत टपालखर्चासह..........२॥४.

फुटकळ अंकास ॥३.

( या पुस्तकासंबंधी सर्व हक्क मालक यांनीं स्वाधीन ठेविले आहेत. )

# विषयांचें सूचिपत्र.


विषय. पृष्ठ.

इंग्लंडांतील प्राथमिक शिक्षण .... .... .... ९२
इंग्रजी व देशी पंचांग .... .... .... .... १४
रा. सा. काशिनाथ नारायण साने .... .... ८२,१०५
काव्यरत्नमंजूषा.
—अंक ९-वसंतक्रीडा-जन्मांध मुलगा ... ... ... २२८
—अंक ११-प्रातःस्मरण-सायंप्रार्थना-संतांचीं वचनें ... ... २५७
चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिया यांचा मृत्यू .... .... २९
चक्रवर्ती सातवे एडवर्ड महाराज यांचें राज्यारोहण .... ७१
जाहिराती .... .... .... .... २११
कार्पेंटर स्कालरशिप.
न्या, इंडियन असोशिएशन धर्म शिक्षण व नीतिशिक्षण ... १४५
नवीन मनुष्यगणती .... .... .... ११४
नवीन पुस्तक—रासायनिक परीक्षण .... .... २४४
नीतिशिक्षणसंबंधाचे आणखी कांहीं विचार .... १७१
पत्रव्यवहार.
अंक १—मध्यभागांतील शिक्षकांची स्थिती—मराठी कोशांत सुधारणा. १६
अंक ४—पुस्तकांतील चूका—गणिताची शंका—छत्रेकृत अंकगणिताची शंका—गोखलेकृत अंकगणितांतील शंका ... ... ९८
—अंक ५—भाषणांतील न्याय—सिद्धांत. कौमुदींतील शंका ... १२१
—अंक ६—सिद्धांत कौमुदींतल्या शंकांचीं उत्तरें ... १५५
—अंक ९—आंकड्यांची मौज ... ... २३०
—अंक १०—शंका ... ... ... २४८
प्रोफेसर मोक्ष मूल्लर .... .... .... २७
पुणें ट्रेनिंग कालेजचा रिझल्ट १९००— अंक २
" " १९०१ .... .... २९९
प्रतिमासिक स्फुट विचार.
—अंक १—शालापत्रकांतील विषय—कै० मोती वलासा—ट्रेनिंग कालेजाची प्रवेश परीक्षा—नवीन इयत्तांविषयीं सूचना ... १
—अंक ३—देशीभाषांचा चंचुप्रवेश—महाराणीचें स्मारक ... ४९
—अंक ६—शिक्षकमित्र ... ... ... १३७
—अंक ७—कै० रामभाऊ गुंजीकर—प्लेगापासून संरक्षण—निवारक उपाय—प्लेग टोंचून घेणें—प्लेग टोंचण्याचें तत्व—या युक्तीच्या संबधाचे गैरसमज ... ... ... ... १६१
—अंक ८—लांगमनच्या मोडी पुस्त्यांच्या वह्या—या नव्या व्यवस्थेपासून फायदा काय—एक सूचना—प्राथमिक शिक्षकांची योग्यता. १८५

अंक९ –व्याकरण शिकविणें--मलांसशिक्षा देणें–शिक्षणपद्धतींचा विचार. २०९
–अंक १०–' फीमेल एज्युकेशन सोसायटी–इंग्रजी शिकविण्यास आरंभ–फीमेल हायस्कूल. ... ... ... २३३
प्राथमिक शिक्षणाची गेल्या सालची हकीगत. .... १२
मंजूर केलेल्या पुस्तकांची याद. .... .... १९९
मराठी भाषेची लेखनपद्धती. .... .... ५६,११८, १०७.
महादेव गोविंद रानडे. कै० वा० .... .... ३५
......................यांविषयीं प्रो. सेल्बी यांचे विचार. १९१
मीठ ... ... ... ... ... २३८
वनस्पतिशास्त्र... ... ... ... ... २४१
वनस्पतींच्या माहितीचा तक्ता. .... अंक १२
वस्तुपाठ–घरमाशी. .... .... .... ३२४
वाचन शिकविण्याविषयीं. .... .... .... ७
वार्षिक रिपोर्टांतील माहितीचा अवशेष. .... .... ९५
शिकविण्याच्या कित्येक पद्धतींविषयीं. .... .... ८९
शिक्षकमित्र [ निराळीं पृष्ठें ] .... .... १ पासून ८०
शिक्षकांस हितगुज. .... .... .... १९७
शिक्षणाविषयक व्याख्यानें ( निराळीं पृष्ठें ) १७७ पासून २००
सूक्ततरंग. .... .... ....१०४, १३२, १९८.
सूक्ष्मदर्शक यंत्र ... ... ... ... २१८
हवामान ... ... ... ... ११०

## चित्रें व आकृती.

महाराणी व्हिक्टोरिया .... .... अंक २
सातवे एडवर्ड महाराज .... .... अंक ४
रा. सा. काशिनाथ नारायण साने .... .... अंक ५
हवामानाच्या संबंधाच्या आकृती .... .... अंक ५
निरनिराळ्या प्रकारच्या कांचा .... .... पृष्ठ २२०
नेत्राची रचना .... .... .... २२१
सूक्ष्मदर्शक यंत्र .... .... .... २२३
माशी .... .... .... .... २२४
माशीचा डोळा, सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिलेला.... २२४
वृक्ष व त्याचे अवयव .... .... २९३

# शालापत्रक.

येथें शद्व नाहीं शिष्यांसी । हें अवघें सद्गुरूपाशीं।
सद्गुरू पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळां जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १५ जानेवारी १९०१. अंक १.

## प्रतिमासिक स्फुट विचार.

**शालापत्रकांतील विषय.** शालापत्रकांत अमुक विषय असावे, अमुक नसावे, या संबंधानें आमचेकडे मधून मधून पत्रें येत असतात. अशा प्रकारच्या सूचना आमच्या वाचकांकडून येतात, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. या सूचनांचा आम्ही सवडी-प्रमाणें योग्य विचार करीत असतों. परंतु कित्येक वेळा चमत्कारिक सूचना येतात, याबद्दल आश्चर्य वाटतें, व आमच्या शिक्षक मंडळी-ला आपल्या धंद्याचा व तत्संबंधाच्या विषयांचा व कर्तव्यांचा विसर पडला कीं काय, असें मनांत येतें! चमत्कारिक सूचनांचे थोडे मासले आजच्या अंकांत दाखवितों, म्हणजे आमचें म्हणणें चांगलें लक्षांत येईल. एकजण लिहितात, कीं गणिताचीं उदाहरणें व तत्संबंधाच्या चम-त्कारिक रीती, वगैरे पत्रकांत येणें ठीक आहे; परंतु 'गणित कसें शिकवावें' हा विषय घेऊन, 'बात्रिसांस सातांनीं भागलें, तर, भाग लागतो तिहींचा, बाकी राहेली एक,' हें शालापत्रकांत कशाला?

यावर आम्ही असें विचारतों, कीं गणित हा विषय किंवा दुसरा कोणचा-ही विषय, अगदीं लहान मुलापासून मोठ्यापर्यंत शिकवावा कसा, ह्याची चर्चा शाळापत्रकांत जर करावयाची नाहीं, तर कोठें करावयाची? अशा प्रकारची ज्यांची दृष्टी आहे, त्यांस आपण कालेजांत मोठे मोठे विषय शिकून तयार झालों, व आपणास आतां 'वेकंवे' शिकवावें लागतें, याची लाज वाटत असेल! शिक्षक केवढालेही मोठाले विषय शिकून तयार झाला असला, तरी त्याला 'लहानावरोबर लहान' होऊन, त्याच्या बोबड्या बोलांचें ही अनुकरण करण्याची हौस असल्योखेरीज तो उत्तम शिक्षक होणारच नाहीं. व असे क्षुल्लक वाटणारे ही विषय क्षुल्लक नव्हत, हें दाखविण्यासाठीं शालापत्रककारही असले 'पोरकट' विषय घेतात. दुसरे एक शंकाकार म्हणतात, कीं, "संस्कृतांतून मराठींत शब्द कसे येतात, हा विषय व्याकरणाचा नव्हे, तर भाषाशास्त्राचा आहे." व यांचे मतें व्याकरणाची चर्चा देखील शालापत्रकांत उपयोगीं नाहीं. मग व्याकरणाच्या पलीकडलें जें भाषाशास्त्र त्याची चर्चा शालापत्रकांत कशाला? आणखी कित्येकजणांनीं 'शुद्धलेखनपद्धतीच्या संबंधाची चर्चा शालापत्रकांत कां करितां?' म्हणून अनेकवार विचारलें आहे. एका मुंबईकर निनावी गृहस्थांनीं तर आम्हांस अशी धास्ती घातली आहे, कीं 'सानें, गोडबोले, हतवळणे व तुम्ही मिळून कितीही हुतुतू घातलीत, तरी तुमचें कोणीही ऐकणार नाहीं, व तुमच्या प्रयत्नांनीं कांहीं व्हावयाचें नाहीं!' या संबंधानें आमचें एवढेंच म्हणणें आहे, कीं मराठी भाषेची लिहिण्याची पद्धती व्यवस्थित असावी, असें आम्हांस वाटत आहे, व त्या पद्धतींत कांहीं अव्यवस्थेचे प्रकार असल्यास ते काढून टाकण्याचा प्रयत्न करणें हें आम्ही आपलें कर्तव्य समजतों; व तें आम्ही यथाशक्ती बजावीत आहों. आमच्या सूचना ज्यांना योग्य वाटतील त्यांनीं घ्याव्या. 'आमची आपली पूर्वापार व्यवस्था जी आहे ती ठीक आहे,' असें कोणास वाटत असल्यास त्यांनीं ती आपली अव्यवस्था घेऊन खुशाल बसावें. त्यांना हरकत कोणाची आहे? कित्येकांना शा-

लापत्रकांत मनोरंजक विषय पाहिजे आहेत. कित्येकांस 'ट्रान्स्हाल ब्रिटिश सरकारानें खालसा करावें कीं नाहीं ?' 'हिंदुस्थानांत दुष्काळ कशानें पडतात ?' 'राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष कोणास नेमावें ? असल्या विषयांवरही चर्चा पाहिजे आहे असें वाटतें. अशा प्रकारच्या कोणच्याही वाचकाची मनीषा आमच्यानें तृप्त करवत नाहीं, याबद्दल आम्हास दिलगिरी वाटते. शालापत्रक हें शिक्षक लोकांच्या उद्योगास उपयोगी पडतील, व त्यांना ज्यांपासून शिकवितांना साहाय्य होईल अशा प्रकारचे विषय लिहिण्यासाठीं आहे. असे विषय जितके 'मनोरंजक' होणें शक्य आहे, तितके करण्याचा आमचा प्रयत्न नेहमीं चाललेला असतो. तसेंच शालापत्रकांत अमुक विषय यावे व त्यांची चर्चा अमुक तऱ्हेनें व्हावी, अशा रीतीची दिशा ठरलेली आहे. तेव्हां त्या मर्यादेचे उल्लंघन आम्हास करितां यावयाचें नाहीं. यासंबंधानें आमच्या वाचकांचें आम्हांस साह्य पाहिजे. परंतु तें मिळावें तसें मिळत नाहीं, याबद्दल वाईट वाटतें. कांहीं ठरींव मंडळी खेरीज शालापत्रकांस कोणी कांहीं लिहून धाडीत नाहीं. शिक्षक लोकांस मनोरंजक होणारा विषय म्हटला म्हणजे निरनिराळे विषय शिकवितांना आलेले अनुभव, हा होय. परंतु त्या संबंधानें लिहावें असें कधीं ही कोणाच्या मनांत येत नाहीं एकंदरींत पाहातां आमच्या शिक्षक लोकांचे वृत्तींत आपल्या धंद्याचे संबंधानें अगदीं शिथिलता दृष्टीस पडते. यांचीं कारणें काय, याचा तर्क आम्हांस होत नाहीं असें नाहीं. परंतु त्याचें निराकरण शालापत्रकांतील विषयचर्चेच्या बाहेरचें आहे, तेथें आमचा उपाय नाहीं. शिक्षक लोकांचे पगार, त्यांच्या बदल्या, त्यांच्या हक्काकडे दुर्लक्ष, त्यांस दुष्काळांत महागाई न देणें, इत्यादि विषय ही बऱ्याच अंशी शालापत्रकाच्या मर्यादेच्या बाहेर आहेत. शिवाय दुसरी गोष्ट अशी आहे, कीं असल्या विषयाचे संबंधानें जीं पत्रें येतात, तीं बिननावीं, अपूर्ण माहितीनें, भीत भीत, आपणावर कांहीं जबाबदारी येणार नाहीं, अशा रीतीनें लिहिलेलीं, अशीं येतात. तेव्हां अशा माहितीवर विश्वासून पत्रककारांनीं असल्या भानगडींत कसें पडावें ? यामुळें असले विषय शिक्षकांच्या हिता-

हिताचे असतांहीं तिकडे दुर्लक्ष करणेंच भाग पडतें. सरते शेवटीं आमचीं आमच्या वाचकांस एवढीच प्रार्थना आहे कीं, शालापत्रकांतील विषय मनोरंजक करणें हें बहुतांशीं आमच्या वाचकांच्या प्रयत्नांवर अवलंबून आहे. आम्ही आपलें कर्तव्य यथाशक्ती करीत आहों. तसाच त्यांनींही फुरसतीप्रमाणें हातभार लाविला असतां पुष्कळ उपयोग होईल.

---

कैं० मोती बुलासा.

पुणें येथील न्यूइंग्लिश स्कुलांतील शिक्षक व डेक्कन एज्युकेशन सोसायटीचें लाईफ मेंबर मोती बुलासा भट्टड, हे इंग्लंडास एकेश्वरी पंथाच्या आश्रयाखालीं धर्मशिक्षण शिकण्यासाठीं जात होते, ते आगबोटीवरच अजारी पडून पोर्टसेड येथें मृत्यू पावले, हें दुर्वृत्त वर्तमानपत्रांवरून आमच्या वाचकांचे कानीं आलेंच असेल. यांच्या मरणानें आमच्या प्रांतांतील शिक्षक मंडळींतला एक उत्तम गृहस्थ अकालीं आपल्यास नाहींसा होऊन अपरंपार नुकसान झालें आहे. मोती बुलासा हे जातीचे मारवाडी होते. या लोकांतले हे पहिलेच ग्रॅज्युएट होते. हे मारवाडी असतांही यांना मराठी भाषा अगदीं स्वभाषेप्रमाणें येत होती, व त्यांना त्या भाषेंत लेख लिहिण्याची लहानपणापासून हौस असे. त्याचप्रमाणें ते उत्तम प्रकारचे शिक्षक होते. शिष्यांस त्यांच्या अभ्यासांत व परीक्षेचें विषय तयार करण्यांत उत्तम रीतीनें साहाय्य कसें करावें, ह्या गोष्टीच्यासंबंधानें त्यांचें कुशलत्व वाखाणण्यासारखे असे; व विद्यार्थ्यांस वर्तनाचें संबंधानें चांगलें वळण लागावें व त्यांचे विचारांस चांगली दिशा लागावी, यासाठीं त्यांचे नेहमीं परिश्रम चाललेले असत. यामुळें ते त्यांच्या हाताखालच्या विद्यार्थ्यांस व स्नेही मंडळीस अत्यंत प्रिय असत. विद्यार्थी तयार करणें व मराठी लेख लिहिणें, या दोन्हीं गोष्टींत ते नागपुरचे प्रख्यात विद्वान व थोर गुरू कैं० हरी माधव पंडित यांचे शिष्य होते; व या कामांतली त्यांची हतोटी त्यांनीं पूर्णपणें उचलली होती. पुण्यास आल्यावर न्यूइंग्लिश स्कुलांतलें आपलें काम संभाळून शिवाय अनेक लोकोपयोगीं कामांत ते मन घालीत

असत. त्यांच्या मित्र मंडळीचा एक क्लब आहे, त्याचे मार्फत अनेक उपयुक्त विषयांवर गेल्या वर्षी पुण्यास जीं व्याख्यानें झालीं, तीं यांचेच प्रयत्नांनीं झालीं. न्यूइंग्लिश स्कुलास जें बोर्डिंग जोडलें होतें, त्याची व्यवस्था बरेच दिवस यांचेकडे असे, व अशा प्रकारची संस्था पाश्चत्य देशांतल्या संस्थांप्रमाणें उपयुक्त व लोकप्रिय व्हावी, म्हणून यांचें प्रयत्न चालू होते. परंतु प्लेगमुळें ती संस्था तूर्त बंद करणें भाग पडलें. इंग्लंडांत जाऊन तिकडील शिक्षणपद्धतीचें अवलोकन करावें, तिकडील बोर्डिंगें पाहावीं, व तिकडच्या गोष्टी इकडे शिक्षण पद्धतींत कितपत लागू पडतील हे पाहावें, व आमच्या शिक्षणक्रमांत सुधारणा करण्याचा यत्न करावा, अशी त्यांची फार दिवसांपासून इच्छा असे. ती त्यांच्या तिकडे जाण्यानें पुष्कळ अशांनीं पूर्ण झाली असती, पण आपल्या दुर्भाग्यापुढें इलाज नाहीं. आमच्या इकडून विलायतेस धर्मशिक्षण घेण्यास जाणें म्हणजे काय, अशाबद्दल पुष्कळांस शंका येईल. तर त्याची हकीकत अशी आहे, कीं एकेश्वर मंडळी म्हणू एक धर्मपंथ आहे; त्या लोकांची मतें अशीं आहेत, कीं देव एक आहे, असें सर्वांनीं मानावें. मग धर्मसंबंधीं इतर व्यवहार कोणाचे कसेही असले तरी चिंता नाहीं. मात्र सर्व धर्मांचे मतें व जगांतील व्यवहाराचे दृष्टीनें ज्या गोष्टी पातकें म्हणून गणल्या आहेत, त्या अमान्य असल्या पाहिजेत. ह्या पंथाचे अनुयायी सर्व पृथ्वीभर पसरलेले आहेत, व या पंथांत सर्व धर्मांतले लोक येऊं शकतात. इंग्लंडांत माक्समूलरसारखे व मारटिन्यूसारखे थोर लोक या पंथांत असत व आहेत, आणि आमचे इकडले ब्राह्मपंथी व प्रार्थनासमाजपंथी, यांचा ही या पंथांत समावेश होतो. या पंथाच्या लोकांनीं आक्सफर्ड येथें एक विद्यालय स्थापन केलें आहे. या विद्यालयांत शिकविण्याचा मुख्य विषय धर्मतत्वांचा विचार, हा आहे. त्यामध्यें सध्याच्या कालमानाप्रमाणें सर्व धर्मांचा उदारदृष्टीनें विचार कसा करावा, हें शिकवितात, व पृथ्वीवरील सर्व धर्मांची माहिती करून देतात. तेव्हां धर्मविचार हा आमच्या लोकांत जुन्या काळापासून कितीही असला, तरी अशा नव्या तऱ्हेनें पृथ्वीवरील सर्व धर्मांचा विचार करणें, ही गोष्ट तिकडे

जाऊनच शिकावयास पाहिजे. या उद्देशानें तिकडे शिकावयास जाण्यासाठीं मोती यांस एकेश्वरी पंथाकडून स्कालरशिप मिळाली होती; व शिवाय आपला आवडता विषय जो शिक्षण, त्यासंबंधानें तिकडे मोती हे मुद्दाम माहिती करून घेणार होते. तेव्हां त्यांचे मरणानें आपल्या नव्या पिढीचें मोठें नुकसान झालें, असें म्हटलें पाहिजे. आमच्या शिक्षणपद्धतीस सध्या पाश्चिमात्य वळण लागलें आहे, हें कितपत हितावह आहे, त्यांत उणीवी काय आहेत, वगैरे गोष्टी इंग्लंडांत व शिक्षणाचे संबंधानें नांवाजलेले जे जर्मनी, स्वित्सरलंड, अमेरिका वगैरे इतर देश, तेथें जाऊन प्रत्यक्ष पाहाण्याची फार जरूर आहे. मोती हे या गोष्टी वेळांतवेळ करून पाहाणार होते. परंतु मुद्दाम त्यासाठीं तिकडे जाऊन इकडील गोष्टींची माहिती मिळविण्याचा यत्न कोणीं केल्यास मोठा उपयोग होईल. मोती यांच्या मित्रमंडळीस आमची अशी सूचना आहे, कीं त्यांनीं त्यांचीं व्याख्यानमालिका गतवर्षाप्रमाणेंच यंदांही होईल अशी तजवीज करावी; व तिला ' मोती बुलासा-व्याख्यानमाला, ' असें नांव देऊन, तें त्यांचें स्मारक करावें.

---

ट्रेनिंग कालेजची प्रवेश परीक्षा.

ट्रेनिंग कालेजच्या प्रवेश परीक्षेच्या संबंधानें आम्हीं मागें अशी सूचना केली होती, कीं ही परीक्षा प्रश्नांचे कागद जिल्हा जिल्ह्याला पाठवून घ्यावी. अशा व्यवस्थेची जरूर किती आहे, हें यंदां दिसून आलें. यंदा प्रथमतः साठ विद्यार्थी नवीन घ्यावयाचे अशी नोटीस होती; व १३६ विद्यार्थी परीक्षेस आले. त्यांतले अखेरीस ४१ विद्यार्थी घेतले; म्हणजे अर्थात् सव्वाशें लोकांस ठिकठिकाणाहून पुण्यास उगाच यावें लागलें. तेव्हां अशा रीतीनें इतक्या जणांस त्रास व व्यर्थ खर्च करणें भाग पडणार, त्यापेक्षां ट्रेनिंगच्या शिक्षकांनीं प्रश्न काढून त्यांचीं उत्तरें बाहेरून लिहून आणिलीं, म्हणून त्यांत नुकसान काय होईल ? विद्यार्थ्यांचीं उत्तरें तपासून त्यांची योग्यता पाहणें हें काम ट्रेनिंगचे प्रिन्सिपाल साहेब यांजकडेसच राहील. शिवाय विद्यार्थ्यांची शरीरप्रकृती नीट न दिसल्यास त्यांस येथें

आल्यावर ही परत जावें लागेल, एवढें ठरविलें म्हणजे झालें. ट्रेनिंगचे प्रिन्सिपाल साहेब या आमच्या सूचनेचा विचार करून अशी काहीं व्यवस्था करविण्याची शिफारस करतील तर पुष्कळ गरीब विद्यार्थ्यांचा त्रास चुकेल.

---

नवीन इयत्तांविषयीं सूचनापर अशीं कित्येक पत्रें आमचेकडे आलीं आहेत. परंतु नवीन ठरावयाच्या इयत्ता शाळाखा त्याच्या अधिकाऱ्यांकडून ठरवून झाल्या व त्या लौकरच प्रसिद्ध होतील. यासाठीं आतां चर्चा करण्यांत अर्थ नाहीं. खेरीज आमचेकडे जीं पत्रें आतां शिल्लक आहेत, त्यांत आजपर्यंत शालापत्रकांत येऊन गेलेल्या चर्चेपेक्षां जास्त कांहीं नाहीं. नवीन इयत्ता झाल्यावर त्यांप्रमाणें व शिक्षणसभेत झालेल्या चर्चेप्रमाणें शिकविण्यास योग्य अशीं पुस्तकें तयार करणें, या गोष्टीची जरूर आहे. यासाठीं पुस्तकांच्या संबंधानें कोणास कांहीं लिहिणें असल्यास लिहावें.

नवीन इयत्तां-
विषयीं सूचना.

---

## वाचन शिकविण्याच्या व्यर्थ खटपटी.

:*:

आमच्या देशांत प्राचीन काळीं गुरूनें तोंडानें सांगावयाचें व शिष्यानें तें ऐकून तसें म्हणावयाचें व पाठ करावयाचें, अशी कोणचीही विद्या शिकविण्याची पद्धत होती. ज्यावेळीं छापखानें नव्हते, व ग्रंथ पुष्कळ लिहितां येतील अशा रीतीचे कागद ही नव्हते, तेव्हां हीच पद्धत विशेष सोयीची होती, हें उघड आहे. आमचे इकडे छापखान्याचा प्रघात जरी लौकर पडला नाहीं, तरी ब्राह्मण, बौद्ध व जैन धर्मांच्या लोकांमधील विद्याप्रसारामुळें ग्रंथ लिहून काढणें, त्यांच्या निरनिराळ्या प्रती बनविणें व ग्रंथावरून विषय पाहाणें किंवा वाचणें या गोष्टींचा प्रघात पुष्कळ दिवसांपासून आहे. विद्या व शास्त्रें यांची मर्यादा जसजशी वाढत गेली, तसतसे ग्रंथही पुष्कळ होत गेले, व ते आपल्या स्वतःच्या संग्रहासाठीं किंवा लोकांसाठीं लिहून काढणें हा धंदाच झाला. सर्व देशभर चोहोंकडे विद्याव्यासंगी

लोकांचीं पुस्तकसंग्रहस्थानें मागें आमचें इकडे पुष्कळ असत, व केवळ स्वत: पुस्तकावरून वाचून विद्याभ्यास करणारे लोक ही पुष्कळ असत. 'वाचन' या शब्दाचा मूळचा अर्थ पाहिला तर 'बोलविणें,' 'म्हणविणें,' असा आहे. म्हणजे गुरूनें प्रथमत: आपण म्हणणें ('वच्' बोलणें किंवा म्हणणें), व मग शिष्याकडून तसें म्हणून घेणें; (वच्-याचें प्रयोजक वाच्-बोलवणें, म्हणविणें). तेव्हां 'वाचन' या शब्दाच्या इतिहासावरून पुस्तकाकडे पाहून तेथें लिहिलें असेल तें तोंडानें आपण म्हणणें, याला प्रथमत: वाचन म्हणत असतील असें वाटत नाहीं. तर गुरुमुखांतुन जी 'संथा' मिळे, ती परत म्हणणें, यास वाचन म्हणत असें दिसतें. पुढें जरासे पुढें गेलेले, व बरेच स्वावलंबी झालेले विद्यार्थी यांस गुरूच्या ठिकाणीं ग्रंथ झाल्यावर, ग्रंथाकडे पाहून म्हणणें, याला 'वाचन' हाच शब्द लावूं लागले; व याच अर्थानें हा शब्द पुढें विशेष प्रचारांत राहिला. 'वाचन' या शब्दाचा मूळचा अर्थ काय, व सांप्रत कोणचा अर्थ झाला आहे, हें स्पष्ट रीतीचें सांगण्याचें कारण असें आहे, कीं सांप्रत आमच्या शाळांत वाचावयास शिकविण्याचा जी पद्धत पडत चालली आहे, व जिच्याकरितां आज अनेक प्रकारच्या खटपटी सुरू आहेत, त्यासंबंधानें जी थोडी टीका आज आम्ही करणार आहों, ती निटपणें लक्षांत यावी.

आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस जरि इंग्रजी भाषा येत नसली, तरी त्या भाषेची व दुसऱ्या पुष्कळ युरोपियन भाषांची लिपी कशी आहे, हें बहुधा सर्व शिक्षक लोकांस ठाऊक झालेलें असेलच. कदाचित् कोणास नीटपणें ठाऊक नसल्यास, त्यानें या गोष्टीची माहिती करून घ्यावी; कारण त्या माहितीचा शिक्षणाचे कामांत उपयोग आहे. इंग्रजी भाषेची व तिच्या लिपीची अशी स्थिती आहे, कीं भाषेंत जे निरनिराळ्या प्रकारचे उच्चार होतात, ते सर्व पृथक्पणें दाखवितां येतील, इतकीं मुळाक्षरें त्या लिपींत नाहींत. यामुळें अशी स्थिती झाली आहे, कीं एकाच अक्षराचे वांट्यास एकापेक्षां जास्त, केव्हां केव्हां आठ दाहा सुद्धां उच्चार

येतात. असें असल्यावर इंग्रजीसारख्या भाषेंत 'वाचन' हा विषय कठीण होईल, व तो शिकविण्यास गुरूंकडून विशेष यत्न झाले पाहिजेत, हें उघड आहे. आमच्या देशांतल्या सर्व भाषा, व त्यांची मूळची संस्कृत भाषा व त्या सर्वांची जी देवनागरी लिपी, किंवा तिच्याच अनुरोधानें झालेल्या दुसऱ्या लिप्या, यांची गोष्ट अशी आहे, कीं या भाषांत जेवढे म्हणून उच्चार होतात, ते सर्व दाखविण्याची सोय त्यांत आहे. हे उच्चार ही पुनः चिनीभाषेसारखे पांचचारशें नाहींत, कीं तितक्यांना खुणा ठरविल्या पाहिजेत. तर ते थोडेच असून एकासारखा दुसरा उच्चार असे-निरनिराळ्या शब्दांत होणारे सारखे उच्चार ठरलेले आहेत. यामुळें 'अमुक एक अक्षर आलें कीं अमुक उच्चार व्हावयाचा व असें वाचावयाचें' असें सांगून दिलें, कीं मग तशीं अक्षरें जेथें येतील, तेथें वाचणारास पुस्तकावर लिहिलेलें पाहून तसेंच वाचितां येईल. त्यांत मग चुकी होणार नाहीं. अशा प्रकारची हिंदुस्थानांतील सर्व भाषांची सोय आहे. आतां उत्तर हिंदुस्थानांतील कित्येक देशी भाषांना आरबी व पारशी भाषांचा सहवास झाल्यामुळें, व अलीकडे इंग्रजीभाषेंतून शब्द घ्यावे लागतात, यामुळें जे दाखविण्यास खुणा म्हणजे मुळाक्षरें नाहींत, असे बरेच उच्चार आमच्या भाषांतून आले आहेत. पण सध्या कठीण आरबी व पारशी शब्द भाषेंतून काढून टाकण्याकडे प्रवृत्ती फार आहे; व जे तसले शब्द निरुपायास्तव भाषेंत राहणारच, त्यांच्या उच्चाराला बहुतेक आम्हीं स्वदेशी स्वरूप देऊन टाकिलें आहे. असा प्रकार इंग्रजी शब्दांचे संबंधानें ही झाला आहे व होत आहे. खेरीज इंग्रजी भाषेचा प्रसार आपल्या लोकांत फार झाल्यामुळें, इंग्रजी शब्द देशीभाषेंत लिहिण्याचा प्रसंग आल्यास आम्हीं ते मूळच्या लिपींत ही लिहितों; व ते वाचण्याची आम्हास अडचण पडत नाहीं. तेव्हां परकी शब्द आम्हांस आमच्या लिपींत कसे लिहितां व वाचतां येतील, या गोष्टीची आम्हांस फारशी काळजी करावयास नको. दुसरी गोष्ट अशी आहे, कीं आमची देवनागरी लिपी अशा चमत्कारिक प्रकारें सोयीची आहे, कीं तिच्यामध्यें थोडीशी कांहीं युक्ती करून हव्या त्या भाषेंतले उच्चार सहज लिहितां व वाचितां

येतात. तेव्हां इंग्रजी भाषेच्या लिपींत ज्या अडचणी येतात, त्या आमच्या भाषेच्या लिपींत येण्याचा संभव फार कमी आहे, हें सहज लक्षांत येईल.

आमच्या लिपीमध्यें एकुणतीस व्यंजनें, चौदा स्वर व अनुस्वार आणि विसर्ग, मिळून पंचेचाळीस खुणा आहेत. त्यांच्या योगानें आमच्या भाषेंतले सर्व उच्चार लिहितां येतात. इंग्रजी भाषेच्या लिपींत सर्व अक्षरें सव्वीस असून, खरोखर उपयोगाचीं अशीं अक्षरे तेवीसच आहेत; व त्यांत फक्त पांचस्वर व दोन अर्ध स्वर आहेत. परंतु स्वरांचे व व्यंजनांचे मिळून स्पष्ट उच्चार ३६ आहेत, व त्यांच्या सर्व मिळून एकंदर तऱ्हा ६९ आहेत. इतक्या तऱ्हा थोड्या अक्षरांस व विशेषेंकरून थोडक्या स्वरांस व त्यांच्या निरनिराळ्या संयोगांस वाटून द्यावयाचे, म्हणजे त्यापासून वाचन फार कठीण होईल, हें उघडच आहे. तेव्हां मुख्यतः या कारणानें इंग्रजींत वाचन हा विषय कठीण झाला आहे. असाच प्रकार फ्रेंच भाषेच्या संबंधानें ही आहे. जर्मन भाषेच्या संबंधानें मात्र व्यवस्थित प्रकार आहे, व यामुळें त्या भाषेंतील उच्चार व तिचें वाचन तितकें कठीण नाहीं असें म्हणतात.

इंग्रजी भाषेचें वाचन कठीण असल्यामुळें तें लहान मुलांना शिकविण्याच्या अनेक पद्धती आजपर्यंत निघाल्या आहेत व निघत आहेत. त्या सर्वांचा उद्देश असा, कीं मुलांना लिहिलेला शब्द पाहिल्याबरोबर थोडक्यांत त्या शब्दाचा उच्चार कळावा. यासाठीं एकाच अक्षराचे भिन्न उच्चार कळण्यासाठीं त्यांचेवर तऱ्हेतऱ्हेच्या खुणा करितात. शिवाय निरनिराळ्या शब्दांची ओळख पटण्यासाठीं चित्रें काढितात. अशा रीतीनें सचित्र मुळाक्षरें व अक्षरांचे चित्रपट उपयोगांत आले आहेत. त्यांचें अनुकरण आमच्या इकडेही मोठ्या झपाट्यानें होत आहे.

वर जें सांगितले आहे, त्यावरून आमची लिपी व तिचें वाचन आणि पाश्चात्य लिपी व तिचें वाचन यांमध्यें भेद केवढा आहे, व तिकडच्या वाचन शिकविण्याच्या पद्धतीचें अनुकरण आम्हीं करणें कितपत फायद्याचें किंवा नुकसानीचें आहे, हें विचारी शिक्षकास दिसून येईल. अलीकडे मूळाक्षराचीं सचित्र पुस्तकें व चित्रपट पुष्कळ झाले आहेत व नवीन तयार होत आहेत. त्यांचा मूळ उद्देश व आपली लिपी या गोष्टी नीट

लक्षांत न ठेवितां जर त्यांचा केवळ अनुकरणदृष्टीनें उपयोग केला तर उलट हीं पुस्तकें वगैरे उपयुक्त न होतां घातक होतील. त्यांपासून कदाचित् कोवळ्या मनाच्या मुलांना असें वाटण्याचा संभव आहे, कीं वाचन हा केवढा कठीण विषय आहे? या पुस्तकांचा व चित्रांचा मूळ उद्देश असा आहे, कीं चित्रें काढून त्यांवरून मुलांना अक्षरांची ओळख करून द्यावी. अक्षरांचे उच्चार कठीण नाहींत, व इंग्रजी लिपीप्रमाणें एकाच अक्षराचे अनेक उच्चार आमच्या लिपींत नाहींत, यामुळें मुलांना आम्हांस चित्रांवरून उच्चारांची व शब्दांची ओळख करून द्यावयास नको आहे. या आमच्या म्हणण्याच्या स्पष्टीकरणार्थ थोडीं उदाहरणें सांगतों.

'अ' या अक्षराची ओळख करून देण्यासाठीं 'अननस' ह्या फळाचें चित्र दिलेलें असतें. या सोप्या शब्दांत तीन मुळाक्षरें आहेत; व 'अननस' हें फळ ज्या मुलांनीं पाहिलें असेल, त्यांना 'अ' या अक्षराची व पाहिजे तरी ह्या तिन्ही अक्षरांची ओळख करून देण्यास सोपें जाईल. पण हें फळ महाराष्ट्रांतील कांहीं नियमित भागांत मात्र दृष्टीस पडतें. बाकीच्या ठिकाणच्या मुलांना 'अननस' म्हणजे काय, हें समजून देण्यास शिक्षकास केवढी खटपट करावी लागेल? ही खटपट 'अ' 'न' आणि 'स' ह्या तिन्ही अक्षरांच्या सोपेपणाचें मनानें खरोखरी विलक्षणच होईल! दुसरा शब्द 'ईडलिंबू' हा घ्या. इतकीं अक्षरें व या फळाबद्दलची माहिती, एवढ्या खटपटीनें शिकवावयाचें काय, तर 'ई' हें अक्षर! हें 'ईडलिंबू' फार थोड्या मुलांना माहीत असेल, व थोड्याच ठिकाणीं याची माहिती करून देणें शक्य आहे. 'ऋ' या अक्षराची माहिती करून देण्यास 'ऋषी' चें चित्र काढिलेलें असतें. अगोदर 'ऋ' हें अक्षर कठीण आहे; व त्याचा उपयोगही साध्या मराठी शब्दांत होत नाहीं. तेव्हां त्याची माहिती आरंभींच मुलांना न झाली तरी चालणार आहे. याच उद्देशानें आमच्या जुन्या वर्णमालेंत ऋ, ॠ, ऌ, ॡ, हीं अक्षरें गणतीमध्यें धरीत देखील नसत. केवळ 'ऋ' हें अक्षर लिहिण्याचें कठीण आहे असें नाहीं. त्याचा उच्चार कठीण आहे. वास्तवीक हें अक्षरच त्याचा उच्चार, इतकें

तेव्हांच ध्यानांत राहील. परंतु आधींच 'ऋ' अक्षर कठीण; त्यांत आणखी त्याबरोबरच उच्चारास फार कठीण असें 'ष' हें अक्षर मुलांस सांगावयाचें, व खेरीज प्राचीन 'ऋषी' ची ओळख करून द्यावयाची!

आतां कित्येक अक्षरांकरितां जीं चित्रें काढीत असतात, तीं फार सोपीं आहेत, व मुलांच्या दृष्टीसमोर असणाऱ्या पदार्थांची आहेत. उदाहरणार्थ, कमळ, घर, चवरी, छत्री, ढग, दरवाजा, धनुष्य, नगारा, पतंग, भटजी, हत्ती, वगैरे. अशा सारख्या पदार्थांचीं चित्रें व क्वचित ते पदार्थही दाखवून, "अमुक पदार्थाचें नांव फळ्यावर कसें लिहावयाचें, तें पहा," अशा रीतीनें मुलाचें लक्ष तिकडे जाईसें करून, अक्षर ओळख करितां येईल. परंतु ध्यानांत येण्यास कठीण, कधीं दृष्टीपुढें न असणारा, अशा पदार्थाचें चित्र दाखविण्यापेक्षां तें अक्षरच नुस्तें फळ्यावर लिहावें, व 'हें अमुक अक्षर' म्हणून सांगावें म्हणजे झालें. दुसरी गोष्ट अशी आहे, कीं चित्रपटावर जें चित्र काढलें असतें, त्यांतल्या सर्व अक्षरांची ओळख करून देण्याचा तें चित्र-काढण्यांत उद्देश नसतो, तर आद्याक्षर तेवढें मुलांस समजून देण्याचा उद्देश असतो. सबंध शब्द हा केवळ शिक्षकांकरितां असतो. चित्रपटाचा उपयोग करितांना हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे.

यावर कोणी असें म्हणेल, कीं सोपे असे शब्द जर नाहींत, तर काय करावें? मग कठीण शब्दही दाखविण्यास नकोत काय? तर यास उत्तर एवढेंच आहे, कीं सोपे शब्द नाहींत, या बद्दलचा दोष कोणाकडे नाहीं. पण सोपे शब्द नाहींत म्हणून कठीण शब्द दाखवून आरंभींच शिकवावयाचा विषय मुलांना कंटाळवाणा होईल असें करणें इष्ट नाहीं. तेव्हां चित्रें देण्यांत व चित्रें दाखविण्यांत तारतम्यभाव न राहिल्यामुळें जी चुकी होण्याचा संभव आहे, तिच्याकडे आमचा कटाक्ष आहे, हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

लहान मुलांची बुद्धी फार तरतरीत असते, दृष्टलोभ विलक्षण असतो, व चित्रें वगैरे पाहण्याची हौस फार असते. यासाठीं प्रथमारंभीं मुलांचे हातांत द्यावयाचीं पुस्तकें चित्रमय असावीं. परंतु अगदीं आरंभीं चित्रें देणें तीं जे पदार्थ मुलांना माहित आहेत, त्यांचीच देऊन, आपण चित्र

ओळखलें, याबद्दल मुलांस भूषण वाटेल अशी तजवीज ठेवावी. मग त्यांतले त्यांतच अक्षर ओळख करावी. पण सहजीं दाखवितां येईल अशा चित्रानें अक्षर ओळख करावी. प्रथमतः चित्राची व त्या पदार्थाची ओळख, व मग अक्षरांची ओळख, असली खटपट करूं नये. यासाठीं ओळखीचे पदार्थ दाखवितां येत नाहींत, असल्या अक्षरांची ओळख सोयीसोयीनें झाली तरी चालेल. कारण आम्हीं मागें सांगितलेंच आहे, कीं आमचीं अक्षरें वाचायला फार कठीण नाहींत, व अक्षरांची जीं नांवें तेच त्यांचे उच्चार, अशी सोय असल्यामुळें अक्षरओळख होण्यास फारशी खटपट नको आहे

बऱ्याच अक्षरांची ओळख झाल्यावर, झाडें, पशु पक्षी, डोंगर, नद्या घरें, देवळें इत्यादि चित्रें दाखवावीं. हीं चित्रेंही प्रथमतः मुलं [illegible] अक्षरांनीं ओळखतील, अशींच असावीं. नंतर पायरीपायरीनें अधिकाधिक कठीण, अशा पदार्थांचीं चित्रें दाखवून, मुलांचें मनोरंजन होऊन पदार्थांची माहिती होईल असें करावें, व त्यांबरोबरच अक्षर ओळख करावी

तेव्हां अक्षरओळख होण्यासाठीं झालेलीं सचित्र पुस्तकें व चित्रपट यांच्या संबंधानें शाळेंतील शिक्षक व वरीं मुलांस माहिती करून देणारी मंडळी, यांस इतकीच सावधगिरीची सूचना करणें [illegible] आहे, कीं हीं जीं पुस्तकें व चित्रपट आहेत, त्यांचा मूळ हेतू लक्षांत ठेवावा चित्रें दाखविणें हा वास्तविक मूळ हेतू नाहीं. तर मुळाक्षरें शिकविणें, हा मूळ हेतू आहे. सध्याच्या कित्येक पुस्तकांतून व चित्रपटांतून हा हेतू विसरून जाऊन काढलेलीं चित्रें आहेत. कित्येकांत फार आहेत, कित्येकांत कमी आहेत. अमुक एक अक्षरासाठीं वहिवाटींतल्या पदार्थाचें चित्र काढतां येत असो वा नसो, एक चित्र काढून दिलेंच पाहिजे अशी समजूत हीं चित्रें काढणाराची झालेली दिसते. ही तजवीज म्हणजे पाश्चिमात्य देशांतील अशा प्रकारच्या तजविजींचें वाईट अनुकरण असल्यामुळें अमका चुका आरंभाला होणें साहाजिक आहे. परंतु शिकविणारांनीं सावधगिरी राखून दुष्परिणाम टाळले पाहिजेत; नाहीं तर या सर्व वाचन शिकविण्याच्या खटपटी व्यर्थ होऊन वाचन हा मोठा बाऊ आहे अशी मनात लहान मुलांच्या मनात अढी बसेल व ती काढणें फार कठीण पडेल.

| तारीख. | जानेवारी. | | फेब्रूवारी. | | मार्च. | | एप्रील. | | मे. | | जून. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पौष, माघ. | | माघ, फाल्गुन. | | फाल्गुन, चैत्र. | | चैत्र, वैशाख. | | वैशाख, ज्येष्ठ. | | ज्येष्ठ, आषाढ. | |
| | तिथि. | वार. | तिथि. | वार. | तिथि. | वार. | तिथि. | वार. | तिथि. | वार. | तिथि. | वार. |
| १ | ११ | मं. | १३ | शु. | ११ | शु. | १३ | सो. | १३ | बु. | १४ | श. |
| २ | १२ | बु. | १४ | श. | १२ | श. | १४ | मं. | १४ | गु. | १५ | र. |
| ३ | १३ | गु. | १५ | र. | १३ | र. | १५ | बु. | १५ | शु. | १ | सो. |
| ४ | १५ | शु. | १ | सो. | १४ | सो. | १ | गु. | १ | श. | २ | मं. |
| ५ | १ | श. | २ | मं. | १५ | मं. | १ | शु. | २ | र. | ३ | बु. |
| ६ | २ | र. | ३ | बु. | १ | बु. | २ | श. | ३ | सो. | ४ | गु. |
| ७ | ३ | सो. | ४ | गु. | २ | गु. | ३ | र. | ४ | मं. | ५ | शु. |
| ८ | ४ | मं. | ५ | शु. | ३ | शु. | ४ | सो. | ५ | बु. | ६ | श. |
| ९ | ५ | बु. | ६ | श. | ४ | श. | ५ | मं. | ६ | गु. | ७ | र. |
| १० | ५ | गु. | ७ | र. | ५ | र. | ६ | बु. | ७ | शु. | ८ | सो. |
| ११ | ६ | शु. | ७ | सो. | ६ | सो. | ७ | गु. | ८ | श. | ९ | मं. |
| १२ | ७ | श. | ८ | मं. | ७ | मं. | ८ | शु. | ९ | र. | १० | बु. |
| १३ | ८ | र. | ९ | बु. | ८ | बु. | ९ | श. | १० | सो. | १२ | गु. |
| १४ | ९ | सो. | १० | गु. | ९ | गु. | १० | र. | ११ | मं. | १३ | शु. |
| १५ | १० | मं. | ११ | शु. | १० | शु. | ११ | सो. | १२ | बु. | १४ | श. |
| १६ | ११ | बु. | १२ | श. | ११ | श. | १२ | मं. | १३ | गु. | ३० | र. |
| १७ | १२ | गु. | १३ | र. | १२ | र. | १३ | बु. | १४ | शु. | १ | सो. |
| १८ | १३ | शु. | १४ | सो. | १३ | सो. | ३० | गु. | ३० | श. | २ | मं. |
| १९ | १४ | श. | ३० | मं. | १४ | मं. | १ | शु. | १ | र. | ३ | बु. |
| २० | ३० | र. | २ | बु. | ३० | बु. | २ | श. | २ | सो. | ४ | गु. |
| २१ | १ | सो. | ३ | गु. | १ | गु. | ३ | र. | ४ | मं. | ५ | शु. |
| २२ | २ | मं. | ४ | शु. | २ | शु. | ४ | सो. | ५ | बु. | ६ | श. |
| २३ | ३ | बु. | ५ | श. | ३ | श. | ५ | मं. | ६ | गु. | ७ | र. |
| २४ | ४ | गु. | ६ | र. | ४ | र. | ६ | बु. | ७ | शु. | ८ | सो. |
| २५ | ५ | शु. | ७ | सो. | ५ | सो. | ७ | गु. | ८ | श. | ९ | मं. |
| २६ | ६ | श. | ८ | मं. | ७ | मं. | ८ | शु. | ९ | र. | १० | बु. |
| २७ | ८ | र. | ९ | बु. | ८ | बु. | ९ | श. | १० | सो. | ११ | गु. |
| २८ | ९ | सो. | १० | गु. | ९ | गु. | १० | र. | ११ | मं. | १२ | शु. |
| २९ | १० | मं. | | | १० | शु. | ११ | सो. | ११ | बु. | १३ | श. |
| ३० | ११ | बु. | | | ११ | श. | १२ | मं. | १२ | गु. | १४ | र. |
| ३१ | १२ | गु. | | | १२ | र. | | | १३ | शु. | | |

# पंचांग.

| तारीख. | जुलई. | | आगष्ट. | | सप्टेंबर. | | आक्टोबर. | | नवेंबर. | | डिसेंबर. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आषाढ, अ० श्रावण. | | अ० श्रावण, श्रावण. | | श्रावण, भाद्रपद. | | भाद्रपद, आश्विन. | | आश्विन, कार्तिक. | | कार्तिक, मार्गशीर्ष. | |
| | तिथि. | वार. | तिथि. | वार. | तिथि. | वार. | तिथि. | वार. | तिथि. | वार. | तिथि. | वार. |
| १ | १५ | सो. | १ | गु. | ३ | र. | ४ | मं. | ५ | शु. | ६ | र. |
| २ | १ | मं. | २ | शु. | ४ | सो. | ५ | बु. | ६ | श. | ७ | सो. |
| ३ | २ | बु. | ३ | श. | ५ | मं. | ६ | गु. | ८ | र. | ८ | मं. |
| ४ | ३ | गु. | ४ | र. | ६ | बु. | ७ | शु. | ९ | सो. | ९ | बु. |
| ५ | ४ | शु. | ५ | सो. | ७ | गु. | ८ | श. | १० | मं. | १० | गु. |
| ६ | ५ | श. | ७ | मं. | ८ | शु. | ९ | र. | ११ | बु. | ११ | शु. |
| ७ | ६ | र. | ८ | बु. | ९ | श. | १० | सो. | १२ | गु. | १२ | श. |
| ८ | ७ | सो. | ९ | गु. | ११ | र. | ११ | मं. | १२ | शु. | १३ | र. |
| ९ | ८ | मं. | १० | शु. | १२ | सो. | १२ | बु. | १३ | श. | १४ | सो. |
| १० | ९ | बु. | ११ | श. | १३ | मं. | १३ | गु. | १४ | र. | ३० | मं. |
| ११ | १० | गु. | १२ | र. | १४ | बु. | १४ | शु. | ३० | सो. | ३० | बु. |
| १२ | ११ | शु. | १३ | सो. | ३० | गु. | ३० | श. | १ | मं. | १ | गु. |
| १३ | १२ | श. | १४ | मं. | १ | शु. | १ | र. | २ | बु. | २ | शु. |
| १४ | १३ | र. | ३० | बु. | २ | श. | २ | सो. | ३ | गु. | ३ | श. |
| १५ | ३० | सो. | १ | गु. | ३ | र. | ३ | मं. | ४ | शु. | ४ | र. |
| १६ | १ | मं. | २ | शु. | ३ | सो. | ४ | बु. | ५ | श. | ५ | सो. |
| १७ | २ | बु. | ३ | श. | ४ | मं. | ५ | गु. | ६ | र. | ६ | मं. |
| १८ | ३ | गु. | ४ | र. | ५ | बु. | ६ | शु. | ७ | सो. | ७ | बु. |
| १९ | ४ | शु. | ५ | सो. | ६ | गु. | ७ | श. | ८ | मं. | ८ | गु. |
| २० | ५ | श. | ६ | मं. | ७ | शु. | ८ | र. | ९ | बु. | १० | शु. |
| २१ | ६ | र. | ७ | बु. | ८ | श. | ९ | सो. | १० | गु. | ११ | श. |
| २२ | ७ | सो. | ८ | गु. | ९ | र. | १० | मं. | ११ | शु. | १२ | र. |
| २३ | ७ | मं. | ९ | शु. | १० | सो. | ११ | बु. | १२ | श. | १३ | सो. |
| २४ | ८ | बु. | १० | श. | ११ | मं. | १२ | गु. | १३ | र. | १४ | मं. |
| २५ | ९ | गु. | ११ | र. | १२ | बु. | १३ | शु. | १४ | सो. | १५ | बु. |
| २६ | १० | शु. | १२ | सो. | १३ | गु. | १४ | श. | १ | मं. | १ | गु. |
| २७ | ११ | श. | १३ | मं. | १४ | शु. | १५ | र. | २ | बु. | २ | शु. |
| २८ | १२ | र. | १४ | बु. | १५ | श. | १ | सो. | ३ | गु. | ३ | श. |
| २९ | १३ | सो. | १५ | गु. | १ | र. | २ | मं. | ४ | शु. | ४ | र. |
| ३० | १४ | मं. | १ | शु. | २ | सो. | ३ | बु. | ५ | श. | ५ | सो. |
| ३१ | १५ | बु. | २ | श. | | | ४ | गु. | | | ६ | मं. |

# पत्रव्यवहार.

## ( १ ) मध्य भागांतील शिक्षक लोक व त्यांची स्थिती.

कांहीं कारणपरत्वें शाळाखात्यांतील सेंट्रल डिव्हिजनची मास्तर लोकांची डायरेक्टरी पाहण्याचा प्रसंग आला त्यावरून जे विचार सुचले आहेत ते आपणास सादर करीत आहें. या सेंट्रल डिव्हिजनमध्यें पुणें, सातारा, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, खानदेश हे जिल्हे तर आहेत, परंतु याशिवाय या डायरेक्टरीमध्यें मुंबई बेट ठाणें, कुलाबा, रत्नागिरी यांही जिल्ह्यांचा समावेश केला आहे. एकंदरीनें पाहिलें तर हा बराच मोठा टापू आहे. तेव्हां यांतील विद्यादान देण्याचें काम कोणकोणत्या जातींनीं उचललें आहे व त्याबद्दल त्यांना मुशाहिरा काय मिळत असतो, याचा विचार केला असतां अगदींच वावगें होणार नाहीं असें वाटतें. या डायरेक्टरीमध्यें फक्त ट्रेनिंगकालेजामधून जे मास्तर पास होऊन आले आहेत त्यांचींच फक्त नांवें आहेत. व शिवाय ( untrained ) न शिकलेले परंतु हेडमास्तरच्या कामावर असलेले लोक यांचीही पण नांवें आहेत. शिवाय संस्थानांत काम करीत असलेल्या मंडळींचीही नांवें दिलीं आहेत. या एकंदर शिक्षक समूहाची संख्या २८९१ आहे. यांपैकीं बहुतेक ट्रेनिंग कालेजामधील आहेत, याचा विचार केला म्हणजे सरकारानें लोकांस खरोखर चांगले शिक्षक दिले आहेत यांत संशय नाहीं; व ट्रेनिंगकालेजाचा हेतू पुष्कळ अंशीं सिद्धीस गेला आहे, हें पाहून सरकारास धन्यता वाटणें अगदीं साहजिक आहे. इतक्या लोकांनीं ट्रेनिंग कालेजांत शिक्षक होण्यासाठीं जाणें हें जसें विवक्षित जातींना शिक्षक होण्याची हौस आहे असें दाखवितें, तसेंच त्या ट्रेनिंग कालेजांत कांहीं तरी मोहकपणा अवश्य आहे असेंही प्रत्ययास आणतें. कारण वऱ्हाडांतील ट्रेनिंग कालेजांत विद्यार्थी मिळण्याची मारामार पडते आणि येथें पाहावें तों तोबा उडतो. याचें कारण ही पण उघड आहे. तें हेंच कीं या ठिकाणीं शिक्षक लोकांना योग्य मुशाहिरा मिळत असा-

वा व असा समज होणें हें साहजिक आहे. परंतु वस्तुस्थिती तशी आहे कीं, काय हें आपण पाहूं. वरील सांगितलेल्या संख्येपैकीं जिल्हेवार शिक्षकांची वांटणी येणेंप्रमाणें आहे. जिल्हा पुणें ३२१ शिक्षक मंडळी; सातारा जिल्हा ३८९, सोलापूर २५४, नगर२ ७४, नाशिक २६१, खानदेश ५४३, मुंबईबेट ९३, ठाणें २४८, कुलाबा २१३, रत्नागिरी २७५, या शिक्षकांपैकीं ब्राम्हण, मुसलमान मराठे, व इतर मंडळींची जिल्हेवार जातवारी पुढें दिल्याप्रमाणें आहे. या जातवारींत ब्राह्मण या संज्ञेमध्यें गौड ब्राह्मण, शेणवी, व क्वचित प्रसंगीं कायस्थ प्रभु यांचीही गणना केली आहे. मराठे या जातींत निव्वळ मराठे गणले असून शिवाय कुणबी, लाडसेकवाणी, भंडारी, वगैरे मंडळींचीही गणना केली आहे; या शिवाय इतर शूद्र जातीचे शिक्षकलोक आहेत. त्यांची गणना त्यांची संख्या फार अल्प असल्याकारणानें केली नाहीं व या कारणामुळें आंकड्यास आंकडा बरोबर मिळणार नाहीं. शिक्षकांची जिल्हेवार जातवारी येणेंप्रमाणें आहे:—

| जिल्हे. | ब्राम्हण. | मुसलमान. | मराठे. |
|---|---|---|---|
| पुणें. | २६६ | १३ | ३६ |
| सातारा. | ३२५ | ६ | २८ |
| सोलापूर. | १९७ | १० | ४७ |
| नगर. | २३१ | ११ | ३२ |
| *खानदेश. | ४१७ | ३६ | ८० |
| नासिक. | २१० | २० | ३१ |
| +ठाणें | २२३× | ६ | १९ |
| कुलाबा. | १८३ | ७ | ८* |
| रत्नागिरी. | २४० | ५ | २२ |
| मुंबई बेट. | ८०+ | १ | ९× |

*१० महार वेगळे जातीचे आहेत. +२० कायस्थ प्रभू आहेत. × गौडब्राम्हणासहित. *५ कायस्थ प्रभु आहेत. + गौडब्राम्हण व कायस्थ प्रभूसहित ×३यहुदी.

यावरील जातींवरून पाहतां शिक्षकवर्गांत ब्राह्मण जातीचा भरणा जास्त आहे. सरासरी पाउणपटीपेक्षांही जास्त वर्ग त्यांचाच आहे, आणि दुसऱ्या श्रमाच्या, आंगमेहनतीच्या व त्यांच्या दृष्टीनें ताज्य ठरलेल्या धंद्यांविषयीं त्यांची जी स्वाभाविक अनास्था दिसते, त्या दृष्टीनें पाहिलें असतां अल्पसंतोषी शिक्षकवृत्तीच्या वेतनावर त्यांची मदार असणें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु ही स्पृहणीय स्थिती आहे, असें मात्र कोणीं समजूं नये. कारण जरी हा शिक्षकाचा धंदा फारच महत्वाचा आहे, किंबहुना देशाचा अभ्युदय करण्याचें अतिशय महत्वाचें काम यांच्यावर सोंपविलेलें आहे, तरी त्याबद्दल यांना जें वेतन मिळतें तें इतकें भिकार असतें कीं, त्यावर इतक्या लोकांनीं आपली संसाराची भिस्त काय म्हणून ठेवावी याचा मोठा अचंबा वाटतो. सर्वांत मोठें आश्चर्य हें वाटतें कीं या लोकांना जो पगार चांगल्या सुबत्तीच्या दिवसांत देखील प्रपंचाच्या निर्वाहास पुरण्याची मारामार असते, त्या लोकांनीं लागोपाठ येणाऱ्या दुष्काळांत व प्लेगच्या दिवसांत कसे दिवस कंठले असतील ? अर्थातच हे लोक जेव्हां एकभुक्त राहिले असतील तेव्हांच त्यांनीं हे दिवस पाहिले असतील. शिक्षकासारखा महत्वाचा परंतु जिकीरीचा दुसरा धंदाच नाहीं. आणि त्यांत एकभुक्त असणें म्हणजे काम किती उत्तम झालें असेल, याची कल्पना करणें नलगे. परंतु अशा स्थितींत देखील पुष्कळांनीं इमानानें पोट बांधून काम केलें; व बिचाऱ्यांना बक्षिस काय तर दुष्काळांत किंवा प्लेगमध्यें काम करावें लागणें. सरकारानें अशी स्थिती ठेवणें हें खरोखर योग्य नाहीं. सरकारास या शिक्षकवर्गाला चांगलेंसें वेतन देतां येणें ही गोष्ट अगदीं अशक्य नाहीं. ही गोष्ट सरकारच्या लक्षांत आली नसेल असें आमच्यानें म्हणवत नाहीं. परंतु याबाबतींत शिक्षकवर्गानें अद्याप पावेतों उठावणी केली नाहीं. जर केली तर सरकार त्याचा कांहीं तरी विचार अवश्य करील यांत संशय नाहीं. असो. आतां शिक्षकवर्गाला वेतन कसें कसें मिळतें त्यांचे वर्ग पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत.

शिक्षकवर्गाचे पगार ६ रु. पासून ९ रु. पर्यंत आहेत. व कांहीं-कांचे पगार तर एक एक रुपयानें वाढले आहेत. थोडक्यांत ९ पासून

६० पर्यंत जर उजळणी म्हटली, तर जितके अंक होतात तितक्या वर्गांचे मास्तरलोकांचे पगार आहेत, असें म्हटलें असतां मास्तर लोकांच्या पगारांची बरीच कल्पना होईल, अशी माझी समजूत आहे. बहुतेक सर्व शिक्षक मंडळींना ट्रेनिंग कॉलेजची ९-१२-१५-२०-२५ या रुपयांचीं सर्टिफिकिटें मिळालीं आहेत. परंतु सर्टिफिकीट मिळालेल्या मंडळींना त्यांच्या सर्टिफिकीटाशिवाय जास्त बढतीच्या जागा मिळाल्या आहेत असें फार क्वचित् दृष्टोत्पत्तीस येतें. अर्थातच कांहींकांना बहडल्या मिळाल्या आहेत. पण एकंदरींत असा वर्ग फार थोडका आहे. असो निरनिराळ्या जिल्ह्यांत १५ व १५ पासून वर पगाराच्या जागा किती आहेत याचें कोष्टक खालीं लिहिल्या प्रमाणें आहे:—

जिल्हा पुणे.

| पगार रु. | | जागा. |
|---|---|---|
| ६० | = | २ |
| ५० | = | १ |
| ४० — ५५ | = | ४ |
| ३० — ४० | = | १४ |
| २० — ३० | = | ३६ |
| १५ — २० | = | ५९ |
| | | ११६ एकंदर. |

सातार्‍यांत १५६ आहेत त्यांचा तपशील.

| रु. | | जागा |
|---|---|---|
| ६० — | | १ |
| ५० — | | १ |
| ४० — ४५ | = | २ |
| ३० — ४० | = | १४ |
| २० — ३० | = | ५६ |
| १५ — २० | = | ७२ |
| | | एकंदर. १५६ |

सोलापूर जिल्ह्यांत ६३ आहेत.

| रु. | | जागा. |
|---|---|---|
| ६० — | | १ |
| ४० — ५० | = | ४ |
| ३० — ४० | = | १४ |
| २० — ३० | = | २२ |
| १५ — २० | = | ४२ |
| | | ६३ |

अहमदनगर ११३

| रु. | | जागा. |
|---|---|---|
| ५० — | | १ |
| ४० — ५० | = | ४ |
| ३० — ४० | = | १२ |
| २० — ३० | = | ३८ |
| १५ — २० | = | ५८ |
| | | ११३ |

### नासिक जिल्हा.

| रु. | | जागा. |
|---|---|---|
| ४० – ४५ | = | ७ |
| ३० – ४० | = | ९ |
| २० – ३० | = | ३७ |
| १५ – २० | = | ४१ |
| | | ९४ |

एकंदर ९४ आहे.

### टाणें जिल्हा.

| रु. | | जागा. |
|---|---|---|
| ४० – ५० | = | ५ |
| ३० – ४० | = | ८ |
| २० – ३० | = | ४६ |
| १५ – २० | = | २६ |
| | | ८५ |

एकंदर ८५ आहेत.

### रत्नागिरी जिल्हा.

| रु. | | जागा. |
|---|---|---|
| ५० वर | = | ६ |
| ४० – ५० | = | ४ |
| ३० – ४० | = | १५ |
| २० – ३० | = | ४६ |
| १५ – २० | = | ४३ |
| | | ११४ |

एकंदर ११४ आहेत.

### खानदेश जिल्हा.

| रु. | | जागा. |
|---|---|---|
| ६० – | | २ |
| ५० – ६० | = | ४ |
| ४० – ५० | = | १६ |
| ३० – ४० | = | १० |
| २० – ३० | = | ८६ |
| १५ – २० | = | ९५ |

एकंदर २१३.

### कुलाबा जिल्हा.

| रु. | | जागा. |
|---|---|---|
| ५० – | = | २ |
| ४० – ५० | = | ५ |
| ३० – ४० | = | ७ |
| २० – ३० | = | ४२ |
| १५ – २० | = | ४१ |

एकंदर ९७ आहेत.

याप्रमाणें एकंदर जागा सर्व जिल्ह्यांमध्यें १५ रुपयावर व १५ रुपयांच्या मिळून १०५१ आहेत, परंतु यांत १५ रुपयाच्याच फार आहेत. श्रमाच्या मानानें हा मोबदला फार कमी आहे असें म्हणावें लागतें. जास्त पगाराच्या जागा कमी आहेत. व ५०–६० च्या तर अगदींच थोडक्या आहेत. ही स्थिती सरकारानें सुधारावी व वरील पगाराच्या जागा जास्त कराव्यात, अशी सरकारास नम्र सूचना आहे. शिक्षक वर्गांत ब्राम्हण ज्ञातीचे शिक्षक २३१९ आहेत.

मुसलमान ज्ञातीची मंडळी ११४ आहेत, व मराठे या सदराखालीं येणारी मंडळी ३१३ आहेत. बहुतेक शिकलेल्या (Trained) शिक्षकांना संस्कृत किंवा पारसियन भाषेचें ज्ञान आहे. इंग्रजी भाषेचें ज्ञान असलेली मंडळी फारच थोडकी आहेत, व त्यांची संख्या १० पासून २० च्या आंत आहे. विश्वविद्यालयाची परीक्षा एखादी तरी दिलेल्या मंडळीची संख्या १० पर्यंत येईल किंवा नाहीं, याची शंकाच आहे. जे कांहीं थोडे इसम आहेत, त्यांना पगार चांगले आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. ट्रेनिंग कालेजची इतकी मंडळी या खात्यांत शिरण्यास कोणतीं कारणें उत्तेजक आहेत याचा आपण विचार करूं. मुख्यत्वेंकरून शाळाखात्यांत जागा मिळण्यास पब्लिक सर्व्हिसची एखादी तरी परीक्षा दिलेल्या लायकीचा मनुष्य असला तर तें काम तो बरेंच चांगले प्रकारें पार पाडील. [ याबद्दल मोठी शंका आहे कारण अनुभव निराळा येतो शा. प. क. ] परंतु दुसरा एक नियम असा घालून ठेविला आहे कीं पेनशन ज्या नौकरीस आहे अशी नौकरी फक्त ट्रेनिंगच्याच लोकांस लागू करावयाची. या नियमाची अमलबजावणी जरा सक्तीनें होत असल्याकारणानें शाळाखात्यांत शिरणाऱ्या लोकांस ट्रेनिंगची एकादी तरी परिक्षा देऊन आपली नौकरी पेनशनलायक करणें भाग पडतें; आणि म्हणूनच बहुतेक शिक्षक "ट्रेन्ड" असा शिक्का मिळवून मोकळे झालेले असतात. विश्व विद्यालयाची अतिशय उच्च प्रतीची परीक्षा दिलेलीं माणसें जर हा शिक्का मिळविलेलीं नसलीं, तर त्यांची शिक्षकाची नौकरी अर्थातच पेनशन मिळण्यास नालायक अशी समजली जावयाची व जातेही [ ही समजूत चुकीची आहे शा. प. कर्ते ] शाळाखात्यांतील डायरेक्टरी पाहून मला जे दोन विचार सुचले, ते शिक्षकवर्गापुढें व अधिकाऱ्यांपुढें ठेविले आहेत. त्यांचा विचार ते करतील व शिक्षकांचें ओझें थोडेसें कमी करण्याचें जर अधिकारी श्रेय घेतील तर या लेखाचा कर्ता आपणास कृतकृत्य मानील.

अमळनेर जि० खानदेश<br>ता० ६ जानेवारी १९०९.

आपणा सर्वांचा नम्र सेवक<br>विष्णुशर्मा.

## ( २ ) मराठी कोशांत सुधारणा.

### कोश सुधारणारास विज्ञप्ती.

वि. वि. मोल्स्वर्थ साहेबांनीं मराठी-इंग्रजी कोश सन १८३१ त छापून सिद्ध केला. त्यांची दुसरी आवृत्ती सन १८५७ निघाली. त्याला आज त्रेचाळीस वर्षे झालीं, तरी मराठी भाषेच्या कोशाची सुधारणा करण्याचें कोणाच्या मनांत आलें नाहीं, हें आम्हां महाराष्ट्रीयांचें दुर्दैव असेंच समजून स्वस्थ बसण्याची पाळी आली होती. पण इतक्यांत डॉ. भांडारकर, न्यायमूर्ती रानडे व प्रो. काथवटे, या विद्वान् त्रैमूर्तींच्या देखरेखीखालीं महाराष्ट्र कोशाचें काम पार पडणार आहे असें ऐकून कोणा महाराष्ट्रीयास आनंद होणार नाहीं? मागें कै. नामजोशी यांनीं कोशाचें काम आंगावर घेतल्यामुळें झालेल्या आनंदांत लवकरच विरजण पडलें होतें. तसें आतां तरी पडणार नाहीं अशी उमेद व खात्री आहे. ती वृथा न होवो म्हणजे झालें. आतां हा कोश तयार होईलच; तरी मला वाटतात त्या सूचना प्रसिद्ध करण्याकरितां आपल्याकडेस पाठवित आहें. ज्यांना ज्यांना कोशांत अमुक एक सुधारणा होणें इष्ट आहे असें वाटत असेल, त्यांनीं त्यांनीं काय सुधारणा करावयाच्या तें सुचविल्यास कोशप्रकाशकांस उपयोग होईल. याकरितां आळस न करितां प्रत्येकानें आपलें मत प्रसिद्ध करावें अशी सर्वांस विनंती आहे.

१. जुन्या कोशांत महाराष्ट्र कवी ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, मोरोपंत, वामन, इत्यादिकांच्या कृतींतील समग्र कठीण शब्दांचा समावेश झालेला नाहीं. यासाठीं सर्व कवींच्या कृतींतील कठीण शब्दांचा समावेश सोदाहरण करावा.

२. जुन्या बखरी, शकावली, तवारिखी, कैफियती, ऐतिहासिक पत्रें, वगैरे जुन्या लेखांतील फारशी व इतर तूर्त प्रचारांत नसलेल्या शब्दांचा सोदाहरण समावेश व्हावा.

३. अलीकडे शास्त्रीय, राजकीय, धार्मिक, सामाजिक वगैरे निरनिराळ्या विषयांवर मराठी भाषेंत नवीन बरेच ग्रंथ झाले आहेत व होत

हित. त्यांत त्या त्या ग्रंथकर्त्यांनीं आपापल्या मताप्रमाणें संस्कृताधारें नवीन शब्द बनविले आहेत; ते हुडकून काढून त्यांचा कोशांत समावेश व्हावा.

४. आंग्लमहाराष्ट्रभाषाकोविद जितके म्हणून शास्त्रवेत्ते आहेत, तितक्यां कडेस आंग्लशास्त्रीयशब्दांस संस्कृताधारें मराठी पारिभाषिक शब्द बनविण्यास विनवावें, व सर्वांकडून शब्द तयार होऊन आल्यावर त्यांतील सर्वसंमत पारिभाषिक शब्दांचा एकाच ठिकाणीं समावेश करावा, व नवीन ग्रंथकारांनीं त्या शब्दांचा उपयोग करावा.

५. प्रत्येक शब्दाची व्यवस्थेशीर व्युत्पत्ती द्यावी. प्रत्येक शब्द मूळ कोणता, प्रत्यय कोणत्या अर्थी लागला, उपसर्ग व धातू यांचे अर्थ, उपसर्ग धातू आणि प्रत्यय यांचा अर्थ मिळून अर्थ काय झाला, हें सविस्तर सांगितलेलें असावें.

६. प्रत्येक शब्द व्याकरणाच्या कोणत्या जातींत जातो तें सोदाहरण सांगितलेलें असावें.

७. शब्दांचा अर्थ सांगावयाचा तो शास्त्रीयरीत्या वर्णनपर सांगून शिवाय पर्याय शब्दही द्यावे.

८. 'म्हण' या शब्दाखालीं महाराष्ट्रभाषेंत जितक्या म्हणून म्हणी प्रचारांत असतील त्या सर्वांचा संग्रह करावा. व त्या म्हणी मूळ प्रचारांत कशा आल्या व त्यांचा उपयोग कोणत्या प्रसंगीं करितात, हें सांगून त्यांशीं समानार्थक अशा आंग्लवाङ्मयांतील म्हणी द्याव्या.

९. 'न्याय' या शब्दाखालीं जितके म्हणून भाषणांतील न्याय आहेत, जे शब्दकल्पद्रुम नांवाच्या कलकत्त्यास प्रसिद्ध झालेल्या कोशांत साकल्येंकरून आहेत, तितक्या सर्वांचा एकत्र संग्रह करावा. कोणताही न्याय पहिल्यानें प्रचारांत कसा आला, त्याचा उपयोग कोणत्या प्रसंगीं करितात हें सांगून त्याच्या तोडीचे आंग्लवाङ्मयांत न्याय असल्यास ते सांगावे.

१०. महाराष्ट्रवाङ्मयांतील सर्व भाषासंप्रदायांचा समावेश करण्यांत यावा

११. कित्येक शब्दाचा अर्थ मूळच्या अर्थाच्या उलट झाला आहे. तो खुलासेवार सांगावा.

१२. हा कोश गोरगरिबांसही घेतां यावा म्हणून याची किंमत शक्य तितकी कमी ठेवितां आली पाहिजे. यासाठीं पुढील उपाय अमलांत यावे.

( अ ) विद्वानांनीं आपल्या विद्वत्तेची मदत फुकट द्यावी.

( ब ) श्रीमंत, शेटसावकार, यांनीं केवळ परोपकारबुद्धीनें द्रव्याचें साहाय्य द्यावें.

( क ) ज्यांची मातृभाषा मराठी आहे असे श्रीमंत गायकवाड, होळकर शिंदे, कोल्हापूरकर, सांगलीकर, मिरजकर, कुरुंदवाडकर वगैरे बहुत संस्थानिक, जहागिरदार व सरदार आहेत. त्यांनीं या कामास फुकट द्रव्यसाहाय्य देऊन शिवाय आपल्या राज्यांतील शाळांच्या लायब्ररींस व उत्तेजनार्थ चांगल्या शिक्षकांस बक्षीस देण्याकरितां या कोशाच्या प्रती भरकिंमतीस घ्याव्या.

( ड ) आमच्या शाळाखात्याकडून बरीच मदत व्हावी व ती होईलही.

( इ ) प्रत्येक महाराष्ट्राभिमानी गृहस्थानें या कोशाची एकेक प्रत घेऊन आपल्या स्नेह्यासोबत्यांस तसें करण्याविषयीं सूचना करावी.

आपला नम्र सेवक,

**सखाराम गणेश प्रभु**, हेडमास्तर रेडी.

---

**आभारपूर्वक स्वीकार**—( १ ) निर्णयसागर छापखान्यची रोजनिशी—ही नेहमींप्रमाणें चांगली आहे. ( २ ) ग्रंथप्रसारक व संपादक मंडळीची रोजनिशी—प्रकाशक दामोदर सांवळाराम आणि मंडळी, बडोदें व मुंबई. यांचेंच पंचांग. दोन्ही नवीनच यंदां निघालीं असून चांगलीं आहेत. रोजनिशींत न्या० रानडे यांचें चित्र आहे. त्याचप्रमाणें भाऊ गोविंद सापकर यांचीही रोजनिशी आमचेकडे आली आहे ती इतर रोजनिशींपेक्षां मोठी असल्यामुळें संग्रहणीय आहे.

---

या अंकांतील पंचांग येथील ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थी रा० रा० **दत्तात्रय विष्णु कुळकर्णी** यांनीं तयार करून पाठविलें, त्याबद्दल आम्ही त्यांचे आमच्या व आमच्या वाचकांच्या तर्फे आभारी आहों.

---

करितात तें असें:—एक तर आपण जें मुलांस सांगतों त्यांवर तीं पूर्णपणें विश्वास ठेवितात, कधीं दिक्कत घेत नाहींत, दुसरें असें कीं, लोक खोटे आहेत असें आढळून येईपर्यंत त्यांजवर भरंवसा ठेवण्याविषयीं आपल्या मनाची बळकट प्रवृत्ती असते. खेरीज हरएक व्यवहारांत लोक ज्या व्यवस्था करितात त्या त्यांच्या प्रामाणिकपणावर दृढ विश्वास आहे म्हणून त्यांना करितां येतात. फार काय सांगावें, खुद्द मिथ्यावादी लोकांची भिस्त दुसऱ्यांच्या विश्वासबुद्धीवर, म्हणजे हे सांगतात तें खरेंच असेल अशी जी लोकांची श्रद्धा, तिजवरच असते. ह्या प्रमाणांवरून सत्याकडेच मनाची प्रवृत्ती असते असें उघड होतें. पण त्याच्या विरुद्ध असें म्हणतां येईल कीं, मुलें सांगणारावर किंवा वडील माणसांवर जो भरंवसा ठेवितात तो तीं ( वडील माणसें ) सत्यशील आहेत असा त्यांस आलेला जो अनुभव त्यावरून ठेवितात, उगीच ठेवीत नाहींत; आणि दुसऱ्याच्या प्रामाणिकपणावर जो आपण भरंवसा ठेवितों तोही ते प्रामाणिक आहेत असें आपल्या अनुभवास आलें तरच ठेवितों. आणि त्यांनीं प्राणाणिकपणानें वागावें यांतच त्यांचा फायदा आहे म्हणून तेही तसे वागतात. तेव्हां मनुष्याच्या मनाचा कल स्वभावतः सत्याकडे असतो असें नाहीं; बाह्य गोष्टींमुळें त्यांस सत्याचा अवलंब करावा लागतो. असो, हा जो मतभेद उत्पन्न झाला आहे, तो कशामुळें हें आपण पाहूं. मनाच्या कोणत्याही कलाचा प्रादुर्भाव होणें तो त्या कलास योग्य परिस्थिती असल्याशिवाय होत नाहीं, ह्या सिद्धांताकडे दुर्लक्ष केल्यामुळें हा वाद उत्पन्न झाला आहे, असें वाटतें. आतां खोटेपणाचा प्रादुर्भाव प्रथमतः होतो तो खरी गोष्ट छपविणें ह्या रूपानें होतो. पण हा कशामुळें होतो व त्यास परिस्थिती कोणती पाहिजे ? एकादी गोष्ट हातून घडली असतां तिजबद्दल शिक्षा होईल या भयानें किंवा वाईट काम केलें असतांही लोकांनीं आपल्यास चांगलें म्हणावें ह्या इच्छेनें मनुष्य खोटें सांगण्यास, व सत्याचा भंग करण्यास, प्रवृत्त होतो. तेव्हां अशी परिस्थिती असतांना मानवी स्वभावाचा कल असत्याकडे असतो कीं नसतो, हा प्रश्न उत्पन्न झाला.

ह्या प्रश्नाचें उत्तर खोटेपणाकडे कल असतो असेंच येईल. अशा परिस्थितींत खरी गोष्ट छपविण्याकडे मनुष्याची प्रवृती साहजिक होते. यावरून मानवी स्वभावाचा कल असत्याकडे विशेष असतो असें सिद्ध होतें.

२१. असत्याचे उगम व त्याजवर उपायः—मुलांस खरेपणाची संवय लावणें म्हणजे ज्या गोष्टीमुळें तीं खोटें काम करण्यास प्रवृत्त होतात त्या गोष्टी आपणांस प्रथम पाहिल्या पाहिजेत.

( अ ) त्या गोष्टींपैकीं पहिली गोष्ट **भीती** ही होय. जेव्हां मूल एखादा अपराध करितें तेव्हां त्या अपराधाविषयीं त्याच्या मनांत डांचत असतें; आणि अशा अपराधांबद्दल सरसकट कडक शिक्षा होते, ह्या गोष्टींची स्मृती-होऊन त्यास खोटें बोलण्याचा मोह उत्पन्न होतोः—आतां ह्यास उपाय म्हटला म्हणजे हा; मुलांवर आपली ममता किती आहे, त्याजविषयीं आपणाला कळवळा किती असतो, आणि आपली न्यायबुद्धी कशी जागृत असते, याबद्दल शिक्षकानें मुलांची खातरी केली पाहिजे; म्हणजे अर्थात् त्यानें मुलांचा विश्वास संपादिला पाहिजे. येणेंकरून भीती राहणार नाहीं, आणि खोटें बोलण्याचा जो मोह, तो नाहींसा होईल.

( आ ) खोटें काम करण्यास प्रवृत्त करणारी दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे वृथाभिमान किंवा पोकळ डौल ही होय. खरोखरी आपल्या आंगीं योग्यता असेल, तिजपेक्षां अधिक आहे असें दाखविण्याची जी इच्छा, तिच्यामुळें मुलें,-मोठे लोक देखील खोटें काम करण्यास प्रवृत्त होतात. आपल्याविषयीं लोकांचें मत चांगलें असावें, आपणास त्यांनीं चांगलें म्हणावें, अशी आपणास इच्छा असते; परंतु खरें पाहतां तसें त्यांचें मत होण्यापुरती योग्यता त्यां त्यांमध्यें नसते. तेव्हां तसें चांगले मत आपणाविषयीं झाल्यास तें अर्थात् वस्तुस्थितीहून फारच निराळें असावयाचें. मूल वाईट काम करितें, आणि मग त्यास असें वाटतें कीं, जर हें लोकांस समजलें तर आपल्याविषयीं जो त्यांचा चांगला ग्रह झाला आहे, तो बदलेल. आजपर्यंत आपणास चांगले लेखीत होते, ते आतां आपणास वाईट म्हणूं लागतील. अशा कारणांनें त्यास खोटें बोलण्याचा मोह उत्पन्न होतो.ह्याच

कारणामुळें प्रश्नांचीं उत्तरें देतांना दुसऱ्याचें उत्तर पाहून त्यावरून उतरून घेण्यास आणि तो उतारा आपलेंच उत्तर, असें शिक्षकास भासविण्यास मूल प्रवृत्त होतें. ह्या दोन्ही उदाहरणांत प्रवर्तक कारण पाहूं गेलें असतां आपली खरी योग्यता आहे तिजपेक्षां अधिक आपलें आंगीं वास करिते, असें म्हणून घेण्याची इच्छा हेंच होय. असा प्रकार असला म्हणजे उपाय हा आहे कीं, अशा मार्गाचें अवलंबन केल्यानें तुमचा हेतू कधींहि सफल होणार नाहीं, तुमची योग्यता मला माहित आहे, ती आहे तिजपेक्षां अधिक भासविल्यानें मी फसणार नाहीं, अशी शिक्षकानें मुलांची खात्री करावी; आणि नसती योग्यता आंगीं दाखविण्याचा यत्न केल्यानें कशी फजिती होते, याचें दाखले द्यावे. सत्यशील मनुष्यास लोक विशेष मान देतात, आणि खोटें काम करणाऱ्याचा ते तिरस्कार करितात, हेंही त्यांच्या नजरेस वारंवार आणून द्यावें. खेरीज स्वतःच्या उदाहरणावरून आणि वारंवार उपदेश करून बुद्धिमत्तेपेक्षां नीतिमत्तेचें महत्त्व अधिक आहे, ही गोष्ट मुलांच्या मनांवर पक्की ठसेल असें करावें. ज्या मुलांमध्यें नुसती बुद्धिमत्ताच दृष्टीस पडेल, त्याची फार वाखाणणी न केल्यानेंही या कामीं बराच उपयोग होईल.

**२२. सत्यशीलतेचें महत्त्व मुलांच्या मनांत बिंबण्यांचीं साधनें:**—मुलांस खरेपणाची संवय लावण्याकरितां ह्या गुणाची थोरवी फार आहे, असें त्यांच्या अंतःकरणांत बिंबलें पाहिजे. असें करण्याचीं साधनें येणेंप्रमाणें:—

( १ ) सत्यशीलतेच्या महत्त्वाचा उत्तम ठसा उठविण्याचें अत्यंत प्रबल साधन म्हटलें म्हणजे शिक्षकाची स्वतःची एकंदर चालचर्या आणि त्याचें नेहेमीचें प्रत्यक्ष वर्तन हीं दोन्हीं अगदीं निर्मळ, व प्रांजळ अशीं असलीं पाहिजेत. असावें एक, आणि दिसावें दुसरें अशीं उपयोगी नाहींत. एका गृहस्थास घर बांधावयाचें असतां मेस्त्र्यानें सुचविलें कीं, या घराच्या खिडक्या अशा ठेवितों कीं, तुम्ही आंत काय करितां तें रस्त्यावरील मनुष्यास बिलकूल दिसूं नये; त्यावर गृहस्थानें उत्तर केलें, " छे!

छे! खिडक्या अशा बसवा कीं, मी जें काय घरांत करीन तें रस्त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक मनुष्याच्या सहज दृष्टीस पडावें." हें त्या गृहस्थाचें उत्तर प्रत्येक शिक्षकानें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. ह्यासंबंधें शिक्षकाकडून ज्या दोन चुक्या होण्याचा संभव असतो, पण ज्या टाळण्याविषयीं त्यानें नेहमीं जपलें पाहिजे, त्या ह्या:—(क) आपल्या मताच्या आणि उपदेशाच्या विरुद्ध आपलें स्वतांचे आचरण म्हणजे एका तऱ्हेनें वागण्यास मुलांना सांगत असतां शिक्षकानें आपण दुसऱ्याच तऱ्हेनें वागणें. उदाहरणार्थ, वेळच्यावेळीं शाळेंत येण्याविषयीं सांगत असतां आपण स्वतःच उशीरा येणें; स्वच्छपणा राखावा असा उपदेश करित असतां आपणच घामटपणा करणें; आपल्याहून वडील माणसाशीं आणि आपल्याकडे आलेल्या पाहुण्याशीं नम्रपणाची आणि आदराची वागणूक ठेवा, असा धडा मुलांस देत असतां स्वतःच्या वरिष्ठाशीं किंवा शाळा पाहण्यास आलेल्या सद्गृहस्थाशीं उद्धटपणानें व बेअदबीनें वागणें इत्यादि. (ख) आपल्या कर्तव्याविषयीं खरी कळकळ न बाळगितां बाहेरून देखावा मात्र दाखविणें. उदाहरणार्थः—कोणी सभ्य गृहस्थ शाळा पाहण्यास आले असतां त्या वेळेपुरती अधिक मेहनत घेणें, किंवा अधिक बेतवात ठेवणें, परंतु इतर वेळीं त्याच्या विरुद्ध वर्तणें. तसेंच इतर वेळीं शाळेची ठाकठिकी कशीबशी असतां परीक्षेच्या वेळीं मात्र कडेकोट तयारी ठेवणें.

(२) सत्यशीलतेचें महत्त्व ठसविण्याचा दुसरा उपायः—कोणतीहि गोष्ट जशी पाहिली किंवा ऐकिली असेल, तशीच तींत कमजास्त किंवा चालढकल न करितां सांगण्याची संवय, हा होय. कोणतीहि गोष्ट सांगतांना ती जशी घडली असेल, तशीच तंतोतंत सांगण्याची वहिवाट आपण ठेवावी. आणि हाच क्रम मुलांकडूनही ठेवून घेत जावें. डॉक्टर जान्सन् ह्यांचें या संबंधानें असें म्हणणें आहे कीं, खिडकीच्या खालच्या भागांतून पाहिलें असतां वरच्या भागांतून मीं पाहिलें, असें जर एखादा मुलगा म्हणेल, तर ती असली लहानशी चुकी देखील त्याजकडून दुरुस्त करवावी. डॉक्टर साहेबांच्या म्हणण्याचा आशय हा कीं, कितीका किरकोळ गोष्ट

असेना, ती सांगण्यांत देखील चालढकल किंवा हलगर्जीपणा उपयोगी नाहीं. गोष्ट असेल तशीच तंतोतंत सांगणें, हा मोठा गूण आहे. त्यास कोणी याथातथ्य असें नांव देतात. ह्या गुणाचा सत्यशीलतेची संवय लावण्यांत उपयोग होतो.

( ३. ) वंचननिषेध; म्हणजे कोणतीही ठकवणूक ही निंद्य आणि तिरस्कारार्ह आहे असें दाखविणें, हा तिसरा उपाय होय. मुलांच्या वागणुकींत लबाडी धडधडीत नजरेस आली असतां तिचा अत्यंत तिरस्कार आपण करावाच, पण फसविण्याचा यत्किंचितूही यत्न झाला तरी आपण सहन करूं नये. त्याचाहि तितकाच तिटकारा दाखवावा. अशा किरकोळ यत्नांचीं उदाहरणें वर्गांत वारंवार घडून येतात. एकादा मुलगा आपल्या शेजारच्या मुलास हळूच कांहीं सुचवितो, किंवा त्याच्या पाटीवरील कृती चोरट्या दृष्टीनें पाहातो. हे फसवणुकीचेच प्रकार होत. एक महापंडित सत्यशीलतेचें महत्त्व इतकें समजत असे कीं, कोण्या एका लहान मुलास निजवावें म्हणून त्याची आई, ' चल, आपण निजूं ' असें बोलून त्यास झोंप येई तों त्याच्या शेजारीं पडून राहिली, हेंही त्या पंडितांस खपलें नाहीं. या तिच्या कृतीसहि त्यानें फसवणुकीचें कृत्य, लबाडीची वागणूक, असें नांव ठेविलें.

( ४. ) खरेपणाचें महत्व मुलांच्या मनावर ठसविण्याचें आणखी एक प्रबल साधन आहे तें हें:—मुलांच्या बोलण्यावर आणि आचरणावर आपण नेहमीं पूर्ण विश्वास ठेवावा. त्यानें आपणास फसविलें असेल तर गोष्ट निराळी. पण तेथपर्यंत त्याच्या बोलण्याविषयीं किंवा वर्तनाविषयीं दिक्कत आपल्या मनांत कधींहि नसावी. मूल खोटें बोलेल ही गोष्ट अगदीं असंभवनीय आहे, अशा समजुतीनेंच त्याच्याशीं आपण आपली वागणूक ठेवावी. मुलांच्या आचरणावर नजर ठेवण्यांत सावधगिरी ठेवणें हें आपलें काम आहे; पण त्यांच्या आचरणाविषयीं आपलें मन दिक्कतखोर नसावें. दिक्कतखोरीचे म्हणजे संशयी वृत्तीचे परिणाम फार घातक होतात. मुलांचे आचरण अशा तऱ्हेचें असेल असा वहीम आपण दाखविला, कीं त्या मुलास तशाच तऱ्हेचें आचरण ठेवण्याचा प्रबल मोह हटकून उत्पन्न होतो. त्या मुलाचा

खोडसाळपणा आपल्या नजरेस आल्यावरही त्याजवरील आपला भरंवसा ढळूं लागला आहे, इतकें मात्र दर्शवावें. पण तो एकदम साफ उडाला असें होऊं देऊं नये.

२३. **खोटें बोलण्याची खोड**:—सत्यशीलतेचें महत्त्व मुलांच्या मनांत कसें बिंबवावें याविषयीं विचार झाला. परंतु ज्या मुलांस खोटें बोलण्याची खोड जडलेली आहे, अशा मुलांविषयीं आपण काय करावें, ह्या प्रश्नाचा निकाल अद्याप होणें आहे. ही खोड नाहींशी करण्यास कोणते उपाय योजावे तें आतां पाहूं.

( १ ) प्रथमत: अशी खोड कां लागली तें कारण शोधावें. ज्याच्या योगानें ही खराब आदत मुलांस लागली तें कारण किंवा कारणें शोधून काढण्याचा यत्न करावा. ( क ) मुलाची स्थिती कदाचित् अशी असेल कीं, त्याजवर आजपर्यंत कोणी भरंवसाच ठेविला नसेल. अशी गोष्ट असेल तर आपण त्याजवर भरंवसा ठेवावा, म्हणजे त्याजवर आपला भरंवसा आहे हें दर्शित होईल, अशा प्रकारचें कांहीं काम त्यास करावयास सांगावें; आणि तें मूल तें काम करील असें मानून बिनदिक्कत स्वस्थ राहावें. ह्याप्रमाणें आपण केलें तर आपण विश्वास ठेविल्यानें मुलास बरें वाटूं लागून तें आपलें आचरण बहुधा सुधारील. ( ख ) वाईट रीतीनें वागविल्यानेंही खोटें बोलण्याची खोड मुलांस जडते. मार खाण्याच्या किंवा शिव्या बसण्याच्या भीतीनें मूल खोटें बोलण्यास प्रवृत्त होतें. अशा ठिकाणीं मुलांशीं आपण आपली वागणूक अत्यंत ममतेची ठेवावी. खोटें बोलण्याबद्दल त्यास शारीर शिक्षा न करितां असत्य भाषण केलेलें पाहून आपणास अत्यंत दु:ख झालें, असें दाखविण्याचा यत्न करावा. ( ग ) ही वाईट खोड कदाचित् वृथाभिमानापासून जडलेली असेल. असें असेल तेव्हां लबाड मनुष्याची लबाडी आज नाहीं उद्यां बाहेर पडून त्याची किती मोठी अवहेलना व तिरस्कार लोकांत होतो, तें स्पष्ट करून सांगावें.

( २. ) **ह्या खोडीचें स्वरूप मुलांचे मनांत बिंबवावें**:—पातक म्हणजे काय, त्याचें स्वरूप कसें आणि पातकाचीं इहलोकीं आणि पर-

लोकीं आपणास भोगावीं लागणारीं फळें कोणतीं याविषयीं मुलांच्या मनांत बोध ठसेल असें करावें.

( ३ ) खोटें बोलण्याचे प्रसंग न आणिल्यानें जो प्रतिबंध होतो, त्यानेंही असत्य भाषण करण्याची खोडी कमी कमी होत जाते. ज्यास लबाड बोलण्याची खोड जडलेली असेल, अशा मुलांस तसें बोलण्याची संधी जितकी कमी येईल तितकें चांगलें. अशी संधी त्यास न देण्याविषयीं आपण जपावें. अशा मुलास आपणाजवळ बोलूं देऊं नये. आणि इतर मुलांशींही त्यास मिसळूं देऊं नये. असें केल्यानें त्यास खोटें बोलण्याचे प्रसंग कमी येतील आणि त्याची खोड उत्तरोत्तर नाहींशी होत जाईल.

२४. येथवर सत्यशीलतेबद्दल विवेचन झालें. सदाचरणाचा दुसरा आधारभूत गुण प्रामाणिकपणा हा होय. ह्या गुणाविषयीं आतां विचार करूं.

मुलांच्या मनांत प्रामाणिकपणाचा बीजारोप शिक्षकानें केला पाहिजे. प्रामाणिकपणानें वागण्याची संवय करणें किती अवश्यक आहे हें मनांत भरून देण्याचे, आणि त्याप्रमाणें मुलांस वागविण्याचे प्रसंग शाळेचें काम करितांना बहुत येतात. म्हणून दुसऱ्याच्या जिनसाच्या संबंधानें शाळेंतील नीतिमत्ता उत्कृष्ट रीतीनें वाढविण्यास बिलकुल अडचण पडणार नाहीं. लेखण्या, पेन्सिली वगैरे चोरणें किंवा गहाळ झालेल्या वस्तू जवळ ठेवणें, या गोष्टी घडल्या असतां त्यांची वासलात किंवा विल्हेवाट शिक्षक लावीलच. पण मुलें दुसरीं कांहीं कृत्यें करितात, त्याचाही नीट बंदोबस्त त्यानें केला पाहिजे. या कृत्यांचा नीट बंदोबस्त केल्यानें मुलांच्या मनांत प्रामाणिकपणाच्या तत्त्वाचा जसा बीजारोप होईल, तसा प्रत्यक्ष चोरीचा बंदोबस्त केल्यानें होणार नाहीं. अशा कृत्यास आपण क्षुल्लक गोष्टी असें म्हणतों खरें, पण त्यांच्या योगानें मुलांचें आचरण जितकें बिघडतें, तितकें धडधडीत विश्वासघात केल्यानें किंवा प्रबळ मोह उत्पन्न झाल्यानेंही कदाचित् बिघडणार नाहीं. विश्वासघात आणि उत्कटमोह यांचें निवारण भीतीच्या योगानें करितां येईल, पण ह्या क्षुल्लक मानिलेल्या कृत्यांचें निवारण तसें करितां येणार नाहीं. अशीं कृत्यें कर-

ण्याची संवय मुलांस लागली म्हणजे त्यांच्यांतील प्रामाणिकपणाचें तत्त्वच बिघडलें; असें समजावें. अशीं हीं कृत्यें कोणतीं; व त्यांचा बंदोबस्त कोणत्या प्रकारें करावा, हें आतां सांगू.

( १. ) शाळेची मालमत्ता म्हणजे शाळेची इमारत व तींत ठेविलेलें सामान यांच्याशीं मुलांचें वर्तन हें पहिलें कृत्य होय. शाळेच्या मालमत्तेची खराबी किंवा नासधूस मुलें करूं लागलीं असतां प्रामाणिकपणाची वागणूक म्हणजे काय हें सांगण्याची आणि त्याप्रमाणें मुलें वागतील असें करण्याची जी संधी येते, ती शहाणा शिक्षक कधींही फुकट दवडीत नाहीं. शाळेच्या दरवाज्यांवर, बांकांवर, खुर्च्यांवर अथवा भिंतीबर ओरखडे ओढण्याची आणि कधीं कधीं त्यांवर वेडे वांकडे शब्द लिहिण्याची पुष्कळ मुलांस संवय असते. अशा प्रसंगीं शिक्षकानें घडलेल्या अपराधाकडे मुलांचें लक्ष्य लावून त्यांत त्यांचा अप्रामाणिकपणा कसा झाला, हें उघडून सांगावें. शाळेच्या मालकानें किंवा सरकारानें आपणावर शाळेचें घर व सामानसुमान विश्वासानें सोंपविलें असतां अशीच नासधूस केली तर, त्या विश्वासाचा आपण घात केला असें होतें, ही गोष्ट त्यांच्या मनावर विशेष जोरानें ठसवावी. शाळागृहास आणि त्यांतील सामानास खर्च किती मोठा करावा लागतो, हें सांगून त्यांची कोणत्याहि प्रकारें खराबी केली तर आणखी खर्च केल्याशिवाय त्यांची दुरुस्ती होणार नाहीं, आणि हा जादाखर्च तुमच्या गैरवागणुकीमुळें जर वारंवार पडूं लागला, तर तो भागवितां येणार नाहीं; आणि आपलें शाळागृह व सामान खराब आणि विद्रूप दिसेल, ह्या गोष्टी त्यांजपुढें उघड्या कराव्या. तसेंच भिंती अगर सामान वेड्यावाकड्या आकृती किंवा शब्द लिहून खराब केलें असलें तर सुंदर वस्तूस तेणेंकरून विद्रूपपणा कसा आला, निर्मळपणा होता तेथें घाणेरडेपणा किती दिसूं लागला, फार जपून ठेविलेला पदार्थ फुटून तुटून कसा निरुपयोगी झाला, हें दाखवून, हें चांगलें झालें काय? तुमच्या स्वतांच्याच वस्तूस कोणी असें विद्रूप केलें असतें तर तुम्हांस तें बरें वाटलें असतें काय? अशा प्रकारचे प्रश्न विचारून पुन्हा तसें कृत्य न करण्याविषयीं उपदेश करावा.

# सार्थ प्राकृत प्रकाश.

सदरहू पुस्तक आमचे मित्र रा. रा. शंकर रामचंद्र हातवळणे यांनी प्राकृत-प्राकृत व्याकरण वररुची ह्यांच्या ग्रंथाच्या आधारें केलें आहे. प्राकृत भाषा ही संस्कृत व हिंदुस्थानांतील अर्वाचीन भाषा ह्यांमधील एक सांखळी आहे. संस्कृतातून प्राकृतांत व प्राकृतांतून अर्वाचीन भाषांत रूपें कशीं आलीं, हें समजल्याशिवाय शब्दांची खरी व्युत्पत्ती समजली असें ह्मणतां येत नाहीं. पुष्कळ ऐतिहासिक प्रश्नांशीं प्राकृताचा निकट संबंध आहे. तेव्हां ह्या भाषेचा चांगला परिचय असल्याशिवाय त्यांचा उलगडा करण्यास अडचण असते. शब्दांचीं रूपें कशीं बनलीं व त्यांस आचार्यांच्या सूत्राचा मूळ आधार कोणता, हें प्रस्तुतच्या पुस्तकावरून दिसून येईल. प्राकृत प्रकाशाचे एकंदर १२ परिच्छेद असून पाहिल्या ९ परिच्छेदांत महाराष्ट्री जी मुख्य प्राकृत भाषा तिजविषयीं व बाकीच्या तीन परिच्छेदांत पैशाची, मागधी व शौरसेनी ह्यांच्या संबंधाच्या मुख्य मुख्य गोष्टी सांगितल्या आहेत. हें पुस्तक मराठी शिक्षक, ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थी व हायस्कुलांतील वरच्या वर्गांतून मराठी शिकणारे विद्यार्थी ह्यांस विशेष करून उपयोगी पडण्यासारखें आहे. पुस्तकाची किंमत ८ आहे. टपाल हशील शिवाय. एकदम बरींच पुस्तकें घेणारास कमिशन मुनासब मिळेल. पुस्तकें आमच्या छापखान्यांत विकत मिळतील.

म्यानेजर चित्रशाळा छापखाना.

---

**सृष्ट चमत्कार तत्वादर्शः**—९ व्या यत्तेचे. यात पृथ्वीचा आकार, गती, दिनरात्र, ऋतु, ग्रहणें ह्याची विपुल माहिती आहे. [illegible] **अंकगणित**—चौथ्या यत्तेचा सर्व विषय सहज समजेल. उपपत्ति, [illegible] भरपूर कागद बांधणी उत्तम किं० ८. **मौजेचे तारा [redacted]** शास्त्रीय ज्ञान. किं० ८॥. ४ प्रतीस १ प्रत कमिशन. शि. ग. [redacted] सारोळा ता० ५ जि० नगर.

---

## विक्रीस तयार. किं. १२ आणे.

मेहेरबान लिव्हरनर साहेब यांनीं इंग्रजींत लिहिलेल्या [illegible] इंडिया या पुस्तकाचें मराठी भाषांतर छापून विक्रीस [illegible] बक डा. आ. प. ई. यांनी मराठी ५।६ यत्तांकरितां नेमलें [illegible]

म्याकमिलन आणि [illegible]

१२ ब्यॉक स्ट्रीट, मुंबई.

# बाक्षस. बाक्षस. बाक्षस

## ा-रु-बा.।

फक्त २॥ रुपये भरून अ. . मा "कादंबरी कल्पद्रुमास" होणाऱ्या ग्राहकांस फुकट. कल्पद्रु ाचे आठ अंक प्रसिद्ध झा े असून त्यांत "कृष्णकांतचें मृत्युपत्र" ही सर्वोत्कृष्ट कादंबरी संपूर्ण झाली आहे आमच्या ग्राहकांस वरील पुस्तक बाक्षिस मिळून वर्ष अखेर उत्कृष्ट बंगाली आणि हिंदी कादंबऱ्यांच्या भाषांतराचीं ६०० पृष्ठें संग्रह करावयास सांपडतील.

गणपती आळी—वांई
जिल्हा सातारा.

अनंत केशव चितळे


---

## हिंदुस्थाचा रहिवासी.

मेहेरबान डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन साहेब बहादूर यांच्या हुकमावरून जाहीर करण्यांत येतें कीं:—

सर वुइल्यम लिवार्नर यांनीं केलेल्या 'सिटिझन ऑफ इंडिया' या नांवाच्या ग्रंथाचें मराठी भाषांतर "हिंदुस्तानचा रहिवासी." हें पुस्तक मराठी शाळांत चालविण्यासाठीं मंजूर केलें आहे. हें पुस्तक पांचव्या व सहाव्या इयत्तांत वाचन पुस्तकाबरोबरच शिकविण्याचें आहे.

२. शाळांतील वर्गाची पालट नुकतीच झाली आहे, करितां वर लिहिलेलें पुस्तक शिक्षक लोकांनीं आपापल्या शाळांत एकदम सुरू करावें.

३. ट्रेनिंग कॉलेजातील पहिल्या वर्षाकरितां नेमलेल्या पुस्तकांत या ग्रंथाचा समावेश केला आहे तेव्हां तेथेंही हें पुस्तक शिकविलें जाईल.

पुणें एज्युकेशनल इन्स्पेक्टर
मध्यभाग याचें ऑफीस,
तारीख १९।१२।१९००.

J. G. Covernton
ॲक्टिंग एज्युकेशनल इन्स्पेक्टर
मध्यभाग.

---


## विक्रीस तयार.

आमचेकडे लीव्हींग सर्टिफिकिटाचे फार्म व वर्गास लागणारे क्याटलाग विक्रीस तयार आहेत

लिव्हींग सर्टिफिकिटाचे फार्म दर शेकड्यास. ८

क्याटलाग दर शेकडा १ रु.

म्यानेजर चित्रशाळा प्रेस पुणें


---


प्रकाशक—शंकर [illegible] जोशी.

Registered No 179

पुस्तक १२. || श्री || अंक २.

# मराठी शालापत्रक.

# MARATHI SCHOOL PAPER

## फेब्रुवारी १९०१.

विषयक्रम.

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिया यांचा मृत्यू. .... .... | २१ |
| प्रोफेसर मोक्षमुल्लर. .... .... .... .... .... | २७ |
| कै० न्या० महादेव गोविंद रानडे. .... .... .... | ३१ |
| शिक्षणविषयक व्याख्यानें. .... .... .... .... | १८५-९२ |
| पुणें ट्रेनिंग कालेज येथील रिझल्ट. .... .... .... | १-४ |
| सन १९००-०१ सालच्या वार्षिक परीक्षेंत पसार झालेल्या विद्यार्थ्यांचीं व शिक्षकांचीं नांवें—... ... ... ... | |

'चित्रशाळा' प्रेस, पुणें.

आगाऊ वार्षिक वर्गणी, टपालखर्चासह रु० १।८.

फुटकळ अंकास ८३.

कै० केरो लक्ष्मण छत्रेकृत

## अंकगणित

### भाग १।२।३

कै० केरो लक्ष्मण छत्रे यांचे चि० रावसाहेब निळकंठ विनायक छत्रे यांनीं पूर्वीच्या अंकगणितांत हल्लीं पुष्कळ सुधारणा करून नवीन आवृत्ती छापविल्या आहेत व ठिकठिकाणीं जास्त उदाहरणें व व्याख्याही दिल्या आहेत. पूर्वीं दुसरा भाग होता त्याचे हल्लीं दोन भाग केले आहेत. म्हणजे एकंदर ३ भाग झाले आहेत. भाग पहिला किंमत ०=॥. भाग दुसरा किं० ।~. व तिसरा भाग लवकरच छापून प्रसिद्ध होईल. शाळामास्तरांस कमिशन मुबलक मिळेल.

म्यानेजर चि० शा० प्रे० पुणें.

---

# रंगीत सचित्र अक्षरलिपी.

लहान मुलांस सुलभ रीतीनें ओळखीचीं चित्रें पाहून अक्षर ओळख व्हावी या उद्देशानें हें पुस्तक तयार केलें आहे. विनयत्तेत मुलांस नुस्तीं बालबोध व मोडी अक्षरें वाचावयाचीं असतात म्हणून ज्या ज्या नांवाच्या आरंभीं मूळाक्षरांतलें एकेक अक्षर आहे अशा वस्तूंचीं चित्रें देऊन त्यांचे खालीं त्यांचीं नावें बालबोध व मोडी लिपींत दिलीं आहेत.

पुस्तकाची किंमत ०२ आणे ट० ख० ०॥.

म्यानेजर चि० शा० प्रेस पुणें.

---

सृष्टचमत्कार—(६०॥ यत्तेकरितां) किं० ०= रा० का० ल० जोशी शनवार पेठ घर. नंबर १९९ पुणें यांजकडे शेकडा २९ कमिशनवर मिळेल.

# चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिया.



चित्रशाळा प्रेस पुणें सिटी.

जन्य, २४ मे १८१९, मृत्यू, २२जानेवारी १९०१.

# शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यांसी । हें अवघें सद्गुरूपाशीं।
सद्गुरू पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळां जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १५ फेब्रुवारी १९०१. अंक २.

## चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिया यांचा मृत्यू.

ता० २२ जानेवारी सन १९०१.

आपल्या परम दयाळू व वयोवृद्ध व्हिक्टोरिया महाराणी साहेब यांच्या मृत्यूनें आज संपूर्ण इंग्रजी साम्राज्य शोकाकूल होऊन गेलें आहे. दैवशाली राणीसाहेब म्हणजे पिकलें पान झाल्या होत्या; व त्यांनीं सुमारें ६४ वर्षांच्या आपल्या लांब कारकीर्दीत उत्तम प्रकारें राज्य चालवून प्रजाजनांची अत्यंत प्रीती संपादिली होती; व त्यांस संतती संपत्ती यांनीं युक्त असें जगांतलें पूर्ण ऐश्वर्य अनुकूल असून, दैववान मनुष्यास या संसारांत जें सुख व्हावयाचें, तें झालें होतें. तसेंच, त्यांचा आपल्या ख्रिस्ती धर्मावर पूर्ण विश्वास असून, त्या धर्माप्रमाणें मरणोत्तर उत्तम गती प्राप्त होण्याचें साधन त्यांनीं निरंतर चालविलें होतें. तेव्हां वस्तुतः त्यांचें मरण कोणत्याही प्रकारें शोकजनक नव्हे. त्यांचे झालें तें चांगलेंच झालें. परमेश्वरानें त्यांच्यापासून त्यांचें कर्तव्य करून घेऊन, आता त्यांस त्यानें आपल्या जवळ अक्षय्य सुखांत राहाण्यासाठीं बोलावून घेतलें, हें त्याच्या इच्छेप्रमाणें योग्यच झालें. परंतु मनुष्यांच्या आपलपोट्या स्वभावाप्रमाणें

असली सुखकारक कारकीर्द आणखी पुष्कळ दिवस चालू राहावी, असें आम्हां प्रजाजनांस वाटत होतें. यामुळें त्यांचा जो हा स्वाभाविक मृत्यू त्याबद्दलही आपल्यास वाईट वाटत आहे ! अलीकडे सुमारें दीडवर्ष आफ्रिकेंत जी लढाई चालली होती, तिचा शेवट अजून समाधानकारक लागत नाहीं, याबद्दल या अखेरच्या दिवसांत राणीसाहेब यांस फार वाईट वाटत होतें. तेव्हां अशा काळजींतच त्यांचा शेवट झाला, हें एक अर्थी वाईट झालें. परंतु या गोष्टी सर्वशक्तिमान परमेश्वराच्या पूर्ण आधीन आहेत; तेव्हां त्याच्या इच्छेस मान देऊन आपण राहिलें पाहिजे.

महाराणीसाहेब यांच्या कारकीर्दीचा एकंदर इतिहास आम्ही षष्ठिवार्षिक उत्सवाच्या वेळीं शाळापत्रकांत समग्र दिलाच आहे. तेव्हां आतां जास्त कांहीं लिहावयाचें नाहीं. थोडक्यांत एवढेंच सांगणें पुरें आहे कीं, अलीकडे कित्येक शतकांत आमच्या या भाग्यशाली राणीसाहेबांच्या कारकीर्दी सारखी अत्यंत भरभराटीची व एकंदरींत सुखासमाधानाची कारकीर्द कोणत्याही देशांत झालेली नाहीं. तसाच त्यांनीं आपल्या मागें होणाऱ्या इंग्लंडच्या राजांस अशा प्रकारचा वागणुकीचा कित्ता घालून ठेविला आहे कीं, सांप्रत सर्व देशांतून प्रजाजनांना राजसत्ता नसून आपल्या इच्छेप्रमाणें राज्य चालावें असें जें वाटूं लागलें आहे, त्याच्या योगानें वाटणारा राजसत्तेबद्दलचा हेवा इंग्लिश राजसत्तेखालच्या प्रजेस कधींही वाटावयाचें कारण नाहीं; व या राष्ट्रांत राजतत्व व प्रजातत्व यांच्या मधील सलोखा निरंतर कायम राहील. तसेंच इतर देशांत ज्या कित्येक व्यवस्था राजा व प्रजा यांमध्यें तंटे होऊन मग झाल्या, त्या इंग्रज लोकांना केवळ शांततेनें प्राप्त होऊन आज काल त्यांचें राष्ट्र उत्कृष्ठ राज्यव्यवस्थेखालीं अत्यंत भरभराटींत आहे. या परिणामाचें सर्व श्रेय महाराणी व्हिक्टोरिया यांसच आहे. आजकाल इंग्रजी प्रजा जें स्वातंत्र्य अनुभवीत आहे, तें प्राप्त करून देण्याचें यश प्रजाजनांचे पुढारी या दृष्टीनें जसें ग्लाडस्टन साहेब यांच्याकडे आहे, त्याचप्रमाणें राजसत्तेच्या बाजूनें तें स्वातंत्र्य प्रजेस मिळवून देण्याचें यश व्हिक्टोरिया महाराणीसाहेब यांचें आहे, तेव्हां सरतेशेवटीं परमेश्वराजवळ

सर्व प्रजेनें अशी प्रार्थना करावी, कीं त्यानें राणीसाहेबांच्या आत्म्यास निरंतर शांती द्यावी, व तिच्या पुत्रपौत्रांस तिचा अत्यंत बालबोध कित्त वळवून, नानाविध व लक्षावधी इंग्रजी राजसत्तेखालच्या या प्रजेस सुख देण्याची बुद्धी द्यावी.

महाराणी विक्टोरिया यांच्या मागें त्यांचे वडील चिरंजीव आलबर्ट एडवर्ड, माजी प्रिन्स ऑफ् वेल्स, हे **'सातवा एडवर्ड राजा'** हें नांव धारण करून राज्यपदारूढ झाले आहेत. यांस परमेश्वर दीर्घायू करून, त्यांची कारकीर्द सर्व ब्रिटीश राज्यास त्यांच्या मातोश्रीच्या कारकीर्दीप्रमाणेंच अत्यंत सुखावह व्हावी, असें हिंदुस्थानांतील राजनिष्ठ प्रजाजन चिंतीत आहेत. ही प्रजाजनांची प्रार्थना परमेश्वर सफल करो!

## प्रोफेसर मोक्षमुल्लर.

इंग्लंड व जर्मनी या देशांत संस्कृत विद्यांमध्यें प्रवीण असे जे कित्येक विद्वान् गृहस्थ अलीकडे होऊन गेले व आज विद्यमान आहेत, त्यांमध्यें प्रोफेसर फ्रेडरिक मोक्षमुल्लर हे प्रमुख होते. हिंदुस्थानांत आलेले प्रख्यात इंग्रज गृहस्थ वुईलसन यांनीं प्रथमतः संस्कृताचा अभ्यास करून, ही भाषा उत्कृष्ट आहे इतकेंच नव्हे, तर अति प्राचीन इतिहासाचे संबंधानें अनेक गोष्टींचा निकाल होण्यास संस्कृताचा अभ्यास करणें फार जरूरीचें आहे, असें दाखवून दिलें. त्यानंतर पुष्कळ जर्मन, फ्रेंच व इंग्रज विद्वानांचें इकडे लक्ष, जाऊन त्यांनीं संस्कृत भाषा व तींतील वेद, उपनिषदें, पुराणें, नाटकें, यांचा अभ्यास केला व अनेक नवीन शोध लाविले. या सर्व नवीन शोधांचें श्रेय मोक्षमुल्लर यांस आहे; व त्यांनीं आम्हां हिंदूंवर अनंत उपकार केले आहेत. संस्कृत विद्यांचा शोध पाश्चात्यांस लागण्या पूर्वी हिंदू राष्ट्र म्हणजे पृथ्वीवरील इतर अनेक रानटी राष्ट्रांतलेंच एक आहे, अशी बहुतेक सर्व युरोपियन राष्ट्रांची समजूत होती. प्रख्यात इंग्रज इतिहासकार मिल्ल यानें असें लिहून ठेविलें आहे, कीं सरकारानें एवढें जे प्राच्य देशीय ग्रंथ खर्च करून जमवून

ठेविले आहेत, त्यांची किंमत ते ज्या फळ्यांवर ठेविले आहेत, त्यांच्या किंमती इतकी देखील नाहीं! अशी प्रथमतः आमच्या विद्यांच्या संबंधानें मोठ्या विद्वानांची सुद्धां चुकीची व चमत्कारिक समजूत होती. परंतु संस्कृतांतलें विद्याभांडार पाश्चात्यांच्या दृष्टीस पडल्यावर, हिंदू राष्ट्र हें एका काळीं अत्यंत सुधारलेलें होतें, त्यांतील लोकांनीं परिश्रम करून लिहून ठेविलेल्या विद्या आजमित्तीस ही आश्चर्य चकीत करून सोडण्यासारख्या आहेत, व प्राचीन ग्रीक व रोमन लोकांनीं विद्या, कला व तत्वज्ञान या गोष्टींच्या संबंधानें जें कांहीं करून ठेविलें आहे, त्याही पेक्षां किंबहुना हिंदूनीं जास्त करून ठेविलें आहे, अशी तिकडील विद्वानांची खात्री झाली. तशी खात्री होतांच त्यांनीं संस्कृत विद्येंत मन घातलें, व त्यांचा सर्व जगास उपयोग व्हावा, अशा रीतीची त्यांची उत्तम प्रकारची व्यवस्था लावून दिली. संस्कृत विद्यांचें सर्व भांडार आजपर्यंत कृपणाच्या ठेव्या प्रमाणें किल्ल्याकुलपांत कोंडून पडलें होतें. त्याला बाहेर काढून व त्यावरचा मळ झाडपून टाकून त्याचें खरें तेज जगास दाखविण्याचें श्रेय मुख्यतः मोक्षमुल्लर यांसच आहे.

मोक्षमुल्लर हे जर्मन होते. यांचा जन्म सन १८२३ या वर्षी झाला, व विसावें वर्ष लागण्यापूर्वींच ते ग्र्याजुएट होऊन, विद्यालयांतला त्यांचा अभ्यास पुरा झाला. त्यांना आरंभापासून संस्कृत भाषा आवडली होती. त्यांनीं १८४४ सालांत 'हितोपदेश' या संस्कृत ग्रंथाचें जर्मन भाषेंत भाषांतर केलें. त्यामुळें त्यांची संस्कृत पंडित म्हणून प्रख्याती होऊन, पुढें संस्कृताचा जास्त अभ्यास करण्यासाठीं ते पारीस शहरीं गेले. तेथें यूजिन बारनो या नांवाचे संस्कृतज्ञ होते, त्यांचे ते अंतेवासी झाले. या पंडितांनीं मोक्षमुल्लर यांची बुद्धी, विद्वत्ता, परिश्रम करण्याची हौस व तरुणपणची तरतरी पाहून त्यांनीं ऋग्वेद ग्रंथ सभाष्य छापून काढावा, म्हणून त्यांस सुचविलें. हें काम असें तसें नव्हतें. ऋग्वेद व भाष्य यांच्या उत्तम प्रती मिळविणें, ते ग्रंथ युरोपांत बसून नीटपणें समजणें, व पुढें एवढा मोठा खर्च करून पुस्तकें छापणें, हें सर्वच काम अवाढव्य होतें. तथापि मोक्षमुल्लर यांनीं त्यास हात घातला. त्या वेळीं ईस्ट इंडिया कंपनीनें विला-

पर्यंत आपल्या हपिसांत पुष्कळ प्राच्य देशीय ग्रंथ जमविले होते. त्यांत ऋग्वेद व त्याचें भाष्य यांच्या प्रती होत्या. त्या पाहाण्यासाठीं व उतरून घेण्यासाठीं म्हणून मोक्ष मुल्लर हे विलायतेस गेले. तेथें प्रख्यात संस्कृतज्ञ विईलसन यांच्या शिफारशीवरून ईस्ट इंडिया कंपनीनें मोक्षमुल्लर यांजकडून ऋग्वेद छापविण्याचा बेत केला. सभाष्य ऋग्वेद त्यांतील अनेक प्रकारच्या माहितीसह छापून होतांच मोक्ष मुल्लर हे संस्कृत पंडित म्हणून प्रख्यात झाले, व इंग्लंड, जर्मन, फ्रान्स, अमेरिका या देशांतील युनिव्हर्सिव्यांनीं त्यांस आपलें सभासद नेमिलें. इंग्लंडांत आक्सफर्ड युनिव्हर्सिटींत ते संस्कृताचे गुरू झाले व यानंतर ते इंग्लंडचेच रहिवाशी बनले. त्यांस राणी सरकारानेंही मोठाल्या पदव्या दिल्या आहेत.

यावर कोणी असें विचारील, कीं मोक्ष मुल्लर यांनीं ऋग्वेद छापिला, यांत विशेष तें काय केलें ? पुस्तक मिळालें व तें छापण्याच्या खर्चाची तजवीज झाली, कीं मग हवे त्यांस हें काम करितां आलें असतें. तर हें काम अशांतलें सोपें नव्हतें. प्रथमतः ऋग्वेद मूळ शुद्ध करावयाचा. नंतर भाष्य अनेक प्रती पाहून शुद्ध करावयाचें. अशा रीतीनें सर्व ऋग्वेद छापून झाल्यावर त्यामधले महत्वाचे, जुने, चमत्कारिक, ऐतिहासिक शब्द, नांवें, इत्यादी शोधून काढून त्यांची जंत्री लावावयाची, भाष्यांत जो अर्थ केला असेल त्याचा नीट विचार करावयाचा हें काम फार कठीण होतें; आणि हेंच तर मुख्यतः करावयास पाहिजे होतें. कारण असल्या माहितीचा युरोपांतील व दुसऱ्या सर्व देशांतील पंडितांस अनेक प्रकारचे जुने शोध करण्यास मोठा उपयोग व्हावयाचा.

याप्रमाणें ऋग्वेद जगापुढें आणिल्यावर माक्स मुल्लर यांनीं त्याचें इंग्रजी भाषेंत भाषांतर केलें. हें काम तर फारच कठीण होतें. ऋग्वेद हा साऱ्या पृथ्वींतल्या ग्रंथांतला जुना ग्रंथ. तो ज्यांनीं मूळ लिहिला, त्यांचे आचार विचार पृथ्वींतल्या दुसऱ्या राष्ट्रांतील लोकांहून भिन्न होतेच, पण सांप्रत त्या लोकांचे जे वंशज हिंदुस्थानांत आहेत, त्यांच्या आचार विचारांहूनही भिन्न होते. शिवाय हल्लींच्या हिंदुस्थानवासी लोकांच्या वेदांबद्दल व

त्यांतील विषयांबद्दल चमत्कारिक समजुती. इतक्या गोष्टी लक्षांत घेऊन भाषांतर करावयाचें, तें करितांना अर्थाची चर्चा करावयाची. वेदाचा अर्थ करण्यासाठीं तयार केलेलीं अशीं अनेक जुनीं साधनें आमचे इकडे आहेत, परंतु सर्व ऋग्वेदाचा अर्थ आमचे इकडे जुन्या काळीं कोणीं केलेला नव्हता. अगदीं अलीकडे सायणाचार्य किंवा विद्यारण्यस्वामी या नांवाच्या एका दक्षिण हिंदुस्थानांतील पंडितानें वेदांवर भाष्यें केलीं. तीं चांगलीं असल्याबद्दल प्रख्याती आहे. परंतु त्या भाष्यांचा मुख्य दोष असा आहे, कीं वेद हे ग्रंथ मनुष्यकृतीचे नसून प्रत्यक्ष परमेश्वराचें निश्वसित आहेत, त्यांत जें काय आहे तें अत्यंत पवित्र, त्यांच्या अर्थावर टीका करणें तर ती अत्यंत पूज्यभावानेंच केली पाहिजे. अशा प्रकारच्या समजुती ठाम झाल्यानंतर हीं भाष्यें लिहिली असल्यामुळें त्यांतील अर्थाची आधुनिक दृष्टीनें मीमांसा करावयास मोठाच विचार लागतो. सायणाचार्यांचे भाष्यांशिवाय वेदावर समग्र भाष्य नसलें, तरी अनेकांनीं वेदवाक्यांचा अर्थ प्रसंगानुसार केला आहे. परंतु हे अर्थ करणारे निरनिराळ्या मतांचे पक्षाभिमानी होते. यामुळें त्यांनीं आपापल्या मतास जुळण्याजोगा अनेक वेदवचनांचा निरनिराळा अर्थ करून त्यायोगानें आधुनिक शोधकांना घोटाळ्यांत पाडण्याचें साधन मात्र करून ठेविलें आहे. एवढे सर्व प्रकार मनांत आणले असतां ऋग्वेदाचें भाषांतर करणें हें केवढें जोखमाचें व अवाढव्य काम होतें, हें लक्षांत येईल. या भाषांतराबरोबरच प्राचीन आर्य देव, आर्य लोकांच्या रीतीभाती, व दुसरी अनेक प्रकारची ऐतिहासिक माहिती, इत्यादी प्रकारांचा शोध लावून व त्यावर लेख लिहून माक्स मूलर यांनीं सर्व वैदिक वाङ्मय सुलभ करून सोडिलें आहे. ऋग्वेदाचें भाषांतर व इतर लेख इंग्रजींत आहेत, व इंग्रजी भाषा ही सर्व जगाची भाषा झाली आहे, म्हणून आतां ऋग्वेदही सर्व जगापुढें आला आहे.

गेल्या शतकाच्या आरंभापर्यंत युरोपियन विद्वान् लोकांची अशी समजूत होती, कीं ख्रिस्ती शास्त्राची मूळ भाषा हीब्रू असल्यामुळें परमेश्वरानें मनुष्य प्राण्यास प्रथम जी भाषा दिली, ती हीच होय; व तिच्यापासून

मग पृथ्वींतल्या सर्व भाषा झाल्या. परंतु कित्येक गृहस्थांनीं संस्कृताचा अभ्यास केल्यानंतर त्यांस लौकरच असें आढळून आलें, कीं आशिया खंडांतील संस्कृत भाषा व पारशी लोकांची पवित्र भाषा व युरोपांतील ल्याटीन, ग्रीक, आंग्लोसाक्सन या भाषा, व या सर्व भाषांपासून झालेल्या भाषा, यांचे मूळ एकच असावें. विद्वानांनीं या संबंधानें शोध करून नवीन भाषाशास्त्र मोक्षमुल्लर यांचे अगोदर बनविलें होतें. परंतु या नवीन शास्त्राप्रमाणें निरनिराळ्या भाषांची तुलना करून त्यावरून हा शोध ठाम करण्याचें श्रेय मोक्षमुल्लर यांसच आहे. यांनीं आणखी असेंही दाखवून दिलें, कीं या सर्व भाषा ज्या मूळ एका भाषेपासून झाल्या, ती भाषा बोलणारे आर्य लोक प्रथमारंभी मध्य एशियेंत राहात असावे, व मग ते तेथून सर्वत्र पसरले. आर्य लोक मूळारंभीं कोठें राहात असावे, यासंबंधानें माक्समूलर यांचे मत सध्या सर्वमान्य नाहीं. पुष्कळांचा तर्क आतां असा झाला आहे, कीं आर्य लोक हे प्रथमतः कोठें तरी अगदीं उत्तर दिशेला जेथें निरंतर बर्फ असतो अशा प्रदेशांत राहात असावे; व ज्या वेळेपासून मनुष्यजातीच्या हालचालीचा कांहीं तरी इतिहास सांपडतो, त्यावेळेचे पूर्वीच ते पश्चिमेकडे आटलांटिक महासागर व पूर्वेकडे सिंधू व तिच्या पांच नद्या, एथपर्यंत पसरलेले होते. आर्यांच्या संबंधाचा स्थाननिर्णय जरी अद्याप संशयात्मक आहे, तरी भाषांच्या संबंधाचा निर्णय व सर्व आर्यांचे पूर्वज केव्हां तरी एकेजागीं राहात होते व एकभाषा बोलत होते, आणि एकाच प्रकारच्या देवांची भक्ती करून, एकाच पद्धतीनें यज्ञयाग करीत होते, व सर्व आर्यांच्या पौराणिक दंतकथा व ऐतिह्य मुळाशीं एकच आहेत, ही गोष्ट माक्समूलर यांनीं पूर्णपणें स्थापित केली आहे. व तिच्या संबंधानें ऋग्वेद प्रसिद्ध केल्यावर माक्समूलर यांनीं अनेक विद्वानांच्या साह्यानें प्राच्य लोकांचे पवित्र ग्रंथ इंग्रजींत त्यांचीं भाषांतरें करून व टीकाविषयक मोठाले निबंध लिहून प्रसिद्ध करण्यास सुरवात केली. या प्रचंड उद्योगाचें फळ अशीं सुमारें चाळीस पुस्तकें तयार झालीं असून, त्यांमध्यें उपनिषदें, वेदान्त, न्याय, गीता, तत्वज्ञान वगैरे विषयांतील हिंदूचे पवित्र

ग्रंथ, बौद्ध लोकांचे बहुतेक धर्मग्रंथ व पारशी लोकांचे प्राचीन पवित्र ग्रंथ इंग्रजी भाषेंत झाले आहेत. या ग्रंथांत त्या त्या प्राचीन ग्रंथाचें केवळ भाषांतरच आहे असें नाहीं, तर सांप्रतच्या शोधक दृष्टीला अनुसरून यांत अनेक प्रकारची ऐतिहासिक व भाषाशास्त्रसंबंधी माहिती भरपूर आहे.

प्रो० मोक्ष मुल्लर यांनीं पृथ्वीतील सर्व भाषांचा साम्यतेच्या दृष्टीनें विचार करून जसें भाषाशास्त्रास नवीन स्वरूप आणिलें, त्याचप्रमाणें त्यांनीं धर्मशास्त्राचे विचारासही नवीन स्वरूप आणिलें. त्यांनीं आमचा वेदान्त व आमचीं उपनिषदें यावर मोठाले ग्रंथ लिहिलेच आहेत. पण पृथ्वीवर निरनिराळे धर्म कोणचे आहेत. त्यांचीं मतें काय आहेत, मूळारंभीं धर्ममत व तत्संबधाच्या कल्पना मनुष्यांमध्यें कशा उत्पन्न झाल्या व त्यांची वाढ कशी होत गेली, व ही वाढ होत जाऊन पुढें निरनिराळे धर्मप्रघात व धर्ममतें कशीं बनत गेलीं, ह्या गोष्टींची चर्चा उत्तम रीतीनें केली आहे. या विषयावरचे प्रो० म्याक्समूलर यांचे ग्रंथ सर्वमान्य आहेत. यांचे आधारें कै० शंकर बाळकृष्ण दिक्षीत यांनीं मराठींत एक ग्रंथ लिहिला आहे. त्याचप्रमाणें माक्समूलर यांनीं सर्व देशांतील पुराणें दंतकथा व जुन्या गोष्टी यांची साम्यता करून, पौराणिक विचार प्रथमतः कसे बनत गेले, व त्यांवरून जुना इतिहास कसा सांपडतो हेंही सिद्ध केलें आहे.

प्रो० मोक्ष मुल्लर यांनीं जसे अनेक विषयांवर ग्रंथ लिहिले, त्याप्रमाणें त्यांचा असल्या विषयांवर व्याख्यानें देण्याचा क्रमही सारखा चालू असे. हिंदू धर्म, बौद्ध धर्म, हिंदूंचा वेदान्त, तुलनादर्शक भाषाशास्त्र वगैरे विषयांवरील त्यांचीं लोकांसाठीं नेहमीं होणारीं व्याख्यानें व युनिव्हर्सिटीमध्यें विद्यार्थ्यांसाठीं होणारीं व्याख्यानें, यांचे योगानें प्राच्य लोकांविषयींच्या व प्राच्य विद्यांच्या संबंधाच्या सर्व गैरसमजुती नाहींशा होऊन, प्राच्य देशांच्या संबंधानें इंग्लंड जर्मनी, फ्रान्स व इतर युरोपियन देशांतील लोकांचें यथार्थ मत आलें आहे.

मोक्ष मुल्लर यांनीं जो निरनिराळ्या विद्यांचा अभ्यास चालविला होता, त्यामुळें त्यांचें एकंदर विद्या प्रसाराकडेंही उत्तम प्रकारचें लक्ष

असे. लोकांत शिक्षणाचा प्रसार कोणच्या प्रकारें व्हावा, स्त्रीशिक्षणास, गरीब लोकांचे शिक्षणास व धंदेवाले लोकांचे शिक्षणास योग्य दिशा कशी लागावी, या संबंधानें त्यांचे विचार वेळोवेळीं प्रगट झाले आहेत; व इंग्लंडांत प्राथमिक शिक्षणाचे संबंधानें जेव्हां जेव्हां विद्वानांचे अभिप्राय घेण्याचा प्रसंग आला, तेव्हां प्रोफेसर म्याक्समुल्लर यांचा अभिप्राय घेतलेला आहे. प्रोफेसर साहेबांचे हे विचार रिपोर्टांमधून वगैरे आढळतात; व त्यांवरून त्यांची जनसमूहांत विद्याप्रसार व्हावा अशी उत्कट इच्छा असे असें दिसून येतें. साधारण प्रतीच्या लोकांमध्यें त्यांच्या धंद्यांस उपयोगी पडेल अशा प्रकारच्या शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे, केवळ विद्वत्तेचेंच शिक्षण यांच्या कांहीं एक उपयोगाचें नाहीं, असे आपले विचार त्यांनीं प्रघट केले आहेत.

म्याक्समूल्लर यांस आमच्या विद्यांचा, आमच्या राष्ट्रांचा व आमच्या लोकांचा मोठा अभिमान होता; व त्यांच्या एकंदर उद्योगानें आमचें अत्यंत हित झालें आहे. सर्व लोकांत, सर्व धर्मांत व सर्व ग्रंथांतून जें चांगलें म्हणून कांहीं असेल, त्याचें अभिनंदन करावयाचें ही त्यांच्या स्वभावांतील मुख्य गोष्ट असे. आमचे धर्मग्रंथ व आमच्या विद्या व आमचें तत्वज्ञान यांचा आरंभीं मिशनरी लोकांनीं पुष्कळ विचार करून त्यांतील गोष्टी जगापुढें आणिल्या आहेत, व त्यामुळें मिशनरी लोकांचेही आमच्यावर उपकार आहेत. परंतु या लोकांनीं आमच्या विद्यादिकांचा केवळ एकपक्षीय विचार केला. दुसऱ्याचे विचार झाले तरी ते असतील असें लोकांपुढें ठेवावें, व लोकांना ज्यांचा त्यांना विचार करूं द्यावा, अशी उदार बुद्धी या उद्योगी पण पूर्ण स्वधर्माभिमानी मिशनरी लोकांमध्यें साहजिकच नव्हती व नाहीं; व या लोकांपैकीं कित्येकांनीं दुसऱ्याच्या विचारांतील नुस्ते दोष काढण्याचेंच काम चालविलें आहे. अलीकडे मद्रासेस जीं कित्येक पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांवरून हें दिसून येईल. या पुस्तकांत माहिती उत्तम असते, व नवीन दृष्टीनें एकेक गोष्टीचा विचार करण्याचा यत्नही चांगला केलेला असतो,

परंतु त्यांत केवळ दोषच शोधून काढून दाखविले असतात, त्यामुळें मूळच्या पुस्तकांच्या संबंधाची आदरबुद्धि कमी होते. हीं सर्व मद्रासी पुस्तकें मुख्यतः प्रो० म्याक्स मूलर यांच्याच ग्रंथांचे आधारें तयार केलेलीं दिसतात. त्यांतलें दोष काढून टीका करण्याचें काम मात्र तेवढें नवें आहे. प्रो० म्याक्स मूलर यांनीं कोणत्याही ग्रंथाचे संबंधानें असें केलेलें नाहीं. प्रत्येक ग्रंथांत जें कांहीं चांगलें असेल तेवढें निवडून काढून तें एकंदर जगापुढें ठेवावें, हा त्याचा निर्मळ हेतू असे, व तो उत्तम रीतीनें सिद्धीस गेला आहे. प्राच्य देशीय विद्या पाश्चात्य विद्वानांपुढें येऊन त्यांच्या संबंधानें त्यांचे मनांत आदरबुद्धी उत्पन्न होणें, व त्या विद्यांच्या उद्धारार्थ नानाप्रकारचे यत्न होणें, व त्या विद्यांपासून अर्वाचीन जगास उपयोगी असें सार काढून घेणें, या गोष्टीला सर्वस्वी प्रो० माक्स मूलर यांचेच यत्न कारणीभूत झाले आहेत. यामुळें सर्व प्राच्य राष्ट्रीयांनीं त्यांचें नांव निरंतर आपल्या दृष्टीपुढें खोदून ठेविलें पाहिजे.

प्रो० म्याक्स मूलर यांचे आम्हां हिंदूवर तर अनंत उपकार आहेत. आमचें राष्ट्र म्हणजे पृथ्वीवरील इतर रानटी राष्ट्रांतलेंच एक होय, ही समजूत त्यांनीं अगदीं खोडून टाकिली. आमचा धर्म म्हणजे केवळ दुसऱ्या अनेक रानटी धर्माप्रमाणें भुतांराक्षसांचा धर्म आहे, या मताचें त्यांनीं सप्रमाण निरसन करून, आमच्या पूर्वजांनीं जेवढा धर्मविचार केला तेवढा कधींच कोणीं केला नाहीं, असें जगास दाखवून दिलें. त्याप्रमाणें आमचे ग्रंथ हे ज्या फळ्यांवर ठेवावयाचे त्या फळ्यांच्या किंमती इतकेही नाहींत, ही समजूत खोटी ठरवून त्यांनीं असें दाखवून दिलें, कीं आमच्या विद्यांच्या इतक्या महत्वाच्या विद्या व त्यांवरील ग्रंथ पृथ्वीच्या पाठीवर दुसऱ्या कोणच्याही जुन्या राष्ट्रांत नाहींत. अशा रीतीनें त्यांनीं आमच्या संबंधानें पाश्चात्यांची यथातथ्य बुद्धी करून दिली. त्याचप्रमाणें त्यांनीं आम्हास आमचे स्वतःचेच ग्रंथ नीटपणें वाचावयास शिकविलें, असें म्हणण्यासहीं चिंता नाहीं. आमच्या विद्यांचें खरें तत्व पाहण्याची. आमच्यामधील शोधक बुद्धी अलीकडल्या काळीं अगदीं नष्ट झालेली होती. संस्कृत ग्रंथांस ते केवळ जुन्या

# न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे.



चित्रशाळा प्रेस पुणें सिटी.

जन्म ता० १८।२।१८४२, मृत्यू ता० १६।१।१९०१.

पवित्र भाषेंतले ग्रंथ म्हणूनच पवित्र मानावे व वादविवाद करून प्रति-पक्षयांचा पाडाव करितां यावा म्हणूनच आमच्या विद्यांचा आम्हांस अभिमान वाटत असे. अमुक एक ग्रंथ केवढा योग्यतेचा, कीं त्यांतील एकेक कोडें सुटत नाहीं. अमुक कवी केवढा मोठा, कीं त्याच्या एकेका श्लोकाचे दाहा दाहा अर्थ होतात! अशा प्रकारच्या आमच्या विद्यांच्या संबधानें आमच्या अडाणी समजुती असत. परंतु आमच्या इकडे पाश्चात्य तऱ्हेची विद्या शिकण्याची पद्धत सुरू झाल्यानें आम्ही आमच्या विद्यांकडे नवीन नजरेनें पाहूं लागलों; व माक्स मूलर यांनीं त्यांतील खरे गूण निवडून काढून ते आमच्या पुढें मांडल्यामुळें आमच्या विद्यांचा जो आम्हास उगाच **वृथा** अभिमान वाटत असे, तो नष्ट होऊन आतां **खरा** अभिमान वाटूं लागला आहे. पूर्वीं आपल्याला कोणीं आमच्या विद्या थोर कां, म्हणून विचारलें असतें, तर योग्य रीतीनें कारण सांगतां आलें नसतें. म्याक्स मूलर यांनीं आपणास जी नवीन दृष्टी दिली आहे, तिच्या योगानें आम्हांस आमच्या विद्यांचा उत्कृष्टपणा तेव्हांच दाखवितां येईल. इतकेंच नाहीं, तर मनांत असल्यास व अंगीं योग्यता आल्यास आम्हांस आतां आमच्या पूर्वजांचा उद्योग पुढें चालवून आमचें जुनें नांव आम्हांस राखतां येईल. तेव्हां या संबंधानें प्रो० माक्स मूलर यांचे आमच्यावर अनंत उपकार आहेत, त्याबद्दल त्यांचे उतराई होण्याकरितां व त्यांचें नांव आमच्या प्राचीन थोर ऋषींच्या नांवांच्या मालिकेंत गोवून टाकून त्यांना आपण त्यांचेबरोबरच ' महर्षी **मोक्ष मूलराचार्य** ' असें पवित्र, गोड व गंभीर असें संस्कृत नामाभिधान द्यावें हें अगदीं योग्य आहे.

---

## कै० न्या० महादेव गोविंद रानडे.

—:+:—

कै० माधवराव रानडे यांच्या मृत्यूची अत्यंत दुःखकारक वार्ता आतां सर्वश्रुत झाली आहे, व त्यांचा एकंदर जीवनवृत्तांत ही सर्वांस ठाऊक झाला आहे या महापुरुषाच्या मरणानें केवळ महाराष्ट्राचीच नाहीं, तर

एकंदर हिंदुस्थान देशाची केवढी हानी झाली आहे, हें कोणासही सांगावयास नको. माधवरावजी हे आमच्या देशांत जो पाश्चिमात्य विद्यारूपी वृक्ष लाविला गेला, त्याचें पहिलें फल होय; व तें फल अगदीं उत्तम असें निपजलें. पाश्चिमात्य विद्याप्रसार देशाला हितप्रद होणार नाहीं अशी प्रथमारंभीं समजूत होती व अजूनही क्वचित् तशी समजूत आहे. परंतु माधवराव रानडे या एकाच उदाहरणानें ही समजूत अगदीं निराधार आहे, असें स्पष्टपणें दाखवून दिलें आमच्या सुशिक्षितांनीं विद्यामंदिरांतून विद्याविभूषित होऊन बाहेर पडल्यावर पुढें काय करावें हें ठरविण्यासाठीं माधवराव रानडे यांच्या चरित्राचा कित्ता पुढें ठेवावा. हा कित्ता प्रत्येक मनुष्यास उपयोगीं पडेल, कारण यांनीं सरकारी नोकरी केली, देशहिताच्या राजकीय व सामाजिक दोन्ही प्रकारच्या चळवळी केल्या, व त्याही पुनः सरकार व जनसमाज या दोघांसही संतोषित राखून केल्या; त्यांनीं विद्यार्थी शिकविले, त्यांनीं व्याख्यानें दिलीं; त्यांनीं व्यापार केला; त्यांनीं ग्रंथ लिहिले; त्यांनीं अनेक उद्योगांसाठीं मंडळ्या सभा व इतर संस्था स्थापिल्या. सारांश, माधवराव यांनीं ज्याचा कित्ता घालून दिला नाहीं, असें देशहिताचें कोणचेंच कृत्य नाहीं. तेव्हां ज्याला देशकार्य कर्तव्य असेल, त्याला अमुक गोष्ट कशी करावी हें पाहण्यास माधवरावजींच्या चरित्राबाहेर मुळींच जावयास नको. यांचें अशा रीतीनें लिहिलें चरित्र लौकरच कोणी तरी तयार करील अशी सर्व लोक आशा करीत आहेत. माधवरावजींच्या संबंधानें सध्या इतके लेख येऊन गेले आहेत, कीं वस्तुतः आम्हास नवीन कांहीं लिहिण्यासारखें राहिलें नाहीं. तेव्हां आम्ही तूर्त आमच्या वाचकांसाठीं येथें ठिकठिकाणचे विचार ग्रथित करितों.

अलौकिक बुद्धिमत्ता, दीर्घ व सतत व्यासंग, देशाबद्दलची खरी कळकळ, विद्यार्जनाचें स्वाभाविक जडलेलें व्यसन, अचुक कल्पकपणा, वगैरे अनेक गुणांनीं माधवरावजींचें चरित्र बोधप्रद असून महत्वाचें झालें आहे. याखेरीज राजदरबारीं व लोकांत त्यांस जो वेळोवेळीं मान मिळत गेला

व लोकांची आणि सरकारची जी कामगिरी त्यांनीं बजाविली, तीही कांहीं साधारण नाहीं. दुसऱ्या कोणा पुरुषाच्या हातून एवढी कामगिरी जरी झाली असती तरी देखील त्यांची थोर पुरुषांत गणना करावी लागली असती. पण रावसाहेबांकरितां आज महाराष्ट्रांतील प्रत्येक समजूतदार मनुष्य जो हळहळत आहे, तो ते कांहीं हायकोर्टाचे जज्ज होते, प्रार्थनासमाजाचे अध्यक्ष होते किंवा सामाजिक सुधारणेचे अध्वर्यू होते म्हणूनच केवळ नव्हे. या गोष्टी थोरपणा प्राप्त होण्यास साधनीभूत नाहींत असें नाहीं. पण तेवढ्यानें माधवरावजीच्या थोरपणाची उपपत्ती लागत नाहीं अशी आमची समजूत आहे. रावसाहेब रानडे यांच्यासारखी आपला देश, आपले लोक व त्यांची उन्नती, यांची खरी खरी कळकळ रात्रंदिवस मनांत बाळगणारा पुरुष आमच्यांत आजपर्यंत झाला नाहीं. दुसऱ्या लोकांची देशहिताची कळकळ कांहीं तरी स्वहित साधण्यासाठीं किंवा प्रतिष्ठेकरितां असते. पण यांनीं स्वदेश हितासाठीं झटतांना स्वहिताची परवा केली नाहीं. इतकेंच नाहीं, पण माधवराव यांस आज कांहीं बाबतींत कोणी जर वाईट म्हणत असेल, तर तें ते देशहिताच्या कामांत पडत असत म्हणूनच म्हणत असेल.

माधवरावजींच्या उद्योगांचें खरें तत्व लक्षांत येण्यास माधवरावजी पुण्यास पहिल्यानें जेव्हां आले तेव्हां पुणें किंवा महाराष्ट्र याची काय स्थिती होती याचें थोडक्यांत निदर्शन केलें पाहिजे. एक राज्य जाऊन दुसरें राज्य कायम होईपर्यंत मध्यंतरीं जो काल जातो तो राष्ट्राच्या अभिवृद्धीस पुष्कळ प्रकारें प्रतिबंधक असतो, हें ऐतिहासिक तत्व सुप्रसिद्ध आहे. सन १८२० पासून सन १८७० पर्यंत महाराष्ट्र देशाची स्थिती अशाच प्रकारची होती. ज्या पुणें शहरांत नानाफडणिसासारख्या मुत्सद्यांनीं कांहीं वर्षें वास्तव्य करून मराठी राज्याचा गाडा हांकला, व जेथें पेशवाईची अखेर होईपर्यंत मुत्सद्दी व शूर पुरुषांची परंपरा कायम होती तेथें एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत सर्व बाबतींत बहुतेक प्रेतकळा आली होती असें म्हटलें असतां त्यांत अतिशयोक्ती होणार नाहीं. ज्या सरदारघराण्यांतील पुरुषांनीं पेशवाईंत मोठीं मोठीं कामें केलीं होतीं त्यांच्या वंशजास इंग्रजसरकारानें पेन्शन घेऊन स्वस्थ

बसण्यास सांगितलें असल्यामुळें नवीन राज्यव्यवथेच्या बरेवाईटपणाबद्दल विचार करण्याचें त्यांचें कुलव्रत त्यांनीं सोडून दिलें होतें. देशाचे पुढारीच असे कर्तव्यपराङ्मुख झाल्यावर गरीब रयतेची स्थिती कशी झाली असेल हें सांगावयास नकोच. आमच्या सांप्रतच्या राज्यकर्त्यांची राज्य करण्याची शिस्थवार रीत, चोहोंकडे त्यानीं घालून दिलेलीं कायद्याची बंधनें, जमीनपाहाणी, आगगाड्या, तारायंत्रें, शाळा, पोस्टऑफिसें वगैरे राज्यव्यवस्थेच्या अपूर्व थाटानें लोक दिपावून गेल्यासारखे झाले होते. त्यांतून बंडवाल्यांचा पराभव झाल्यानंतर इंग्रजी राज्याची अधिकच छाप बसली गेली. जुन्या सरदार घराण्यांतील पुरुषांस राजकारणांत पडण्याची जरूर नसल्यामुळें त्यांच्या आंगचे गूण लुप्तप्राय झाले, व पुणेंपाठशाळेतून तयार झालेले नवीन विद्वान सरकारी नौकरींत आणि त्यामुळें प्राप्त झालेल्या मानांतच दंग होऊन राहिले. जी पुण्याची तीच सगळ्या महाराष्ट्राची स्थिती होती. माधवरावजी पुण्यास येण्यापूर्वी येथील विश्रामबाग कॉलेज किंवा पुनाकालेज यांमधून बुद्धिवान व विद्वान् मंडळी तयार होऊन बाहेर पडली नव्हती असें नाहीं, पण वर निर्दिष्ट केलेल्या अनेक कारणांमुळें राष्ट्रामधील चळवळ अगदीं बंद पडून गेली होती व कोणास आपण पुढें काय करावें हें सुचत नसून आपली हल्लींची स्थिति बरी किंवा वाईट हेंही कळत नव्हते. ज्या प्रांतांतील लोकांनीं एकदां मराठी राज्याचा गाडा हांकला होता त्यांतील पुढाऱ्यांच्या वंशजांची दोन पिढ्यांत अशी स्थिती होऊन जावी ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. पण माधवरावजींनीं पुण्यांत जेव्हां पाऊल ठेवलें तेव्हां या महाराष्ट्राच्या जुन्या राजधानीची स्थिती वरच्याप्रमाणें झाली होती यांत बिलकूल संदेह नाहीं. कोणत्याही प्रकारची चळवळ करण्याविषयीं पराङ्मुखता आणि केवळ स्वहितपरायणतेमुळें अथवा पूर्वीच्या अमदानींत ज्या गुणांची चहा होत होती तेच गुण नेटिवांच्या अंगीं असण्याची अवश्यकता न राहिल्यामुळें एक प्रकारचें लोकांच्या पुढाऱ्यांच्या आंगीं आलेलें शैथिल्य हेंच काय तें सर्व देशभर नजरेस येत होतें. लोकांच्या आंगचें तेज अगदींच नाहींसे झालेलें होतें असें नाहीं, पण वर लिहि-

लेल्या कारणामुळें महाराष्ट्र देश म्हणजे त्या वेळीं एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंड्या गोळ्यास कोणत्या तऱ्हेनें उब दिली असतां तो पुनः सजीव होईल, व हातपाय हालवूं लागेल याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं, अनेक उपायांनीं, अनेक रीतींनीं त्यास पुनः जिवंत करण्याचें दुर्धर काम आंगावर घेऊन त्याकरितां जिवापाड जर कोणीं मेहनत केली असेल तर ती प्रथमतः माधवरावजींनींच केली असें म्हटलें पाहिजे; व आमच्या मतें हेंच त्यांच्या थोरवीचें किंवा असामान्य मोठेपणाचें मुख्य चिन्ह होय; मुंबईच्या कालेजांत विद्याभ्यास करीत असतां इंग्रजी विद्येनें माधवरावजींच्या मनावर जे परिणाम झाले असतील अथवा त्यांच्या अंतःकरणांत जो प्रकाश पडला असेल त्याखेरीज त्यांच्या मनाची सार्वजनिक चळवळीकडे प्रवृत्ती होण्यास डा० भाऊदाजी, दादाभाई नौरोजी वगैरे थोर गृहस्थांचीं उदाहरणें बरींच कारणीभूत झालीं असावीं. एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, माधवराव मुंबई सोडून कायमचे पुण्याच्या प्रिन्सिपाल सदर अमिनच्या जागेवर आले, तेव्हां दादाभाई नौरोजीसारख्या पुढारी गृहस्थांच्या उदाहरणानें व कृतीनें त्यांच्या मनावर बराच परिणाम झालेला होता, माधवरावजी मुंबईसच राहते तर आपल्या असाधरण बुद्धिसामर्थ्यानें त्यांनीं तेथेंही उत्तम लौकिक संपादन केला असता यांत बिलकुल शंका नाहीं. तथापि महाराष्ट्राची राजधानी जें पुणें शहर तेथें येऊन त्यांस जी कामगिरी करावयास सांपडली त्यामुळें माधवरावजींच्या आंगचे अलौकिक गुण लोकांच्या पूर्णपणें नजरेस आले असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. सरकारी नोकरीचें काम चांगल्या रीतीनें संभाळून देशाच्या उत्कर्षाकरितां कोणकोणत्या दिशेनें काय काय प्रयत्न केले पाहिजेत हें ठरविणें व ते अमलांत आणण्याकरितां सतत परिश्रम करून जागरूकता ठेवणें हें काहीं सामान्य बुद्धिवान् पुरुषाचें काम नव्हे. कित्येकांस नित्यव्यवसायापुढें सार्वजनिक कामें सुचत नाहींत; सुचलीं तर करण्याची उमेद नसते; आणि यदाकदाचित् करण्यास प्रवृत्त झाले तर त्यास मनुष्यबळ किंवा इतर जी सामुग्री लागते ती ज्या उपायांनीं प्राप्त करून घ्यावयाची ते उपाय योजण्यास ते असमर्थ असतात. कित्येक

विद्वानांची तर या व्यापक प्रश्नानें बुद्धीच गुंग होऊन जाते, व कित्येक एकदेशीय असून कोणास अमुक एक दिशेनें राष्ट्राची उन्नती होईल असें वाटत असल्यास दुसऱ्यास दुसरीच दिशा पसंत पडते. माधवराव-जींच्या आंगचा पहिला गुण हा होय कीं, सर्व दिशेनें व सर्व बाजूंनीं राष्ट्राची उन्नति झाली पाहिजे असें त्यांस वाटत होतें व या सर्व दिशांचे व बाजूंचें सांगोपांग परीक्षण करून त्यांच्या योग्यायोग्यतेबद्दल निर्णय करण्याइतकी परमेश्वरानें त्यांस प्रगल्भ व व्यापक बुद्धी दिली होती. धर्मव्यवस्था, समाजसुधारणा, उद्योगधंदेशिक्षण, राजकीय व्यवस्था, वगैरे सर्व बाबतींत आम्ही मागें आहों व या सर्व गोष्टींत सुधारणा झाल्याखे-रीज इतर सुधारलेल्या राष्ट्रांची आपणांस बरोबरी करतां यावयाची नाहीं असा त्यांचा पक्का ग्रह झालेला होता. वर सांगिल्याप्रमाणें सर्व प्रकारें थंड झालेल्या देशाच्या प्रत्येक गात्रास कसें सजीव करतां येईल याचा रात्रंदिवस विचार करणारा तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत एकच पुरुष झाला. सन १८०० सालीं निवर्तलेल्या नाना फडणिसास मोडकळीस आलेकी पेशवाई कशी सुरक्षित ठेवावी याची ज्याप्रमाणें रात्रंदिवस काळजी वा-टत असे, तद्वतच एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं पंचवीस तीस वर्षें माधवरावजींनीं राज्यक्रांतीनें कांहीं वेळ स्तब्द झालेल्या महाराष्ट्रास कसें सजीव करतां येईल या काळजींत घालविलीं. आणि केवळ महाराष्ट्रा-करितांच नव्हे तर सर्व हिंदुस्थानाबद्दल अशाच तऱ्हेचे विचार त्यांच्या मनामध्यें सदैव घोळत असत, पाश्चिमात्य शिक्षणाबरोबर एक प्रकारची सार्वजनिक जबाबदारी आपणावर येऊन पडते ही गोष्ट माधवरावजींनीं पुरी ओळखली होती व आपल्या पंचवीस तीस वर्षांच्या वर्तनक्रमानें लोकांस ती जबाबदारी कशी बजावावी याचें उत्कृष्ट उदाहरण घालून दे-ऊन त्यांनीं महाराष्ट्राचाच नव्हे तर हिंदुस्थान देशाचा लौकिक राखिला असें म्हणणें भाग आहे.

हिंदुस्थानची किंवा महाराष्ट्र देशाची जागृति अमुक उपायानें होईल आणि अमुक उपायानें होणार नाहीं हें ठरविण्यास असामान्य व व्यापक बुद्धी लागते हें वर सांगितलेंच आहे. पण अशा प्रकारची अलौकिक

बुद्धी असूनही जर दुसरे गूण पुढाऱ्यांच्या आंगीं नसतील तर त्यांच्या हातून मोठीशी कामगिरी व्हावयाची नाहीं. राष्ट्राची उन्नती होण्यास ज्या हजारों गोष्टी कराव्या लागतात त्या एकट्याच्या हातून होत नाहींत. त्यास योग्य माणसांची निवड करून त्यांचें साह्य घ्यावें लागतें; किंबहुना अशा प्रकारचीं माणसें तयार करावीं लागतात असें म्हटलें तरी चालेल. माणसें तयार करण्याचे हें काम किती कठीण आहे हे अनुभवावांचून समजणें अशक्य आहे. मनुष्याची पारख, त्याच्या हातून चुक्या घडल्या असतां त्यास शांतपणें संभाळून घेऊन पुनः उत्तेजन देण्यास अवश्यक लागणारे उत्साह, शांती, वगैरे गूण पुढाऱ्याचे आंगीं जरूर असावे लागतात. माधवरावजींच्या आंगीं हे गूण पूर्णपणें वसत होते व म्हणूनच त्यांच्या हातून इतकीं कामें येथें सिद्धीस गेलीं. सार्वजनिक सभा, वक्तृत्व सभा, लवाद कोर्ट, प्रार्थनासमाज, फीमेल हायस्कूल, औद्योगिक चळवळ, वगैरे ज्या संस्था पुणें शहरांत झाल्या किंवा आहेत त्या सर्वांशीं माधवरावजींचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें संबंध होता असें आढळून येईल. या सर्व चळवळी सुरू ठेवण्याबद्दल लोकमत जागृत करून ठेवणें, निरनिराळ्या संस्थांकरितां निरनिराळीं मनुष्यें पाहून त्यांच्या हातून तीं कामें करून घेणें, देशांतल्या किंवा परदेशांतल्या सर्व प्रकारच्या हालचालींवर नजर ठेऊन त्यांचा स्वदेशाच्या उत्कर्षाशीं कसा संबंध पोंहोचतो याचें अहोरात्र मनन करणें, हें माधवरावजींचें व्यसनच होऊन राहिलें होतें. त्यांच्या घरीं केव्हांही जा, तेथें कांहीं नाहीं कांहीं तरी सार्वजनिक कामांतल्या विषयांची चर्चा चालू असावयाचीच. बारा आणि बारा चोविस तास अशा रीतीनें सार्वजनिक कामांत एकसारखें मन घालून तीं सुयंत्रिक रीतीनें चालविण्याइतकें बुद्धिसामर्थ्यच आधीं थोड्या लोकांत असतें. आणि ज्या थोडया लोकांच्या आंगीं अशा प्रकारचें सामर्थ्य असतें त्यांस आलस्यानें, स्वहितपरतेनें किंवा उत्साहभंगानें पछाडलेलें असल्यामुळें युनिव्हरसिटींतून दरसाल शेंकडों ग्र्याज्युएट बाहेर पडताहेत, तरी रात्रंदिवस देशहितार्थ तनमनधन अर्पणारा ' यततामपि सिद्धानां कश्चिन्मामपि वेत्ति तत्त्वतः ' या न्यायानें एखादाच माधवरावजींसारखा पुरूष निर्माण होतो. माधवरावजींनीं अंगीकृत केलेलें

काम किती कठीण होतें, याची कल्पना अलीकडे दाहा पंधरा वर्षे जो कोणी पुण्यामध्यें राहिलेला असेल त्यास होईल. आमची नवीन तरूण मंडळी कर्तव्यपराङ्मुख असूनही आणखी तिच्यामध्यें पोकळ स्वाभिमान व कांहीं न करितां दाखवावयाचा डौल, हे देशकार्यास विघातक असणारे गुण हवे तितके आहेत. अशी मंडळी एकदिलानें काम करील हे म्हणावयास नको. यामुळें माधवरावजींसारखा युक्तिवान्, सहनशील, आपला स्वतःचा मानापमान देशहितासाठीं बाजूस ठेवणारा, असा खरा साधुपुरूष अग्रेसर असतांही आमच्या मंडळींत निरंतर आपसांत तंटे होतच आहेत. अखेरीस ते तंटे खुद्द माधवरावांसारख्यांसही आवरले नाहींत. रजा घेऊन येथें येऊन राहिल्यावर प्रथमतः हे तंटे मोडावयाचे असा त्यांचा उद्देश होता; आणि त्यांनीं आपल्या युक्तीनें ते खास मोडले असते, यांत शंका नाहीं. असा पुरुष आपल्यामधून गेला असतां एकाएकीं सूर्यास्त झाल्याप्रमाणें सर्व लोक दिङ्मूढ झाले यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

माधवरावजींनीं जीं हीं सर्व कामें केलीं ती त्यांस सुखानें करतां आलीं अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. मुंबईपेक्षां पुणें किंवा महाराष्ट्र देश यांतील लोक अधिक एकरूप असल्यामुळें सार्वजनिक चळवळींचें माधवरावजींनीं मुंबईहून आणिलेलें बीं येथें लवकरच उदयास आलें. हें गेल्या पंचवीस तीस वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासावरून कोणासही सहज समजण्यासारखें आहे. हें बीं रुजत घालून त्यास पाणी घालणें व पुढें तज्जन्य वृक्षाचें पालनपोषण करणें हें सर्व काम माधवरावजीच करीत होते. त्यांस मदत करणारे लोक अनेक होते, पण या सर्व गृहस्थांची व त्यांनीं चालविलेल्या कामांची मदार काय ती माधवरावजींवरच असे. महाराष्ट्रांतील लोकांस सार्वजनिक बाबतींत चळवळ करण्याचें जर कोणी शिक्षण देत असेल तर ते माधवरावजीच होत, ही गोष्ट सरकारास कळूनही चुकली होती. माधवरावजींनीं स्थापिलेली सार्वजनिक सभा ही राजद्रोही आहे असा सर रिचर्ड टेंपलच्या कारकीर्दीत—बूट निघालाही होता. पण या सर्व अडचणींतून आणि संकटांतून धिमे-

पणानें माधवरावजींनीं हातांत धरलेलीं सर्व कार्यें तडीस नेलीं. यांच्यापेक्षां कमी उत्साहाचा पुरुष अशा प्रसंगीं डगमगून गेला असता, पण रावसाहेबांच्या बुद्धीचें व्यापकत्व जितकें अलौकिक होतें तितकाच शांती हा गूण त्यांचे अंगांत असामान्य असल्यामुळें त्यांच्या दीर्घोद्योगास अखेरीस यश येऊन मुंबई इलाख्याच्या मध्यभागास एक प्रकारची विशेष जागृती प्राप्त झाली. पुष्कळ लोक सार्वजानिक कामें करण्यास रुपेरी त्रिढी ही आडकाठी आहे असें मानितात. पण माधवराव यांनीं आपल्या वर्तनानें असें दाखवून दिलें कीं कळकळीनें उद्योग करणारास ही अडचण मुळींच नाहीं. अखेरीस सार्वजनिक सभेवर प्रत्यक्ष सरकारचाही पुष्कळ भरंसा बसला होता, व ही सभा जीं मतें प्रतिपादन करिते ती महाराष्ट्रांतील सुशिक्षित पुढारी लोकांची मतें आहेत असें सरकार समजूं लागलें होतें, हें सर्वप्रसिद्धच आहे. अशा रीतीनें निदान आमच्या महाराष्ट्रास एक प्रकारें राजकीय सजीवपणा प्राप्त झाला होता. माधवरावजींसारखे पुरुष जेथें निपजले नाहींत तेथल्या आणि महाराष्ट्राच्या स्थितीची तुलना केली असतां आमच्या म्हणण्याची सत्यता कळून येईल.

अशा तऱ्हेचा पुरूष देशांत निर्माण होणें हें देशाचें एक भाग्यच आहे. विद्वत्ता, मुत्सद्दीपणा, काम करण्याची हौस, सार्वजानिक हीत कोणत्या उपायांनीं करितां येईल याबद्दल एकसारखा निदिध्यास, आणि लोकांनीं नेहमीं आपल्या उन्नतीच्या चळवळींत व्यग्र असावें अशी अनिवार इच्छा, इतके गूण आंगीं वसत असलेले थोर पुरुष राष्ट्रांत वारंवार निपजत नसतात. महाराष्ट्र देशांत अठराव्या शतकांत नाना फडनीस हे अशा प्रकारचे मुत्सद्दी होऊन गेले खरे, पण विद्वत्तेचें मान लक्षांत आणितां त्यांची आणि माधवरावजींची तुलना करण्यापेक्षां महाराष्ट्राच्या किंवा दक्षिणेच्या प्राचीन इतिहासांत प्रसिद्धीस आलेले हेमाद्री किंवा माधवाचार्य यांची उपमा आमच्यामतें माधवरावजींस अधिक सजण्यासारखी आहे. माधवाचार्यांची बुद्धी चोहोंकडे अकुंठित असल्यामुळें त्यांस ‘ सर्वज्ञः स हि माधवः ’ असें म्हणत असत. माधवरावजींचें बुद्धिवैभव

ही अशाच प्रकारचें विस्तृत व व्यापक होतें; व या इंग्रजी राज्यांत जर हायकोर्टच्या जज्जाच्या कामापलीकडे त्यांच्या विशालबुद्धीचा उपयोग झाला नाहीं तर तो दोष माधवरावजींचा नव्हे, हल्लींच्या राज्यपद्धतीचा आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

माधवराजींचा महाराष्ट्राकडे आणि महाराष्ट्रीयांचा माधवरावजींकडे विशेष ओढा कां होता याचा यावरून विशेष खुलासा होईल. कायदे पंडित, लेखक वगैरे बाबतींत माधवरावजींची योग्यता इतर कोणत्याही राष्ट्रीय पुढाऱ्यापेक्षां कमी नव्हती. किंबहुना सर्व विषय अवगत करून घेण्याची हौस आणि कोणताही विषय हातीं घेतला असतां त्यासंबंधीं कांहीं तरी नवी शक्कल काढून त्यास मनोहर रूप देण्याची त्यांची हातोटी दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रीय पुढाऱ्यांत सांपडेल असें आम्हांस वाटत नाहीं. पण याहीपेक्षां त्यांच्या आंगचा लोकोत्तर गूण म्हटला म्हणजे आपल्या राष्ट्राचा अभ्युदय केव्हांना केव्हां तरी खास झाला पाहिजे, किंबहुना ही गोष्ट परमेश्वरानेंच संकल्पित आहे, अशीं जी त्यांच्या ठायीं उमेद होती ती होय. भावी सुपरिणामाबद्दल अशा तऱ्हेची निःसंशय मनोवृत्ती फारच थोडया पुढाऱ्यांचे ठायीं आढळेल. सरकारची ताबेदारी, योग्य माणसांची कमतरता, समाजामध्यें रूढ असलेल्या समजुती, इत्यादी अनेक कारणांनीं माधवरावजींस आपल्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी करतां आल्या नाहींत. तथापि दूरवर नजर देऊन धिमेपणानें अंगीकृत कार्यें त्यांनीं अव्याहत रीतीनें चालू ठेविलीं होतीं. प्राचीन व अर्वाचीन सुधारणेच्या झगडयांत मनुष्यास पदोपदीं कसें बुचकळल्यासारखें होतें याचे एके प्रसंगीं त्यांनीं मोठ्या मार्मिक रीतीनें वर्णन केलें आहे. या सर्व अडचणी सोसून बिनतक्रार देशोन्नतीच्या कार्याकरितां उत्साहानें भगवाझेंडा हातीं धरून सदैव पुढें राहणें हें कांहीं लहानसहान मुत्सद्दीपणाचें काम नव्हे. पण माधवरावजींची लोकसेवा एवढयावरच थांबली नाहीं. त्यांनीं आपल्या हयातींत, आपल्या जन्मभूमींतील लोकांस शहाणे करून सोडण्याचा क्रम अबाधित चालू ठेविला होता. राष्ट्रा-

मध्यें लिहिणारे व बोलणारे पुढारी पुष्कळ असले तरी अशा रीतीनें को-कांस समाजामध्यें जागृती उत्पन्न करण्याचें गुरुत्व ज्यांकडे देतां येईल असे लोक फारच विरळा होतात.

न्यायमूर्ती रानडे यांस अमुक एक जातीचा असा अभिमान मुळींच नव्हता. हिंदी या नांवास त्यांचेजवळ सगळ्यांत आद्य मान असे. ते म्हणत, हिंदुस्थानांत असलेल्या प्रत्येक व्यक्तीनें आतां आपण आधीं हिंदुस्थानवासी आणि मग ब्राम्हण किंवा पारशी, किंवा मुसलमान असें नेहमीं मनांत वागवावें. परवां त्यांचेविषयीं बोलतांना एक मुसलमान गृहस्थ म्हणाले, " रानडे हे हिंदूशीं हिंदू, पारशाशीं पारशी व मुसलमानाशीं मुसलमान असत. " अमुक एका विषयाविषयीं म्हणजे त्यांजवळ माहिती नव्हती असें कधीं आढळून आलेंच नाहीं. कोणाचाही विषय असो, त्यांत अगदीं पारंगत असणाऱ्या मनुष्याप्रमाणें त्यांस त्याची माहिती असे. कोणास कोणच्याही गोष्टीची माहिती पाहिजे असो, तो रानडे यांजकडे गेला असतां त्यास माहिती मिळावयाची, अगर माहिती मिळविण्यास लागणारीं सर्व साधनें मिळावयाचीं; इतकेंच नव्हे तर मनुष्य तीं साधनें व ती माहिती मिळण्याविषयीं खरा आतूर आहे असें आढळून आलें, तर तीं साधनें मिळविण्याच्या कामीं जी काय मदत देणें शक्य असेल, ती मदतही त्यास मिळावयाची. यामुळें त्यांचेकडे माहितीसाठीं अगर सल्ल्यासाठीं हिंदुस्थानांतील सर्व भागांतून लोक यावयाचेच. इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानाच्या संबंधानें माहिती लागल्यास परकीय देशांतील लोकही त्यांचेचकडे पत्रव्यवहार करीत. न्यायमूर्ती रानडे यांचे आंगीं आणखी एक मोठा गुण हा होता कीं ते जगन्मित्र होते. हिंदुस्थानांत अमक्या एका प्रांतीं किंवा शहरीं त्यांचा स्नेही नव्हता असें मुळींच नव्हतें. देशकार्यासाठीं कोणाची कशी मदत लागते याचा मुळींच नेम नसतो. समाजांत अमुक व्यक्ती अधिक उपयोगी व अमुक व्यक्ती कमी उपयोगी किंवा निरुपयोगी अशी बुद्धी त्यांचे ठायीं मुळींच नव्हती. यामुळें ज्या मनुष्याशी त्यांचा परिचय झाला तो कितीही कमी दर्जाचा असला, तरी हे त्यास कधींच तुच्छ न मानतां

त्यांच्याशी स्नेहभावानें वागत. दुसऱ्याच्या अंगीं अणुभर गुण असला तरी तो फार मोठा पर्वताएवढा आहे असें धरून त्याच्याशी वर्तन करावयाचें आणि त्याचेकडून जें काम होणें शक्य असेल तेवढें करण्याची तो पराकाष्टा करील इतका उत्साह त्याचें अंगीं आणून द्यावयाचा, हा त्यांचा अगदीं ठराविक क्रम असे. यामुळें त्यांनीं सांगितलेलें काम प्रत्येक माणूस अगदीं मनःपूर्वक करी व तें आपल्या हातून उत्तम घडावें म्हणून आपली पराकाष्ठा करी.

दुसरा त्यांचे अंगचा मोठा गुण निराशारहित्य. मार्गांत अडचणी आल्या असतां त्या दूर कशाच्या होतात, असे निराशेचे उद्गार काढून हात जोडून कपाळ टेंकून बसणें त्यांस माहित नव्हतें. आणि तसें करण्याचा कोणीं यत्किंचित् कल दाखविला तरी ते त्यास होईल तें करून आशेच्या मार्गावर आणून सोडीत. अडचणी या आपल्याला मदत म्हणूनच परमेश्वरानें आपल्या मार्गांत पाठवून दिलेल्या असतात असें ते म्हणत. या श्रद्धेला अनुसरूनच त्यांचा एकंदर वर्तनक्रम व व्ययसायक्रम असे. आज आपल्या प्रयत्नास इष्ट असें फळ मिळालें नाहीं तर उद्यां येईल, सुप्रयत्न आहे तर त्यांचे फळ मिळाल्याखेरीज कधीं सुद्धां रहाणार नाहीं, हा त्यांचा दृढ विश्वास; आणि त्या विश्वासाच्या जोरावर त्यांनीं आपला एकंदर कार्यव्यवहार चालविल्यामुळें इष्टफळसिद्धी म्हटल्यावेळीं न झाल्यानें त्यांस कधीं निराशेनें पछाडलें नाहीं.

दिवसाच्या आठही प्रहरांत स्वदेशहिताचा विचार करण्यांत सर्वथा निमग्न होणारा गृहस्थ हिंदुस्थानांत एकच झाला व तो म० रानडे होय. ह्यूमसाहेब त्यांस नेहमीं ‘ आमचे गुरु ’ असें म्हणत, तें अगदीं यथार्थ होय. ते खरोखर देशहितबुद्धी मनांत बाळगूनच अहोरात्र व्यवसाय करीत असत. माधवरावजींचें धोरण, चांगलीं माणसें विद्येनें व सहवासानें जितकीं अधिक तयार होतील तितकीं करण्याकडे विशेष आहे, असें त्यांच्या एकंदर कृतीवरून व बोलण्यावरून दिसून येई. कोणीही अंमळ चणचणीत व होतकरू असा मनुष्य त्यांनीं पाहिला कीं, त्याच्यासारखें काम त्याला

देण्यास त्यांचे जवळ असेच. कोणत्याही मनुष्याचा त्याच्या योग्यतेप्रमाणें उपयोग करून घ्यावयाचाच असें त्यांचें धोरण असे. आपल्या देशांत असावीं तशीं कामें नाहींत, तीं असतीं तर लोकांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें उद्योगधंदा लावून देण्यामध्यें माधवरावजींस पुष्कळच अवकाश सांपडला असता. गुणी मनुष्याचा उत्कर्ष व्हावा, त्याला उत्तेजन मिळावें आणि त्याचा आयुष्यक्रम सुखानंदांत व शांतिसमाधानांत जावा, अशी त्यांची फार इच्छा असे.

माधवराव हे अलौकिक विद्वान होते, हें सर्वप्रसिद्ध आहे. सरकारी काम व सार्वजनिक कामें, ह्या गोष्टी झाल्यावर, अगदीं जरूर अशा विश्रांतीमध्यें जो काळ जाई, त्याशिवाय त्यांचा बाकी राहिलेला काळ नेहमीं विद्याव्यासंगांत जात असे. आपण एवढी विद्वत्ता कशी संपादिली आपल्या वाचनाचे प्रिय विषय कोणचे आहेत, आपणास इंग्रजीचें एवढें ज्ञान कसें झालें, व आपला विद्याव्यासंग कसा चालतो, असें त्यांस एकदां कोणीं विचारलें असतां यांनीं असें उत्तर दिलें होतें:—

"शास्त्र, तत्वज्ञान इतिहास, काव्य वगैरे अनेक विषयांवरील ग्रंथ मीं वाचीत असतों. परंतु त्यांत विशेषेंकरून इतिहास व अर्थशास्त्र ह्या विषयांकडे माझा ओढा असल्यामुळें त्यासंबंधाचे ग्रंथ बहुतेक माझ्या पाहाण्यांत आले आहेत व तत्संबंधीं अजूनही जे जे नवीन ग्रंथ होतात ते सर्व मी वाचतों. शेक्सपियरचीं नाटकें व वाल्टरस्काटच्या कादंबऱ्या मीं वाचल्या आहेत. परंतु इतर ग्रंथकारांच्या कादंबऱ्या किंवा नाटकें ह्यांकडे माझें फारसें लक्ष नाहीं. कोणताही ग्रंथ वाचला म्हणजे त्याचा सारांश तो ग्रंथ बाजूस ठेवून मी लिहून काढतों व ह्याप्रमाणें मला सारांश लिहितां आला म्हणजे त्या ग्रंथाचें हृद्गत मला कळलें असें मी समजतों. अशा सारांश लिहून ठेविलेल्या शेंकडों वह्या मजजवळ आहेत व त्यांचा मला वारंवार उपयोग होतो. लेकीचा इतिहास सन १८६५ सालीं माझे वाचण्यांत आला होता, त्यावेळीं त्याचा मीं सारांश लिहून काढला होता. परवां एके प्रसंगीं मला त्या ग्रंथांतील माहितीची कांहीं जरूर पडली, तेव्हां तो ग्रंथ न पाहतां माझ्या सारांशाच्या मदतीनें मीं आपलें काम केलें. अद्यापिही एखादा ग्रंथ मला कठीण लागतो. परंतु तो समजून घेण्याकरितां मी पुन्हांपुन्हा त्यांचें वाचन करतों व मग मला तो ग्रंथ सहज समजतो. अमुकच वेळेस अमुक काम करावें असा हल्लीं माझा क्रम नाहीं.

नोकरीचें काम व सार्वजनिक काम संभाळून जी फुरसत मला मिळते ती मी वाचनांत किंवा लेखनांत घालवितों. त्याशिवाय मला दुसरा उद्योगच नाहीं. इंग्रजी भाषेसंबंधानें विशेष प्रकारचे श्रम मी केलेले नाहींत, परंतु मी कालेजांत होतों तेव्हांपासून कोणताही भाषण करण्याचा किंवा लिहिण्याचा प्रसंग मीं वाया जाऊं दिला नाहीं. वर्तमानपत्रांतून लिहिणें व सभांतून बोलणें ह्यांपासून इंग्रजी भाषा लिहिण्यास व बोलण्यास मला उपयोग झाला आहे. आगाऊ लिहून काढल्याशिवाय मी कोणतेंही भाषण करीत नाहीं व विचार केल्याशिवाय कांहीं लेख लिहीत नाहीं. असा क्रम ठेविला म्हणजे भाषा आपोआप येते. माझ्या ज्ञानाबद्दल लोकांस नवल वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण ज्ञान संपादन करण्यास मला जितकी अनुकूल स्थिती होती तितकी दुसऱ्यांस क्वचितच असेल. सर अलेक्झांडर ग्रयांट' हे माझे गुरू होते व विद्यार्जनांत त्यांची मला फारच मदत झाली. तसे गुरू अलीकडील तुम्हां विद्यार्थ्यांस मिळत नाहींत यामुळें तुमची व्हावी तशी तयारी होत नाहीं. विद्यार्थी, फेलो व प्रोफेसर, म्हणून एकंदर दहा बारा वर्षें मला कालेजांत घालविण्यास सांपडलीं व त्या काळांत मला कालेजांतील लायब्ररीचा बराच उपयोग करून घेतां आला. माझ्या वेळचे विद्यार्थी, कालेजांत मिळणाऱ्या सुट्या फुकट घालवीत नसत. सुट्टींत कांहीं तरी विषय नेमून घेऊन त्यावर आम्ही परिश्रम करीत असूं."

माधवराव यांनीं कांहीं दिवस कालेजमध्यें विद्यार्थ्यांस शिकविण्याचे काम केलें, हें अप्रतिम केलें अशी त्यांची ख्याती आहे. जें कांहीं शिकवावयाचें, तें त्याचे संबंधाची माहिती मिळणें शक्य असेल तेवढी मिळवून शिकवावयाचें असा त्यांचा बाणा होता. त्यांनीं विद्यार्थ्यांस दिलेलें व्याख्यान ऐकावयास स्वतः युरोपियन प्रोफेसर येऊन बसत, असें सुप्रसिद्ध आहे. पुढें ते व्याख्यानरूपानें जेव्हां लोकशिक्षणाचें काम करीत, तेव्हां त्यांचें व्याख्यान कोठेंही असो, व कोणत्याही विषयावर असो, तें ऐकण्यास लोक मोठ्या उत्सुकतेनें जमत असत.

( २ ) कपडे आणि खेळ:—आपले कपडे, पुस्तकें, पाट्या वगैरे सामान ह्याविषयीं मुलांचें वर्तन वाईट असेल तेव्हांही ह्या सद्गुणाविषयीं प्रत्यक्ष पाठ देण्याची संधि उत्तम असते. कपड्यास आणि पुस्तकादिकांस जपलें पाहिजे; नाहीं तर आईबापाशीं अप्रामाणिकपणानें वागण्याचा दोष येतो, व त्यांचा विश्वासघात होतो, हें मुलांच्या मनांत अशा प्रसंगीं चांगलें बिंबवितां येईल. कधीं कधीं मुलें आपल्या टोप्या चेंडूसारख्या वर फेकितात अगर लाथेनें उडवितात, आणि अशामुळें टोप्याची खराबी होते; गोट्या खेळतांना गुडघे टेकून बसल्यानें धोतराची किंवा विजारीची खराबी होतें; कधीं कधीं तर मुलें सपशेल धुळींत लोळतात, आणि त्यामुळें सर्वच कपडे खराब होतात; अशा प्रकारचे सर्व खेळ बंद करावे. तसेंच ज्या खेळाच्या योगानें मुलें लोभाविष्ट होण्याचा संभव असेल, तेही खेळ बंद करावे.

( ३. ) चोरून दुसऱ्याच्या उत्तराचे उतारे करणें:—ज्या शाळेंत नीतिमत्तेचें मान अगदींच खालवलेलें असतें, त्या शाळेंतील मुलांस आपल्या शेजारच्या मुलाच्या पाटीकडे किंवा कागदाकडे चोरट्या दृष्टीनें पाहून त्यांच्या उत्तराचा किंवा कृतीचा उतारा करण्याची चटक असते. असें करण्यांत कोणतें पातक घडतें, हें मुलांस उघड करून सांगावें. चोरी करूं नये, अशी शास्त्राची आज्ञा आहे; आणि त्या आज्ञेचें उल्लंघन हें मोठें पातक आहे, ही गोष्ट त्यांच्या मनांत ठसवावी. दुसऱ्याची मौल्यवान् वस्तु अथवा त्याचा पैसा याचा अपहार केला तरच चोरी होते असें नाहीं; तर आपली ज्या वस्तूवर सत्ता नाहीं अशा कोणत्याहि वस्तूचा अपहार करणें ही देखील चोरीच होय. मोठ्या मोलाची वस्तु चोरिली असो, वा हलक्या किंमतीची चोरली असो दोन्ही प्रकारांचा निषेध शास्त्रानें केला आहे. जी गोष्ट आपणास येत नाहीं, ती येते आहे असें भासविणें हें अप्रामाणिकपणाचें वर्तन होय. अशा अप्रामाणिकपणाच्या वर्तनास लोक नांवें ठेवितात आणि त्याचा तिटकारा करितात, असें शिक्षकानें मुलांस समजून सांगावें. तसेंच त्यांची हळू हळू अशी समजूत करावी कीं, आपणास कोणताहि विषय

समजतो, असें भासविण्यापेक्षां त्या विषयाचें यथार्थ ज्ञान आपणामध्यें खरोखर वसणें हेंच खऱ्या संतोषाचें कारण आहे.

( ४ ) **शिक्षकाचें उदाहरण**— शिक्षकानें खुद्द आपलें वर्तन फार प्रामाणिकपणाचें ठेवावें; आणि तेणेंकरून आपण प्रामाणिकपणास फार चाहतों, असें स्पष्ट करावें. हें त्यांस खालीं लिहिल्याप्रमाणें आचरण ठेविल्यानें साधेल.

( क ) आपलें कर्तव्य दक्षतेनें करावें, ( ख ) शाळागृह आणि त्यांतील सामानसुमान ह्यांस मोठ्या काळजीनें जपावें; त्याचप्रमाणें मुलांच्या सामानासही जपावें. ( ग ) दुसऱ्याची वस्तु आपणास सांपडली तर ती आपणाकडे न ठेवितां चौकशी करून ज्याची त्यास पावेल, असें करावें. ( घ ) प्रामाणिकपणाचें वर्तन कोठेंही आढळून येवो, आणि कोणाचेंहि असो, अशा वर्तनाची वाखाणणी करावी. ( ङ ) सदाचाराविरुद्ध वर्तन करण्याविषयीं कोणत्याहि प्रकारें मुलांस मोह उत्पन्न करण्याचें टाळावें.

२९. येथवर सदाचाराला आधारभूत जे दोन सद्गुण सत्यशीलता आणि प्रामाणिकपणा, ह्या विषयीं विवेचन झालें. आतां त्यांशिवाय दुसरे कोणते गुण मुलांमध्यें आपण उत्पन्न केले पाहिजेत, तें पाहूं. ह्या गुणां पैकीं कांहींचा उल्लेख पूर्वी प्रसंगवशात् झाला असेल; तथापि त्याजबद्दल विशेष विचार करणें इष्ट आहे.

२६. ईश्वराविषयीं खरें ज्ञान करून देणें हें नीतिशिक्षण देणाऱ्याचें पहिलें काम आहे. ईश्वरज्ञान आणि नीति यांची सांगड मुळापासूनच आहे. ईश्वरज्ञानाच्या पोटींच नीतीचा उगम आहे, असें म्हटलें असतां अधिक शोभेल. कोणताहि धर्म घ्या, त्यांत ईश्वरज्ञान म्हणजे ईश्वराच्या स्वरूपाचें निरूपण आणि सदाचार असे दोन मुख्य भाग आहेतच. कोणताहि धर्मग्रंथ वाचा, त्यांतील गोष्टी साक्षात् किंवा परंपरेनें या दोन भागांत आल्याच पाहिजेत. तेव्हां सर्व नीतिमत्तेचा प्रभव ज्यापासून होतो, तें ईश्वरज्ञान गुरूनें मुलांस करून देणें अत्यंत आवश्यक आहे. ईश्वराचें अस्तित्व, त्याची अनंतशक्ति, अगाध चातुर्य, अखंड प्रेम इत्यादि

गोष्टी मुलांच्या मनांत स्वतंत्र रीतीनें किंवा ओघानेंच प्रसंग आला असतां बिंबवून ईश्वराविषयीं प्रेम आणि पूज्यबुद्धि उत्पन्न करावी. ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं मुलांची खातरी करण्यास फार प्रयास नकोत. प्रत्येक कार्याला कांहीं तरी कारण असलें पाहिजे. हा भाव लहान मोठ्या सर्व मनुष्यांच्या मनांत स्वभावतःच असतो. मुलांच्या मनांत तो सूक्ष्मरूपानें वास करितो, त्यास प्रगल्भ दशेस आणावें. एखादा खाण्याचा पदार्थ, खेळण्याचें सामान, घर इत्यादि पदार्थ दाखवून हे कोणीं केले, कोणत्या कारागिरानें हे निर्मिले, असे प्रश्न करून तो कार्यकारणभाव जागृत करावा. ह्या साध्या कल्पना पुढें वाढवीत वाढवीत मुलांचा पल्ला प्राणी व त्यांचा उत्पन्नकर्ता ईश्वर एथपर्यंत नेऊन पोहोंचवावा. भागीरथी, ड्यान्यूब, नैल, आमाझोन अशा असंख्य नद्या समुद्रांत. निरंतर वाहत असून समुद्राचें पाणी यत्किंचित्‌हि वाढत नाहीं. हें कसें ? अत्यंत सूक्ष्म प्रवालकीटक समुद्रांत मोठमोठीं प्रवालाचीं बेटें तयार करितात, एवढी अचाट शक्ति ह्या क्षुद्र प्राण्यांस कोणीं दिली ? हिमालय, आल्प्स्, आंडीज वगैरे मोठमोठे पर्वत व त्याचप्रमाणें मुंग्या, व त्याहूनहि अत्यंत सूक्ष्म कीटक हे कोणीं उत्पन्न केले? हे व असे दुसरे प्रश्न करून ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं जी स्वाभाविक बुद्धि ती दृढ करावी. ईश्वराचें अगाध चातुर्य आणि अप्रतिम वत्सलता हीं, मनुष्य, पशुपक्षी इत्यादिकांसाठीं उपजीविकेच्या साधनाची जी व्यवस्था त्यानें केली आहे तींत कशीं दिसून येतात, तें फोड करून सांगावें. ईश्वराचें अगाध ज्ञान, अप्रतिम चातुर्य, आणि अद्वितीय प्रेम हीं त्यानें निर्माण केलेल्या प्रत्येक वस्तूंत कशीं दाखविलीं आहेत, हें शोधण्याचें वळण मुलांस लहानपणापासून लावावें. कधीं एखादी क्षुल्लक वस्तु घेऊन तिजपासून केवढा विचित्र परिणाम होतो, त्यावरून त्याची अनंत शक्ति आणि प्राणिमात्रावरील अप्रतिम प्रेम हीं त्यांचे मनांत बिंबवावीं. गव्हाच्या एका दाण्यापासून सात आठ हजार दाणे कसे उत्पन्न होतात, तसेंच एका लहानशा आंब्याच्या बाठ्यापासून शेंकडों मधुर आम्रफळें आपणास कशीं प्राप्त होतात, हें सांगून आपणाकरितां ईश्वरानें उप-

जीविकेचीं व तशींच उपभोगाचीं हीं साधनें किती विपुल करून ठेविलीं आहेत, हें मुलांस स्पष्ट करून सांगावें. पुढें मूल उपजणार तों आधींच स्तनाचीं तयारी केलेली असते ह्यावरून त्याच्या वत्सलतेचें स्वरूप त्यांच्या ध्यानामध्यें आणून द्यावें.

२७ आत्म्याविषयीं मुलांस ज्ञान करून देणें आणि आपण केलेल्या कृत्यांची जबाबदारी आपणावरच राहते ह्या दोन्ही गोष्टी सांगणें इष्ट आहे. आत्मा अमर आहे, ह्या गोष्टीची कल्पना मुलांस करून देणें हें सकृद्दर्शनीं फार कठीण आहे असें वाटतें खरें; परंतु वस्तुतः तें तितकें कठीण नाहीं. मुलांस प्रथमतः धोंडा आणि फुलझाड ह्यांच्या गुणाची तुलना करण्यास सांगावें. नंतर धोंडा, फुलझाड आणि घड्याळ ह्यांची तुलना त्यांजकडून करवावी. नंतर जनावरें आणि त्यानंतर मानवी प्राणी ह्यांचीहि त्यांच्याशीं तुलना करावी: तुलना करून घेतांना मुलांच्या नजरेस असें आणून द्यावें कीं, क्रमाक्रमानें पुढच्या वस्तूंत मागच्या वस्तूंचे कांहीं गुण असून आणखी कांहीं नवीन गुणहि आहेत; शेवटीं ती परंपरा मानवी प्राण्याजवळ येऊन ठेपल्यावर असें दृष्टोत्पत्तीस आणून द्यावें कीं, मानवी प्राण्यांत जीव, चलनवलनादि व्यापार आणि मानसिकशक्ति ह्या तिन्ही गोष्टींची जशी सांगड पडली आहे, तशी सांगड धोंड्यांत, फुल झाडांत, घड्याळांत किंवा पशुपक्ष्यादि इतर प्राण्यांत पडलेली दिसत नाहीं; तर मग आपणामध्यें असें कांहीं तत्व आहे कीं, तें आपणांत आहे ह्याबद्दल आपण निःसंशय आहों; आणि त्या त्या शक्तिहि नेहमीं आपण अनुभवितों, परंतु तें तत्व काय आहे, तें आपणास सांगतां येत नाहीं. असें जें विलक्षण तत्व मनुष्यमात्रांत विद्यमान असतें तोच आत्मा. तो शाश्वत म्हणजे चिरकाळ टिकणारा आहे, आणि पुण्यपाप, सदाचरण, दुराचरण, ह्यांचीं फळें जशीं इहलोकीं तशीं परलोकींहि त्यास भोगावीं लागतात. शरीराचा आणि आत्म्याचा संबंध तुटला म्हणजे त्यास आपण मृत्यु असें म्हणतों; पण शरीराचा जसा नाश होतो, तसा आत्म्याचा नाश होत नाहीं. जुनीं वस्त्रें टाकून आपण जशीं नवीं वस्त्रें घेतों, तद्वतच ही अवस्था सोडून आत्मा दुसऱ्या अवस्थेंत जातो.

२८. त्याचप्रमाणें परमेश्वरानें मनुष्यांत सदसद्विवेचनाची म्हणजे सदाचार कोणता आणि दुराचार कोणता हें ओळखून काढण्याची शक्तिहि ठेविली आहे; तिची माहिती करून द्यावी. ही सदसद्विवेचनशक्ति म्हणजे एक आन्तरदीपच होय. ह्या अंतरीचा दिवा प्रज्वलित ठेवून त्याच्या प्रकाशानें आपण जें जें करतों, तें तें पाहण्याचें वळण मुलांस लावावें, म्हणजे बरें कोणतें आणि वाईट कोणतें तें त्यांस समजूं लागेल. मुलांच्या मनांत दुसरी गोष्ट बिंबविण्याची ती ही कीं, परमेश्वर आपणास निरंतर पाहत आहे; त्याची दृष्टी आपणास कधीं चुकवितां येत नाहीं; आणि त्याच्या शक्तीस अडथळाहि करितां येत नाहीं. मनुष्यास आपली माहिती बाहेरून मात्र होईल, पण परमेश्वर आपलें अंतरंग जाणतो. त्याची इच्छा कोणती, बरें कोणतें वाईट कोणतें वगैरे समजविण्याकरितांच त्यानें हा आंतरदीप (ही मनोदेवता) आपणास दिला आहे. अशाप्रकारें सदसद्विवेचनशक्तीविषयीं माहिती करून दिली म्हणजे सद्वर्तनाकडे मुलांचें मन वळेल. परमेश्वराचे, आत्म्याचें आणि ह्या सदसद्विवेचनशक्तीचें ज्ञान मुलांस करून द्यावयाचें तें त्यांच्या वयाच्या आणि समजुतीच्या मानानें दिलें पाहिजे. ह्या गोष्टीचा विसर पडतां कामा नये. पांच किंवा सात महिन्याच्या मुलांस दुधावरच पोशिलें पाहिजे, त्यांस जडान्न घालणें उपयोगीं नाहीं; त्याचप्रमाणें ह्या गोष्टी हळू हळू मुलांस त्याच्या आकलनशक्तीप्रमाणें प्रसंगानुसार सांगितल्या पाहिजेत, हें ध्यानांत ठेवावें.

२९. कोणतेहि एकादें कृत्य आपणाकडून पुनः पुनः होत गेलें म्हणजे त्याच पौनःपुन्याच्या योगानें तें करण्याचा आपणास अभ्यास होतो. हा अभ्यास दृढ होत गेला असतां त्यांस आपण संवय म्हणतों. म्हणून सत्कृत्याची संवय लागण्याकरितां तें वारंवार करविलें पाहिजे. दुष्कृत्याचा प्रादुर्भावच होऊं द्यावयाचा नाहीं म्हणून ते प्रथमपासूनच मना केलें पाहिजे. सत्कृत्य हें सुखाचें साधन आहे, दुष्कृत्यापासून दुःख निष्पन्न होतें, असें वारंवार दाखवून सत्कृत्याचें व समाधानाचें जें साहचर्य तें दृढ करावें; आणि दुष्कृत्य व दुःख ह्यांची सांगड नेहमीं कशी असते तें स्पष्ट

करावें, चांगल्या संवयी लावण्यांत प्रथम आपल्या अधिकाराचा उपयोग करावा, आणि उदाहरणाचाहि उपयोग करावा. पण हळू हळू सदाचरणाचा अभ्यास इतका दृढ करावा कीं, पुढें पुढें तें अमलांत आणण्यास आपल्या अधिकाराची किंवा उदाहरणाची जरूरी पडूं नये. चांगलें वर्तन हें रोजच्या परिपाठांतलें होऊन तसें वर्तन ठेवण्यास कांहीं यत्नच पडूं नये, सहजगत्या तें घडून यावें; व स्वभावच तसा बनून जावा, हें धोरण नीतिशिक्षण देतांना शिक्षकानें ठेवावें.

३० असो, आणखी कोणत्या चांगल्या संवयी शिक्षकानें मुलांस लाविल्या पाहिजेत त्याविषयीं सांगूं.

३१ **स्वच्छपणा**—मुलांचें शरीर, कपडे, जोडे, पुस्तकें वगैरे सामान हें नेहमीं निर्मळ राहील, असें करावें. देहाची स्वच्छता ठेविल्यानें प्रकृति दुरुस्त राहून समाधान कसें वाटतें, तें उघडून सांगावें. घाणेरडया मुलांची कधींहि क्षमा करूं नये. निर्मळ मुलावर शिक्षकाची कृपा अधिक आहे असें नजरेस आलें म्हणजे दुसरीं मुलें स्वच्छ राहण्याविषयीं यत्न करितील. रामदासाच्या ' दंत, चक्षु, आणि घ्राण । पाणि, वसन आणि चरण । सर्व काळ जयाचे मलिन । तो एक मूर्ख । ' या ओंवीचा अर्थ मुलांच्या मनांत ठसवावा. तोंड, हात, पाय, दांत नाक धुऊन साफ केलेले नसल्यास मुलास परत पाठवून ते घासून स्वच्छ करून येण्यास सांगावें. आणि परत आल्यावर उशीर झालेल्या मुलांत त्याची गणना करावी. शरीर स्वच्छ, कपडे धुतलेले, जोडे साफसूफ केलेले, केस विंचरलेले, अशा मुलास शाबासकी दिल्याशिवाय कधींहि राहूं नये.

३२. **आत्मसंयमनः**—हा गुण मुख्यतः हावरेपणा व आधाशीपणा ह्याच्या संबंधानें मुलांच्या मनांत बिंबवावा. खाण्यापिण्याचा अतिरेक झाल्यानें व इतर अयोग्य अशा वासनांची तृप्ति करीत गेल्यानें किती हानि होते, हें उदाहरणें देऊन स्पष्ट करावें. तसेंच आहारविहार योग्य आणि नियमित ठेविल्यानें समाधान कसें होतें, त्यांचींहि उदाहरणें द्यावीं. फ्रेंच लोकांत एक म्हण आहे कीं, थोडक्यावर निर्वाह करणें हें सर्व स्वातंत्र्याचें

बीज होय. पण जो खाण्यापिण्याच्या आवडीचाच बंदा नोकर होऊन राहिला त्यास तें कल्याणरूपी स्वातंत्र्य कसें मिळेल ? कधीं मिळणार नाहीं. ही गोष्ट मुलांस समजावून द्यावी. हावरेपणानें आणि आधाशीपणानें श्रीमंत कुटुंबांचीही कशी दुर्दशा होते, ह्याचीं उदाहरणें दिलीं असतां मुलांस देखील समजतील. आपलें स्वतःचें सुख एकीकडे ठेवून दुसऱ्याच्या दुःखाचें निवारण प्रथम करून ज्यांनीं दृढ आत्मसंयमन व मनाचा व्यक्तपणा थोर केला, अशांचीं उदाहरणें द्यावीं; आणि हावरे-पणा व आधाशीपणा ह्यांपासून मुलांस निवृत्त करावें.

३४. **सभ्यपणा आणि विनयः**—दुसऱ्याशीं सभ्यपणानें वागलें असतां तेहि आपणाशीं तसेंच वागतात, आणि ह्यामुळें उभयतांसहि सामाधान होतें; म्हणून ह्या गुणाचें संपादन करण्याविषयीं मुलांस उत्ते-जन द्यावें. हा सभ्यपपणा वास्तविक आंगीं बाणलेला असावा, त्यांत ढोंग उपयोगी नाहीं. खेरीज शिष्टसंप्रदायास अनुसरून मुलांची वागणूक शाळेंत रहावयाची, ती नुसते नियम घालून दिल्यानेंच राहणार नाहीं. अशी वागणूक निष्पन्न होण्यास तिची संवयच मुलांस झाली पाहिजे. याकरितां शिक्षकानें वारंवार ह्या गोष्टीकडे मुलाचें लक्ष्य लावावें. व्यवस्थितपणा, आणि नीटनेटकेपणा जेणेंकरून मुलांच्या आंगीं येईल, अशा रीतीनें मुलांस उभे करणें अगर बसविणें, कोणी योग्य रीतीनें बसण्याचें व उभे राहण्याचें वर्ज करील तर त्यास तघडतोब दटावणें, खुद्द आपणाशीं मुलें फाजील सलगी करूं लागलीं, तर त्यांस तसें करूं न देणें, स्वतः आप-णाशीं किंवा आपआपसामध्यें त्यांचें यत्किंचित्हि दांडगाईचें वर्तन झा-ल्यास त्याबद्दल आपली तत्काळ इतराजी दाखविणें, अशा साधनांनीं मुलांस शिष्टसंप्रदायानें वागण्यास लावावें. तसेंच, चांगल्या रीतीनें बसणें किंवा उभे राहणें ह्यापासून प्रकृति दुरुस्त राहते, तीस अपाय होत नाहीं; रेळल्या लोळत्या बैठकीनें प्रकृतीस अपाय होतो, हेंहि समजून द्यावें. दुसरें लोक आपणास नीट सांगत असतां त्याकडे दुर्लक्ष्य करणें हें असभ्य-पणाचें व कृतघ्नपणाचें काम होय. गलबला किंवा धांगडधिंगा करणें हें

अत्यंत अयोग्य वर्तन असून तें कोणत्याहि शिष्ट लोकांस बिलकुल खपत नाहीं. मोठेपणीं लोक जसें सभ्यपणानें वागतात — आणि तुम्हींहि पुढें तसें वागूं लागाल—— तसें आतांहि आपल्या सोबत्याशीं आणि शिक्षकांशीं वागत जावें, अशा प्रकारचा प्रत्यक्ष उपदेशहि केला पाहिजे. याप्रमाणें योग्य रीतीनें योग्य प्रसंगीं वाहवा केली असतां देखील मुलांच्या वागणुकींत चांगला फरक पडून त्यांना चांगल्या संवयी लागतात, हेंहि ध्यानांत ठेवावें. सभ्यपणाची वागणूक दृष्टीस पडली असतां तेथें शाबासकी अवश्य द्यावी, व आपल्यास तें वर्तन पसंत पडलें असें जरूर दर्शवावें. अशा गोष्टींची संवय लावण्याच्या कामांत मुलांच्या वर्तनांतील दोष काढून त्याबद्दल दूषण ठेवण्यापेक्षां चांगल्या वागणुकीबद्दल वाहवा करण्यास ( शाबासकी देण्यास ) कोठें सांपडेल इकडे शिक्षकानें विशेष लक्ष्य ठेवावें.

याच संबंधानें आणखी कांहीं गोष्टींचा खुलासा करणें इष्ट आहे. आपल्या शाळांतून ह्या गोष्टींच्या संबंधें बहुत सुधारणा करितां येईल. मात्र शिक्षकाची या कामीं उत्सुकता पाहिजे.

( १ ) शाळेंत येतांना आणि शाळेंतून परत जातांना मुलांनीं मुकाट्यानें व मर्यादेनें येणें व जाणें हें अगदीं अवश्यक आहे. पण ह्या गोष्टीकडे आपल्या शाळांत लक्ष्य दिलेलें क्वचितच आढळेल. ह्या प्रकारें मुलांचा प्रवेश आणि निर्गम होणें अगदीं जरूर आहे. आणि त्या प्रमाणें अंमल करण्यास शिक्षकानें कसूर करूं नये. आरडाओरड, अमर्याद बोलणें चालणें वगैरे प्रकारची वागणूक आपल्या घरांत कोणी सहन करणार नाहीं. त्याप्रमाणें शाळागृहांतहि शिक्षकानें सहन करूं नये. अशी वहिवाट ठेविल्यानें शाळागृहांत मर्यादेनें वागण्याची संवय मुलांस लागेल. घरांत शिरतांना जसे प्रथम आपले जोडे आपण काढून ठेवितों, आणि तेथें जे कोणी असतील त्यांस प्रणाम ( नमस्कार, रामराम, सलाम वगैरे ) करतों, त्याप्रमाणें शाळेंत शिरतांना बाहेर नेमल्या ठिकाणीं जोडे काढून शिक्षकांस व मुलांस प्रणाम करावा; आणि हें झाल्यावर आपल्या जागेवर मुकाट्यानें बसून आपलें सामानसुमान जागच्याजागीं

# पुणें ट्रेनिंग कॉलेज.

सन १९००-०१ सालच्या वार्षिक परीक्षेंत पसार झालेल्या विद्यार्थ्यांचीं व शिक्षकांचीं नांवें:—

## वर्ष तिसरें.

| अ. नं. | नांव. | गुण. | जिल्हा. |
|---|---|---|---|
| १ | पुरुषोत्तम ना० वर्तक | ६७.७ | रत्नागिरी. |
| २ | दामोदर ग० भालेराव | ६६.२ | नाशिक. |
| ३ | विष्णू आ० प्रभू | ६३.७ | मुंबई. |
| ४ | गजानन बा. क्षीरसागर | ६३.५ | पुणें. |
| ५ | पांडुरंग वा. भागवत | ६२.५ | नगर. |
| ६ | गंगाधर के. रिसबूड | ६०.५ | कुलाबा. |
| ७ | पांडुरंग के. कुळकर्णी | ६०.३ | सातारा. |
| ८ | मुजाहदखान वा सांडेखान | ५८.८ | खानदेश. |
| ९ | विठ्ठल खं. क्षीरसागर | ५८ ३ | नाशिक. |
| १० | सखाराम द० वंजारी | ५८.१ | खानदेश. |
| ११ | कृष्णाजी वि० फाटक | ५७.३ | सोलापूर. |
| १२ | सिताराम ना० मर्डेकर | ५५.३ | खानदेश (शिक्षक). |
| १३ | गोविंद वि० कर्वे | ५५.१ | ठाणें. |
| १४ | नारायण गो० मुजुमदार | ५४ ६ | खानदेश. |
| १५ | मुरलीधर पां० शिंपी | ५२.२ | पुणें. |
| १६ | त्र्यंबक कृ. कुळकर्णी | ४८.५ | सातारा. |
| १७ | हरी वा० पेंडसे | ४७.२ | विजापूर. |
| १८ | कृष्णाजी ज० वर्तक | ४६ ५ | जंजिरा. |
| १९ | वामन भि० गोन्दे | ४५.४ | पुणें. |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | बापूजी के. करंदीकर | ४४.१ | ठाणें. |
| २१ | श्रीधर वि० दर्शने | ४१.९ | सातारा (शिक्षक) |
| २२ | जयराम ना. पाटील | ४०.१ | नाशिक. |

## वर्ष २ रें.

### ( तिसऱ्या वर्षाकरितां ठेविलेले. )

| अ. नं. | नांव | गुण | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | निकाजी मो. मांदुसकर. | ६९.९ | ठाणें. |
| २ | *नीळकंठ वा. आंबेकर. | ६७.९ | सातारा. |
| ३ | विनायक म. महाजन. | ६७.१ | पुणें. |
| ४ | नारायण सि. देव. | ६७.० | पुणें. ( ड्रा० माफ ) |
| ५ | वासुदेव भा. साने. | ६६.७ | कुलाबा. |
| ६ | *गजानन एन. बोकील. | ६५.४ | नगर. |
| ७ | दिनकर न. कुबेर. | ६४.७ | सोलापूर. |
| ८ | गणेश वि. पटवर्धन. | ६२.७ | कुलाबा. |
| ९ | *नरहर बा. कुळकर्णी. | ६२.५ | बेळगांव. |
| १० | शहाबुद्दीन व. इमामभाई | ६१.९ | मुंबई. ( ड्रा० माफ ) |
| ११ | बाळकृष्ण ना. जोशी. | ५९.९ | मुंबई. |

## पास झालेले.

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | हरी शा. सुकठणकर. | ५९.४ | मुंबई. ( शिक्षक ) |
| १३ | नारायण रा. कुळकर्णी. | ५८.८ | नगर ( ड्रा० माफ ) |
| १४ | *यज्ञेश्वर सि. खटावकर. | ५७.८ | सातारा. |
| १५ | यशवंत मो. पराडकर. | ५७.४ | सोलापूर. |
| १६ | विनायक शा. राह्राणे. | ५६.८ | नगर. |
| १७ | हरी दा. नित्सुरे. | ५६.६ | रत्नागिरी. |
| १८ | गणेश सि. उमराणी. | ५६.० | सातारा. |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | मारुती त्रि. पिटके. | ५५.६ | सोलापूर. |
| २० | भार्गव गो. चितळे. | ५४.७ | रत्नागिरी. |
| २१ | *भास्कर दे. चुरी | ५४.७ | ठाणें. |
| २२ | *गोपाळ ग. गोविलकर. | ५४.४ | कुलाबा. |
| २३ | केशव कृ. गांडके. | ५३.५ | पुणें. ( डू० माफ. ) |
| २४ | गोपाळ सी. मर्ढेकर. | ५३.३ | मुंबई. ( डू० माफ. ) |
| २५ | *गणेश रा. कुळकर्णी. | ५३.२ | बेळगांव. |
| २६ | *केशव त्र्या. शिंदे. | ५३.२ | ठाणें. |
| २७ | भिमाजी श्री. प्रभू. | ५२.९ | बेळगांव. ( डू० माफ ) |
| २८ | गणेश बा. राखे. | ५२.५ | पुणें. |
| २९ | *सीताराम ह. शिरवळकर. | ५२.४ | ठाणें. |
| ३० | गोविंद रं. हिंगणें. | ५२.२ | नगर. ( शिक्षक ) |
| ३१ | *किसनसिंग पं. रजपूत. | ५१.९ | सोलापूर. (डू० माफ) |
| ३२ | *आत्माराम रा. पुसाळकर. | ५१.५ | सातारा. |
| ३३ | *दामोदर गणेश गोरे. | ५१.३ | नगर. |
| ३४ | *महादेव ह. गरुड. | ५०.९ | नगर. |
| ३५ | *बाबाजी म्हा. शेटे. | ५०.९ | ठाणें. |
| ३६ | *रामचंद्र कृ. हर्डीकर. | ४८.८ | रत्नागिरी. |
| ३७ | *दाजी वि. पाटील. | ४८.३ | सोलापूर. |
| ३८ | *रघुनाथ स. डोंगरे. | ४८.२ | ठाणें. |
| ३९ | *दत्तात्रय वि. प्रभू. | ४८.१ | ठाणें. |
| ४० | *गोपाळ स. पेंगशे. | ४७.५ | रत्नागिरी. |
| ४१ | नरहर गो. अम्हे. | ४५.४ | पुणें. ( शिक्षक. ) |
| ४२ | गणेश गो. रेणावीकर. | ४४.८ | सातारा. |

( पहिल्या वर्षाचें सर्टिफिकीट मिळालेले )

१ व्यंकटेश व. पतके    सातारा ( १८९८ ) ( डू. माफ )

| | | |
|---|---|---|
| २ | दिगंबर श्री. देशपांडे | पुणें ( १८९८ ) |
| ३ | * भालचंद्र ज्ञा. म्हाळगी | पुणें ( १८९८ ) |
| ४ | * बापू ल० कुळकर्णी | सातारा ( १८९८ ) |
| ५ | * राघोजी गो० फाटक | रत्नागिरी ( १८९८ ) |
| ६ | * कृष्णाजी गं. देशपांडे | कुलाबा ( १८९८ ) ड्रा. माफ |
| ७ | * केशव बा० पाळंदे | कुलाबा ( १८९८ ) |
| ८ | * नारायण बा० वळामे | सोलापूर ( १८९८ ) |

---

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | गोविंद अ. देशपांडे | ४८२ | पुणें | ( शिक्षक ) |
| २ | गणेश मा० भालेराव | ४८.१ | नगर | ( शिक्षक ) |

**टीप**—ज्यांच्या मागें * खूण केली आहे, ते ड्राइंगच्या परीक्षेंत पसार न झाल्यामुळें त्यांस सर्टिफिकिट देण्यांत आलें नाहीं.

पुणें ट्रेनिंग कालेज
१३ फेब्रुवारी १९०१.

*R. P. GODBOLE*
आक्टिंग प्रिन्सिपल.

# सार्थ प्राकृत प्रकाश.

सदरहू पुस्तक आमचे मित्र रा. रा. **शंकर रामचंद्र हतवळणे** ह्यांनीं प्रसिद्ध प्राकृत वैयाकरण वररूची ह्यांच्या ग्रंथाच्या आधारें केलें आहे. प्राकृत भाषा ही संस्कृत व हिंदुस्थानांतील अर्वाचीन भाषा ह्यांमधील एक सांखळी आहे. संस्कृतांतून प्राकृतांत व प्राकृतांतून अर्वाचीन भाषांत रूपें कशीं आलीं, हें समजल्याशिवाय शब्दांची खरी व्युत्पत्ती समजली असें ह्मणतां येत नाहीं. पुष्कळ ऐतिहासिक प्रश्नांशीं प्राकृताचा निकट संबंध आहे. तेव्हां ह्या भाषेचा चांगला परिचय असल्याशिवाय त्यांचा उलगडा करण्यास अडचण असते. शब्दांचीं रूपें कशीं बनलीं व त्यांस आचार्यांच्या सूत्राचा मूळ आधार कोणता, हें प्रस्तुतच्या पुस्तकावरून दिसून येईल. प्राकृत प्रकाशाचे एकंदर १२ परिच्छेद असून पहिल्या ९ परिच्छेदांत महाराष्ट्री जी मुख्य प्राकृत भाषा तिजविषयीं व बाकीच्या तीन परिच्छेदांत पैशाची, मागधी व शौरसेनी ह्यांच्या संबंधाच्या मुख्य मुख्य गोष्टी सांगितल्या आहेत. हें पुस्तक मराठी शिक्षक, ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थी व हायस्कुलांतील वरच्या वर्गांतून मराठी शिकणारे विद्यार्थी ह्यांस विशेषेंकरून उपयोगीं पडण्यासारखें आहे. पुस्तकाची किंमत ८८ आहे. टपाल हशील शिवाय. एकदम वरींच पुस्तकें घेणारास कमिशन मुबलक मिळेल. पुस्तकें आमच्या छापखान्यांत विकत मिळतील.

**म्यानेजर चित्रशाळा छापखाना.**

---

**सृष्टचमत्कार तत्वादर्श:**—६ व्या यत्तेचें. यांत पृथ्वीचा आकार; गती, दिनरात्र, ऋतु, ग्रहणें इ० ची विपुल माहिती आहे. कि० ८८=॥. **अंकगणित**—चौथ्या यत्तेचा सर्व विषय सहज समजेशी उपपत्ति, उदा० भरपूर कागद बांधणी उत्तम कि० ८=. **मौजेचे बारा खेळ**—खेळांत शास्त्रीय ज्ञान. कि० ८-॥. ४ प्रतींस १ प्रत कमिशन. **शि. ग. पवार.** सारोळा ता० व जि० नगर.

---

## विक्रीस तयार. किं. १२ आणे.

मेहेरबान लिव्हारनर साहेब यांनीं इंग्रजींत लिहिलेले सिटीझन आफ इंडिया या पुस्तकांचे मराठी भाषांतर छापवून विक्रीस तयार आहे. व हे बुक डा. आ. प. ई. यांनीं मराठी ५।६ यत्तेकरितां नेमले आहे.

**म्याकमिलन आणि कंपनी.**

# बक्षिस. बक्षिस. बक्षिस.

## त-रु-चाला.

फक्त २॥ रुपये भरून आमच्या "**कादंबरी कल्पद्रुमास**" होणाऱ्या ग्राहकांस फुकट. कल्पद्रुमाचे आठ अंक प्रसिद्ध झाले असून त्यांत "**कृष्णकांताचें मृत्युपत्र**" ही सर्वोत्कृष्ट कादंबरी संपूर्ण झाली आहे. आमच्या ग्राहकांस वरील पुस्तक बक्षिस मिळून वर्षअखेर उत्कृष्ट बंगाली आणि हिंदी कादंबऱ्यांच्या भाषांतराचीं ६०० पृष्ठें संग्रह करावयास सांपडतील.

गणपती आळी—**वांई**
जिल्हा सातारा.
**अनंत केशव चितळे**


## हिंदुस्थाचा रहिवासी.

मेहेरबान डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन साहेब बहादूर यांच्या हुकमावरून जाहीर करण्यांत येतें कीं:—

सर वुइल्यम लिवार्नर यांनीं केलेल्या 'सिटिझन ऑफ इंडिया' ह्या नांवाच्या ग्रंथाचें मराठी भाषांतर "हिंदुस्तानचा रहिवासी" हें पुस्तक मराठी शाळांत चालविण्यासाठीं मंजूर केलें आहे. हें पुस्तक पांचव्या व सहाव्या इयत्तांत वाचन पुस्तकाबरोबरच शिकविण्याचें आहे.

२. शाळांतील वर्गांची पालट नुकतीच झाली आहे, करितां वर लिहिलेलें पुस्तक शिक्षक लोकांनीं आपापल्या शाळांत एकदम सुरू करावें.

३. ट्रेनिंग कॉलेजांतील पहिल्या वर्षाकरितां नेमलेल्या पुस्तकांत ह्या ग्रंथाचा समावेश केला आहे तेव्हां तेथेंही हें पुस्तक शिकविलें जाईल.

पुणे, एज्युकेशनल इन्स्पेक्टर
मध्यभाग यांचें ऑफीस,
तारीख १९।१२।१९००.

J. G. Covernton.
ॲक्टिंग एज्युकेशनल इन्स्पेक्टर
मध्यभाग.


## विक्रीस तयार.

आमचेकडे लीव्हींग सर्टिफीकिटाचे फार्म व वर्गास लागणारे क्याटलाग विक्रीस तयार आहेत.

लीव्हींग सर्टिफीकिटाचे फार्म दर शेकड्यास ॥८.
क्याटलाग दर शेकडा १६..

म्यानेजर चित्रशाळा प्रेस पुणें.

Registered No 179

पुस्तक १२. ॥ श्री ॥ अंक ३.

# मराठी शालापत्रक.

# MARATHI SCHOOL PAPER

## मार्च १९०१.

विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| प्रतिमासिक स्फुट विचार. .... .... .... | ४९ |
| देशी भाषांचा चंचुप्रवेश–महाराणीचें स्मारक. | |
| इंग्लंडांतील प्राथमिक शिक्षणाची थोडी माहिती. .... | ५३ |
| मराठी भाषेची लेखनपद्धती. .... .... | ५६ |
| प्राथमिक शिक्षणाची गेल्यासालची हकीगत. .... | ६२ |
| शिक्षणविषयक व्याख्यानें. .... .... .... | १९३-२०० |


'चित्रशाळा' प्रेस, पुणें.

आगाऊ वार्षिक वर्गणी, टपालखर्चासह रु० १८३.

फुटकळ अंकास८१.

## मराठी कापी-बुकें मंजूर झालीं.

# जाहिरात.

१. मेहेरबान डायरेक्टर आफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन साहेब बहादूर ह्यांच्या हुकुमावरून डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड व म्युनिसिपलबोर्डे ह्यांनीं चालविलेल्या सर्व शाळा, त्याचप्रमाणें विद्याखात्याकडून ज्या प्राथमिक शाळांस मदत होत आहे अशा सर्व शाळा, ह्यांच्या माहिती करितां जाहीर करण्यांत येतें कीं, मुंबई येथील मेसर्स लांगमन ग्रीन आणि कंपनी ह्यांनीं इयत्ता २ ते ५ ह्यांसाठीं तयार केलेलीं कापी-बुकें विद्याखात्याकडून मंजूर करण्यांत आलीं आहेत; आणि प्रत्येक इयत्तेंतील ( इयत्ता २ ते ५ ) विद्यार्थ्यानें त्या त्या इयत्तेस नेमिलेलें कापी-बुक सर्व लिहून पुरें केलेलें असें वार्षिक परिक्षेचे वेळीं हजर केलें पाहिजे.

२. आणखी असें जाहीर करण्यांत येतें कीं, विद्यार्थ्यांनीं सर्व वर्षभर हींच कापी-बुकें लिहिल्यास अर्थात चांगलें; परंतु ज्या अर्थीं हीं कापी-बुकें नेहेमीं वापरणें हें खर्चाचें काम आहे त्या अर्थीं विद्याखात्याची या कामीं सक्ती नाहीं. तथापि जेथें पुष्कळ कापीबुकें घेण्याचें विद्यार्थ्यांस सामर्थ्य असेल तेथें हींच कापीबुकें वर्षभर लिहिण्यास विद्यार्थ्यांस उत्तेजन देण्यांत यावें.

पुणें, एज्युकेशनल इन्स्पेक्टर मध्यभाग ह्यांचें आफिस; ता० १६ मार्च १९०१ इ.

J. G. CONVERNTION·
आक्टिंग एज्युकेशनल इन्स्पेक्टर
मध्यभाग.

---

**सृष्टचमत्कार तत्वादर्श:**—६ व्या यत्तेचें. यांत पृथ्वीचा आकार; गती, दिनरात्र, ऋतु, ग्रहणें इ० ची विपुल माहिती आहे. किं०८॥. **अंकगणित**—चौथ्या यत्तेचा सर्व विषय सहज समजेशी उपपात्ति, उदा० भरपूर कागदं बांधणी उत्तम किं० ८. **मौजेचे बारा खेळ**—खेळांत शास्त्रीय ज्ञान. किं० ८॥. ४ प्रतीस १ प्रत कमिशन. **शि. ग. पवार.** सारोळा ता० व जि० नगर.

// शालापत्रक.

येथें द्वंद्व नाहीं शिष्यांसी । हें अवघें सद्‌गुरूपाशीं।
सद्‌गुरू पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळां जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १५ मार्च १९०१. अंक ३.

## प्रतिमासिक स्फुट विचार.

**देशी भाषांचा चंचुप्रवेश.** देशी भाषांचा युनिव्हर्सिटींत प्रवेश व्हावा या करितां आज कित्येक वर्षें जो यत्न चालला आहे, त्यास अंशतः तरी यश आलें, ही थोडीशी समाधानाची गोष्ट आहे, यांत संशय नाहीं. एम्. ए. या परीक्षेस जे विद्यार्थी भाषा हा विषय घेतील, त्यांनीं पाहिजे तर मराठी, कानडी किंवा गुजराथी यांतली एकादी भाषा घ्यावी असें युनिव्हर्सिटीनें ठरविलें आहे. आतां हा विषय घेणारांसाठीं मराठीच्या संबंधाच्या कोणकोणच्या गोष्टी सिंडिकेट ठरविते तें पाहाणें आहे. बाकी एवढ्यानें देशी भाषांना विशेष मोठेसें उत्तेजन येईल असें वाटत नाहीं. याचें कारण एम. ए. च्या परीक्षेस प्रत्येक वर्षी भाषाविषयांत फारच थोडे विद्यार्थी असतात. त्यांतले कित्येक संस्कृत भाषेमध्यें बक्षिसें, पदक वगैरे असल्यामुळें संस्कृत भाषा घेणार. एम्. ए. च्या परिक्षेस साधारणतः हुषार लोकच जातात, म्हणून संस्कृत भाषा कठीण याच कारणामुळें देशी भाषा कोणी घेईल असें कधींही व्हावयाचें नाहीं. तर देशी भाषा घेणारे ती केवळ हौसेनें घेणार. असे विद्यार्थी वर्षाचे कांठीं एक दोन अस-

तील किंवा मुळींच कोणी नसेल, असाच प्रकार होणार आहे. शिवाय एम्. ए. च्या परीक्षेचा अभ्यास कालेजामध्यें नियमित रीतीनें व्याख्यानें वगैरे देऊन कोणीही चालवीत नाहीं. यामुळें 'कोणचीही देशी भाषा' या विषयाचा प्रोफेसर कालेजमध्यें नेमला जाऊन त्या विषयाचा कांहीं शोध वगैरे होईल, असें म्हणावयास नको. भाषासाम्य, भाषेचा इतिहास, कविता, भाषेची व्युत्पत्ती व वाद, इत्यादि विषय एम्. ए. या परीक्षेसाठीं नेमिले असतां, एम्. ए. चे विद्यार्थी अगोदरच चांगले शिकलेले असल्यामुळें त्यांचेकडून स्वभाषेचा अभ्यास थोडा बहुत तरी होईल, यांत शंका नाहीं. परंतु वस्तुस्थिती वर सांगितल्याप्रमाणें असल्यामुळें हा विषय नेमल्यानें विशेष कांहीं उपयोग होईल असें वाटत नाहीं. आतां याचा उपयोग करून घेणें हें आमच्या मंडळीच्या हातीं आहे. युनिव्हरसिटीनें ज्याप्रमाणें विषय नेमला, त्याप्रमाणें संस्कृत या विषयास आहे तशी एकादी स्कालरशिप, फेलोशिप किंवा मेडल् नेमला जाण्याची खटपट आमची मंडळी लौकरच करील तर फार चांगलें होईल. कै० रानडे यांचें स्मारक करण्याचा विचार आमची मंडळी करीत आहे. तर त्यांचें स्मारक यासारखें दुसरें कोणचेंही चांगलें होणार नाहीं. या विषयाच्या संबंधानें दीर्घ प्रयत्न करून त्याची इतकी तरी अखेरी लावण्याचें सर्व श्रेय कै० रानडे यांजकडे आहे. तेव्हां मराठी, गुजराथी व कानडी या निरनिराळ्या प्रांतातल्या मंडळीनें निरनिराळे तीन फंड करून तीन निरनिराळ्या स्कालरशिपा रानडे यांच्या नांवाच्या नेमाव्या. म्हणजे दरवर्षी निदान एक तरी विद्यार्थी या विषयाचा अभ्यास लक्षपूर्वक करील. एवढा तरी यत्न आमच्या मंडळीच्या हातून होईल काय ?

---

महाराणीचें स्मारक.

स्वर्गवासी महाराणी विक्टोरिया यांचीं स्मारकें सर्वत्र करण्याचें घाटत आहे, त्याप्रमाणें आमच्या इकडेही करण्याचा विचार चालू आहे. परंतु आमचा देश अफाट पडल्यामुळें व प्रजाजनही निरनिराळ्या प्रकारचे असल्यामुळें हें स्मारक कोठें असावें व कोणचें असावें, याबद्दल मोठा कडाक्याचा वाद चालला

आहे. लार्ड कर्झन, व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर, यांचें म्हणणें असें आहे कीं, कलकत्ता येथें एक जंगी राष्ट्रीय स्मारक करावें. तेथें एक मोठा भव्य, सुंदर, विस्तृत असा हॉल उभारावा, व त्यांत राणीच्या कारकीर्दींतलीं व दुसरीं अनेक जुनीं स्मारकें, जुन्या व नव्या इतिहासप्रसिद्ध व प्रख्यात गृहस्थांच्या तसबिरा, पुतळे वगैरे ठेवावे. ठिकठिकाणच्या लोकांचें म्हणणें असें आहे, कीं आम्ही सर्व जरी हिंदुस्थानचे प्रजाजन आहों, व कलकत्ता ही जरी आमची राजधानी आहे, तरी ही राजधानी इतकी लांब अंतरावर आहे, व आमचे लोकांपैकीं पुष्कळ इतके गरीब आहेत, कीं कित्येकांस कित्येक पिढ्यांमध्यें सुद्धां कलकत्त्याचें दर्शन कधीं होणार नाहीं. तेव्हां ठिकठिकाणच्या लोकांच्या पैशानें निरनिराळ्या ठिकाणीं स्मारकें करावीं, म्हणजे सर्वांस उपयोग होऊन सर्वांनाही महाराणीचें स्मरण चिरकाल राहील. दुसरें असें एक म्हणणें आहे, कीं स्मारक करणें तें कांहीं तरी लोकोपयोगी असावें. नुस्ता एकादा भव्य हॉल उभारून काय उपयोग? हिंदुस्थानचे प्रजाजन फार गरीब आहेत. राजेलोकांनीं जरी मोठमोठ्या रकमा दिल्या, तरी त्या ते गरीब प्रजेपासूनच घेतलेल्या पैशांतून देणार. तेव्हां स्मारक असणें तें उपयुक्त असावें. अशा रीतीनें निरनिराळ्या लोकांचे निरनिराळे विचार आहेत. ते एकवटून या कामांत एकमत होणें कठीण दिसतें. असें मतवैचित्र्य असलें म्हणून त्यांत नवल ही नाहीं. कारण राणीसरकारच्या स्मरणाचे संबंधानें प्रीतिभाव असणें, या एका गोष्टीखेरीज इतर गोष्टींत एक मत होणें संभवतच नाहीं. यासाठीं याला उत्तम उपाय म्हटला म्हणजे ठिकठिकाणीं जी रक्कम जमेल, त्यांतला अमुक एक भाग राष्ट्रीय स्मारकाकडे देऊन बाकीच्या रकमेनें स्थानिक स्मारकें करावीं, अशी व्यवस्था ठरवावी. याशिवाय ज्यास वाटेल त्यास फक्त राष्ट्रीय स्मारकास किंवा कांहीं इकडे व कांहीं तिकडे, अशी वांटून रक्कम देण्यास हरकत नसावी. अशा रीतीची तडजोडीची व्यवस्था सर्वानुमतें ठरेल तर फार बरें होईल. आतां दुसरी गोष्ट, स्मारक काय असावें. कलकत्त्यास होणारें जें राष्ट्रीय स्मारक तें

म्हणजे एक जंगी हॉल असून त्यांमध्यें अनेक प्रकारचे राष्ट्रीय इतिहासाचें स्मरण देणारे व मुख्यतः महाराणीच्या कारकीर्दीचें स्मरण देणारे असे पदार्थ, व दुसऱ्या स्मरणीय गोष्टी असाव्या हें ठीक आहे. परंतु ठिकठिकाणचीं स्मारकें हीं कांहीं तरी लोकोपयोगी गोष्टींच्या रूपानें असावीं, हें अगदीं योग्य आहे. आमच्या देशामध्यें लोकोपयोगी कामांमध्यें सर्वांत कमी पैसा म्हटला तर विद्यार्जनाच्या वांट्यास येतो. निरनिराळ्या खात्यांमध्यें आपापल्या गरजेप्रमाणें हव्या तशा रकमा काढून घेतात. व गरीब बिचाऱ्या विद्याखात्याला अगदी कमी पैसा मिळतो. यासाठीं ठिकठिकाणीं कांहीं तरी विद्यासंस्था निघाव्या. मुंबईंत टाटायुनिव्हरसिटीची जी खटपट चालू आहे, तिलाच 'विक्टोरिया युनिव्हरसिटी' असें नांव देऊन बरीच रकम तिकडे द्यावी व तें एक स्मारक करावें असें पुष्कळांचें मत आहे. पण ज्याप्रमाणें कलकत्यास होणारा हॉल सर्व लोकांस पसंत पडणार नाहीं, त्याप्रमाणें मुंबईस होणारी ही गोष्ट ही सर्व प्रजाजनांस पसंत पडेल असें नाहीं. तेव्हां ठिकठिकाणीं निरनिराळीं स्मारकें होणें, याशिवाय सर्वांना पसंत पडण्यासारखी गोष्ट दिसत नाहीं. याची व्यवस्था अशी होणें योग्य दिसतें कीं, प्रथमतः कलकत्यास राष्ट्रीय स्मारक करून त्यासाठीं सर्व ठिकाणच्या रकमांतून योग्य वांटा घ्यावा. नंतर 'टाटा युनिव्हरसिटी' ही सुद्धां मोठीं सर्वोपयोगी अशी राष्ट्रीय संस्थाच व्हावयाची आहे, या साठीं सर्व स्मारक फंडांतून या युनिव्हरसिटीकरितां थोडा थोडा वांटा घ्यावा. आणि मग ठिकठिकाणच्या लोकांनीं आपल्या मर्जीनुरूप स्थानिक स्मारकांची व्यवस्था करावी. आतां अशा प्रकारची व्यवस्था कोणीं ठरवावी हा मोठा प्रश्न आहे. कारण नामदार व्हाईसराय साहेब सर्व देशाचें जंगी एकच स्मारक असावें असें म्हणत आहेत. ठिकठिकाणचे लोक आपलीं निरनिराळीं स्मारकें असावीं, असें म्हणतात. परंतु व्हाईसराय साहेबांच्या विरुद्ध जाऊन निराळीच व्यवस्था करावी असें पुष्कळांस आवडणार नाहीं. याचा परिणाम मात्र असा होईल कीं ठिकठिकाणचे लोक आपल्या मनासारखी व्यवस्था होत नाहीं म्हणून उदासीन राहातील, व पैसे

जमाविण्याचें काम नीट होणार नाहीं. तेव्हां ठिकठिकाणच्या लोकांनीं वेळींच व्यवस्था करून व्हाईसराय साहेबांशीं बोलणें सुरू करावें, व सर्वांस आवडेल अशी तडजोडीची एकच व्यवस्था कायती ठरवून कामास लागावें, हा यांतला उत्तम मार्ग होय. व्हाईसराय साहेब मोठे चाणाक्ष दूरदृष्टी व धोरणी आहेत; तेव्हां ते सर्व गोष्टी ध्यानांत आणून सर्वांस मानवेल अशी व्यवस्था ठरवितील अशी पुष्कळांची खात्री आहे.

---

## इंग्लंडांतील प्राथमिक शिक्षणाची थोडी माहिती.

इंग्लंड व वेल्स यांतील प्राथमिक शिक्षणाच्या शाळांचा सन १८९८ व ९९ सालचा रिपोर्ट नुकताच पाहाण्यांत आला. त्यांतली थोडीशी माहिती आमच्या वाचकांसाठीं येथें देतों. सन १८८५ सालापासून या साळापर्यंत सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांची संख्या शेंकडा १६ या प्रमाणानें वाढली आहे. इंग्लंडांतील शाळांमध्यें दोन प्रकारचे विद्यार्थी असतात; एक फी देणारे व दुसरे ज्यांस फुकट शिक्षण दिलें जातें, असे. या दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या वाढीचें प्रमाण असें आहे:—

| साल. | फी देणारे. | फी न देणारे. |
|---|---|---|
| १८९५ | ७८०३१० | ४५१९१५९ |
| १८९६ | ७६११४७ | ४६६१८४२ |
| १८९७ | ७३५१४२ | ४७७१८९७ |
| १८९८ | ७०६२५१ | ४८७०६१५ |

यावरून दिसून येईल कीं प्रथमतः फुकट शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या तिकडे फार मोठी आहे. शिवाय उत्तरोत्तर फी देणाऱ्या मुलांची संख्या कमी होऊन फी न देणाऱ्या मुलांची संख्या वाढत आहे. तेव्हां या गोष्टीनें काय सिद्ध होतें? लोकांना फुकट शिक्षणाची जरूर फार आहे, व फी देण्यास नको आहे. असा प्रकार जर इंग्लंडासारख्या

श्रीमंत देशांत आहे, तर आमच्या इकडे ही असलाच पाहिजे हें उघड आहे. आमच्या इकडे मागसलेल्या लोकांना शिक्षणास उत्तेजन देण्यासाठीं अनेक युक्त्या केलेल्या आहेत. पण वरील इंग्लंड देशांतल्या स्थितीवरून दिसून येईल, कीं शिक्षण फुकट देण्याचे ठरविणें यासारखी उत्तेजनपर दुसरी कोणचीही युक्ती नाहीं.

अशा स्थितीमुळें प्राथमिक शिक्षणास सरकार जी ग्र्यांट देतें, तिची रक्कमही उत्तरोत्तर वाढत आहे. ती अशी:—

| साल. | प्राथमिक शाळांना दिलेली खर्चाची ग्र्यांट पौंड. | मुलांची फी भरण्यासाठीं दिलेली ग्र्यांन्ट पौंड. |
|---|---|---|
| १८९५ | ४०८१२८१ | २१५१४६८ |
| १८९६ | ४२१७५०६ | २१९६८०८ |
| १८९७ | ४३३९७३९ | २२२६५२२ |
| १८९८ | ४५५४९३२ | २२६५३१९ |

इंग्लंडमध्यें असा कायदा आहे, कीं अमुक वयापर्यंत मुलास सर्व वेळ शाळेंत घातलें पाहिजे, पुढें अमुक वयापर्यंत ( २१ वर्षांपर्यंत ) निदान अमुक तास तरी घातलें पाहिजे. बाकीच्या वेळांत हे विद्यार्थी आपला घरचा धंदा शिकतात, व आईबापांस त्यांचे पोटाचे धंद्यांत मदत करितात. असे विद्यार्थी रात्रीच्या शाळांत शिकतात. या शाळा नुकत्याच स्थापन होऊं लागल्या आहेत, व त्या मोठ्या महत्वाच्या आहेत. यांत लेखनवाचनादि विषय शिकवून शिवाय घरगुती उपयुक्त विषयही शिकवितात. या शाळांच्या संबंधाची थोडीशी माहिती पुढें देतों. त्या माहितीवरून या शाळांची कशी भरभराट होत चालली आहे, हें दिसून येईल. या शाळांपैकीं पुष्कळ मिश्र आशा आहेत; म्हणजे त्यांमध्यें मुलगे व मुली एकत्र शिकत असतात.

| माहिती. | १८९५ | १८९६ | १८९७ | १८९८ |
|---|---|---|---|---|
| एकंदर रात्रीच्या शाळा. | ३९४७ | ४३४७ | ४९८० | ५५३५ |
| एकंदर विद्यार्थी, | २७०२८५ | २९८७१४ | ३५८६२८ | ४३५५०० |
| तपशीलः— | | | | |
| १४ वर्षांचे आंतलें | ४३०४९ | ६११९५ | ८५८७७ | ११९४९२ |
| वय १४ ते १८ | १५३८७९ | १६३६४३ | १८६४३५ | २२०४६२ |
| १८ ते २१ | ३७६४० | ३८०७० | ४३४८४ | ४८५३६ |
| २१ वर्षांवर | ३५७१७ | ३५८१५ | ४१८३२ | ४७११० |
| ज्यांच्या शिक्षणास मदत मिळते असे | ९८१३३ | १०८७०८ | १२२४३० | १६६७५४ |
| ड्राईंग शिकविणाऱ्या शाळा. | १३३८ | १०४८ | ११४६ | ११८३ |
| हस्तशिक्षण. | ३९९ | ४३८ | ४४९ | ५२५ |
| स्वयंपाक. | ५०१ | ५३१ | ६२३ | ६५५ |
| परीटकाम. | ४१ | ४७ | ७६ | ९८ |
| स्त्रियांचें घरकाम | १२ | ९ | ६ | १० |
| सरकारची वार्षिक मदत पौंड. | ११२०८४ | १२९५४२ | १६२१५८ | १८८७६३ |

वरील आंकड्यांवरून दिसून येईल कीं, कामधंदा करणारे लोकांना आपल्यास शिक्षण मिळावें अशी इच्छा अधिकाधिक होत चालली आहे व त्यामुळें काम संभाळून शिकण्याच्या ज्या शाळा आहेत त्यांतील विद्यार्थी वाढत आहेत. त्यांतही पुनः १८ ते २१ व २१सां पुढील वयाचे विद्यार्थी, यांची संख्या फार झपाट्यानें वाढत चालली आहे. तशीच या विद्यार्थ्यां

पैकीं ज्यांना सरकारी मदत मिळते अशा विद्यार्थ्यांची संख्याही उत्तरोत्तर वाढत आहे. यावरून लोकांना शिक्षण फुकटचें पाहिजे आहे, व लोकांत शिक्षणाचा प्रसार होण्यास फुकटच्या शाळा पुष्कळ स्थापित केल्या पाहिजेत, व त्यांतही बऱ्याचशा संध्याकाळच्या व रात्रीच्या शाळा असाव्या पाहिजेत असें सिद्ध होतें. इकडे आमच्या शिक्षणाचे अधिकारी, म्युनिसिपल कमेट्यांचे सभासद व लोकलबोर्डांचे सभासद यांचें लक्ष जाईल अशी आम्ही आशा करितों.

---

## मराठी भाषेची लेखनपद्धती.

—:-*-:—

या विषयावर गेल्या आक्टोबरच्या अंकांत लेख आला होता. त्यानंतर अनेक घाईच्या विषयांपुढें हा विषय मागें पडला होता. आतां हा लौकरच संपवून टाकूं.

गेल्या खेपेस रा॰ हतवळणे यांच्या पुस्तकांतील पृष्ठ ३७ सांपर्यंतच्या विषयाचा विचार झाला. आतां पुढें क्रियापदांच्या रूपांचा विचार आला आहे. नामांच्या रूपाप्रमाणेंच हीं रूपें फार महत्वाचीं आहेत. यांतही पुस्तककारांनीं प्रथमत: अत्यंत भानगडीची अशी ठरलेली गोष्ट अमुक ठिकाणीं अनुस्वार द्यावा कीं न द्यावा, हीच विचारासाठीं घेतली आहे. या ठिकाणीं व इतरत्र पुस्तककारांनीं जे विचार प्रघट केले आहेत, त्यांवरून वाचकांच्या लक्षांत एक गोष्ट आल्याशिवाय राहाणार नाहीं. ती ही, कीं ग्रंथकारांच्या मनांत, पुष्कळांना अनुस्वार नको आहेत ही गोष्ट नेहमीं वागत होती, व यामुळें त्यांनीं पुष्कळ ठिकाणीं ऐतिहासिक परंपरेसही धाब्यावर बसविल्यासारखें केलें आहे. मराठींत अनुनासिकत्व पुष्कळ असेल; व तें पुष्कळांस नकोसेंही झालें असेल. पण तेवढ्यावरूनच केवळ तें एकीकडे झुगारून देण्यास लायक ठरतें, असें मुळींच होत नाहीं. अनुस्वाराची चालू वहिवाट फार दिवसांची आहे; आणि ज्या अनुस्वारांना इतिहासाचा आधार आहे, ते अशा रीतीनें कधींही दूर होणार

नाहींत. या संबंधानें मागें या विषयास आरंभ करितांना आम्हीं चर्चा केलीच आहे, ती वाचकांनीं ध्यानांत ठेवावी.

क्रियापदांचा विचार करावयास आरंभ करण्यापूर्वी ग्रंथकारांनीं मराठी क्रियापदांच्या उत्पत्तीचा व इतिहासाचा विचार मुळींच केला नाहीं, असें आम्हांस मोठ्या दिलगिरीनें म्हणावें लागत आहे. ग्रंथकारांनीं उलट असा शेरा मारला आहे;—"संस्कृत, प्राकृत, व मराठी या भाषांतील काळ व अर्थ यांच्या संबंधानें एकवाक्यता नाहीं, इतकेंच नाहीं, तर भेद पुष्कळ आहे. काळाच्या व अर्थाच्या बाबतींतील प्रकार संस्कृत व प्राकृत यांशीं न जुळतां इंग्रजीचीं विशेष जुळतो." हा ग्रंथकाराचा शेरा अगदीं गैरसमजाचा आहे. यांतील दोन्ही विधानें अगदीं चुकीचीं आहेत, हें आतां आम्ही या खेपेस बळकट पुराव्यानें सिद्ध करणार आहों. मराठीतील क्रियापदरूपें मराठीची आई जी प्राकृत भाषा, व तिची आजी जी संस्कृत, तिच्यांतील रूपांपासून अगदीं सरळ रीतीने ऐतिहासिक परंपरेनें सिद्ध होतात. संस्कृत भाषेपासून मध्यंतरीं प्राकृताच्या द्वारें मराठीची उत्पत्ती होण्यास सुमारें तेरा चौदाशें वर्षें लागलीं आहेत असा आमचा अजमास आहे. एवढ्या बऱ्याच लांब व घडामोडीच्या काळांत ऐतिहासिक दृष्टीनें जेवढा फेरफार होणें अगदीं रास्त दिसतें, त्याशिवाय अधिक फेरफार या रूपांत झालेले दिसत नाहींत. उलट कित्येक बाबतींत तर मूळचीं संस्कृत रूपें व प्रस्तुतचीं मराठी रूपें यांमध्यें आश्चर्य वाटण्यासारखें साम्य व एकवाक्यता आहे. या संबंधानें शाळापत्रकांत बरेच दिवसांपूर्वी एकदां थोडेंसें लिहिलें होतें; व याचा विस्तृत विचार रा० जोशी यांच्या 'प्रौढबोध' व्याकरणाच्या इंग्रजी आवृत्तीच्या क्रियापद प्रकरणांत आहे. तथापि या ठिकाणीं विषयमाहात्म्यामुळें आमच्या वाचकांसाठीं विशेष खुलासा करणें इष्ट आहे.

संस्कृत भाषेंत काळ व अर्थ, मिळून दाहा आख्यात विभक्ती आहेत. त्यांना लकार असें नांव देतात. हे संस्कृतांतले दाहा लकार असे आहेत:—

| काळाचें नांव | लकारसंज्ञा | 'हस्' धातूचें रूप, तृ. पु. ए. व. |
|---|---|---|
| १ वर्तमान | लट् | हसति |
| २ भूत (साधा) | लुङ् | अहसीत् |
| ३ अनद्यतन भूत | लङ् | अहसत् |
| ४ परोक्षभूत | लिट् | जहास |
| ५ भविष्यत् (साधा) | लृट् | हसिष्यति |
| ६ अनद्यतन भविष्यत् | लुट् | हसिता |
| ७ आज्ञार्थ | लोट् | हसतु |
| ८ विध्यर्थ | विधिलिङ् | हसेत् |
| ९ आशीर्वादार्थ | आशीर्लिङ् | हस्यात् |
| १० संकेतार्थ | लृङ् | अहसिष्यत्. |

टीप—संस्कृतांत कोणच्याही काळाचीं रूपें लिंगाप्रमाणें फिरत नाहींत व या सर्व काळांना सकर्मक धातू असतां कर्मणि व अकर्मक, असतां भावे रूपें आहेत.

आतां मराठीमध्यें काळ व अर्थ मिळून आख्यात विभक्ती आठ आहेत, त्यांची व्यवस्था अशा प्रकारची आहे:—

| काळाचें नांव | तृतीय पुरुष एकवचनीं रूप | विशेष प्रकार. |
|---|---|---|
| १ जुना वर्तमान | हंसे; करी | लिंगाप्रमाणें न फिरणारा. |
| २ चालू वर्तमान | हंसतो | लिंगाप्रमाणें फिरणारा. |
| ३ साधा भुत | हंसला; केला | लिंगाप्रमाणें फिरणारा. |
| ४ रीतिभूत | हंसे; करी | लिंगाप्रमाणें न फिरणारा. |
| ५ भविष्य | हंसेल; करील | लिंगाप्रमाणें न फिरणारा. |
| ६ आज्ञार्थ | हंसो | लिंगाप्रमाणें न फिरणारा. |
| ७ विध्यर्थ | हंसावा | लिंगाप्रमाणें फिरणारा. |
| ८ संकेतार्थ | हंसता | लिंगाप्रमाणें फिरणारा. |

टीप— यांपैकीं साधा भूत व विध्यर्थ ह्या काळीं सकर्मक धातूवरून केवळ कर्मणि किंवा भावीप्रयोग होतो; इतर काळीं फक्त कर्तरिप्रयोग होतो.

हे जे मराठींतले आठ काळ, यांपैकीं जुनावर्तमान, रीतिभूत भविष्य आज्ञार्थ हे चार संस्कृतांतील शुद्ध काळांच्या रूपांपासून झाले म्हणून त्यांचीं रूपें लिंगाप्रमाणें फिरत नाहींत. बाकीचे चार संस्कृत धातुसाधित विशेषणावरून साधतात, म्हणून त्यांचीं रूपें लिंगांवरून फिरतात; हें पुढें हीं सर्व रूपें कशीं झालीं आहेत, हे सांगितलें आहे, त्यावरून दिसून येईल.

आतां हे काळ कसे झाले आहेत हें पहा. जुना वर्तमान काळ हा संस्कृतांतल्या वर्तमानावरून झाला. या काळाचा प्राचीन मराठींत वर्तमान, भूत व भविष्य या तिन्ही काळीं उपयोग होत असे. याचीं उदाहरणें कवितेंत वारंवार येतात, व चिपळूणकरकृत निबंधांत तीं सांगितलीं आहेत, तीं आमच्या वाचकांनीं पाहिलेलीं आहेत, यासाठीं तीं येथें सांगावयास नकोत. हा जो वर्तमान काळाचा भूतकाळीं उपयोग असे, तो तसाच राहून त्याचा पुढें रीतिभूत बनला. भविष्यकाळीं या वर्तमानकाळाच्या रूपांचा उपयोग प्रथमतः जशाचे तसाच होत असे, नंतर त्या रूपांच्या पुढें ' ल ' हें अक्षर घालण्याची चाल पडली. या ' ल 'चा प्रथमपुरुषीं एकवचनीं ' न ' झाला, व अनेकवचनीं ' ल ' चा लोप झाला. या प्रकारें पुढें भविष्यकाळाचीं रूपें अशीं बनलीं:—

| | | | |
|---|---|---|---|
| मी | करी-न | आम्ही | करूं |
| तूं | करिशी-ल | तुह्मी | करा-ल |
| तो | करी-ल | ते | करीती-ल |

हा ' ल ' कोठून आला याचा शोध अद्यापि लागला नाहीं. परंतु प्रथमतः वर्तमानाचींच नुसतीं रूपें भविष्यकाळीं उपयोगांत येत असून त्यांत पुढें ' ल ' मिळविण्याची चाल केव्हां पडली, हें मात्र स्पष्टपणें सांगतां येतें. मराठी भाषेतले जुने शिलालेख एक मुंबई नजीकच्या परळ गांवांतील ११८६ सनांतला, व दुसरा मालेगांवाजवळील पाटण नामक जुन्या गांवांतला १२०६ सनांतला, असे उपलब्ध आहेत. या दोहींमध्यें केवळ वर्तमानाचीं

रूपें घालून भविष्यकाळ केला आहे. पण यानंतरचा प्रख्यात मराठी ग्रंथ ज्ञानेश्वरी, जो सन १२९० त पूर्ण झाला, त्यामध्यें या रूपांत सर्वत्र 'ल' घातलेला आहे. यावरून 'ल' लावण्याची चाल सन १२०६ पासून सन १२९०पर्यंतच्या मध्यंतरीच्या काळांत केव्हां तरी पडली असावी.

तेव्हां जुना वर्तमान, रीतीभूत व भविष्य हे तीन काळ संस्कृत वर्तमानावरून झाले; व अज्ञार्थ हा संस्कृत अज्ञार्थावरून झाला. या प्रमाणें दोन संस्कृत काळांवरून चार मराठी काळ झाले.

चालू वर्तमान, साधाभूतकाळ व विध्यर्थ हे अनुक्रमे वर्तमान, भूत व विध्यर्थ यांच्या विशेषणांस 'आहे' धातूचीं रूपें जोडून झाले, व संकेतार्थाचीं रूपें हीं वास्तविक चालू वर्तमानचींच रूपें थोड्या फरकानें आहेत. हीं रूपें कशीं सिद्ध होतात, हें थोडेंसें पुढें दाखवितों. 'त' प्रत्ययान्त वर्तमानकालवाचक विशेषणें जात, येत, इत्यादी व ल-प्रत्ययान्त भूतकालवाचक विशेषणें केला, गेला, इत्यादी व विध्यर्थक विशेषणें करावा, यावी, इत्यादी, हीं मूळ संस्कृतापासून कशीं झालीं हें सांगावयास नकोच.

[पु० मी] गेला + आहें; = गेलाहें; गेलोहें, असेंही रूप क्वचित् कवितेंत येतें. नंतर 'ह' चा लोप होऊन गेलाएँ व गेलोयँ अशीं रूपें झालीं. हीं अद्यापि कोकणी भाषांतून आहेत. गेलाएँ किंवा गेलोयँ याचें थोडक्यांत 'गेलों' असें झालें.

[स्त्री० मी] गेली + आहें = गेल्याहें, गेल्याएँ, गेल्येयँ इत्यादी. याचें सोपें रूप 'गेल्यें' झालें, व पुढें त्याहून सोपें 'गेलें' असें झालें. या ठिकाणीं 'ह' हें व्यंजन व 'ए' हा स्वर हीं अक्षरें जरी नाहींशीं झालीं, तरी अनुस्वार कायम राहतो हें लक्षांत ठेविलें पाहिजे

[तो] जाता + आहे = जातोय्, जाताए = जातो.

[ती] जाती + आहे = जातिये, जातिए = जात्ये, जाते; इत्यादी.

अशा रीतीनें चालू वर्तमान भूत व विध्यर्थ यांचीं सर्व रूपें बनवितां येतील. याचा विस्तार करण्याचें कारण दिसत नाहीं.

आतां या सर्व रूपांत अनुस्वार कोठें आहेत व ते कां आहेत हें सांगतों:–( १ ) जुना वर्तमान, चालू वर्तमान रितीभूत, साधाभूत, यांच्या प्रथमपुरुषीं उभयवचनीं अनुस्वार आहे. याला कारण मूळ संस्कृत प्रत्ययां तला मकार आहे. यांपैकीं कित्येक काळांच्या द्वितीय पुरुषाच्या बहुवचनीं अनुस्वार देतात, जसें, आहां, आहांत, गेलां, गेलांत, इत्यादी. परंतु हा अनुस्वार वैकल्पिक आहे, यावरून तो कारणाशिवाय आलेला दिसतो. यासाठीं हा काढून टाकिला असतां कोणासही अडचण वाटणार नाहीं. आतां जीं क्रियापदरूपें लिंगावरून फिरतात, त्यांच्या कित्येक नपुंसकलिंगी रूपांचे अंतीं अनुस्वार येतो. जसें, होतें, झालें, होतीं, झालीं, इ० याचें कारण नपुंसकलिंगी शब्द असला व त्याचे अन्तीं 'अ' शिवाय स्वर असला म्हणजे त्या अंत्य स्वरावर अनुस्वार द्यावा, हा नपुंसकलिंगी शब्दांचे संबंधाचा नियम होय. हा नियम मागील निबंधात सांगितल्याप्रमाणें नामांचे रूपांत जसा सांपडतो तसा क्रियापदाचे रूपांतही सांपडतो.

वरील सर्व विवेचनावरून मराठी क्रियापदरूपें संस्कृत रूपांशीं जुळत नाहींत हें म्हणणें व्यर्थ आहे, असें दिसून येईल. शिवाय या रूपांत जे थोडे अनुस्वार आहेत, त्यांना व्युत्पत्तीचा पूर्ण आधार आहे, अशी कोणाचीही खात्री होईल. मराठींतल्या कित्येक रूपाचें संस्कृत क्रियापदरूपांशीं चमत्कार वाटण्यासारखें साम्य दिसतें असें मागें म्हटलें आहे, त्यांचीं उदाहरणें सांगतों. जुन्या मराठींत सर्व काळीं संस्कृताप्रमाणें कर्मणी व भावी रूपें होत असत ( जसें, कीजशी, कीजेल, धरियलें, इ० ). यांत प्रत्ययापूर्वी 'ज' ( किंवा 'य' ) अक्षर लावीत. हें अक्षर संस्कृतांतील कर्मणी प्रत्यय जो 'य' ( जसें, क्रियते गीयते, इ० ) त्याच्याशीं आश्चर्य वाटण्यासारखें जुळतें. त्याचप्रमाणें मराठींतल्या जुन्या वर्तमान काळाचें द्वितीयपुरुषाचें एकवचन व तृतीयपुरुषाचें बहुवचन हीं संस्कृतांतल्या त्या त्या रूपांशीं चमत्कारिक रीतीनें साम्य पावतात. तशींच आज्ञार्थाचीं रूपेंही संस्कृतांतल्या त्या रूपांना फारच जवळ आहेत. एवढें

साम्य केवळ सहजीं घडून आलें आहे, असें कोणाच्यानेंही कधीं म्हणवणार नाहीं. याशिवाय क्रियापदरूपांचे संबंधानें गैरमाहितपणाचीं व चुकीचीं अनेक विधानें लेखकारांनीं केलेलीं आहेत. परंतु त्यांचें खंडण करीत बसण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं ग्रंथकारांच्या या एकंदर प्रतिपादनावरून असें मात्र दिसून येतें, कीं आहे ही एकंदर व्यवस्था आपल्या मर्जीनुरूप नाहीं, म्हणून तिला कांहींतरी नांवें ठेवावीं ! असो. आतां आमचीं क्रियापदारूपें इंग्रजीशीं मुळींच जुळत नाहींत, हेंही थोडक्यांत दाखवितो. मराठींत निरनिराळ्या प्रकारचे काळ व अर्थ मिळून आख्यात-विभक्ती आठ आहेत; इंग्रजींत फक्त तीनच आहेत. त्यांतही इंग्रजींतला भविष्यकाळ तर स्वतंत्र नसून तो साह्यकारी क्रियापदांचे साह्यानें होतो. इंग्रजींत मराठीप्रमाणें विध्यर्थ व संकेतार्थ यांस स्वतंत्र रूपें नाहींत. आज्ञार्थाला फक्त द्वितीय पुरुषीं रूपें आहेत. इंग्रजींत मराठीसारखा रीतिभूत काळही नाहीं. मराठींतल्या कांहीं काळांचीं रूपें लिंगांप्रमाणें फिरतात, इंग्रजींत तशीं कोणच्याही काळाची फिरत नाहींत. मराठींत दोन काळ फक्त कर्मणी व बाकीचे सर्व फक्त कर्तरी आहेत; इंग्रजींत तिन्ही काळांचीं रूपें कर्तरी व कर्मणी अशीं दोन्ही प्रकारचीं करितां येतात. इंग्रजींत क्रियापदांना फक्त कर्तरी व कर्मणी असे दोन प्रयोग असतात. मराठींत भावी म्हणून एक निराळाच प्रयोग असून तो संस्कृताच्या सादृश्यावरून आला आहे. याशिवाय मराठी क्रियापदांचे प्रत्यय इंग्रजीवरून झाले आहेत असें कधींच कोणास म्हणतां येणार नाहीं. तेव्हां आतां मराठी क्रियापदांचें इंग्रजीशीं साम्य कोणत्या बाबतींत खरोखरी दिसून येतें, हें कोणी सांगेल काय ?

---

## प्राथमिक शिक्षणाची गेल्या सालची हकीगत.

सन १८९९–१९०० सालाबद्दलचा मुंबई इलाख्यांतील विद्याखात्याचा रिपोर्ट थोडे दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाला आहे. त्यांतून प्राथ-

मिक शिक्षणाची गेल्या वर्षाची हालहवाल शाळापत्रकाच्या वाचकांकरितां थोडक्यांत देण्याचा विचार आहे.

प्राथमिक शाळा व त्यांत शिकत असलेल्या मुलांची माहिती.

| | १८९९ । १९०० | | १८९८ । ९९ | |
|---|---|---|---|---|
| | शाळा. | विद्यार्थी. | शाळा | विद्यार्थी. |
| सरकारी | ९ | ११८२ | ९ | ९९३ |
| लोकलबोर्ड | ३८८९ | २०७८२९ | ३८९२ | २१०८२६ |
| म्यु. कमेट्या | ५४७ | ६३८९४ | ५५१० | ६१४२९ |
| संस्थानें | २०९१ | १३३४५ | २११८ | १२५५०१ |
| मदत मिळते अशा | १७३५ | ७०१८५ | १७८६ | ६७५०७ |
| मदत न घेणाऱ्या | ९६ | ३५७८ | ९६, | ३७१७ |
| | ८३६७ | ४६००१२ | ८४९२ | ४६५१७३ |

वरील आंकड्यांचा विचार केला म्हणजे गतवर्षी प्राथमिक शिक्षणाचें पाऊल जरासें मागें पडलें आहे असें दिसून येईल. या गोष्टीबद्दल आश्चर्य मानण्याचें मुळींच कारण नाहीं. प्लेग, दुष्काळ यांसारखीं राष्ट्रीय संकटें दारांत उभीं असतांना राष्ट्राची सर्वच गोष्टींत पिच्छेहाट होणार. व्यापार मंदावला म्हणून व्यापारी ओरडणार, पिकें बुडालीं म्हणून शेतकरी कपाळाला हात लावणार, तिजोरींत जमा व्हावी तशी न झाल्यामुळें व राष्ट्राच्या हिताची सर्व जबाबदारी आपल्यावर आहे व त्याकरितां आपण अश्रांत श्रम केले पाहिजेत ही गोष्ट सारखी नजरेसमोर असल्यामुळें सरकारचेंही मन अस्वस्थ रहाणार. अशा स्थितींत निरुपद्रवी शाळाखातेंच अपवादाच्या यादींत कसें असावें ? तरी पण सर्व भयाण स्थिति डोळ्यांसमोर ठेऊनही शाळाखात्याकडे दृष्टी फेंकिली म्हणजे शिक्षणाच्या बाबींत झालेलें नुकसान फार आहे असें म्हणतां येणार नाहीं.

मध्यभागांत तीनच शाळा कमी झाल्या पण मुलांची संख्या फारच कमी झालेली आढळून येईल. याचें मुख्य कारण दुष्काळ हें होय.

सोलापूर जिल्ह्यांत पुष्कळ शिक्षक कमी करावे लागले व पुष्कळांना दुष्काळाच्या कामावर पाठवावें लागलें. अहमदनगर जिल्ह्यापैकीं दुष्काळामुळें सात शाळा बंद करणें भाग पडलें.

मि. प्रायर मध्यभागचे ए. इन्स्पेक्टर हे पुणें व सातारा या दोन जिल्ह्यांतून शाळा पाहून आले. त्यांनीं दिलेल्या अभिप्रायांत बऱ्याच गोष्टी महत्वाच्या आहेत. साहेबांची स्वारी सासवड, परिंचें, लोणद यांवरून साताऱ्यास गेली. यामुळें पुरंदर, वाई, सातारा, कऱ्हाड, व हवेली तालुक्यांतील पुष्कळ शाळा व फलटण संस्थानांतील शाळा त्यांस तपासण्यास मिळाल्या म्युनिसिपल स्कूलस अशीं दोनच ठिकाणचीं पाहिलीं. एक सातारा व दुसरें रहिमतपूर. साताऱ्याच्या शाळांची स्थिती बरी आहे. तथापि प्लेगच्या खर्चाखालीं म्युनिसिपालिटी इतकी दडपून गेली आहे कीं मोठ्या व महत्वाच्या शाळेच्या हेडमास्तरचा पगार काय तो ३५ च रु. आहे. राजवाड्यांतील शाळेचें छप्पर मोडकळीस आलें असून तें दुरुस्त करण्यास कमिटीस सामर्थ्य नाहीं. रहिमतपूरची शाळा चांगली चालली आहे. तेथील छोटेखानी म्युनिसिपालिटीच्या सुदैवानें हुषार, तरूण व मेहनती असे हेडमास्तर तिला लाभले आहेत. मात्र जागा फार दाटीची आहे व अ. मास्तरचे पगार फार थोडे आहेत. जेजुरी व त्रिंबक येथील म्युनिसिपालिट्यांपाशीं आतां मुळींच त्राण उरलेलें नाहीं आणि दुसऱ्या इतर लहान लहान म्युनिसिपालिट्यांचे दारिद्र्याकडे लक्ष पुरविलें म्हणजे लोकल फंडमधून या शाळा चांगल्या चालतील असें वाटतें. सासवडची शाळा प्लेगमुळें बंदच होती व जेजूरी येथील म्युनिसिपालिटीचें दिवाळें वाजल्यामुळें तेथील शाळा अजीच बंद झाली आहे.

बालबोध शाळांपैकीं मोहन ता० सातारा, मसूर ता० कऱ्हाड, भुंज ता० वाई व किकवी ता० पुरंदर, या शाळा फारच उत्तम तऱ्हेनें चालल्या आहेत. पैकीं किकवी येथील शाळा तर एका मराठ्याच्या ताब्यांत आहे. मोडी इयत्तांचा व्हावा तसा प्रसार झालेला दिसत नाहीं. वाई ता. खंडाळा

येथें एक अशी शाळा आहे. तींत सर्व इयत्ता शिकवितात, व ती फारच उत्तम तऱ्हेनें चालली आहे. महत्वाकांक्षी ब्राम्हण व व्यापारीलोक हे बालबोध यत्ताच पाहिजेत असें आपल्या ग्रामस्थ बंधूंच्या मनांत भरवीत असतात. आम्हीं मागें यत्तांच्या संबंधानें लिहितांना मोडी इयत्ता या लोकप्रिय नाहींत, असें म्हटलें होतें, त्यांचें हें एक उत्तम प्रमाण आहे. बाकी इन्स्पेक्टर साहेब म्हणतात त्याप्रमाणें ब्राम्हण लोक इतरांचे 'मनांत मुद्दाम भरवितात,' हें म्हणणें योग्य दिसत नाहीं. त्यांचें अनुकरण इतर लोक करितात एवढें मात्र खरें.

सातारा जिल्ह्यातील शाळांत हलक्याजातींचीं मुलें दिसून आलीं नाहींत व याला कारण दुष्काळ हें सांगण्यांत आलें. परंतु हजेरी बुकें पाहतां दुष्काळ नसतांना सुद्धां अशीच स्थिती होती असें आढळून आलें. ही स्थिती डे० इन्स्पेक्टरांच्या नजरेस आणून दिलेली आहे; व कलेक्टरसाहेबांस या गोष्टींचें महत्व त्यांच्या हाताखालील कामगारांनीं ग्रामस्थ लोकांस समजावून सांगावें म्हणून विनंती करण्याचें ठरलें आहे.

जाम ता० वाई येथील शाळामास्तरनें प्लेगच्या कामीं चांगली मदत केली होती. त्यास बढती देण्याची तजवीज झाली आहे.

प्लेग व दुष्काळ यांमुळें कसे हाल सोसावे लागतात याचें साहेबांनीं एक हृदयद्रावक उदाहरण दिलें आहे. साहेब बिचुकलें ता० कोरेगांव येथील शाळा पाहण्यास गेले होते व शाळेंत गोंधळ चालला होता. मास्तर शाळेंत हजर नव्हते. तेथून एक मैलावर तलियें नांवाच्या गांवीं तेथील मास्तरची शुश्रूषा करण्यास ते गेले होते. साहेबही त्या गांवीं गेले. तेथील वृद्ध व मान्य हेडमास्तरावर आलेला प्रसंग त्यांच्या नजरेस पडला. बिचाऱ्याच्या डोक्यास मोठी जखम झाली होती. कांहीं महिन्यापूर्वीं त्यानें आपलीं मुलें माणसें प्लेगमुळें कोरेगांव येथें पाठविलीं होतीं, व साहेब तेथें गेले त्याच्या आदल्या दिवशीं मास्तर आपल्या मुलांमाणसांस भेटावयास गेले होते. तिकडून परत येतांना वाटेंत खिंडींत एक खूब मोठा दगड त्यांच्या डोक्यांत बसला, व त्यानें ते खालीं बसले. हें कृत्य दुष्काळानें पीडित अशा माणसाच्या हातून झालेलें असावें. कांहीं वेळानें त्यांजपाशीं पैसे वगैरे जें सांपडलें तें सर्व घेऊन तो माणूस

पळून गेला. या मास्तरांची त्यांच्या सोईकरितां पुढें कोरेगांव येथें बदली करण्यांत आली, व तेथें ते आतां सुखानें रहात असतील अशी आशा आहे.

सातार जिल्ह्यांत रजिष्टर झालेल्या शाळा दिसून आल्या नाहींत. यावरून सरकार खासगी शाळांस मदत देतें ही गोष्ट तिकडे चांगलीशी प्रसिद्ध झालेली दिसत नाहीं. साहेबांच्या आगमनानें पुष्कळ मास्तर लोकांस कांहीं थोडें तरी प्रमोशन आपल्यास मिळेल असें वाटूं लागलें होतें व या ठिकाणीं बऱ्याच मास्तरलोकांनीं प्रमोशनबद्दल साहेबास विनंती केली. पण डेप्युटी इ. यांजकडून या बाबतींत पूर्वीच योग्य तजवीज झाली होती असें साहेबांचे नजरेस आलें. कांहीं थोड्या गोष्टींत, मुख्यत्वेंकरून पुष्कळ नोकरी झालेल्या अशा अनट्रेन्ड लोकांस-योग्यता पाहून प्रमोशन देण्याची शिफारस झाली. पुष्कळ कमी पगाराचे लोकांनीं भत्त्याबद्दल गोष्ट काढली. पण या गोष्टीचा अद्याप विचार व्हावयाचा आहे.

शाळांच्या इमारतींचे कामांत पाहिजे तितकें लक्ष पोंचत नाहीं व या बाबतींत ठिकठिकाणच्या ग्रामस्थांकडून मिळावी तितकी मदत मिळत नाहीं. याचें एक साहेबांनीं उदाहरण दिलें आहे तें लक्षांत घेण्यासारखें आहे. पाडळी ता. सातारा येथील शाळेस इमारतीची फारच जरूर आहे. ग्रामस्थ लोकांस विचारतां १०० रुपयांपर्यंत आपण मदत करूं असें म्हणाले. याच गावांत एका मोठ्या देवळाचे काम चाललेलें साहेबांच्या दृष्टीस पडलें. प्रथम साहेबांस वाटलें कीं येथीलच मुंबईला वगैरे जाऊन पैसा कमावून आलेल्या एखाद्या श्रीमान गृहस्थाचें नांव देवळाच्या बाबतींत पुढें येईल. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं याकामीं खर्च होणारे २००० रुपये ग्रामस्थानींच वर्गणीनें गोळा केले होते !

उत्तर भागांतही शाळांचें व मुलांचें मान बरेंच कमी झालेलें आहे व याचें मुख्य कारण दुष्काळ. कांहीं ठिकाणीं प्लेगही कारण झालेला आहे. या भागांत मोडी यत्तांचा मात्र प्रसार अधिक होत आहे असें दिसून येतें.

दक्षिण भागांत शाळा तीन कमी झाल्या, पण विद्यार्थ्यांची संख्या बरीच जास्त झाली. ही वाढ बहुतेक धारवाड जिल्ह्यांत झालेली आहे. कानडा, रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यांतील संख्या कमी झालेली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यांत संख्या कमी झाली याचें कारण प्लेग हें होय. लोकल-बोर्डाची पैशासंबंधी स्थिती फार शोचनीय झाली आहे. हल्लीं आहेत त्याच शाळा उत्तम तऱ्हेनें चालविण्याची मारामार पडूं लागली आहे. अशा स्थितींत नवीन शाळा काढणें मुळींच शक्य नाहीं.

सिंध प्रांतांत एक शाळा जास्त झाली व विद्यार्थ्यांची संख्या२९३ नीं वाढली. शिकारपूर डि. लो. बोर्डनें शाळाखात्यानें ठरविलेल्या दराप्रमाणें फी वसूल करण्याची सुरवात केल्यामुळें फीचें उत्पन्न वाढलें आहे. शिकारपूर जिल्ह्यांत परठिकाणचे लोकांकरीतां म्हणून बोर्डिंगची पद्धत चांगल्या तऱ्हेनें चालली आहे. तेथें १४ शाळा असून बाहेर गांवचे असे ३७० विद्यार्थी शिकत आहेत. त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था तेथील जमीनदार व शाळामास्तर हे कारितात. ही व्यवस्था कधीं कधीं फुकट व कधीं कधीं विद्यार्थ्यांच्या नातेवाईकांकडून खाण्याचा खर्च घेऊन केली जाते. असें म्हणतात कीं ज्या ठिकाणच्या हेड-मास्तराची कीर्ति फार त्या ठिकाणीं बाहेर गांवच्या मुलांचा फार भरणा होतो.

**म्युनिसिपल् शाळा.**—मध्यभागांत शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या बरीच कमी झाली. याला कारणें म्हणजे कमिट्यांची दारिद्रावस्था, प्लेग दुष्काळ, वगैरे होत. मुंबई शहरांत विद्यार्थ्यांची संख्या बरीच वाढली आहे. याचें कारण लोक प्लेग असून सुद्धां पळाले नाहींत. येथील उर्दू शाळांतून ट्रेन्ड शिक्षक नाहींत, यांबद्दल उर्दू शाळांचें डेप्यूटीनीं दिलगिरी प्रदर्शित केली आहे.

अॅक्टिंग इन्स्पेक्टर साहेब यानीं पुणें जिल्ह्यांतील बारामती व शिरूर येथील शाळांची फार शिफारस केली आहे. ते म्हणतात कीं या ठिकाणच्या म्युनिसिपालिट्या शाळांची स्थिती उत्तम राहावी म्हणून जरूर अशा खर्चाच्या बाबींत कधींही कसूर करीत नाहींत. पण पंढरपूर म्युनिसिपाटीची स्थिती अगदीं उलट आहे. हिची खटपट कमी पगाराचे व (अर्थात्) गैरहुषार शिक्षक पैदा करण्याकरितां चालते. व्यायामशिक्षणाच्या बाबतींत तर पंढरपूर कमेटी अगदींच बेफिकीर आहे. म्युनिसिपालिट्यांची नेहमींचीच प्रवृत्ती शिक्षणाकडे काटकसर करण्याची असते.

उत्तरभागांत म्युनिसिपल् शाळांची व मुलांची संख्या जरी वाढलेली दिसते

तरी तिला वाढ न म्हणतां थोडीशी सुधारणा असेंच म्हणणें बरें. कारण ही संख्या म्हणजे १८९६–९७सालांत असलेल्या संख्येपेक्षां अजून फारच कमी आहे. अमदाबाद बोर्डाची एल. एम्. वाडिया अध्यक्ष असतांना असलेल्या शिक्षणव्यवस्थेबद्दल इन्स्पेक्टर यांनीं फार स्तुती केली आहे. सुरतच्या म्युनिसिपल शाळांचेंही काम इन्स्पेक्टर साहेबांस पसंत पडलें. भडोच, विरमगांव व धोलका या ठिकाणची व्यवस्था वाईट आहे असें त्यांचें म्हणणें पडतें. विरमगांव व धोलका येथील बोर्डें तर शाळाखात्याच्या सूचनांकडे अगदीं दुर्लक्ष करितात असा त्यांजवर आरोप आहे.

दक्षिण भागांतील म्युनिसिपल् शाळांची संख्या आहे तीच असून विद्यार्थ्यांची संख्या वाढलेली आहे. कांहीं ठिकाणच्या शाळा प्लेगमुळें पुष्कळ दिवस बंद ठेवाव्या लागल्या होत्या. बेळगांव येथील शाळांची तर पुरीच दैना उडाली. एकंदरींत दक्षिणभागांतील म्युनिसिपल शाळांची व्यवस्था चांगल्या प्रकारें चालली. इमारतीही चांगल्या आहेत. मात्र कांहीं गांवांत मोठ्या पगाराच्या जागा कमी करून त्या जागांवर कमिटींत जो पक्ष बळावलेला असेल त्या पक्षाच्या मर्जींतील कमी दर्जाच्या माणसांची योजना करण्याची प्रवृत्ती दिसून येते. कमीटींत दुसराच पक्ष बळावला म्हणजे ज्यांना अगोदर गैरवाजवी प्रमोशन मिळालेलें असतें, असे शिक्षक परत नेण्याबद्दल सरकाराकडे विनंती होते, असे इन्स्पेक्टरांचे अभिप्राय आहेत.

सिंधमधील शाळांची संख्या कायम असून विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. **कराची** व **हैद्राबाद** येथें प्लेग उद्भवला होता. ॲक्टिंग इन्स्पेक्टरांचा कमेट्यांच्या शाळांबद्दल अभिप्राय चांगला आहे. कांहीं कांहीं गांवांतून शाळागृहांबद्दल कुरकूर राहिली आहे. पण तूर्त सरकारची व कमेट्यांची स्थिती समाधानकारक नसल्यामुळें या गोष्टीस इलाज नाहीं. रोहरी व कांबर येथील शाळांची तारीफ केली आहे.

**संस्थानें.** संस्थानांनीं चालविलेल्या शाळांची संख्या व विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे. हा प्रकार विशेषतः उत्तर भाग व कांठेवाड यांत दिसून येतो. मोठी इयत्तांच्या शाळांची संख्या कमी झाली आहे व याचें मुख्य

कारण दुष्काळामुळें पुष्कळ लोक गांवें सोडून गेले हें होय. चांगले दिवस येतांच शिक्षणाची सरशी होते असा नेहमींचा अनुभव आहे.

मध्यभागांत शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. यांतील बरीच वाढ अक्कलकोट संस्थानाचें वांट्यास येईल. परंतु सर्व संस्थानांत थोडी बहुत वाढ आहेच. भोरसंस्थानच्या शाळांची स्थिती असमाधानकारक आहे. डे० इन्स्पेक्टर जिल्हा पुणें यांनीं तपासलेल्या पंधरा शाळांत एकही ट्रेन्ड् शिक्षक नाहीं. कुलाब्याच्या डेप्यूटींचें हेंच म्हणणें आहे. कांहीं शाळा तर देवळांतूनच आहेत. पाली येथील शाळेची इमारत धोक्याची आहे.

अक्कलकोट संस्थानांत झालेल्या वाढीचें कारण तेथें प्लेग नव्हता व त्यामुळें परगांवच्या लोकांचा फार भरणा झाला हें होय. संस्थानच्या शाळांतून शिक्षण चांगल्या तऱ्हेचें मिळत नाहीं. सर्व यत्ता कोठेंच शिकविल्या जात नाहींत. ट्रेंड् शिक्षकांचा पुरा अभाव आहे. व्यायाम शिक्षणावर बरेंच दुर्लक्ष असतें. सुरगान जि. नासिक येथील शाळेच्यासंबंधानें चांगला अभिप्राय आला आहे. मध्यभागचे अॅक्टिंग इस्पेक्टरचें म्हणणें असें आहे कीं एकंदरींत संस्थानच्या शाळांची स्थिती वाईट आहे. अधिकाऱ्यांचें लक्ष शाळांच्या संख्येकडे असतें. पुष्कळ वाईट शाळांपेक्षां थोड्याच पण चांगल्या शाळा असणें फार चांगलें. ट्रेनिंग कालेजांतून लोक तयार करून आणण्याची संस्थानांनीं अवश्य तजवीज केली पाहीजे.

उत्तर भागांतील संस्थानच्या शाळांची संख्या वाढली आहे. पण विद्यार्थ्यांची संख्या फार कमी झाली आहे. याचें कारण बऱ्याच संस्थानांतील दुष्काळ हें होय. हल्लींची स्थिती लक्षांत घेतली तर एकदरींत उत्तर भागांतील संस्थानच्या शाळा चांगल्या दिवसांत खालसा इलाख्यांतील शाळांची बरोबरी करितील.

दक्षिण भागांतील शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे. कोल्हापूर, सांगली, जमखिंडी, मिरज, जंजिरा व मुधोळ या संस्थानांतून ट्रेन्ड् शिक्षकांची योजना केलेली आहे. मात्र सावंतवाडी संस्थानांतील ९४ शाळांमि

ळून ट्रेन्ड् शिक्षक काय तो एकच आहे।"एकंदरींत बऱ्याच संस्थानांत शाळा गृहें चांगलीं आढळून आलीं. परंतु मिरजच्या आजुबाजूच्या खेड्यांतील कांहीं शाळा, कुरुंदवाड, जत व इचलकरंजी वगैरे पैकीं बऱ्याच शाळा यांस इमारतीचीं अगदीच गैरसोय आहे. शिवाय शिक्षक गैरहुषार व फारच कमी पगाराचे असून शाळांचीं स्थिती वाईट आहे."

सिंधेंत खैरपूर संस्थानांत शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे यावरून या संस्थानांत शिक्षणाची अभिरुची वाढत आहे.

**सरकारांतून मदत मिळते अशा शाळा**—या प्रकारच्या शाळांची संख्या ९१ नीं कमी झाली आहे पण विद्यार्थ्यांच्या संख्येत बरीच भर पडली आहे. उत्तरभाग, मध्यभाग व दक्षिणभाग या तिन्ही भागांत या शाळांची संख्या कमी झालेली आहे. यापैकीं बऱ्याच शाळा मिशनरींनीं चालविलेल्या आहेत, त्यांची व्यवस्था बरी आहे. नातूंची पंढरपूर येथील शाळा हननबेगयांची वालसंग येथील शाळा, सोलापूर येथील अमेरिकन मिशनरी शाळा, त्याप्रमाणेंच राहुरी, वडाळें, सोनाई, कोळेगांव, केंडाळ येथील मिशनस्कुलें व अहमदनगर येथील ख्रिश्चियन व्हर्नाक्यूलर सोसायटीचें मॉडेल स्कूल या शाळांची शिफारस झाली आहे. सिंधप्रांतांत शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे; व त्या प्रांतात या शाळांची स्थिती हळू हळू सुधारत चालली आहे.

**नाइट्स्कूलस अथवा रात्रीच्या शाळा.**—याही शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या बरीच कमी झाली आहे. काठेवाडांत तर ही संख्या फारच कमी झालेली आहे. प्लेग व दुष्काळ यांमुळें कोणत्याही गोष्टीस हल्लीं कायमपणा नाहीं; अशा स्थितींत या शाळांचें पाऊल मागें पडलें यांत आश्चर्य नाहीं. मि० कॉव्हर्नटन् अ. इन्स्पेक्टर यांचें म्हणणें असें आहे कीं जरी या शाळांची व्यवस्था बरी आहे तरी ती असावी तशी नाहीं. त्यांच्या मतें

असल्या शाळांचा पुष्कळ उपयोग म्हणजे शहरांतील कारागीर गिरणीं-तील मजूर वगैरे लोकांना झाला पाहिजे व या शाळांचा फायदा घेण्याचें मजूर लोकांचे मनांत येण्यास त्या शाळांची स्थिती सुधारली पाहिजे. हें काम चांगल्या देखरेखीचें व कळकळीचें आहे. हें आस्थेवाईक व मेहनती स्कूल कमिट्यांनीं मनावर घेतल्यास सहज होईल. हें सरकाराकडून होणें अशक्य आहे.

**रजिष्टर न झालेल्या शाळा.**—या शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे. या शाळांतून व्यवहारीक शिक्षण मुळींच मिळत नाहीं, असा अक्टिंग इन्स्पेक्टरचा अभिप्राय आहे. त्यांची अशी सूचना आहे कीं सरकारानें या शाळांच्या व्यवस्थापकांस आपल्या शाळा रजिष्टर करून घेण्यास लावावें, कॉन्हर्नेटन् यांच्या रिपोर्टामध्यें आणखी एक त्यांनीं महत्वाची सूचना केली आहे. तींतील आशय असा आहे कीं दारूच्या गुत्त्यांना सरकारचा परवाना लागत असतो, पण बिन परवा-न्यावांचून काढलेल्या या शिक्षणगुत्त्यांकडे सरकार अगदींच काना-डोळा करतें. वास्तविक पहातां अशा गुत्त्यांपासून किती अनहित होत आहे याची कल्पनाच करणें कठीण. या शाळांत लहानपणीं जाणारीं पुष्कळ मुलें अगदीं बिघडून जातात.

## रेव्हिन्यू आफिसरांचे शेऱ्यांपैकीं कांहीं महत्वाचे उतारे.

मि. के. आर. बोमनजी. कले. रत्नागिरी.—"शाळांत शिकत असलेल्या मागसलेल्या मुलांची संख्या जराशी कमी झाली आहे........अशा मुलांच्या सोईकरीतां मालवण येथें लोकलबोर्डाचा एकच वर्ग आहे." मागसलेल्या लोकांची आजपर्यंत नीट काळजी घेतलेली नाहीं असें मला वाटतें. १८९१ च्या खानेसुमारीवरून जिल्ह्यांत शेकडा ८.०६ इतके महार आहेत. असें असून सर्व जिल्ह्यांत या जातीचे विद्यार्थी कायते ६२ च आहेत. ही संख्या इतकी सुक्ष्म आहे कीं, या लोकांस मुळींच शिक्षण मिळत नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं.

"गेल्या फेब्रुआरींत मीं ही गोष्ट डायरेक्टर साहेबांच्या नजरेस, आणिली होती. त्यांत हलक्या जातीच्या विद्यार्थ्यांस स्कालरशिपा देण्या-करितां प्रतिवर्षी कांहीं तरी रक्कम खर्च करावी, व नंतर अशातऱ्हेनें तयार झालेल्या विद्यार्थ्यांचा शिक्षक म्हणून उपयोग करावा अशी सूचना केली होती. आनंदाची गोष्ट कीं अशा प्रकारच्या दरमहा २ रुपये प्रमाणें १० स्कालरशिपा देण्याची मंजुरी मिळाली आहे.

औद्योगिक शाळा अशी एकच रत्नागिरीस आहे. तेथें सुतारकाम, टेबलें, पेट्या करणें, लांकडावर खोदींव नकशी वगैरे शिकविण्याची सोय आहे. ५ यत्तापर्यंत प्राथमिक शिकण दिलें जातें. मात्र कांहीं विषय कमी करून ड्राइंग हा विषय शिकविला जातो. या शाळेंत गुदस्त सालीं मुलांची संख्या २४९ असून हल्लीं २६९ आहे. फी वगैरे कांहीं नाहीं, उलट विद्यार्थ्यांस त्यांच्या यत्तेप्रमाणें दरमहा कांहीं पगार मिळतो. याच पद्धतीवर दापोली तालुक्यांत वनकवली येथें डा. विश्राम रामजी घोले यांच्या आश्रयानें शाळा सुरू झाली आहे. तीकरितां इमारत बांधण्याची व्यवस्था सुरू आहे."

**मि० जे. घोसाळ, असि० कले० कुलाबा**........"मी. मुलींच्या शाळा पाहिल्या पण त्यांची व्यवस्था समाधानकारक वाटली नाहीं, ज्या शाळेंत नवराबायको शिक्षक असावयाचीं अशी पद्धत आहे. अशा प्रकारची एक शाळा मी एकदां पहाण्यास गेलो होतों. मुली इतका गोंधळ करीत होत्या कीं मी आलो हें कोणालाच कळलें नाहीं. सुट्टीचा जरी तास नव्हता तरी मुली खेळ खेळत होत्या. मास्तर व मास्तरीण यांची थट्टामस्करी चालली होती! मास्तरीणबाई बटाटे सोलीत बसल्या होत्या. टोपलींतील बटाटे चुलीवर टाकण्यास योग्य झाले होते. यावरून माझी तर खात्री झाली कीं मास्तरीणबाई हेंच काम सकाळपासून करीत होत्या. मुलींच्या शाळांत शिवणकाम जेव्हां जेव्हां मागावें तेव्हां तेव्हां पुरें झालेलें काम पुढें करतात. मुलींच्या हातांत प्रत्यक्ष काम चाललें आहे असें चुकून सुद्धां पाहाण्यास सांपडत नाहीं."

ठेवावें; असा मुलांस बोध करावा. तसेंच शाळा सुटतानांही रांगेनें मुलें उभीं करून त्यांस आपल्याबरोबर शाळेच्या दारापर्यंत न्यावें; आणि आपण उभे राहून तीं स्वस्थपणानें घाई न करितां जात आहेत किंवा कसें, इकडे लक्ष्य ठेवावें, कोणी दांडगाई किंवा दुसरे चार करील किंवा एकदम मुसंडी मारून बाहेर पडण्याचा यत्न करील, तर त्यास बोलावून सर्वांचे शेवटीं सोडावें. प्रसंगीं अधिक शिक्षाही करावी.

(२) आपल्या लोकांत एक मोठी निंद्य चाल आहे, ती शपथ वाहण्याची आणि अपशब्द बोलण्याची. वयस्कर पुरुष, आणि खालच्या जातींतल्या बायका आणा वाहतांना व घाणेरे शब्द उच्चारतांना आपण किती ऐकतों ! 'देवाच्यान्' 'तुमच्या गळ्याच्यान्' वगैरे शपथा घेऊन बोलणें हें कांहीं धर्मांमध्यें तर मोठें पाप गणलें आहे. पण तसें जरी नसलें तरी कोणतीही गोष्ट शपथपूर्वक सांगण्याची जरूरी असणें म्हणजे आपल्या नुसत्या बोलण्यावर ऐकणराचा बिलकुल भरंवसा नाहीं, असें व्यक्त करणेंच होत नाहीं काय? जातां येतां किरकोळ कामांतही जर शपथ घेतल्याविना आपल्यावर लोक विश्वास ठेवीत नाहींत, तर मोठ्या प्रसंगीं आपलें वचन प्रमाण कोण मानील? हा विचार मनांत आणून शपथ वाहून सांगण्या ऐवजीं खरें बोलण्याचीच वहिवाट घालावी. आणि आणाशपथांचा प्रकार अगदीं बंद करावा. शपथ घेऊन मुलें तुम्हांस कांहीं सांगूं लागलीं असतां त्याबद्दल नाखुशी दाखवून खरें असेल, तेंच तुम्ही सांगा, शपथ घेण्याची अवश्यकता नाहीं; असें त्यांस बोलून आणा वाहण्याचें बिलकुल मना करावें. आपण नुसतें बोलूं त्यावरच दुसऱ्यानें बिनदिक्कत विश्वास ठेवावा, शपथ वाहण्याचा प्रसंग येणें म्हणजे शरमेची गोष्ट, अशा प्रकारचा अभिमान मुलांत उत्पन्न करावा; आणि खोटी शपथ घेणें तर महापातक अशी त्यांची खातरी करावी. तसेंच हलकट, व दुसऱ्याचे जिव्हाळीं लागणारे अपशब्द सहजीं उच्चारण्याची खोड बहुतांस असते, ती ही फारच वाईट. बायकांदेखत असे अपशब्द वापरणें तर अत्यंत लज्जास्पद होय. याकरितां अशा शिव्या

वगैरे अपशब्दाचें बीजच शाळेंतून नाहींसें करावें. असे शब्द उच्चारणें हें मर्दपणाचें काम नाहीं, कोणीं अपकार केल्यास त्याचा प्रतिकार करणें तो योग्य मार्गानें करावा, पण शिव्या देणें नामर्दपणाचें काम आहे, अशी बुद्धी मुलांमध्यें उत्पन्न करावी. आणि अपशब्द वापरणाऱ्या मुलांस कडक शिक्षा करावी. दुसरी एक गोष्ट अशी आहे, कीं एकाद्यामध्यें कांहीं व्यंग असल्यास तें काढून किंवा कोणाचे घरचा कांहीं अपमानास्पद प्रकार असल्यास त्याबद्दल बोलून दुसऱ्यास चिडविण्याचा मुलांचा स्वभाव असतो. हा मोडण्याचाही शिक्षकानें अवश्य यत्न करावा. यासाठीं कोणास कोणीं हसूं नये, असल्या गोष्टी वाचनाचे पुस्तकांतून आहेत.

( ३ ) भांडखोरपणा हा दुर्गुण आपल्या लोकांत विशेष दिसून येतो. लहान सहान गोष्टीवरून एकमेकांशीं भांडावें, अशी अदत पुष्कळांस लागलेली नजरेस येते. ह्या भांडखोर स्वभावापासून फार नुकसानी होते. मनाचा थोरपणा थोडा जरी प्रदर्शित केला तरी देखील भांडणाचे प्रसंग बहुधा चुकतील, उभयपक्षांनीं थोडी थोडी सवलत केल्यास, थोडें थोडें नमतें घेतल्यास, वाद मिटेल, आणि त्यांत दोघांचेंही कल्याण होईल. दोन पक्षांपैकीं एकानें पडतें घेतल्यानें कोणचेंही भांडण तेव्हांच मिटतें. परंतु पडतें घेण्यांत कमीपणा आहे, अशी साधारणतः मनुष्याची समजूत असते. यासाठीं जेव्हां कांहीं नफा तोट्याचा विशेषसा संबंध नाहीं किंवा तसा संबंध असूनही जेव्हां वाद तुटत असेल, तेव्हां पडतें घेणें हा थोरपणाचा गुण आहे—किंबहुना हा ईश्वरी गुण आहे—असें लहानपणापासून मुलांचे मनांत बिंबविण्याचा यत्न करावा. एका पक्षानें थोडें पडतें घेतलें कीं दुसरा सहज तसें करितो. प्रसंग विशेषीं तसें त्यानें नाहीं केलें, तरी पहिल्या पक्षानें गम खाल्ली, त्यांत त्याचा थोरपणा उलटा जास्तच दिसून आला, असें मुलांना समजेसें करावें. ‘ तुटे वाद संवाद तो हीतकारी ’ हें समर्थांचें महावाक्य मुलांचे मनांत पक्कें ठसेल

असें करावें. अशा रीतीनें शिक्षकानें वारंवार उपदेश करून व त्याप्रमाणें प्रत्यक्ष तंटे मिटवून मुलांत हा दुर्गुण उत्पन्न होणार नाहीं असें करावें.

( ४ ) चवथी गोष्ट फार महत्वाची आहे. हिच्याकडे प्रत्येक शिक्षकानें जरूर लक्ष दिलें पाहिजे जातिभेद किंवा धर्मभेद मनांत न आणतां सर्वांनीं एकमेकांशीं सलूख्यानें वागावें यविषयीं कोणत्याही प्रसंगीं उपदेश करण्याचें, व त्याप्रमाणें आपण स्वतः वागण्याचें टाळूं नये. कुलाभिमान, जात्याभिमान, देशाभिमान हे गूण प्रत्येक व्यक्तींत जागृत असलेच पाहिजेत. अशा अभिमानाशिवाय मनुष्यांत किंवा राष्ट्रांत पाणीदारपणा आणि तरतरी कधींही उत्पन्न होणार नाहीं. पण प्रत्येक व्यक्तीस असा अभिमान असावा, ह्यावरूनच प्रत्येकाच्या अभिमानास कांहीं मर्यादा आहे, असें होतें. ती मर्यादा अर्थात् ही कीं, आपल्या अभिमानापासून दुसऱ्याच्या अभिमानास धक्का पोहोचूं नये. परधर्मीयास कमीपणा आहे असें मानून त्याचा अपमान करणें यांचें कारण फाजिल स्वाभिमान हें आहे. तेव्हां स्वाभिमान अंतःकरणांत असावा हें जरी खरें, तरी तो अमर्याद होतां कामा नये. मुलांचे मनांत असें भरवून द्यावें कीं आपणास आपल्या धर्माचा अभिमान जसा असतो, व तो बाळगण्याचा आपल्यास जसा हक्क आहे, तसा अभिमान दुसऱ्यास त्याच्या स्वतःच्या धर्माबद्दलही असतो, व तो मनांत बाळगण्याचा हक्क त्यासही आहे. स्वधर्म किंवा स्वजाती यांचा नुस्ता अभिमान बाळगण्यानें तंटे होत नसतात. तर तो अभिमान दुसऱ्याच्या अभिमानाच्या मर्यादेंत जेव्हां शिरूं पाहतो, तेव्हां तंट्यास कारण होतें. यासाठीं हा अभिमान प्रत्येकानें आपल्या पुरता बाळगून तो दुसऱ्यास चीढ येण्यास कारणीभूत होणार नाहीं असें वर्तन ठेवण्याचा कित्ता लहानपणींच घालून द्यावा. कोणतीही जात असो, कोणताही धर्म असो, त्या त्या जातींत आणि धर्मांत कांहीं विशिष्ट गूण असतातच. याकरितां त्या त्या विशिष्ट गुणांसाठीं, त्यात्या

कुळाची जातीची किंवा धर्माची प्रशंसा करणें. आणि त्या गुणांचा स्वीकार करणें, हें आपलें काम आहे. म्हणून 'हा काय कुणब्टा! यास काय येणार आहे ?' 'हा प्रत्यक्ष लोहार! ह्यानें ऐरणी घनाकडे वळावें.' 'अहो हा देशस्थ म्हणजे वेशिस्त?' अशा प्रकारचे उद्गार शिक्षकानें स्वतः कधींच काढूं नयेत. आणि कोणी मुलें अशा प्रकारें एकमेकांस हिणावूं लागल्यास त्यांसही वेळच्या वेळीं दाबून, विद्याही जातीवर किंवा धर्मावर अवलंबून नाहीं अशा प्रकारचीं उदाहरणें त्यांस सांगावीं. धान्याचें पीक होण्यास जशी देशविशेषाची जरूरी नाहीं, जमीन पाणी आणि मेहेनत हीं मिळालीं असतां धान्य पाहिजे त्या देशांत पिकतें, त्याचप्रमाणें विद्येचें आहे. तिचें जो परिशीलन करील तो कोणत्या का जातीचा असेना, त्यास ती प्राप्त होईल. हीन जातीचा मनुष्य असून तो केवळ आपल्या आंगच्या विद्येनें मोठें पद पावला, अशा प्रकारचीं कांहीं प्रसिद्ध उदाहरणें मुलांस गोष्टींच्या रूपानें सांगावीं. प्रख्यात ऋषी वाल्मीकी हा मुळचा वाल्याकोळी होता. प्रख्यात इंग्रज यंत्रकार आर्कराईट हा न्हाव्याचा मुलगा होता, असलीं उदाहरणें जमवून ठेवून त्यांचा योग्य वेळीं मुलांस सांगण्याकडे उपयोग करावा. तशींच उदाहरणें प्रत्यक्ष वर्गांतलीं ही दाखवावीं. पण तीं दाखवितांना मुलांचें मन दुखविलें जाणार नाहीं अशा खुबीनें दाखविलीं पाहिजेत. असो ह्या प्रकारें जातिमहत्वाचा प्रादुर्भाव होऊं लागला असतां किंवा जातीच्या उच्चनीचत्वाविषयीं वादविवाद निघाला असतां तो मोडून टाकावा. कधींही वाढूं देऊं नये. शिक्षक उच्च गणलेल्या वर्गांतील असल्यास त्यानें तर नीच मानलेल्या जातीशीं विशेष ममतेनें वागावें. आणि त्यास शिकण्याविषयीं उत्तेजन द्यावें. मनुष्य आपल्या धर्माप्रमाणें व जातीच्या चालीप्रमाणें वागत असला म्हणजे तो कोणच्याही धर्माचा असला तरी पूज्यच आहे, अशी आपल्या लोकांतली एक जुनी समजूत आहे. या समजुतीचा शिक्षकास पुष्कळ उपयोग करून घेतां येईल.

३४. प्रेमभाव म्हणजे दुसऱ्यावर ममता करणें, त्यांच्याशीं स्नेहानें वागणें. सदिच्छा, परोपकार, सद्बुद्धी वगैरे गोष्टी प्रेमभावाखालींच मोडतात. मुलांनीं एकमेकाशीं स्नेहानें वागावें, ममतेनें बोलावें, एकमेकाशीं सभ्यतेचीं वर्तणूक ठेवावी, उपकार करण्याचा प्रसंग आला असतां तो शक्त्यनुसार करावा; असा उपदेश मुलांस करून प्रसंगविशेषीं गरीब मुलांस कपडे किंवा पुस्तकें घेण्याच्या कामीं त्यांजकडून मदत करवावी. अशी प्रत्यक्ष उपकृती केल्यानें किंवा करविल्यानें परस्परांमध्यें प्रेमभाव वाढविण्यांत बहुत साहाय्य होतें. प्रत्यक्ष कृतीशिवाय कोरडा कळवळा काय कामाचा? त्यानें मन उलटें निष्ठुर मात्र होतें. गरीब मुलांस हलकी सलकी मदत करण्यास इतर मुलें नाखुष नसतात इतकेंच नव्हे, तर लहान मुलांना दुसऱ्यास देण्याची हौस फार असते, असें वारंवार दिसून येतें. दारीं भिकारी आला असतां थोडी बहुत भिक्षा घेऊन ती त्यास घालण्यास धावणारीं अथवा आपलें जुनें आंगडें देऊं काय, असें आग्रहानें आईस पुसणारीं मुलें पुष्कळांस आठवत असतील. तेव्हां मुलांमध्यें बीजरूपानें असलेला हा गुण शिक्षकास यत्नानें वाढवितां येईल. ह्याप्रमाणें मुलांमुलांमध्यें प्रेमभाव वृद्धिंगत करतां करतां मनुष्यमात्रावरही ह्याप्रमाणेंच प्रेम असावें अशी बुद्धी पुढें उत्पन्न करावी. प्रेमभावानें वागलें असतां आपल्या चित्तास समाधान होतें, दुसऱ्यास मदत होते. आणि परमेश्वराकडे असें सत्कृत्य रुजू होतें, ह्या गोष्टी उदाहरणें देऊन उघड कराव्या.

३५. स्त्रियांविषयीं पूज्यबुद्धी मुलांमध्यें उत्पन्न करावी. पूर्वी आपले लोक स्त्रियांस बहुत मान देत असत, असें मनुस्मृती, रामायण, भारत इत्यादि ग्रंथांवरून कळून येतें. मनूनें स्त्रियांस " गृहलक्ष्मी " असें म्हटलें आहे, आणि त्यांस संतुष्ट ठेवण्याविषयीं त्याचा आदेश आहे. ह्याकरितां स्त्रियांस एकेरी शब्दांनीं हाक न मारितां योग्य मान द्यावा. आणि हलकट बीभत्स शब्द त्यांच्या देखत तर कधींत उच्चारूं नयेत, असा उपदेश मुलांस करावा. आपल्या बहिणीस लिहिण्यास, वाचण्यास वगैरे शिकवि-

ण्याबद्दल, त्यांस उत्तेजन द्यावें. लहान किंवा मोठ्या बहिणी बरोबर भांडूं नये असें मुलांस निरंतर सांगत असावें. खालच्या खालच्या जातींत, आणि कोठें कोठें वरिष्ठ जातींतहि मुलें आपल्या आयाबहिणींशीं नीट वागत नाहींत. याचें कारण आयांचा जितका धाक त्यांवर असावा तितका नसतो. म्हणून भावाबहिणींचा संबंध काय, मायलेकरांचें नातें कसें, ह्या गोष्टी मुलांस समजून द्याव्या. बायकांची ममता स्वभावतःच पुत्रावर व व भावावर असते. त्याचप्रमाणें आपणहि त्यांजवर ममता करावी, आणि त्यांच्या उपयोगीं पडावें, असा बोध मुलांस वेळोवेळीं करावा. या गोष्टीच्या संबंधानें मुलांस शिक्षण देतांना शिक्षकानें एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. तीही, कीं आमच्या विचारी व थोर शास्त्रकारांनीं जरी शास्त्रांत लिहून ठेविलें आहे, तरी आमच्या लोकांत स्त्रियांस हलक्या मानण्याची चाल प्राचीनकाळापासून आहे, व तिचें बीज अंशतः शिक्षकाचे मनांतही रुजलेले असण्याचा संभव आहे. जेवढीं म्हणून दुर्गुणांचीं नांवें आहेत तेवढीं स्त्रीजातीवर ज्यांत लादलीं आहेत, असें अनेक संस्कृत श्लोक शिक्षकांना सुभाषितें म्हणून वाचलेले आठवत असतीलच. मराठी कवितेमध्यें संस्कृतांतून आलेलीं असलीं कवितारत्नें नाहींत ही मोठी सुभाग्याची गोष्ट होय! या संबंधानें कांहीं गैरसमज कोणाचे मनांत बिंबलेला असल्यास त्यानें एवढें ध्यानांत ठेवावें कीं ज्या स्त्रीजातीस कित्येक नीच पुरुषांनीं नीच म्हणून म्हटलें आहे, त्यांतली एक आपली जन्मदात्री आहे; एखाद्दुसरी तरी बहीण असेल; व एखादी धर्मपत्नी असेल. तेव्हां आपल्या मातेस, बहिणीस किंवा बायकोस वाईट म्हटलेलें जर आपणास यत्किंचितही खपत नाहीं, तर एकंदर स्त्रीजातीसही म्हटलेलें खपूं नये. अशा प्रकारें स्त्रियास योग्य मान देण्याचे संबंधानें शिक्षकानें प्रथमतः आपल्या मनास सुसंस्कार देऊन, मग असले विचार मुलांचे मनांत येणार नाहींत अशी तजवीज लहाणपणापासून करीत असण्याचा यत्न करावा.

३९. वर प्रेमभाव मनुष्यामात्रीं जागृत करावा, असें सांगितलें; याव-

रून इतर प्राण्याशीं आपण क्रूरपणानें वागावें असा समज होऊं देऊं नये. पशु, पक्षी, कीटक वगैरे मुक्या प्राण्यांच्या संबंधानें मुलें निष्ठुरतेनें वागूं लागल्याचें आढळांत आल्याबरोबर तसें वर्तन मना करावें. सरडे, बेडुक, वगैरे गरीब जीवांवर आणि बांधलेल्या जनावरांवर दगड किंवा काठी मारण्याची खोड कांहीं मुलांस असते. हें कर्म फार निर्दयपणाचें आहे, असें त्यांस समजून सांगावें. आणि पशुपक्ष्यादिकांवरहि प्रेम करणाऱ्या सज्जनांच्या गोष्टी सांगून त्यांस अशा क्रूरकर्मापासून निवृत्त करावें.

३७. साध्या व सुंदर वस्तूंविषयीं मुलांच्या मनांत आवड उत्पन्न करावी. वाचनाचे पुस्तकांतून अनेक पदार्थांचा उल्लेख येत असतो. ह्या पदार्थांची व तशा प्रकारच्या दुसऱ्या गोष्टींची माहिती कित्येक वेळां मुलांचे मनांत भरेशी वर्गांतल्या वर्गांत करून देणें कठीण पडेल. पण हीच माहिती मुलांना तो पदार्थ प्रत्यक्ष नेऊन दाखविला असतां प्रसंग विशेषीं शिक्षकानें तोंडांतून चकारशब्द न काढतांही होईल. डोंगर, पर्वत, झरा, दरी, नदीचा उगम, धबधबा, समुद्र, इत्यादिकांची माहिती वर्गांत त्या संबधानें कितीही सांगितलें तरी जशी होणें शक्य आहे, त्यापेक्षां ते पदार्थ प्रत्यक्ष दृष्टीस पडण्याची संधी असतां तीच माहिती अधिक चांगली होणें शक्य आहे, हें उघड आहे. तेव्हां असले पदार्थ प्रत्यक्ष दाखविण्याचे प्रसंग शिक्षकानें कधींही टाळूं नये. प्रत्यक्ष वस्तू दाखविल्यानें त्याचेच शिकविण्याचे श्रम कमी होतील. शनिवारीं रविवारीं शिक्षकानें मुलांस बरोबर घेऊन एखाद्या शेतांत, बागांत किंवा डोंगरावर जावें, आणि तेथें त्यांस शेतें, झाडें, फुलें आणि वनशोभा यांचा देखावा दाखवावा. आणि नानाप्रकारच्या पक्ष्यांचा मंजुळ ध्वनी त्यांजकडून ऐकवावा. आणि तेणेंकरून सृष्टिसौंदर्यापासून डोळ्यांना व कानांना विन खर्चानें जो आनंद होतो, तो करून घेण्यास शिकवावें.

३८. सर्वच शिक्षकांस गायनकला साधेल असें नाहीं. तथापि ज्यांस साधेल त्यांनीं यत्न करून ती कला शिकावी, आणि आपल्या मुलांस शिकवावी. नुस्ते श्लोक, आर्या, वगैरे चालीवर म्हणणें व म्हणावयास शि-

कविणें हें कांहीं कठीण नाहीं. ख्रिस्ती धर्माच्या लोकांच्या शाळेंत रोज नियमानें ईश्वरप्रार्थना होत असते, यामुळें त्या शाळेंतल्या मुलांस थोडें तरी गावयास शिकविण्याचा प्रसंग येतो. आपल्या शाळांतून शिक्षणामध्यें धर्माचा संबंध नसला तरी ईश्वरपर व नीतिपर पद्यें, जीं सर्व धर्मांतील लोकांस सारखींच मान्य होतील अशीं मुलांस शिकवून, तीं रोजच्या रोज शाळा सुरू झाल्याबरोबर सुस्वर व मंजूळ गायनाच्या रूपानें म्हणविण्याची चाल पडेल तर त्यांत वाईट नाहीं. त्यापासून उलट फायदाच होईल. गायनाच्या योगानें मनाचा कठोरपणा जाऊन त्यास कोमलता येते; आणि दुःखित मनाला विसावा मिळतो. भक्ती आणि गायन ह्यांचें साहचर्य प्रत्येक देशांत आणि प्रत्येक धर्मांत मानिलेलें दृष्टीस पडतें; त्याचें कारण तरी हेंच आहे. गायनानें वृत्ती शांत होऊन परमेशभक्तींत लीन होऊन जातात. आजपर्यंत झालेले देवाचे भक्त ह्यांजकडे पाहिलें असतां त्यांनीं गायनानेंच देवास आळविलें आहे, असें ध्यानांत येईल. व्यवहारांतही गायनापासून मोठी करमणूक होते. ह्या करमणुकींत मन गुंतविलें असतां त्याची प्रवृत्ती वाईट कल्पना आणि दुर्गुण ह्यांजकडे होण्याचें सहजच बंद पडतें.

---

सरकारी नोकरींतील कनिष्ठ प्रतींच्या जागा मिळण्यासंबंधानें सरकारांनीं केलेले नियम. सरकारी ठराव नंबर १८९३ ता. १४ माहे डिसेंबर सन १९००.

# जाहिरात.

विद्याखातें.

## नंबर १८९४ ता. १४ माहे डिसेंबर सन १९००.

### शेडयूल सी.

### थर्ड ग्रेड सर्टिफिकीटें.

खालीं परिक्षेचे दोन प्रकार दिले आहेत, त्यां पैकीं कोणत्याही प्रकाराखालीं दिलेल्या सर्व विषयांत पास होणाऱ्या उमेदवारांस थर्ड ग्रेड सर्टिफिकीट दिलें जाईल.

१

( परीक्षा इंग्रजी भाषेच्या द्वारें होईल. )

(१) अंकगणित पूर्ण, युक्लिडची भूमिति पुस्तक पहिलें; दुबेरजी जमाखर्चाची सामान्य माहिती.

(२) इंग्रजी गद्य ग्रंथांतील २५० पृष्ठें वाचणें व त्यांतील अर्थ सांगणें; व इंग्रजी कवितांच्या ७५० ओळींचा अर्थ सांगणें. (पुस्तकें एक वर्ष आगाऊ नेमण्यांत येतील. ) व्याकरण पूर्ण.

सरकारी किंवा व्यापारसंबंधी एकादें पत्र वाचणें व त्याचा अर्थ करणें.

(३) परीक्षकानें दिलेल्या विषयावर रिपोर्ट लिहिणें.

शुद्धलेखन, अक्षर व वर्णरचना

२

( परीक्षा मराठी, गुजराथी कानडी किंवा सिंधी ह्या भाषेच्या द्वारें होईल )

(१) अंकगणित पूर्ण, जमाखर्च, युक्लिडची भूमिति पुस्तक पहिलें.

(२) पहिल्या प्रतीच्या ( मराठी, गुजराथी कानडी किंवा सिंधी ) वाचन पुस्तकांतील गद्य धडे वाचणें व त्यांचा अर्थ करणें. व्याकरण पूर्ण. कविता ३०० ओळी पाठ करणें व त्यांचा अर्थ सांगणें.

हातानें स्वच्छ लिहिलेला (मराठी गुजराथी, कानडी किंवा सिंधी ) सरकारी कागद जलद वाचणें.

(३) परीक्षकानें दिलेल्या विषयावर ( मराठी गुजराथी, कानडी किंवा सिंधी ह्यांतील सफाइदार

| | |
|---|---|
| | रिपोर्ट लिहितांना अक्षराचें व-ळण, शब्द तोडून लिहिणें व विराम चिन्हें करणें,ह्यांकडे लक्ष देणें. |
| (४) हिंदुस्तानचा इतिहास पूर्ण; राज्यव्यवस्थेची ठोकळ माहिती. | (४) हिंदुस्तानचा इतिहास पूर्ण,राज्यव्यवस्थेची ठोकळ माहिती. |
| (५) जगाच्या भूगोलाची सामान्य माहिती व हिंदुस्तानच्या भूगोलाची विशेष माहिती. भूपृष्ठ विद्येचीं मूलतत्त्वें. | (५) जगाच्या इतिहासाची सामान्य माहिती. हिंदुस्तानच्या भूगोलाची विशेष माहिती. भूपृष्ठ-वि द्येचीं मूलतत्वें. |
| (६) आरोग्यविद्या. | (६) आरोग्यविद्या. |

महत्वमापन हा विषय ऐच्छिक आहे. वाटेल तर उमेदवारानें घ्यावा.

टीप—१. दुसऱ्या प्रकारांतील दुसऱ्या विषयाच्या ऐवजीं खालीं दिलेला विषय घेण्याची मोकळीक आहे:—

(२) मोडी किंवा बाळबोध वाचनाच्या पहिल्या प्रतीच्या वाचनपुस्तकांतील गद्य धडे व 'अखलाके-काशी' हें पुस्तक वाचणें व त्यांतील अर्थ सांगणें. उर्दू व्याकरण पूर्ण.

हातानें स्वच्छ लिहिलेलें (मोडी आणि उर्दू) पत्र जलद वाचणें.

„ —२. ज्या कचेरींतील काम उर्दू भाषेंत चालत असेल अशा कचेरींत नोकरी करूं इच्छिणाऱ्या उमेदवारानें मराठीच्या ऐवजीं उर्दू भाषेच्या द्वारें दुसऱ्या प्रकारांत सांगितलेली परीक्षा वाटेल तर द्यावी. 'अखलाके-काशी' हें वाचन पुस्तक नेमिलें आहे.

नामदार गव्हर्नर साहेब बहादूर दर इजलास ह्यांच्या हुकुमावरून.

J. DEC. ATKINS.
सेक्रेटरी गव्हर्नमेंट.

पुणें, एज्युकेशन इन्स्पेक्टर मध्यभाग यांचें आफीस, तारीख १२ मार्च सन १९०० इ०

J. G. Covernton.
आक्टिंग एज्युकेशनल इन्स्पेक्टर
मध्यभाग.

---

सृष्टचमत्कार—(१ल्या यत्तेकरितां) किं० ८= रा० का० ल० जोशी शनवार पेठ घर नंबर १९९ पुणें यांजकडे शेंकडा २५ कमिशनवर मिळतो.

## लिव्हिंग सर्टिफिकिटांत जास्त नमूद करण्याची माहिती.

खालील जाहीर नोटिस, मध्यभागांतील ज्या लोकांचा तिच्याशीं संबंध असेल त्या सर्वांच्या माहितीसाठीं व तिच्याअन्वयें वहिवाट ठेवण्यासाठीं प्रसिद्ध केली आहे.

पुणें एज्युकेशनल इन्स्पेक्टर मध्यभाग यांचें आफीस; ता. ३१ आगष्ट सन १९०० } J. G. Covernton. आ० ए० इ० मध्यभाग.

# जाहीर नोटिस.

या नोटिशी द्वारें असें जाहिर करण्यांत येतें कीं, एकंदर म्युनिसिपल व इतर मिडल स्कूलचे हेडमास्तर, लोकलबोर्ड शाळांतील अगर इतर प्राथमिक शिक्षणाच्या शाळांतील विद्यार्थी आपल्या शाळांत नवीन घेतेवेळीं पूर्वीच्या शाळेच्या हेडमास्तरच्या सहीचें जें लिव्हिंग सर्टिफिकिट घेत असतात त्या सर्टिफिकिटांत पूर्वीच्या शाळेंत मुलाचें नांव दाखल केल्याची तारीख, महिना व सन व ती शाळा सोडल्याची तारीख, महिना व सन अशा दोन्ही तारखा असल्या पाहिजेत; त्याचप्रमाणें पूर्वीच्या शाळेंत मुलाचें नांव दाखल करते वेळचें त्याचें वयही या सर्टिफिकिटांत दाखल केलेलें असलें पाहिजे. शिवाय या सर्टिफिकीटांतील वरील माहितीचे आंकडे शाळेंतील रजिष्टरांतील आंकड्यांबरहुकूम आहेत असाही शेरा सदर सर्टिफिकिटांत असला पाहिजे. तसेंच मुलाचें वर्तन अभ्यास व त्याजकडून सर्व फी वसूल झाली आहे या संबंधानें थोडक्यांत सदर सर्टिफिकिटांत शेरा असला पाहिजे.

२. लोकलबोर्ड शाळांचे, म्युनिसिपल शाळांचे व सरकारी ग्रँट मिळणाऱ्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळांचे हेडमास्तर, यांस या नोटिशी द्वारें अशी ताकीद देण्यांत येत आहे कीं, या आफिसाकडून गेलेल्या नंबर (सी. बी. ४२७९) ता० ७ आक्टोबर १८९२ च्या पत्रांत नमूद केलेला जो वयाचा दाखला (नमुना ED. ३३९ M. G.) त्याचा उपयोग त्यांनीं केला पाहिजे; व हा दाखला शाळेंत नवीन येणाऱ्या प्रत्येक मुलासाठीं भरून घेतला पाहिजे. जीं मुलें मिडलस्कुलांत जाण्या-

साठीं पूर्वीची शाळा सोडतात त्यांचे वयाचे दाखले या नोटिशींच्या पहिल्या पॅरिग्राफमध्यें सांगितलेल्या लिव्हिंग सर्टिफिकिटालगत पाठविले पाहिजेत.

J- G. Covernton-

आ॰ ए॰ इन्स्पेक्टर मध्यभाग.

---

## चित्रलेखन मूलतत्व ( पुस्तक पहिलें )

सतत पंचवीस वर्षे ड्रॉईंग शिकविण्याच्या अनुभवावरून ज्या ज्या गोष्टी विद्यार्थ्यांस प्रथम शिकविणें अवश्य वाटलें त्या सर्व शास्त्रीय नियमानें पद्धतशीर बसवून हें बूक तयार केलें आहे. पुस्तकाची किंमत प्रथम सहा आणे ठेविली होती परंतु कलेचें शिक्षण व अभिरुची आपले देशांत जितकी असावी तितकी नसल्या कारणानें व बुकाचा प्रसार फार व्हावा व विद्यार्थ्यांस हें बूक घेण्यास सुलभ जावें करितां याची किंमत अगदींच कमी म्हणजे फक्त अडीच आणे केली आहे. अशा तऱ्हेचें बूक हें मराठींत पहिलेंच आहे तेव्हां सर्वत्रांनीं या बुकाचा उपयोग करून घ्यावा अशी आमची शिफारस आहे.

हें बूक मे. विद्याखात्याचे डायरेक्टर सा. बा. यांनीं मराठी शाळाकरितां व मराठी शाळांचे लायब्रऱ्यांकरितां आपले मेमो नंबर ६०९४ तारीख १. १२. १९०० मध्यें पास केलें आहे. कळावें.

**दिनकर मोरेश्वर भाव्ये.**

ड्रॉईंगमास्तर हायस्कूल नाशिक.

ग्रंथकर्ता.

---

# बक्षिस. बक्षिस. बक्षिस

## त-रु-वाला.

फक्त २॥ रुपये भरून आमच्या "**कादंबरी कल्पद्रुमास**" होणाऱ्या ग्राहकांस फुकट. कल्पद्रुमाचे आठ अंक प्रसिद्ध झाले असून त्यांत "**कृष्णकांताचेंमृत्युपत्र**" ही सर्वोत्कृष्ट कादंबरी संपूर्ण झाली आहे. आमच्या ग्राहकांस वरील पुस्तक बक्षिस मिळून वर्षअखेर उत्कृष्ट बंगाली आणि हिंदी कादंबऱ्यांच्या भाषांतराचीं ६०० पृष्ठें संग्रह करावयास सांपडतील.

गणपती आळी—वांई· १·

कै० केरो लक्ष्मण छत्रेकृत

# अंकगणित

## भाग १।२।३

कै० केरो लक्ष्मण छत्रे यांचे चि० रावसाहेब निळकंठ विनायक छत्रे यांनीं पूर्वीच्या अंकगणितांत हल्लीं पुष्कळ सुधरणा करून नवीन आवृत्ती छापविल्या आहेत व ठिकठिकाणीं जास्त उदाहरणें व व्याख्याही दिल्या आहेत. पूर्वी दुसरा भाग होता त्याचे हल्लीं दोन भाग केले आहेत. म्हणजे एकंदर ३ भाग झाले आहेत. भाग पहिला किंमत ०≡॥. भाग दुसरा किं० ।=. व तिसरा भाग लवकरच छांपून प्रसिद्ध होईल. शाळामास्तरांस कमिशन मुबलक मिळेल.

म्यानेजर चिं० शा० प्रे० पुणें.

---

# रंगीत सचित्र अक्षरलिपी.

लहान मुलांस सुलभ रीतीनें ओळखीचीं चित्रें पाहून अक्षर ओळख व्हावी या उद्देशानें हें पुस्तक तयार केलें आहे. विनयत्तेंत मुलांस नुस्तीं बालबोध व मोडी अक्षरें वाचावयाचीं असतात म्हणून ज्यांच्या नांवाच्या आरंभीं धूळाक्षरांतलें एकेक अक्षर आहे अशा वस्तूंचीं चित्रें देऊन त्यांचे खालीं त्यांचीं नांवें बालबोध व मोडी लिपींत दिलीं आहेत.

पुस्तकाची किंमत ०२ आणे ट० ख० ०॥.

म्यानेजर चि० शा० प्रेस पुणें.

# सार्थ प्राकृत प्रकाश.

सदरहू पुस्तक आमचे मित्र रा. रा. **शंकर रामचंद्र हतवळणे** ह्यांनीं प्रसिद्ध प्राकृत वैयाकरण वररूची ह्यांच्या ग्रंथाच्या आधारें केलें आहे प्राकृत भाषा ही संस्कृत व हिंदुस्थानांतील अर्वाचीन भाषा ह्यांमधील एक सांखळी आहे. संस्कृतांतून प्राकृतांत व प्राकृतांतून अर्वाचीन भाषांत रूपें कशीं आलीं, हें समजल्याशिवाय शब्दांची खरी व्युत्पत्ती समजली असें ह्मणतां येत नाहीं. पुष्कळ ऐतिहासिक प्रश्नांशीं प्राकृताचा निकट संबंध आहे. तेव्हां ह्या भाषेचा चांगला परिचय असल्याशिवाय त्यांचा उलगडा करण्यास अडचण असते. शब्दांचीं रूपें कशीं बनलीं व त्यांस आचार्यांच्या सूत्राचा मूळ आधार कोणता, हें प्रस्तुतच्या पुस्तकावरून दिसून येईल. प्राकृत प्रकाशाचे एकंदर १२ परिच्छेद असून पहिल्या ९ परिच्छेदांत महाराष्ट्री जी मुख्य प्राकृत भाषा तिजविषयीं व बाकींच्या तीन परिच्छेदांत पैशाची, मागधी व शौरसेनी ह्यांच्या संबंधाच्या मुख्य मुख्य गोष्टी सांगितल्या आहेत. हें पुस्तक मराठी शिक्षक, ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थी व हायस्कुलांतील वरच्या वर्गांतून मराठी शिकणारे विद्यार्थी ह्यांस विशेषें-करून उपयोगीं पडण्यासारखें आहे. पुस्तकाची किंमत ८ आहे. टपाल हशील शिवाय. एकदम बरींच पुस्तकें घेणारास कमिशन मुबलक मिळेल. पुस्तकें आमच्या छापखान्यांत विकत मिळतील.

**म्यानेजर चित्रशाळा छापखाना.**

---


## विक्रीस तयार. किं. १२ आणे.

मेहेरबान लिव्हारनर साहेब यांनीं इंग्रजींत लिहिलेसे सिटीझन आफ इंडिया या पुस्तकांचे मराठी भाषांतर छापवून विक्रीस तयार आहे. व हे बुक डा. आ. प. ई. यांनीं मराठी ५।६ यत्तेकरितां नेमले आहे.

**म्याकमिलन** आणि **कंपनी.**

१२ ब्यॉंक स्ट्री. मुंबई.


---


प्रकाशक—शंकर नरहर जोशी.

Registered No 179

पुस्तक १२. ॥ श्री ॥ अंक ४.

# मराठी शालापत्रक.

# MARATHI SCHOOL PAPER

## एप्रिल १९०१.

विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ |
|---|---|
| चक्रवर्ती सातवे एडवर्ड महाराज यांचें राज्यारोहण .... | ....७३ |
| रावसाहेब प्रिन्सिपल काशिनाथ नारायण उर्फ नानासाहेब साने. | ८२ |
| शिक्षकविण्याच्या कित्येक पद्धतींविषयीं .. .... .... | ....८९ |
| –( १ ) सार्वजनिक शाळा व वर्गपद्धती .. ... ... ... | |
| वार्षिक रिपोर्टाच्या माहितीचा अवक्षेप .... | .. ९५ |
| पत्रव्यवहार .. .... ... | ....९८ |
| –(१) पुस्तकांतील चुका (२) गणितांची शंका (३) छत्रेकृत अंकगणितांतील शंका (४) गोखलेकृत अंकगणितांतील शंका:- | |
| सूक्ततरंग .... .... .... | १०४ |


' चित्रशाळा ' प्रेस, पुणें.

आगाऊ वार्षिक वर्गणी, टपालखर्चासह रु० १।८।.

फुटकळ अंकास ।.

# कै० केरो लक्ष्मण छत्रेकृत.

## अंकगणित

### भाग १।२।३

कै० केरो लक्ष्मण छत्रे यांचे चि० रावसाहेब निळकंठ विनायक छत्रे यांनीं पूर्वीच्या अंकगणितांत हल्लीं पुष्कळ सुधारणा करून नवीन आवृत्ती छापविल्या आहेत व ठिकठिकाणीं जास्त उदाहरणें व व्याख्याही दिल्या आहेत. पूर्वी दुसरा भाग होता त्याचे हल्लीं दोन भाग केले आहेत. म्हणजे एकंदर ३ भाग झाले आहेत. भाग पहिला किंमत ८॥. भाग दुसरा किं० ।८. व तिसरा भाग लवकरच छापून प्रसिद्ध होईल. शाळामास्तरांस कमिशन मुबलक मिळेल.

म्यानेजर चि० शा० प्रे० पुणें.

---

# रंगीत सचित्र अक्षरलिपी.

लहान मुलांस सुलभ रीतीनें ओळखीचीं चित्रें पाहून अक्षर ओळख व्हावी या उद्देशानें हें पुस्तक तयार केलें आहे. विनयत्तेंत मुलांस नुस्तीं बाळबोध व मोडी अक्षरें वाचावयाचीं असतात म्हणून ज्यांच्या नांवाच्या आरंभीं मूळाक्षरांतलें एकेक अक्षर आहे अशा वस्तूंचीं चित्रें देऊन त्यांचे खालीं त्यांचीं नांवें बाळबोध व मोडी लिपींत दिलीं आहेत.

पुस्तकाची किंमत ८२ आणे ट० ख० ८॥.

म्यानेजर चि० शा० प्रेस पुणें.

चक्रवर्ती सातवे एडवर्ड महाराज.



चित्रशाळा छा० छा०

# शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यांसी । हें अवघें सद्गुरूपाशीं।
सद्गुरूपालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळां जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १९ एप्रिल १९०१. अंक ४.

## चक्रवर्ती सातवे एडवर्ड महाराज यांचें राज्यारोहण.

आपले नुकतेच सिंहासनारूढ झालेले चक्रवर्ती-महाराज सातवे एडवर्ड यांच्या राज्यारोहणाची हकीगत सरकारी ठरावासोबत आमच्याकडे प्रसिद्धीसाठीं आली आहे, ती पुढें दिली आहे. ती देण्याच्या अगोदर त्यांची थोडीशी हकीकत वाचकांसाठीं येथें लिहावयाची आहे. महाराजांचा जन्म सन १८४१ सालीं नव्हेंबर महिन्यांत झाला. तेव्हां यांचें वय हल्लीं साठ वर्षांचें आहे. इंग्लंडांत हें वय म्हणजे पोक्तपणाचें दर्शक असें गणलें आहे; व ज्याची राज्यकारभारांत पडण्याची इच्छा असते, असा कोणचाही मनुष्य पन्नास साठ वर्षांचा झाल्याखेरीज पोक्तपणांतआला असें समजत नाहींत. इंग्लंडांत होऊन गेलेले जे मोठेमोठे मुत्सद्दी, त्यांनीं महत्वाचीं कामें याच वयांत संपादित केलीं आहेत. यांचे वडील प्रिन्स आलबर्ट हे मोठे विद्वान्, राजधोरणी, शांत व गंभीर स्वभावाचे होते. त्यांचा स्वभाव या महाराजांचे आंगीं बहुतांशीं उतरला आहे. यांचा विद्याभ्यास प्रिन्स आलबर्ट यांनीं आपल्या देखरेखीखालीं उत्तम रीतीनें करून घेतला आहे. यांनीं बहुतेक सर्व पृथ्वीभर प्रवास केला असून आपल्या

विस्तीर्ण राज्यांतले सर्व मुख्य मुख्य प्रदेश यांनीं पाहिले आहेत; व सर्व ठिकाणच्या भिन्न भिन्न प्रकारच्या प्रजाजनांची चांगली माहिती करून घेतली आहे. विद्याभ्यास होऊन प्रवास वगैरे झाल्यानंतर यांचीं सुमारें तीस वर्षें जीं शांतपणें जगाचा अनुभव घेण्यांत गेलीं, त्याचा त्यांस फार मोठा उपयोग झाला आहे. आपल्या वडिलांचें व मातोश्रीचें शील कसें आहे, याजकडे यांचें प्रथमपासून लक्ष असेल हें उघड आहे, व त्यांस पोक्तपणा आल्यापासून त्यांनीं आपल्या मातोश्रीच्या कारभाराकडे सारखें लक्ष ठेविलें असेल, यांत शंका नाहीं. अलीकडे कित्येक वर्षें व्हिक्टोरीया राणीसाहेबांची प्रकृती अशक्त झाल्यापासून पुष्कळ किरकोळ कामें राणीसाहेब यांसच करावयास सांगत असत. यामुळें राज्यकारभारांत 'आपण आपल्या मातोश्रींचा कित्ता वळविण्याचा बेत केला आहे,' असें जें यांनीं सांगितलें, तें सर्व प्रकारें खरें होईल. कारण महाराणी व्हिक्टोरिया यांचा सोज्वळ कित्ता पाहून व त्यापासून देशाचें अत्यंत हित झालें आहे हें लक्षांत आणून, त्यांचा कित्ता कोणीही विचारी मनुष्य कोणच्याही कामांत वळविणार नाहीं, असें कधींच व्हावयाचें नाहीं. राजेसाहेबांच्या म्हणण्याचा अनुभव लोकांस इतक्यांतच येऊन चुकला आहे. राज्ञी परलोकवासी झाल्यावर राज्यकारभार हातीं घेण्याची शपथ घेण्यासाठीं जो पहिलाच दरबार भरला, त्यावेळीं राजपुत्र युवराज हे पूर्णपणें सातवे एडवर्ड महाराज शोभत आहेत असें दरबारांत हजर असणारी मंडळी म्हणूं लागली. कारण पहिल्याच दरबारीं त्यांचेमध्यें गंभीर असें राजकीय तेज चमकूं लागलें. हा एकदम पडलेला फरक पाहून सर्व दरबारी लोकांस मोठेंच आश्चर्य वाटलें. ज्यांना दरबारामध्यें राणीसाहेबांच्या पोक्त वर्तनाची संवय झालेली होती, अशा मुत्सद्यांच्या स्तुतीस पात्र झालेले राजेसाहेब यांचें वर्तन खरोखरच प्रशंसनीय असलें पाहिजे. या वेळीं त्यांनीं असें दाखवून दिलें, कीं आपण इतके दिवस निपुणपणें केलेलें अवलोकन मुळींच व्यर्थ गेलें नाहीं; व नुसतें अवलोकन करीत बसण्याचें आजपर्यंतचें काम सोडून देऊन आपण आतां पूर्णपणें

राष्ट्राधिपती व लोकधुरीण बनलों आहों. असें हातून घडून येण्यास आंगीं चांगली हुषारी, दूरदृष्टी, व आपल्या हातांत अधिकार यावयाचा आहे तो आपण पुढें अशा रीतीनें चालवूं, असा फार दिवसांपासून झालेला बेत पाहिजे.

इंग्लंड देशचा राजा म्हणजे त्याचे हातीं अधिकार कांहीं नसतो, सर्व कारभार प्रधानमंडळी पार्लमेंटच्या मताप्रमाणें चालविते, अशी आमच्यापैकीं पुष्कळांची समजूत आहे. परंतु ही समजूत कशी चुकीची आहे, व इंग्लंडच्या राजाच्या शिरावर केवढी जबाबदारी असते, या संबंधानें आम्हीं सन १८९७ सालीं महाराणीच्या जुबेलीच्या वेळीं जो विस्तृत लेख लिहिला होता, त्यांत सांगितलें आहे. सर्व कारभार प्रधानमंडळ चालवितें हें खरें. पण पार्लमेंटांत त्या त्यांस चांगलें पाठबळ असल्यास मात्र चालवितें. तसें पाठबळ नसल्यास किंवा असलेलें नाहींसें झाल्यास प्रधानमंडळी आपापले अधिकार फेंकून देऊन मोकळी होईल. पण राजाची गोष्ट तशी नाहीं. त्यास कसा तरी कारभार चालविणें भाग आहे. एक नाहीं तर दुसरी मंडळी शोधून काढून राजानें देशाच्या कारभाराचा गाडा सुयंत्रित हांकणें हें त्याचें कर्तव्य आहे. प्रधान मंडळीवर कोणी कांहीं दोषारोप केल्यास ती मंडळी राजीनामा देऊन मोकळी होईल, पण राजाच्या वरचें जोखीम निरंतरचें आहे. राजा हा देशाच्या कारभारांच्या संबंधानें सर्व प्रजेचा मुखत्यार व जबाबदार आहे. त्याला दिसत नाहीं व कळत नाहीं असें कांहीं नाहीं, असें साधारणतः मानण्याची पद्धत आहे ती योग्यच आहे. अशा प्रकारचे आपल्या मतापुरते जबाबदार असे पक्ष इंग्लंदांत असल्यामुळें राजाला निरंतर जागृत व सावध राहून प्रजेचें हित पाहात बसावें लागतें. जेथें इंग्लंडसारखी राज्यव्यवस्था नाहीं, तेथील राजाचें कर्तव्य एका अर्थी फार सोपें असतें. कारण तो आपल्या मताप्रमाणें प्रजेच्या हितासाठीं झटला म्हणजे झालें. पण इंग्लंड देशच्या राजाला देशाचे कायदे व मामूल वहिवाटीप्रमाणें स्वतः वागावयाचें असतें; व ते कायदे व त्या वहिवाटी कोणी मोडल्या कीं काय, हें ही पण पाहावयाचे असतें. अशा प्रकारचें कर्तव्य

बजावणें फारच जोखमाचें आहे हें उघड आहे. यासाठीं इंग्लंडच्या राजास फार दक्षतेनें वागावें लागतें. महाराणी विक्तोरिया यांचे अगोदरचे राजे व युवराज थोडेबहुत कोणच्या तरी पक्षाकडे असत. पण या महाराणीसाहेबांनीं असा कित्ता घातला, कीं कोणच्याही पक्षाकडे आपला यत्किंचितही ओढा दिसूं द्यावयाचा नाहीं. असें वर्तन ठेवण्याचें राणी साहेबांस त्यांच्या परम सुज्ञ भ्रतारांनीं शिकविलें, व तोच कित्ता सांप्रतचे राजेसाहेब यांनीं ही लहानपणापासून वळविला आहे. यांनीं आजपर्यंत युवराज असतां कोणच्याही पक्षाकडे आपला ओढा दाखविला नाहीं. सर्व निरनिराळ्या राजकीय पक्षांतील थोर मंडळी या राजेसाहेबांच्या स्नेहांतली आहे. इंग्लंडसारख्या देशाच्या राज्यकारभारांत निरंतर असेंच पाहिजे आहे. इंग्लंडच्या राजानें कोणच्याहीं पक्षाशीं विशेष असा स्नेह अगदीं न ठेवितां निरनिराळ्या पक्षांस आपापसांत हवा तसा वादविवाद करूं देऊन, सर्व पक्षांच्या वादविवादापासून तत्वबोध करून घेतला पाहिजे, व आपण केवळ प्रजाहिताकडेसच नजर ठेविली पाहिजे. असे केल्यानेंच राजाचें खरें वजन राहून प्रत्येक पक्षाचे लोक राजास योग्य मान देतील, व आपसांत तंटेबखेडे व भिन्नमत झाल्यास राजाकडे तडजोडीस येतील; व राजा कोणच्याही पक्षाचा अभिमानी नसला म्हणजे त्यानें सुचविलेली तडजोड अर्थातच दोन्ही पक्षांस मान्य होईल. अशा प्रकारचे प्रसंग दोन्ही पक्षांमध्यें व एकाच पक्षाच्या मुत्सद्यांमध्यें येऊन, माजी राणी सरकार व त्यांचे भ्रतार यांनीं अनेक वेळां तडजोडी केल्या आहेत. इतर देशांत आपसांत तंटे, वादविवाद व प्रसंगीं राज्यक्रांती ही झाल्याची उदाहरणें असून, इंग्लंडांत गेलीं पाउणशें वर्षें सर्व कारभार सुयंत्रित व तंटाबखेडा न होतां चालून इंग्लंडच्या लोकांनीं दुसऱ्या सर्व देशांतील लोकांपेक्षां अधिक असें राज्यस्वातंत्र्य मिळविलें आहे, याचें कारण हेंच आहे. वाफेचें किंवा दुसरें एकादें यंत्र आपल्या लहान मोठ्या अवयवांसुद्धां जसें रात्रंदिवस न बिघडतां उत्तम रीतीनें चालतें, तशी इंग्लंडची राज्यव्यवस्था आज कित्येक दिवस चालू आहे. प्रसंगीं वादविवाद व धुसफुशी

होतात, पण त्या कधीं विकोपास जात नाहींत, व त्यांचा परिणाम बहुधा लोकांना अनुकूल असाच होतो. तसेंच अशा यंत्रांत कल्पक कारागीर उत्तरोत्तर सुधारणा करून जसें तें यंत्र अधिकाधिक उपयोगाचें होईल असें करीत असतात, त्याच रीतीनें इंग्लंडच्या राज्यपद्धतींत गेल्या पाऊणशें वर्षांत अनेक शाहाण्या मुत्सद्यांच्या उद्योगानें अनेक प्रकारच्या सुधारणा झाल्या आहेत. असा सुयंत्रित कारभार आजकाल कोणच्याही देशांत चाललेल्या सांपडणार नाहीं. तसेंच परमेश्वरकृपेनें आमच्या देशाची अशा पृथ्वींतील उत्तम राज्यव्यवस्थेशीं सांगड झाली आहे, यामुळें काल-गतीनें आमचें राष्ट्रही इंग्रजी राष्ट्रांतल्या सर्व उत्तम गोष्टी घेऊन त्या राष्ट्रांप्रमाणेंच पुढें येईल यांत शंका नाहीं.

सातवे एडवर्ड महाराज यांचें वर्तन मोठें सभ्यपणाचें आहे. त्यांना विद्येचा मोठा शोक आहे. त्यांचे आजपर्यंतचे आवडीचे विषय गायन कला व शेतकी आणि बागाईत हे आहेत. त्यांस कोणचेंही वाईट व्यसन नाहीं. इतर राष्ट्रांतील राजे व मोठाले मुत्सदी यांची त्यांस उत्तम ओळख असून, कित्येकांजवळ त्यांचा चांगला स्नेह आहे. जर्मनीचे बादशाहा हे यांचे भाचे असून उभयतां एकमेकांशीं फार प्रेमानें वागतात.

आमच्या देशांत राजेसाहेब यांनीं प्रवास केलेला आहे. त्यांनीं आमचे देशांतील राजेरजवाडे व प्रजाजन यांच्याकरितां जो जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे, तो पुढें दिला आहे. त्यावरून त्यांचें आमच्या हिताकडे उत्तम लक्ष राहील असें दिसत आहे. आजपर्यंत अनेक परक्या लोकांनीं दुसऱ्या देशांवर राज्य केलें, परंतु 'आम्ही या देशांतील लोकांचे हिता-साठीं राज्य करितों,' असें म्हणण्याचें व प्रत्यक्ष हातानें करून दाख-विण्याचें श्रेय बरेचसें सांप्रतच्या राज्यकर्त्यांनीं माजी महाराणी साहेबांच्या कारकीर्दींत घेतलें आहे.' हाच उत्तम कित्ता त्यांचे चिरंजीव वळवितील व आमच्या देशास उर्जित दशा आणितील असें सर्वांस वाटत आहे. ही गोष्ट यांच्या हातातें घडून येण्यास परमेश्वर यांस बुद्धी व शक्ती देवो, व

त्यांचें राज्य आम्हांस फार दिवस सुखासमाधानाचें होवो, अशी सर्व प्रजा-जनांची परमेश्वराजवळ निरंतर प्रार्थना आहे.

मेहेरबान एज्युकेशनल इन्स्पेक्टर साहेब बहादूर मध्यभाग यांचे कडील पत्र नंबर १०५९३ ता ३० माहे मार्च सन १९०१ इसवी यांतील हुकुमाअन्वयें सदर ठराव शाळापत्रकांत प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

काशिनाथ गणेश केळकर.
प्रिन्सिपल ट्रेनिंग कालेज पुणें.

ग्रेटब्रिटन व आर्लंडचे राजे व हिंदुस्थानचे बादशाहा सातवे एडवर्ड महाराज यांजविषयींचा जाहीरनामा व त्यांचें त्यास उत्तर.

जनरल डिपार्टमेंट नं० ६७१.

बॉम्बे क्यासल
ता० १ फेब्रुवारी सन् १९०१ इ०

हिंदुस्थान सरकारच्या होम डिपार्टमेंट ( पाब्लिक ) कडून ता. २१ माहे जानेवारी सन् १९०१ इसवी रोजीं आलेली तारः—

" हिंदुस्थान सरकारची अशी इच्छा आहे कीं शनवार ता० २६ माहे जानेवारी सन १९०१ इसवी रोजीं वाचलेला जाहीरनामा व त्यावरील उत्तर सार्वजनिक हपीसांवर चिकटवून अथवा इतर प्रकारें त्यांच्या प्रसिद्धीसाठीं व प्रसारासाठीं तजविजी करण्यांत याव्या. "

**सरकारी ठराव**—जाहीरनामा व त्यावरील उत्तर याच्या आणखी कांहीं प्रती निरनिराळ्या हपीसांतील मुख्य अधिकाऱ्यांकडे पाठविण्या-विषयीं गव्हर्मेंट सेंट्रल प्रेसचे सुपरिंटेंडेंट यांस विनंति करावी; व सदर अधिकाऱ्यांस सदर प्रती मिळाल्यावर त्यांनीं हिंदुस्थानसरकारच्या इच्छे-प्रमाणें सदर जाहीरनामा व उत्तर ह्यांच्या प्रसिद्धीसाठीं तावडतोब तज-विजी कराव्या.

(सही) जे. डि.सी. ॲटकिन्स.
सेक्रेटरी टू गव्हर्नमेंट.

———

नेक नामदार मुंबई इलाख्याचे गव्हर्नर-इन-कौन्सिल यांचे हुकुमाअन्वयें ता० २६ जानेवारी सन १९०१ इसवीच्या बॉम्बे गव्हर्मेंट ग्याझेटच्या जादापत्रकांत प्रसिद्ध झालेला परम दयाळू महाराज सातवे एड्वर्ड राजेसाहेब ग्रेटब्रिटन आणि आयर्लंडचे राजे व हिंदुस्थानचे बादशाहा यांच्या राज्यपदारोहणाच्या संबंधाचा जाहीरनामा व त्यांचें त्यावर उत्तरादाखल झालेलें भाषण:—

**जाहीरनामा**—"ज्यापक्षीं सर्वशक्तिमान प्रभूच्या इच्छेनुरूप आमच्या मंगलस्मृती व प्रतापशालिनी कुलवती स्वामिनी व्हिक्टोरिया राणीसाहेब परलोकवासी झाल्या व ज्या अर्थी त्यांच्या मृत्यूमुळें ग्रेटब्रिटन व आयर्लंद या संयुक्त राज्याचें श्रेष्ठ राज्यपद पूर्ण हक्कानें थोर व प्रतापशाली राजपुत्र आलबर्ट एड्वर्ड यांचेकडेच सर्वांशीं आलें आहे, त्यापक्षीं आतां आम्हीं सदर राज्याचे 'धार्मिक व व्यवहारिक' मानकरी, तसेंच परलोकवासी महाराणी साहेबांच्या 'प्रिव्हिकौन्सिल' चे सभासद, व सदर राज्यांतील इतर अनेक मुख्य सरदार आणि लंडन शहरचे 'लार्ड मेयर आल्डरमेन व नागरिक जन' यांसह एक विचारानें, एक वाचेनें व एक दिलानें आतां या जाहिरनाम्याद्वारें असें प्रसिद्ध व जाहीर करितों कीं, सदर थोर व प्रतापशाली राजपुत्र आल्बर्ट एडवर्ड हे आमच्या सुखस्मृती परलोकवासी महाराज्ञीच्या मृत्यूमुळें हल्लीं आमचे कायदेशीर व सर्वांशीं हक्कदार स्वामी सातवे एडवर्ड झाले आहेत; व तसेंच ईश्वरकृपेनें ते ग्रेटब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याचे राजे धर्मसंरक्षक व हिंदुस्थानचे, बादशाहही झाले आहेत. तरी आम्ही ( प्रजाजन ) मनःपूर्वक व नम्रतापूर्वक त्यांच्याशीं प्रेमानें व सर्वतोपरी इमानानें वागण्याचें व सदैव त्यांची आज्ञा पाळण्याचें कबूल करित आहों; व ज्या प्रभूच्या सत्तेनें राजे व राण्या राज्य करितात, त्या प्रभूनें या आमच्या सातवे एडवर्ड राजेसाहेबांनीं आमच्यावर राज्य करावें अशासाठीं त्यांस चिरायू व सुखी करावें अशी आम्ही प्रार्थना करीत आहों.

सेंट जेम्स राजवाड्यांतील दरबारीं इ० स० १९०१ जानेवारी ता० २३ रोजीं प्रसिद्ध झाला."

## उत्तरादाखल झालेलें राजभाषण.

"राजपुत्र, सरदार लोक, व इतर सभ्य गृहस्थहो, माझ्या कारकीर्दीत तुम्हांस उद्देशून बोलण्याचे मला जे जे प्रसंग येतील त्या सर्वांत हा आजचा प्रसंग विशेष दुःखद होय. या प्रसंगीं माझें प्रथमचें व अति दुःखात्मक असें कर्तव्य म्हटलें म्हणजे माझ्या परम प्रिय मातोश्री विक्टोरिया राज्ञी यांच्या मृत्यूचें वर्तमान आपणा सर्वांस कळविणें हें होय; आणि आमच्या मातोश्रीच्या मरणामुळें आपणा सर्वांचें जें अपरिहार्य नुकसान झालें आहे त्यामुळें तुम्ही सर्व राष्ट्रांतील लोक—किंबहुना माझ्यामतें सर्व जगही म्हटलें तरी चालेल—माझ्याकरितां अती हळहळत आहां हें मी जाणत आहें. माझ्या शिरावर हा जो जबरदस्त राज्यभार आला आहे, तो स्वीकारून वाहण्याचे कामीं मी नेहमी राणी साहेबांच्याच मार्गाचें अनुकरण करण्याचा सतत प्रयत्न करीन, हें मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. तसेंच 'राज्यनियम नियंत्रित राजा' या पदाच्या अर्थाप्रमाणें सर्वतोपरी वागून तें पद मिळविण्याचा व माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत माझ्या प्रजाजनांचे कल्याणासाठीं व त्यांची स्थिती सुधारण्यासाठीं झटण्याचा मी पूर्ण निश्चय केला आहे. माझे पूर्वजांपैकीं सहा पुरुषांनीं धारण केलेलें एडवर्ड हें नांव धारण करण्याचा मी निश्चय केला आहे. असें केल्यानें माझे चिरस्मरणीय, थोर व सुज्ञ वडील, ज्यांना सर्वानुमतें 'भले आल्बर्ट' असें माझेमतें यथार्थ नामाभिदान मिळालें होतें, त्यांजपासून प्राप्त झालेले जें माझे नाव आल्बर्ट, त्याची योग्यता मी कमी समजतों असें नाहीं. पण हें नांव अनन्यगामी असावें अशी माझी इच्छा आहे. सरतेशेवटीं मला सांगण्याचे हेंच कीं वारसाचे हक्कावरून ही जी हल्लीं माझेवर अती मोठी जबाबदारी आली आहे व जींतून नीटपणें पार पडण्यासाठीं माझ्या राहिलेल्या सर्व आयुष्यभर माझी सर्व प्रकारची शक्ती मी खर्च करण्या-निश्चय केला आहे, ती जबाबदारी संभाळण्याचे कामी माझें राष्ट्र व पार्लमेंट मला मदत करतील अशी मी उमेद बाळगून आहें"

याच वेळीं राजेसाहेब यांनीं आमच्या देशांतील राजे रजवाडे व प्रजाजन यांस कळण्यासाठीं जो जाहीरनामा प्रसिद्ध केला, तोही पुढें देतों:——

"हिंदुस्थानांतले राजेरजवाडे आणि प्रजाजन ह्या समळ्यांचें कल्याण व्हावें, अशी आमची फार इच्छा आहे. आमच्या मातुश्रींनींच हिंदुस्था-

नाचा राज्यकारभार प्रत्यक्ष आपलेकडे घेतला, आणि त्या देशांवर त्यांच्या विशेष असलेल्या प्रेमाच्या ओढयानें त्यांनीं आपणांस 'हिंदुस्थानची चक्रवर्तिनी' म्हणविलें. हिंदुस्थानांतल्या राज्यकारभारांतल्या प्रत्येक बाबीकडे त्यांचें लक्ष फार असे, हें आम्हाला ठाऊक आहे. त्याप्रमाणेंच त्यांच्या कारकीर्दीच्या शेवटशेवटच्या वर्षी आफ्रिकेंतल्या लढाईच्या संबंधानें महाराणी साहेबांविषयीं जी राजनिष्ठा हिंदुस्थानांतल्या राजेरजवाड्यांनीं प्रगट केली ती, आणि आपल्या देशाच्या बाहेर हिंदुस्थानच्या सैन्यानें जे पराक्रम केले, तेही आम्ही जाणत आहों. आम्ही हिंदुस्थानांत गेलों होतों तेव्हां तेथें जें काय आम्हीं पाहिलें आहे, तें आम्ही कधींही विसरणार नाहीं, आणि आमच्या मातोश्रींना कित्ता घालून दिल्याप्रमाणें, आम्ही आमच्या हिंदुस्थानांतल्या सर्व प्रकारच्या प्रजाजनांच्या हितार्थ प्रयत्न करूं, आणि त्यांच्याप्रमाणें आम्ही त्यांची अचल राजनिष्ठा आणि प्रेम हीं आपणांकडे ओढून घेऊं."

राजेसाहेबांची सुशील पत्नी डेनमार्क देशाच्या राजघराण्यांतील राजपुत्री असून, त्या अत्यंत लोकप्रिय आहेत. राजेसाहेब यांची तसबीर या अंकासोबत आम्ही वाचकांस सप्रेम अर्पण करीत आहों. तिचा त्यांनीं स्वीकार करावा.

"परम दयाळू परमेश्वर सातव्या एडवर्ड महाराजांस
चिरकाल सुरक्षित राखो!"

## रावसाहेब प्रिन्सिपल काशिनाथ नारायण उर्फ बाबासाहेब साने बी. ए.

राष्ट्राच्या उत्कर्षाचें मुख्य अंग समाजाची मानसिक उन्नती हें होय. ती उन्नती सर्वस्वी ज्ञानवृद्धीवर अवलंबून असते. ज्ञानप्राप्ती अनेक साधनांनीं करून घेतां येते, परन्तु ती प्राप्त करून घेण्याविषयीं आवड उत्पन्न होणें हे मुलांस लहानपणीं ज्या प्रकारचें वळण लागलेलें असेल, त्याप्रमाणें घडतें. याकरितां राष्ट्रोन्नतीचा विचार करितांना बालशिक्षणास प्रधानपद मिळतें. राष्ट्रांतील तरूण लोक ज्या मानानें विद्याभिलाषी बनले असतील, ज्या मानानें त्यांच्या मनांत नीतीचे अंकूर बळावले असतील, ज्या मानानें त्यांच्या मनांत सत्यप्रीती, समानदृष्टी, परोपकारिता इत्यादि सद्गुण जागृत झाले असतील, त्याच मानानें त्यांस स्वतःस, इतरांस व एकंदर राष्ट्रास सुखसमाधान प्राप्त होईल. लहान मुलांस व तरुणांस सुशिक्षित करण्याकरितां प्रत्येक सुधारलेल्या राष्ट्रांत सरकार केवळ निरपेक्ष बुद्धीनें मुद्दाम प्रयत्न करितें, तें एतदर्थेच. समाजांत नीतिमत्ता व ज्ञान वाढत गेल्यास तंटेबखेडे सहजींच टळतात, राष्ट्रांत स्वस्थता नांदते, लोकांस स्वस्थ चित्तानें अनेक विषयांवर विचार व शोध करितां येतात व प्रत्येक बाबतींत लोकांचें पाऊल पुढें पडून देशाचा सर्व बाजूंनीं उत्कर्ष होत जातो. लहान मुलांस शिक्षण देण्याकरिता गांवोगांवीं व शहरोशहरीं सरकारांतून ज्या अनेक शाळा स्थापित करण्यांत आल्या आहेत, त्यांसाठीं शिक्षकवर्ग यथाशास्त्र तयार करण्याचें ठिकाण पुणें येथील मराठी ट्रेनिंग कालेज हें एक आहे हें सर्वांस ठाऊक आहेच.

२. पुणें ट्रेनिंग कालेजांत भावी शिक्षकांस शिक्षण मिळून त्यांच्या ठिकाणीं नीतिमत्ता व ज्ञान यांची ज्या प्रकारची जोपासना होईल त्याच प्रकारें पुढें महाराष्ट्रांतील बालविद्यार्थ्यांस कित्ता लागून ज्ञानप्राप्ती होणार आहे. यास्तव पुणें ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सिपल यांजकडे सर्व महाराष्ट्रीय

बालशिक्षणाची पर्यायानें जबाबदारी येते, व हें जोखमाचे काम त्या अधिकाऱ्याकडून चांगल्याप्रकारें पार पडलें म्हणजे सर्व समंजस लोक मोठे आभारी होऊन त्याचें अभीष्ट चिंतितात व त्या अधिकाऱ्याचा कालेजाशीं असलेला संबंध सुटला म्हणजे लोकांस सहजीच ती गोष्ट दुःसह होते. रावसाहेब काशिनाथ नारायण ऊर्फ बाबासाहेब साने, माजी प्रिन्सिपल, ट्रेनिंग कालेज पुणें, यांची बेळगांव हैस्कूलच्या हेडमास्तरच्या जागीं नुकतीच बदली झाल्यामुळें कालेजांतील हल्लींच्या विद्यार्थ्यांस आणि कालेजांतील व बाहेरील जुन्या नव्या सर्व शिक्षकांस व शिक्षणाची आस्था बाळगणाऱ्या सर्व लोकांस जी हळहळ वाटत आहे, ती याचकरितां. एरवीं बाबासाहेब यांची बढतीवर बदली झाल्यामुळें सर्वांस आनंद झाला आहे, तो यथार्थच आहे.

२. सन १८७२ त बाबासाहेब साने यांनी आपल्या वयाच्या २२ व्या वर्षी बी. ए. ची परीक्षा उतरली. त्यांचा अभ्यास पुण्याच्या डेक्कन कालेजांत झाला. बाबासाहेब यांनीं सन १८७३ सालांत शाळाखात्यांत नोकरी धरिली, व तेव्हांपासून आज तागायत ते याच खात्यांत नोकरी करीत आहेत. ही नोकरी शिक्षक व परीक्षक या स्वरूपाची आहे. बाबासाहेब यांनीं प्रथम सुमारें १० वर्षे पर्यंत हायस्कूलांत उपशिक्षकाची नोकरी केली. हायस्कुलांतील शिक्षक या नात्यानें त्यांनीं बरेच दिवस रत्नागिरीस काम केलें. त्या वेळीं तेथें प्रख्यात शिक्षक कै. वामनराव मोडक हे हेडमास्तर होते; व कै० जनार्दनपंत मोडक हे पहिले शिक्षक होते. साने यांची टापटीप, करारीपणा व शिकविण्याचें धोरण, या स्वाभाविक गुणांस उभयतां मोडक यांच्या सहवासानें उत्तेजन मिळून, पुढें विकास पावलेल्या शिक्षकास योग्य अशा अनेक गुणांचें या वेळीं बीजारोपण झालें असें म्हणण्यास चिंता नाहीं. या वेळीं रत्नागिरी हायस्कूल फार भरभराटींत असून, त्या वेळीं तेथून अनेक उत्तम विद्यार्थी तयार होऊन जगांत पुढें आले आहेत. रा. सा. साने यांची सर्व विषय शिकविण्याची धाटणी उत्तम असून, इतिहास हा त्यांचा

आवडता विषय आरंभापासून ठरलेला आहे. हा विषय साने हे शिकवीत असतां विद्यार्थ्यांस मोठा आल्हाद वाटे. रत्नागिरीस त्यांची उत्तम शिक्षक म्हणून बरीच प्रख्याती झाल्यावर त्यांची पुणें हायस्कुलांत बदली झाली. येथें आल्यावर कांहीं दिवसांनीं कै० जनार्दनपंत मोडक, कै० चिपळूणकर व रा. सा. साने यांनीं मिळून ' काव्येतिहास-संग्रह' या नांवाचें एक मासिक पुस्तक सुरू केलें. यांत इतिहासाचा भाग रा. सा. साने यांच्या हातून तयार होत होता. या भागांत महाराष्ट्राच्या जुन्या इतिहासाच्या संबंधाच्या बखरी, पत्रें, यादी आणि इतर कागदपत्र प्रसिद्ध झाले आहेत. या लेखांच्या प्रसिद्धीपासून महाराष्ट्राच्या इतिहासास कसें नवीन स्वरूप प्राप्त झालें, हें कोणास सांगावयास नको. याचें सर्व श्रेय साने यांच्या अविश्रान्त श्रमांकडे आहे. या प्रसिद्ध झालेल्या लेखांस माहितीच्या व स्पष्टीकरणाच्या अनेक टीपा जोडल्या आहेत, त्या पूर्ण शोध करून लिहिलेल्या असून फार मार्मिक रीतीच्या आहेत. या टीपा विद्यार्थी व एरव्हीं वाचणारे यांस फार उपयोगाच्या आहेत. सांप्रत महाराष्ट्राच्या इतिहासास उपयोगीं पडतील असे अनेक लेख व कागदपत्र प्रसिद्धीस येत आहेत. पण या उद्योगास आरंभ करण्याचें श्रेय साने यांसच आहे. या उद्योगाबरोबर जुनी व नवी मराठी भाषा व कविता यांचा साने यांनीं पुष्कळ अभ्यास केला. त्याचा उपयोग पुढें ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थ्यांस शिकविण्यामध्यें फार झाला हें सांगावयास नको. पुढें यांनीं सुमारें १० वर्षेपर्यंत उपपरीक्षकाची ( डेप्युटी ए. इन्स्पेक्टराची ) नोकरी केली. कुलाबा, ठाणें, नगर, पुणें, खानदेश इत्यादी ठिकाणीं ते डेप्युटी ए. इन्स्पेक्टर होते. या हुद्यावर असतां ते फार लोकप्रिय झाले होते. तारीख १ एप्रिल सन १८९४ रोजीं ते पुणें ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सिपल झाले, व चालू महिन्याच्या १ ले तारखेपासून त्यांची बदली येथून बेळगांवास, हायस्कूलच्या मुख्य शिक्षकाच्या जागीं झाली आहे.

४. रावसाहेब साने यांच्या ठिकाणीं उत्तम बुद्धिमत्ता, विशाल विद्वत्ता, दृढाभ्यास, शोधकपणा, निरलसता, शुद्धाचरण, साधेपणा, गुणग्राहिता,

कर्तव्यासक्ती, कार्यक्षमता, बहुश्रुतपणा, इत्यादी श्रेष्ठ गूण पूर्णपणें वास करीत असून, शिवाय त्यांस शिक्षक व परीक्षक या नात्यानें बहुतेक सर्व महाराष्ट्र सूक्ष्मपणें पाहण्याची बरींच वर्षेपर्यंत अमोलिक संधी प्राप्त होऊन, लहान मोठ्या विद्यार्थ्यांचीं शारीरिक व मानसिक शक्ती, स्थानभेदानें व स्थितीभेदानें त्यांची असलेली भिन्न परिस्थिती, इत्यादिकांचीही पूर्ण माहिती झाली आहे; व यानंतर पुणें ट्रेनिंग कालेजांत शिक्षकवर्ग तयार करीत असतां, त्यांस विशेष अनुभव प्राप्त झाल्यामुळें त्यांच्या संबंधानें चार शब्द येथें नमूद केल्यास हल्लींच्या व पुढें होणाऱ्या शिक्षकांस अतिशय उपयोग होईल, असें जाणून आम्हीं बाबासाहेब यांच्या चरित्रांतील कित्येक गोष्टींचा समयोचित उल्लेख करीत आहों.

१. सन१८८४सालापर्यंत रावसाहेब साने हे रत्नागिरी, व पुणें येथील हायस्कुलांत असिष्टंत मास्तर होते. ह्या वर्षापर्यंत कुलाबा जिल्हा शाळा खात्याच्यासंबंधानें ठाणें जिल्ह्यांत मोडत असे. ठाणें जिल्ह्यांत शाळांची संख्या फार वाढत गेल्यामुळें सन १८८४ त कुलाबा जिल्हा स्वतंत्र करून त्यावर डेप्युटी ए० इन्स्पेक्टरच्या जागीं रावसाहेब साने यांची नेमणूक झाली. हे ज्या ज्या जिल्ह्यांत डे० ए० इन्स्पेक्टर होते, त्या त्या जिल्ह्यांत विद्यावृद्धीच्या कामीं शिक्षकांस कोणच्या अडचणी येतात, शिक्षणक्रम कशा प्रकारें चालविला असतां शिष्यांस व शिक्षकांस अल्पायासानें इष्ट हेतू साधितां येतील, कोणत्या ठिकाणीं कोणत्या प्रकारची शाळा असावी, मुलांच्या शाळा कोणत्या ठिकाणीं अधिक दिल्या पाहिजेत, कोणत्या ठिकाणीं मुलींच्या शाळा घातल्यास त्या नीट रीतीनें चालतील, कोणत्या ठिकाणीं रात्रीच्या शाळा घालणें श्रेयस्कर होईल, कोणत्या ठिकाणीं कनिष्ट जातींतील लोकांस शिकविण्याची सोय करितां येईल, काय केलें असतां मोडी अक्षरास उत्तेजन येईल, काय केलें असतां विद्यार्थ्यांस वाचनाची गोडी लागेल; काय केलें असतां विद्यार्थ्यांची प्रकृती सुधारेल, कोणकोणत्या जुन्या गोष्टी नवीन शिक्षणक्रमांत ठेविल्या पाहिजेत, कोणत्या तादृश लाभदायक नाहींत, कोणते शिक्षक आपलें काम झटून करितात, कोणते शिक्षक आपआपल्या

कामांत वाकबगार आहेत, कोणते शिक्षक मनमिळाऊ आहेत, इत्यादी अनेक बाबतींत एकसारखा मननक्रम सुरू होऊन, अल्पकाळांत शिक्षकांत व विद्यार्थ्यांत एक प्रकारचा जोम दिसूं लागला; ज्याला त्याला शिकण्याविषयीं विशेष उत्साह वाटूं लागला; शिक्षकांस हुरूप आला; शिक्षकांच्या अडचणी रावसाहेबांच्या पूर्णपणें ध्यानांत असल्यामुळें इमानें इतबारें काम करणाऱ्या शिक्षकांस आपल्या कामाची खातरजमा वाटूं लागली; व एकंदरींत चोहोंकडून सुधारणा होत गेली. शिक्षकांस अध्ययनाचा व अध्यापनाचा नाद लागण्यासाठीं ते एकसारखा प्रयत्न करीत. मेहनती शिक्षकांची त्यांच्या कारकीर्दीत सर्वत्र उत्तम चहा होत असे. आळशी व चुकार शिक्षकांची त्यांनीं बिलकुल मुलाजा केली नाहीं. आपण केलेल्या व वरिष्ठांनीं घालून दिलेल्या नियमांचें कोणी उल्लंघन केल्यास तें त्यांस मुळींच सहन होत नसे, व उल्लंघन करणारास ते कधींहि योग्य शासन केल्याशिवाय राहिले नाहींत. यामुळें यांच्या कारकीर्दीत प्रत्येकास उत्तम काम करून दाखविणें या गोष्टीवरच अनन्यभावानें सर्वस्वी भिस्त ठेवणें भाग पडे. रावसाहेब साने यांची परीक्षा घेण्याची पद्धती उत्तम आहे. शाळेच्या मगदुराप्रमाणें ते परीक्षा घेत असत. भाषा विषयाकडे त्यांचे विशेष लक्ष असे. गणित विषयाची परीक्षा घेतांना त्यांचा फार मार्मिकपणा दिसून येई. शिक्षकानें वर्षभर योग्य प्रकारें मेहनत केली आहे कीं नाहीं, हें शोधून काढण्याचा त्यांचा मुख्य इरादा असे. विद्यार्थ्यांच्या स्वभावाचा व स्थितीचा ते नेहमीं विचार करीत. विद्यार्थी नापास करण्याकडे त्यांचा बिलकुल कल नसे. बाबासाहेब यांची स्मरणशक्ती अपूर्व आहे. कोणत्याही शिक्षकाच्या कामाचें स्वरूप त्यांच्या एकदां लक्षांत आलें म्हणजे सहसा विसर पडण्याचा संभव नाहीं. वास्तव त्यांच्या मनाचा समज उगीच कोणास फिरवितां येणें अशक्य असतें. ज्याच्याविषयीं त्यांचा एकदां बरावाईट ग्रह झाला, त्यानें चांगलें काम फिरून नजरेस आणिल्याशिवाय तो ग्रह बदलणें दुरापास्त असतें व यामुळें रावसाहेबांस कोणीं रदबदली केलेली ऐकण्याचा फारसा प्रसंग आलेला नाहीं, व एकंदरींत सुपरिणाम झाला आहे.

रा० सा० साने परीक्षा घेतांना शिक्षकानें प्रत्येक विषय कसा शिक-विला आहे हें ही लक्षपूर्वक पाहात असत. प्रत्येक विषय शिकवावा कसा, या संबंधानें त्यांनीं ज्या ज्या जिल्ह्यांत काम केलें तेथें मुद्दाम सर-क्युलरें काढलीं आहेत. हीं सरक्युलरें त्यांचे मागून गेलेल्या अधिकाऱ्यांस चांगली वाटून त्यांनीं तीं कायम ठेविलीं आहेत किंवा त्यांत वेळोवेळीं आलेल्या अनुभवाप्रमाणें फेरफार केले आहेत. अशा रीतीनें बरेच दिवस प्राथमिक शाळांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन, शिक्षक व विद्यार्थी यांच्या स्थितीचें नीट अवलोकन केल्यावर त्यांची पुण्याचे ट्रेनिंग कालेजावर नेमणूक झाली, यामुळें त्यांनीं मिळविलेल्या अनुभवाचा कालेजाची सुधा-रणा करण्यांत उपयोग साहजिकच उत्तम प्रकारें झाला आहे.

६. बाबासाहेबांची शरीरप्रकृती जरी निरोगी आहे, तरी म्हणण्या-सारखी दणगट नाहीं. त्यांची राहाणी फार व्यवस्थित आहे. त्यांच्या आंगीं कार्यक्षमता अतिशय आहे. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें नोकरीच्या नात्यानें स्वतः आपल्या कर्तव्यांत पूर्णपणें व्यापृत असतांही त्यांचे इतर व्यासंग एकसारखे अविश्रान्त चालले असतात. मागें ज्याचा उल्लेख केला आहे, तें "काव्येतिहास संग्रह" मासिक पुस्तक या वेळीं चालू होतेंच. हें पुस्तक सुमारें बारा तेरा वर्षें चालू होतें. त्यांत काव्यांवर व विशेषतः इतिहासावर त्यांनीं जागोजाग अर्थद्योतनार्थ जीं टिप्पणें केलीं आहेत, त्यांवरून त्यांचा दृढपरिश्रम, बहुश्रुतपणा, सहृदयता, विस्तृतवाचन व वाचकाची जिज्ञासा समजण्याची अपूर्व शक्ती, हे गुण उत्तम रीतीनें व्यक्त होत आहेत. डेप्युटी इन्स्पेक्टरचें काम करीत अ-सतां जुन्या ऐतिहासिक स्थलांची व पुरुषांची माहितीही ठिकठिकाणीं मिळेल ती मिळविण्याचा त्यांचा सतत यत्न सुरू असे. बाबासाहेब स्वारींत ज्या ठिकाणीं जात, त्या ठिकाणीं जें कांहीं प्रेक्षणीय असेल तें पा-हिल्याशिवाय राहात नसत. कोठें किल्ला, कोठें देऊळ, कोठें पूल, कोठें मठ, कोठें लेणें, कोठें तळें, जेथें जें कांहीं चमत्कारिक असेल तें

मोठ्या कौतुकानें पाहून त्याचा इतिहास, आख्यायिका, दंतकथा, रचना, इत्यादिकांचा सूक्ष्म माहिती काढीत व तिची नोंद करून ठेवण्याचा त्यांचा पाठ असे. त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं जीं जुन्याकाळीं प्रसिद्धीस आलेलीं घराणीं आहेत, त्यांचेबद्दल लक्षपूर्वक ते शोध करीत, व ऐतिहासिक महत्वाच्या लेखांचा व कागदपत्रांचा शोध लावीत. प्रत्येक जिल्ह्याच्या ग्याझीटियरवरून बहुतेक माहिती ते आगाहूच काढून ठेवीत. कोठें कांहीं इतिहास, बखरी, पोवाडे, काव्यें आढळ-ल्यास त्यांचाही ते फार आवडीनें संग्रह करीत असत. इतक्या सर्व गोष्टी त्यांच्याकडून होत, याचें कारण त्यांचा सुव्यवस्थित उद्योग हें होय.

७. बाबासाहेब यांनीं ट्रेनिंग कालेजांतील आपलें काम हातीं घेतल्यावर प्रथमतः कित्येक दिवसपर्यंत त्या कामाची पद्धती वगैरे नीटपणें अवलोकन केली. विद्यार्थ्यांची ग्राहकशक्ती, कालेजांतील अभ्यास, कालेजांतून पसार झाल्यावर शिक्षकाचें काम करावयास अवश्य असणारी त्यांची तयारी, इत्यादिकांचा पूर्ण विचार केला. कालेजांतील शिक्षकांशीं अनेक बाबतींत वाटाघाट करून ज्या ज्या गोष्टी कराव्या असें त्यांच्या मनांत येई, त्यांच्या युक्तायुक्ततेबद्दल त्यांनीं चांगला विचार केला; तसेंच प्राक्टि-सिंग स्कूलांतील कामकाजही बरोबर समजून घेतलें, व त्या शाळेच्या हेड-मास्तरांची सल्ला मसलत घेऊन त्या कामाचें धोरण निश्चित करून ठेविलें. बोर्डिंग हौसमध्यें विद्यार्थ्यांची राहण्याची, भोजनाची वगैरे सोय कशी आहे हेंही त्यांनीं आणिलें व त्यांत कशी सुधारणा होईल याजब-द्दलचा निदिध्यास सुरू झाला. सारांश त्यांनीं आपणास प्रिन्सिपल अस-तांना जें काम करावयाचें, त्याचें प्रस्तुत स्वरूप काय आहे व वास्तविक स्वरूप कसें असावें व कशानें इष्टसिद्धी लौकर व अनायासानें घडून येईल, याजबद्दल प्रथमतः आराखडा काढून ठेविला.

[ पुढील अंकांत संपेल. ]

# शिकविण्याच्या कित्येक पद्धतींविषयीं.

## ( १ ) सार्वजनिक शाळा व वर्गपद्धती.

—०+०—

मुलांच्या व मुलींच्या मोठाल्या शाळा घालून व अनेक शिक्षक नेमून शिकविणें, हा शिकविण्याचा अगदींच नवीन प्रकार नाहीं. आमच्या इकडल्या पूर्वीच्या शिक्षणपद्धतींत हे प्रकार बीजरूपानें होते. आमच्या पूर्वजांपैकीं ब्राह्मणांनीं पुष्कळ दिवसपर्यंत मुख्य धंदा शिक्षणाचाच केला. बौद्ध व जैन लोकांच्या यतींनीं ही मुख्य काम तेंच केलें. प्राचीनकाळीं आमचे देशांत सर्वत्र ब्राह्मण, बौद्ध व जैन या लोकांच्या लहान मोठ्या शाळा होत्या, व तेथें त्यांच्या नांवलौकिकाप्रमाणें हिंदुस्थान देशाच्याच दूरदूरच्या भागांतून नाहीं, तर इतर देशांतूनही शेंकडो विद्यार्थी शिकावयास येऊन राहात असत, ही गोष्ट सर्व प्रसिद्ध आहे. या सर्व प्राचीन काळच्या शाळांत पुष्कळ विद्यार्थी असून निरनिराळे विषयांत निष्णात असे निरनिराळे शिक्षक व एकच विषय शिकणाऱ्या मुलांचे निरनिराळे वर्ग, अशी आतांच्या सारखीच व्यवस्था असे. राजेलोक व श्रीमंत लोक यांचे येथें एखादा शिक्षकच नेमून घरांतल्या थोड्याच मुलांस निराळें शिकविण्याची चाल होती; पण तेथें सुद्धां एक दोन पेक्षां जास्त विद्यार्थी असावे, अशी व्यवस्था नेहमीं असेच. राजपुत्रांबरोबर प्रधान, मानकरी, सरदार वगैरे लोकांचे मुलगे शिकण्यासाठी घेण्याची चाल आमचे इकडे सर्वत्र होती असें अनेक जुन्या उदाहरणांवरून दिसतें. हस्तिनापुरास कौरवपांडवांचे राजपुत्र व त्याचे बरोबर शिकण्यासाठीं घेतलेले अनेक मोठ मोठयांचे मुलगे यांची द्रोणाचार्य व कृपाचार्य यांनीं चालविलेली एक मोठी शाळाच होती, असें म्हणण्यास चिंता नाहीं. तेव्हां यावरून उघड दिसतें कीं एकापेक्षां अधिक विद्यार्थी एकत्र बसवून त्यांना शिकविणें, ही पद्धत आमचे इकडे प्राचीन आहे. युरोपांत सुद्धां हाच प्रकार आहे. प्राचीन ग्रीक लोक व्याख्यानपद्धतीनें व संभाषणपद्धतीनें शिकवीत, तरी त्यांचे गुरू पुष्कळ विद्यार्थी घेऊनच शिकवीत. व निरनिराळ्या गुरूंकडे त्यांच्या त्यांच्या

लौकिकाप्रमाणें विद्यार्थी जमून, ती अमक्याची शाळा, असें म्हणत असत. त्यानंतरच्या काळीं ही सर्व युरोपभर ठिकठिकाणीं युनिव्हर्सिट्या व कालेजें शिक्षणाविषयीं प्रख्यात असत; तेथेंही पुष्कळ विद्यार्थीच एकत्र राहून शिकत. युरोपांत श्रीमंत लोकांमध्येंही मुलांना एकाद्या प्रख्यात शाळेंत अनेक मुलांबरोबर व एकाद्या प्रख्यात गुरूच्या हाताखालीं शिकण्यास पाठविण्याची चाल विशेष होती. तिकडे राजेलोक व श्रीमंत लोक यांनीं आपले मुलगे रोम, पारीस, आक्सफर्ड अशा शहरांसारख्या लांबच्या ठिकाणीं लहान वयांत सुद्धां शिकण्यास पाठविल्याचीं उदाहरणें अनेक आहेत. तेव्हां पुष्कळ मुलांना एकत्र मिळवून शिकविणें, ही शिकविण्याची पद्धत साधारणतः सर्वमान्य व बरीच जुनी दिसते. आतां पुष्कळ मुलें एकत्र मिळालीं म्हणजे त्यांतलीं अनेक एकच तऱ्हेचा अभ्यास करणारीं असतात, यामुळें त्यांचे निरनिराळे वर्ग बनतात. ही जी वर्ग-रचना-पद्धत, तिच्याविषयीं आज थोडका विचार करूं.

आमचे इकडे शाळांतून मुलांचे जे वर्ग बांधितात, ते त्यांच्या अभ्यासाच्या सारखेपणावरून बांधितात. कांहीं अभ्यासांच्या मर्यादा ठरवून त्यावरून इयत्ता किंवा पायऱ्या बांधलेल्या असतात, व एकेका इयत्तेचा अभ्यास करणारांचा एकेक वर्ग, अशी व्यवस्था असते. हा प्रकार आरंभापासून तों अत्यंत उच्च शिक्षणापर्यंत सर्वत्र सारखा चालू आहे. तेव्हां शाळा म्हटली कीं तेथें एका अभ्यासाच्या मुलांचे वर्ग बनवून शिकविणें व सारख्या अभ्यासाच्या इयत्ता बांधणें, हे प्रकार प्राचीन काळापासून सर्वमान्य झालेले दिसतात. आतां कित्येक श्रीमंत गृहस्थांस व राजेरजवाडे यांस आपली मुलें मध्यम, व गरीब वगैरे सर्व प्रकारच्या लोकांबरोबर बसलेलीं आवडत नाहींत, व यामुळें ते घरींच शिक्षक ठेवितात. तथापि तसें करून ही ते सहाध्यायी असे श्रीमंत व उच्च कुळांतले मुलगे एकत्र मिळवितात. कित्येक ठिकाणीं तर राजेरजवाड्यांसाठीं व श्रीमंतांसाठीं निराळींच विद्यालयें व कालेजें स्थापिल्याचीं उदाहरणें आहेत. इंग्लंद देशांत अगदीं अलीकडल्या काळापर्यंत बडे लोक आपणास मोठे

कुलीन, खानदानीचे व उच्चप्रतीचे समजत. तेव्हा एकादा मोठा श्रीमंत व्यापारी अथवा कारखानदार झाला, तरी तो ही त्यांचेमतें हलकाच असे. यामुळें हे लोक ज्या ठिकाणीं आपले लोकांचीं मुलें जास्त असतील अशा शाळेंत आपले मुलांना पाठवीत, अथवा घरचे घरींच होईल तेवढा अभ्यास करवीत. परंतु अलीकडे ह्या समजुती व हे प्रकार बहुतेक बंद झाले आहेत. या सर्व गोष्टींच्या संबंधानें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं युरोपांतील शाळा म्हणजे बोर्डिंग स्कुलें असून तेथें विद्यार्थी रात्रंदिस एकत्र राहावयाचे असतात; आमच्या इकडे तसा प्रकार नसून विद्यार्थी केवळ दिवसा शिकण्यापुरते एकत्र जमावयाचे असतात. यामुळें आमच्याइकडे भिन्नजाती, श्रीमंती, गरीबी वगैरे संबंधानें तिकडल्या इतक्या हरकती येण्याचा संभव नाहीं. अलीकडील शिक्षणपद्धतीसुरू झाल्यावर आमच्या इकडे जातींच्या संबंधानें कित्येक हरकती आलेल्या आहेत. परंतु हा प्रकार ही आतां बहुतेक मागें पडल्यासारखाच आहे.

तेव्हां सार्वजनिक शाळा, अभ्यासांच्या इयत्ता व साहाध्यायी विद्यार्थ्यांचे वर्ग, हे प्रकार सर्वमान्य झाल्या सारखेच आहेत. यांचे योगानें थोड्या खर्चांत पुष्कळ काम होतें; श्रमविभाग साधतो; व देशाचे सरकारास, म्युनिसिपालिटया वगैरे सार्वजनिक संस्थांस व मंडळ्यांस शाळा स्थापन करितां येऊन एकंदर उत्सुक प्रजाजनांस लोकशिक्षणाचा प्रसार कसा चालला आहे हें पाहाण्यास सांपडतें. यांतल्या सर्व गोष्टी जरी सर्वमान्य झाल्या आहेत, तरी शिक्षणाच्या धंद्यांत पडलेल्या मनुष्यास त्याविषयीं विचार करून आपलें मत ठरविणें जरूरीचें आहे; कारण अशा रीतीनें ठाम मत बनविल्यानें त्यांच्या वर्तनक्रमावर बरावाईट परिणाम घडण्याचा संभव असतो. जी गोष्ट आपणास चांगली वाटते, तीच आपले हातून चांगली होते; व जी गोष्ट वाईट वाटत असते, ती जरी आपलें कर्तव्य म्हणून आपणास करावयाची असली, तरी नीट होत नाहीं. म्हणून ज्या गोष्टी आपणास वहिवाटावयाच्या असतात, त्याविषयीं वारंवार विचार करून मत बनविण्याची प्रत्येक मनुष्यास फार जरूर आहे. तेव्हां शिकविण्याचा धंदा

करणारानें प्राचीन व अर्वाचीन शाळापद्धती व त्यांतल्या व्यवस्था यांचें निरंतर मनन केलें पाहिजे. सार्वजनिक शाळापद्धती आज सर्वमान्य झाली आहे. परंतु वर्गपद्धतीचा विचार करण्यापूर्वी आपण सार्वजनिक शाळांपासून नफे तोटे काय होतात, याविषयीं अगोदर थोडकासा विचार करूं.

ह्या विचारास आरंभ करण्यापूर्वी आमच्या वाचकांस प्रथमतः दोन गोष्टी सांगून ठेविल्या पाहिजेत. पहिली गोष्ट ही, कीं हे विचार आमच्या देशांतील ग्रंथकारांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें एखाद्या इंग्रजी लेखावरून घेण्याचा विचार नाहीं. याविषयीं केवळ स्वतंत्र विचार प्रदर्शित करण्याचा हा लेख लिहिणाराचा मानस आहे; व त्याविषयीं आमच्या वाचकांस काय वाटतें तें ही त्यांनीं कळवावें, अशी त्यांस विनंती आहे. कोणत्याही गोष्टीच्या विचाराला मूळ आधार कोणच्या तरी पाश्चिमात्य किंवा इंग्रजी लेखाचा असतो; व त्या देशांत प्रत्येक विषयाचें भांडार भरपूर असल्यामुळें तसें होणें स्वाभाविकही आहे. परंतु या लेखांत आमच्या इकडील सध्या चालू असलेल्या कित्येक शिकविण्याच्या पद्धतींच्या संबंधानें केवळ स्वतंत्र असे विचार प्रदर्शित करण्याचा लेखकाराचा उद्देश आहे.

सार्वजनिक शाळा म्हणजे जेथें कोणच्याही मुलास जाऊन शिकतां येईल अशा शाळा. या शाळांत मुलांची गरीबी, श्रीमंती, जात, धर्म, यांचा विचार नसतो. देशांतल्या लोकांचे आचारविचार, रीतिभाती, धर्ममतें वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन सार्वजनिक शाळा चालतेल्या असतात. यांत या गोष्टींच्यासंबंधानें अशी व्यवस्था असते, कीं सर्वांना मान्य म्हणून ठरविलेल्या अशाच गोष्टी शिकवाव्या व अमान्य गोष्टींची चर्चा करूं नये. इंग्लंडदेशांत या सार्वजनिक शाळा प्रथमतः स्थापन झाल्या, त्यावेळीं मोठाच वादविवाद झाला. प्रथमतः त्या देशांत सार्वजनिक शाळापद्धती बहुतेक नव्हतीच असे म्हटलें तरी चालेल. त्या देशांत देवळांमधून मुलांना घेऊन धर्मोपदेशक शिकवीत; व निरनिराळे धर्मपंथ जसे असत, तशाच त्या

निरनिराळ्या पंथाच्या शाळा असत. सध्या जरी सार्वजनिक शाळांचें वर्चस्व आहे, तरी अशा प्रकारच्या जुन्या देवळांतल्या धर्मोपदेशकांनीं चालविलेल्या शाळाही अजून पुष्कळ आहेत. निरनिराळ्या युनिव्हरसिट्या आहेत त्यांचें व्यवस्थेवरही धर्माचा पगडा मागें विशेष होता. परंतु त्याचें संबंधानें एक गोष्ट अशी असे, कीं देशांतला जो मान्य असा मुख्य धर्म, तो युनिव्हरसिट्यांना मान्य असतो; त्यांतले जे बारिकसारिक पंथ, त्यांचा विचार कोणी करीत नाहीं. याशिवाय देशांत सर्वप्रसिद्ध अशा पांच सात मोठाल्या सार्वजनिक शाळा आहेत. त्या शाळांना देशाचा सर्वमान्य धर्मपंथ मान्य असून, त्यांची व्यवस्था वेळोवेळीं ज्यांचे हातीं येईल. त्या उपपंथाचा पगडा तेथें असतो. या शाळांना सरकार कांहीं मदत करीत नाहीं. पूर्वकालीं कोणीतरीं ठेवलेला पैसा किंवा जमीन यांच्या उत्पन्नावर या सर्व युनिव्हरसिट्या, त्यांमधलीं कालेजे व शाळा चालतात. मागें देवळा देवळांतून लहान मुलांच्या शाळा असत, तेथले धर्मगुरूचा ज्या धर्मपंथाकडे ओढा असे, त्या पंथाचें तेथें वर्चस्व असे; व त्या धर्मपंथाचे लोक आपलीं मुलें पाठवीत. असा प्रकार बहुतेक अगदीं अलीकडल्या काळापर्यंत चालला होता. युरोपांतील अन्य देशांत सरकारानें मदत देऊन शाळाखातें सुरू केलें. आमच्या देशांत इंग्रजी राज्य झाल्यावर इकडे ही शाळाखातें सुरू झालें. पण इंग्लंडांत सरकारानें लोकशिक्षणाच्या संबंधानें अगदींच उदासीनता धरिली होती. याचें कारण असें होतें कीं देशांत निरनिराळे धर्मपंथ असल्यामुळें सर्वांना मान्य होईल अशी सार्वजनिक शाळापद्धती कशी सुरू करावी, हें कळेना. यामुळें मुद्दाम होऊन वाईटपणा घेऊन लोकांची अप्रीती कोण संपादणार? परंतु या स्थितीमुळें देशाचें फार नुकसान होत होतें. म्हणून सन १८७० सालचें सुमारास मि० ग्लाडस्टन हे मुख्यप्रधान असतां त्यांनीं एक सार्वजनिक शाळापद्धती काढली. त्यावेळीं या पद्धतीच्या संबंधानें खडेजंगी वादविवाद होऊन, मि० ग्लाडस्टन व त्यांचे अनुयायी यांच्याबद्दल लोकमत ही वाईट झालें. तथापि त्यांनीं लोकहिताकडे लक्ष देऊन ही पद्धती सुरू

करून तिच्या अनुरोधानें देशांत एक सार्वजनिक शाळाखातें काढलें, व सर्वत्र शाळा स्थापिल्या. या पद्धतीचें मूळ तत्व असें आहे, कीं कोणत्याही धर्मपंथाचा विचार न करितां लेखन, वाचन, गणित वगैरे अत्यंत जरूरीचे विषय या शाळांतून मुलांस शिकवावे. पुढें धर्मविचारांशीं संबंध येऊन मुलें तितकीं पोक्तवयाचीं झालीं, कीं निरनिराळ्या पंथांच्या शाळा आहेतच. या शाळाखात्याच्या स्थापनेच्या वेळीं जरी एवढी चळवळ झाली, तरी आतां सर्वत्र सामसूम होऊन ही व्यवस्था उत्तमप्रकारें चालली आहे व तींत निरनिराळ्या पक्षाच्या प्रधान मंडळ्यांनीं जरूर त्या सुधारणा करून, आतां इंग्लंदांत विद्याप्रसार झपाट्यानें होत आहे.

आतां आमच्या इकडचा विचार केला तर आमचे इकडे पूर्वीं सार्वजनिक शिक्षणपद्धती अशी कधींच सुरू नव्हती; बाकीच्या सर्व तऱ्हा मात्र बहुतेक तिकडल्या प्रमाणेंच असत. प्रथमतः ब्राह्मण, बौद्ध, जैन व पुढें मुसलमान, या निरनिराळ्या धर्मांच्या लोकांच्या शाळा असत, व एका धर्माच्या लोकांचीं मुलें दुसऱ्या धर्माच्या लोकांच्या शाळेंत जात नसत, हें उघड आहे. पण फार जुन्या काळीं ब्राह्मण, बौद्ध व जैन हे लोक आपल्या मुलांस व विशेषतः उच्च प्रतीचे विषय शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस परस्परांच्या शाळांतून मुद्दाम पाठवीत, व लहान मुलांना लेखनवाचनादि शिकविण्याचें काम तर बौद्ध व जैन धर्मी पंतोजी करीत असें दिसतें. पुढें निरनिराळ्या पंथांच्या निरनिराळ्या शाळा असत. धर्माचे वैष्णव, शैव वगैरे निरनिराळे जितके पंथ व उपपंथ, तितक्या जातीच्या निरनिराळ्या शाळा, त्याच प्रमाणें वेदान्त, न्याय, धर्मशास्त्र, वैद्यक वगैरे भिन्न शास्त्रांचे जेथडे निरनिराळ्या प्रकारचे पंथ होते, तितक्यांच्या निरनिराळ्या शाळा होत्या, असें अनुमान करण्यास जागा आहे. या शाळा त्या त्या पंथांतले मोठाले विद्वान् गुरू चालवीत व त्यांना त्यांच्या पंथांतले राजे व धनिक लोक वर्षासनादि देऊन मदत करीत. ही मदत धार्मिक राजे व श्रीमंत लोक आपल्याच पंथाच्या शाळेस करीत असें नाहीं, तर केवळ पारमार्थिक बुद्धीनें अन्यपंथीयांसही मदत करीत. या शाळांतून प्रचंड ग्रंथसंग्रह असे; व राजे आणि

श्रीमंत लोक ग्रंथसंग्रहांत नवीन ग्रंथ लिहवून ठेवण्याचाही यत्न करीत. त्या वेळीं ग्रंथांच्या प्रती तयार करण्याचे संबंधानें इतक्या अडचणी असतां प्रचंड ग्रंथांच्या एवढ्या प्रती तयार होऊन ठिकठिकाणीं मोठालीं ग्रंथालयें झालीं कशीं, याचें आज मोठें आश्चर्य वाटतें. सर्वांतही जैन लोकांचें मोठेंच आश्चर्य वाटतें. कारण त्यांनीं अमुक आपल्या धर्माचें किंवा अमुक दुसऱ्याच्या धर्माचें पुस्तक, याचा विचार न करितां केवळ विद्याप्रसारार्थ सर्वप्रकारच्या ग्रंथांच्या प्रती लिहून सर्व देशभर मोठालीं ग्रंथालयें स्थापित केलीं आहेत, व त्यांचे या संबंधानें आमच्या राष्ट्रावर अप्रतिम उपकार झाले आहेत. आज ज्या ठिकाणीं जैन पुस्तकालयें सांपडतात, त्या ठिकाणीं प्राचीनकाळीं जैन विद्यालयें होतीं हें उघड आहे. त्या ठिकाणीं सर्व पंथांचे विद्यार्थी जमत; तेथचे जैन पंडित जैन, बौद्ध व ब्राह्मणी या सर्व विद्यांत प्रवीण असत; ते सर्व विद्यांत विद्यार्थी तयार करीत, व आपण व विद्यार्थी मिळून ग्रंथ लिहून तयार करीत. असें स्पष्टपणें दिसून येतें. [ पुढें चालू. ]

---

## वार्षिक रिपोर्टाच्या माहितीचा अवशेष.

--=०+०=--

गेल्यां खेपेस वार्षिक रिपोर्टाची जी माहिती दिली आहे, तींत यारयाचे रिव्हिन्यु आफिसरांचे दोन महत्वाचे अभिप्राय स्थळसंकोचास्तव राहिले होते, ते या खेपेस पुढें देतों.:—

**रा० सा० एन्. सी. सोमण, डि. डे. कलेक्टर, बेळगांव.**

" लोकांमध्यें अज्ञान फारच आहे. शेतीभाती, गुरेढोरें व बायकापोरें यापलीकडे त्याना कांहींच कळत नाहीं. पुष्कळांना तर अपल्या जमिनीवर सारा किती आहे हें ही माहीत नसतें. मुलांना शाळेंत पाठवा म्हणून त्याचीं मनें वळवण्यांत श्रम खर्च करण्यापेक्षां खतें तयार करणें, लागवडीचे प्रकार, गुरांचे रोग, सरकारची राज्यव्यवस्था, आपले हक्क व अशा सारख्याच दुसऱ्या व्यवहारिक विषयांवर सोपी माहिती देण्याकरितां रात्रीचे वर्ग काढून लोकांच्या मनांत प्रकाश पाडण्याचे कामीं शाळाखात्यानें

आपल्या श्रमांचा उपयोग करणें बरें. एकदां लोकांना याची गोडी लागली कीं ते आपण होऊनच आपलीं मुलें शाळेंत पाठवतील. शाळामास्तरांच्या ताब्यांत जरूर तीं पुस्तकें व साधनें दिलीं व चांगलें काम बजावणारास कांहीं बक्षिसाची योजना केली तर हा हेतू सिद्धीस जाण्यास म्हणण्यासारखा खर्चही येणार नाहीं. व्याख्यानें विद्वान लोकांकडून लिहिवलेलीं असावीं व तीं छापवून द्यावीं. शाळामास्तरांचें काम एवढेंच कीं तीं पुराणाप्रमाणें लोकांस समजून सांगावीं."

हा हेतू स्तुत्य आहे. पण थोडकासा पगार मिळविणाऱ्या शिक्षकावर काय काय गोष्टी संपवावयाच्या याचाही विचार केला पाहिजे. बहुधा खेडेगावांत साधारण कांहीं समजतें असा शाळामास्तरच असतो. पाटील कुळकर्ण्यांचें ही काम त्याचे हातून हवें असलें तरी बऱ्याच पाटील कुळकर्ण्यांपेक्षां चांगल्या तऱ्हेनें होईल विचाऱ्याच्या गळ्यांत पोष्ट-आफिसानें माळ घालून बरेंच दिवस झाले. पोष्टाचें कामांत पडत असलेल्या त्रासाच्या मानानें मिळणारा मुशाहिराही फारसा नाहीं. शिवाय पोष्टाच्या कामामुळें त्याच्या मुख्य कामांत केवढी आडकाठी येते, हें सर्वांस ठाऊक आहेच. अशांत वर केलेली सूचना जर आणखी अमलांत आली, तर मग आमच्या शाळामास्तरांचे हाल पुसावयास नकोत!

**डि. डे. कलेक्टर धारवाड**.—"मुलांचा स्वभाव बनवणें हें अर्थात आईबापांचें मुख्य कर्तव्य होय. परंतु आईबापच अशिक्षित असले म्हणजे ही गोष्ट सिद्धीस जाण्याची आशा करणें व्यर्थ. प्राथमिक शाळांत मुलें पाठविणाऱ्या आईबापांत अशांचीच संख्या फार. म्हणून वर्तनाला व स्वभावाला सात्त्विक स्वरूप देणें हें प्रत्येक शाळामास्तराचें मी काम समजतों. या गोष्टीकडे पुष्कळ शाळामास्तर लक्ष पुरवीत नाहींत. 'दुसरे आपणास कदाचित पहातील असें जेव्हां असेल तेव्हांच चोरी करूं नये.' असें पुष्कळ मुलांकडून माझ्या प्रश्नास उत्तर मिळालें. सांपडण्याची भीति नसली म्हणजे चोरी करण्यास हरकत नाहीं, असा त्यांचा समज झाला असावासें वाटतें. दुसऱ्या कित्येक प्रश्नांचीं उत्तरें सुद्धां

अशींच असमाधानकारक होती. अलूर, गजेंद्रगड, व मुळगुंद येथील शाळांत मिळालेली उत्तरें समाधानकारक होतीं आणि याशाळांचे हेड-मास्तर, विशेषत: मुलांचे व सामान्यपणें देशाचें कल्याण ज्या गोष्टींवर अवलंबून आहे अशा ज्या वर सांगितलेल्या गोष्टी त्यांकडे लक्ष पुरवितात अशी खात्री झाली.

"माझ्या ताब्यांतील तालुक्यांतील स्त्रीशिक्षणाची स्थिती समाधान कारक नाहीं. या बाबतींत लोकच केवळ प्रतिकूळ आहेत असें नाहीं, तर शिक्षकलोक पुष्कळ वेळां या बाबतींत बेफिकीर राहतात. मुंडरगी येथील शाळा एवढीच कायती उत्तम तऱ्हेनें चालली आहे. तेथें उत्तम शिक्षक आहे असें मला आढळून आलें. पुष्कळ मुलींच्या शाळां-तून म्हातारे व बिनहुरूपाचे लोक शिक्षक आहेत. मुलींच्या शाळा ११ असून विद्यार्थीनींची संख्या ६९२ आहे.

मुसलमान लोकांचें शिक्षणबाबतींत मुळींच लक्ष नाहीं. तीच स्थिती हलक्या हिंदू जातींची. मुसलमान विद्यार्थ्यांची संख्या २८१ पेक्षां जास्त नाहीं. महारांकरितां म्हणून निराळ्या शाळा नाहींत. दुसऱ्या शा-ळांना जोडलेले असें दोन वर्ग आहेत, एक नवलगुंद तालुक्यांत व दुसरा रोण तालुक्यांत. या जातीचे विद्यार्थी ९२ पेक्षां जास्त नाहींत."

हा अभिप्राय महत्वाचा व विचार करण्याया सारखा आहे. वर नमूद केलेली स्थिती इतर ठिकाणींही दृष्टोत्पत्तीस येईल. मुलें स्वभावानें सरळ, प्रामाणिक व शरीरानें सदृढ अशीं बनविण्याचें प्रत्येक शिक्षकाचें कर्तव्य आहे; व या बाबतींत अगदींच दुर्लक्ष्य करणारे लोक शिक्षक या नांवास पात्र नाहींत यांत शंका नाहीं. परंतु बोर्डिंग स्कूलसची पद्धत इकडे सुरू होई-पर्यंत व उत्तम तऱ्हेनें तयार झालेले शिक्षक तयार होऊं लागतपर्यंत आणि शिक्षकांस अधिक आस्था वाटण्यासाठीं जरा जास्त योग्यतेचे पगार मिळूं लागतपर्यंत ही उणीव दूर होणें कठीण आहे. तरी पण शिक्षक म्हणवून घेणारांनीं या गोष्टीचा विचार करण्यासारखा आहे. शिक्षकाच्या कर्त-

त्यांची इयत्ता म्हणजे नेमलेले विषय शिकविणें एवढीच नव्हे, तर मुलांस सुनीतीचें वळण लावणें हें ही त्यांचें कर्तव्य आहे. हें शिक्षकांनीं विसरतां कामा नये.

---

# पत्रव्यवहार.

## ( १ ) पुस्तकांतील चुका.

वि० वि० शाळांत चालणाऱ्या कांहीं पुस्तकतून कांहीं चुका आढळल्या त्यांची याद सोबत पाठविली आहे. ही आपल्या शालापत्रकांत प्रसिद्ध करण्याची मेहेरबानी करावी, म्हणजे तिकडे ग्रंथकर्त्यांचें व शाळाखात्यांतील योग्य अधिकाऱ्यांचें लक्ष जाऊन त्या दुरुस्त होतील.

## चुकांची यादी.

| पुस्तकाचें नांव. | पान. | ओळ. | चुकीचा प्रकार. |
|---|---|---|---|
| १ मोडी पहिलें पुस्तक आवृत्ती १२. | ४८ | १७ | ओळ ७ यांत मुलगा म्हणतो, सकाळीं छड्या मारिल्या. आणि ओळ १७ यांत बाप म्हणतो 'कालच कां छड्या मारिल्या?' अर्थावबोधानें पाहतां 'कालच' या शब्दांऐवजीं 'आजच' हा शब्द असावा. |
| २ मराठी सहावें पुस्तक आवृत्ती ९. | १९ | ९ | ओळ ९ 'याप्रमाणें जेव्हां पाण्याचे सपाटीचा नीच प्रदेश भरून येऊं शकत नाहीं तेव्हां पाणी उच्च प्रदेशाकडून नीच प्रदेशाकडे निरंतर वाहत राहतें.' असें लिहिलें आहे. परंतु त्या वाक्याचे जागीं 'याप्रमाणें जेव्हां पाण्याच्या सपाटीचा नीच प्रदेश भरून येऊं शकत नाहीं तेव्हां पाणी नीच प्रदेशाकडून निष्प्रतिबंध अस |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | त्यामुळें तें उच्च प्रदेशाकडून नीच प्रदेशाकडे निरंतर वाहत राहतें.' असें वाक्य असावें. |
| ३ दादोकृत लघुव्याकरण. | १ | कलम ६ | कलम ९ यांत 'स्वर १६ आहेत ते अ, आ, इ० पासून औंपर्यंत.' असें लिहिलें आहे. तेथें "स्वर १६ आहेत ते अः पर्यंत' असें असावें. कारण कोणतेहीं व्यंजनास अनुस्वार आणि विसर्ग जोडावयाचा असला म्हणजे त्यांत त्यांचा बोध होतोच; इतकेंच नाहीं तर सोळा स्वरांची भरतीच होत नाहीं. तशांत लहान मुलांस १६ स्वर सांगण्याचा उद्देशही पुष्कळ ठिकाणच्या लिहिण्यावरून दिसतो. |
| ४ जमाखर्च पद्धती. | २ | कलम ४ | यांत रोजखर्डा व कीर्द लिहिण्यांत फरक नाहीं असें मात्र लिहिलें आहे. परंतु कीर्दीस खातेपान लावितात तसें रोजखर्ड्यास लाविलेलें कोठेंच आढळत नाहीं; म्हणून फरक नाहीं या शब्दांपुढें 'मात्र रोजखर्ड्यास खातेपान लावीत नाहींत.' असें वाक्य असावें. |

९ भूगोल वर्णन भाग १ यांत खानदेशचे वर्णनांत १६ तालुके आणि सहा पेटे असल्याचें दिसून आलें. परंतु ही आवृत्ती निघण्याचे आधींच या जिल्ह्यांत १७ तालुके आणि ४ पेटे झाले. शिवाय नशिराबाद तालुका मोडून जळगांव आणि निजामपूर पेटा मोडून नवापूर पेटा झाल्यास बरेच दिवस झाले असून अद्याप ही सुधारणा झाली नाहीं. तर ती सुधारणा व्हावी.

आपला नम्र,

तोताराम गणू झोपे.

## (२) गणिताची शंका.

वि० वि० लिमयेकृत अंकगणित भाग २ यांतील पांचव्या इयत्तेकारितां सामान्य प्रश्न भाग १९ उदाहरण ९ वें-असें आहे; "एक मनुष्य समुद्र किनाऱ्याजवळ उभा असतां त्यानें किनाऱ्याकडे येणाऱ्या एका जहाजावर तोफ उडाल्याचा प्रकाश पाहिला व लागलीच त्या जहाजाकडे जाण्याकरितां दर तासास ३ मैलांप्रमाणें निघाला. तो निघाल्यावर त्यास १९ सेकंदांनीं त्या तोफेचा आवाज ऐकूं आला. पुढें पहिल्यानें प्रकाश पाहिला होता त्या नंतर ९ मिनिटांनीं दुसऱ्यानें तोफ उडाल्याचा प्रकाश पाहिला, तेव्हां चालबंद करून तो उभा राहिला व नंतर १०½ सेकंदांनीं दुसऱ्यानें तोफ उडाल्याचा आवाज ऐकिला. तर ध्वनीचा वेग प्रत्येक सेकंदास १२०० फूट धरून जहाजाचा वेग दर तासास काय होता ?"

**खुलासा**---किनाऱ्यावरच्या मनुष्यानें तोफ उडाल्याचा प्रकाश पाहिला आणि लागलीच जहाजाकडे दर तासास ३ मैल या वेगानें जाण्यास निघाला; नंतर १९ सेकंदांनीं त्यानें तोफेचा आवाज ऐकिला, यावरून किनाऱ्यापासून कांहीं अंतर चालून गेल्यावर आवाज ऐकिला असें ठरतें. दर तासीं तीन मैल वेगानें तो १९ सेकंदात ६६ फूट चालून गेला व तेथें तोफेचा आवाज ऐकिला. किनाऱ्यापासून ६६ फुटांवर ध्वनी येण्यास १९ सेकंदें लागलीं. यावरून मनुष्य आणि जहाज यांतील अंतर १२००×१९=१८००० फूट; आणि मनुष्य व किनारा यांतील अंतर ६६ फूट; तेव्हां जहाज आणि किनारा यांतील अंतर पहिल्या तोफेच्या वेळीं १८०००+६६=१८०६६ फूट झालें.

आतां दुसऱ्या तोफेच्या वेळीं जहाज आणि किनारा ह्यांत किती अंतर पडलें तें पाहूं. पहिल्या तोफेचा प्रकाश पाहिल्याबरोबर तो मनुष्य चालूं लागला व नंतर ९ मिनिटांनीं दुसऱ्यानें तोफ उडाल्याचा प्रकाश पाहिला यावरून मनुष्य आणि किनारा ह्यांत-

$$६ : ९ :: ३ = \frac{१९}{६०} = \frac{१}{४} = १३२०$$ अंतर पड-

ल्यावर दुसरी तोफ उडाल्याचा प्रकाश पाहिला. व तेथें म्हणजे किनाऱ्यापासून १३२० फुटावर जहाजावरचा ध्वनी येण्यास $१०\frac{१}{२}$ सेकंदें लागलीं. यावरून जहाज आणि मनुष्य यांतील अंतर २०६० फूट होतें; ह्यास्तव दुसऱ्या आवाजाचे वेळीं किनारा आणि जहाज ह्यांतील अंतर १२६००+१३२०=१३९२० फूट होतें; पहिल्या तोफेच्या वेळीं किनारा व जहाज ह्यांतील अंतर १८०६६ फूट आणि दुसऱ्या तोफेच्या वेळीं किनारा आणि जहाज ह्यांतील अंतर १३९२० फूट होतें. पहिल्या तोफेचा प्रकाश दिसल्यानंतर दुसऱ्या तोफेचा प्रकाश ५ मिनिटांनीं दृष्टीस पडला. सबब ५ मिनिटांत जहाज १८०६६−१३९२० =४१४६ फूट चाललें; म्हणून ५ मि. : ६० मि. : : ४१४६ फूट

$$= \frac{६० \times ४१४६}{५ \times ५२८०} = \frac{२०७३ \text{ मैल}}{२२०} = ९\frac{९३}{२२०} \text{ मैल हें उ.}$$

ग्रंथकर्त्यांनीं पहिल्यावेळीं १८००० फूट आणि दुसरे वेळीं १३९२० फूट अंतर होतें असें मानिलें; म्हणून १८०००−१३९२०=४०८० फूट एवढी ५ मि. त जहाजाची चाल व यावरून १ तासांत $९\frac{३}{११}$ मैल असें उत्तर येतें. परंतु वास्तविक रीतीनें उदाहरणावरून पाहतां तसा अर्थ उत्पन्न होत नाहीं. उदाहरणाच्या रचनेंत जर ' मनुष्य किनाऱ्यावर पहिल्या तोफेचा आवाज ऐकून निघाला ' असें लिहिलें असतें, तर ग्रंथकर्त्यांनीं पुस्तकांत लिहिलेलें उत्तर खरें ठरलें असतें; परंतु प्रकाश पाहिल्याबरोबर मनुष्य जहाजाकडे जाण्यास निघाला व निघाल्यानंतर १५ सेकंदांनीं आवाज ऐकिला ' असें लिहिलें आहे, सबब किनाऱ्यापासून ६६ फुटावर पहिल्या वेळीं ध्वनी ऐकिला असें निश्चयात्मक ठरतें. सबब पहिला आवाज ऐकतेवेळीं किनारा आणि जहाज यांतील अंतर १८०६६ फूट होतें. इतकें अंतर ग्रंथकर्त्यांनीं हिशेबांत न धरतां १८००० फूट धरलें, म्हणजे ६६ अंतर हिशेबांत धरलें नाहीं. एवढाच कायतो माझ्या अल्पमतीस वाटलेला फरक आपणांस कळविला आहे, तरी येत्या अंकीं छापून प्रसिद्ध करण्याची मेहेरबानगी व्हावी. कळावें कृपा लोभ असावा हे विनंती.

आपला,

भिकाजी गणेश समुद्र

## ( १ ) छत्रेकृत अंकगणितांतील शंका.

वि० वि० छत्रेकृत अंकगणित भाग २ सुधारलेली आवृत्ती १ ली पृष्ठ १६३ उदाहरण ७० चा खुलासा माहे डिसेंबर स० १८९६ च्या शालापत्रकांत केलेला आहे. त्या खुलाशांत काढून दाखविलेलें उत्तर पूर्वीच्या आवृत्तींतील उत्तराशीं जमत नाहीं. व हीं दोन्हीं उत्तरें नवीन आवृत्तीतील उत्तराशीं जमत नाहींत. म्हणून विचार करून पाहतां असें लक्षांत आलें कीं, सदरहु उदाहरणाचा जो अर्थ घेऊन नवीन आवृत्तींत उत्तर दिलें आहे, तो अर्थ उदाहरणाच्या भाषेंत स्पष्ट झालेला नाहीं. यास्तव तो अर्थ स्पष्ट करून, खालीं उदाहरण करून दाखविलें आहे, त्यास अवश्य स्थळ मिळावें. उदा०:—"आज गुरुवारीं सकाळीं दोन घड्याळांत एकदम ९ वाजतात, आणि काल बुधवारीं सकाळीं पहिल्यांत ११ ला १० मि० कमी असतां दुसऱ्यांत ११ वाजले होते, तर आज संध्याकाळीं दोहोंमध्यें एकदम ९ वाजण्यासाठीं मंदाचा कांटा किती पुढें सारावा, अगर जलदाचा कांटा किती मागें सारावा?"

खुलासाः—बुधवारीं सकाळीं पहिल्या घड्याळांत ११ ला १० मि० कमी असतां दुसऱ्यांत ११ वाजतात. आणि गुरुवारीं सकाळीं दोन घड्याळांत एकदम ९ वाजतात. यावरून पहिल्या घड्याळांत २२ तास १० मि० झालीं तेवढ्या वेळांत दुसऱ्या घड्यांत २२ तास झाले. म्हणून पहिलें घड्याळ, दुसऱ्याच्या २२ तासांत १० मि० पुढें गेलें असें ठरलें. आतां गुरुवारीं सकाळचे ९ वाजल्यापासून संध्याकाळचे ९ वाजेपर्यंत १२ तास होतात. तितक्या अवधींत पहिलें घड्याळ किती पुढें जाईल, तें वर काढिलेल्या प्रमाणावरून काढिलें असतां—

२२ ता० : १२ ता० : : १० मि० = ५$\frac{५}{११}$ मि० पहिलें घड्याळ पुढें जाईल म्हणून इतकीं मिनिटें जलदाचा कांटा मागें सारिला पाहिजे.

वरच्या कल्पनेप्रमाणेंच दुसरें उत्तर काढावयाचें व तेंहीं वरच्या इतकेंच येतें. हें सहज ध्यानांत येणार आहे.

स० वि० भागवत.

फ. असि. कल्याण.

## ( ४ ) गोखलेकृत अंकगणितांतील शंका.

वि. वि. गोखलेकृत अंकगणित भाग दुसरा प्रश्नसमुदाय उदाहरण ( १०० ):—

"२१४३३०२ ह्या सात आंकड्यांनीं किती प्रकारच्या निरनिराळ्या संख्या होतील ?" असें आहे. आणि त्याचें उत्तर १६६१२० दिलें आहे. माझे मतें ह्याचें उत्तर १६३८३ येतें.

रीतीः—( ह्या सात आंकड्यांनीं होणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या संख्या विचारल्या आहेत म्हणजे एक आंकड्याच्या, दोन आंकडयांच्या, तीन आंकडयांच्या, चार आंकडयांच्या, पांच आंकडयांच्या, सहा आंकडयांच्या व सात आंकडयांच्या, मिळून किती होतील असा अर्थ.

उदाहरणांत जे सात आंकडे दिले आहेत त्यांत एक शून्य आहे; २ हा आंकडा दोन वेळ आला आहे, आणि ३ हा आंकडा तीन वेळ आला आहे व ४ हा आंकडा एक वेळ आला आहे. अशा आंकडयांच्या संख्यांसंबंधानें माझें मतें खालीं लिहिल्याप्रमाणें नियम ठरतो.

नियमः—संख्या बनविण्याकरितां दिलेल्या आंकडयांत जर शून्य असून तेच तेच आंकडे पुनः पुनः आलेले असतील तर त्या आंकडयांत शून्यासुद्धां निरनिराळे जितके आंकडे असतील ती संख्या मुख्य स्थानीं मांडून जितक्या आंकडयांच्या संख्या काढावयाच्या असतील त्यापेक्षां एक कमी इतका त्या संख्येला घातप्रकाशक द्यावा; आणि त्याला मुख्य स्थानीं मांडलेल्या संख्येपेक्षां एक कमी इतका गुणक द्यावा. तितक्या संख्या होतील.

ह्या नियमाप्रमाणें सदर सात आंकडयांपासून होणाऱ्या निरनिराळ्या संख्या काढावयाच्या.

सदर अंकांत शुन्यासुद्धां २, १, ४, ० असे निरनिराळे चार अंक आहेत म्हणून वरील नियमाप्रमाणें:—

| | | |
|---|---|---|
| एक अंकांच्या संख्या | $= ४^{०} \times ३ =$ | ३ |
| दोन अंकांच्या संख्या | $= ४^{१} \times ३ =$ | १२ |
| तीन ,, | $= ४^{२} \times ३ =$ | ४८ |
| चार ,, | $= ४^{३} \times ३ =$ | १९२ |
| पांच ,, | $= ४^{४} \times ३ =$ | ७६८ |
| सहा ,, | $= ४^{५} \times ३ =$ | ३०७२ |
| सात ,, | $= ४^{६} \times ३ =$ | १२२८८ |
| | एकूण बेरीज | १६३८३ |

ह्या निरनिराळ्या प्रकारच्या सर्व संख्या झाल्या.

.'. १६३८३ हें उत्तर.

दत्तात्रय गोपाळ तेंडुलकर.

---

## सूक्ततरंग.

—:०:—

२१ अहितकर[illegible] कल्पी अल्पायु बाळ थानींच.

२२ सेव्य सदुप[illegible]धाग्रह; असदुपदेश हा सुराग्रह रे !

२३ कोणीहि सदु[illegible]शामृतलवहि प्राशितां कधीं न मरे.

२४ सत्सत्पतिपासु[illegible] प्राप्त नव्हे दुष्ट मंडळीस हित.

२५ कामें, क्रोधें, लोभें नागविले अमित, यांस जे भुलले—
यांच्या कुदृष्टिपातें तेजस्वी पुरुषहीरही उडले.

२६ बा ! दुरभिमान [illegible] वस, देइल धनपतिकरींहि खर्पर हा.

२७ जो भव्य पावणारा सद्गुरु सद्वाक्सुधेसि सुनर पितो.

२८ वांच्छित शमा अकाम प्राज्ञ, इतर इच्छितो सकाम रणा.

२९ सिंव्हीला तोचि उचित सुत, जो मारूनि सिंधुरा झाला.

३० केवळ हितोक्ति कृत्या, भासे त्या काळदाटि ज्या गांठी.

३१ निर्मळपणें निघावें रक्तपुटांतूनि केविं सूतानें.

---

१ फाटून गेले.

( पुढें चालू. )

## चित्रलेखन मूलतत्व (पुस्तक पहिलें)

सतत पंचवीस वर्षे ड्रॉईंग शिकविण्याच्या अनुभवावरून ज्या ज्या गोष्टी विद्यार्थ्यांस प्रथम शिकविणें अवश्य वाटलें त्या सर्व शास्त्रीय नियमानें पद्धतशीर बसवून हें पुस्तक तयार केलें आहे. पुस्तकाची किंमत प्रथम सहा आणे ठेविली होती. परंतु कलेचें शिक्षण व अभिरुची आपले देशांत जितकी असावी तितकी नसल्या कारणानें व त्याचा प्रसार फार व्हावा व विद्यार्थ्यांस घेण्यास सुलभ जावें करितां याची किंमत अगदींच कमी म्हणजे फक्त अडीच आणे केली आहे. अशा तऱ्हेचें हें मराठींत पहिलेंच पुस्तक आहे. तेव्हां सर्वांनीं याचा उपयोग करून घ्यावा अशी आमची शिफारस आहे.

हें पुस्तक मे. विद्याखात्याचे डायरेक्टर सा. बा. यांनीं मराठी शाळांकरितां व मराठी शाळांचे कायमऱ्यांकरितां आपलें मेमो नंबर १०९४ तारीख १. १२. १९०० मध्यें पास केलें आहे. कळ

म्यानेजर चित्रशाळा छापखाना,
पुणें सिटी.

---

# बक्षिस. बक्षिस. बक्षिस

## तरूवाला.

फक्त २॥ रुपये भरून आमच्या "कादंबरी कल्पद्रुमास" होणाऱ्या ग्राहकांस फुकट. कल्पद्रुमाचे आठ अंक प्रसिद्ध झाले असून त्यांत "कृष्णकांताचेंमृत्युपत्र" ही सर्वोत्कृष्ट कादंबरी संपूर्ण झाली आहे. आमच्या ग्राहकांस वरील पुस्तक बक्षिस मिळून वर्षअखेर उत्कृष्ट बंगाली आणि हिंदी कादंबऱ्यांच्या भाषांतराचीं ६०० पृष्ठें संग्रह करावयास सांपडतील.

गणपती आळी—वांई
जिल्हा सातारा. } अनंत केशव चितळे

# सार्थ प्राकृत प्रकाश.

सदरहू पुस्तक आमचे मित्र रा. रा. **शंकर रामचंद्र हतवळणे** ह्यांनीं प्रसिद्ध प्राकृत वैयाकरण वररूची ह्यांच्या ग्रंथाच्या आधारें केलें आहे प्राकृत भाषा ही संस्कृत व हिंदुस्थानांतील अर्वाचीन भाषा ह्यांमधील एक सांखळी आहे. संस्कृतांतून प्राकृतांत व प्राकृतांतून अर्वाचीन भाषांत रूपें कशीं आलीं, हें समजल्याशिवाय शब्दांची खरी व्युत्पत्ती समजली असें म्हणतां येत नाहीं. पुष्कळ ऐतिहासिक प्रश्नांशीं प्राकृताचा निकट संबंध आहे. तेव्हां ह्या भाषेचा चांगला परिचय असल्याशिवाय त्यांचा उलगडा करण्यास अडचण असते. शब्दांचीं रूपें कशीं बनलीं व त्यांस आचार्यांच्या सूत्रांचा मूळ आधार कोणता, हें प्रस्तुतच्या पुस्तकावरून दिसून येईल. प्राकृत प्रकाशाचे एकंदर १२ परिच्छेद असून पहिल्या ९ परिच्छेदांत महाराष्ट्री जी मुख्य प्राकृत भाषा तिजविषयीं व बाकींच्या तीन परिच्छेदांत पैशाची, मागधी व शौरसेनी ह्यांच्या संबंधाच्या मुख्य मुख्य गोष्टी सांगितल्या आहेत. हें पुस्तक मराठी शिक्षक, ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थी व हायस्कुलांतील वरच्या वर्गांतून मराठी शिकणारे विद्यार्थी ह्यांस विशेषें-करून उपयोगीं पडण्यासारखें आहे. पुस्तकाची किंमत ८८ आहे. टपाल हशील शिवाय. एकदम बरींच पुस्तकें घेणारास कमिशन मुबलक मिळेल. पुस्तकें आमच्या छापखान्यांत विकत मिळतील.

म्यानेजर चित्रशाळा छापखाना.

---

## विक्रीस तयार. किं. १२ आणे.

मेहेरबान लिव्हारनर साहेब यांनीं इंग्रजींत लिहिलेले सिटीझन आफ इंडिया या पुस्तकांचे मराठी भाषांतर छापवून विक्रीस तयार आहे. व हे बुक डा. आ. प. ई. यांनीं मराठी ५।६ यत्तेकरितां नेमलें आहे.

म्याकमिलन आणि कंपनी.

१२ ब्यॉक स्ट्री. मुंबई.

---

प्रकाशक—शंकर नरहर जोशी.

*Registered No* 179

पुस्तक १२. ॥ श्री ॥ अंक ५.

# मराठी शालापत्रक.

# MARATHI SCHOOL PAPER

## मे १९०१.

विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| रावसाहेब प्रिन्सिपल काशिनाथ नारायण साने. .... .... | १०९ |
| नवीन मनुष्य गणती .... .... .... .... .... | ११४ |
| हवामान .... .... .... .... .... .... | ११९ |
| पत्रव्यवहार .... .... .... .... | १२९ |
| —१ भाषणांतील न्याय २ सिद्धांत कौमुदींतील शंका.— ... | |
| सूक्ततरंग .... .... .... .... | १३२ |


'चित्रशाळा' प्रेस, पुणें.

आगाऊ वार्षिक वर्गणी, टपालखर्चासह रु० १॥.

फुटकळ अंकास ⅛ ॥.

कै० केरो लक्ष्मण छत्रेकृत

# अंकगणित

## भाग १।२।३

कै० केरो लक्ष्मण छत्रे यांचे चि० रावसाहेब निळकंठ विनायक छत्रे यांनीं पूर्वीच्या अंकगणितांत हल्लीं पुष्कळ सुधारणा करून नवीन आवृत्ती छापविल्या आहेत व ठिकठिकाणीं जास्त उदाहरणें व व्याख्याही दिल्या आहेत. पूर्वी दुसरा भाग होता त्याचे हल्लीं दोन भाग केले आहेत. म्हणजे एकंदर ३ भाग झाले आहेत. भाग पहिला किंमत ८≡॥. भाग दुसरा किं० ।=. व तिसरा भाग लवकरच छापून प्रसिद्ध होईल. शाळामास्तरांस कमिशन मुबलक मिळेल.

म्यानेजर चि० शा० प्रे० पुणें.

---

रा. भि. जोशीकृत

# बालबोध मराठी व्याकरण.

याची पुष्कळ जास्त माहिती घालून सुधारलेली

## दुसरी आवृत्ती.

चित्रशाळेंत विक्रीस तयार आहे. पृष्ठसंख्या १८०.

किंमत ८५ आणे ट० ख० ८१

---

## ५००० म्हणींचा कोश (अकलेची बँक).

किं० १॥ रुपया. { गणेश नारायण देशपांडे तारळेकर. बुधवार पेठ घर नं० २४ पुणें शहर



रावसाहेब काशिनाथ नारायण सानें.

प्रिन्सिपाल पुणें ट्रेनिंग कालेज सन १८९४-१९०१.

चित्रशाळा प्रेस पुणें.

# शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यांसी । हें अवघें सद्‍गुरूपाशीं।
सद्‍गुरू पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळां जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १९ मे १९०१. अंक ५.


## रावसाहेब प्रिन्सिपाल काशिनाथ नारायण ऊर्फ बाबासाहेब साने बी. ए.

( मागील अंकावरून पूर्ण. )

८. ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थ्यांच्या संबंधानें कालेजाच्या अधिकाऱ्यांवर दोन प्रकारची जबाबदारी असते. एक, विद्यार्थ्यांच्या बोर्डिंगांतील वागणुकीची; व दुसरी, कालेजांतील विद्याभ्यासाची. बोर्डिंगांत विद्यार्थ्यांवर प्रिन्सिपल साहेब स्वतां किंवा सुपरिंटेंडेंट यांच्या मार्फत जशी नजर ठेवतील, त्या मानानें बोर्डिंगांतील विद्यार्थी शिक्षक बनल्यावर आपल्या विद्यार्थ्यांवर गृहशिक्षणासंबंधानें नजर ठेवितील हें उघड आहे. कालेजांत जशा प्रकारें त्यांस शिक्षण मिळेल, त्याच प्रकारें पुढें ते आपल्या विद्यार्थ्यांस शिक्षण देतील. यास्तव रावसाहेब साने यांचें असें मत झालें होतें कीं, बोर्डिंग व कालेज हीं एका ठिकाणीं, निदान फार जवळ तरी असावीं. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी वगैरे पाश्चिमात्य देशांत ज्याप्रमाणें मुलांच्या शाळांत बोर्डिंगें असतात त्याप्रमाणें तिकडील ट्रेनिंग कालेजांसही बोर्डिंगें असतात. हीं बोर्डिंगें पुनः शाळेपासून दूर नसून शाळा, बोर्डिंग व प्रा-

क्टिसिंग स्कूल या संस्था एकत्रच असतात. त्याचप्रमाणें तिकडील ट्रेनिंग कालेजांना वस्तुदर्शनशिक्षण व बालोद्यानशिक्षणपद्धती यांना उपयोगीं पडणारी उपकरणसामुग्री विपुल असते. आमच्या इकडे गरीबीमुळें या सर्वच गोष्टींचा अभाव आहे. धारवाड व अमदाबाद येथील ट्रेनिंग कालेजांची बोर्डिंगें व शाळा एकेच जागीं आहेत. पुण्यास तशी सोय नाहीं, ही गोष्ट रा० सा० साने यांचे मनास फार लागून राहिली होती. इंग्रजी कालेजांना गांवाबाहेर जशा भव्य इमारती असतात, तशी एकादीं ट्रेनिंग कालेजासही असावी असें त्यास फार वाटत होतें. तसें होणें जर शक्य नाहीं तर, हल्लीं बोर्डिंग व कालेज हीं एकमेकांपासून लांब आहेत तीं नजीक तरी असावीं व बोर्डिंगची इमारत चांगली असावी अशी त्यांची इच्छा होती. बोर्डिंग व कालेज हीं अगदीं नजीक किंवहुना एका इमारतींत असलीं तर फार बरें; व ही इमारत अशा ठिकाणीं असावी कीं, तेथें तालमीची व प्राक्टिसिंग स्कुलाची सोय उत्तम जमावीं; ही व्यवस्था घडल्यास विद्यार्थ्यांचा वेळ जाण्यायेण्यामध्यें मुळींच फुकट जाणार नाहीं; कालेजांतील उपकरणांचा उपयोग वाटेल तेव्हां अनायासानें करितां येईल; शिक्षकांसही विद्यार्थ्यांच्या बोर्डिंगांतील वर्तनावर चांगली नजर ठेवितां येईल; व असें झालें म्हणजे हल्लींच्याच दोन तीन वर्षांच्या काळांत विद्यार्थ्यांची कार्यक्षमता अधिक वाढेल. रावसाहेब साने यांचें मत निदान बोर्डिंग कसब्या पेठेंतून काढून दुसऱ्या कोणत्या तरी चांगल्या, हवाशीर व कालेजापासून नजीक अशा जागीं न्यावें असें होतें. ही गोष्ट घडविण्याविषयीं त्यांचा एकसारखा प्रयत्न चालला होता. आम्ही मोठ्या आनंदानें कळवितों कीं, या त्यांच्या प्रयत्नास यश आलें आहे. रावसाहेब यांची बदली होण्याच्या सुमारासच सरकारांतून बोर्डिंग हौसकरितां भाड्याची रकम वाढविल्याबद्दल ठराव झाला आहे; आणि बोर्डिंगसाठीं एक चांगली जागा घेण्याचें ठरलें आहे.

९. ट्रेनिंग कालेजांत येणारे विद्यार्थी फार गरीब असतात. परंतु कालेजांत येणारे विद्यार्थी उत्तम बुद्धिवान व उद्योगी असल्याखेरीज त्यांची तेथें डाळ

शिजत नाहीं. बुद्धिवान मंडळीस इंग्रजी शिकण्याची सोय नसली, म्हणजे ते ट्रेनिंगमध्यें येतात. थोडेवर्षांपूर्वीं एका विद्वान ग्रंथकारानें आपल्या ग्रंथांत असें विधान ठोकून दिलें होतें कीं जगांतले दगड तेवढे ट्रेनिंग-कालेजांत जाऊन शाळामास्तर होतात ! या चुकीच्या समजुतीचें निरसन करण्यासाठीं शालापत्रकांत लेख लिहिण्याची रा. सा. यांनीं सूचना केली व हें मत चुकीचें आहे, असें आपल्या स्वतःच्या व कै० दिक्षीत यांच्या अनुभवशीर लेखांनीं सिद्ध करून दिलें. कालेजांतील विद्यार्थ्यांची गरीबी लक्षांत आणून रा. सा. साने यांनीं त्यांच्या स्कालरशिपा अनुक्रमें रु. ८।७॥६ अशा होत्या, त्या ८, ७॥ व ७ अशा करविल्या. याप्रमाणें आतां ट्रेनिंग कालेजांत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस खर्चास पुरेसा पगार मिळतो असें म्हणण्यास चिंता नाहीं. परंतु अशा रीतीनें मदत आली तरी, पुढें लोकशिक्षणाचें काम ज्यांचे हातीं यावयाचें, त्यास स्वतःचे आरोग्याची व अभ्यासाची काळजी अवश्य असली पाहिजे; व त्यासाठीं त्यांस जरी थोडासा खर्च करावयास पडला तरी ती गोष्ट वावगी आहे असें कोणी म्हणणार नाहीं. ट्रेनिंगांतील तरुण विद्यार्थ्यांस योग्य वळण अवश्य लाविलेंच पाहिजे. कारण हेच विद्यार्थी पुढें शिक्षक होऊन लहान मुलांस वळण लावणार. यासाठीं रा. सा. साने यांनीं असें ठरविलें आहे, कीं प्रत्येक विद्यार्थ्याचे अमुक अमुक साधे व गरम कपडे असलेच पाहिजेत; त्याप्रमाणें पुढें ड्राईंग वगैरे विषय शिकण्यासाठीं स्वतःची सामुग्री असली पाहिजे, म्हणून व नेहमींच्या उपयोगाचीं कांहीं पुस्तकें घेतां यावीं व नोट बुकें बाळगितां यावीं म्हणून प्रत्येकानें निदान १० रुपये खर्चासाठीं आणिलेच पाहिजेत. या दोन्ही नियमांपासून फार फायदा झाला आहे, असें अनुभवांतीं दिसून आलें आहे. याप्रमाणें रा. सा. साने हे विद्यार्थ्यांच्या कालेजांतल्या अभ्यासाकडे जशी नजर ठेवीत, त्याप्रमाणें त्यांचा घरचा अभ्यास व राहाणी यांजकडेही नजर ठेवीत.

१०. रावसाहेब साने यांचें मत असें आहे कीं, ट्रेनिंग कालेजांत जितके विषय विद्यार्थ्यांस शिकावे लागतात, त्या सर्व विषयांत त्यांची

तयारी यथास्थित व पद्धतशीर झाली पाहिजे. अमुक विषय मुख्य व अमुक गौण ही कल्पना प्रशस्त नाहीं. कालेजांतील विद्यार्थ्यानें प्रत्येक विषय पुढें लहान मुलांस शिकवावयाचा आहे ही गोष्ट लक्षांत बाळगिली पाहिजे. जे विषय विद्यार्थ्यांस केवळ आपले आपण तयार करितां येण्यासारखें असतील, त्यांवर शिक्षकानें आपला वेळ खर्च करावयास नको; परंतु ते विषय विद्यार्थ्यांनीं काळजीनें केले आहेत कीं नाहींत, हें शिक्षकानें अवश्य पाहिलें पाहिजे. मोडीलेखन, वर्गाध्यापन, प्राक्टिसिंग स्कूलच्या कामाची तयारी, वगैरे अभ्यास त्यांनीं आगाऊ केले आहेत, अशी खातरी करून घेण्यास ते फार जपत. अशा कामीं विद्यार्थ्यांस सर्व प्रकारें मदत करणें फार अगत्याचे आहे, असें जाणून त्यांस पुस्तकें, सामान वगैरे जें लागेल तें ते फार आवडीनें पुरवीत. मोडीलेखनाचें काम कितीएक वर्षेपर्यंत त्यांनी स्वतांकडे ठेविलें होतें. त्यांनीं मोडी लेखनाकरितां आंखलेले प्रमाणांकित कागद वगैरे मुद्दाम तयार करवून घेऊन, आपल्या मताप्रमाणें नवीन किते छापवून घेतले होते. प्राक्टिसिंग स्कुलावर शिकवावयास जाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यानें रोजच्या धड्यांचें टांचण करून तें हेडमास्तरास दाखवावें व त्यांजकडून तपासून घेऊन नंतर वर्ग शिकविण्यास आरंभ करावा, असा त्यांनीं नियम केला असून तो सध्या अमलांत आहे.

१२. ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थ्यांच्या नीतीवर एकंदर पुढील पिढीची नीतिमत्ता अवलंबून असल्यामुळें ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थ्यांच्या नीतिमत्तेबद्दल फार काळजी घेणें अतिशय अगत्याचे आहे. नीती शिकविणारा स्वतां नीतिमान नसेल तर विद्यार्थी नीतीचे सिद्धांत परीक्षेंत बरोबर उतरून देतील, परंतु ते त्यांच्या मनावर प्रतिबिंबित होणार नाहींत. तसें होण्यास शिक्षकाचें आचरण सर्वथैव त्या सिद्धांताप्रमाणें असणें अवश्य आहे. " उत्तम गुण प्रगटवावे ॥ मग भलत्यासि बोलतां फावे. " असें रामदासांनीं म्हटलें आहे, त्याचा तरी व्यंगितार्थ हाच आहे. आपलें आचरण शुद्ध नसल्यास लोकांस शुद्धाचरण ठेवण्याचा उपदेश करणें हें केवळ

भाडोत्रीपणाचें काम होय. अशा उपदेशानें त्या बोधकर्त्याची थट्टा मात्र होते. रावसाहेब साने यांचा आचार व विचार यांत पूर्ण तादात्म्य असल्यामुळें, त्यांचा उपदेश बहुमोलाचा वाटून त्याप्रमाणें वागण्यास त्यांचे विद्यार्थी फार उत्सुक असतात. सरकारी शाळेंत नीतिशिक्षण मिळत नाहीं व त्यामुळें विद्यार्थ्यांच्या नीतिमत्तेचें भान कमी पडत चालले आहे, असा कित्येक लोक आरोप करीत असतात, तो व्यर्थ आहे, असा रावसाहेब साने यांचा अभिप्राय आहे. मराठी क्रमिक पुस्तकांत जे एकंदर पाठ आहेत, त्यांमध्यें शाळेंत शिकविण्याजोगीं सर्व नीतितत्त्वें संग्रहित झालेली आहेत, अशी त्यांनीं खातरी करून घेतली आहे. शिकविणारे लोकही तीं तत्त्वें योग्य रीतीनें शिकविण्यास लायक असतात अशी त्यांची समजूत आहे. अलीकडील विद्यार्थ्यांची नीती जर बिघडली असेल, तर तिचें मूळ कोणत्याही रीतीनें प्रस्तुतच्या शिक्षणक्रमाशीं नसून सामान्यतः सर्व समाजाच्या एकंदर आचारविचारांत जो फरक पडला आहे व पडत आहे त्यांत असले पाहिजे, असें आह्मांस वाटतें. शाळाखातें स्थापन झालें तेव्हां जीं नीतितत्त्वें शाळानिहाय शिकवीत असत, तीं हल्लीं शिकवून शिवाय दुसऱ्याही कित्येक नीतिसंबंधी गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनांत हल्लीं पहिल्यापेक्षां चांगल्या प्रकारें ठसविण्यांत येत आहेत. पहिल्यापेक्षां शाळांची संख्या व शिक्षकांची संख्या हल्लीं फार वाढली आहे; परीक्षक लोकही सुशिक्षित व वरिष्ठ शिक्षणांत प्रवीण असे आहेत; अशा स्थितीत शाळाखात्यांतील उणीवेमुळें विद्यार्थी अनीतिमान होतात, असें म्हणण्यांत अर्थ नाही. विशिष्ट धर्मांतील आचार विचार शाळेंत शिकविण्याची सोय केलेली नाहीं, हें खरें; परंतु त्यामुळें सामान्य नीतीला धक्का कसा बसावा, हें आम्हांस समजत नाहीं. क्रमिक पुस्तकांत जागोजाग जे नीतिनियम सोदाहरण सांगितले आहेत त्यांचें मार्मिकरीत्या स्पष्टीकरण कारितां यावें म्हणून बाबासाहेब यांनीं शाळापत्रकांत एक निबंध लिहिण्यास सुरुवात केली आहे. त्यांतील विषय कालेजांतील विद्यार्थ्यांस या पूर्वीच त्यांनीं शिकवून पाहिला आहे.

१३. सेव्य व सेवक, गुरू व शिष्य, परीक्षक व उमेदवार इत्यादिकांचा परस्पर संबंध फारच नाजुक असतो. सेव्यानें सेवकापासून

काम करून घ्यावयाचें असेल, गुरूला शिष्यांस अधिक अभ्यास कर म्हणून सांगावयाचें असेल, व परीक्षकास परीक्षेकरितां चांगले उमेदवार यावे, असें वाटत असेल, तर प्रत्येकानें काहीं एक करावयास ज्यास सांगावयाचें त्यास दैववादी न बनवीतां कर्तृत्ववादी बनविण्याचा पूर्ण प्रयत्न केला पाहिजे. चाकरास काम चांगलें करितां यावें म्हणून अवश्य त्या सोयी धन्यानें करून दिल्या पाहिजेत, नाहींपेक्षां धन्यानें सांगितलेलें काम चाकर दैवावर हवालील. विद्यार्थ्यानें आपला अभ्यास उत्तम करावा अशी इच्छा असल्यास शिक्षकानें तो निश्चित, बेतवार करितां येण्या इतकाच नेमून दिला पाहिजे; नाहींपेक्षां विद्यार्थी तो मुळींच न करितां स्वस्थ बसेल. तसेंच ज्या उमेदवाराची परीक्षा घ्यावयाची त्यास परीक्षकानें अमुक विषयांत तपासावयाचें, अशी स्पष्ट मर्यादा ठरवून ठेविली पाहिजे; नाहींतर त्याचा गोंधळ होऊन त्याला यशप्राप्तीचा भरंवसा न आल्यामुळें पास होण्याचा प्रयत्न मनापासून करण्याची इच्छा होणार नाहीं. रावसाहेब साने यांच्या लक्षांत ही गोष्ट येऊन सर्टिफिकेट परीक्षेंतील वर्गाध्यापनाच्या विषयांत परीक्षा घेण्याच्या संबंधानें त्यांनीं फार मोठा फेरफार केला. ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थ्यांनीं आयत्यावेळीं परीक्षक जो विषय सांगतील, तो एकदम शिकवून दाखविला पाहिजे, असा पूर्वी परिपाठ असे व यामुळें पुष्कळ विद्यार्थी त्या विषयांत योग्य तयारी नसल्यामुळें शिकवितांना गडबडून जात, व त्यांचें मोठें नुकसान होई. " सर्वः सर्वं न जानाति " या म्हणीची व्याप्ती सर्वत्र असल्यामुळें व विद्यार्थ्यांची विषयज्ञानाची परीक्षा इतर रीतींनीं करितां येत असल्यामुळें वर्गाध्यापनाच्या वेळीं शिक्षक-विद्यार्थ्यांची शिकविण्याची पद्धती कशी आहे हें पाहण्याचा मुख्य हेतु आहे हें लक्षांत आणून रा. सा. साने यांनीं योग्य मुदतपर्यंत अध्यापनाचे विषय अगोदर नेमून देण्याची पद्धती सुरू केली व ती सफल झाली असा अनुभवही आला. हल्लीं अध्यापनाच्या वेळीं शिकवावयाच्या विषयांत शिक्षक आधींच तरबेत असल्यामुळें व शिवाय त्यास पाठांचीं टांचणें आगाऊ करण्याची सवड देऊन ठेवण्याची सुरुवात केल्यामुळें, त्याची शिष्यांपुढें

विषय मांडण्याची तऱ्हा, विद्यार्थ्यांच्या मनांत शिरून त्यांचें रहस्य शोध-ण्याचें कौशल्य, बहुश्रुतपणा, वक्तृत्व, प्रश्न विचारण्याची खुबी, वर्गावर छाप, चोहोंकडे नजर, समयसूचकता इत्यादी गुण विशेष कसोशीनें तपासण्याची परीक्षकांस उत्तम सवड मिळाली आहे. यामुळें अध्यापनासारख्या प्रमुख विष-यांत उमेदवारांस निवळ दैव-वादी बनावें लागत असे, ती अडचण आतां दूर झाली आहे. पाठांच्या टांचणांचे अनेक नमुने रावसाहेब साने यांनीं शालापत्रकांत प्रसिद्ध करून कालेजाबाहेरील शिक्षकांस तो मार्ग सुलभ करून दिला आहे.

१४. सृष्टी ही सर्व शास्त्रांची जननी होय. सृष्टींतील वस्तू स्वतां पाहून व त्यांचा अनुभव घेऊन बुद्धिमान लोकांनीं जे अनेक नियम बांधिले तींच शास्त्रें होत. वस्तू पाहिल्याशिवाय तिच्या गुणधर्माविषयीं अटकळ केली तर ती चुकण्याचा विशेष संभव असतो. बिनचूक अनुमान होण्यास वस्तूचें प्रत्यक्ष ज्ञानच अवश्य आहे. याकरितां वस्तू प्रत्यक्ष दाखवून त्याच्या गुणधर्मांची माहिती करून देणें फार हितावह आहे. शिक्षणाचा मुख्य हेतू मुलांस ज्ञानप्राप्ती करून देणें हा नव्हे, तर ज्ञानप्राप्ती करून घेण्याचा मार्ग शिकविणें हाच होय. मुलांस प्रत्यक्ष वस्तू दाखविल्या असतां शिक्षक जें कांहीं सांगेल तें तर विद्यार्थ्यांस सुलभपणें समजेलच; परंतु शिवाय मुलांस स्वतां विचार करण्याचा नाद लागून त्यापासून त्याचा कायमचा फायदा होईल ही गोष्ट फार महत्वाची आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांत "वस्तुदर्शन पाठांस" अलीकडे शिक्षणक्रमांत अग्रस्थान मिळत चाललें असून प्रत्येक विषय तशा प्रकारें कसा शिकवितां येईल, याचा तिकडील विद्वान हल्लीं एकसारखा विचार करीत आहेत. लहान मुलांची नैसर्गिक चंचलवृत्ती वस्तुनिरीक्षणांत गुंतवितां आली, म्हणजे एकीकडे करमणूक होऊन शिवाय ज्ञानवृद्धी ही होते. यामुळेंच ट्रेनिंग कालेजांत रा. सा. साने यांनीं वस्तुदर्शन पाठांस विशेष महत्व देऊन ते पाठ सर्व वर्गांच्या विद्यार्थ्यांस विशेष अगत्यानें देण्याची तजवीज केली आहे. हिंदुस्थानच्या स्वाभाविक वैभवाचें विद्यार्थ्यांस यथार्थ ज्ञान व्हावें, म्हणून त्यांनीं कालेजाच्या पुढील चौकाच्या

मध्यभागीं एक सुप्रमाण व निम्नोन्नत भागविशिष्ट असा हिंदुस्थानाचा मूर्त नकाशा भूमीवर सुस्थिर करून ठेविला आहे. देशावरील विद्यार्थ्यांस खाडीची बरोबर कल्पना यावी म्हणून त्यांनीं मुंबई बंदराचा नकाशा खोदून तयार केला आहे. या शिवाय वस्तुपाठांकरितां अवश्य लागणारी सामुग्रीही बरीच जुळवून ठेविली आहे. प्राक्टिसिंगस्कुलांतील लहान मुलांस बालोद्यानपद्धतीनें शिक्षण देण्याकरितां कांहीं सामानसुमान विलायतेहून आणविलें आहे, व शिवाय येथेंही बऱ्याच वस्तूंचा संग्रह करून वस्तुपाठ देण्याचें आरंभिलें आहे. प्रतिवर्षी प्लेगचा तडाखा सुरू होऊन त्यामुळें शिक्षणास जो दरसाल धक्का बसतो व अभ्यासाची पिच्छेहाट होते, त्यामुळें या कामीं इष्ट हेतू सिद्धीस जाण्यास अजून कालावधी लागेल असें वाटतें.

१९. कॉलेजांत शिकविला जाणारा प्रत्येक विषय स्वताला अवगत राखण्याचा रावसाहेब साने यांचा अव्याहत प्रयत्न असे. मराठी व संस्कृत भाषा, व्याकरण, इतिहास, भूगोल-शिक्षणपद्धती, वगैरे विषय तर त्यांच्या फार आवडीचे असून त्यांत ते प्रवीणच आहेत; परंतु यांशिवाय अंकगणित, भूमिती, पदार्थविज्ञान इत्यादी विषयांत ही त्यांचें चांगलें परिशीलन आहे, असें वेळोवेळीं अनुभवास आलें आहे. कालेजांतील विद्यार्थ्यांस रसायनशास्त्राचीं मूलतत्वें चांगलीं अवगत असणें अवश्य आहे, नाहींपेक्षां आरोग्यशास्त्राचे ठळक नियमही विद्यार्थ्यांस नीट समजणें कठीण; हें तत्व लक्षांत घेऊन त्यांनीं कालेजांत येतांच लौकरच १००० रुपयांची यंत्रसामुग्री विलायतेहून आणविली, व लागलीच कालेजांत रसायनशास्त्र नेमिलेलें नसतांही प्रयोग करून दाखविण्यास सुरुवात केली. पुढें कांहीं वर्षें गेल्यावर रसायनशास्त्र शिक्षणक्रमांत दाखल करण्यांत आलें. रावसाहेब यांचें मत, रसायनशास्त्र तिसरे वर्षास नेमिलें आहे, तसें न नेमितां दुसरे वर्षास नेमावें असें होतें. त्यांचा हेतू हा विषय दुसऱ्या वर्षास नेमिल्यास पुष्कळ विद्यार्थ्यांस तो विषय शिकतां येईल, असा होता. परंतु चारी ट्रेनिंगकॉलेजांतील अभ्यास बहुतेक एकसारखे व्हावे, असा अभिप्राय पडून ती गोष्ट सिद्धीस गेली नाहीं.

१६. रावसाहेब साने यांच्या कारकीर्दीचा विचार करितांना, पुण्यांतील ग्रंथिक सान्निपाताच्या साथीचा विचार करणें ओघानेंच प्राप्त होतें. पुण्यांतील प्रत्येक कुटुंबास या महासंकटापासून किती हाल भोगावे लागले आहेत, व प्राणहानी व वित्तहानी किती झाली आहे याचा अनुभव सर्वांस आलेलाच आहे. ट्रेनिंगकालेजाचे प्रिन्सिपल यांचें बोर्डिंग हें एक कुटुंबच आहे. गांवांतील इतर लोकांप्रमाणें यांसही कधीं स्वाराच्या गेटावर, कधीं हायस्कूलांत, कधीं भांबुर्डेक्यांपमध्यें विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करावी लागली. बोर्डिंगांतील व बाहेरील मिळून २।३ विद्यार्थी या रोगास बळी पडले. परंतु एकंदरींत रावसाहेब साने यांच्या दक्षतेनें व मेहनतीनें कालेजास मोठासा अपाय घडला नाहीं ही गोष्ट फारच लक्षांत ठेवण्यासारखी आहे. बोर्डिंगांतील विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची अशी खातरी झाली होती कीं, रावसाहेब साने यांच्या कारकीर्दींत प्लेगाविषयीं आपणास फारशी काळजी बाळगण्यास नको व या त्यांच्या सुव्यवस्थेबद्दल सर्वत्र तारीफ होत आहे. पुण्यांतील इतर आफिसांप्रमाणें ट्रेनिंग कालेजांतीलही पुष्कळ नोकर या रोगास बळी पडले. शिवाय बदल्या वगैरेही पुष्कळ झाल्या यामुळें कालेजांतील शिक्षकसमुदाय बहुतेक नवा झाला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. रावसाहेब साने यांनीं नवीन मंडळीस जुनें वळण लावून देऊन व आपला अनुभव सांगून कालेजांतील पूर्वपरंपरा कायम राखिली आहे हें त्यांस फारच भूषणास्पद आहे.

१७. रावसाहेब साने यांचें विद्यार्थ्यांच्या कल्याणामध्यें जसें चित्त गुंतलेलें आहे, तसेंच शिक्षकवर्गाच्या कल्याणाविषयींही त्यांच्या मनांत रात्रंदिवस विचार घोळत असतात. चाटफील्डसाहेब यांच्या स्मारकाच्या फंडाचे सेक्रेटरी हे होते, हें सर्वांस माहीत आहेच. मराठी मास्तरच्या मुलांसाठीं वरिष्ठ शिक्षणाची सोय व्हावी म्हणून दरमहा २४ रु. प्रमाणें विद्यार्थ्यांचें

शिक्षण पुरें होईपर्यंत स्कालरशीप मिळावी म्हणून जो ठराव झाला आंत यांनीं पुष्काळ खटपट केली. त्याजबद्दल मराठी मास्तर यांनीं त्यांचे आभार मानिले पाहिजेत.

१८. ट्रेनिंग कालेजांत, बोर्डिंगांत व प्राक्टिसिंग स्कुलांत अशी एकही गोष्ट आढळणार नाहीं कीं, जीमध्यें रावसाहेब साने यांनीं कांहींना कांहीं आवश्यक अशी सुधारणा केली नाहीं. आपणास कितीही तसदी पडो, परंतु आपलें काम बरोबर झालें पाहिजे, असा त्यांचा बाणा असे व ही गोष्ट प्रत्येकास अनुकरणीय आहे. रावसाहेब यांच्या संबंधानें अगदीं ठळक अशाच गोष्टी वर निर्दिष्ट केल्या आहेत. यांच्या चरित्रांतील आणखी अनेक गोष्टी बोधपर व अनुकरणीय आहेत, परंतु स्थलसंकोचामुळें जास्त विस्तार करितां येत नाहीं, याजबद्दल वाचकांची माफी मागून व रावसाहेब साने यांच्या बढतीबद्दल अभिनंदन करून, व त्यांचे हातून आजपर्यंत झालीं तशींच लोकशिक्षणाचीं कामें व्हावीं म्हणून परमेश्वरानें त्यांस आरोग्य व सामर्थ्य द्यावें असें चिंतून, आम्ही हा लेख संपवितों.

## नवीन मनुष्यगणती.

गेल्या मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेस सर्व हिंदुस्थान देशाची जी खानेसुमारी झाली, तिचे आंकडे आतां प्रसिद्ध झाले आहेत. त्यांवरून माहितीचीं कांहीं कोष्टकें पुढें देतों. ही मनुष्यगणती करण्यांत मुख्य उद्देश केवळ प्रत्येक प्रांताची व शहराची लोकसंख्या समजावी एवढाच नसतो. तर अमुक एक मुदतींत ही लोकसंख्या किती वाढली किंवा कमी झाली, हें ही पहावयाचें असतें. कारण हें पाहण्यापासून विवक्षित प्रांत किंवा स्थळ यांची निरनिराळ्या प्रकारची स्थिती कशी आहे हें पाहण्यास चांगलें साह्य होतें. याच प्रमाणें मनुष्यगणतीचे वेळीं लोकांच्या जाती, धर्म, त्यांचे पोटभेद, भाषा, उद्योगधंदा लोकांत विद्या-

प्रसार कसा होत चालला आहे. वगैरे अनेक प्रकारची अत्यंत उपयुक्त अशी प्रांतोप्रांतींची अवांतर माहितीही मिळवावयाची असते. ही माहिती या वेळीं अगदीं बरोबर मिळावी, असे प्रयत्न करण्याविषयीं सरकारचे चोहींकडे सक्त हुकूम होते. यामुळें या मनुष्यगणतीचे वेळीं ही माहिती उत्तम रीतीनें घेतली असेल. पण मनुष्यगणतीच्या कामाचा संपूर्ण रिपोर्ट अजून आपल्यापुढें येण्यास अवकाश लागेल हें उघडच आहे.

सन १८९१ च्या खानेसुमारीच्या वेळीं हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या २८७३१७०४८ होती. सन १९०१ त ती २९४२६६७०१ झाली आहे. तेव्हां दहा वर्षांत दर शेंकडा २·४२ माणसें जास्त झालीं. यांतही पुनः लक्षांत ठेविलें पाहिजे, कीं या गणतीमध्यें वरचा ब्रम्हदेश आला आहे तो मागील गणतीच्या वेळीं नव्हता. त्याचप्रमाणें बलोचिस्थान ही नव्हतें; व कित्येक प्रांतांची नीट गणती त्या वेळीं झाली नव्हती. नवीन मनुष्य गणतींत सर्व 'ब्रिटिश इंडिया' चे आंकडे त्यांतील संस्थानांसुद्धां अगदीं उत्तम प्रकारें बरोबर असेच आले आहेत. तेव्हां ही वाढ वास्तविक इतकीही येणार नाहीं हें उघड आहे. हे प्रकार लक्षांत घेऊन खरोखरी किती लोकसंख्या वाढली ह्याचें प्रमाण पाहिलें तर तें शेकडा १.४९ निघत आहे. सन १८८१ पासून सन १८९१ या दहा वर्षांत ही वाढ शेंकडा ११·२ झाली होती. इतकी वस्ती या वेळीं कमी होण्याचीं कारणें प्लेग व दुष्काळ हीं आहेत. यावरून वस्ती किती वाढणें साहाजिक असून वाढली नाहीं, हें स्पष्टपणें कळून येईल. या वाढीच्या संबंधाचें देशी राज्यें व इंग्रजी मुलूख यांचें प्रमाण कसें निघतें पहाः—

| | सन १८९१ | सन १९०१ | जास्त | कमी |
|---|---|---|---|---|
| देशी राज्यें— | ६६०५०४७९ | ६३१८१९६९ | ---- | ४-३४ |
| इंग्रजी राज्य— | २२१२६२५६९ | २३१०८५१३२ | ४-४४ | ---- |

एकंदर देशाचे इंग्रजी राज्याच्या निरनिराळ्या प्रांतांतले आंकडे व देशी राज्यांतले आंकडे पुढें दिले आहेत:—

| प्रांत. | सन १९०१ ची वस्ती. | | | सन १८८१ ते सन १८९१ पर्यंतच्या दहा वर्षांची दर शेकडा कमी जास्त संख्या. | सन १८९१ ते सन १९०१ पर्यंतच्या दहा वर्षांची दर शेकडा कमी जास्त संख्या. |
|---|---|---|---|---|---|
| | पुरुष. | स्त्रिया. | एकूण. | | |
| **इंग्लिश राज्य.** | | | | | |
| अजमीर........................ | २,५०,७२१ | २,२५,६०९ | ४,७६,३३० | +१७·७२ | −१२·१७ |
| आसाम........................ | ३१,४२,५६१ | २९,७९,६४० | ६१,२२,२०१ | +११·३१ | +१२·६७ |
| बंगाला........................ | ३,७३,७६,४३८ | ३,७३,३६,५८२ | ७,४७,१३,०२० | + ६·८९ | + ४·७२ |
| वऱ्हाड........................ | १३,९४,१०७ | १३,५८,३११ | २७,५२,४१८ | + ८·४१ | − ४·९९ |
| मुंबई इलाखा........................ | ९५,९५,८०५ | ८९,८८,६९१ | १,८५,८४,४९६ | +१४·३४ | − १·९३ |
| (अ) मुंबई........................ | ७८,०४९३ | ७५,२५,५३५ | १,५३,३०,४६६ | ÷१३.५२ | − ३·९३ |
| (ब) सिंध........................ | १७,६२,६९४ | १४,५०,११४ | ३२,१२,८०८ | +१८·९७ | +११·८८ |
| (क) एदन........................ | २८,१८० | १३,०४२ | ४१,२२२ | +२६·४४ | − ६·४८ |
| ब्रम्हदेश (सर्व)........................ | ४७,०५,०९४ | ४६,१६,०६७ | ९२,२१,१६१ | ......... | +१८·६६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (अ) वरचा............ | १८,९२,३८१ | १९,९७,४९२ | ३८,४९,८३३ | + | +१४·४९ |
| (ब) खालचा........... | २८,९२,७१३ | २५,१८,६१५ | ५३,७१,३२८ | +२२·५८ | +२१·८४ |
| मध्यप्रांत.................... | ४८,४१,८३२ | ५०,०३,४८५ | ९८,४५,३१८ | + ९·६१ | − ८·७१ |
| कुर्ग........................ | १,००,२१४ | ८०,२४७ | १,८०,४६१ | − २·९३ | + ४·२८ |
| मद्रास....................... | १,८८,५३,०२४ | १,९३,५५,५८५ | ३,८२,०८,६०९ | +१५·५८ | + ७·२४ |
| वायव्यप्रांत व अयोध्या......... | २,४६,२०,९५१ | २,३०,७५,३६३ | ४,७६,९६,३२४ | + ६·४ | + १·८४ |
| वायव्यप्रांत ............... | १,८०,२८,४८१ | १,६७,८३,६९३ | ३,४८,१२,१७४ | + ४ | + १·६३ |
| अयोध्या ................. | ६५,९२,४८० | ६२,९१,६७० | १,२८,८४,१५० | +११·०९ | + २·४० |
| पंजाब........................ | १,२०,९५,७११ | १,०३,५३,७७३ | २,२४,४९,४८४ | +१०·७१ | + ७·५८ |
| बलूचिस्थान................... | ४,४५,६०३ | ३,६५,२०८ | ८,१०,८११ | * | ............ |
| आंदमान...................... | १८,५८१ | ५,९१८ | २४,४९९ | + ६·७१ | +५६·९५ |
| सर्व प्रांतांची एकंदर वस्ती.. | ११,७४,४० ६५२ | ११,३६,४४४८० | २३,१०,८५१३२ | + ९·६८ | + ४·४४ |
| **देशी राज्यें.** | | | | | |
| हैदराबाद..................... | ५६,६४,७७२ | ५५,१०,१२५ | १,११,७४,८९७ | +१७·१८ | − ३·१४ |
| वडोदा......................... | १०,०७,९४४ | ९,४२,९८३ | १९,५०,९२७ | +१०·५४ | −१९·२३ |

+ वरचा ब्रह्मदेश इ. स. १८८१ चे गणतींत नव्हता.

* बलुस्थानची वस्ती सन १८८१ चे गणतींत नव्हती.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| म्हैसूर. | २७,९६,१६९ | २७,४२,२१७ | ५५,३८,४८२ | +१८·०९ | +१२·०३ |
| काश्मीर | १५,४४,४१२ | १३,६१,७६१ | २९,०६,१७३ | +६५·७१ | +१४·२४ |
| राजपुताना | ५१,६७,६४० | ४६,७३,३९२ | ९८,४१,०३२ | +१७·१ | −१८·१ |
| मध्यहिंदुस्थान | ४३,५७,२२५ | ४१,४४,६५८ | ८५,०१,८८३ | +११·४१ | −१७·५ |
| मुंबई देशी राज्ये | ३५,०४,९७५ | ३३,८६,७१६ | ६८,९१,६९१ | +१६·६५ | −१४·४९ |
| मद्रास ,, ,, | २१,००,३१३ | २०,९०,००९ | ४१,९०,३२२ | +१०·६३ | +१३·२३ |
| मध्यप्रांत ,, ,, | ९,८२,८२३ | १०,००,६७३ | १९,८३,४९६ | +२६·३६ | − ८·१९ |
| बंगाल ,, ,, | १८,९९,७०४ | १८,३६,०११ | ३७,३५,७१५ | +१८·३ | +१३·३३ |
| वायव्यप्रांत,, ,, | ४,११,८९७ | ३,८७,७७८ | ७,९९,६७५ | + ६·८४ | + ०·९१ |
| पंजाब ,, ,, | २४,१७,९३२ | २०,२०,८८४ | ४४,३८,८१६ | +१०·४२ | + ४· २ |
| ब्रह्मदेश ,, ,, | ६,०९,८९५ | ६,१८,५६५ | १२,२८,४६० | * | .... |
| देशीराज्यांतली एकंदर वस्ती. | ३,२४,६५,६९७ | ३,०७,१५,८७२ | ६,३१,८१,५६९ | +१६·५८ | − ४·३४ |
| हिंदुस्थानदेशाची एकंदर वस्ती. | १४,९९,०६३४९ | १४,४३,६०३५२ | २९,४२,६०७०१ | +११·२ | + २·४२ |

* ब्रह्मदेशच्या देशी राज्यांची वस्ती सन १८८१ मध्यें गणली नव्हती.

# हवामान.

पृथ्वीच्या समोंवतीं सुमारें नव्वद मैलांपर्यंत एक वायुमय आच्छादन आहे, त्यास हवा असें म्हणतात. हा हवा नांवाचा वायुरूप पदार्थ मुख्यत्वें-करून आक्सिजन व नैट्रोजन या दोन वायूंच्या भेसळीनें झाला आहे; व तो प्राणिमात्राच्या जीवनास आवश्यक आहे. ही जी हवा तिच्यामध्यें कमजास्त उष्णता असते, त्यावरून स्थळोस्थळींचें हवामान बनत असतें. हें हवा-मान जसें असेल त्याप्रमाणें प्राणिमात्रांच्या प्रकृतीस सुखकारक अथवा असुखकारक असतें. यासाठीं स्थळोस्थळींच्या भिन्न हवामानाचा विचार व तत्संबंधाची माहिती सर्वांस फार अगत्याची आहे.

पृथ्वीस उष्णता व प्रकाश हीं सूर्यापासून प्राप्त होतात. ही उष्णता आणि प्रकाश सर्वत्र सारखा मिळत नाहीं, तर पृथ्वीच्या निरनिराळ्या भागांत व निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या प्रकारचा असतो. या गोष्टी सर्वांस ठाऊक आहेत. पण असें का होतें, याचा थोडा विचार करूं.

पृथ्वीच्या पाठीवर निरनिराळ्या ठिकठिकाणीं मिळणारी उष्णता ही सूर्याचे किरण पृथ्वीवर ज्या तऱ्हेनें येऊन पोंचत असतील, व ते किरण एकेका ठिकाणीं जितका वेळ राहात असतील, त्यामानानें असते.

किरण सरळ येऊन पृथ्वीवर पडले असतां त्यांच्यापासून उष्णता जास्त मिळते. सूर्याचे किरण पृथ्वीचा पृष्ठभाग वाटोळा आहे, यामुळें सर्व ठिकाणीं सर्व वेळीं किरण सरळ पडणें अशक्य आहे. हे सर्व नीट कळण्यासाठीं आकृती १ ही पहा. या आकृतीवरून दिसून येईल कीं सूर्यकिरण पृथ्वीवर येऊन पोंचतात, त्यांचा मार्ग परस्परांशीं समांतर असतो; म्हणजे, प्रत्येक किरण ही एक सरळ रेघ आहे असें मानलें तर प्रत्येक किरण दुसऱ्याशीं समांतर आहे. ( २ ) कांहीं किरण पृथ्वी-वर अगदीं सरळ येऊन पडतात. असे किरण इ या ठिकाणी पडत आहेत. यांना लंब किरण असें म्हणूं. ( ३ ) पृथ्वीच्या पृष्ठभागावरील इ हें स्थळ घेऊन त्याच्या वर किंवा खालीं पाहूं गेल्यास, किरण अधिका-

धिक वांकडे पडत जातील. यांना वक्र किरण असें म्हणूं. ( ४ ) पृथ्वीचें जें वातावरण, त्यामध्यें थोडी फार वाफ ( म्हणजे वायुरूप झालेलें पाणी ) नेहमीं असतेंच. ही वाफ पृथ्वीच्या पृष्ठभागाजवळ फार असते. आकाश अगदीं निरभ्र असतांही हवेंत वाफ असते. पण आकाश साभ्र असलें म्हणजे फारच असते. या वाफेचा एक गूण असा आहे, कीं बाहेरची उष्णता शोपून घ्यावी. यामुळें हवा स्वच्छ असली तरी पृथ्वीच्या पृष्ठभागाजवळ सूर्यकिरण येऊन पोंचत तों त्यांमधील उष्णता बरीच कमी होते. आकाश साभ्र असलें तर ती पुष्कळच कमी होते. यावरून आणखी असेंही लक्षांत येईल, कीं किरण पृथ्वीच्या पृष्ठभागाला येऊन पोंचतपर्यंत त्यांना हवेमधून थोड्या अंतरावर जावयाचे असेल, तर त्यांमध्यें उष्णता जास्त असेल; व त्यांना हवेमधून पुष्कळ लांबपर्यंत जावयाचें असेल तर ते पृथ्वीला येऊन पोंचतपर्यंत त्यांमधील उष्णता पुष्कळ कमी होईल.

आतां पहिल्या आकृतीवरून दिसून येईल, कीं अ, आ आणि ई, उ यांमध्यें पृथ्वीला येऊन पोंचणाऱ्या किरणास हवेमधून जास्त जावें लागतें, व आ, इ व इ, ई यांमधील किरणांना हवेमधून तितकें जावयास नको असतें. यामुळे अर्थात या ठिकाणच्या म्हणजे **लंब** किरणांमध्यें उष्णता जास्त असते; व **वक्र** किरणांमध्यें उष्णता कमी असते.

( ५ ) आकृती १ हीवरून आणखी असें दिसून येईल, कीं किरण दाखविणाऱ्या सरळ रेषा मोजून पाहिल्या तर, त्यांची संख्या इपासून ईपर्यंतच्या पृष्ठभागांत जास्त आहे व आ, इ किंवा ई, उ या पृष्ठभागांत तेवढ्याच प्रदेशावरची किरणांची संख्या कमी आहे. यावरून **लंब** किरण संख्येनें जास्त असतात व **वक्र** किरण कमी असतात.

तेव्हां **लंब** किरणांत जास्त उष्णता असण्यास दोन कारणें आहेत. एक, या किरणांची संख्या तितक्याच लांबीरुंदीच्या पृष्ठभागावर वक्रकिरणांपेक्षां जास्त असते, व त्यांना हवेमधून **वक्र** किरणांच्या इतकें जावयाचें नसतें यामुळें त्यांतील उष्णता तितकी कमी झालेली नसते.

मागें दुसरी एक गोष्ट अशी सांगितली आहे, कीं सूर्यकिरण पृथ्वीच्या पृष्ठभागावर जितक्या वेळ राहतील, त्या मानानें त्यांमधून उष्णता जास्त मिळेल. आतां आपल्यास ठाऊक आहे, कीं वर्षांतले कांहीं दिवस मोठे असतात व कांहीं लहान असतात. दिवस मोठे असले म्हणजे रात्री अर्थातच लहान असतात. कित्येक ठिकाणीं तर हें रात्रिदिवसांचें अंतर फारच मोठें असतें. दिवसास पृथ्वीला सूर्यापासून उष्णता मिळत असते व रात्रीं उष्णता मिळत तर नाहींच, पण उलट पृथ्वीमधून उष्णता जात असते; म्हणजे तिचा दिवसभर तापलेला पृष्ठभाग रात्रीं निवत असतो. तेव्हां वर्षांत ज्या वेळीं मोठे दिवस असतात, तेव्हां आपणास उष्णता जास्त मिळते, ही गोष्ट सहज लक्षांत येईल.

येथपर्यंत पृथ्वीला मिळणारी उष्णता कमजास्त होण्याचीं मुख्य कारणें सांगितलीं. आतां हीं कारणें स्थलांतरानें कशीं फिरतात याचा विचार करूं.

**दिवस-रात्र**—पृथ्वीच्या दोन गती प्रसिद्धच आहेत. एक, पृथ्वी भोंवऱ्यासारखी आपल्या आंसाभोंवती फिरत असते. ती चोवीस तासांत एकदां आपल्या भोवती फिरते. यामुळें **दिवस-रात्र** होतात. दिवसास रात्रीपेक्षां उष्णता फार जास्त असते हें उघडच आहे. त्याचप्रमाणें बारा तास पर्यंत पृथ्वीचें एक अर्ध जरी सूर्याकडे असतें, तरी त्या अर्धावर प्रत्येक ठिकाणीं किरण सारख्याच तऱ्हेनें पडत नाहींत. कांहीं वेळ लंब किरण असतात तेव्हां—म्हणजे दोनप्रहरीं—उष्णता जास्त येते, व इतर वेळीं ती त्या मानानें कमी मिळते.

**ऋतू**—पृथ्वीची दुसरी गती सूर्याभोंवती फिरणें. ती आपल्या सभोंवती फिरत फिरत तीनशें पांसष्ट दिवसांत सूर्याभोंवती फिरते. पृथ्वी सूर्याभोंवती ज्या मार्गानें फिरते, त्या मार्गास **कक्षा** असें म्हणतात. या कक्षेत पृथ्वी सूर्याभोंवती फिरते ती अगदीं **सरळ रीतीनें** फिरत नसून थोडीशी **कलथी** म्हणजे **वांकडी** अशी फिरते. हा वांकडेपणा आकृती २ हींत दाखविला आहे. ह्या आकृतींत मध्यें सूर्य असून दोन बाजूला पृथ्वीच्या दोन प्रकारच्या स्थिती

दाखविल्यां आहेत. या दोन्ही स्थितींत पृथ्वीचा आंस म्हणजे पृथ्वीमधून उत्तर-दक्षिण जाणारी कल्पित रेषा अ, इ, ही पृथ्वीच्या कक्षेला लंबरूप नसून थोडी कलथी आहे. हा कलथेपणा दोन्ही स्थितींत एकाच बाजूला आहे; व पृथ्वी फिरत असतां हा कलथेपणा सारखाच कायम असतो. या कलथेपणामुळें पृथ्वीच्या ऋतूंत कसा फरक पडतो, हें नुस्ते कितीहि सांगितलें तरी कळणार नाहीं. यासाठीं तें नीट कळण्याकरितां थोडी युक्ती करूं.

आतां आम्ही जो प्रयोग सांगणार तो रात्रीं दिव्याचे साह्यानें करून पाहावा. एका मोठ्याशा टेबलावर मधोमध एक ज्याचेवर वाटोळा 'ग्लोब' आहे असा दिवा ठेवावा. हा सूर्य आहे असें समजूं. त्याचे भोवतें टेबलावर खडूनें एक वर्तूळ काढावें. ही पृथ्वीची कक्षा. नंतर दोन लोखंडाच्या सळया घ्याव्या. एक सळई एका बाजूला टेबलावर पृथ्वीच्या कक्षेमध्यें पृथ्वीचा आंस जसा तिरपा आहे त्या प्रमाणेंच तिरपी अशी उभी खोंचून ठेवावी. नंतर एक चिंध्यांचा चेंडू घ्यावा व त्याच्या मधोमध आरपार दुसरी सळई टोंचावी. हा चेंडू म्हणजे पृथ्वी व ही सळई म्हणजे पृथ्वीचा आंस. ही सळई दोन्ही बाजूला चेंडूमधून हातांत धरण्यासारखी बाहेर येईल, इतकी लांब असावी. नंतर एका मनुष्यानें हा चेंडू सूर्याच्या एका बाजूला टेबलावर सळई टोंचलेली, आहे, त्याचे समोर दुसऱ्या बाजूस कक्षेवर उभा धरावा. सळईचें एक टोंक कक्षेवर ठेऊन सळई अशी उभी धरावी, कीं ती दुसऱ्या बाजूच्या सळईशीं अगदीं समांतर होईल. नंतर त्या माणसानें ती सळई, तींत असलेल्या चेंडूसुद्धां, सूर्याभोंवती डावीकडून उजवीकडे कक्षेमधून फिरवावी. ती फिरवीत असतां दोन गोष्टी लक्षांत ठेवाव्या. त्या या, कीं चेंडूमधून गेलेली सळई टेबलावर उभ्या केलेल्या सळईशीं नेहमीं एकसारखी समांतर राहील; व दुसरी गोष्ट, तिचें एक टोंक टेबलावर आहे, तसेंच दुसरें टोंक सर्व कक्षेमधून चेंडू फिरवीत असतां सारखें एकाच दिशेला असेल. पृथ्वीचा आंस कलथा असल्यामुळें सूर्य-किरण पृथ्वीच्या पृष्ठभागावर येऊन पोंचण्याच्या दिशा सारख्या बदलत असतात; त्याच

प्रमाणें ते पृथ्वीच्या पृष्ठभागावर रोजच्या रोज येऊन पडण्याची वेळ ही मागें पुढें होत असते.

आतां आपल्या आकृतीकडे लक्ष द्या. आकृती तीन हिच्यावरून दिसून येईल कीं पहिल्या स्थितीमध्यें पृथ्वीची वरची बाजू, म्हणजे उत्तर गोलार्ध, सूर्याकडे अधीक कललेली असून खालची बाजू, म्हणजे दक्षिण गोलार्ध—त्या मानानें फारच बाजूला गेलेली असते. या वेळीं उत्तर गोलार्धांत दिवस मोठा असून उन्हाळा असतो व दक्षिण गोलार्धांत दिवस लहान असून हिंवाळा असतो. अशा रीतीनें पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत असतां उत्तर गोलार्ध सूर्यापासून हळू हळू दूर कलून जाऊन दक्षिण गोलार्ध कलून जवळ येतो, व पहिल्या स्थितीनंतर बरोबर सहा महिन्यांनीं आकृतीमध्यें दाखविलेली दुसरी स्थिती येते. या वेळीं दक्षिण गोलार्ध सूर्याकडे कललेला असून उत्तर गोलार्ध बाजूला कलून जातो म्हणजे पहिल्या स्थितीच्या अगदीं उलट स्थिती होते. या वेळीं उत्तर गोलार्धांत दिवस लहान असून हिंवाळा असतो व दक्षिण गोलार्धांत दिवस मोठा असून उन्हाळा असतो.

ह्या ज्या दोन स्थिती सांगितल्या ह्या सहा महिन्यांनीं होतात. मध्यंतरी तीन महिन्यांनीं दोन वेळा अशी स्थिती प्राप्त होते कीं त्या वेळीं दोन्ही गोलार्ध सूर्याकडे असण्याची तऱ्हा एकसारखीच असते; यामुळें दोन्हीकडे उष्णता सारखीच मिळते, व दिवस आणि रात्र हीं सारखींच असतात.

आतां ही गोष्ट चांगली ध्यानांत यावी म्हणून पृथ्वी जर सूर्याभोंवतीं कलथी न होतां फिरत असती, म्हणजे पृथ्वीचा आंस तिच्या कक्षेवर अगदीं उभा असता, तर काय झालें असतें तें पाहूं. आकृती ४ यांत ही स्थिती दाखविली आहे. हा प्रयोगही आपण पहिल्याप्रमाणेंच दिवा, सळया व फडक्याचा चेंडू यांच्या सहाय्यानें टेबलावर करून पहावा. या दुसऱ्या प्रयोगावरून दिसून येईल कीं पृथ्वी जर कलथी फिरत नसती, तर पृथ्वीचा कोणताही भाग सूर्याकडे अधिक कललेला आहे असें न होतां तिच्या सर्व भागांवर सूर्याचे किरण साऱ्या वर्षभर प्रत्येक जागीं सारख्याच तऱ्हेनें पोंचले असते. आणि दिवस व रात्र सर्वत्र सारखींच असतीं.

अशा स्थितीत विषुववृत्तावर नेहमीं उन्हाळा, व उत्तरेकडे किंवा दक्षिणेकडे जसजसें जावें तसतशी उष्णता कमी होत जाऊन ध्रुवांशीं फार थंडी, अशी स्थिती असती, व ही स्थिती सर्व वर्षभर सारखीच राहिली असती.

पृथ्वीचा आंस कलथा असल्यामुळें हवेंत होणारा फरक विषुववृत्ताच्या जवळच्या प्रदेशांत तितका लक्षांत येत नाहीं. आम्ही ( म्हणजे आमचे मुख्य शहर मुंबई हें ) विषुववृत्तापासून अठरा अंश उत्तरेस आहों. येथें हा फरक फारसा नजरेस येत नाहीं. पण फार उत्तरेकडचें किंव दक्षिणेकडचें स्थळ घेतलें तर हा फरक फारच नजरेस येईल. उदाहरणार्थ इंग्लंडची राजधानी लंडन हें स्थळ घेतलें, तर तेथें साऱ्या वर्षांत सूर्य डोक्यावर कधींच येत नाहीं. तो नेहमीं दक्षिणच्या बाजूला असतो. उन्हाळ्यांत थोडासा स्वस्थ मध्यबिंदूकडे येतो. त्या वेळीं देखील त्याचे किरण लंब नसतां वक्रच असतात. ( आकृती २ पहा). हिवाळ्यांत तर ते फारच वक्र असतात. खेरीज आकृतींतले किरण मोजले असतां असें दिसून येईल, कीं उन्हाळ्यांत एकाद्या ठिकाणीं येऊन पडणाऱ्या किरणांची संख्या हिंवाळ्यांत तेवढ्याच जाग्यावर पडणाऱ्या किरणांपेक्षां जास्त असते. यासाठीं लंडन येथें सूर्य किरण लंबरूपानें कधींच न पडून त्यांची पुरी उष्णता तेथें कधींच मिळत नाहीं; व यामुळें तिकडली हवा तिकडल्या भरउन्हाळ्यांत झाली तरी फार थंड असते.

याप्रमाणें पृथ्वीच्या एकंदर पृष्ठभागावर हवेमध्यें फरक पडण्यास सामान्यतः कारणें कोणची होतात, हें सांगितलें. आतां विशेष कारणांचा विचार करूं.

आकृती १, २ व ३ यांमध्यें ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्यांवरून प्रत्येक स्थळाचें विषुववृत्तापासून जें अंतर असेल, त्या मानानें **सामान्यतः** प्रत्येक स्थळांच्या हवामानांत कसा फरक पडतो हें कळून येतें. हीं हवा बदलण्याचीं सामान्य कारणें होत. दुसऱ्या कांहीं कारणांनीं पृथ्वीच्या पृष्ठभागाचे संबंधानें सारख्याच स्थितींत असणाऱ्या निरनि-

राळ्या स्थळांच्या हवेंत देखील फरक पडत असतो. हीं **स्थानिक** कारणें होत. हीं कारणें अशीं आहेत:—

**स्थळाची उंची**—प्रत्येक स्थळ समुद्राचे सपाटीपासून सारख्या उंचीवर नसतें. डोंगराळ प्रदेशांतील स्थळें थोडीं, मध्यम किंवा फार उंच असतात. कांहीं स्थळें अगदीं समुद्राचे सपाटीबरोबर असतात. या उंचीच्या मानानें स्थळोस्थळींच्या हवामानांत फरक पडतो.

पृथ्वीला सूर्यापासून जी उष्णता पोंचते, ती पृथ्वीच्या पृष्ठभागापासून पुनः परत चोहींकडे पसरत असते. परंतु जे पृष्ठभाग उंच असतात, तेथील उष्णता लौकर निघून जाऊन सपाट प्रदेशांत ती फार वेळ टिकते. याचें कारण सखल व सपाट प्रदेशांत हवा दाट असून त्यांत ओलावा किंवा पाण्याची वाफ फार असते. प्रत्येक मनुष्यास स्वतःचा अनुभव असा आहे कीं त्याचे आंगांतून जी उष्णता जाते, ती त्याचे आंगावर जाड, उबदार कपडे असले तर कमी जाते, व पातळ कपडा असल्यास जास्त जाते. याच रीतीनें सखल प्रदेशांत हवेचें वेष्टण जाड असल्यामुळें उष्णता जास्त वेळ टिकते व उंच डोंगराळ प्रदेशांत कमी वेळ टिकून, त्यांवरील स्थळें लौकर थंड होतात निरनिराळ्या डोंगराळ प्रदेशांत सुद्धां पुष्कळदां हवामानांत फार फरक पडतो. उच्च प्रदेश असून सपाट असला तर तेथची उष्णता जास्त वेळ टिकते. पण तोच उच्चप्रदेश खडकाळ व ज्याच्यामधील चढण थोडी थोडी वाढत जाणारी, असा असला म्हणजे तो प्रदेश लौकर निवून जातो. याचे कारण अशा प्रदेशांतून उष्णतेला निघून जाण्याला मार्ग फार असतात याच कारणानें डोंगराळ प्रदेश व उच्च ठिकाणें ह्या थंड जागा झाल्या आहेत. उच्च प्रदेशामध्यें एकदम एकाद्याच ठिकाणीं थंड हवा कशी होते, हें उष्ण कटिबंधांत चांगलें कळून येतें. आपल्या इकडलीं माथेरान, महाबळेश्वर, निलगिरी, अबू पहाड, पंचमढी, दार्जिलिंग, सिमला, वगैरे हवाशीर पर्वतशिखरें सुप्रसिद्धच आहेत. अमेरिकेंतलें शहर कीटो हें अगदीं विषुववृत्तावर आहे. पण तें समुद्राचे सपाटीपेक्षां ९६०० फूट उंच असलेल्या पर्वतावर आहे. व याचे सभों-

वताळचा प्रदेश विशेष चटगीचा आहे. यामुळें तेथें बाराही महिने वसंत ऋतु असतो. उष्ण कटिबंधांत कित्येक पर्वत तर असे आहेत कीं त्यांचे शिरोभाग बाराही महिने हिमाच्छादित असतात.

पर्वतांचा उपयोग कोणच्याही ठिकाणच्या हवामानास फारच असतो, याचीं उदाहरणें आमच्या देशाच्या सृष्टिरचनेचा विचार केला असता पुष्कळ आढळतील. त्यांतलें एकच उदाहरण येथें देतों. हिंदुस्थानाच्या उत्तरेस सैबीरियापासून तिबेटपर्यंत एक उंचवट्याचें मैदान आहे. येथील हवा फार थंड आहे. हिंदुस्थान देशाकडील हवा उष्ण आहे, यामुळें इकडील हवा ऊन होऊन हलकी झाली म्हणजे वर निघून जाते; व तिच्या जागीं थंड हवा यावयास पाहिजे असते. ही थंड हवा सैबीरिया कडून व मध्य एशियेंतून जशीच्या तशीच येईल तर ती अतीशय थंड असेल. परंतु मध्यंतरीं फार उंच अशी हिमालय पर्वताची भिंत असल्यामुळें तिच्यावर या थंड हवेचा मुक्काम होतो; व त्या थंड हवेमध्यें असणारी बहुतेक वाफ बर्फाचे रूपानें याच पर्वताचे माथ्यावर राहते; आणि अशा रीतीनें उत्तरेकडल्या वाऱ्याचा सराटा व थंडपणा कमी होऊन तो हिंदुस्थानच्या मैदानांत संथपणानें संचार करितो. अशा रीतीनें हिमालय पर्वत हिंदुस्थानाच्या उत्तरेकडून येणाऱ्या फार गार हवेपासून हिंदुस्थानाचें संरक्षण करणारी एक भिंतच झाली आहे. त्याचप्रमाणें हा वारा जर जशाचा तसाच खालीं येता, तर त्याच्या बरोबर प्रचंड पाऊसही आला असता. पण हिमालय पर्वत हा त्या वाऱ्यामध्यें असणारा बहुतेक ओलावा शोषून घेऊन, तें पाणी बर्फाचे रूपानें आपल्या डोक्यावर सांठवून ठेवितो, व मग गंगा, यमुना, सिंधू, ब्रह्मपुत्रा वगैरे नद्यांमधून तें आपल्यास लागेल तसें थोडें थोडें देतो, व उत्तरेकडील हवाही आमच्या इकडे थोडी थोडीच खालीं सोडतो.

**पर्जन्य**—प्रत्येक स्थळीं पाऊस पडण्याचें मान असतें, त्यावरही तथचें हवामान फार अवलंबून असतें. जेथें पाऊस फार पडतो व वर्षांत वारंवार पडतो, तेथें हवेंत वाफ कमजास्त प्रमाणानें असतेच. यामुळें अशा

प्रदेशांत उष्णता जास्त वेळ टिकण्यास किंवा ती पृष्ठभागापर्यंत लौकर येऊन पोंचण्यास कारणें होतात. पण जेथें मुळींच पाउस पडत नाहीं किंवा अगदीं थोडा पडतो, तेथें पृथ्वीचा पृष्ठभाग लौकर तापतो व लौकर निवतो. यामुळें अशा प्रदेशांतील हवा फार अस्थीर असते. हिंदुस्थानांत सिंधप्रांत हें याचें चांगलें उदाहरण आहे. आफ्रिकेंत व अमेरिकेंत असले प्रदेश फार आहेत.

**रानें व झाडी**—रानें व झाडी यांच्या योगानें हवामानांत मोठाच फरक होत असतो. झाडें ही जमिनीप्रमाणें लौकर उष्णता घेत नाहींत, यामुळें उघड्या मैदानापेक्षां वृक्षमय प्रदेशांतील हवा अधिक थंड असते. खेरीज झाडांमध्ये ओलावा फार उत्पन्न होतो; व रानवट प्रदेशांत पाऊसही फार पडतो. म्हणून मोठाल्या अरण्यमय प्रदेशांतील हवा पुष्कळदा गरम व सर्द असते. अशा प्रदेशांत दिवसास उष्णता सपाट प्रदेशाइतकी जमत नाही व रात्रीं तितकी कमीही होत नाहीं.

अफ्रिकेंत व अमेरिकेंत कित्येक सपाट निर्वृक्ष मैदानें आहेत. त्यांमध्यें भर दोनप्रहरीं तापलेल्या जमीनीस हात लाववत नाहीं, व वारा अग्नीच्या ज्वाळांप्रमाणें कढत येत असतो. यावेळीं कढत वाऱ्याची झुळुक उघड्या आंगास लागली तर आंगावर फोड येतात. पण सूर्यास्त होऊन थोडा वेळ झाला नाहीं तोंच इतकी थंडी पडतें, कीं तिच्यायोगानें पाणी देखील थिजतें.

**समुद्राचें सान्निध्य**—समुद्राच्या सान्निध्यापासून कोणत्याही प्रदेशांतील हवेंत फार फरक पडतो. याचे कारण असें आहे, कीं जमीनीच्या हवामानाप्रमाणें समुद्राचें हवामान लौकर बदलत नाहीं. दिवसास समुद्र जमीनी इतका तापत नाहीं व रात्रीं समुद्रामध्यें पृथ्वीपेक्षां जास्त उबारा असतो. यामुळें दिवसास जमीन तापली असतां समुद्राकडून थंड वारा येतो, व रात्रीं जमीन थंड झाली असतां जमीनीवरून समुद्राकडे थंड वारा वाहात असतो. या वाऱ्यास कोकणांत 'मतलय' असें म्हणतात. आफ्रिका व अमेरिका या दोन्ही खंडांतले प्रदेश विषुववृत्ताजवळ असून, अमेरिकेला

आटलांटिक महासागर जवळ असल्यामुळें तेथील हवा थंड असते; पण आफ्रिकेंतील प्रदेशापासून समुद्र दूर असल्यामुळें त्या खंडाला हा फायदा मिळत नाहीं.

आमच्या देशाला हवामानाच्या संबंधानें उत्तरेकडील पर्वतापासून जसा फायदा आहे तसा पश्चिमसमुद्रापासूनहीं आहे. आमच्या देशांतील हवा तापून वर जाऊं लागली म्हणजे पश्चिम समुद्रांतून व हिंदिमहासागरातली थंड हवा तिच्या जागीं येते. पण ती रिकामी येत नाहीं. तर महासागरावर उत्पन्न झालेली सर्व वाफ बरोबर घेऊन येते. ही हवा मे महिन्यापासून सपटंबर पर्यंत वाहात असते व ह्यामुळें आपल्यास पाऊस मिळतो. हा जो हिंदुस्थानांत पश्चिम दिशेकडून वारा वाहात येतो, हा एक नियमित प्रकारचा वारा आहे. यास आरबी भाषेंत 'मोसम' असें नांव आहे. अशा प्रकारचे वारे पृथ्वीच्या पाठीवर पुष्कळ ठिकाणीं वाहात असतात. त्यांपासून हवा थंड किंवा उबदार होणें, पाऊस येणें वगैरे अनेक फायदे होतात. कित्येक अती थंड देशाला हा समुद्रावरचा गरम वारा पोंचून तेथील हवेचा गारठा कमी होतो. स्काटलंड देशास पश्चिमेकडून जर उबदार हवा मिळाली नसती, तर तो प्रदेश हल्लीं आहे त्या पेक्षा थंड असता. इंग्लंड, स्काटलंड, फ्रान्स, वगैरे देश ज्या अक्षांशामध्यें आहेत, त्यांमध्येंच असणारे अमेरिकेंतले प्रदेश या देशांपेक्षां फार थंड आहेत. कारण त्यांना हा समुद्राच्या उबदार हवेचा फायदा मिळत नाहीं. हे जे समुद्रांतले वारे उत्पन्न होतात. त्यांतील कांहींना 'व्यापारोपयोगी वारे' असें नांव कोणीं दिलें आहे. कारण हे वारे वर्षांतील नियमित दिवशीं नियमित दिशेनें वाहावयाचे, असें ठरलेलें असतें, यामुळें समुद्रांत फिरणाऱ्या गलबतांस त्यांचा फार उपयोग होतो.

तेव्हां कोणच्याही ठिकाणची हवा बनण्यास मुख्यतः पुढील गोष्टी कारणीभूत होतात.

( १ ) कोणच्याही स्थळाचें विषुववृत्तापासून असणारें अंतर.

( २ ) त्या स्थळाची समुद्राच्या सपाटीहून उंची.

( ३ ) तेथें पडणारा पाऊस.

( ४ ) त्या प्रदेशांतील झाडी.

( ५ ) त्या प्रदेशास समुद्राचे सान्निध्य; व त्या प्रदेशावर समुद्राचे पृष्ठभागावरून थंड अथवा उबदार हवा येणें.

( ६ ) कोणच्याही प्रदेशाकडे वाहाणाऱ्या वाऱ्यांची दिशा व ते वारे समुद्र, पर्वत किंवा सपाट प्रदेश, यांपैकीं जेथून वाहात येत असतील, ह्या भागानें हवेंत होणारा फरक.

याशिवाय कोणच्याही विवक्षित गांवास नदीचें, पर्वताचें, सरोवराचें अथवा अरण्याचें सानिध्य असणें, इत्यादी हवा बदलण्याचीं बारीकसारीक अनेक स्थानिक कारणें असतात. त्यांचा विचार ही कोणच्याही ठिकाणचें हवामान ठरविण्यास लक्षांत घ्यावा लागतो.

---

# पत्रव्यवहार.

## ( १ ) भाषणांतील न्याय. ( पुढें चालू. )

१३. **सूचिकटाह-न्याय**—( सुई व कढई यांचा न्याय ). सुईचें टोंक अगदीं बारीक असतें. त्याच्या आकारावरून कढईच्या आकाराची स्थिती लक्षांत आणणें, यावरून ' दोन गोष्टींपैकीं सोपी आधीं करून नंतर कठीण करणें ' अशा प्रसंगीं या न्यायाचा उपयोग होतो.

१४. **रविकुक्कुट-न्याय**—( सूर्य व कोंबडा यांचा न्याय ). एकाद्या कोंबड्यानें असें मनांत आणिलें कीं मी ओरडतों म्हणून सर्व लोकांस सूर्य उगवणार हें समजतें, म्हणून आपण ओरडावयाचें नाहीं व दुसऱ्या कोंबड्यासही ओरडूं द्यावयाचें नाहीं. आतां हा नियम एकाद्या कोंबड्यानें केला अशी कल्पना केली, व फार तर तो आपण स्वतः तर त्याचे आठ दहा मित्र इतक्या मंडळींत अमलांत येईल. परंतु जगांतील सर्व कोंबड्यांच्या

ओरडण्याची बंदी त्याच्यानें करवणार नाहीं. यावरून ' सर्वत्र प्रसिद्ध जी गोष्ट ती एकादा मनुष्य आपण व आपले मित्र ह्यांच्यामध्यें गुप्त ठेवील. परंतु जगांत सर्व ठिकाणीं गुप्त ठेवणें त्याजकडून कधींही व्हावयाचें नाहीं, ' अशा वेळीं ह्या न्यायाची योजना होते. ' कोंबडा लपविला म्हणून उजडावयाचें राहात नाहीं,' ही म्हण या न्यायावरूनच निघालेली दिसते.

१५. **मूषक मंडूक-न्याय**—( उंदीर व बेडूक यांचा न्याय ). उंदीर व बेडूक हे गर्वानें आपापसांत परस्परांची तुलना करीत आहेत, इतक्यांत सर्पानें त्या दोघांसही एकदम उचलून न्यावें. यावरून 'दोघांची आपसांत चढाओढ लागली असतां तिसऱ्यानें त्या दोघांसही बगलेंत मारून न्यावें ' असा अर्थ दाखविणें इष्ट असतां या न्यायाचा उपयोग होतो.

१६. **रविकिरगत-कमल-न्याय**—( सूर्याचे किरण व कमल यांचा न्याय ). सूर्यकिरण सूर्यविकासी कमळाच्या कळीवर गेले असतां ती विकास पावते; ( म्हणूनच सूर्यविकासी कमळें सूर्योदय होतांच फुलतात ). यावरून ' एकादें कारण सुरू झालें कीं त्याच्या कार्यालाही आरंभ होतो,' असा अर्थ दाखवावयाचा असतां या न्यायचा उपयोग होतो.

१७. **बादरायण-संबंध न्याय**—( बोरीच्या चाकाचा न्याय ). ' अस्माकं बदरीचक्रं युष्माकं बदरीतरुः । बादरायणसंबंधो यूयं यूयं वयं वयं ।' यावरून ' कोणाचा खरोखर कांहीं संबंध नसतां तो कसा तरी जुळवणें ' अशा वेळीं याचा उपयोग होतो.

१८ **मंडूकप्लुतिन्याय**—( बेडकाच्या उडीचा न्याय ). ' बेडूक एका स्थळाहून त्याच्या जरा वरच्या स्थळीं उडी मारितो. यावरून 'एका स्थितींतून निघून तिच्या वरच्या स्थितींत जाणें, किंवा मध्येंच एकादी गोष्ट करण्याची सोडून देऊन पुढील करूं लागणें,' अशा वेळीं या न्यायाची योजना होते.

भिकाजी सदाशिव मुळे.
फ. अ. मास्तर देवरुख.

## ( २ ) सिद्धांत कौमुदींतील शंका.

वि० वि० भट्टोजी दीक्षितांच्या सिद्धांतकौमुदीचें अध्ययन करीत असतां मला कांहीं शंका आल्या आहेत; त्यांचें आपल्या शालापत्रकाच्या वाचकांपैकीं कोणीतरी अभिज्ञ गृहस्थ निरसन करीतील असें समजून आपणाकडे हें पत्र पाठवीत आहें; तर त्यास स्थळ मिळावें.

**शंका पहिली**—" अणुदित्सवर्णस्यचाप्रत्ययः " १।१।६ या सूत्राचें व्याख्यान करितांना " तेन विश्वपाभिःइत्यत्र होढः इतिढत्वं न भवति।" असें म्हटलें आहे. पण प्रकृतस्थळीं—होढः—८।२।३१ या सूत्राचें कार्यच होत नाहीं. कारण—हस्य ढःस्याज्झलि पदन्तेच— । तेव्हां या व्याख्यानाचें प्रयोजन काय ?

**शंका दुसरी**—" भूवादयोधातवः " ।१।३।१ याची व्याख्या " क्रियावाचिनः भ्वादयः धातुसंज्ञाः स्युः " तेव्हां प्रकृत सूत्रांतील " भुवा " याचें सार्थक्य कसें ? 'भ्वादयोधातवः' असें सूत्र कां नाहीं ?

**शंका तिसरी**—" इकोऽचिविभक्तौ।७।१।७३ " हें सूत्र " इकोविभक्तौ " असें असलें तरी त्यापासून उक्त सूत्राचें कार्य होतें. असें असतां " अचि " याशब्दाचें प्रयोजन काय ? कारण 'विभक्तौ' असें म्हटलें तरीहि पुढें 'सु'या प्रत्ययानें नुगागमप्राप्ती होऊन वारिन्+सु (स्) अशी स्थिती झाल्यावर " स्वमोर्लुक् " यावरून 'सु' लुक् होऊन वारिन्; पुढें 'न लोपः प्रतिपादिकान्तस्य' यावरून 'न' चा लोप होऊन 'वारि' असें रूप सिद्ध होतें, व इतर रूपेंही याप्रमाणेंच सिद्ध होतात. तेव्हां 'अच्' ग्रहणाचें प्रयोजन काय ?

महाराज, पत्रविस्तार बराच झाला, तरी स्थल देण्यास अनमान करूं नये. कळावें ही विनंती.

नारायण गणेश रहाळकर.
मुंबई.

## सूक्ततरंग.

—:*:—

३२ हरिलंवन असतांही बलिगज सहवास वारणा जिरतें?

३३ सोडुनि सदन्न सेविल कोण सुधी अशुचि वाळके तुकडे ?

३४ धर्माश्रित जय पावे, न अधर्माश्रित न यांत संदेह.

३५ होतो ईर्षासूयाहंकृतिनीं प्रबळही प्रभाव ढिला.

३६ येइल पदरांत कसें यश धर्मन्यायनिष्ठ-जन-घातें.

३७ न गिळी कटुरस म्हणुनी कोप धरुनि काय बाळ कापावा?

## भीष्मपर्व.

१ स-नयांची चिंता बुध न करिति जैशी, तशीच अ-नयांची.

२ करितां साधूच्छेद स्वोच्छेदचि होय, हो यश न राहे;
खल काम-कोप-लोभ च्छळिति, बळें करुनियां वश नरा हे

३ वा! सत्यधर्म जिकडे, तिकडे श्रीकृष्णनाथ जाणावा,
हा तेथें जय, रविला प्रार्थुनि नलगे प्रकाश आणावा.

४ न भजति सुयशस्काम क्लीबा, आरोग्यकाम चिबुडाला.

५ वन्यगुणें काय घडे मारुतिशीं इतर वानरां जन्य.

६ वृद्धहि सिंह महामदमत्ताही काय गा! ढळे नागा ?

७ सुबुभुक्षितही सुपितर म्हणति क्षुधिता मुला ' सुपायस खा. '

८ सुगुरु सुशिष्य सुवश कीं सुस्त्रीवश सुबहुमन्मथ नरा ज्या.

९ जे जे गुरुभक्तिरसिक ने न भ्रमले पडोनि संत तमीं.

१० जिकडे वपु तिकडे मन युक्त, न शोभेल अन्यथा नातें,
पायें अनन्य लोटुनि लावावें अन्य काय थानातें?

११ अन्य असोत, वदेल स्वसुताप्रति अहितवचन आइ कशी ?

१२ कैसा जिंकावा हो! करुनि बळें आहवा[१] युवा जीनें ?
वा! जिंकिला कधींतरि जवनें तरणेंहि वायु वाजीनें ?

१३ साक्षाद्विष्णुपदाहूनि पूर्ण करिल काय सर्व काम गया ? ॥

१ युद्धास. २ वृद्धानें.

१४ नखहि नको ज्या कार्या त्या काढावा कशास करवाल[1] ? ॥
१५ सन्मित्रोक्ति करी जें अमृतनदाची न तें करी लहरी.
१६ पावेल श्रीच्याशीं ज्येष्ठेचा कोंवि पांड[2] सेंदूर.
१७ अनता जना शिवे रे ! संसारीं खोखटी दशा न नता.
१८ प्रावृट्प्रियभेकांच्या कां न गभे सुरभि[3] मानसा गैरगा[4];
क्षुद्रनदी जशि धरिती, तसि न धरी दुरभिमान सागरगा[5].
१९ आत्मस्थिती[6] निववी जशि, तशि तप्तासि न सुरापगा स्वोदरें[7].
२० श्वश्रूपुढें स्नुषा, गुरुशक्तिपुढें शक्ति नच नटावी हो !
२१ मित्रें पदार्थ मित्रा न धरूं द्यावा करील विभ्रम जो.
२२ व्यसनीं तेज न सोडी कुलज हृदय, पावकांत माणिकसें.
२३ धन काय ? काय तेंही जें स्वजन व्यसन पाळिना शास्त्र.
२४ वपु न बहुत पोषावें, यशचि, सदा खाय ज्या न कीनाश;
बुध होउं दे प्रतिज्ञानाश न, अज जेंवि जानकीनाश.
२५ व्याघ्र कसा व्याघ्रोदर चिरिल ? क्षम तो वृकोदर चिराया.
२६ होय न जातां दीपावरि कोणीही पतंग जयशाला[9]
बा ! पावला कधींतरि हरिशीं झगडुनि मतंगज यशाला.
२७ लोकीं म्हणेल कोण स्वामित्राणें सुयोध नाव न हो ?
२८ मित्रमतिच हित करिती, मायचि म्हणती बळें, ‘ सुपायस खा. ’
२९ रुचि अमृतीं सांपडतां, रसिकीं घ्यावी कशास रुचि ताकीं ?
३० कोण तयातें मारिल ज्याचें जगदीश परम तो कवच,
ज्याचें प्रभुला बहुमत जैसें वृद्धासि परम तोक वच.
३१ संत सकलशरणांगत वत्सल, नाहींत अधिक शिबिकांहीं,
एक्यासदुक्तिनें जी सुगति घडे, ती न कोटि शिबिकांहीं.
३२ कैसे शमविल कोपप्रभृति, न शमवेल मन्मथ नरा ज्या ?
३३ अति जीर्ण तसें न जसें म्हणवी भंगोनि ‘ हा ! ’ निशांत[1] नवें.

---

१ तरवार. २ योग्यता. ३ वसंत. ४ विष. ५ समुद्राला मिळणारी. ६ आत्मज्ञान ७ आपल्या उदरानें. ८ यम. ९ जयगृह. १० गृह.

३४ संस्कारधर्मलोपें दुष्टजन समागमें उडे शुद्धी;
मग गुणवंताचीही सद्विक्षेपीं प्रवर्तती बुद्धी.
३५ हितरतगुरुमन पाहुन गतसद्वृत्ता मुलांस, कळकळतें.
३६ होईल तृणांत तृणसम यज्ञविहित तज्ञमहित द्रर्भ कसा ?
३७ क्षत्रिय शरीर जें जें पात्र सुशस्त्रा न आमयातें हो.
३८ प्रेमभराचि विकळ करी धीरा न तसा पडोनि नगहि वर.

---

## द्रोणपर्व.

१ नसतां धुरंधर वृषभ बाळवृष भरें करूनि भा, वांके
२ रविरुचिचें तीमार्गें संपादे स्वल्पकाज वातीस,
विसरविल काय तेज प्रकट करुनि अल्प काजवा तीस?
३ वांकेल ताजव्याचें भारावांचूनि काय बा! परडें?
४ होईल काय हंसी गति टाकूनीहि आलसा चिमणी ?
५ सिंह शरभाश्रितांचें करितील अनिष्ट काय गुरगुरुनी?
६ भगवत्प्रसादसुकवच ल्याला जो साधु, काय तो मरतो?
७ गुरुवचनरत्न डोळस मान्य करी मान्य अंध न करी तें.
८ जरी मरण हित, अहितमर्दनकामें तथापि टाळावें.
९ सिंधु-अगस्त्याचमना न पुरे पुरतील काय मग अंधु.
१० आत्माहि उपेक्षावा नोपेक्षावाच बोल संतांनीं,
झाला भक्तमनोरथ न गुरुजनीं, कीं न फोल संतानीं.
११ पूर्ण गुरुदया नव्हतां व्हावें कैसें तयासम न्यूनें?
१२ देती प्रभूक्तितें श्रितमति, कुलजा जेविं मान सासुतें
१३ मृत्यु हरितसे समयीं अमरांसहि कवण मृत्युला चुकवी,
ऐसें जाणुनि तत्व, व्यसनांत न मोह पावती सुकवी.
१४ श्रीगणपतिजवळ गणक सिद्धांतरहस्य जो सुधी सिकता,
जो त्या बळें न मोजिल कां ? गंगासिंधुजंतुसह सिकता.

---

१ साधूंचे मत्सराचे ठायीं. २ कूप. ३ कल्पवृक्षाचे ठायीं. ४ वाळू.

१५ तंतुपटें काय हारिल दिग्गिभांच्या घनहिमातपा कोळी ?
१६ द्विज बहु मानासि जपे, साधु जसा वृद्धजनकदेहातें.
१७ ज्या काळाच्या वदनीं मेरु विरे त्यांत कां न पृथुक विरे ?
१८ प्रभुनें प्रभुला द्यावें देइल दीना न दीन देशाला.
१९ उपदेशासि न वळतां कोणीही न शुभ लाभला मार्गे.
२० श्रीकर माथां असतां बहु काय छत्र, काय वा चवर ?
२१ कांसेसि लागल्याचें क्षुद्र अलाबुहि करूनि भवन तरे.
२२ गुरुवचना कीर्ति जशी कैंची पविच्या तशी भली कवचा ?
२३ शोकीं आप्तसमागम विषतरुचा जेंवि भरविला पाला.
२४ चिंता चतुर न वरिती, नाशी धृति, वित्त, काळजी बा हे.
२५ तिमिरहत गतीच्छु कवण रविच्या घालील आण वाजीतें.
२६ रक्षोचित प्रतिज्ञावच, न तसें धन, कलत्र, शिर, कविला.
२७ जो गुण करी तयाचें अरिवश होउनि अनिष्ट वाक्य रची.
२८ कां नवलास नव्हे घटकर्णगळीं जरि बसेल कानवला ?
२९ करतील मराळाचें काय, धरुनिही समस्त बक रागा ?
३० हंसध्वंस कधींतरि केला संगर करूनि काकांहीं ?
३१ गुरुकार्यासाचि कविचें निजकार्या न बहु मानस त्वरतें.
३२ कीं सर्वदाहि सत्या सत्संधा निष्फळाचि खलसंधा.
३३ बा ! चिंतातटिनीच्या गिळिले बहु देव, दैत्य, नर, डोहें.
३४ चुकवावें हरिणाच्या कैसें क्षुब्धाहरीस कळपानें ?
३५ कांहीं काळ सुखें कीं दुःखें संसारिकाय कोंदे गा !
३६ हास्यचि बहु ताप न विष, मानधन न साहतात येराचि तें.
३७ अंगार सर्व दुर्धर तदपि चकोरासि जे सुखें पचले.
३८ तेजस्वी नच वांके, स्त्रीकारिल केसरी कसा जीन ?
३९ दैवत्यक्तासि शके न सखा न पिता न माय ताराया.
४० नांदे सुखे सदोदित संसारी तोचि, जो अनय न करी;

---


१ दिग्गजाच्या. २ पाऊस, थंडी, उष्णता. ३ भोपळा.

न निघे इतर जन, बुडे व्यसनीं पंकीं जसा अनर्थेन करी.
४१ आश्या नसतां भीतो मग न गणी सत्त्वसागर विपत्ती.
४२ समयीं गुग जाणुनियां शब्देंही सुयश साधु साधुनि घे.
४३ प्रबळहि कुपितहि सुपुरुष धर्मानें द्विरद भी महातातें.
४४ त्यजिलें सर्वस्वहि परि न पळहि सत्या बुधें, नभा वातें.
४५ भीरु जयश्रीस तसे कन्येला वर जसे नको विदरे.
४६ स्वजनपरित्राणाहुनि अन्यव्रत मत नसेचि आर्याला.
४७ समरीं सहाय जो जन तो प्राणाहूनि अधिक लक्षावा.
४८ स्वभुजावन जड ज्याला, श्रितरक्षण करिल काय तो काचा?
तो धन्य, जया आश्रित उत्संगावरिल काय तोकाचा.
४९ ब्रह्मद्रव्य, ज्ञातिद्रव्य, गुरुद्रव्य रक्षिति न हरिती,
ब्रह्मण्य सत्यवादी दीजननीं तातसे दया करिती.
५० अभिमुख वात वहातां तरुला व्यापील काय गा! वेल.
५१ सुरभी म्हणेल काय व्याघ्रें स्वसमक्ष वासरा खावें?
५२ जशि आपुली ताशि बुडों दे बुध पंकांत गाय न पराची.
गानपटुसखा समयीं सांवरितो तान गायनपराची.
५३ जरि लांबरुंद बळकट, होतिल सम काय कांबळे-शाला?
५४ असतें प्रथम सुविकासित परि बहु केला अधर्म मुख सुकवी.
५५ रविदर्शनेंचि पावे तपतांही ग्रीष्म तोख राजीव.
५६ नाकास लावितां तो मानधना साहवे चुना काय?
५७ सदनीं शिरल्यावरि कां रोंविल मर्मी न दांत काला[१]ही.
५८ अनुकूल दैव असतां न समर्थ करावयास हानि यम
होतां तें प्रतिकूल प्रबलहि दुर्बलाचि होय हा नियम.
५९ अभिमानी आप्तांचा साहेल असोनि शक्ति अंत कसा?
६० नसतो विवेक कांहीं बा घडतो आत्मघातही कुपितां[३]
सु-पिताहि क्रोधाच्या आवेशें करुनि होतसे कुपितां[४].

[पुढें चालू.]


१ अंध. २ काळसर्प. ३ रागावलेल्याला. ४ दुष्ट बाप.


## आकृती १




## आकृती २


लंडन येथील सूर्य किरणांची स्थिती.
आकृती २






अ इ = आंस; आ ई = विषुववृत्त.

## आकृती ४




अ इ = आंस; आ ई विषुववृत्त

# चित्रलेखन मूलतत्व ( पुस्तक पहिलें.)

सतत पंचवीस वर्षे ड्रॉईंग शिकविण्याच्या अनुभवावरून ज्या ज्या गोष्टी विद्यार्थ्यांस प्रथम शिकविणें अवश्य वाटलें त्या सर्व शास्त्रीय नियमानें पद्धतशीर बसवून हें पुस्तक तयार केलें आहे. पुस्तकाची किंमत प्रथम सहा आणे ठेविली होती, परंतु कलेचें शिक्षण व अभिरुची आपले देशांत जितकी असावी तितकी नसल्या कारणानें व त्याचा प्रसार फार व्हावा व विद्यार्थ्यांस घेण्यास सुलभ जावें करितां याची किंमत अगदींच कमी म्हणजे फक्त अडीच आणे केली आहे. अशा तऱ्हेचें हें मराठींत पहिलेंच पुस्तक आहे. तेव्हां सर्वांनीं याचा उपयोग करून घ्यावा अशी आमची शिफारस आहे.

हें पुस्तक मे. विद्याखात्याचे डायरेक्टर सा. बा. यांनीं मराठी शाळांकरितां व मराठी शाळांचे लायब्रऱ्यां करितां आपले मेमो नंबर ६०९४ तारीख १, १२. १९०० मध्यें पास केलें आहे. कळावें.

म्यानेजर चित्रशाळा छापखाना,
पुणें सिटी.

---

# विक्रीस तयार.

**माहे एप्रील १९०१ अखेर नवीन नकाशे छापलेले विक्रीस तयार आहेत ते:—**

| | | | |
|---|---|---|---|
| अमेरिका खंडाचा नकाशा. | दर | .... .... | ४८१२ |
| रत्नांगिरी जिल्ह्याचा नकाशा. | दर | .... .... | ३ |

N. V. PATVARDHAN.
अ० क्युरेटर ग० सें० बुकडिपो,
मुंबई.

---

मृष्टचमत्कार—(१ ल्या यत्तेकरितां ) किं०८= रा० का० ल० जोशी शनवार पेठ घर नंबर १९९ पुणें यांजकडे शेंकडा २५ कमिशनवर मिळतो.

# सार्थ प्राकृत प्रकाश.

सदरहू पुस्तक आमचे मित्र रा. रा. शंकर रामचंद्र हतवळणे ह्यांनीं प्रसिद्ध प्राकृत वैयाकरण वररूची ह्यांच्या ग्रंथाच्या आधारें केलें आहे प्राकृत भाषा ही संस्कृत व हिंदुस्थानांतील अर्वाचीन भाषा ह्यांमधील एक सांखळी आहे. संस्कृतांतून प्राकृतांत व प्राकृतांतून अर्वाचीन भाषांत रूपें कशीं आलीं, हें समजल्याशिवाय शब्दांची खरी व्युत्पत्ती समजली असें ह्मणतां येत नाहीं. पुष्कळ ऐतिहासिक प्रश्नांशीं प्राकृताचा निकट संबंध आहे. तेव्हां ह्या भाषेचा चांगला परिचय असल्याशिवाय त्यांचा उलगडा करण्यास अडचण असते. शब्दांचीं रूपें कशीं बनलीं व त्यांस आचार्यांच्या सूत्राचा मूळ आधार कोणता, हें प्रस्तुतच्या पुस्तकावरून दिसून येईल. प्राकृत प्रकाशाचे एकंदर १२ परिच्छेद असून पहिल्या ९ परिच्छेदांत महाराष्ट्री जी मुख्य प्राकृत भाषा तिजविषयीं व बाकींच्या तीन परिच्छे-दांत पैशाची, मागधी व शौरसेनी ह्यांच्या संबंधाच्या मुख्य मुख्य गोष्टी सांगितल्या आहेत. हें पुस्तक मराठी शिक्षक, ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थी व हायस्कुलांतील वरच्या वर्गांतून मराठी शिकणारे विद्यार्थी ह्यांस विशेषें-करून उपयोगीं पडण्यासारखें आहे. पुस्तकाची किंमत ८८ आहे. टपाल हशील शिवाय. एकदम बरींच पुस्तकें घेणारास कमिशन मुबलक मिळेल. पुस्तकें आमच्या छापखान्यांत विकत मिळतील.

म्यानेजर चित्रशाळा छापखाना.

---

## विक्रीस तयार. किं. १२ आणे.

मेहेरबान लिव्हारनर साहेब यांनीं इंग्रजींत लिहिलेले सिटीझन आफ इंडिया या पुस्तकाचें मराठी भाषांतर छापवून विक्रीस तयार आहे. व हे बुक डा. आ. प. ई. यांनीं मराठी ५।६ यत्तेकरितां नेमले आहे.

म्याकमिलन आणि कंपनी.

९२ ब्यॉक स्ट्री. मुंबई.


---

प्रकाशक—शंकर नरहर जोशी.

*Registered No* 179.

पुस्तक १२. ॥ श्री ॥ अंक ६.

# मराठी शालापत्रक.

# MARATHI SCHOOL PAPE

जून १९०१.

## विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| प्रतिमासिक स्फुट विचार .... .... .... .... | १३७ |
| -शिक्षक मित्र- ... ... ... ... ... | |
| मराठी भाषेची लेखन-पद्धती. .... .... .... .... | १३८ |
| धर्मशिक्षण व नीतिशिक्षण. .... .... .... .... | १४९ |
| पत्रव्यवहार .... .... .... .... | १५५ |
| १-सिद्धान्तकौमुदींतल्या शंकांची उत्तरें- ... ... ... ... | |
| सूक्ततरंग .... .... .... .... | १५८ |
| शिक्षक-मित्र..... .... .... .... .... .... | १-८ |


‘ चित्रशाळा ’ प्रेस, पुणें.

आगाऊ वार्षिक वर्गणी, टपालखर्चासह रु० १८३.

फुटकळ अंकास ८३.




म्यानेजर चि० शा० प्रे० पुणें.




---

## विक्रीस तयार. किं. १२ आणे.

मेहेरबान लिव्हारनर साहेब यांनीं इंग्रजींत लिहिलेले सिटीझन आफ इंडिया या पुस्तकांचे मराठी भाषांतर छापवून विक्रीस तयार आहे व हे बुक डा. आ. प. ई. यांनीं मराठी ५।६ यत्तेकरितां नेमले आहे.

**म्याकमिलन आणि कंपनी.**

१२ ब्यॉक स्ट्री मुंबई.

# शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यांसी । हें अवघें सद्गुरुपाशीं।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळ जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १५ जून १९०१. अंक ६.

## प्रातिमासिक स्फुट विचार.

शिक्षक-मित्र.

आजचे अंकाचे शेवटीं 'शिक्षक-मित्र' नामक एका लहानशा ग्रंथाचीं आठ पृष्ठें दिलीं आहेत; व हा ग्रंथ सुमारें ७।८ अंकांत समाप्त होईल. हा ग्रंथ कै० हरी श्रीधर उपाध्ये धुळें ट्रेंनिंग कालेजांतील माजी शिक्षक यांनीं लिहिलेला आहे. यांनी तो छापण्यासाठीं लिहिला होता. परंतु ते सन १८९६ चे डिसेंबर महिन्यांत मृत झाल्यामुळें तो तसाच त्यांचे एका मित्राजवळ पडून होता. तो उपाध्ये यांच्या कित्येक मित्रांच्या विनंती वरून आम्ही शालापत्रकांत प्रसिद्ध करीत आहों. उपाध्ये यांचें थोडेंसें चरित्र शालापत्रकाच्या फेब्रुवारी सन१८९७ च्या अंकांत आलें आहे- त्यावरून व ते शाळांतून आणि ट्रेनिंग कालेजमध्यें प्रख्यात शिक्षक होते या वरून त्यांचीं आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस चांगली ओळख असेल. शालापत्रकांत व ट्रेनिंग कालेजाच्या शिक्षणक्रमांत अमुक अमुक विषय कसे शिकवावे याची चर्चा वारंवार येते. परंतु ती इंग्रजी ग्रंथांचे आधारेंच बहुधा येते. प्रस्तुतच्या लहानशा पुस्तकांतले विचार स्वतंत्रपणें सुचलेले असे आहेत. दुसरी एक त्यांच्या संबंधाची विशेष गोष्ट अशी आहे, कीं प्रथ-

मतः ट्रेनिंग कालेजांत शिकवावें कसें या बद्दलचीं व्याख्यानें ऐकून व तेथील प्राक्टिसिंग स्कुलांत शिकवून व पुढें शाळांत शिकविण्याचा अनुभव बरेच दिवस घेऊन तयार झालेल्या अशा एका हुषार शिक्षकाचे हे विचार आहेत. पुष्कळ शिक्षक असे म्हणतांना आढळतात, कीं, "ट्रेनिंगमध्यें असें असें शिकवा म्हणून सांगतात तें निराळें व प्रत्यक्ष शाळांतून ज्या पद्धतीनें काम करावें लागतें ती निराळी. ट्रेनिंगांत जसें शिकवितात तसें प्रत्यक्ष शिकवितां येणें कठीण आहे." आतां हें म्हणणें खरोखरी अगदीं कोत्या समजुतीचें आहे. व्यवहारांत नियमबद्ध पद्धत एक पडते व तिची अंमलबजावणी पुष्कळदां बरीच निराळी करावी लागते, हें अंशतः खरें आहे. परंतु सांप्रत ट्रेनिंगमध्यें शिकविली जाणारी शिक्षणपद्धती व एकाद्या शाळेंत गेलें असतां दृष्टीस पडेल ती शिक्षणपद्धती यांचेमध्यें जेवढा फरक दृष्टीस पडतो, तेवढा कांहीं वास्तविक पाहतां पद्धत व प्रत्यक्ष केलेलें काम यांचेमध्यें पडूं नये. हीच गोष्ट प्रस्तुत पुस्तकांत कै० उपाध्ये यांनीं स्वानुभवाच्या गोष्टी सांगून सिद्ध करून दाखविली आहे. त्यांचा अनुभव ट्रेनिंगमधील विद्यार्थी, शिक्षक, हेडमास्तर व ट्रेनिंगकालेजातील शिक्षक इतक्या प्रकारचा आहे. तेव्हां यासाठीं त्यांचा हा अल्पसा ग्रंथ प्रत्येक शिक्षकानें वाचून मनन करण्यासारखा आहे. तेव्हां शिक्षक लोक या लेखाचें नीटपणें परिशीलन करतील अशी आम्ही आशा करितों.

---

## मराठी भाषेची लेखनपद्धती.

( पुढें चालू )

गेल्या मार्च महिन्याच्या अंकांत जें विवेचन केलें आहे, त्यावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल, कीं मराठीतलीं सर्व क्रियापदरूपें संस्कृतांतल्या कोणच्या तरी रूपांवरून साधलीं आहेत. आतां हीं रूपें शुद्धरीतीनें कशीं लिहावीं ह्या विषयीं येथें जास्त चर्चा करण्याची गरज नाहीं. त्याचा विचार व्याकरणामध्यें परिपूर्ण असतो. तसेंच, हीं

रूपें होतांना अन्त्य व उपान्त्य यांच्या स्वरांमध्यें ऱ्हस्वदीर्घत्वाच्या संबंधानें होणारे फेरफार, धातूस प्रत्यय लागण्याचे पूर्वी जो 'ई' आगम होत असतो तो ऱ्हस्व किंवा दीर्घ होणें, ह्या गोष्टी ही व्याकरणांत आहेत. ह्यासाठीं जोशी यांचें प्रौढबोध व्याकरण पाहावें. त्यांत असल्या सर्व रूपांचा पूर्ण विचार केलेला आहे. हे प्रकार लहान मुलांना स्वतः व्याकरणावरून नेहमीं ठरवितां येणें कठीण आहे. परंतु ते रोजच्या संवयीनें तेव्हांच ध्यानांत राहतात. 'मी करितों' यांतील 'मी' दीर्घ, 'रि' ऱ्हस्व व 'तों' वर अनुस्वार, या गोष्टी मुलांनीं पाठ करून ध्यानांत ठेविल्या पाहिजेत असें नाहीं. या सहजीं त्यांचे ध्यानांत राहातात.

आतां या रूपांत अनुस्वार कोठें आहेत, एवढें मात्र येथें सांगतों:—

जुनावर्तमान व रीति भूत—प्रथम पुरुषीं उभयवचनीं रूपांच्या अन्तीं अनुस्वार आहे.

चालू वर्तमान—(१) प्रथम पुरुषीं उभयवचनीं अनुस्वार असतो; (२) द्वितीय पुरुषीं नपूंसकलिंगी एकवचनीं उपान्त्याक्षरावर—तूं येतेंस. (३) द्वितीयपुरुषीं अनेकवचनीं अंत्याक्षरावर—तुम्ही येतां. (४) तृतीयपुरुषीं नपुंसकलिंगी एकवचनीं रूपाच्या अंतीं अनुस्वार असतो; जसें, तें करितें.

भूतकाळ—यांत चालू वर्तमानकाळाप्रमाणें अनुस्वार असून, शिवाय तृतीयपुरुषीं अनेक वचनीं रूपाचे अंतीं अनुस्वार असतो;—तीं मुलें बसलीं.

भविष्य काळ—प्रथम पुरुषीं अनेकवचनीं—आम्ही जाऊं.

आज्ञार्थ—यांत प्रथम पुरुषीं अनुस्वार असतो—मी जाऊं, आम्ही जाऊं.

विध्यर्थ—यांत नपुंसकलिंगी रूपांत अंतीं अनुस्वार येतो.

नाहीं—या क्रियापदाचे अंतीं नेहेमीं अनुस्वार देतात. पण तो प्रथम पुरुषीं मात्र येऊं शकेल. इतरत्र तो येण्याचें कारण दिसत नाहीं. पाहीजे तर सर्वच ठिकाणचा अनुस्वार काढून टाकावा.

ह्या सर्व अनुस्वारांना कारण संस्कृतांत या रूपांशीं जुळणाऱ्या रूपांत अनुनासिक अक्षर ( विशेषतः 'म' ) असतें हें आहे. यासाठीं हे अनुस्वार मुळींच ठाकाऊ नाहींत. खेरीज यांपासून प्रथम पुरूष, तृतीयपुरुष

( उदा०–मी करितों, तो करितो, इ० ) इत्यादि कित्येक भेद सहजीं कळतात. मग हे अनुस्वार काढून टाकण्याचा एवढा आग्रह कां असावा! हें आम्हास कळत नाहीं.

आतां धातुसाधितांचा विचार केला, तर करणें, बोलणें, चालणें, यांतील अन्त्याक्षरावरचा अनुस्वार काढून टाकावा अशी या पुस्तकांत शिफारस केली आहे, ती मुळींच बरोबर नाहीं. हा अनुस्वार संस्कृतांतील करणं, लेखनं, चलनं इत्यादि रूपांच्या अन्त्य अनुस्वारावरून आला आहे, या साठीं तो व्युत्पन्नच आहे. शिवाय अकारान्तखेरीज सर्व नपुंसकलिंगी नामांच्या अंतीं अनुस्वार असावा असा मागें आपण नियम ठरविला आहे; यासाठीं हा अनुस्वार आपणास रद्द करितां येणार नाहीं. आतां धातुसाधित शब्दांचीं सर्वच रूपें पुढें लिहितों, त्यावरून अनुस्वार कोठें हवा हें कळून येईलच.

## ' कर ' धातू–

करणें, करीत, करितां, (उ०–करितां येतें;) करितांना, केला, केलेला, केली, केलेली, केलें, केलेलें, करिता (उ. करिता झाला ) करून, करूं (उ०–करूं लागला ), करणार, करावयाचा (ची, चें ) इत्यादि.

आतां नामांच्या रूपांचा विचार करूं.

(१) नामाच्या अनेकवचनीं सामान्यरूपाच्या अन्त्याक्षरावर अनुस्वार असतो. हा प्राकृत भाषेतून आलेला आहे. कारण त्या भाषेंत अनेकवचनीं सामान्यरूप 'हं' हें अक्षर लागून होतें, व त्याचें मराठींत 'अम्' असें होतें. उदा०–बापास, बापांस; घोड्यास, घोड्यांस; नदीस, नद्यांस, मातेस, मातांस; बायकोस, बायकांस; इत्यादि.

'भाव' हें नाम चालवून दाखविलें असतां मराठी विभक्तिरूपांत अनुस्वार कोठें हवा व कोठें नको, हें दिसून येईल.

भाव, अकारान्त पुल्लिंगी.

| | ए. व. | अने. |
|---|---|---|
| प्रथमा— | भाव, भावो, भावू | भाव. |
| द्वितीया— | भावा, भावास, भावाला, भावातें. | भावां भावांस, भावांला, भावांना भावांतें, |
| तृतीया— | भावें, भावानें, भावाशीं. | भावीं, भावानीं, भावांहीं, भावांशीं. |
| चतु०— | भावास, भावाला, भावातें | भावांस, भावांला, भावातें, भावांना |
| पंच०— | भावाहून [ घर, घरून ] | भावांहून. |
| षष्ठी— | भावाचा | भावांचा. |
| सप्त०— | भावीं [ डोळा—डोळां ] | भावीं. |
| संबो.— | भाव | भावांनो. |

या प्रत्ययांमध्यें अनुस्वार आहेत ते साधार आहेत. त्यांच्या संबंधानें ते संस्कृतांतून कसे आले इत्यादि प्रकारची यापेक्षां जास्त चर्चा पाहिजे असल्यास ती व्याकरणांत पाहावी.

**सर्वनामें**—‘ तुं ’ यांत नेहमीचा अनुस्वार आहे. ‘मी’ व ‘आम्ही’ ही रूपें तृतीयेची असतील तेव्हां अनुस्वार द्यावा. ‘ त्वां ’ यावर अनुस्वार देतात, व ‘ म्यां ’ यावरही देतात. परंतु ‘ म्यां ’ यांतला अनुस्वार पाहिजे तर रद्द करितां येईल. तथपि हें तृतीयेचें रूप आहे अशा दृष्टीनें हा अनुस्वार सदृश्यासाठीं कदाचित् ठेवावा लागेल. ‘कांहीं’ यांत दोन्ही अक्षरांवर अनुस्वार देतात. याची मंडळीला वाटेल तशी व्यवस्था करण्यास हरकत दिसत नाहीं. दोन्ही पक्षाला मान्य होण्याजोगी तोड म्हटली तर पहिल्या अक्षरावरचा अनुस्वार काढावा व दुसऱ्यावरचा कायम ठेवावा.

**विशेषणें**—क्रियाप्रमाणें फिरणाऱ्या विशेषणांचे रूपांत व्याकरणदृष्ट्या अनुस्वार येत असेल तेथें तो दिलाच पाहिजे.

याशिवाय अनेक निरनिराळे शब्द, नामें, क्रियापदें, विशेषणें, अव्ययें वगैरे यांमध्यें त्यांच्या निरनिराळ्या अक्षरांवर कोणी अनुस्वार देतात, कोणी देत नाहींत असले प्रकार आहेत. त्यांच्यासंबंधानें ग्रंथकार यांनीं सुचविलेला उपाय आम्हांस पसंत आहे. तो हा कीं अशा शब्दांत अमुकएक ठिकाणीं अनुस्वार असण्यास योग्य कारणें

आहेत कीं नाहींत हें पाहून एकदां निकाल ठरवावा व अशा शब्दांची एक निर्णयाची यादी तयार करावी; व मग तो निकाल अखेरचा असें समजून त्याप्रमाणें सर्वांनीं ते शब्द नेहमीं लिहीत जावें.

या प्रमाणें अनुस्वाराचा विचार पूर्ण झाला. आतां ऱ्हस्व-दीर्घत्वाबद्दल विचार करूं.

ऱ्हस्व-दीर्घत्वाचे संबंधानें पाहिलें, तर भिन्नमत होत असल्यास तें अन्त्य व उपान्त्य यांसंबंधाच्या गोष्टीविषयीं होतें; याशिवाय इतरल जे स्वर असतील ते ऱ्हस्व असावे किंवा दीर्घ असावे, हें एकदां विचार करून निर्णयात्मक ठरवून टाकावें. यासंबंधानें प्रस्तुत पुस्तकांत जो विचार केला आहे तो आम्हांस बहुतेक मान्य आहे. त्याविषयीं आम्हास इतकेंच सुचविणें आहे, कीं अखेर निर्णय करितांना प्रत्येक गोष्ट कायमची ठरविण्याकडे लक्ष ठेवावें, कोणच्याही प्रकारची धरसोड करूं नये, हें बरें. कारण धरसोड झाली असतां ती गोष्ट विद्यार्थी व शिक्षक यांना फार त्रास दायक होईल. एकाद्या गोष्टीच्या संबंधानें विकल्प किंवा दोन प्रकार असतील तर ते असूं नयेत असें नाहीं. पण तसले विकल्पाचे प्रकार विद्यार्थी व शिक्षक यांच्यासंबंधानें नसावे; व क्रमिक पुस्तकें व इतर शालोपयोगीं पुस्तकें यांत एकच प्रकार असावा. ग्रंथकार पुढें वैकल्पिक प्रकार पाहिजे तर उपयोगांत आणतील. मात्र ते साधार व व्याकरणशुद्ध असावे म्हणजे झालें.

अन्त्य व उपान्त्य स्वर यांच्या संबंधाचा तक्रारीचा भाग असा आहे, कीं जे संस्कृत शब्द जसेच्या तसेच मराठींत आले आहेत, त्यांचे स्वर मराठींत त्यांना विभक्त्यादि लावितांना किंवा त्यांचा मराठींतल्या तऱ्हेनें उच्चार करितांना जसेच्या तसेच ठेवावे, कीं त्यांत मराठींतल्या पद्धतीप्रमाणें फेरफार करावा. या संबधानें कित्येकांचें म्हणणें असें आहे, कीं तें मूळचे जसे असतील तसेच ठेवावे. कारण काय, तर ते मूळचे संस्कृत आहेत व संस्कृतांत तसे आहेत म्हणून! आतां हें त्यांचें म्हणणें सर्वस्वी कधींही चालणार नाहीं. कारण सामान्यरूपांसारखे जे अगदीं जरूरीचे फेरफार आहेत,

ते करावेच लागतात. ते करितांना अमका शब्द संस्कृत म्हणून त्यांतला मूळचा स्वर असेल तसाच ठेवा, फिरवूं नका, असें म्हटलेलें चालत नाहीं. उदाहरणार्थ 'रवि' याचें रूप 'रवीनें' असें रीतीप्रमाणें न करितां 'रविनें' असें करा, असा हट्ट कोणास धरितांच येणार नाहीं. परंतु जेव्हां शब्दाला प्रत्यय वगैरे लागलेला दिसत नाहीं, आणि तो शब्द मूळचा जशाच्या तशाच उपयोगांत आणिलेला दिसतो, तेव्हां तो मूळचा आहे तसा लिहा असें कित्येक म्हणतात. दुसऱ्या पक्षाचे म्हणणें असें आहे, कीं मूळचा शब्द कसाही असला, तरी तो मराठींत आल्यावर त्याचा ऱ्हस्व-दीर्घ, जसा उच्चार मराठीच्या पद्धतीप्रमाणें होईल, तसा तो लिहावा. आतां कोणाही विचारी मनुष्यास दिसून येईल कीं हें दुसऱ्या पक्षाचेंच म्हणणें सर्वप्रकारें संयुक्तिक आहे. शब्द कोणच्याही भाषेंतला असो, तो आपल्यास हवा असला आणि आपल्या भाषेंत आपण घेतला म्हणजे मग त्यास मराठी पोषागच चढविला पाहिजे. कांहीं शब्द मूळचे अन्य भाषांतले म्हणून त्यांची लिहिण्याची तऱ्हा जर मूळच्या प्रमाणें ठेवा-वयाची, तर मग त्यांचीं विभक्त्यादिकांचीं रूपें सुद्धां कां मूळच्या भाषे-प्रमाणें करूं नये ? दुसऱ्या भाषांतून चोहींकडे अशीच चाल आहे. संस्कृतांत जुन्या काळीं ग्रीक वगैरे भाषांतून व अलीकडे इंग्रजींतून, व क्वचित् इतर भाषांतून शब्द घेतले आहेत. पण त्यांना संस्कृत तऱ्हेचीं रूपें दिलीं आहेत. कित्येक शब्द तर असें बेमालूम संस्कृत बनविले आहेत, कीं ते मूळचे दुसऱ्या एकाद्या भाषेंतले आहेत असें ओळखतां येणें कठीण आहे त्याचप्रमाणें मराठींत जुन्याकाळीं पलटण, तुरूप, आरमार, गलबत वगैरे अगदीं परकीय असे शब्द पुष्कळ घेतलेले आहेत. त्यांना असा मराठी पोषाख आतां चढविला आहे, कीं ते मूळचे परकी आहेत असें आतां मनांत सुद्धां यावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें मराठींत शब्द येतांना अपभ्रंश म्हणून जे झाले, ते तरी कां झाले ? त्यांचें तरी कारण हेंच आहे, कीं मूळ संस्कृत शब्द घेतला म्हणजे त्याला मराठीस जुळेल असें स्वरूप द्यावयाचें. आतां सध्या असा प्रकार झाला

आहे, कीं थोडेंबहुत संस्कृत ज्यांना कळतें असे लोक पुष्कळ असतात, म्हणून आतां आम्ही शब्दांमध्यें पूर्वीसारखा सर्वस्वी फरक करीत नाहीं. परंतु व्याकरणाचें रूप बनविण्यासाठीं जो फेरफार करावयाचा तो इतर सजातीय मराठी शब्दांप्रमाणें केलाच पाहिजे. तेथें मग अमुक शब्द मूळचा संस्कृत म्हणून त्याची कींव करावी, असलें म्हणणें व्यर्थ आहे. यासाठीं असा निर्णय केला पाहिजे, कीं,—

( १ ) मराठींत संस्कृतांतून किंवा कोणत्याही दुसऱ्या भाषेंतून शब्द घेतल्यावर, त्याची व्यवस्था इतर सजातीय मराठी शब्दांप्रमाणेंच सर्व प्रकारें करावी.

( २ ) अशा शब्दांचे अंतीं किंवा उपान्त्य अक्षरांत जे स्वर असतील, ते मराठींतल्या रीतीप्रमाणें ऱ्हस्व, दीर्घ, होत असतील तसे लिहावे.

( ३ ) उच्चाराप्रमाणें मराठी शब्दाच्या अंती ऱ्हस्व स्वर कधींच येत नाहीं. यासाठीं मूळचा शब्द कोणच्याही भाषेंतला असो, त्याचे अंती 'ई' 'ऊ' स्वर असतील ते नेहमीं दीर्घच लिहावे.

हा ऱ्हस्वदीर्घत्वाचा वाद पुष्कळ दिवसांपासून चालू आहे. याचा निकाल जुन्या सर्वमान्य ग्रंथकारांनीं आम्हीं लिहिल्याप्रमाणेंच केलेला आहे. हट्ट काय तो कित्येक संस्कृताचे विशेष अभिमानी लोक यांचा आहे. मात्र ही गोष्ट तितकी कोणीं विशेष आस्थेनें आमलांत आणिली नाहीं. दादोबा पांडुरंग यांनीं आपल्या मताचा कल असाच दाखविला आहे. पण त्यांनीं पक्का निर्णय लिहून ठेविला नाहीं. तसा जर त्यांनीं लिहून ठेविला असता, तर आज असलेले दोन पक्ष कधींच मोडले असते. उभयतां चिपळूणकर व कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं आपल्या व्याकरणांत व भाषाविषयक लेखांत आम्हीं वर दिल्या प्रमाणेंच स्पष्टपणें निर्णय दिला आहे. तेव्हां आतां हा वाद एकदांचा सयुक्तिक रीतीनें मोडून टाकावा हें सर्व प्रकारें उत्तम आहे.

[ पुढें चालू. ]

# धर्मशिक्षण व नीतिशिक्षण.

आज कित्येक दिवस आमच्या मंडळींत असा वाद चालू आहे कीं आमच्या शाळांतून धर्म व नीती यांच्यासंबंधानें मुलांस शिक्षण मुळींच मिळत नाहीं, यामुळें प्रथमतः मुलांचें व त्यामुळें एकंदर समाजाचें मोठें नुकसान होत आहे. सन १८८० सालीं देशांतला शिक्षणक्रम कसा काय चालला आहे याची चौकशी करण्यासाठीं सरकारानें जें कमीशन नेमलें होतें, त्याच्या चौकशींत ही धर्मशिक्षण व नीतिशिक्षण या संबंधाच्या गोष्टी आल्या होत्या; व त्यावेळीं तत्संबंधानें अनेक गृहस्थांचे विचार घेतलेले आहेत. तेव्हांपासून आतांपर्यंत धर्मशिक्षण व नीतिशिक्षण यांच्यासंबंधानें सरकारानें किंवा दुसऱ्या कोणाच्या शाळा असल्यास त्यांनीं विशेष अशी कांहीं तजवीज केलेली नाहीं. यामुळें या विषयावर मधून मधून वाद निवत असतो. तो वर्तमानपत्रांतून किंवा सभांतून झालेला पाहून पुष्कळांस कदाचित् असें वाटत असेल, कीं धर्म व नीती यांच्या संबंधानें सरकारी व खासगी शाळांचे चालक फार अनास्था दाखवीत आहेत. पण वास्तविक तसा प्रकार आहे असें आम्हांस मुळींच वाटत नाहीं. प्रथमतः नीतिशिक्षण शाळांतून मुळींच मिळत नाहीं, ही समजूतच मुळीं चुकीची आहे. नीती म्हणजे खरें बोलणें, प्रामाणिकपणानें वागणें, वडिलांचा, परक्यांचा व गुरूंचा मान ठेवून त्यांची आज्ञा मानणें, सभ्यपणानें वागणें, शरीर, पोषाख, यांची स्वच्छता ठेवणें, चोरी वगैरे दुष्ट कृत्यें न करणें, वाईट शब्द न उच्चारणें, इत्यादि गोष्टी होत. या गोष्टी आमच्या शाळांतून शिकवीत नाहींत असें जें कित्येकांचें म्हणणें आहे, त्याचा अर्थ आम्हांस समजत नाहीं. आतां एवढें खरें, कीं गणीत, भूगोल, इतिहास, व्याकरण, वगैरे विषय जसे शाळांतून शिकवितात तसे हे नीतीचे विषय मुद्दाम घेऊन कोणी शिकवीत नाहींत. परंतु हे विषय तशा प्रकारें शिकविल्यानें पुरे व्हावयाचे नाहींत.

नीतितत्त्वें लहान मुलांना कळावयाचीं नाहींत. त्याच्या संबंधानें व्याख्यानद्वारा सांगूं लागल्यास तो विषय कठीण होईल. दुष्परिणामच होईल. हे विषय उदाहरणांच्या व दृष्टांतांच्या द्वारें शिकवावयाचे आहेत. सत्याचा, सभ्यतेचा, आज्ञाधारकपणाचा परिणाम चांगला, त्याच्या उलट वागणुकीचा परिणाम वाईट, या गोष्टी तशा परिणामांची उदाहरणें ज्यांत आहेत, अशा कथा सांगूनच शिकवावयाच्या असतात. जुन्या काळापासूनचा सर्व देशांतला प्रघातही असाच आहे. आमच्या महाभारतादि ग्रंथांत अनेक कथा अशा तऱ्हेनें आल्या आहेत. हितोपदेश, पंचतंत्र, कथासरित्सागर, वगैरे संस्कृतांतले लहान मोठे ग्रंथ याच उद्देशानें लिहिलेले आहेत. प्रख्यात धर्मसंस्थापक बुद्ध व ख्रिस्त, यांनीं तर आपल्या शिष्यांस धर्म व नीती यांसंबंधी गोष्टी तऱ्हे तऱ्हेच्या सुंदर व मनोरंजक कथा सांगून शिकविल्या. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांतले इसाबनीतीसारखे ग्रंथ तरी यामुळेंच निर्माण झाले. अमुक रीतीनें वागा असें सांगण्यापेक्षां अमके तसे वागले यामुळें त्यांचें असें असें कल्याण झालें असें दृष्टांताचें द्वारें सांगितलें असतां तें कोणालाही चांगलें समजतें, हें उघडच आहे. यासाठीं सुज्ञ जनांनीं पूर्वींच्या काळापासून नीती शिकविण्यासाठीं दृष्टांत, उदाहरणें, अन्योक्ती, आणि प्रत्यक्ष स्वतःचें वर्तन हे मार्ग धरिले आहेत. हेच मार्ग आजकाल सर्व देशांतून शाळांमध्यें चालू आहेत. वाचनाच्या पुस्तकांत असलेल्या अनेक गोष्टी असतात. त्या शिक्षक कांहीं नुसत्या शब्दार्थापुरत्या शिकवित नाहींत. त्यांचें सार, त्यांचें तात्पर्य, त्यांपासून वाचणारानें काय घ्यावयाचें, वगैरे त्यांतलें सर्व मुलांना शिक्षक नेहमीं सांगत असतात. मग 'शाळांतून सध्या नीतीशिक्षण मिळत नाहीं,' अशा प्रकारची ओरड जी कित्येक करीत असतात, त्यांतलें मर्म काय असावें बरें? खरोखरी पाहातां या ओरडींत तथ्य

अगदींच कमी आहे. नीतीशिक्षण कित्येकांचे दृष्टीनें जितकें मिळावंयास पाहिजे तितकें कदाचित मिळत नसेल. पण त्याचा दोष सध्याच्या शाळा व शिक्षक यांजकडे नसून तो मुलांच्या पालकांकडे आहे, हें आम्ही पुढें दाखविणार आहों. हा जो बराच मोठा दोषाचा वांटा पालकांकडे येऊं पाहातो, तो आपल्यावरचा दोष उडविण्यासाठीं कित्येकजण शाळांतून नीतिशिक्षण मिळत नाहीं, म्हणून ओरड करीत आहेत. मुलें शाळेंत सुमारें पांच किंवा सहा तास असतात. तेवढ्या वेळांत सर्व विषय शिकवून नीतिविषयक शिक्षण देणें जितकें शक्य आहे तेवढें शिक्षक नेहमीं देत आहेत. आमच्या शाळांना बोर्डिंगें असून मुलें जर सकाळपासून संध्याकाळपर्यंत, अथवा रात्रंदिवस शिक्षकांच्या ताब्यांत असतीं, तर शिक्षकांना मुलांस नीती शिकविण्यास पुष्कळच जास्त सवड सांपडली असतीं हें खरें. पण तशी व्यवस्था आमचेकडे नाहीं, तेथें उपाय नाहीं. कित्येक म्हणतात, कीं शाळांच्या शिक्षकांनीं पांच सहा तास अभ्यास घेतल्यावर संध्याकाळीं तास दोन तास मुलांना घेऊन फिरावें, खेळावें; म्हणजे मुलांस नीतीचा मार्ग शिकविण्याचे प्रसंग पुष्कळच येतील. गोष्ट खरी आहे. पण असें म्हणणारे हे शिक्षकांचे स्थितीकडे बिलकूल लक्ष देत नाहींत. शिक्षकास पगार मिळणार फार तर २०।२५ रुपये. कित्येक ठिकाणीं तर दाहाचे आंतही ज्यास पगार मिळतो असे शिक्षक आहेत. त्यांनीं बिचाऱ्यांनीं पोटासाठीं पांचसहा तास दगदग केल्यावर मग संसाराची व कुटुंबाची व्यवस्था त्यास पाहावयास नको काय ? कित्येकांना तर वर्षाचें अंती एकंदर संसाराची तोंड मिळवणी करण्यासाठीं एखादा दुसराही धंदा करावा लागत असेल. पोष्टहपीस जसें पांच चार रुपयांची लालूच दाखवून बिचाऱ्या शिक्षकांच्या गळ्यांत घातलें आहे, तशीच गांवचीं सत्रा बलुती हुषार शिक्षकाच्या गळ्यांत अडकविलीं असतां चांगलीं चालतील असें पुष्कळांस वाटत असतें. त्याचप्रमाणें शिक्षकानें शाळा नसेल तेव्हां मुलांचे बरोबर फिरून मुलें वागतात कशीं हें पाहावें,

संध्याकाळीं त्यांचे बरोबर खेळावें व सहल करून यावें असेंही पुष्कळांचें मत असेल. परंतु या गोष्टी शिक्षकाचे हातून हल्लीं होतात त्यापेक्षां जास्त होणें अगदीं अशक्य आहे. मोठी शाळा असेल तेथें लोकानीं एकादे शिक्षकास थोडा जास्त पगार देऊन किंवा इतर वेळीं फुरसत देऊन तो आपला संध्याकाळचा वेळ मुलांबरोबर घालवील अशी सोय मुद्दाम केली तर पुष्कळ फायदा होईल यांत शंका नाहीं.

या गोष्टीची खरी तजवीज म्हटली म्हणजे बोर्डिंगस्कुलें किंवा निदान जेथें सकाळीं सहापासून संध्याकाळीं सहापासून मुलें राहातील अशीं स्कुलें स्थापन करणें ही आहे. अशीं स्कुलें सर्वस्वी सरकार स्थापन करूं शकेल अशी कल्पना करणें अशक्य आहे. तीं लोकांच्याच उद्योगानें स्थापन झालीं पाहिजेत. इंग्लंड वगैरे पाश्चात्य देशांतून असल्या शाळा असतात, त्या लोकांनींच धर्मार्थ ठेवलेल्या फंडातून किंवा वर्गणीवर चालविलेल्या असतात. त्यांस सरकारची मदत मात्र असते. अशा शाळा स्थापन करण्याची खटपट जोंपर्यंत आमचे हातून होत नाहीं, तोपर्यंत आमच्या शाळांतून हल्लींपेक्षां जास्त नीतिशिक्षण मिळणें अशक्य आहे. आणखी पुनः यापेक्षां जास्त नीतिशिक्षण वर्गांत देण्यास सवडही होणार नाहीं. प्रत्येक धड्याच्या एका तासांतलीं पंधरा मिनिटें जर आपण नेहमींच्या धड्यांतील नीतीवर व्याख्यान करण्यांत घालवूं लागलों, तर इतर शिकविण्याच्या विषयांस वेळ कमी पडेल.

नीतिशिक्षणाच्या संबंधानें आपण नेहमीं शाळांस व शिक्षणपद्धतीस दोष देत असतों. पण आपण स्वतः त्या संबंधानें काय करीत असतों? आपल्या घरचीं मुलें सर्व दिवसभर काय करितात, काय शिकतात, खेळावयास किंवा फिरावयास कोठें जातात, त्यांचे सोबती कोण आहेत व कोणच्या प्रकारचे आहेत, इत्यादी गोष्टींची चौकशी किती पालक करीत असतात, याचा विचार प्रत्येकानें आपल्याशीं करावा. सध्या जी आमची शाळांची तऱ्हा आहे, ती लक्षांत घेऊन पाहिलें असतां नीतिशिक्षणाची जबाबदारी बहुतेक पालकांचे माथीं येते. शाळेंतल्या धड्यां-

बरोबर जें नीतिशिक्षण देतां येईल तेवढेंच काय तें शिक्षक देऊं शकेल. त्याशिवाय नीतिशिक्षणासंबंधानें मुलास जें कांहीं सांगावयाचें, तें सांगण्याची तजवीज बरोबरीं झाली पाहिजे आहे या संबधानें पाहिलें तर आमची गृहस्थिती सध्या फार-वाईट झाली आहे. आमच्या पालकांचें मुलांच्या वर्तनाकडे असावें तितकें लक्ष नसतें. मग मुद्दाम मुलांना आपलें जवळ बसवून घेऊन चार नीतीच्या गोष्टी सांगणें हें तर एकीकडेंसच राहिलें. आतां अशी स्थिती असण्याचें कारण काय, तिचा दोष कोणाकडे आहे, वगैरे गोष्टींची चर्चा करणें हें अप्रासंगिक आहे. यासाठीं आम्ही येथें एवढेंच सांगतों कीं, कीं मुलांस सुनीतीचें वळण लावण्याचें काम तात्विक-दृष्ट्या जरी गुरूचें आहे, तरी सध्याच्या व्यवस्थेंत तें गुरूच्या हातून पडावें तसें पार पडत नाहीं व पडणारही नाहीं. बोर्डिंगें किंवा साऱ्या दिवसभर भरणाऱ्या शाळा होतील तेव्हां हें गुरूचें कर्तव्य गुरूकडे जाईल. तेथपर्यंत मुलांस सुनीतीचें वळण लावण्याचें काम मुलांचे वडिलांनीं बरेंचसें केलें पाहिजे, आईबापांनीं रात्रंदिवस मुलांचें वर्तनाकडेस लक्ष ठेवावेंच. परंतु शिवाय त्याच्या वाचनाचीं पुस्तकें व इतर विषय यांच्या द्वारेंही त्यास नीती सांगण्याचा यत्न करावा.

शाळेंत निरनिराळ्या वयांचीं, कमजास्त योग्यतेचीं व भिन्न भिन्न स्वभावांचीं मुलें असतात, यामुळें परस्पर-तुलनेनें नीती शिकविण्याचें योग्य स्थळ शाळा हेंच आहे. म्हणून शाळांतूनच नीतिशिक्षण देण्याची तजवीज जेवढी होईल तेवढी उत्तम, हें खरें आहे. परंतु शाळेंत ही व्यवस्था होण्यास आम्ही मागें सांगितल्याप्रमाणें बोर्डिंग स्कुलें व सर्व दिवसभर भरणाऱ्या शाळा पाहिजेत; व तसें होण्यास पैशाची तजवीज पाहिजे. ज्यांना सवड असेल त्यांनीं आपलीं मुलें नेहमींच शाळेंत ठेवावयाचीं; ज्यांना तशी सवड नसेल त्यांनीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत बहुतेक वेळ मुलें शाळेंत ठेवावयाचीं; अशा शाळेंत सकाळीं सहापासून संध्याकाळपर्यंत अभ्यास, खेळ, व्यायाम, यांच्या द्वारें शिक्षण सारखें चालू असा-

बयाचें. अशा रीतीच्या शाळा आमचे इकडे होत तों मुलांच्या नीतीच्या संबंधाचा बोजा सध्याचे जे मुलांचे गुरू त्यांचेवर मुळींच घालतां येणार नाहीं.

आतां अशा प्रकारच्या शाळा व्हाव्या कशा, हा मोठा महत्वाचा प्रश्न आहे. परंतु त्याचा विचार आज येथें आम्हास करावयाचा नाहीं. सध्या येथें एवढेंच सांगणें पुरें आहे, कीं केवळ सरकाराकडून अशा शाळा स्थापन होणें अशक्य आहे. त्यांची सोय लोकांनीं आपली आपण केली पाहिजे आहे; व मग सरकारानें त्यांस उदारपणानें हात-भार लविला पाहिजे, हें उघडच आहे.

आतां आमच्या शाळांतून धर्मशिक्षण मिळत नाहीं अशी जी पुष्कळांची ओरड आहे, तीविषयीं विचार करूं धर्मशिक्षण हें वास्तविक मुलांच्या पालकांनीं घरच्या घरीं द्यावयाचें. परंतु पूर्वींपासून सर्व देशांत व सर्व धर्मांचे लोकांमध्यें मुलांचें शिक्षण हें धर्मगुरू यांच्या हातीं असे व मुलांना शिकविण्याच्या शाळा त्यांच्याच असत, यामुळें लोकांना नेहमीं असें वाटत असतें, कीं धर्मशिक्षण हें शाळेंत मिळावें. त्याचप्रमाणें धर्म व नीति यांची बहुधा सांगड असते, यामुळें नीती-शिक्षण ही त्याबरोबरच मिळावें असें लोकांत वाटतें आतां हें म्हणणें जुन्या काळच्या शिक्षणपद्धतीप्रमाणें ठीक होतें, परंतु हल्लींच्या शिक्षण-पद्धतीस हें मुळींच लागू पडणार नाहीं. हल्लीचें शिक्षण हें केवळ व्यावहारिक शिक्षण आहे. शिवाय सार्वजनिक शाळा म्हटल्या म्हणजे त्यांत निरनिराळ्या धर्मांचे, जातींचे भिन्नभिन्न पंथांचे व समजुतींचे लोक असणार. केव्हां तर शिक्षक एका धर्माचा व विद्यार्थी निराळ्या धर्माचे, असाही प्रकार असणार. अशा स्थितींत सध्याच्या सार्वजनिक शाळां-तून धर्मशिक्षण कसें देतां येईल ? आमच्या देशांत तर हिंदू, मुसल-मान, जैन, यहुदी, पारशी ख्रिस्ती, अशीं निरनिराळ्या धर्मांचीं मुलें शाळेंत येणार. इंग्लंडदेशांत निदान लोकांचा धर्म तरी एकच ख्रिस्ती आहे; पंथ मात्र निरनिराळे आहेत. पण तेथे देखील धर्मशिक्षणाची सोय

शाळेंत करितां येत नाहीं. तिकडे सार्वजनिक शाळा स्थापन करण्याची वेळ आली, तेव्हां हीच मोठी पंचाईत येऊन पडली, व मोठा वादविवाद सुरू झाला; व अखेरीस सरकारी शाळाखातें स्थापन करण्यास फार अडचणी सोसाव्या लागल्या. आमच्या इकडे लोकांच्या अज्ञानामुळें तसले कांहीं तंट्यांचे प्रकार न होतां सार्वजनिक शाळा स्थापन झाल्या. तेव्हां आतां त्यांतून धर्मशिक्षण मिळत नाहीं, याविषयीं विशेष वाईट वाटूं न देतां त्यांच्यापासून उपयोग करून घेतला पाहिजे. आमच्या व्यावहारिक शाळांत धर्मशिक्षण देतांच यावयाचें नाहीं. कोणी तशा प्रकारचें शिक्षण देण्याचा यत्न केल्यास तो उगाच लोकांत असंतोष उत्पन्न होण्यास मात्र कारण होईल. सर्व धर्मांच्या जातींच्या व पंथांच्या लोकांस मान्य अशीं जीं नीतितत्वें, त्यांचें शिक्षण मात्र शाळांतून चांगल्या रीतीनें देतां येईल; तर मागें सांगितल्याप्रमाणें त्याची तजवीज करावी. कित्येक लोकांचें असें म्हणणें आहे, कीं सर्व लोकांना मान्य अशीं धर्मतत्वें एकत्र करून त्यांचें शिक्षण शाळांतून द्यावें. याच दृष्टीनें कित्येक शाळांतून भगवद्गीता वाचून अर्थ सांगणें, इत्यादि प्रकार करितात. परंतु आमचे मतें हें करणें निरर्थक आहे. ज्या थोड्या शाळांत अशी चाल आहे, तेथें हिंदुधर्मीचींच मुलें बहुतेक असतात, म्हणून गीता वाचण्याबद्दल कोणी तक्रार करीत नाहीं. नाहींतर मिशनरी लोकांच्या शाळांत बायबल वाचलेलें जसें इतर धर्मांच्या विद्यार्थ्यांस खपत नाहीं, तसाच प्रकार गीतेचा होईल. शिवाय गीता वाचून त्याचा अर्थ मुलांना कळावा कसा, व त्यापासून मुलांना वास्तविक धर्मशिक्षण तें काय मिळणार ? तेव्हां असले निरर्थक प्रकार करीत बसण्यापेक्षां धर्मशिक्षणाकडे आमच्या सार्वजनिक शाळांनीं लक्षच देऊं नये हा योग्य मार्ग आहे. सर्व धर्मांच्या लोकांस मान्य होतील अशीं धर्मतत्वें तरी कशीं निवडून काढावीं? अशा प्रकारचीं धर्मतत्वें निवडून काढून एक सार्वजनिक धर्म बनविण्याचा यत्न पूर्वीं अकबर बादशाहासारख्याकडून सिद्धीस गेला नाहीं, व अलीकडे ब्रह्मसमाज व प्रार्थनासमाज यांना देखील ही गोष्ट

मोठ्या माणसांचे संबंधानेंही अर्जून साधत नाहीं; तर ती लहान मुलांचे संबंधानें शाळाखात्याच्या अधिकाऱ्यांस साधेल अशी कल्पना करणें हें वेडेपणाचें आहे. सर्व धर्मांच्या, पंथांच्या व जातींच्या लोकांस मान्य होतील अशीं नीतितत्त्वें पुष्कळ निवडून काढतां येतील, पण अशा प्रकारचीं धर्मतत्त्वें कधीं ही कोणास निवडून काढतां यावयाचीं नाहींत. आमच्या इकडे सार्वजनिक शाळांतून निरनिराळ्या धर्मांचे लोक निमुटपणें व स्नेहभावानें येऊन बसतात व शिकतात, आणि परस्परांशीं मित्रत्वानें वागतात, व शिक्षक विधर्मी असला तरी तें कांहीं मनांत आणीत नाहींत. एवढीच गोष्ट पुष्कळ आहे. या गोष्टीपासूनच मोठें हित होणार आहे, हें लक्षांत ठेवून, शाळेंत मिळणारें शिक्षण म्हणजे व्यावहारिक शिक्षण हें धर्मशिक्षणाहून अगदीं भिन्न आहे, अशी जी लोकांची समजूत झाली आहे, तीच कायम राहूं द्यावी हें बरें.

आतां याच्यावर असा प्रश्न उत्पन्न होतो, कीं ' तर मग धर्मशिक्षण आमचे मुलांस मिळावें कसें?' तर याचें उत्तर एवढेंच आहे, कीं धर्मशिक्षण हें एक घरचे वरीं पालकांनीं दिलें पाहिजे; किंवा त्यासाठीं नियमित कुटुंबांनीं खासगी तजवीजी केल्या पाहिजेत. धर्मशिक्षण सार्वजनिक शाळेंत मिळावयाचें नाहीं व तेथें तें देतां ही यावयाचें नाहीं. सार्वजनिक शाळांतून धर्मशिक्षण मिळत नाहीं अशी ओरड करणें व्यर्थ आहे.

घरचीं माणसें आपल्या मुलांना धर्मशिक्षण देतात कीं नाहींत, व तें त्यांनीं कसें द्यावें, याविषयींचा विचार आमच्या विषयमर्यादेच्या बाहेरचा आहे, तेव्हां तत्संबंधानें आम्हांस विशेष कांहीं लिहावयाचें नाहीं. तथापि येथें येवढें सांगावयास चिंता नाहीं, कीं घरीं धर्मशिक्षण मुलांस देण्याचे संबंधानें बहुतेक अनास्थाच आहे. मुलांस सुनीतीचें वळण लावण्याचे संबंधानेंही बहुतेक तोच प्रकार आहे. सार्वजनिक शाळांतून मुलें सुमारें पांच किंवा सहा तास असतात, त्यावेळीं बहुतेक अभ्यासच चाललेला असतो. अभ्यासामध्यें सुनीतीच्या चार गोष्टी सांगण्याचे प्रसंग जे येतील, तेवढेच शिक्षकास साधून घ्यावयाचे असतात. यासंबंधानें मुद्दाम असें

शिक्षकास कांहींच करितां येत नाहीं. इकडे घरीं आईबापांचे नजरेखालीं मुलें बहुतेक वेळ असतात. आईबापांना त्यांचा स्वभाव, त्यांचें वर्तन, त्याच्या मनाची स्थिती, वगैरे सर्व गोष्टी ठाऊक असतात. यामुळें मुलांस सुनीतीचें वळण लावण्याची संधी घरचे माणसांस जेवढी असते, त्याच्या शतांश सुद्धां शाळेंतल्या शिक्षकास नसते. असें असून आम्हीं घरच्या वडील माणसांनीं कांहीं न करावें व शाळांच्या नांवानें ओरड करावी. ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट नव्हे काय? याचा अर्थ केवळ असा दिसतो, कीं आपण आपलें स्वतःचें कर्तव्य करीत नाहीं आणि तें न झाल्यामुळें येणाऱ्या दोषाचें ओझें शाळांवर ढकलीत आहों! आमच्या शाळांतून कोणाऱ्या धर्माच्या विरुद्ध शिक्षण मिळतें, अथवा नीतीच्या संबंधानें मुलांस कांहीं सांगण्याचे प्रसंग आले तर ते शिक्षक लोक टाळतात असें मुळींच होत नाहीं, ही गोष्ट सर्वांस कबूल करावी लागेल. त्यापेक्षां जास्त कांहीं सार्वजनिक शाळांतून सध्याचे स्थितींत करितां यावयाचें नाहीं, असें आम्हीं मागें सांगितलेंच आहे. तेव्हां आमच्या सार्वजनिक शाळांचे माथीं या गोष्टीचा दोष कसा येतो हें आम्हांस समजत नाहीं. आमच्या कुटुंबांतील घरचीं माणसें मुलांस कधीं स्नान, संध्या, नमस्कार, ह्या गोष्टी नियमानें व यथायोग्य रीतीनें करावयास लावितात काय, त्यांस जवळ घेऊन बसून कधीं कथा-पुराणांतल्या नीतिपर गोष्टी सांगतात काय, अथवा परमेश्वराची आठवण करून देऊन त्याचें दिवसांत एकादवेळ तरी स्मरण करावयास लावितात काय? ही धर्मशिक्षणाची गोष्ट झाली. आतां नीतिशिक्षणाचे संबंधानें पाहिलें तर आपला मुलगा सकाळपासून संध्याकाळपर्यंत करतो काय, जातो येतो कुठकुठे, वागतो कसा, याला संगत कोणाची आहे, इत्यादि गोष्टींकडे कितीजण जरूर तितकें तरी लक्ष ठेवितात? हे जे आम्ही प्रश्न विचारीत आहों, यांचा प्रत्येकानें आपल्याशीं नीट विचार करून पहावा. आमचें असें म्हणणें नाहीं, कीं या गोष्टींच्या संबंधानें सर्वच पालक निष्काळजी असतात. कित्येक लोकांच्या घरीं चांगली शिस्त असते, व मुलांस आपल्या सम-

जुतीप्रमाणें धर्माचे व सुनीतीचें वळण लावण्याचा प्रयत्न त्यांचेकडून होत असतो. परंतु साधारणतः एकंदर प्रकार काय आहे याचा विचार प्रत्येकानें करावा. आमच्या मतें या दोन्ही गोष्टींच्या संबंधानें आमच्या समाजाची स्थिती फार असमाधानकारक झालेली आहे. इकडे आमच्या पुढारी मंडळीचें लक्ष गेलें पाहिजे. या संबंधाचा दोष आमच्या शाळांकडे व शिक्षणपद्धतीकडे मुळींच नाहीं. नीतिशिक्षणाच्या संबंधानें शाळांतून ज्या गोष्टी होणें शक्य आहे, त्या होत आहेत. जास्त कांहीं करावयास नको आहे असें आमचें म्हणणें नाहीं. किंवा जास्त कांहीं करण्याची तजवीज होऊं नये, असें ही आमचे म्हणणें नाहीं. आम्हांस एवढेंच मुख्यतः सांगावयाचें आहे, कीं सध्या जी कित्येक लोक ओरड करीत आहेत, ती आपल्यावरील जबाबदारी शाळांवर ढकलण्याकरितांच केवळ करीत आहेत. तेव्हां या दोन्हीं गोष्टींची जबाबदारी शिक्षकांपेक्षां आपल्यावरच जास्त आहे असें पालकांनीं लक्षांत ठेविलें असतां धर्मशिक्षण व नीतिशिक्षण यांची व्यवस्था नीट लागेल. आम्हांस कित्येक पालक असे आढळले आहेत, कीं प्रथमतः त्यांनीं आपला मुलगा काय करितो इकडे पुष्कळ दिवस मुळींच लक्ष देऊं नये; आणि मग वाईट परिणामास गोष्ट येऊन पोंचल्यावर शाळेस व शिक्षकांस दोष द्यावा, जशी काय शाळेनें मुलांच्या संबंधाच्या एकंदर गोष्टींची जबाबदारी आपल्या शिरावर घेतलेली आहे! प्रत्येकानें ही गोष्ट ध्यानांत आणिली पाहिजे कीं सांप्रत मुलांना वाईट वळण लागण्याचीं कारणें घरींच जास्त होत असतात, यासाठीं त्यांचा बंदोबस्त घरच्या घरींच झाला पाहिजे.

यावरून धर्मशिक्षण व नीतिशिक्षण यांसंबंधानें सांप्रत जो वाद चालू आहे, यासंबंधानें आपल्या शाळांच्या तर्फे आम्हांस पुढील गोष्टी लोकांपुढें आणावयाच्या आहेतः—

(१) धर्माचे बाबतींत सार्वजनिक शाळांनीं तटस्थ राहिलें पाहिजे; यासाठीं तत्संबंधानें शाळेंत कांहीं करितां येणार नाहीं.

(२) धर्मशिक्षणाचे विषयीं शिक्षकाचें फार तर एवढेंच कर्तव्य आहे, कीं त्यानें कोणाच्याही धर्मसमजुतींच्या संबंधानें अवाक्षर काढूं नये;

व मुलांचे पालक मुलांना आपल्या धर्मसमजुतीप्रमाणें कांहीं करावयास सांगतात, तत्संबंधानें अनादर दाखवूं नये.

( ३ ). मुलांस वाचनाच्या व इतिहासादिकांच्या पुस्तकांतील गोष्टीच्या द्वारें नीतिबोध करीत असावें. सत्य, सदाचार, थोराशीं नम्रता, स्वाभिमान, वगैरे गूण मुलांचे मनांत जागृत करून देण्याचे प्रसंग घालवूं नयेत; आणि मुलामध्यें कांहीं वाईट प्रकार दिसल्यास त्याबद्दल मुलाचे पालकास जेव्हांचे तेव्हां कळवीत असावें.

( ४. ) शाळेंतल्या अभ्यासाखेरीज शिक्षकानें मुलांचे खेळ, फिरणें वगैरे यांकडे फुरसतीनुसार लक्ष पोंचवीत असावें; त्यावेळीं मुलांना सुनीतीचें वळण लावण्याचे प्रसंग हवे तितके येतात; त्या सर्वांचा उपयोग करून घेण्यास शिक्षकास फुरसत मात्र नसते. तेव्हां जोंपर्यंत आमच्या शाळा या फक्त नियमित वेळ शिकविण्याच्या शाळा आहेत. तोंपर्यंत शिक्षकांस यापेक्षां जास्त कांहीं करितां येणार नाहीं.

(५). मुलांस सुधर्माचें वळण व सुनीतीचें वळण पुष्कळ अंशीं लावण्याचें मुख्य ठिकाण घर आणि कुटुंब, व तें लावणारा खरा शिक्षक मुलांचा बाप किंवा पालक हा होय. तेव्हां या संबंधानें शाळेस दोष लावण्याचें टाकून मुलांचें पालकांनीं इकडे आपणच थोडेसें जास्त लक्ष पुरवावें.

---

# पत्रव्यवहार.

## सिद्धान्तकौमुदींतल्या शंकांची उत्तरें.

त्रि० वि० शालापत्रक पुस्तक १२ अंक पांचवा यांत राहाळकर नांवाच्या एका मुंबईकर गृहस्थानें सिद्धांतकौमुदींतील कांहीं शंका प्रसिद्ध केल्या आहे, त्यांचें यथाशक्ती निरसन करीत आहें.

**शंका १ ली.**— "अणुदित्सवर्णस्यचाप्रत्ययः" यासूत्राचें व्याख्यान करितांना "तेन विश्वपाभिः इत्यत्र होढः इतिढत्वं न भवति" असें

म्हटलें आहे. पण प्रकृतस्थळीं " होढः " ८।२।३१ या सूत्राचें कार्य न होत नाहीं. कारण " हस्य ढः स्याज्झलि पदान्तेच । " तेव्हां या व्याख्यानाचें प्रयोजन काय ?

उत्तरः—" नाज्झलौ इतिनिषेधो यद्यपि अक्षरसमाम्नायिकानामेव तथापि हकारस्याकारो न सर्णस्तत्र आकारस्य प्राश्लिष्टत्वात् । तेन विश्वपाभिः इत्यत्र होढः इति ढत्वं न भवति ।" जरी 'नाज्झलौ' हा निषेध अक्षरसमाम्नायंतील वर्णांसच लागू आहे, तरी त्यांत प्रश्लेषानें 'आ' हा वर्ण जास्त घेतला असल्यामुळें 'आ' आणि 'ह' हे परस्पर सवर्ण नाहींत. आतां जर 'आचा' प्रश्लेष नकेला तर 'आ' आणि 'ह' यांच्या सावर्ण्याचा निषेध होणार नाहीं, व तेणेकरून 'हच्या' पुढें भिस् प्रत्यय आला असतां " होढः ८।२।३१ " या सूत्रानें 'ह' च्या स्थानीं 'ढ' होतो, तसा 'आ' च्या स्थानींहीं 'ढ' झाला असता, पण 'आ' चा प्रश्लेप केल्यामुळें 'आ' आणि 'ह' याचें सावर्ण्य नष्ट होऊन " विश्वपाभिः इत्यत्र होढः इति ढत्वं न भवति ' हें सिद्ध झालें. ईकार आणि शकार यांच्या सावर्ण्याचा निषेध नाहींच. 'आ' आणि 'ह' यांच्या सावर्ण्याचाच निषेध दाखविण्याचा सूत्रकाराचा आशय आहे. " आदेशप्रत्यययोः ८ । ३ । ५९ " या सूत्रावरून इण किंवा ककार यांपुढें आदेश किंवा प्रत्ययसंबंधी सकार आला तर त्याच्या स्थलीं षकाराची प्राप्ती होते, व ती होणें योग्यच; परंतु 'आ' आणि 'ह' हे सवर्ण म्हटल्यास 'आ' पुढेंही उक्त प्रसंगीं षकाराची प्राप्ती व्हावी. परंतु " कालसमवेलासु " या सूत्रांतील आकारापुढें 'सु' प्रत्ययांतर्गत सकार आला असूनहि सकारस्थानीं षकार झाला नाहीं असें त्या सूत्रावरून स्पष्ट दिसतें. यावरून 'ह' आणि 'आ' हे परस्पर सवर्ण नाहींत हें सिद्ध झालें. कौमुदीकारांनीं सूत्रकाराचा आशय मनांत आणून आचा प्रश्लेष करून " तेन विश्वपाभिः इत्यत्र होढः इति ढत्वं न भवति" असें म्हटलें आहे.

शंका २ री.—" भूवादयोधातवः " याची व्याख्या 'क्रियावाचिनः

भ्वादयः धातुसंज्ञाः स्युः ' तेव्हां प्रकृत सूत्रांतील 'भूवा' यांचें सार्थक्य कसें ? " भ्वादयोधातवः " असें सूत्र कां नाहीं ?

**उत्तरः**--क्रियावाचक असे जे 'भू' आदीकरून शब्द त्यांस धातू म्हणतात. धातुपाठाच्या प्रारंभींच ' भू, सत्तायाम् ' असा धातू दिला आहे. त्यावरून ' भ्वाद्यो धातवः ' असें सूत्र असणें योग्य होय. पण तसें सूत्र केल्यानें एका विशिष्ट गणाचा मात्र बोध होईल. तेव्हां " वा-गतिगंधनयोः " हा दुसरा एक धातू घालून ' भू ' धातूचें क्रियावाचकत्व स्पष्ट केलें आहे.

**शंका ३ री.**—' इकोऽचिविभक्तौ ७ । १ । ७३ ' हें सूत्र ' इकोविभक्तौ ' असें असलें तरी त्यापासून उक्त सूत्राचें कार्य होतें. कारण नुसतें ' विभक्तौ ' म्हटलें तरी सुद्धां पुढें ' सु ' या प्रत्ययानें नुमागम प्राप्ती होऊन वारिन् + सु ( स् ) अशी स्थिती प्राप्त झाल्यावर " स्वमोर्लुक् " यावरून ' सु ' लोप होऊन 'वारिन्' पुढें 'न' लोपः प्रातिपदिकान्तस्य ' यावरून नचा लोप होऊन ' वारि ' असें रूप सिद्ध होतें; व इतर रूपेंही या प्रमाणेंच सिद्ध होतात. तेव्हां अज्ग्रहणाचें प्रयोजन काय?

**उत्तरः**--८।२।८ या निषेधसूत्रावरून पुढें सबुद्धि सु असतां न लोपाचा निषेध आहे; म्हणून ही अडचण टाळण्याकरिता अज्ग्रहण केलें असावें असें सकृद्दर्शनीं मनांत येतें. पण लुकानें सलोप होऊन ' नलुमताङ्गस्य ' हा निषेध येतो व त्यामुळें ' सु ' लोप होऊन त्याचें प्रत्ययत्वही नष्ट होतें. यावरून ' नलुमताङ्गस्य ' हा वैकल्पिक निषेध आहे, असा सूत्रकाराचा आशय दिसतो. जेव्हां त्या निषेधाला बाध येतो. तेव्हां ' नङि संबुध्योः ' याची प्राप्ती होऊन नकार राहून जाईल. तेव्हां त्याच्या निवृत्तीकरितां सूत्रामध्यें ' अचि ' हें पद घातलें आहे.

याप्रमाणें रा. राहाळकर यांच्या आशंकांचें यथामती निरसन केलें आहे. कौमुदीशीं परिचय असलेली मंडळी सध्यांच्या मराठी शिक्षकांत फारच थोडी आहे. तथापि त्यां पैकीं पुष्कळांचा संस्कृत भाषेशीं थोडाबहुत

परिचय आहे. तेव्हां सिद्धांतकौमुदीसारख्या फार महत्वाच्या विषयाकडे त्यांचें लक्ष लागेल अशी मी आशा करितों. कळावें ता० ३।६।०१.

सदाशिव धोंडो तांबे.
अ० मा० रत्नागिरी.

.'. याच विषयावर रा० त्रिंबक गणेश बोडस, गोविंद पांडुरंग पावशे, व गजानन गोपाळ जोशी यांचीं पत्रें आलीं आहेत. वरील पत्र सर्वांत अधीक खुलासेवार असल्यामुळें तें छापलें आहे.

शा० प० कर्ते.

---

# सूक्ततरंग.

—:-०-:—

( मागील अंकावरून पुढें चालू. )

६१ पुत्रें पिता कदापिन पीडावा सोडुनि क्षमा भीड.
६२ पाहे जडरूपाचि जड तें सर्व ब्रह्मरूप संन्यासी
६३ राजानें राजाशीं भांडावें, तदिसस वर्जावें.
६४ तेजस्वी सुत जनका दे जेविं हरिस न तेविं तोख पत्नी.
६५ न करिल समयीं सुज्ञें सूचविले धर्म धर्मपर कोण ?
६६ जेणें भूत हित नव्हे न रुचे तें पळहि आयु धन्यास.
६७ रजतापुढें कसें जी मिरवावें तेज आपुलें कथिलें ?
६८ बुडतो सर्व बुडवितो लोभी, क्रोधी तसाचि नर कामी.
६९ खल सावधान न मरे तरि मारावें असावधानातें.
७० मांजर वांचेल कसें करिल व्याघ्रासमीप गुरु गुरु तें ?
७१ बा विहगांहीं सोडुनि दत्र-परिवृत-पादपा नभा जावें.
७२ सोडुनि साहंकारा अन्यजनीं कोण पातक रहातें ?

## कृष्ण-विजय.

१ बोध सकल सम मास ब्रह्मा करु, नायकेल खळ सामास,
जरि साश्रु दरिद्र वदे, तें कुधनिक मानसास न परि द्रव दे.

२ स्ववचनचि सदा कुलजें रक्षावें न तनुजादि विपदाकुल जें.

३ न नया मान सभा जे दे, जातां तेथ साधुमानस भाजे.

४ पोष्य जनासि न पोषी जीवंतहि तो असोनियां शव दोषी.

५ सकळार्थदकृति काय-प्रदपितरांची फिटेल उपकृती काय ?

६ कोण पराभव नाहीं पावत हें नीतिवुद्धिच्या भवनाहीं—
आणावें स्वमनींच; व्याकुळ होताति पावतां श्रम नीच.

७ प्राप्तप्रौढत्व सिंहीतनय न पळही क्रोष्टृयूथीं वसेल.

८ जेथें लाभ विनाश जंतुस घडे, जाणें न तें हो टळे.

९ हंसांतें हांसलेही, तरि गुण यश तें नाशिलें काय काकीं ?

१० विधु चकोरिं कर-व्रज नावरी.

११ सकृप प्रभुच्या ठायीं, साधी काय न दीनता ?

१२ जो सिंधूसि तरे सुखें भुजबळें तो कां न डोहा तरे ?

१३ प्रांतप्राप्तिसुदूर उंदिर कसा भूभृद्धवा खाणिल ?

१४ दुष्टाचारीं क्षमा ती निजविमलयशीं स्पष्ट दावील हानी.

१५ कूपाला दोष कैंचा बुवडूनि नयनें पाडितां अंधकारा.

१६ सिंह क्रोधें न गर्जे, जवळिहि करिती यद्यपि ध्वान फेरू.

१७ स्वामी ज्याचा न ठाके मृगरिपुसमरीं यूथ वांचेल काय ?

१८ ईशक्षोभ करी तृणासि अशनी हें बोलती जाणते.

१९ ग्लानि नसे शांतिसुरभिच्या थानीं.

२० जो मेघ कूप, पल्वल, वापी, कासार, शत महासरिता—
भरि, तारका तयाचा कां राहे चातकास्य दास रिता ?

२१ मीन समुद्र त्यागुनि होईल कां पल्वलोदकीं दीन ?

२२ कर्मी वसो, नसो परमर्मी लोचन असो दया धर्मी.
नर्मीहि मृषोक्ति नयो, शर्मी नांदो, शिरां क्षमावर्मी.

२३ हंसें मुक्ता नेली मग केला कळकळाट काकांनीं.

---

१ सकल अर्थ देणारी ज्यांची कृती आहे असा देह देणाऱ्या पितरांची. २ समीप देश प्राप्ति ज्याला कठीण. ३ पर्वतांचा स्वामी अशा मेरू पर्वतास. ४ शब्द ५ कोल्हा. ६ थडेंत.

२४ उतरे एकहि न कसीं कनकाशीं कोटि भांडतां धुतरे.
२५ ग्रीष्मीं दावाग्नीतें जिंकुनि जय जोडितील काय तणें;
मुकुटाच्या पदवीतें कैशीं हो पावतील पायतणें?
२६ कल्पशतींही पोटीं आम्रत्वाचेंचि ज्ञान कोथांच्या.
२७ फळ नसतांही मैत्री न विटे, दुष्टात्मजीं जसी माता;
बा! तामसपतिभजनीं साध्वीनाटोपिती मना हाता.
२८ कुक्षींत क्षेत्राच्या अर्पावें बीज जों असे वोला.
२९ सद्योजातें[1] मराळ स्तुत्य न वृद्धांहि वायसां गावें.
३० परळ श्रीमंतातें मागे हतविधि. शिजे कसा हरळ[2].
३१ मूर्ख स्वाहित कारि, परि कळवळतो साधुजारि उदासीन.
३२ तो हीन क्षय पावे स्वकरें स्वगुणेंचि जो गुरुद्रोही.
३३ दंतीनेंचि स्वबळें काढावा पंकमग्न जो दंती,
साधूनेंचि हरावी बोधें जे साधुच्या मनें खंती.
३३ विश्वगुरूच्या ठायीं अपराध करूनि कोण वांचेल?
३४ स्वार्थ न पाहे कोणी, दूषी दुसऱ्यासि, हेंचि नीचपण.
३५ पल्वल, नदी, सरोवर मिरविति तें भाग्य मेघपाथाचें[3].

## मंत्रभागवत.

१ यत्नसर्वदास्याहि अरिस जारि सहसा शूर सुज्ञजन वधिते,
तरि कैसे मेळविते महित चिरस्थायि सुयश अनवधि ते.
२ अप्रिय वदतां देती दुःखाचे सज्जनास वचक थवे.
३ मिळतां सुब्राह्मण गुरु, इतरातें गुरु म्हणोनि कां गावें.
४ दुर्वृत्तांची दंडावांचुनि पावे कधींहि न द्रव धी.
५ भगवत्पराङ्मुखाला कुदशेचा लाभ रोकडा होतो.
६ सद्धर्मघातकर जो त्याची साधूंस काय हो! माया?
७ कैसाही प्रबळ असो, लंघूं न शकेचि कांळ नेमी तें. (पुढें चालू)

---

१ नुकता जन्मलेला. २ दगड. ३ मेघोदकांचें. ४ तोंडांत गवत धरलेल्यासही. ५ अमर्याद.

# शिक्षक-मित्र.

## उपोद्घात.

—:*:—

शिक्षकाचें काम करीत असतां पुष्कळ दिवसांच्या अनुभवावरून असें दिसून आलें कीं ट्रेनिंग कालेजांतील संपूर्ण शिक्षण मिळवून बरेच दिवस शिक्षकाचें काम करीत असलेल्या शिक्षकांखेरीज इतर शिक्षकांची शिकविण्याची पद्धती जशी असावी तशी असत नाहीं. ट्रेनिंग कालेजांत शिक्षणपद्धतीचीं मूलतत्वें व प्रत्यक्ष शिकवावें कसें या गोष्टी जरी नीटपणें शिकवितात, तरी आपली शिकविण्याची पद्धती त्या मूलतत्वांच्या धोरणानें ठेवून काम करणारे शिक्षक थोडे. कोणच्या तरी कारणानें तीं मूलतत्वें एकीकडे गुंडाळून ठेऊन गतानुगतिकन्यायानें जुन्या शिक्षणपद्धतीचेंच अनुकरण पुष्कळ शिक्षक करीत असतात. पुष्कळ ट्रेन्ड शिक्षकांची अशी स्थिती असते व अन्ट्रेन्ड शिक्षकांस तर कालेजांतील शिक्षणपद्धतीचा गंध देखील नसल्यामुळें आपली शिकविण्याची पद्धती अमुक एक प्रकारची असणें आवश्यक आहे अशा प्रकारचा विचारच त्यांच्या मनांत येत नाहीं. शिक्षक वर्गापैकीं बऱ्याच जणांची अशी स्थिती असल्यामुळें हल्लीं शाळांतून शिकविण्याची जी पद्धती आहे, तींत अनेक व्यंगें शिरून त्यांचा अनिष्ट परिणाम नवीन शिकणारांवर होत असतो. अशावेळीं ही सदोष पद्धती बदलण्याचा कांहीं यत्न करून पहावा, असें मनांत आल्यावरून शिक्षकांस हें अल्प सहाय करण्याचें योजिलें आहे. सरकारी नियमाप्रमाणें इयत्तांवार ठरविलेले निरनिराळे विषय मुलांस कोणत्या प्रकारें शिकवावे या विषयवार स्वतंत्र विचार या लेखांत मुद्दयर्त्वेकरून केला असून, कोणत्याही एकाच विषयाशीं स्वतंत्र-

पणें संबंध नसून सामान्यतः कोणताही विषय शिकवितांना ज्या गोष्टी ध्यानांत ठेवणें अवश्य आहे, त्यांचा विचार सर्व विषयांचा प्रत्येकशः विचार झाल्यानंतर, **सामान्यविचार** ह्या सदराखालीं केला आहे. तसेंच शारीर शिक्षण व नीतिशिक्षण यांच्या संबंधानें चोहोंकडे उदासीनता दिसून येत असल्यामुळें त्या शिक्षणाच्या अभावीं समाजाचें जें नुकसान होत आहे, तिकडे शिक्षक वर्गाचें लक्ष जाऊन बुद्धिविकासक शिक्षण विशेष रीतीनें फलद्रुप व्हावें म्हणून तत्संबंधाचा आणखी एक भाग शेवटीं जोडिला आहे. या लेखांत निरनिराळे विषय शिकविण्याची जी पद्धती लिहिली आहे, ती जरी अनुभवसिद्ध आहे, तरी ते ते विषय शिकविण्याची ती एकच पद्धती असून तींत अगदींच दोष नसतील, अथवा तीपेक्षां दुसरी चांगली पद्धती कोणाला सुचणार नाहीं असें मुळींच नाहीं. हा लेख लिहिण्याचा उद्देश इतकाच आहे कीं शिकविण्याच्या संबंधाचे माझ्यासारख्या कित्येक दिवस शिकविण्याचा थोडा बहुत अनुभव घेतलेल्या मनुष्याचे विचार माझ्या व्यवसायबंधूंस कळावे; व आपली शिकविण्याची पद्धती दोषयुक्त आहे किंवा चांगली आहे, ह्या विचाराकडे शिक्षकांचें लक्ष लागून ती दोषयुक्त आहे असें दिसून आल्यास त्यांनीं तींतील दोष काढून टाकण्याचा यत्न करावा. तसेंच तो यत्न करीत असतां त्यांस या लेखापासून प्रत्यक्ष कांहीं तरी साह्य व्हावें, असाही आणखी हा लेख लिहिण्याचा हेतू आहे. हे हेतू परमेश्वर पूर्ण करो !

# शिक्षक-मित्र.

## १. अक्षर-ओळख.

मुलगा अगदीं प्रथम शाळेंत आल्यावर त्याला मूळाक्षरें व अंक शिकवावयाचे हें पहिलें काम होय. आरंभीं शाळेंत येणारीं मुलें बहुतेक पांच वर्षांच्या वयाच्या सुमाराचीं असतात. ह्या वेळच्या त्यांच्या स्थितीचा विचार करून त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था त्या धोरणानेंच लाविली पाहिजे. ह्या वयांत कित्येक गोष्टी मुलांच्या आंगी सामान्यत्वेकरून असलेल्या आढळतात. ह्या वेळीं तीं बहुधा भितरीं असतात. आजपर्यंत त्यांचा परिचय त्यांचे आईबाप अथवा अशींच दुसरीं घरचीं मनुष्यें यांशिवाय परक्याशीं मुळींच नसल्यामुळें पहिल्यानेंच पंतोजीपुढें उभीं राहिल्यावर अर्थातच त्यांना भीती वाटते. तशांतून शिक्षक म्हणजे मुलांस मारण्याचा धंदा करणारा एक मनुष्य, व शाळा म्हणजे मार देण्याचें ठिकाण, अशी मुलांचीं समजूत पूर्वीपासूनच झालेली असते. तेव्हां अशा स्थितींत अगदीं प्रथमदर्शनीं शाळेंत गेल्याबरोबर कोंवळ्या बुद्धीच्या मुलांच्या मनांत भीतीनें प्रवेश केला तर त्यांत नवल कोणतें? याकरितां ह्या वयांत मुलांस शिकविणें तें अत्यंत मायाळूपणानें व त्यांच्याशीं हंसत खेळत बोलून शिकविलें पाहिजे. त्यांना असें वाटलें पाहिजे कीं, पंतोजी हा आपल्या घरच्या माणसांसारखाच आपल्यावर ममता करणारा आहे. दुसरी गोष्ट अशीं कीं, ह्या वयांत मुलांच्या आंगीं नव्या नव्या गोष्टी समजून घेण्याची आवड स्वाभाविकपणेंच वास करीत असते. ती त्यांची इच्छा जर तशीच जागृत ठेविली तर मुलांस शिकविण्याच्या संबंधानें शिक्षकाला अल्पायासानें बहुत गोष्टी साधितां येतील. तिसरें असें कीं, ह्या वयांत मुलाची धारणाशक्ती फारच संकुचित असते. याकरितां कोणताही नवा विषय त्यांस समजावून देणें तो त्याच्या धारणाशक्तीचा विचार करून समजून दिला पाहिजे. लांब लांब व्याख्यानें देऊन त्यांस शिकवीत गेल्यानें त्यांना त्या विषयाचें तर ज्ञान होणार नाहींच; परंतु तो विषय न

समजल्यामुळें पुढें अधिक शिकण्याची जी त्याची उमेद, तीही खचत जाऊन अखेरीस मुलें शिकण्याचा कंटाळा करूं लागतील. याकरितां मुलांची समजून घेण्याची शक्ती किती आहे व त्या बेतानें आपलें सांगणें सोपें आहे किंवा नाहीं, ह्याचा विचार शिक्षकानें क्षणोक्षणीं करीत असावें.

लहान मुलांना प्रथम अक्षरें शिकवितेवेळीं एक एका मुलाला एक धडा सुमारें चार पांच अक्षरांचा घालून देऊन तो त्याजकडून घटविण्याची पद्धत हल्लीं सर्वत्र प्रचारांत आहे. बहुधा नवा आलेला मुलगा पहिलाच धडा महिना दोन महिनेपर्यंत देखील घोटीत असतो. ही पद्धती कोणत्याही प्रकारें चांगली नाहीं. शिक्षकानें एकेका मुलाला निरनिराळा धडा कधींही देत बसूं नये. सुमारें १० मुलें एकदम फळ्याजवळ घेऊन त्यांस शिकवूं लागावें. अगदीं आरंभीं एकच 'अ' हें अक्षर फळ्यावर काढून दाखवावें. नंतर एका मुलाला फळ्याशीं बोलावून त्याला फळ्यावरचें अक्षर पाहून तसेंच दुसरें अक्षर फळ्यावर काढावयास सांगावें. प्रथमच तें त्याला काढितां येणार नाहीं. यासाठीं आपण स्वतः त्याचा हात धरून त्याजकडून तें अक्षर फळ्यावर पांच सहा वेळा काढवावें, व मग त्यालाच काढावयास सांगावें. ह्या वेळीं तो पहिल्यापेक्षां कांहीं जास्ती ध्यानांत ठेवून वेडेंवांकडें कसें तरी अक्षर काढूं लागेल. मग तो जेथें चुकत असेल तेथें कसें काढावयाचें तें सांगून त्याजकडून तें नीट काढून घ्यावें. नंतर दुसऱ्या मुलाला फळ्याजवळ बोलावून त्यालाही त्याचप्रमाणें तें अक्षर काढावयास शिकवावें. याप्रमाणें सगळीं मुलें झाल्यानंतर पुनः एकदां पहिल्यापासून शेवटपर्यंत सर्व मुलांना तें अक्षर फळ्यावर काढावयास सांगून नंतर त्यांस जागेवर बसूं द्यावें. मग दुसरीं दहा मुलें घेऊन त्यांस तेंच अक्षर काढावयास शिकवावें. असें करितांना शिक्षकास पहिल्या मुलाला शिकवितांना जे श्रम पडतील त्यापेक्षां दुसऱ्या, तिसऱ्या, मुलांस शिकविण्यास कमी कमी श्रम पडतील हें उघड आहे.

वरील क्रमानें शिकवीत राहिल्यास बहुधा एक दोन दिवसांत त्यांना 'अ' ची ओळख चांगली होऊन त्यांस तें अक्षर काढितां येऊं

लागेल. इतकें झाल्यावर उजळणीचें अथवा पहिलें पुस्तक आपल्या हातांत घेऊन एकएका मुलाला आपल्या जवळ बोलावून त्यांत ' अ ' हें अक्षर कोठें कोठें आलें आहे तें त्याला शोधून काढावयास सांगावें. प्रत्येकापासून निदान दहादां तरी तें अक्षर शोधून काढवावें, मग पुनः तें फळ्यावर हातानें काढवून घ्यावें. असें करितां करितां ' अ ' हें अक्षर चांगलें घटेल. तें चांगलें घटल्यावर ' आ ' हें अक्षर शिकवावें. याला फार प्रयास पडणार नाहींत हें उघडच आहे. ' अ ' आणि ' आ ' ह्यांतील फरक समजावून दिल्याबरोबर त्यास ' आ ' काढितां येऊं लागेल. ' अ ' व ' आ ' हीं दोन्हीं अक्षरें एकदम शिकाविलीं तरीही चिंता नाहीं. मग हीं दोन्ही अक्षरें फळ्यावर काढून घ्यावीं व पुस्तकांतून वाचवावीं.

' अ ' आणि ' आ ' हीं अक्षरें चांगलीं काढितां व ओळखतां येऊं लागल्यावर ' इ ' आणि ' ई ' हीं अक्षरें शिकवावी, व पहिलीं ज्या रीतीनें शिकविलीं त्याचरीतीनें हीं ही शिकवावी.

अ आ; इ ई; उ ऊ; इत्यादी अक्षरांच्या जोड्या हे निरनिराळे धडे आहेत, असें समजावें, व प्रत्येक धडा सांगून झाल्यावर मागील झालेले सर्व धडे व तो नवा धडा मिळून सर्व अक्षरें फेरबदल करून फळ्यावर काढून घ्यावीं व पुस्तकांतून वाचावावीं. अक्षरांच्या गंजिफांचा उपयोग ह्या वेळीं करीत गेलें तर अक्षरओळख लवकर होण्याला चांगली मदत होईल. याकरितां जसजशीं अक्षरें तयार होत जातील तसतशा झालेल्या अक्षरांच्या गंजिफा घेऊन त्यांवरूनही मुलांकडून अक्षरें ओळखवावी.

एक विशेष गोष्ट ह्या ठिकाणीं ध्यानांत ठेवावी; ती ही कीं, जें जें नवें अक्षर मुलांस काढावयास शिकवावयाचें तें त्यास चांगलें ठळक व वळणशुद्ध काढितां आलें पाहिजे. पहिल्यापासून वळणशुद्ध अक्षर काढावयास शिकविल्यानें पुढें प्रयास पडणार नाहींत.

स्वर शिकवून झाल्यानंतर व्यंजनें शिकविणें तीं पांच पांच अक्षरांचा एक धडा याप्रमाणें शिकवावीं.

अशा रीतीनें बालबोध मुळाक्षरें शिकवून झालीं म्हणजे त्याच पद्-

तीनें मोडी अक्षरें शिकवावीं. मात्र प्रत्येक धडा शिकवितांना बालबोध अक्षरेंही फळ्यावर काढून घ्यावीं, म्हणजे त्यांच्या मदतीनें नवीं म्हणजे मोडी अक्षरें लवकर ध्यानांत राहूं लागतील. मोडी अक्षरें शिकवितांना तीं मुलांकडून ओळखून घेण्याची जरूर पडेल तेव्हां मोडी पहिल्या पुस्तकाचा उपयोग करावा.

इतका विषय शिकवून झाल्यावर बाळवर्गाचा हा विषय पुरा होतो. अक्षरओळखीच्या संबंधाचा पुढील भाग पहिल्या इयत्तेंत शिकवावयाचा असतो.

स्वर व व्यंजनें यांची ओळख चांगली झाल्याशिवाय बाराखड्या शिकविण्याला आरंभ करूं नये; व प्रथम बालबोध बाराखड्या शिकवून त्या चांगल्या येऊं लागल्यावर मोडी बाराखड्या शिकवाव्या.

बाराखड्या शिकवावयाच्या त्या दरएक मुलाला प्रत्येक बाराखडीच्या बारा अक्षरांचा एक धडा देऊन त्या त्यांजकडून घोंटाळून तयार करून घ्यावयाच्या, अशी जी जुनी शिकविण्याची पद्धती अजून कोठे चालू आहे ती बंद करावी. मुळ व्यंजनाला एक काना दिल्यानें 'आ' स्वरयुक्त अक्षर बनतें, अशा रीतीनें का, खा, गा, इत्यादि 'ज्ञा' पर्यंतचा धडा फारच लवकर म्हणजे एका दिवसांत तयार होईल. हा धडा फळ्याच्या साह्यानेंच शिकवावा. पाटीवर धडा देण्याचें कारण नाहीं.

का, खा, इत्यादि 'ज्ञा' पर्यंतचा धडा झाल्यावर कि, खि, इत्यादि 'ज्ञि' पर्यंतचा दुसरा धडा पहिल्या धड्याप्रमाणेंच शिकवावा. प्रत्येक धडा झाल्यावर त्या धड्याचीं अक्षरें, व पुढें जसजसे जास्ती धडे होत जातील तसतशीं मागील धड्यांसुद्धां सर्व अक्षरें पुस्तकांतून मुलाकडून शोधून काढून वाचवावीं. साधारणतः पुस्तकाच्या एका पृष्ठांत येणारीं अक्षरें प्रत्येक मुलाकडून वाचविलीं म्हणजे पुरे होतील.

ह्या रीतीनें 'कौ' पर्यंतचे धडे शिकवावे. व नंतर अनुस्वार आणि विसर्ग ह्यांची शक्य तेवढी समजूत करून द्यावी. अनुस्वाराचे उच्चार निरनिराळे होतात ते सर्व त्यांच्या ध्यानांत आणून द्यावें. तसेंच विसर्गाच्यापुढें अक्षर

असतां त्याचा उच्चार कसा होतो, व पुढें अक्षर नसतां त्याचा उच्चार कसा होतो, तोही नीट ध्यानांत आणून द्यावा. ह्या वेळीं हे उच्चार केवळ वाचनाच्या दृष्टीनें ध्यानांत आणून द्यावयाचे आहेत, व्याकरणाच्या किंवा शुद्धाशुद्धतेच्या दृष्टीनें नव्हत, हें मात्र लक्षांत ठेवावें.

इतकीं सगळीं अक्षरें शिकवून झाल्यानतर बाराखडी म्हणजे काय व ती कोणती हें त्यांस सांगावें. व क्रमानें सर्व बाराखड्या त्यांजकडून काढून घ्याव्या.

मोडी बाराखड्यांपैकीं आ, इ, व उ, हे स्वर जोडून झालेलीं अक्षरें बालबोध बाराखड्यांप्रमाणें केवळ खुणांच्या योगानें बनलेलीं नाहींत. याकरितां चार चार अक्षरांची एक बाराखडी म्हणजे एक घडा, असें समजून ह्या बाराखड्या शिकविल्या पाहिजेत. मोडीमध्यें ऱ्हस्व-दीर्घांचा भेद मानीत नाहींत म्हणून चार चार अक्षरांचा घडा शिकविला म्हणजे तेवढ्यानें काम होतें. हा चार अक्षरांचा घडा शिकवावयाचा तो देखील फळयाच्या साह्यानें सर्व मुलांस एकदम शिकवावा व सुरेख अक्षरें काढविण्याकडे फार लक्ष द्यावें.

मोडी बाराखडया शिकविण्याचें काम चालू असतांना जोडाक्षरें शिकविण्यासही आरंभ करावा. प्रथम अगदीं सोपीं जोडाक्षरें सांगावीं. पहिलें व्यंजन अर्धे काढावयाचें म्हणजे कसें, व पुढचें दुसरें त्याला कसें जोडावयाचें, हें नीट समजून द्यावें. कांहीं जोडाक्षरें 'एका पुढें दुसरें' अशीं जोडितात, व 'कांहीं एकाखालीं दुसरें' अशीं जोडून काढितात. हा भेद त्यांच्या लक्षांत आणून देऊन अशा दोन्ही तऱ्हांनीं लिहावयाचीं जोडाक्षरें शिक्षकानें आपल्याजवळ एका वहींत टिपून ठेवावीं, व तीं मुलांकडून वारंवार काढून घ्यावीं.

यानंतर कठीण जोडाक्षरें शिकवावीं, परंतु तीं सगळींच पहिल्या इयत्तेंतील मुलांस शिकवूं नयेत. पहिलें पुस्तक घेऊन शिक्षकानें एकदां स्वतः वाचावें, व त्यांत आलेलीं तेवढीं कठीण जोडाक्षरें वहींत टिपून ठेवावीं; आणि प्रथमतः तितकींच मुलांस काढावयास व ओळखावयास शिक-

वार्वी म्हणजे झालें. बाकीचीं विशेष कठीण जोडाक्षरें मुलगा पुढील इयत्तेंत गेल्यावर शिकेल. जोडाक्षरें कशीं काढावयाचीं तें फळ्यावर शिकवीत असतां पुस्तकावरून तीं ओळखावयास शिकवावें. "

मोडी बाराखड्या पुऱ्या झाल्यावर मोडी जोडाक्षरें शिकवावीं. व तीं बाळबोध जोडाक्षरासारख्याच पद्धतीनें शिकवावीं

इतकें शिकवून झाल्यावर पहिल्या इयत्तेप्रमाणें अक्षरओळख पुरी झाली. मग एक एक सोपा शब्द फळ्यावर एकदम लिहवावा, व पुस्तकावरून वाचवावा.

## २. उजळणी.

—:•*•:—

अ, आ इत्यादी मूळाक्षरें शिकविण्याचा वेळ, व १, २ इत्यादि अंक शिकविण्याचा वेळ एकच नसावा. म्हणजे अक्षरें सकाळीं शिकविलीं तर अंक संध्याकाळीं शिकवावे. अक्षरें शिकवितांना फक्त फळ्याचाच उपयोग करण्याची जरूर लागते. परंतु अंक शिकवितांना फळा व गोट्या अगर खडे, ह्या दोहोंचीही जरूर आहे. 'अ' ह्या अक्षराप्रमाणें प्रथम १ हा अंक काढाव-यास शिकवावा. व तो झाल्यावर २ हा अंक शिकवावा. १ आणि २ हे अंक शिकवितांना फळ्यावर टिंबें काढून, व गोट्यांचें साह्य घेऊन त्यांतील भेद त्यांच्या ध्यानांत आणून द्यावा. दोन गोट्या म्हणजे किती, व एक गोटी म्हणजे किती, व दोन गोट्या पुष्कळ किंवा एक गोटी पुष्कळ, आणि दोन गोट्या एकीपेक्षां किती जास्ती, इत्यादि गोष्टी त्यांस चांगल्या समजल्या पाहिजेत. अशा रीतीनें दोन अंकांची समजूत झाल्यावर तिसरा ३ हा अंक सांगावा. प्रत्येक अंक तयार झाल्यावर पुढचा एक, याप्रमाणें १० पर्यंत अंक शिकवावे. प्रत्येक अंक शिकविल्यावर त्यासुद्धां मागें झालेल्या सर्व अंकांतील परस्पर कमी जास्तीपणा त्यांच्या ध्यानांत आणून द्यावा. कोणताही अंक उच्चारिल्यावर तितक्या गोट्या एकंदर गोट्यांच्या राशींतून निवडून काढितां आल्या पाहिजेत. झालेल्या अंकांचा परस्पर कमीजास्तीपणा व प्रत्येक अंक म्हणजे किती वस्तू, ह्या गोष्टींची चांगली ओळख झाल्याशिवाय पुढचा अंक बिलकूल शिकवूं नये. थोडा जास्ती वेळ लागला तरी हरकत नाहीं.

## कै० केरो लक्ष्मण छत्रेकृत
# अंकगणित
## भाग १।२।३

कै० केरो लक्ष्मण छत्रे यांचे चि० रावसाहेब निळकंठ विनायक छत्रे यांनीं पूर्वीच्या अंकगणितांत हल्लीं पुष्कळ सुधारणा करून नवीन आवृत्ती छापविल्या आहेत व ठिकठिकाणीं जास्त उदाहरणें व व्याख्याही दिल्या आहेत. पूर्वी दुसरा भाग होता. त्याचे हल्लीं दोन भाग केले आहेत. म्हणजे एकंदर ३ भाग झाले आहेत. भाग पहिला किंमत ०=॥. भाग दुसरा कि० ।≈ व तिसरा भाग लवकरच छापून प्रसिद्ध होईल. शाळा-मास्तरांस कमिशन मुबलक मिळेल.

म्यानेजर चि० शा० प्रे० पुणें.

---

# सार्थ प्राकृत प्रकाश.

सदरहू पुस्तक आमचे मित्र रा. रा. **शंकर रामचंद्र हतवळणे** ह्यांनीं प्रसिद्ध प्राकृत वैयाकरण वररूची ह्यांच्या ग्रंथाच्या आधारें केलें आहे प्राकृत भाषा ही संस्कृत व हिंदुस्थानांतील अर्वाचीन भाषा ह्यांमधील एक सांखळी आहे. संस्कृतांतून प्राकृतांत व प्राकृतांतून अर्वाचीन भाषांत रूपें कशीं आलीं, हें समजल्याशिवाय शब्दांची खरी व्युत्पत्ती समजली असें ह्मणतां येत नाहीं. पुष्कळ ऐतिहासिक प्रश्नांशीं प्राकृताचा निकट संबंध आहे. तेव्हां ह्या भाषेचा चांगला परिचय असल्याशिवाय त्यांचा उलगडा करण्यास अडचण असते. शब्दांचीं रूपें कशीं बनलीं व त्यांस आचार्यांच्या सूत्राचा मूळ आधार कोणता, हें प्रस्तुतच्या पुस्तकावरून दिसून येईल. प्राकृत प्रकाशाचे एकंदर १२ परिच्छेद असून पहिल्या ९ परिच्छेदांत महाराष्ट्री जी मुख्य प्राकृत भाषा तिजविषयीं व बाकींच्या तीन परिच्छेदांत पैशाची, मागधी व शौरसेनी ह्यांच्या संबंधाच्या मुख्य मुख्य गोष्टी सांगितल्या आहेत. हें पुस्तक मराठी शिक्षक, ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थी व हायस्कुलांतील वरच्या वर्गांतून मराठी शिकणारे विद्यार्थी ह्यांस विशेषें-करून उपयोगीं पडण्यासारखें आहे. पुस्तकाची किंमत ०८ आहे. टपाल हशील शिवाय. एकदम बरींच पुस्तकें घेणारास कमिशन मुबलक मिळेल. पुस्तकें आमच्या छापखान्यांत विकत मिळतील.

म्यानेजर चित्रशाळा छापखाना.

## चित्रलेखन मूलतत्व ( पुस्तक पहिलें )

सतत पंचवीस वर्षे ड्रॉइंग शिकविण्याच्या अनुभवावरून ज्या ज्या गोष्टी विद्यार्थ्यांस प्रथम शिकविणें अवश्य वाटलें त्या सर्व शास्त्रीय नियमानें पद्धतशीर बसवून हें पुस्तक तयार केलें आहे. पुस्तकाची किंमत प्रथम सहा आणे ठेविली होती. परंतु कलेचें शिक्षण व अभिरुची आपले देशांत जितकी असावी तितकी नसल्या कारणानें व त्याचा प्रसार फार व्हावा व विद्यार्थ्यांस घेण्यास सुलभ जावें करितां याची किंमत अगदींच कमी म्हणजे फक्त अडीच आणे केली आहे. अशा तऱ्हेचें हें मराठींत पहिलेंच पुस्तक आहे. तेव्हां सर्वांनीं याचा उपयोग करून घ्यावा अशी आमची शिफारस आहे.

हें पुस्तक मे. विद्याखात्याचे डायरेक्टर सा. बा. यांनीं मराठी शाळांकरितां व मराठी शाळांचे लायब्रऱ्यांकरितां आपलें मेमो नंबर ६०९४ तारीख १. १२. १९०० मध्यें पास केलें आहे. कळावें.

म्यानेजर चित्रशाळा छापखाना,
पुणें सिटी.

---

# रंगीत सचित्र अक्षरलिपी.

लहान मुलांस सुलभ रीतीनें ओळखीचीं चित्रें पाहून अक्षर ओळख व्हावी या उद्देशानें हें पुस्तक तयार केलें आहे. बिनयत्तेत मुलांस नुस्तीं बालबोध व मोडी अक्षरें वाचावयाचीं असतात म्हणून ज्यांच्या नांवाच्या आरंभीं धुळाक्षरांतलें एकेक अक्षर आहे अशा वस्तूंचीं चित्रें देऊन त्यांचे खालीं त्यांचीं नांवें बालबोध व मोडी लिपींत दिलीं आहेत.

पुस्तकाची किंमत ८२ आणे ट० ख० ७॥.

म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें.


---

प्रकाशक—शंकर नरहर जोशी.

Registered No B 179

पुस्तक १२. ॥ श्री ॥ अंक ७.

# मराठी शालापत्रक.

# MARATHI SCHOOL PAPER

## जुलई १९०१.

### विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| प्रतिमासिक स्फूट विचार.... .... .... .... | १६१ |
| कै० रामभाऊ गुंजीकर—प्लेग पासून संरक्षण—निवारक उपाय—प्लेग टोंचून घेणें—प्लेग टोंचण्याचें तत्व—या युक्तीच्या संबंधाचे गैरसमज — | |
| मराठी भाषेची लेखनपद्धती [समाप्त] .... .... .... | १७० |
| नीतिशिक्षणसंबंधाचे आणखी कांहीं विचार .... .... .... | १७६ |
| शिक्षकमित्र.... .... .... .... .... | ९–१६ |


' चित्रशाळा ' प्रेस, पुणें.

आगाऊ वार्षिक वर्गणी, टपालखर्चासह रु० १८३.

फुटकळ अंकास८३.

# चुकीची दुरुस्ती

गेल्या मार्च महिन्याच्या शालापत्रकांत "थर्ड ग्रेड सर्टिफिकेट—परीक्षे" संबंधानें दिलेल्या जाहिरांतींत दुसऱ्या प्रकाराखालीं जे अभ्यास दिले आहेत, त्यांतील ९ व्या कलमांत आरंभीं 'जगाच्या इतिहासाची सामान्य माहिती' असें पडलें आहे, तेथें "जगाच्या भूगोलाची सामान्य माहिती" असें समजावें.

# जाहिरखबर.

## पुणें ट्रेनिंग कॉलेजाची

### सर्टिफिकेट—परीक्षा.

चालू सालीं पुणें ट्रेनिंग कॉलेजाची सर्टिफिकेट—परीक्षा मंगळवार तारीख १ आक्टोबर सन १९०१ इ० रोजीं सकाळीं मद्रास १० वाजतां सुरू होईल. कळावें, तारीख १३ माहे जुलई सन १९०१ इ०.

*K. G. KELKAR.*
प्रिन्सिपल, पुणें ट्रेनिंग कॉलेज.

# जाहिरात.

## पुणें ट्रेनिंग कॉलेजाची

### ड्राइंगची परीक्षा.

जाहीर करण्यांत येतें कीं—मुंबई येथील स्कूल ऑफ् आर्ट कडून ट्रेनिंग कॉलेजा करितां होणारी "फर्स्ट ग्रेड ड्राइंग" ची परीक्षा सोमवार तारीख ७ माहे आक्टोबर सन १९०१ इ० रोजीं सकाळीं ९ वाजतां पुणें येथें हायस्कुलांत सुरू होईल. तरी ज्या मास्तरांस सदर परीक्षेस बसावयाचें असेल त्यांनीं आपले अर्ज तारीख १ सप्टेंबर सन १९०१ इ० रोजीं किंवा त्यापूर्वीं आम्हांकडे पोंचतील असे पाठवावे. अर्ज पुढें आल्यास घेतले जाणार नाहींत. अर्ज आमच्या नावचे असावे. व त्यांत अर्जदार सदर परीक्षेस पूर्वीं बसला असल्यास तो कोणत्या सालच्या कोणत्या महिन्यांत बसला व कोणत्या विषयांत पास झाला हें त्यानें स्पष्ट लिहावें. त्यानें आपलें वय व जात हीं अर्जांत नमूद करावीं. कळावें.

पुणें, ट्रेनिंग कॉलेज.
ता. १३ जुलई सन १९०१ इ.

*K. G. KELKAR.*
प्रिन्सिपल, पुणें ट्रेनिंग कॉलेज.

# शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यांसी । हें अवघें सद्गुरूपाशीं।
सद्गुरू पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणे करून सोडावें । सकळां जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १५ जूलई १९०१. अंक ७.

## प्रतिमासिक स्फुट विचार.

कै० रामभाऊ गुंजीकर.

आम्हास लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं मराठी भाषेचे एक प्रख्यात अभिमानी गृहस्थ रामभाऊ गुंजीकर हे गेल्या महिन्याच्या अखेरीस मुंबई येथें मृत्यू पावले. हे आपल्यांतील इंग्रजीच्या पहिल्या अमदानींत तयार झालेल्या सुशिक्षित मंडळींपैकीं होते. मुंबईत प्रथमारंभीं मराठी भाषेच्या उन्नतीसाठीं 'विविधज्ञानविस्तार,' 'ज्ञानप्रसारक' इत्यादि ज्या चळवळी झाल्या, त्यांच्या चालकांमध्यें गुंजीकर हे प्रमुख होते. हे पुष्कळ दिवस मुंबईतच शिक्षक होते. पुढें त्यांस बेळगांव येथें असि० डे. इन्स्पेक्टर नेमलें होतें. आलीकडे सुमारें चार वर्षे ते पेनशनर होते. त्यांचा मराठी भाषेंत लेख लिहिण्याचा क्रम नेहमीं चालू असे. त्यांचे पुष्कळ लेख 'विविधज्ञानविस्तार' या मासिक पुस्तकांत आलेले आहेत. मराठी भाषा व व्याकरण या विषयांवर त्यांनीं अनेक लेख लिहिले आहेत. त्यांनीं 'सुलभ-व्याकरण' म्हणून एक लहानसें पुस्तक व शुद्धलिहिण्यावर एक पुस्तक लिहिलें आहे. कोणी व्याख्यान देत असतां तें जसेंच्या तसेंच

लिहून घेण्याची जी लघवी-लिपी म्हणून इंग्रजींत आहे, तिच्या पद्धतीवर मराठींत लिपी बसविण्याची पहिली खटपट यांचीच होती. यांची मराठी भाषा लिहिण्याची पद्धत साधी, सोपी व मनोहर अशी असे. 'मोचनगड' या नांवाची एक मराठी कादंबरी यांनीं लिहिली आहे; ही कादंबरी म्हणजे मराठी भाषेत असले ग्रंथ कसे लिहावे याचा उत्तम कित्ताच आहे. संस्कृत सिद्धांतकौमुदीचें मराठी भाषांतर त्यांनीं चालविलें होतें. पण लोकाश्रयाच्या अभावामुळें तें पूर्ण झालें नाहीं. जेवढा भाग प्रसिद्ध झाला आहे तेवढा फार बालबोध व मार्मिक रीतीनें लिहिलेला आहे. ' रामचंद्रिका ' म्हणून एक संस्कृत रूपावलीचें पुस्तक यांनीं लिहिलें आहे, तें विद्यार्थ्यांस फार उपयोगी आहे. यांनीं भगवद्गीतेची मराठींत फार सरळ व सुलभ टीका लिहिली आहे, तीही फार लोकप्रिय आहे. अलीकडे 'काव्यसंग्रह' या मासिक पुस्तकाचें कर्तृत्व यांजकडेसच होतें. दुःख वाटण्यासारखा योगायोग असा आहे, कीं या उपयुक्त मासिक पुस्तकाचें कर्तृत्व कोणाकडेसच नीटपणें टिकत नाहीं. कै० मोडक, ओक, गुंजीकर अशी या पुस्तकाच्या कर्त्यांची शोकजनक मृत्युमालिकाच झाली, हें मनांत आलें म्हणजे फार दिलगिरी वाटते. दुर्दैवेंकरून मराठीला राजद्वारीं किंवा विद्यामंदिरांत विशेषसा ठाव मिळत नाहीं. त्यांत अशा प्रकारचे लहानसान यत्न जे भाषेची अभिवृद्धी इच्छिणारांनीं यथामती चालविले आहेत, त्यांना देखील असलीं विघ्नें यावीं, ही मोठी खेदजनक व निराशा उत्पन्न करणारी गोष्ट होय. गुंजीकर हे स्वभावानें सत्वशील, शांत व मनमिळाऊ असून त्यांची शिकविण्याची तऱ्हा ही चांगली असे. त्यांचा वेळ लेखन, वाचन, अध्यापन व अभ्यास यामध्यें जात असे, व सार्वजनिक खटपटींत ते कधीं पुढें येत नसत. मरणसमयीं त्यांचें वय सुमारें साठ वर्षांचें होतें. गुंजीकर यांच्या मृत्यूमुळें मराठी वाङ्मयाचें फार मोठें नुकसान झालें आहे व तें भरून येणें फार कठीण आहे. परमेश्वर यांच्या आत्म्यास चिरकाळ शांती देवो, व त्यांच्या उद्योगाचें अनुकरण करण्याची पुष्कळांस बुद्धी होवो!

---

प्लेगपासून संरक्षण.

प्लेग या रोगानें बहुतेक पुष्कळ दिवस आमच्या इकडे ठाणें धरल्यासारखें दिसत आहे. तीन चार वर्षांत त्याचा जोर कमी होतो किंवा तो मुळींच जातो, ही समजूत आतां बहुतेक नाहींशी होऊन, कदाचित् हा एक कायमचाच रोग आमच्या इकडे होऊन बसतो कीं काय, असें लोकांस वाटूं लागलें आहे. एवढें खरें, कीं लोकांना अनुभव येऊन व संवय होऊन, व सरकारी कामगारांच्या समजुतींतही पुष्कळ फरक पडून, या रोगाची पूर्वी जेवढी भीती वाटत असे तेवढी आतां वाटत नाहीं व लोक सावधपणानें व शांततेनें आपल्या बचावाची व्यवस्था करितात. असल्या रोगापासून जें नुकसान होत असतें, तें पुष्कळदां माणसें घाबरून जातात व गोंधळ आणि घोटाळा करितात यामुळेंच होत असतें. तेव्हां घाबरणें कमी झाल्यावर या भयंकर शत्रूपासून आपलें संरक्षण करण्याचें सामर्थ्य लोकांच्या आंगीं अधिकाधिक येत जाईल हें उघड आहे. या साथीनें विशेषतः उद्योगधंदे आणि व्यापार व लोकशिक्षण या गोष्टींचें फार मोठें नुकसान होत आहे. ठिकठिकाणीं पुनः पुनः सांथ आल्यानें शाळा कशा अगदींच बसतात, याबद्दलची शाळाखात्याच्या वार्षिक रिपोर्टांवरून खात्री होईल. या रोगावर कोणास उपाय म्हणून अजून कांहीं सुचत नाहींच. विषमज्वर, नवज्वर इत्यादि जे कित्येक भयंकर ताप आहेत, त्यांच्यांतच पण श्रेष्ठस्थानीं याची गणना केली पाहिजे. तथापि याच्यावर औषधोपचार करण्याचा कित्येकांचा यत्न चालला आहे, व त्यांमध्यें थोडें यश ही कित्येकांस आलें आहे. मुंबईचे प्रख्यात विद्वान गुजराथी गृहस्थ प्रो० त्रिभुवनदास कल्याणदास गज्जर, ज्यांनीं आपल्या कुशलतेनें महाराणीच्या पुतळ्यावर फासलेलें डांबर काढून टाकून युरोपियन रसायनशास्त्रज्ञांसही चकीत करून सोडिलें, त्यांनीं या रोगावर एक औषध काढिलें आहे; व त्याचा गेल्या दोन वर्षांत मुंबईस व पुण्यास निरनिराळ्या डाक्तरांनीं जो अनुभव घेतला, त्यावरून तें फार उपयोगी आहे, असें दिसून आलें आहे. नुकतेच प्रो० गज्जर यांनीं जे आंकडे प्रसिद्ध केले आहेत, त्यांवरून त्यांच्या औषधानें शेंकडा ४० । ६० पर्यंत रोगी बरे होतात असें दिसून आलें आहे. हा परिणाम खरोखरीच

प्रशंसनीय आहे. प्रो० गज्जर यांचें औषध गरीब लोकांस फुकट मिळावें म्हणून रा० नारायणदास या नांवाच्या एका श्रीमान व्यापाऱ्यांनीं तें आपल्या खर्चानें देण्याचें चालविलें आहे. तेव्हां आतां या रोगाचा जिकडे म्हणून प्रसार आहे, तिकडे लोकांनीं या औषधाचा अवश्य उपयोग करून पहावा.

---

प्लेगनें पिच्छाडल्यानंतर औषध घेऊन पाहाणें हा संरक्षणाचा एक उपाय आहे. परंतु यापासून त्या भयंकर रोगाच्या प्रसारास प्रतिबंध होण्याचा फारसा संभव नसतो. लोकांस तर मुख्यतः हें पाहिजे आहे, कीं याचा प्रसार उत्तरोत्तर कमी कशानें होईल. प्रो० गज्जर यांनींच या रोगाचीं प्रतिबंधक अशीं हवा साफ करण्याचीं व पोटांत घेण्याचींही औषधें तयार केलीं आहेत. त्यांचाही उपयोग लोकांनीं करून पाहावा. परंतु या रोगाला प्रतिबंधक असे मुख्य उपाय म्हटले तर स्थानत्याग व प्लेग टोंचून घेणें हे आहेत. स्थानत्याग म्हणजे जेथें प्लेग येईल तेथून दुसरीकडे निघून जाणें. गेल्या पांच वर्षांच्या अनुभवावरून असें दिसून आलें आहे, कीं हा रोग जरी सांथीचा आहे, तरी ज्या जागेंत त्याचें बीजारोपण झालेलें असेल त्या जागेंत राहिल्यानें मात्र तो उत्पन्न होतो. त्याचे खालोखाल रोग्याशीं अतिनिकट संबंध असल्यानें त्याचा प्रादुर्भाव होतो. परंतु अनुभव पाहिला तर पहिल्याच गोष्टीचा जास्त आहे. आणखी पुनः असा अनुभव आला आहे कीं प्रत्यक्ष तें स्थान म्हणजे घर किंवा जागा, हीं सोडलीं म्हणजे झालें. जेथें माणसें पटापट मरत असतात, तेथून शंभर कदमावरील जागेंत देखील रोगाचा प्रादुर्भाव झालेला नसल्यास कोणास यत्किंचितही इजा होत नाहीं. तेव्हां स्थानत्याग हा उपाय ठरल्यासारखा आहे; व तो करण्यासाठीं गांवापासून फार लांब कोणीकडे जावें लागतें असेंही नाहीं. उघडी स्वच्छ हवा व ऊन हीं या रोगाचीं मारक औषधेंच आहेत. यामुळें स्थानत्याग करणें या उपायासाठीं मोठी पंचाईत करावी लागते असें नाहीं. जेथें रोग आला असेल, तेथून जवळच पण मोकळ्या जागेंत गेलें कीं कार्य होतें, असा मुंबई, पुणें, बेळगांव, धारवाड, धुळें येथचा व दुसऱ्या पुष्कळ

निवारक उपाय.

ठिकाणचा अनुभव आहे. कित्येक ठिकाणीं तर असा अनुभव आला आहे, कीं उंदीर मरूं लागल्यामुळें रोग येणार असें अनुमान होतांच लोकांनीं घरें सोडून उवड्यावर जाऊन राहावें व कोणास कांहीं इजा होऊं नये. तेव्हां अशा रीतीनें या रोगास कसें टाळावें हें लोकांस कळूं लागल्यामुळें यापुढें हा रोग एकाद्या ठिकाणीं उत्पन्न झाला, तरी त्यास यथास्थित खाद्य न मिळून त्याचा प्रसार होणार नाहीं, व त्याचें बीज उत्तरोत्तर नष्ट होत जाईल. तेव्हां लोकांनीं तावडतोब स्थानत्याग करणें व तसें त्यांस करितां येण्यासाठीं ठिकठिकाणीं पुढारी लोक, म्युनिसिपालिट्या व सरकार यांनीं लोकांना साह्य करणें, हा सर्वांत उत्तम उपाय होय.

---

प्लेग टोंचून घेणें.

स्थानत्याग हा उपाय जरी उत्तम आहे, तरी तो सर्वांसच साध्य असतो असें नाहीं. कारण प्रथमतः मुबलक, सोयीवार, अशी मोकळी जागा मिळाली पाहिजे, व तेथें लोकांचें थंडी वाऱ्यापासून व चोरट्यांपासून रक्षण झालें पाहिजे. शिवाय जागा मिळाली तरी दुसऱ्या अनेक कारणांनीं लोकांना घरें सोडतां येत नाहींत; व घरें सोडूनही पुष्कळ वेळा दुषित जागा व माणसें यांच्याशीं व्यवहार ठेवणें भाग पडतें. यामुळें रोग होण्याचा व त्याचा प्रसार होण्याचा संभव असतो. विशेषतः शहरांतील लोकांची नेहमीं अशी स्थिती असते. तेव्हां याला उपाय काय करावा, असा प्रश्न उत्पन्न झाला आहे. याच्याचवर प्रो० हाफ्किन नांवाच्या एका डाक्तरानें उपाय काढला आहे, व त्या उपायाचा अनुभव पाहाण्याचें काम चालू आहे. हा उपाय प्लेग टोंचणें. प्लेग टोंचणें म्हणजे या रोगाचें बीज देवींच्या विषाप्रमाणें शरीरांत घालून तो रोग कृतीनें उत्पन्न करणें. आतां हा मूळचा रोग जर भयंकर आहे, तर कृतीनें उत्पन्न झालेला रोग ही भयंकर होईल; मग या टोंचून घेण्याचा उपयोग काय, असें कोणी म्हणेल. तर तसें होत नाहीं. देवी हा रोग जरी भयंकर आहे, तरी तो गाईच्या शरीरांतून आला म्हणजे त्याचा भयंकरपणा नष्ट होतो; आणि त्यामुळें तो मनुष्याच्या शरीरांत मुद्दाम उत्पन्न केला तरी त्यापासून इजा होत नाहीं. त्याच रीतीनें या रोगाचें विष घेऊन तें मोठ्या काळजीनें असें बनविलेलें असतें कीं त्याचा भयंकरपणा कमी व्हावा. मग तें मनुष्याच्या शरीरांत घालून

रोग उत्पन्न करावयाचा. म्हणजे मग त्या मनुष्याच्या शरीराच्या आंगीं या रोगाचा प्रतिकार करण्याची योग्यता येते. अशा प्रकारें हा स्थानत्यागाच्या पुढचा उपाय आहे. ज्यांना स्थानत्याग करितां येत नाहीं, किंवा स्थानत्याग करूनही दूषित जागांशीं व माणसांशीं संबंध ठेवावा लागतो, त्यांनीं हा या रोगापासून आपलें रक्षण करून घेण्याचा हा उपाय करून पहावयाचा आहे. हा रोग जसा नवा आहे त्याप्रमाणें हा प्रतिबंधक उपाय ही नवाच आहे. परंतु त्यापासून फायदा होण्याचा संभव आहे व तोटा तर कांहीं होत नाहीं, तर त्याचा उपयोग करून स्वसंरक्षणाची तजवीज करून ठेवणें अवश्य आहे. इंग्रजींत एक म्हण आहे, कीं "रोग आल्यावर तो बरा करीत बसणें, यापेक्षां त्याचे प्रतिबंधक असे उपाय प्रथमतः करणें बरें." त्या दृष्टीनें साधेल त्यानें स्थानत्याग व त्यानंतर प्लेग टोंचून घेणें हे उपाय करावें असें आतां ठरल्यासारखें दिसतें. स्थानत्याग हा उपाय आतां सर्वांस मान्य झाल्यासारखा दिसतो. व ज्यांना सवड असते ते तो करण्यांत चुकत नाहींत. पण दुसरा उपाय जो टोंचून घेणें, त्याच्या संबंधानें अजून पुष्कळांची खात्री नाहीं; यामुळें त्याचा उपयोग करून घेण्याकडे अजून पुष्कळांची प्रवृत्ती होत नाहीं. आमच्या वाचकांना म्हणजे शिक्षकांना या उपायाच्या संबंधानें विचार करण्याचा प्रसंग वारंवार येत असेल, कारण लहान गावांतून शाहाणे लोक काय ते शिक्षकच अशी समजूत असते, व ती यथार्थही असते. तेव्हां त्यांच्या विचारासाठीं आज ही थोडीशी चर्चा आम्ही येथें करीत आहों. त्यांनीं या टोंचून घेण्याच्या उपायाचें अवश्य मनन करावें.

---

प्लेग टोंचण्याचें तत्व.

आतां या टोंचून घेण्याच्या युक्तीचें बीज काय आहे हें सांगतों. या भयंकर रोगाच्या संबंधानें शास्त्रज्ञानीं असा सिद्धांत केला आहे, कीं या रोगाचे अतिशय सूक्ष्म असे जंतु असतात, व ते मनुष्याच्या रक्तांत प्रवेश करून, तेथें फार थोड्या वेळांत असंख्य वाढतात. त्यांचें मळमूत्र हें भयंकर विष आहे. तें रक्तांत भिनलें म्हणजे मनुष्य मरतें. दुसरी अशी गोष्ट अनुभवानें ठरल्यासारखी आहे, कीं हे जंतू वर्षांतून नियमित दिवस जागृत होऊन वाढतात; व त्याच्या वाढीचे दिवस भरले म्हणजे पुनः सुप्तावस्थेस पोंचून कांहीं दिवस तसेच असतात. यावरून प्रो०

हाफ्कीन यांनीं अशी कल्पना बांधली आहे, कीं या जंतूंचें विष काढून घेऊन त्यास सौम्य स्वरूप द्यावें, व तें मनुष्याच्या रक्तांत भिनवून त्यांच्या आंगांत रोग उत्पन्न करावा. अशा रीतीनें कृतीनें रोग ज्याच्या शरीरांत उत्पन्न होईल, त्याला पुढें कांहीं काळ पर्यंत–निदान रोगाच्या एका हंगमांत तरी–रोग होणार नाहीं, अथवा झालाच तर त्याचा जोर बेताचा असेल. हा मुद्दाम उत्पन्न केलेला रोग सौम्य असल्यामुळें त्यापासून इजा होत नाहीं. आतां ही गोष्ट कशी साध्य होतें? तर याचें तत्व असें आहे, कीं एकादें धान्य जसें वर्षांतले कांहीं दिवसच शेतांत वाढून पुढें पिकून तयार होऊन जातें, व नंतर त्या शेतांत ज्याप्रमाणें निदान वर्षभर तरी तेंच धान्य पिकूं शकत नाहीं, किंवा पिकलें तरी नीट पिकास येत नाहीं, त्याप्रमाणें हा रोग शरीररूपी जमीनीवर एकदां कृतीनें रुजविला म्हणजे त्याच्या हंगामाची जी मुदत आहे, तेवढ्या मुदतींत तो पुनः रुजणार नाहीं. क्वचित् रुजला तरी फारसा जोरदार असणार नाहीं. सारांश, प्लेग टोंचून घेणें म्हणजे रोगबीज आपल्या शरीरांत मुद्दाम घालून घेऊन त्याचें शेत सौम्य रीतीनें बनवावयाचें, व त्याची पुनः वाढ होण्यास शरीर कांहीं दिवसपर्यंत अयोग्य करून टाकावयाचें. अशा प्रकारची या टोंचून घेण्याच्या युक्तीची कल्पना आहे. ही योग्य आहे कीं नाहीं, हें अनुभवानें सिद्ध व्हावयाचें आहे. तो अनुभव घेण्यास सर्वांनीं तयार होऊन कल्पना काढणारास साह्य केलें पाहिजे. याचें कारण या अतिशय भयंकर रोगाचें निर्मूलन करण्याचा दुसरा मार्ग दिसत नाहीं. याला रामबाण असा औषधोपचार साध्य होत नाहीं, आणि हा रोग जाईल केव्हां, हें ही कळत नाहीं. याच्या योगानें व्यापारधंदे, उद्योग, विद्याप्रसार चाकरीनोकरी, वगैरे सर्व उपयुक्त गोष्टींना मोठा धक्का बसला आहे. तेव्हां अशा शत्रूबरोबर टक्कर देण्याची जी युक्ती निघाली आहे, तिला साह्य करून ती खरीच आहे असें सिद्ध होऊं देण्यास मदत करावी व लोक संरक्षणाची तजवीज निवेलें असें करावें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. या युक्तीचा अजून अनुभव यावयाचा आहे. पण तो अनुभव तरी आपण युक्ति काढणारास साह्य केल्याखेरीज कसा येईल? एकादी गोष्ट नवी असली म्हणजे लोकांचे तिच्या संबंधानें अनेक तर्क चालतात. परंतु येथें आपणास तर्क करीत

असण्यास वेळ नाहीं. कारण भयंकर शत्रू दारांत आपल्यावर हल्ला करण्यास टपून बसलेला आहे. त्यांचा प्रतिकार हर तऱ्हेनें केला पाहिजे. त्याच प्रमाणें लोकसमूहास एकाद्या गोष्टीची योग्यायोग्यता पहाण्याचें ज्ञान नसतें. चार पुढारी जसें चालतील तसें पाहून एकंदर जनसमाज चालणार. या साठीं हें अनुभवाचें जोखीम समजूतदार, सुशिक्षित, अशा पुढारी लोकांवरच मोठें आहे, हें त्यानीं लक्षांत बाळगिलें पाहिजे.

---

आम्हीं मागें सांगितलेंच आहे, कीं टोंचून घेणें हें अजून अनुभवाच्या मार्गांत आहे. म्हणून हा या रोगावर उत्तम उपाय आहे, म्हणून तो सर्वांनीं करावा, असें सरकारानें किंवा दुसऱ्या कोणीं कायमपणानें ठरविणें कांहीं योग्य होणार नाहीं. तथापि या युक्तीपासून अहित कांहीं नाहीं व हित होण्याचा फार संभव आहे असें जर असेल, तर ती युक्ती करून पाहाणें हें आपलें कर्तव्य आहे. या संबधानें पुष्कळ दिवसांपासून अनेक तऱ्हेचा वाद सुरू आहे. त्यामध्यें शिरण्याची आमची इच्छा नाहीं. त्यावादविवादांतील मुख्य मुद्याच्या गोष्टी मात्र येथें सांगतों; त्यांचा आमच्या वाचकांनीं नीट विचार करावा. त्या गोष्टी ह्या;—( १ ) मूळचा रोग मुद्दाम सौम्य करून हें टोंचण्याचें औषध तयार केलेलें असतें; व ( २ ) त्यांत जें विष काढून घेतलेलें असतें, तें मृत बीज असतें. यामुळें टोंचल्यानें हा रोग कदाचित एकादवेळ भयंकररीतीनें उत्पन्न होईल, हें म्हणणें व्यर्थ आहे. ( ३ ) या औषधांत या रोगाचेंच केवळ बीज जावें, इतर रोगाचे विष त्यांत बिलकुल उतरूंनये, अशा प्रकारची काळजी घेऊन लस बनवितात. यामुळें लस घेणारास ही लस शरीरांत घालून घेतल्यामुळें दुसरे रोग जडतील अशी कल्पना करण्याचें कारण नाहीं. ( ४ ) कित्येक म्हणतात, कीं ही लस शरीरांत गेल्यानें कांहीं रोगांना उत्तजन येत असेल; आणि असले रोग जर शरीरांत मुळचे असले, तर लस टोंचून घेतल्यानें नुकसान होईल. ही गोष्ट कदाचित खरी असेल. पण असें प्रत्येक औषधांचे संबंधानें म्हणतां येईल. समजा, कीं आपण पित्तावर औषध घेतलें, तर तें कदाचित् थंड किंवा स्निग्ध असल्यामुळें

या युक्तीच्या संबंधाचे गैरसमज.

पोटांत जडत्व येईल. म्हणून पित्तशमनासाठीं औषधच घ्यावयाचें नाहीं काय? तर असें कधींच कोणी म्हणणार नाहीं. पित्तशमनासाठीं औषध तर घ्यावयाचें; पण त्याच्यापासून दुसरें कांहीं बारिकसारिक नुकसान होईलसें वाटत असल्यास त्यासाठीं काळजी घ्यावयाची. तशा प्रकारची काळजी हें औषध तयार करितांना घेतली जात आहे, असें लस तयार करणारे डाक्तर सांगत आहेत, व त्यांवर विश्वास न ठेवण्यास योग्य कारण दिसत नाहीं. ह्या युक्तीचा हा जो प्रयत्न चालला आहे, तो लोकांना त्रास देण्यासाठीं कांहीं चाललेला नाहीं, तर लोकांना या भयंकर शत्रूच्या जबड्यांतून सोडविण्यासाठीं चाललेला आहे, असें सर्वांनीं लक्षांत ठेवावें. ( ९ ) आणखी एक मुद्दा असा पुढें आणितात, कीं याचा उपयोग जर थोड्या मुदतीपर्यंतच व्हावयाचा असतो, तर उगाच त्रास करून कां घ्यावा? हा मुद्दा निदान समजूतदार मनुष्य तरी पुढें आणीत नसेल असें आम्हांस वाटतें. टोंचून घेण्याचा उपयोग कदाचित् थोडे दिवसांपुरता असेल. पण त्यापासून होणारा त्रास अगदीं क्षुल्लक आहे; आणि त्यापासून या भयंकर रोगाचा प्रतिकार होण्याचा संभव आहे, म्हणून याचा उपयोग फार आहे, असें प्रत्येकास कबूल करावें लागेल. टोंचून घेण्यानें त्रास अगदीं थोडा होतो, व हें मुद्दाम आणलेलें दुखणें फार तर दहा पंधरा तास टिकतें. तेव्हां आपल्या आरोग्यासाठीं चार सहा महिन्यांत एखाददां जसें आपण शोधनवगैरे घेतों, त्यातलाच हा प्रकार आहे. ( १ ) हा रोग मनुष्य भिऊन गेला असतां होण्याचा संभव फार असतो व पुष्कळदां मनुष्य केवळ भीतीनें मरतो असें आढळलें आहे. तेव्हां 'आपण टोंचून घेतलें आहे, तेव्हा आपणास रोग होण्याची भीति नाहीं,' अशी समजूत झाल्यानें पुष्कळ फायदा होईल. आतां टोंचून घेण्याचे संबंधानें पुढील गोष्टी अवश्य लक्षांत ठेविल्या पाहिजेतः—(१) टोंचणें हें हुषार अनुभविक डाक्तराकडून काळजीपूर्वक झालें पाहिजे. ( २ ) लस बिघडलेली असूं नये; शस्त्रें नीट साफ करून घ्यावीं;—सारांश चालढकल अगदीं होऊं नये. एका डाक्तरानें दिवसांत अमुक माणसांस टोंचावयाचें व पुष्कळसें

काम केलें असें दाखवावयाचें; हा मुद्दा नसून, अमक्या माणसांस चांगले रीतीनें टोंचून त्यांना रोग होण्याची भीती नाहीशी करावयाची आहे, असें टोंचणारानें मनांत बाळगिलें पाहिजे. ( ३ ) टोंचून घेणारानें आपल्यास नेहमीं औषध देणारा जो डाक्तर किंवा वैद्य असेल, त्याच्या सल्ल्यानें टोंचून घ्यावें, म्हणजे प्रत्येकाच्या प्रकृतीच्या मानानें कसें जपलें पाहिजे, हें त्यास कळेल. ( ४ ) हा उपाय अजून नवीन आहे; त्याच्यावर लोकांचा विश्वास बसला नाहीं; लोक नवीन एकादी गोष्ट स्वीकारण्याचे संबंधानें मोठे संशयी असतात; यासाठीं टोंचून घेणें हें खुषीवर असावें. टोंचून घेणारास अमुक बक्षिस किंवा सवलती मिळतील, इतक्या रीतीचें आमिष देखील कोणास दाखवूं नये हें योग्य आहे. कारण तसें केलें तर अज्ञान लोकांच्या मनांतला बेभरंवसा जास्त वाढेल. लोकांतल्या सुशिक्षित पुढाऱ्यांनीं व सरकारानें प्रत्यक्ष अनुभवानें आणि सप्रमाण व्याख्यानें, लेख, इत्यादिकांनीं लोकांचीं मनें वळवावी. 'विश्वासानें विश्वास उत्पन्न होतो, ' हें तत्व या गोष्टींत ध्यानांत ठेविलें पाहिजे. समजूतदार लोकांस मात्र आमचे एवढेंच सांगणें आहे, कीं टोंचून घेण्यांत नुकसान मुळींच नसून, फायदा फार आहे, असें चांगल्या विद्वान डाक्तरांनीं अनुभवपूर्वक ठरविलें आहे. यासाठीं त्याचा उपयोग करून घेऊन आपल्या संरक्षणाची तजवीज करावी व अशिक्षित लोकांना आपल्या उदाहरणानें टोंचून घेण्यास उत्तेजन द्यावें.

---

## मराठी भाषेची लेखनपद्धती.

[ पुढें चालू व समाप्त ]

एथपर्यंत केलेल्या विवेचनामध्यें बहुतेक सर्व वादग्रस्त गोष्टींवर चर्चा झाली असें म्हणण्यास चिंता नाहीं. आतां पुष्कळ शब्दांच्या संबंधाचा विचार अजून राहिला आहे, हें जरी खरें आहे; तरी ते शब्द असे आहेत, कीं त्यांची व्यवस्था एकदां कोणत्या तरी प्रकारें करून टाकिली म्हणजे झालें.

या शब्दांत कोठें अनुस्वार, कोठें ऱ्हस्वदीर्घत्व, इत्यादिकांचे संबंधानें भिन्न मत आहे. पण त्यांत मुद्याची गोष्ट विशेष कांहीं नाहीं; व यांतील पुष्कळ शब्दांच्या संबंधानें प्रस्तुत पुस्तकांत सुचविलेला निकाल आह्मांस पसंत आहे. आम्हीं मागें एकदां सुचविलेंच आहे, कीं ज्या ठिकाणीं कोणची ही मुद्याची गोष्ट नाहीं, तेथें ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, जोडाक्षर, इत्यादिकांचे संबंधानें सोयीकरितां अथवा सुलभतेकरितां पूर्वपरंपरा व इतिहास यांना सोडून जरी एकादी गोष्ट ठरवावी असें वाटलें, तरी ती ठरविण्यास चिंता नाहीं. मात्र धरसोड व घोटाळा हीं टाकून देऊन कांहीं तरी एक ठरींव प्रकार कायम करावा म्हणजे झालें.

आतां दोन चार मुद्याच्या गोष्टींच्या संबंधाचे आमचे विचार नमूद करून, व पुढें या गोष्टींची व्यवस्था अखेर कशी लावावी, या विषयीं सुचवून या खेपेस या विषयाची रजा घेतों.

(१). मराठींत अन्त्याक्षराच्या ऱ्हस्वदीर्घत्वाच्या संबंधानें जसा विचार आहे, तसाच उपान्त्याच्या ऱ्हस्व दीर्घत्वाचे संबंधानें ही विचार करणें भाग पडतें. कित्येक ठिकाणीं उपान्त्यामध्यें केवळ ऱ्हस्वदीर्घत्वाचाच विचार नसून, ईच्या जागीं ऱ्हस्व इ, य किंवा अ, व उच्या जागीं ऱ्हस्व उ व किंवा अ, असे फेरफार होत असतात. परंतु या फेरफारांच्या संबंधानें नियम उत्तम रीतीनें ठसवितां येतात. एक मुख्यतः ठरलेली गोष्ट अशी आहे, कीं मराठी शब्दाचे शेवटीं अकार असला, म्हणजे उपान्त्य 'ई' किंवा 'ऊ' नेहमीं दीर्घ असावयाचा; व सामान्यरूप होऊन त्या अंतींच्या 'अ'ला कोणच्याही प्रकारें दीर्घत्व आलें असतां मात्र उपान्त्य कोणच्या तरी तऱ्हेनें ऱ्हस्व होतो. या विषयींचे नियम व्याकरणांत पूर्ण रीतीनें दिलेले आहेत. आतां कित्येक शुद्ध संस्कृत शब्दांचे संबंधानें काय करावें असा प्रश्न उत्पन्न होईल. उदाहरणार्थ, 'रीति' असा संस्कृतातून आलेला शब्द आहे. याचें सविभक्तिक रूप 'रीतीस' असें करावें, कीं 'रितीस' असें करावें; त्याचप्रमाणें 'भूप' यांतला उपान्त्य 'ऊ', हा अन्त्याला दीर्घत्व आल्यावर मराठींतल्या रीतीप्रमाणें ऱ्हस्व करावा कीं दीर्घच ठेवावा? तर

यासंबंधानें अशी गोष्ट असते, कीं प्रथमतः एकादा परक्या भाषेंतला शब्द आपण घेतला, कीं त्याचें जें मूळचें स्वरूप असेल तें कायम राखण्याकडे आपली प्रवृत्ती असते. त्यांत आपण सहसा फेरफार करीत नाहीं. तो शब्द जसा काय परका किंवा पाहुणा आहे, अशा रीतीचा त्याचा आम्ही बोज राखितों. परंतु त्याचा आपणास जसजसा अधिकाधिक परिचय होत जातो, त्याप्रमाणें त्यास आपण स्वभाषेच्या पद्धतीप्रमाणें वागवूं लागतों. अशा वेळीं भाषेंत दोन किंवा वैकल्पिक प्रकार उत्पन्न होतात; व पुढें चालू भाषेंत इतर शब्दांच्या सादृश्यानें जो मार्ग उक्त असेल तो कायम राहून दुसरा नष्ट होतो. असे प्रकार मराठींत अनेक झालेले आहेत. त्याचीं आम्ही उदाहरणें देत बसत नाहीं. तीं व्याकरण चाळलें असता पाहिजेत तितकीं सहज पाहण्यास मिळतील. याप्रमाणें पाहिलें तर 'रीति' याचें कांहीं दिवस 'रीतीस' असेंच झालें; पुढें 'रीतीस' व 'रितीस' असे दोन्ही प्रकार मान्य झाले; आणि आतां हळू हळू मराठीच्या पद्धतीस मान्य असें जें रूप 'रितीस' तें कायम राहून, 'रीतीस' हें दुसरें रूप अर्थात नष्ट होईल. जे शब्द संस्कृतातून मराठींत येऊन त्यांचा उपयोग वारंवार होत असल्यामुळें भाषेंत अगदीं रुळून जातात, त्यांचे संबंधानें त्यांस पूर्ण मराठीत्व प्राप्त होण्याची गोष्ट लौकर घडून येते. परंतु जे शब्द मराठींत केवळ कधीं कधींच उपयोगांत असतात, त्यांना आपण संस्कृतांतलें त्याचें स्वरूप कायम ठेवून वागवितों. या आमच्या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ उदाहरणें पहाणें असल्यास व्याकरणांत पाहावीं. यासंबंधानें एवढाच मुद्दा लक्षांत ठेवावयाचा आहे, कीं कोणच्याही शब्दाला अखेरीस पूर्ण मराठी स्वरूप देणें ही मुख्य गोष्ट आहे. यासाठीं दोन रूपें होत असल्यास शुद्ध मराठी रूप हें विशेष ग्राह्य होय; आणि अखेरीस त्याच रूपाची प्रवृत्ती व्हावी. उदाहरणार्थ, 'रीति', 'रूप', यांचीं 'रितीस', 'रुपाला', हींच रूपें सरतेशेवटीं भाषेमध्यें कायम राहातील.

(२). दुसरी गोष्ट एकाच शब्दाचीं अनेक रूपें भाषेंत असल्यास त्यांचें काय करावें? यासबंधानें मागें एकवार शालापत्रकांत रा० पेठे यांच्या लेखामध्यें चर्चा आली आहे. प्रस्तुत पुस्तककारांचें मत असें झालेलें दिसतें, कीं भाषेंत एकाद्या शब्दाचीं निरनिराळीं रूपें किंवा एकच शब्द अनेक रीतींनीं लिहिण्याच्या तऱ्हा नसाव्या. तर एकच शुद्ध किंवा सोयीवार रूप ठरवून त्याचा सर्वांनीं उपयोग करावा. आमच्या मतें अशी मर्यादा घालणें बरोबर नाहीं. एकाच शब्दाचीं अनेक रूपें सर्व भाषातून असतात. संस्कृतांत तर असा प्रकार असल्यामुळे त्याच्यापासून फायदा ही झालेला आहे. यासाठीं जे जे निरनिराळे प्रकार असतील ते ते सर्व कायम ठेवावे. ते आपण मुद्दाम होऊन नष्ट करून टाकण्याचे भानगडींत पडूं नये. जें अधीक उपयुक्त तें राहातें व कमी उपयोगाचें तें नष्ट होतें, असा सृष्टिक्रमच आहे. त्याप्रमाणें जो उत्तम प्रकार असेल तो राहून बाकीचे आपोआप नष्ट होतील. क्वचित निरनिराळे प्रकार सर्वच सारख्या योग्यतेचे असल्यामुळें कायम राहातील. पण तसें झालें म्हणून त्यांत काय बिघडलें? आतां कोणी म्हणतील कीं असले दोन दोन चार चार प्रकार असल्यानें विद्यार्थ्यांचा फार घोटाळा होतो. हें म्हणणें खरें आहे. परंतु निरनिराळे प्रकार भाषेंत जर अगोदरचेच आहेत, तर आतां ते नाहींसे करून टाकण्याची खटपट करीत बसल्यानेंही कमी घोटाळा होईल. असें नाहीं. शिवाय, मुलांचा घोटाळा करून त्यांना नापास करण्याची ज्याला हौसच असेल, अशा परीक्षकाचे वर्तनास कशानें ही आळा घालितां येणार नाहीं. जेथें भिन्न असलेले प्रकार फारसे एकमेकांपासून निराळे नसतील, तेथें मुलांचे संबंधानें ते सर्व तसेच राहूं द्यावे. जेथें बराचसा फरक असेल, तेथें त्यांतला सोपा प्रकार असेल तोच फक्त नेहमीं क्रमिक व शालोपयोगी पुस्तकांत घालावा असें ठरवावें. पण बाकीचे प्रकार दोषयुक्त आहेत असें ठरवूं नये. ते ज्यांना पसंत होतील ते घेतील. दुसरें असें आहे, कीं शब्दाचें जें रूप क्रामिक व शालोपयोगी पुस्तकांत कायमचें ठरेल, तेंच सर्व ग्रंथकार बहुधा घेतील. तेव्हां एकाद्या ठरीव

रूपाचाच स्वीकार भाषेनें करावा असें आपल्यास वाटत असल्यास, अमुक रूप वाईट म्हणून तें सोडून द्या व अमुक ठेवा, असें सांगून वादविवादास कारण न करितां जें रूप पसंत असेल त्याचा शाळांत चालणाऱ्या पुस्तकांत स्वीकार करावा. कित्येक दिवसांनीं शाळांत चालणाऱ्या पुस्तकांत घेतलेला प्रकार उपयोगांत येऊन दुसरे प्रकार आपोआप मागें पडतील व कांहीं दिवसांनीं नष्टही होतील; व या युक्तीनें कोणास वाईट न वाटतां काम होईल.

(३). आतां आणखी एक विचार करण्यासारखी गोष्ट राहिली आहे. ती ही, कीं अमुक करावें असें ठरलें, पण तें अमलांत कसें यावें? भाषा बोलणारे व लिहिणारे सर्व लोक व ग्रंथकार यांच्याकडून नवे प्रकार कसे घेवावे? आतां याचा विचार इतकाच आहे, कीं झालेल्या विवेचनांत खरोखरी पाहातां नवे म्हणून म्हणण्यासारखे प्रकार फार थोडे आहेत. यासंबधानें इतका वादविवाद होण्याचें मुख्य कारण जे थोडे प्रकार सुचविले जात आहेत त्यांचें महत्व, असें म्हणावयास चिंता नाहीं. दुसरें, नुस्ते बोलणारे व साधारणतः किरकोळ लेख लिहिणारे, यांच्या लेखांच्या संबंधानें मुद्दाम होऊन आपणास पाहण्याचें कारण नाहीं. यांनींही शुद्ध, व्यवस्थेशीर, अशी भाषापद्धती स्वीकारावी हें उक्त आहे. परंतु एकंदर भाषेचा ओघ क्रमिक व शालेपयोगी पुस्तकें आणि सर्वमान्य ग्रंथ यांचेवर अवलंबून असतो. यांची काळजी घेतली असतां किरकोळ लेखांची व्यवस्था आपोआप लागते. तेव्हां शालोपयोगी ग्रंथ व सर्वमान्य होणारे ग्रंथ यांच्या भाषेची व्यवस्था पाहावी म्हणजे झालें. शुद्ध भाषापद्धतीच्या संबंधानें व्हावयास पाहिजे होता तितका वादविवाद होऊन सर्व गोष्टी आतां ठरल्यासारख्या झाल्या आहेत. तेव्हां आतां सर्व मतें विचारांत घेऊन एकच पद्धत बनविण्याचें काम एकाद्या गृहस्थाकडे सोपवावें. हें काम करावयास पुष्कळांची कमेटी उपयोगीं नाहीं. तर तें एकानेंच सर्व मतें पाहून केलें पाहिजे. नंतर त्यानें ठरविलेली पद्धत एकवार पांचचार अनुभविक मंडळीनें पाहून वाटल्यास सुधारणा सुचवाव्या. मग पहिल्याच गृहस्थानें पुनः

विचार करून अखेरची व्यवस्था करावी. अशा प्रकारें एकाच माणसानें अखेर व्यावस्था सुचवावी, व कायम करावी असें आम्हीं म्हणतों. याचें कारण असल्या कामांत भिन्न मतें होऊन, वादविवाद कधींच संपावयाचा नाहीं असें असतें. तेव्हां एकहातीं काम झालें असतां वादविवादास जागा राहणार नाहीं. तसेंच अखेर व्यवस्था करणारा गृहस्थ व त्यास सूचना करणारे यांनीं लक्षांत ठेवावें, कीं या कामांत ज्याला ज्याला सूचना करणें होत्या त्या त्यानीं केल्या आहेत; तेव्हां आतां आग्रह धरण्याचें कारण नाहीं. एकदां या अडचणींचा निकाल व्हावा, ही मुख्य गोष्ट आहे. असें केल्यावर सर्वांनीं स्वीकारण्यासारखी एकच अशी भाषा लिहिण्याची पद्धत तयार होईल.

यानंतर सर्व शालोपयोगी पुस्तकें व शाळांत चालणारीं, शाळाखात्याच्या आश्रयाखाली असलेलीं पुस्तकें या पद्धतीनें लिहावीं. त्याच प्रमाणें असा नियम करावा, कीं जीं पुस्तकें शाळाखात्याकडून बक्षिसासाठीं किंवा लायब्ररीसाठीं मंजूर होतात, किंवा ज्यांना दक्षिणाप्राईझकमेटी व डेक्कन व्हरनाक्युलर सोसायटी यांकडून उत्तेजन मिळतें, तीं सर्व या पद्धतीनें लिहिलेलीं असावीं. असें एकदां ठरवून टाकल्यानंतर भाषेंतील सर्व मुख्य मुख्य ग्रंथ थोड्याच दिवसांत अशा प्रकारें ठरलेल्या पद्धतीप्रमाणें होऊन जातील; व मग अर्थात किरकोळ ग्रंथ व लेख ह्यांत ही या सर्वमान्य भाषापद्धतीचें अनुकरण होऊं लागेल.

तेव्हां आज इतके दिवस चाललेल्या वादविवादाचा अखेर निकाल होण्यास कांहीं विशेष अडचण आहे असें आम्हांस वाटत नाहीं. मात्र एक मोठी अडचण आहे. ती कोणची, तर आमच्या मंडळीची शिथिलता. सुमारें वर्ष दीड वर्षापूर्वीं या संबंधानें बऱ्याच कडाक्यानें वाद चालला होता व पुष्कळांनीं यांत मन घातलें आहे असें दिसत होतें. पण आमच्या त्रिवर्ग विद्वान मित्रांचें प्रस्तुतचें पुस्तक तयार झाल्यापासून बहुतक सामसूम झाल्यासारखें झालें आहे. जसा काय असा कांहीं वाद कधीं उपस्थितच झाला नव्हता! असें होणें हें आमच्या नेहमींच्या पद्धती-

प्रमाणेंच आहे. परंतु आमचे त्रिवर्ग मित्र यांनीं ज्याअर्थीं ही गोष्ट मुद्दाम मनावर घेतली आहे, त्याअर्थीं त्यांनीं आतां ती एकीकडे सारून न ठेवितां तिची तड लावावी. आतां विशेषशी भानगड उरली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. लेखनपद्धतीची व्यवस्था ठरवण्याचें महत्व किती आहे व तिची जरूरी केवढी आहे हें त्यांस अनुभवावरून माहित झालेलें आहे. तेव्हां त्यांनीं आतां या वादविवादाचा शेवट लावावा असें त्यांस सुचवून, व त्यांनीं इतकी खटपट केली म्हणून मराठी भाषा बोलणारांचे तर्फे त्याचे आभार मानून सध्या आमच्या मित्रांची आम्ही रजा घेतों.

---

## नीतिशिक्षण संबंधाचे आणखी कांहीं विचार.

गेल्याखेपेस शाळांतून मुलांस नीती व धर्म यांचें शिक्षण देण्याच्या संबंधानें जी चर्चा चालू आहे, तिच्याविषयीं जे आमचे विचार व्यक्त केलें होते, त्याविषयीं कित्येकांचा गैरसमज झालेला दिसतो. त्या विचारांच्या संबंधानें कित्येक असा प्रश्न करितात, कीं " मुलाच्या नीतीच्या संबंधाची जबाबदारी आपल्यावर नाहीं असें जर शिक्षकवर्गाच्या तर्फेनें तुम्ही म्हणतां, तर तुम्ही देखील आपल्यावरची जबाबदारी उडविण्याचा यत्न करितां असेंच झालें नाहीं काय ? आणि मग जो दोष गेल्या अंकांतील लेखामध्यें घरच्या मंळळीवर येतो म्हणून तुम्हीं म्हटलें आहे, तोच आमच्यावर—म्हणजे शिक्षकपक्षावर—येत नाहीं काय ? " या प्रश्नाचें उत्तर आम्ही असें देतों, कीं मुलांस सुनीतीचें वळण लावण्याचें आम्हा शिक्षकांचें कर्तव्य नाहीं, असें आम्ही मुळींच म्हणत नाहीं. तें कर्तव्य आमचेंच आहे, व तसें म्हणावयास आम्हास मोठा अभिमानही वाटतो. परंतु आजची शिक्षणाची व्यवस्था अशी आहे, कीं तिच्यामुळें आम्हास आमचें कर्तव्य बजावण्यास सांपडत नाहीं. जुनी शिक्षणपद्धती अशी होती, कीं मुलाचें अमुक वय झालें, कीं त्यास सर्वस्वी गुरूच्या स्वाधीन

करावें. तेथून मग त्यास अध्ययन पूर्ण झाल्याखेरीज व तरूणपण आल्याखेरीज हालतां येत नव्हतें. यामुळें त्या तरूण माणसास जी कांहीं योग्यता प्राप्त होत असे, ती सर्वस्वी गुरूच्या शिक्षणाचें फळ असे. ही बऱ्याच प्राचीन काळची स्थिती झाली. अलीकडल्या काळीं ही बहुतेक तोच प्रकार होता असें म्हणावयास चिंता नाहीं. याचे कारण अलीकडे आमच्या लोकांनीं बाप हाच गुरू असें ठरविल्यासारखें झालें होतें. सध्या उपनयन संस्काराचें जें एक प्रकारें सोंग होत असतें, त्यामध्यें तरी गुरुस्थान मुलाचा पिताच घेत असतो. यामुळें या मधल्याकाळीं बाप मुलास एकंदर संसाराचें व वडिलोपार्जित धंद्याचें शिक्षण देई व गांवातला वाईट बरा पंतोजी असे तो लेखनवाचनाचें शिक्षण देई; यामुळें जें काय थोडें फार शिक्षण व्हावयाचें, तें या दोनच गुरूंच्या शिक्षेखालीं होत असे; व या दोन गुरूंची मुलांवर रात्रंदिवस नजर असे. असें शिक्षण कांहीं दिवस झाल्यावर पुढें धंदा किंवा कसब यांचें विशेष शिक्षण देण्याचें ठरल्यास त्यासाठीं मुलगा सर्वप्रकारें तें शिक्षण देणाऱ्या विवक्षित गुरूच्या ताब्यांतच नियमित काळ पर्यंत असे. उदाहरणार्थ, एकद्यास कारकुनीचा धंदा शिकावयाचा, तर तो पुण्यास फडावर, किंवा दुसऱ्या एकाद्या सरकारी कामगाराच्या हाताखालीं शिके. तसेंच एकाद्यास सैन्यांत जावयाचे असलें, तर तो एकाद्या सरदाराचें शिष्यत्व पत्करी. याप्रमाणें विद्येच्या योग्यतेच्या संबंधानें फार प्राचीन काळची पद्धत जरी धामधुमीच्या व पेशवाईच्या वगैरे काळांत बदलली असली, तरी गुरु-शिष्यांचा जो निकट संबंध, त्याची तऱ्हा फारशी बदलली नव्हती, असें म्हणावयास चिंता नाहीं. पण सध्याचे जे आम्ही शिक्षक व आमचे शिष्य, यांच्या परस्परसंबंधाचा प्रकार कसा आहे तो पहा. जुन्या काळचे शिक्षक यांचीं मुख्य धोरणें दोन असत. एक आपण ज्या विद्येंत प्रवीण आहों, ती शिष्यांस शिकवून ती विद्या उत्तम रीतीनें राखावयाची; व दुसरें धोरण आपण अमके उत्तम शिष्य तयार केले, अशा प्रकारची लोकांमध्यें कीर्ती मिळवावयाची. आतां हल्लींचे शिक्षक कसे आहेत ते पहा.

सांप्रतचे शिक्षक स्वतः होऊन शाळा काढीत नाहींत; तर दुसऱ्यांनीं काढलेल्या शाळांतून पगार घेऊन शिकवीत असतात. अर्थात त्यांस या शाळांबद्दल **आपलेपणा** वाटत नसतो. त्यांतून गुरुशिष्य यांचा बरेच दिवस तरी संबंध असेल, तर एक बरें. पण हा संबंध नेहमीं गुरूच्या बदलीवर अवलंबून असावयाचा. शाळांतले उपशिक्षक वारंवार बदलतात तसे हेडमास्तरही बदलतात, निदान मुख्य गुरू तरी एकेका ठिकाणीं कायमचे असतील, तर किती तरी उत्तम परिणाम होईल. पण सध्याच्या स्थितींत व व्यवस्थेंत हें होणें शक्य नाहीं, व आपल्याला आहे ही स्थितीच पत्करून समाधान मानून घेणें भाग आहे. अशा प्रकारची ही जी चमत्कारिक स्थिती विद्याक्रमास प्राप्त झाली आहे, ती ज्या ठिकाणच्या विद्याक्रमाचें अनुकरण आम्ही करीत आहों, त्या इंग्लंड देशांत ही नाहीं. तिकडे पुष्कळ जुन्या शाळा आमच्या इकडील जुन्या पंतोजीच्या शाळांसारख्या आहेत. त्यांची संस्था व व्यवस्था कायमची असून त्यांच्यावरचा मुख्य शिक्षक व तेथले दुसरे कित्येक शिक्षकही बहुतेक कायमचे नेमलेले असतात; किंवा ते बरेच वर्षे तरी एकाच ठिकाणीं रहावयाचे असतात. यामुळें आधुनिक शिक्षणव्यवस्थेंतला पगारदार शिक्षकांच्या वारंवार बदल्या होणें हा जो मोठा दोष, त्याच्या संबंधानें होणारें नुकसान या शाळांच्या संबंधानें तरी टळलें आहे. दुसरा एक प्रकार तिकडे असा आहे, कीं आमच्या इकडे ज्याप्रमाणें एक शाळाखातें आहे व त्या एकाच खात्यांतले अनेक शिक्षक, ज्यांच्या वारंवार बदल्या करणें भाग पडतें, असा प्रकार आहे, तसें तिकडे नसून, नवीन शिक्षणव्यवस्थेप्रमाणें झालेलीं जीं ‘ बोर्डें ’ तीं प्रत्येकीं स्वतंत्र असतात. यामुळें प्रत्येक बोर्ड आपले शिक्षक नियमित वर्षांचा करार करून घेऊन नेमतें; व त्या शिक्षकांची एका शाळेंतून दुसऱ्या शाळेंत बदली होण्याचा संभव कमी असतो. कारण अशा प्रकारें करारानें गुंतलेले शिक्षक नियमित मुदतीनंतर दुसरीकडे मोठी जागा आली तर मात्र आपली पहिली शाळा सोडून दुसरीकडे जातात, नाहींतर पुष्कळ दिवस एकाच शाळेंत टिकतात. तेव्हां

आवरून दिसून येईल, कीं शिक्षकांचा अस्थीरपणा आमच्या इकडल्यापेक्षां इंग्लंडांत फार कमी आहे.

आतां आमच्या इकडली दुसरी अडचण पहा. आमच्या इकडे मुलें दिवसांतून फक्त पांच सहा तास काय तीं शिक्षकाचे हातीं असतात, हें मागील लेखांत सांगितलेंच आहे. त्या वेळांत इयत्तेचे व परीक्षेचे नियमित अभ्यास व्हावयाचे असतात. त्यांतले त्यांत साधेल तेवढें सुनीतींचें वळण लावावयाचें. तेव्हां या संबंधानें शिक्षकांवर केवढीही जबाबदारी असली, तरी ती बजावण्याचें त्याचेकडून कितपत होईल याची कल्पना कोणासही करितां येणार आहे. म्हणून आम्हीं गेल्या खेपेस सांगितलें आहे, कीं सध्याच्या शिक्षणाच्या व्यवस्थेप्रमाणें शिक्षकास मुलांच्या नीतीशिक्षणाकडे लक्ष देण्यास सवड मिळावी तितकी मिळत नाहीं. आणि या संबंधानें शिक्षकांस जास्त सवड होईल अशा प्रकारचा आपल्या शिक्षण-व्यवस्थेंत बदल होण्याचाही बिलकूल संभव नाहीं. याला वास्तविक दोन तजविजी आहेत. त्या कोणच्या, तर आपापल्या ठिकाणीं स्वतंत्र अशा खासगी शाळा स्थापन होणें; व दुसरी, मोठाल्या व मध्यम प्रतीच्या गांवांत ज्या म्युनिसिपालिटीच्या शाळा आहेत, त्यांची व्यवस्था लोकांच्या हातीं अधीन असणें. असें झालें असतां शिक्षकांच्या वारंवार होणाऱ्या बदल्या टळून, शिवाय मुलें दिवसांत बराच वेळ शाळेंत राहूं देण्याची व्यवस्था लोकांना करितां येतील. पण सांप्रतची एकंदर जनसमूहाची पैशाच्या, विद्वत्तेच्या व सार्वजनिक कामें करण्याच्या हौसेच्या संबंधानें जी स्थिती आहे, तिचा विचार करून पाहिलें तर आणखी निदान बरींच वर्षें तरी ह्या दोन्ही गोष्टींची व्यवस्था आपल्यास हवी तशी होणें अशक्य आहे. या सर्व कारणामुळें मुलांस सुनीतीचें वळण लावण्याचें आम्हा शिक्षकांचें कर्तव्य असून, तें आम्हांस चांगलें बजावितां येत नाहीं, अशी वस्तुस्थिती प्राप्त झालेली आहे.

तेव्हां मुलांस सुनीतीचें वळण लावण्याचें काम अखेरीस पुष्कळसें घरीं वडील माणसांवरच येऊन पडतें, हें उघड आहे. परंतु तें कर्तव्य आमच्या

घरच्या माणसांच्या हातूनही नीट बजावलें जात नाहीं. प्राचीन काळीं ही महत्वाची गोष्ट काळजीपूर्वक व्हावी म्हणून याचा धर्माशीं फार निकट संबंध जोडून दिलेला होता. परंतु सांप्रत आमची एकंदर धर्मश्रद्धा केवळ नामशेष राहिली आहे, व तिचें वेळोवेळीं खोटें प्रदर्शन करणें, या पलीकडे आमची मजल जात नाहीं, यामुळें मुलांच्या विद्याभ्यासाच्या संबंधानें जी जुन्याकाळीं पद्धत लावून दिली होती, ती ही याच कोटींत येऊन पडली आहे. तेव्हां या बाबतींत तरी जो धर्माचा प्रकार म्हणून समजला जात आहे, तो नीटपणें कसा बजावला जाणार?

आमच्या सर्व उच्चवर्णांच्या लोकांत मुलाची मुंज होत असते. ही मुंज करणें म्हणजे मुलास शाळेंत घालणें किंवा गुरूच्या स्वाधीन करणें होय. परंतु यांतला खरा उद्देश आजमित्तीस-कितीजण ध्यानांत ठेवितात? सांप्रत मुंज हा संस्कार केवळ कुटुंबीय व इष्टमित्र मंडळी यांची चार दिवस चैन व्हावी म्हणूनच केवळ साजरा होत असतो. मुलगा जातींत आला पाहिजे व चार आप्तइष्ट मंडळी आपले घरीं येऊन समारंभ झाला पाहिजे, एवढ्याच साठीं सांप्रत आपण हा संस्कार करीत असतों. याचा मूळचा उद्देश अगदीं निराळा आहे, हें कोणास माहित नाहीं असें नाहीं. मूळचा उद्देश म्हटला म्हणजे हा संस्कार करून मुलास गुरूच्या स्वाधीन करावयाचें. या संस्कारानंतर शिष्य गुरुगृहीं राहून, त्याचा विद्याभ्यास चालला असतां व तो पुरा झाल्यावर प्राचीन गुरू त्यास नीतितत्वें सांगत असे. हा जो जुन्या काळचा नीतीचा उपदेश तो सध्या उपाध्येबुवा मुंजीच्या वेळीं मुंजीचे वेळचे मंत्र म्हणून मुलांपुढें म्हणून दाखवितात.यापलीकडे या उत्कृष्ट उपदेशाची संभावना सांप्रत होत नाहीं. हा उपदेश कोणी ही मनन पूर्वक वाचून पाहिला असतां असें दिसून येईल, कीं यांतलें प्रत्येक वाक्य अत्यंत मौल्यवान आहे, व त्यांत नीतिरत्नें भरलेलीं आहेत. हा सुंदर उपदेश तैत्तिरीयोपनिषदामध्यें आहे. हा मराठी भाषांतरासह शालापत्रक पुस्तक ६ अंक ९ यांत आलेला आमच्या वाचकांस आठवत असेल. तो पुनः येथें उतरून घेतों:—

वेदमनूच्योऽऽचार्योऽन्तेवासिनमनुशास्ति ।
सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः । सत्यान्न प्रमदितव्यम् । धर्मान्न प्रमदितव्यम् । कुशलान्न प्रमदितव्यम् । भूत्यै न प्रमदितव्यम् । स्वाध्याय-प्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् । देव-पितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् । मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव । यान्यनवद्यानि कर्माणि । तानि सेवितव्यानि । नो इतराणि । यान्यस्माकꣳ सुचरितानि । तानि त्वयोपास्यानि । नो इतराणि । ये के चास्मच्छ्रेयाꣳसो ब्राह्मणाः । तेषां त्वयाऽऽसनेन प्रश्वसितव्यम् । श्रद्धया देयम् । अश्रद्धयाऽदेयम् । श्रिया देयम् । ह्रिया देयम् । भिया देयम् । संविदा देयम् । अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात् । ये तत्र ब्राह्मणाः सम्मर्शिनः । युक्ता आयुक्ताः । अलूक्षा धर्मकामाः स्युः । यथा ते तत्र वर्तेरन् । तथा तत्र वर्तेथाः । अथाभ्याख्यातेषु । ये तत्र ब्राह्मणाः सम्मर्शिनः । युक्ता आयुक्ताः । अलूक्षा धर्मकामाः स्युः । यथा ते तेषु वर्तेरन् । तथा तेषु वर्तेथाः । एष आदेशः । एष उपदेशः । एषा वेदोपनिषत् । एतदनुशासनम् । एवमुपासितव्यम् । एवमुचैतदुपास्यम् ॥ ४ ॥ तैत्तिरीयोपनिषत् । शिक्षाध्याये ११ अनुवाकः ।

अध्ययन झाल्यानंतर आचार्य आपल्या विद्यार्थ्यास उपदेश करितो । खरें बोलत जा । आपलें कर्तव्य करीत जा । आपल्या अध्ययनाची हयगय करूं नकोस । सत्यापासून चळूं नकोस । कर्तव्यापासून चळूं नकोस । जें हितकारक त्यापासून चळूं नकोस । जें मंगलकारक त्यापासून चळूं नकोस । जें शिकला आहेस तें जागृत ठेवण्यांत व तें दुसऱ्यास शिकविण्यांत मुळींच आळस करूं नकोस । देव व पितर यांच्याप्रीत्यर्थ जीं कर्मे करावयाचीं तीं विसरूं नकोस । आई ही ज्याचा देव असा हो । बाप हा ज्याचा देव असा हो । आचार्य ज्याचा देव असा हो । घरीं आलेला पाहुणा ज्याचा देव असा हो । जीं कृत्यें सर्वथा निर्दोष तीं करावीं । दुसरीं करूंच नयेत । आम्ही जीं चांगली कृत्यें करितों ।

तींच तुम्हीं करा। दुसरीं करूं नका। आपल्यापेक्षां श्रेष्ठ असे लोक आहेत त्यांचा मान राखून, या बसा म्हणून त्यांस संतुष्ट करा। कोणाला कांहीं द्यायचें तें श्रद्धेनें द्यावें। श्रद्धेवांचून देऊं नये। आनंदानें द्यावें। गरीबपणानें द्यावें। संकोचानें द्यावें। नेमपूर्वक द्यावें। कोण्या वेळीं कसें वागावें, काय करावें, हें कळेनासें झाल्यास चार विचारी लोक वागत असतील त्याप्रमाणें वागत जावें। मग ते तुमचे नेमलेले शिक्षक असोत किंवा दुसरे कोणी मोठे असोत। त्यांची बुद्धी निष्ठुरपणाची नसली व ते धर्मशील असले म्हणजे झालें। त्याचप्रमाणें, ज्या गोष्टी चांगल्या कीं वाईट याविषयीं संशय उत्पन्न झाला असेल, त्यांच्या संबंधांतही चार विचारी लोक वागत असतील त्याप्रमाणें वागत जावें। मग ते तुमचे नेमलेले शिक्षक असोत किंवा दुसरे कोणी शहाणे असोत। त्यांची बुद्धी निष्ठुरपणाची नसली व ते धर्मशील असले म्हणजे झालें। हीच आमची आज्ञा। हाच उपदेश। आम्ही तुम्हांला जे नियम घालून देतों ते हेच। याचप्रमाणें वागत जा। यांप्रमाणें वागत जावें।

हा जो उपदेश करीत असत, यावरून नीतिशिक्षणाची योग्यता आपल्यामध्यें केवढी समजली जात होती, हें कोणाचेही लक्षांत येईल. या प्रत्येक वाक्यामध्यें जी एकेक गोष्ट सांगितली आहे, ती मुलाचे मनावर चांगली ठसावी व तिची योग्यता त्यास चांगली कळावी, म्हणून प्राचीन काळीं गुरूंना वारंवार दृष्टान्त, उदाहरणें, कथा, आख्यानें वगैरे सांगून मुलांना संभाषणाचे द्वारें शिकवावें लागत असेल. आपल्या लोकांत कथा पुराणें आख्यानें, उपाख्यानें, वगैरे प्रकार तसेच पंचतंत्र, हितोपदेश, दशकुमार चरित्र, बृहत्कथा, कथासरित्सागर, इत्यादी जे शेंकडो ग्रंथ आज उपलब्ध आहेत, ते याच कारणासाठीं लिहिलेले असले पाहिजेत; व त्यांचा उपयोग सांप्रतच्या वाचनाच्या पुस्तकासारखाच तेव्हा होत असेल हे उघड आहे. एरव्हीं वरच्या सुंदर उपदेशामध्यें जो एकेक अमोलिक उपदेश आहे, तो तरूण विद्यार्थ्यांच्या मनांत पक्केपणीं कसा बिंबावा? हल्लीं शाळांमधून नेमलेलीं

वाचनाचीं पुस्तकें काय थोडीं आहेत? व त्यांच्यावरून वरीलप्रमाणें नित्युपदेश काय थोडा करितां येणार आहे? परंतु संप्रत प्रथमतः वार्षिक किंवा दुसऱ्या एकाद्या परीक्षेकडे लक्ष द्यावयाचें असल्यामुळें वाचनांतील उपदेशापेक्षां विशेष धोरण शब्दार्थ, व्याकरण, वगैरे गोष्टींकडे असतें. सांप्रतची आपली पद्धती निराळी आहे सध्या आपण अगदींच निराळ्या दृष्टीनें या गोष्टींकडे पाहातों. यामुळें जुन्या व नव्या पद्धतींत एवढा मोठा फरक पडला आहे. हा उपदेश मागें गुरू करीत असे, आतां ही हें कर्तव्य गुरूंचेंच आहे हें आम्हांस कबूल आहे; व तें बजाविण्यास गुरूंची तयारी ही आहे. पण तें करण्याची आम्हांस सवड मिळत नाहीं, तेवढी करून द्या म्हणजे झालें! याचप्रमाणें धर्माशीं ज्यांची सांगड घालून दिलेली आहे, अशाप्रकारचे मुलांना सुनीतीचें व चांगल्या वर्तनाचें वळण लावण्याचे कित्येक तांत्रिक प्रकार ही असत. हे सांप्रत कोठें कोठें अंशतः चालू आहेत. परंतु त्यांचा मुळ उद्देश सांप्रत कोणी ही मनांत आणीत नाहीं. हे प्रकार कोणचे तर सकाळीं लौकर उठून प्रातःस्मरण करणें, भूपाळ्या वगैरे म्हणणें; पुढें स्नान संध्या करणें, नमस्कार घालणें, पाहाटेस उठून खर्डे लिहिण्यास बसणें, संध्याकाळीं पर्वाचा म्हणणें, तीथ वार, नक्षत्रें इत्यादी पाठ करणें, श्लोक, स्तोत्रें वगैरे म्हणणें, वगैरे, या किरकोळ गोष्टींमुळें मुलांस एक प्रकारचें '**वळण**' ज्याला इंग्रजींत *discipline* असें म्हणतात, व ज्याचें महत्व शिक्षणांत मोठें धरलें आहे, तें लागत असे. असले कवाइतीचे प्रकार नवीन शिक्षणपद्धतीमध्यें ही नाहींत असें नाहीं. 'शाळेंतील कवाईत' म्हणून पाश्चिमात्य शिक्षणक्रमांत एक विषयच आहे. पण ही कवाईत शिकविण्याजोगे शिक्षक आमच्या इकडे अजून तयार झालेले नाहींत; व त्या पद्धतीला जो थोडाजास्त खर्च लागण्याचा संभव आहे, तो करण्याचें आमच्या शाळांना सामर्थ्य नाहीं. त्यासाठीं मुलांना जे एक प्रकारचे नवीन पोषाख वगैरे पाहिजेत, ते मुलाचे वडील खुषीनें देणार नाहींत; आणि सर्वांत मोठी अडचण, असले **नवीन प्रकार** आमच्या मुलांच्या घरच्या वडील मंडळीस मुळींच नको आहेत. यामुळें जुनें नष्ट होऊन

गेलें व नवीन कांहीं एक आम्ही घेतलें नाहीं, अशांतला प्रकार सांप्रत होऊन गेला आहे. तसेंच पुष्कळ कुटुंबांतून मुलांना मार्गे रूपावळी, समासचक्र, रुद्र, पवमान, त्रिसुपर्ण, इत्यादी शिकवीत व हीं त्यांना रोजचेरोज म्हणावीं लागत. यामुळे जिव्हेस एक प्रकारचें वळण लागतें, पाठ करण्याची संवय होते, व आंगीं सभाधीतपणा व हुषारी येते, असें समजत. आणि हें अनेकप्रकारें खरें ही होतें. यांतले प्रकार आजमितीस किती जिवंत आहेत; हे नष्ट कां झाले; ते नष्ट होणें योग्य होतें कीं काय; त्यां-पासून खरोखर कांहीं उपयोग होता कीं नाहीं; ते पुनः कितीसे व कशा प्रकारें सुरू करितां येतील; असलें प्रकार जुने नको असतील तर नवीन पाश्चात्य शिक्षणपद्धतींत तसे कांहीं आहेत कीं नाहींत; त्यांतले आपल्यास किती घेतां येतील; अशा प्रकारच्या गोष्टींचा विचार आमच्या मुलांच्या शिक्षणाची—विशेषतः नीतिशिक्षणाची—आस्था बाळगणारांनीं अवश्य करावयास पाहिजे आहे. तो सर्वांनीं अवश्य करावा एवढेंच आज सांगून सध्या हा लेख संपवितों.

या रीतीनें १० पर्यंत अंक शिकवून झाल्यावर अगोदर दोहोंचा पाढा ' बे पंचे दहा ' पर्यंत शिकवावा. ज्या मुलांस शिकवावयाचें तीं शिक्षकानें आपल्या जवळ घ्यावीं. नंतर जमिनीवर दोन गोट्यांची एक रांग एके ठिकाणीं ठेवावी. त्याच्यापुढें दोन रांगा, पुढें तीन रांगा, या प्रमाणें पांच रांगा होत तोंपर्यंत लागतील तितक्या गोट्या मांडून ठेवाव्या. मग प्रत्येक समुदायामध्यें रांगा किती आहेत, व एक एका रांगेंत गोट्या किती आहेत, ह्या गोष्टी मुलांच्या ध्यानांत चांगल्या आणून द्याव्या. नंतर दोहोला ' बे ' असें म्हणतात, व रांगांना त्यांच्या संख्येच्या क्रमानें एके दुणे, त्रीक, चोक, व पंचे अशीं नांवें आहेत, ही समजूत करून द्यावी. दुणे म्हणजे किती रांगा ? तीन रांगांना काय म्हणतात ? असे प्रश्न विचारून ही समजूत दृढ करून द्यावी. आणि इतकी समजूत झाल्यानंतर ' बे एके बे ( दोन ) ', ' बे दुणे चार ', असें सागून आपल्या सांगण्याचा त्या त्या समुदायांतील संख्येशीं मेळ कसा आहे, हें त्यांच्या ध्यानांत आणून द्यावें. नंतर हीच गोष्ट फळ्यावर टिंबांचे समुदाय ( जमिनीवरील गोट्यांप्रमाणेंच ) लिहून पुनः समजून द्यावी, व अनेक प्रकारचे प्रश्न पुनः पुनः विचारून तो धडा चांगला तयार करून घ्यावा.

अंक शिकविण्याच्या आरंभाबरोबरच मुलांकडून परवाचा म्हणविण्याचीही सुरवात करावी. अगदीं पहिल्यानें १०० पर्यंत अंक व १० पर्यंत पाडे इतकी उजळणी रोज म्हणवावी; व वर्गांत जो धडा चालला असेल तो व त्याच्या मागचा एक एक धडा, इतकें त्याच वेळीं पांचपांचदां म्हणवावें. परवाचा म्हणत असतां प्रत्येक मुलगा आपण सांगितलेली उजळणी म्हणत आहे, किंवा उगीच मुकाट्यानें उभा आहे, तसेंच सांगितलेल्या उजळणीचा उच्चार बरोबर करीत आहे किंवा नाहीं, ह्या गोष्टींकडे फार बारकाईनें लक्ष ठेवावें; नाहींतर भलतेच उच्चार त्याच्या तोंडांत बसतील. परवाचेची उजळणी मुलांकडून न सांगवितां शिक्षकानें स्वतः सांगावी. ती फार सावकाश सांगावी, व उच्चार स्पष्ट व सर्व मुलांस चांगला ऐकू जाईल असा करावा. ११ पासून १०० पर्यंतचे

अंक ‘ एकावर एक अकरा,’ ‘ एकावर दोन बारा, ’ अशा रीतीनें सांगण्याची वहिवाट आहे ती बंद करून ‘ अकरा, एकावर, एक ’ ‘बारा, एकावर दोन, ’ अशा रीतीनें सांगावे. ह्या रीतीनें शिकविल्यानें उच्चारिलेला कोणताही अंक जास्त सुलभतेनें मांडितां येऊं लागेल. कारण ‘ बारा ’ म्हटल्याबरोबर ‘ एकावर दोम ’ हा पुढला भाग त्यांस लागलाच आठवेल, व लिहिण्याला सुलभ जाईल.

दहापर्यंत अंक, व ‘ बे पंचे दहा ’ येथपर्यंतचा पाडा शिकवून झाल्यावर ११ पासून १९ पर्यंत एक धडा, व १६ पासून २० पर्यंत दुसरा धडा हे अगोदर शिकवावे. व नंतर ‘ बे सक बारा ’ पासून ‘ बे दाहीं वीस ’ पर्यंतचा धडा शिकवावा. ज्या पद्धतीनें १ पासून १० पर्यंत अंक व ‘ बेपंचे दहा ’ पर्यंतचा पाडा शिकविला, त्याच पद्धतीनें सर्वथा हे तिन्ही धडे शिकवावे; व पुढें मुलांची आकलनशक्ती जशी वाढत जाईल त्याप्रमाणें ९१ पासून ६० पर्यंत अंकांचा एक धडा, व ६ चा पाडा सगळा, असा एक एक धडा एकदम तयार करून घ्यावा. तथापि एवढा मोठाच धडा एकदम तयार होणें जड गेल्यास पूर्ववत् अर्धा अर्धा धडा तयार करून घ्यावा. मात्र प्रत्येक वेळीं असा निश्चय असला पाहिजे कीं, जो धडा चालला असेल तो, व मागचे सर्व धडे, हे चांगलें तयार झाल्याशिवाय पुढें शिकवावयाचें नाहीं. अंकांचा जो कोणताही धडा झाला असेल, तेथपर्यंतचे मागील सर्व अंक बिनचूक मांडतां आले पाहिजेत, व त्यांतील परस्परांचा लहानमोठेपणा समजला पाहिजे, तेव्हां तो धडा चांगला झाला असें समजावयाचें. पाड्यांतील कोणताही उलटा व सुलटा प्रश्न विचारिला, अगर त्या पाड्याच्या साह्यानें होणारा एखादा सोपा हिशोब विचारिला तर त्याचें उत्तर देतां आलें पाहिजे. अशा रीतीनें प्रत्येक धडा चांगला पुरा होईल, तेव्हांच त्याच्या पुढील धडा सांगावा.

ह्या क्रमानें १०० पर्यंत अंक व १० पर्यंत पाडे एकदम पुरे होतील. व तितकें झालें म्हणजे बालवर्गाची उजळणी पुरी होते.

शंभरापर्यंत अंक मांडतां येऊं लागल्यानंतर कोणताही नवा धडा देण्यापूर्वी मुलांस पुढचे ( शतं—स्थानापर्यंतचे ) अंक मांडावयास व वाचावयास शिकवावे. ‘ अष्टोदरशें ’ व ‘एकशें आठ’ अशा दोन प्रकारांनीं ह्या संख्या वाचितात, याकरितां मुलांची समजूत दोन्ही प्रकारांनीं करून द्यावी. तसेंच अशा संख्यांपैकीं लहान कोणती व मोठी कोणती हें ओळखण्यास शिकवावें.

वर लिहिलेल्या संख्या ओळखतां येऊं लागल्यावर पाव, अर्धा, व पाऊण ह्यांनीं युक्त अशा रेघांच्या संख्या मांडावयास व वाचावयास शिकवाव्या.

तीन स्थानांच्या संख्या मांडितां व वाचतां येऊं लागल्यानंतर रेघांच्या संख्या मांडावयास शिकवीत असतांच ११ पासून पुढील पाडे शिकवूं लागावें. प्रत्येक पाडा चांगला तयार झाल्याशिवाय पुढचा सांगूं नये.

येथें एक विशेष गोष्ट विचार करण्यासारखी आहे. ती ही कीं, पुढें जे पाडे शिकवावयाचे ते मुलांस लिहितां येण्याऊ निराळ्या रीतीनें शिकविण्याची मुळींच जरूर नाहीं. कारण तीन अंकांची कोणतीही संख्या मांडतां येऊं लागल्यानंतरच ते शिकवावयाचे . असल्यामुळें पुढील पाड्यांची फक्त तोंडीं वाचणी दिली म्हणजे झालें. परवाचा म्हणण्याकडे फार लक्ष देऊन केवळ **परवाचेच्याच द्वारें** पुढील उजळणी तयार करावी. १०० पर्यंत अंक झाल्याबरोबर पुढें परवाचा म्हणणें तो ११ पासून २० पर्यंत पाडे, एकवीसकीं, पावकीं व निमकीं इतकीं रोज म्हणविलीं पाहिजेत. जो धडा शिकविण्याचें काम वर्गांत चाललें असेल तो व त्याच्या पुढचे पांच धडे ह्यांची वाचणी पांच पांचदां द्यावी. ११ पासून २० पर्यंत पाडे म्हणतां येऊं लागल्यावर ‘ अकराचोक, बाराचोक, इत्यादि वीसचोकपर्यंत, ’ अशा रीतीनें फेरबदल करून उजळणी म्हणवावी, म्हणजे ती चांगली घटेल.

पाडें शिकवीत असतां उजळणीच्या प्रश्नांचीं उत्तरें, पाहिल्यापासून धडा मोजीत न बसतां, एकदम देतां येतील अशा रीतीनें ते शिकविण्याची पद्धती आरंभापासूच ठेवावी. शिकविलेल्या उजळणीचा ज्यांत

उपयोग करितां येईल, अशा तऱ्हेचे तोंडचे हिशोबही ते पाडे शिकवीत असतांच करावयास शिकवावे. ' आठ चोक किती ? ' व ' किती चोक बत्तीस ? ' ह्या निरनिराळ्या तऱ्हेच्या प्रश्नांचा उपयोग कशा प्रकारच्या हिशोबांत करावा लागतो हें समजावून द्यावें. मुलांकडून हा भाग तयार करण्याचें काम बरेंच कठीण आहे. याकरितां एकसारखे प्रश्न विचारून मुलांकडून त्यांचीं उत्तरें वदवून तो तयार करवावा. बऱ्याच दिवसांची संवय झाल्याशिवाय तो चांगला तयार होणार नाहीं.

पाडे शिकवीत असतांच आण्यांचे पैसे करणें, रुपयांचे आणे, चवल्या पावल्या, वगैरे करणें, तसेंच पैशांचे आणे, आण्यांचे रुपये, चवल्यांचे व पावल्यांचे रुपये करणें, वगैरे गोष्टींची माहिती करून घ्यावी; व हिशोबांत त्यांचा उपयोग करीत असावें. ह्या गोष्टींचा संबंध केवळ पाड्यांशींच असल्यामुळें पाडे शिकवीत असतां थोड्या प्रयत्नांनीं त्या मुलांस लवकर येऊं लागतील.

रेघांच्या संख्या कशा मांडावयाच्या हें पूर्वीं शिकविलेलें असल्यावर केवळ वाचणी शिकविल्यानेंच पावकीं व निमकीं मुलांस येऊं लागतील; व जसजशीं तीं येऊं लागतील तसतशीं पाड्यांप्रमाणेंच अनेक तऱ्हेचे प्रश्न विचारून ती घटवावीं.

तिसांपर्यंत पाडे, पावकीं, व निमकीं झालीं म्हणजे हल्लींच्या नियमाप्रमाणें पहिली इयत्ता पुरी होते. यापुढील म्हणजे आळ्यांवरच्या उजळणी शिवाय बाकीची उजळणी दुसऱ्या इयत्तेंत शिकवावयाची आहे. ती देखील पूर्वींच्या पद्धतीनेंच शिकवावी. धडे देत बसण्याचें कारण नाहीं

तिसऱ्या इयत्तेकरितां शेर, मण, इत्यादि आळ्यांवरची उजळणी नेमलेली आहे. ह्या उजळणीचे धडे देण्याचें अगर वाचणी म्हणविण्याचें कांहीं कारण नाहीं. ती मांडण्याची त्या त्या उजळणीची विशेष प्रकारची मोड मुलांस समजावून सांगितल्यानें ती त्यांस लवकर येऊं लागेल. आळ्यांवरची उजळणी सर्व शिकवून झाल्यावर " १ खंडी ७ मण १० पा०," " १९ रुपये १४ आणे ६ पै," " २ शेर ३ छटाक, " इत्यादि ह्या

संख्या त्या त्या उजळणीच्या पद्धतीनें बिनचूक मांडितां येतील, इतकी मुलांची तयारी झाली पाहिजे.

---

## ३. अक्षर लिहिणें.

-:-०-:-

कोणत्या पद्धतीनें शिकविलें असतां अक्षर लवकर चांगलें होईल, ह्याबद्दल बराच मत भेद होईल असें वाटतें. तथापि स्वतः शिक्षकाचेंच अक्षर जर चांगलें असेल, तर त्याला मुलांचें अक्षर तयार करण्याच्या कामीं निःसंशय चांगलें यश येईल. चांगलें अक्षर म्हणजे कसें, लेखणी कशी असावी, ती धरावी कशी, हलक्या हातानें सफाईदार अक्षर कसें काढावें, इत्यादि गोष्टी त्याला चांगल्या अवगत असल्यामुळें, जरी त्यानें ह्या पद्धतीसंबंधानें विशेष विचार केला नसला तरी, त्याची शिक्षण-पद्धती स्वतः सिद्धच चांगली असते. अक्षर कसें शिकवावें ह्याबद्दल अशा म्हणजे चांगलें अक्षर लिहिणाऱ्या शिक्षकांचीं मतें जास्त उपयोगी पडतील.

अक्षर शिकवावयाचें तें प्रथम सोपीं अक्षरें शिकवून नंतर कठीण वळणाचीं शिकवीत गेल्यास चांगलें. परंतु हल्लींचे 'श्रीमंत' वळणाचे कित्ते अशा सोईचे नाहींत. पहिल्यानेंच 'श्री' 'त' 'स' 'गु' 'अ' 'ख', इत्यादि अशीं कठीण मोडी अक्षरें मुलांकडून तयार करण्यास फारच प्रयास पडतात. यापेक्षां सोपीं मोडी अक्षरें प्रथम कोणतीं शिकवावयाचीं तीं शोधून काढून तीं अगोदर शिकवूं लागल्यास जास्त हितावह होईल.

अक्षरें शिकविण्याचा क्रम ठरविल्यानंतर ह्यासंबंधीं पहिलें मुख्य काम म्हणजे मुलांस लेखणी चांगली धरावयास शिकवून अक्षरें काढविणें हें होय. मुलांच्या लेखण्या शिक्षकानें स्वतः करून देत जावें. लेखणीचा टांक मधोमध पिंजलेला व साफ तुटलेला असला तर अक्षर काढण्यास फार सुलभ जातें, ही गोष्ट सर्वांस माहीत आहेच. परंतु बहुतेक मुलांस लेखण्या अगदीं करितां येत नाहींत, आणि पुष्कळ शिक्षक स्वतः लेखण्या करण्याचा कंटाळा करितात व त्यामुळें मुलांचें अक्षर चांगलें होण्याच्या

कामीं आरंभींच मोठा व्यत्यय येतो. एकदां केलेली लेखणी किती तरी दिवसपर्यंत मुलगा तशीच वापरीत असतो. ती किती ही वाईट झाली तरी तिजकडे कोणी लक्ष देत नाहीं. वाईट लेखणीनें लिहिण्यापेक्षां मुलगा कांहीं वेळ रिकामा बसला तरी पुरवेल.

लेखणी चांगली असली म्हणजे पुढची विचार करण्यासारखी गोष्ट लेखणी चांगली धरणें ही होय. बहुतेक मुलांचीं अक्षरें वाईट असतात, ह्याचें एक मुख्य कारण, त्यांस लिहितांना लेखणी चांगली धरितां येत नाहीं, हें आहे. पुष्कळ मुलांस लेखणी उजव्या हाताकडे झुकती व उपडी अशी धरून लिहिण्याची संवय असते. अशी लेखणी धरून लिहिणें चुकीचें आहे. शिक्षकानें ह्या गोष्टीकडे विशेष लक्ष देऊन मुलांस चांगली लेखणी धरून लिहिण्याची संवय लावावी. प्रत्येक मुलाजवळ शिक्षकानें प्रथम कांहीं दिवसपर्यंत रोज बसून आपल्यासमक्ष त्याजकडून लिहवावें. व लेखणी कशी धरावयाची, हें त्यांस नीट समजावून द्यावें. लेखणी कशी धरावयाची हें एकदां त्याच्या चांगलें ध्यानांत आलें म्हणजे त्या कामांत त्याजकडून पुनः बहुधा हयगय होणार नाहीं. शिक्षकानें तिकडे वारंवार लक्ष मात्र देत असलें पाहिजे.

आतां अक्षरें शिकविण्याच्या संबंधानें विचार करावयाचा; अक्षर शिकविण्याचा वेळ म्हणजे विश्रांतीचा वेळ, असें पुष्कळ शिक्षक समजतात. लिहिण्याकरितां नेमलेल्या तासांत मुलांना खरडे लिहिण्याला बसविलें म्हणजे झालें. पुढें कित्ता असतोच, तो वाटेल तर पाहून त्याप्रमाणें येतील तशीं अक्षरें त्यांनीं काढावीं. विश्रांतीचा कंटाळाच आला, अगर अगदींच रिकामें बसणें चांगलें नाहीं असें मनाला वाटलें, तर एकादेवेळीं 'अक्षरें दाखवावयास आणा,' म्हणून मुलांस हुकूम सुटावयाचा, व मग मुलांनीं वाटेल तीं अक्षरें दाखवावयास आणावीं, व शिक्षकानें आपल्या लहरीप्रमाणें त्याखालीं तीं अक्षरें पुनः काढून दाखवावीं, म्हणजे आटपलें. खरोखरी अशीच पद्धती फार चालू आहे. आणि अशा पद्धतीच्या योगानें मुलांचीं अक्षरें सुधारलीं नाहींत, अगर जास्ती बिघडलीं तर त्यांत आश्चर्य तरी कसचें !

घळणदार अक्षर म्हणजे कसें, ह्याबद्दल शिक्षकानें विचार केलेला असला पाहिजे. ही माहिती त्याला असली तर मुलगा अक्षर दाखविण्यास आला असतां त्याच्या अक्षरांत दोष काय आहे, कोणचे भाग कसे असले पाहिजेत, ह्या गोष्टी त्याला स्पष्टपणें सांगतां येतील. अमुक अक्षर वाईट आहे, मध्यम आहे, किंवा चांगलें आहे, असें मोघमपणें पुष्कळ सांगूं शकतील. परंतु त्यांत दोष कोणते आहेत, व सुधारणा कोणत्या केल्या पाहिजेत, ह्या गोष्टींवर स्पष्ट खुलासा पूर्वी विचार केलेला असल्याशिवाय एकदम सहसा करितां येणार नाहीं. या करितां शिक्षकानें ह्या संबंधानें सर्व अक्षरांबद्दल स्वतः तरी विचार करून ठेविला पाहिजे, किंवा अशा गोष्टींचा ज्यांत विचार केलेला असेल, असें एखादें पुस्तक तरी चांगलें अवगत करून घेतलें पाहिजे. ह्या विषयावर हल्लीं निरनिराळ्या तऱ्हेचीं पुस्तकें निघत आहेत, ही फार सोईची गोष्ट झाली आहे. प्रत्येक शिक्षकानें असलें एखादें पुस्तक आपल्याजवळ जरूर बाळगावें. त्याचा त्याला फार उपयोग होईल. पण ज्यांचें स्वतांचें अक्षर बरें असतें अशा पुष्कळ शिक्षकांना अशीं पुस्तकें जवळ बाळगण्याची इच्छा होत नाहीं, इतकेंच नव्हे, परंतु आंगीं असलेल्या ह्या गुणाची आपल्यामध्यें परिपूर्णता आहे असें वाटूनच कीं काय, सहजगत्या असें एखादें पुस्तक त्यांच्या हातीं गेलें, तर तें वाचण्यांत त्यांना कमीपणाच वाटूं लागतो, अथवा तें वाचून पाहण्यासारखें त्यांत कांहीं विशेष असेल, असें त्यांस वाटत नाहीं. मला वाटतें, कोणतीही एखादी कला आपल्याला पूर्णपणें अवगत आहे, दुसऱ्यापासून घेण्यासारखें तींत कांहीं राहिलें नाहीं, असें शिक्षकास वाटणें सर्वथा अनिष्ट आहे.

अगदीं आरंभीं अक्षर शिकवितांना सर्व वर्गाला एक एक अक्षर एकदम शिकवूं लागावें. पुष्कळ अक्षरें एकदम शिकविण्याला अडचण पडते व मुलांस ही तशानें नीट कळत नाहीं. जें अक्षर शिकवावयाचें असेल तें शिक्षकानें फळयावर खडूनें काढून दाखवावें, व तें कसें काढावयाचें ह्याबद्दलच्या ज्या विशेष गोष्टी असतील, त्या मुलांस सांगाव्या. नंतर तें अक्षर मुलांस स्लेटींवर


काढावयास सांगावें. स्लेटीवरचें अक्षर पाहून तें किती चुकलें आहे हें ज्याचें त्यास सांगावें, व त्यांनीं जें अक्षर काढिलें असेल तें न पुसतां त्यांतच तें गिरवून सुधारून दाखवावें. असें केल्यानें आपलें चुकलें आहे कोठें, व तें कसें नीट केलें पाहिजे, हें त्यांना लवकर व स्पष्ट कळूं लागेल. मुलांनीं अक्षर काढिलें असेल त्याच्याच खालीं दुसरी ओळ काढून आपण चांगलें अक्षर काढून दिलें, तरी त्या योगानें मुलांची समजूत चांगली होणार नाहीं. याकरितां निदान पहिल्यानें बरेच दिवसपर्यंत मुलांनीं काढिलेल्या अक्षरांतच वळण सुधारून दाखविणें जास्त हितावह आहे. दोन किंवा तीन अक्षरें अशा रीतीनें स्लेटीवर तयार झालीं म्हणजे तींच अक्षरें कागदावर शाईनें काढावयास सांगावें. कागदावर अक्षरें काढितांना लेखणी चांगली धरितां आली पाहिजे ह्या गोष्टीकडे अगदीं दुर्लक्ष होतां कामा नये. जें अक्षर शिकवावयाचें तें फळ्यावर काढून ठेवावें. नंतर शिक्षकानें प्रत्येक मुलांजवळ बसून त्याजकडून तें आपल्या समक्ष काढवावें; व चुकत असेल तेथें आपल्या हातानें त्याचा हात धरून त्याजकडून तें नीट करावें. ह्यावेळीं तो कोठें काय चुकत आहे, हे नीट समजावून द्यावें. म्हणजे त्या अक्षराचें चांगलें वळण कोणतें तें बहुतेक त्याच्या मनावर बिंबल्यासारखें होईल. एका ओळीचीं अक्षरें अशा रीतीनें तयार झालीं म्हणजे अक्षरांचें तें चांगले वळण मुलांच्या हातांस बसण्याकरितां कित्यावर पातळ कागद ठेवून ती एकच ओळ शाईनें छापल्याप्रमाणें लिहिण्याची वहिवाट कांहीं दिवसपर्यंत ठेवावी. मात्र केवळ छापण्यावरच सर्वथा अवलंबून राहूं नये. लिहिण्याच्या तासांपैकीं कांहीं वेळ याप्रमाणें छापवून बाकीच्या वेळांत तीच ओळ कागदावर स्वतंत्रपणें लिहवावी. ह्या रीतीनें ओळ लिहवीत असतां सर्व अक्षरें सारखीं लिहविण्याकडे लक्ष असलें पाहिजे. कांहीं दिवसपर्यंत कोऱ्या कागदाखालीं अक्षरांची लांबी किती असावी हें दाखविणाऱ्या दोन ओळी आंखलेला कागद धरण्याला दिला तर फार उपयोग होईल. किंवा दोन ओळींमध्यें लिहवावें म्हणजे अक्षरें लहान मोठीं येणार नाहींत. बरीच संवय झाल्यानंतर ह्या ओळी आंखलेल्या

# विक्रीस तयार

लांगमनचे मोडी किते नंबर १–२–३–४ बरहुकूम लाइन पेपर आम्ही तयार केले आहेत. लहान मुलांस कित्त्याखालीं दिलेल्या दोन किंवा तीन रेघांवरून वळण झळविलें असतां नीट हात बसत नाहीं सबब आम्हीं मुद्दाम हे रेघांचे कागद तयार केले आहेत.

दर ०॥ कागद ८.

म्या० चि० शा० प्रे० पुणें.



म्यानेजर चि० शा० प्रे० पुणें.



## अशी संधी कधींच आली नव्हती!

### सबंध महाभारतासारखा राष्ट्रीय ग्रंथ अवघ्या ८ रुपयांला!

महाभारताचें सरळ व सुबोध गोष्टींच्या रूपानें भाषांतर.

# भारतामृत.

दोन भागांत संपूर्ण. भाग पहिला छापून तयार आहे. पृष्ठें ८५०.

## उद्योगपर्व अखेर.

महाभारतापैकीं सर्वांत मोठे व महत्त्वाचे पर्व यांत आहेत. एवढ्याची किंमत रु ४॥. ट. ख. ।= लायब्ररीच्या सोयीकरितां कापडी जाड पुठ्याचें बाइंडिंग. किंमत ५॥.

पुढील सर्व पर्वे एका भागांत येत्या मार्च अखेरपर्यंत छापून काढण्याचा विचार आहे. दोन्हीं भागाकरितां आज पैसे भरणारांना दोन्ही भागाची किंमत ८ रुपये शिवाय ट. ह. ॥= पडेल.

ज्यांनीं आदिपर्व व सभापर्व यापूर्वी घेतले नसतील त्यांना पुढील तीन भागांची किं. ३ रुपये पडेल आगष्ट अखेरपर्यंतच्या ग्राहकांस टपाल हशील पडणार नाहीं.

गोखले यांचा वाडा ६३९, सदाशिव पेठ पूना सिटी. — त्र्यं. त्रिंबक द्रवीड. संपादक विद्याविनोद.



# जाहीरखबर.
## पुणें ट्रेनिंग कॉलेजाची
### प्रवेश–परीक्षा.

———=०:*:०=———

१. पुणें ट्रेनिंग कालेजांत पाठविण्याकरितां जिल्ह्यांच्या डे. ए. इन्स्पेक्टर साहेबांनीं निवडलेल्या उमेदवारांची प्रवेश-परीक्षा चालू सालीं गुरुवार तारीख ५ दिसेंबर सन् १९०१ इसवी रोजीं सुरू होईल. तर त्या दिवशीं सकाळीं मद्रास ११ वाजतां उमेदवारांनीं पुणें ट्रेनिंग कॉलेजांत हजर व्हावें. या खेपेस सुमारें ६० इसम नवीन घ्यावयाचे आहेत.

२. परीक्षा सहाव्या इयत्तेच्या विषयांत होईल. शुद्धलेखन आणि अक्षर यांकडे विशेष लक्ष दिलें जाईल.

३. उमेदवारांत दृष्टी, वर्णोच्चार इत्यादिकांसंबंधें व्यंग नसावें. व्यंग असल्यास अशा उमेदवारांस घेतलें जाणार नाहीं.

४. उमेदवारांनीं आपल्याबरोबर चांगल्या वर्तणुकीबद्दल आपल्या हेडमास्तरांचा दाखला आणावा, आणि पब्लिक सर्व्हिस परीक्षा पास झाल्याचें सर्टिफिकीटही आणावें. हे दाखले आणण्यास चुकूं नये.

५. आंगांतील कपडे व आंथरूण पांघरूण अशीं बरोबर आणावयाचीं; त्यांत आंगाबरोबर घालावयास दोन गरम कपडे, एक जाड पासोडी व कांबळा इतकीं जरूर आणावीं.

६. त्याप्रमाणेंच पुस्तकें आणावयाचीं त्यांत पुढें लिहिलेलीं पुस्तकें अवश्य असावीं. बालबोध पुस्तकें १ ते ४. मोडी पुस्तकें १ ते ३. हिंदुस्थानचा इतिहास—मुंबई इलाखा, हिंदुस्थान व पृथ्वी यांचीं वर्णनें.

७. वर सांगितलेल्या पुस्तकांशिवाय इतर पुस्तकें व चित्रकलेचें सामान वगैरे घेण्याकरितां प्रत्येक इसमानें परीक्षेच्या समयीं १० रुपये डिपाझिट ठेविले पाहिजेत. ज्यास कालेजांत घेतलें जाणार नाहीं, त्या इसमाचें डिपाझिट परत केलें जाईल.

पुणें, ट्रेनिंग कालेज,
ता. १३ माहे जुलई सन १९०१ इ०

*K. G. KELKAR.*
प्रिन्सिपल पुणें ट्रेनिंग कॉलेज.

## विक्रीस तयार. किं. १२ आणे.

मेहेरबान लिन्हारनर साहेब यांनीं इंग्रजींत लिहिलेले सिटीझन आफ इंडिया या पुस्तकांचे मराठी भाषांतर छापवून विक्रीस तयार आहे. व हे बुक डा. आ. प. ई. यांनीं मराठी ५।६ यत्तकरितां नेमले आहे.

म्याकमिलन आणि कंपनी.
१२ ब्यॉक स्ट्री. मुंबई.

**सृष्टिज्ञानः**—म ६ व्या य. क. यांत ग्रहणें, भरती ओहोटी, हवा, राज्यव्यवस्था इ० माहिती आहे. किं. २॥ आणे ट. ख. ४ प्रतीस ८८६.

**अंकगणित प्र. स.:**—यांत अंकग. भाग २ यांतील ट्रेनिंगचे व प. स. परिक्षेचे प्रश्न रीतीसह दिले आहेत. किं. ४ आणे ट. ख. ८८६.

आगष्ट १९०१ अखेरपर्यंत पहिलें ८१८६ व दुसरें निमे किंमतीस मिळेल ट ख. व व्हा. पे. चार्ज पडेल. पुढें भर किंमतीवर शेंकडा २५ टक्के कमिशन.

मु. मालगुंड ता. व जि. रत्नागिरी. **गोपाळ यज्ञेश्वर भिडे.**

---

## चित्रलेखन मूलतत्व (पुस्तक पहिलें)

सतत पंचवीस वर्षे ड्रॉइंग शिकविण्याच्या अनुभवावरून ज्या ज्या गोष्टी विद्यार्थ्यांस प्रथम शिकविणें अवश्य वाटलें त्या सर्व शास्त्रीय नियमानें पद्धतशीर बसवून हें पुस्तक तयार केलें आहे. पुस्तकाची किंमत प्रथम सहा आणे ठेविली होती. परंतु कलेचें शिक्षण व अभिरुची आपले देशांत जितकी असावी तितकी नसल्या कारणानें व त्याचा प्रसार फार व्हावा व विद्यार्थ्यांस घेण्यास सुलभ जावें करितां याची किंमत अगदींच कमी म्हणजे फक्त अडीच आणे केली आहे. अशा तऱ्हेचें हें मराठींत पहिलेंच पुस्तक आहे. तेव्हां सर्वांनीं याचा उपयोग करून घ्यावा अशी आमची शिफारस आहे.

हें पुस्तक मे. विद्याखात्याचे डायरेक्टर सा. बा. यांनीं मराठी शाळांकरितां व मराठी शाळाचे लायब्ररीयां करितां आपलें मेमो नंबर ६०९४ तारीख १. १२. १९०० मध्यें पास केलें आहे. कळावें.

म्यानेजर चित्रशाळा छापखाना,
पुणें सिटी.

---

प्रकाशक—शंकर नरहर जोशी.

Registered No B 179

पुस्तक १२. ॥ श्री ॥ अंक ८.

# मराठी शालापत्रक.

# MARATHI SCHOOL PAPER

आगष्ट १९०१.

## विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| प्रतिमासिक स्फुट विचार. .... .... .... | १८९ |
| लांगमनच्या मोडी पुस्त्यांच्या वह्या—या नवीन व्यवस्थेपासून फायदा काय—एक सूचना—प्राथमिक शिक्षकांची योग्यता— | |
| कै० म० गो० रानडे यांविषयीं प्रिन्सिपल सेल्बी यांचे विचार. | १९१ |
| शिक्षकांस हितगुज. .... .... .... | १९७ |
| मेहेरबान डायरेक्टर ऑफ् पब्लिक इनस्ट्रकशन साहेब बहादूर यांनीं मंजूर केलेल्या पुस्तकांची ता० १ मे १९०१ पर्यंत दुरुस्त केलेली यादी. .... .... .... | १९९ |


' चित्रशाळा ' प्रेस, पुणें.

आगाऊ वार्षिक वर्गणी, टपालखर्चासह रु० १८३.

फुटकळ अंकास ८३.

रा. भि. जोशीकृत.
## बालबोध मराठी व्याकरण.
याची पुष्कळ जास्त माहिती घालून सुधारलेली दुसरी आवृत्ती.
चित्रशाळेंत विक्रीस तयार आहे. पृष्ठसंख्या १८०.
किंमत ८५ आणे ट० ख० ८१

---

# जाहीरखबर.
## पुणें ट्रेनिंग कॉलेजाची
### सर्टिफिकेट—परीक्षा.

चालू सालीं पुणें ट्रेनिंग कॉलेजाची सार्टीफिकेट—परीक्षा मंगळवार तारीख १ आक्टोबर सन १९०१ इ० रोजीं सकाळीं मद्रास १० वाजतां सुरू होईल. कळावें, तारीख १३ माहे जुलई सन १९०१ इ०.

*K. G. KELKAR.*
प्रिन्सिपल, पुणें ट्रेनिंग कॉलेज.

# जाहिरात.
## पुणें ट्रेनिंग कॉलेजाची
### ड्रांइंगची परीक्षा.

जाहीर करण्यांत येतें कीं—मुंबई येथील स्कूल ऑफ् आर्ट कडून ट्रेनिंग कॉलेजा कारितां होणारी "फर्स्ट ग्रेड ड्राइंग" ची परीक्षा सोमवार तारीख ७ माहे आक्टोबर सन १९०१ इ० रोजीं सकाळीं ९ वाजतां पुणें येथें हायस्कुलांत सुरू होईल. तरी ज्या मास्तरांस सदर परीक्षेस बसावयाचें असेल त्यांनीं आपले अर्ज तारीख १ सप्टेंबर सन १९०१ इ० रोजीं किंवा त्यापूर्वीं आम्हांकडे पोंचतील असे पाठवावे. अर्ज पुढें आल्यास घेतले जाणार नांहींत. अर्ज आमच्या नांवचे असावे. व त्यांत अर्जदार सदर परीक्षेस पूर्वीं बसला असल्यास तो कोणत्या सालच्या कोणत्या महिन्यांत बसला व कोणत्या विषयांत पास झाला हें त्यानें स्पष्ट लिहावें. त्यानें आपलें वय व जात हीं अर्जांत नमूद करावीं. कळावें,

पुणें, ट्रेनिंग कॉलेज.
ता. १३ जुलई सन १९०१ इ.

*K. G. KELKAR.*
प्रिन्सिपल, पुणें ट्रेनिंग कॉलेज.

# शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यांसी । हें अवघें सद्गुरूपाशीं।
सद्गुरू पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळ जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १५ आगष्ट १९०१. अंक ८.

## प्रतिमासिक स्फुट विचार.

लांगमनच्या मोडी पुस्त्यांच्या वह्या

मोडी लेखनासाठीं अलीकडे लांगमन या नांवाच्या एका युरोपियन कंपनीनें वह्या तयार केल्या आहेत; व त्या मेहेरबान डायरेक्टर साहेब यांनीं पसंत करून, साऱ्या वर्षभर त्यांचेवरच पुस्त्या काढाव्या असें ठरविलें आहे. या संबंधानें लोकांमध्यें बराचसा गैरसमज उत्पन्न झालेला दिसतो. हा गैरसमज आमच्या मतें उगाच आहे. मोडी अक्षराची पुस्ती लिहावयाची असते त्या प्रमाणेंच अक्षर घटवावयाचें असतें. हें अक्षर घटविणें जर ह्या वह्यांवर कोणी करूं लागेल, तर वह्या जास्त लागून खर्च फार होईल. पण तसा मुळींच उद्देश नाहीं, व तसा शाळाखात्याच्या अधिकाऱ्यांचा हुकूम ही नाहीं. परीक्षकांस चांगल्या काढलेल्या पुस्त्या दाखवावयाच्या, त्या मात्र या नवीन वह्यांत दाखवाव्या. परंतु नेहमीं लिहिणें ते त्या वह्यांमध्यें ज्या रीतीनें कागद आंखलेले असतात, तसे आखून घेऊन त्यावर लिहावें. हे कागद साधे पातळ चालतील, व ते घरचे घरीं आंखून घेण्यास चिंता नाहीं. अथवा आंखलेले कागद बाजारांत विकत ही मिळतात, ते ज्यांस परवडतील त्यांनीं घ्यावे. हे कागद फारसे महाग नाहींत. लांगमनची वही साऱ्या वर्षांत एक घेतली कीं बस्स होईल. आतां लांगमनच्या वह्या थोड्या महाग आहेत

हें खरें. पण त्या एकदां चोहींकडे सुरू झाल्या कीं कंपनीला त्या यापेक्षां स्वस्त देण्यास परवडतील. तसेंच आजपर्यंत चालत आलेल्या पद्धतीप्रमाणें साध्या कागदांवर रोज खर्डे लिहिण्यासही कांहीं हरकत आहे असें आम्हांस वाटत नाहीं. मात्र या नवीन वह्यींतल्या ओळी हा कित्ता, म्हणून मुलांनीं पुढें ठेवावयाचा. आतां थोड्याशा गैरसमजामुळें ही तक्रार जास्त उत्पन्न झाली आहे. कित्येक लोकांची समजूत अशी झालेली दिसते, कीं मुलांनी अक्षर घटविण्यास म्हणजे खरडे लिहिण्यास सुद्धां याच वह्यांचा उपयोग करावा, म्हणजे त्याच्यावरच लिहावें असें मे० डायरेक्टरसाहेब यांनीं ठरविलें आहे. तर तसें मुळींच नाहीं. तशी कोणाची समजूत झाली असल्यास, किंवा तशी समजूत कोणी करीत असल्यास ती अगदीं चुकीची आहे. फक्त चांगल्या किंवा परिक्षेच्या पुस्त्या या वह्यांवर लिहावयाच्या आहेत. प्रत्येक इयत्तेमध्ये 'मोडी पुस्त्यांची भरलेली वही दाखवावी' असें लिहिलेलें आहे. या रीतीनें वर्षाला लांगमनची एक वही पुरेल. हल्लीं कोणचा तरी छापी कित्ता विकत घ्यावा व त्याच्या साह्यानें लिहावें असा जो अव्यवस्थित प्रकार चालला आहे, त्यापेक्षां हा सर्व शाळांना एक असा ठरींव कित्ता घेऊन सर्वत्र एकच व्यवस्था असणें हें सर्व प्रकारें हितावह आहे. तेव्हां अशा प्रकारें सयुक्तिकरीत्या ही तक्रार शिक्षक लोकांस मोडतां येणार आहे. मुलांनी परीक्षेच्या पुस्त्या लांगमनच्या वहींत लिहावयाच्या व नेहमीं अक्षर घटविण्यासाठीं तशा प्रकारचे कागद म्हणजे खरडे आंखून त्यांच्यावर लिहावयाचें, एवढाच या नवीन व्यवस्थेचा मुख्य उद्देश आहे.

---

*या नवीन व्यवस्थे- पासून फायदा काय?*

कोणची ही नवीन व्यवस्था सुरू झाली, कीं 'या नवीन व्यवस्थे पासून काय फायदा?' 'जुनें होतें तें काय वाईट होतें?' अशा प्रकारचे प्रश्न नेहमीं उत्पन्न होत आसतात. तशाच प्रकारचा प्रश्न सध्या या बाबतींत ही उत्पन्न झा-

ला आहे, व तक्रारीचें कारण अंशतः हें ही आहे. मोडी अक्षर हें कित्या प्रमाणें पाहून लिहावें, अशी पद्धत आहे; व तें लिहिण्याचीं निरनिराळीं वळणें आहेत. हीं वळणें जुन्या काळीं—विशेषतः पेशवाईंत—जे कित्येक नामांकित लिहिणारे होऊन गेले, त्यांनीं घालून दिलेलीं आहेत. अगदीं अलीकडलें मोडी अक्षराचें उत्तम वळण घालून देणारे गृहस्थ कै० बंडोपंत रानडे हे होत. हीं वळणें प्रत्यक्ष ज्यांनीं काढलीं, त्यांना होऊन गेल्यास पुष्कळ वर्षें होऊन गेलीं. तेव्हां सध्या बिवलकरी, बंडोपंती किंवा जनोबाभट्टी वळण म्हणजे केवळ मूळच्या वळणांच्या नकला होत. खरें मुळचें वळण आतां राहिलें नाहीं. शाळाखात्यानें इतर विषयांप्रमाणें मोडीलेखन या विषयाची सर्व शाळांना एक अशी व्यवस्था करण्याचें ठरविलें. परंतु सर्व शाळांना एक कित्ता असें अजूनपर्यंत केलें नव्हतें. यामुळें ज्यानें जसें वाटेल तसें लिहावें असा प्रकार चालला होता. अशी अव्यवस्था असणें चांगलें किंवा असली तरी चालेल असें कोणी ही कधीं म्हणणार नाहीं. यासाठीं डायरेक्टर साहेब यांनीं इंग्रजी कापी बुकांप्रमाणें वह्या करण्याचें मनांत आणिलें व मासल्याकरितां वह्यांचे नमुने मागितले. त्यांतला जो नमुना एतद्देशीय अनुभविक गृहस्थांचे सल्ल्यानें पसंत झाला, त्याप्रमाणें ह्या नवीन वह्या तयार केल्या आहेत. या छापून तयार करण्याचें काम 'लागमनस्' या कंपनीनें केलें आहे. मूळचें वळण एतद्देशीय गृहस्थाचेंच आहे. तेव्हां यांतला उद्देश सर्व शाळांतून एकच प्रकारची मोडी अक्षर लिहिण्याची तऱ्हा असावी, हा आहे. वाचन, व्याकरण, गणीत, भूगोल, इतिहास वगैरे विषयांत जशीं नियमित पुस्तकें व्यवस्थेकरितां लावलेलीं असतात, त्यांतलाच हाही प्रकार आहे. आतां ह्या विषयांत सुद्धां जशीं निरनिराळीं चांगलीं पुस्तकें पसंत करून नेमलेलीं असतात, त्याप्रमाणें असल्या दुसऱ्या वह्या ही अशाच रीतीनें कोणीं चांगल्याशा तयार केल्या, तर त्याही चालविण्यास परवानगी मिळणार नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं. सध्या या विषयाची एकंदर दुसऱ्या विषयांप्रमाणेंच नीट ठरीव व्यवस्था झाली, हें चांगलें झालें; व हें को-

णत्याही प्रकारें अयोग्य नाहीं. ह्या वह्यांची किंमत थोडी कमी झाल्यानें गरीब लोकांची सोय होणार आहे. हें योग्य मुदतीनंतर होण्यास अडचण येईल असें वाटत नाहीं. कारण शाळेंत चालणाऱ्या सर्व पुस्तकांची किंमत नेहमींच पुष्कळ कमी असते.

---

एक सूचना

मोडी पुस्त्यांच्या या नवीन वह्या सुरू होऊन लेखनाची तऱ्हा सुव्यास्थित झाली, त्याचप्रमाणें मोडीच्या संबंधाची आणखी ही एक व्यवस्था व्हावयास पाहिजे आहे. ती कोणची, तर मोडीमध्यें ऱ्हस्वदीर्घादिकांची रीत घालणें. मोडी लिपी लिहिण्याचा प्रघात पूर्वीसारखा आतां नाहीं. कारण सध्या पुष्कळ व्यवहार छापी अक्षरांनीं चालतो व तीं बाळबोध असतात. परंतु लोकांना नेहमीं लिहिण्यासाठीं कोणची तरी लिपी पाहिजेच. सध्या असा प्रकार झाला आहे, कीं मोडी लिपींत ऱ्हस्वदीर्घादी शुद्धाशुद्धतेची व्यवस्था नाहीं, म्हणून पुष्कळांस बाळबोध लिहावें लागतें. या लिहिण्यास वेळ बराच जास्त लागतो, तेव्हां मोडीस सुद्धां ऱ्हस्वदीर्घांची पद्धत लाविली, कीं इंग्रजी भाषेस जशी छापण्याची रोमन लिपी असून जलदीनें लिहिण्याची इंग्रजी अक्षरांची लिपी आहे, तसाच प्रकार मराठीच्या संबंधानें ही होईल. मोडींत ऱ्हस्वदीर्घांचा भेद उत्तम प्रकारें दाखवितां येतो. याविषयीं मागें शालापत्रकांत विस्तृत लेख आलेले आहेत. मोडींत ऱ्हस्वदीर्घाकडे नजर दिल्यास लिहिण्यास वेळ फार लागेल, असें कित्येक म्हणतात. पण शालापत्रकांतली पद्धत पाहिली असतां असें दिसून येईल कीं तशा पद्धतीनें शुद्ध रीतीनें मोडी लिहिण्यास फारसा जास्त वेळ लागत नाहीं. झरझर लिहिण्याचा जो मोडीचा गूण तो कायमच राहतो. जो थोडा जास्त वेळ लागतो, तो मोडींत शुद्धशुद्ध साधतें या दृष्टीनें मुळींच लक्षांत घेण्यासारखा नाहीं. मोडींत शुद्धाशुद्ध लिहिण्याची व्यवस्था जर केली नाहीं तर मोडी लिपी लिहिण्यास उपयोगीं नाहीं म्हणून मुळींच नष्ट होऊन जाणार आहे. आजच नवीन सुशिक्षितांपैकीं पुष्कळांना मोडी मुळींच लिहितां येत नाहीं अशी स्थिती झालेली

आहे. त्याच प्रमाणें गेल्या वर्षी शिक्षणसभेंत 'मोडी मुळींच नको' असे उद्गार निघालेले सर्वांस आठवत असतीलच तेव्हां शाळा-खात्यानें मोडी अक्षर वळविण्याच्या संबंधानें सुव्यवस्था करण्याची जशी तजवीज केली, त्याच प्रमाणें त्याच्या शुद्धाशुद्धतेच्या संबंधानें ही व्यवस्था करण्याची तजवीज करावी. सध्याचीं जीं मोडी पुस्तकें आहेत, त्यांत शुद्धशुद्धतेची पद्धत घातली म्हणजे झालें. या संबंधानें फक्त दोन प्रकार करावयास पाहिजे आहेत;—एक मोडींत ऱ्हस्व व दीर्घ हा भेद दाखविण्याची व्यवस्था करणें; व दुसरा सध्या शब्द एका मागून एक जोडून लिहितात तसे न लिहितां तोडून लिहिणें. हा दुसरा प्रकार सध्याच्या मोडी पुस्तकांत घेतलेलाच आहे. पहिला तेवढा घेतला म्हणजे झालें. या आमच्या सूचनेप्रमाणें कांहीं व्यवस्था होईल तर फार चांगलें होईल. पुणें ट्रेनिंग कालेजांत या पद्धतीचा प्रथमतः अनुभव घेतां येईल. तर रा० सा० प्रिन्सिपाल यांनीं आपल्या विद्यार्थ्यांस आपलीं परीक्षेमधील उत्तरें अशा रीतीनें मोडींत लिहिण्यास सांगून एवढा अनुभव घेऊन पाहावा, अशी त्यांस आमची विनंती आहे.

---

प्राथमिक शिक्षकांची योग्यता.

**मद्रास इलाख्याचे डायरेक्टर** यांचा वार्षिक रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्यें प्राथमिक शिक्षकांच्या योग्यतेच्या संबंधानें पुढील अर्थाचे उद्गार आहेतः—" प्राथमिक शाळांच्या शिक्षकांची योग्यता वाढविण्यासाठीं अजून पुष्कळ करावयास पाहिजे आहे. त्यांची शिक्षणपद्धती अजून पुष्कळ चांगल्या तऱ्हेची झाली पाहिजे. कोणीही मनुष्य थोडेसें शिकलेला असला कीं तो प्राथमिक शिक्षण देण्यास योग्य होतो, ही समजूत जगदीं चुकीची आहे. मनुष्याचा पुढें जो कांहीं स्वभाव बराबाईट बनावयाचा, याचा पाया बाळपणांत पडावयाचा असतो; त्यामुळें बाळपणचें म्हणजे प्राथमिक शिक्षण फार महत्वाचे मानिलेलें आहे. विचार आणि वृत्ती यांना लहानपणीं भलतेंच वळण लागलें असतां तीं माणसें पुढें वाईट

निपजून दुष्परिणाम होतील. सगळ्या शिक्षकांना बाळपणाचें मानसशास्त्र शिकवावें, अशी व्यवस्था करणें सध्याचे स्थितींत शक्य नाहीं हें खरें. परंतु तयार होणारे शिक्षक उत्तरोत्तर याहून जास्त योग्यतेचे तयार झाले पाहिजेत, असा हेतू मनांत बाळगण्यास मुळींच हरकत नाहीं. बालोद्यान-शिक्षणपद्धती व वस्तुदर्शनपद्धती यांना शिक्षणक्रमांत स्थळ मिळून त्या पद्धतीनें शिकविण्यास शिक्षकलोक बरेच जास्त योग्यतेचे पाहिजेत. शिक्षणसंबंधानें वर्तमानपत्रांतून व शिक्षणसभांमधून अशा सूचना होत आहेत, कीं शिक्षकांना पगार फार थोडा असतो, यामुळें चांगल्या योग्यतेचीं माणसें शिक्षक होण्यास मिळत नाहींत; यासाठीं शिक्षकांचा पगार वाढविण्याची तजवीज लौकर झाली पाहिजे. हें खरें आहे, कीं सध्या आपल्यास ज्या योग्यतेचे शिक्षक पाहिजे आहेत, त्या योग्यतेच्या मानानें पाहिलें तर दरमहा पांचांपासून आठांपर्यंत पगार म्हणजे फार थोडा आहे. जास्त योग्यतेचे शिक्षक जर पाहिजे आहेत, तर त्यांना पगारही जास्त दिला पाहिजे हें निर्विवाद आहे. असें होण्यास शाळाखात्याकडे सरकारानें जास्त पैसा दिला पाहिजे. तो देण्याची जोंपर्यंत सवड होणार नाहीं, तोंपर्यंत प्राथमिक शिक्षणाची स्थिती सुधारण्याची आशा बाळगणें व्यर्थ आहे." या उद्गारांवर आमचे बंधू गुजराथ शालापत्रककार म्हणतात:—

" मद्रास इलाख्याचे संबंधानें वर जें म्हटलें आहे, तें आमच्या इकडे ही बऱ्याच बाबतींत लागू आहे. थोड्या दिवसांमागें शिक्षकांचा पगार सात रुपयांच्या आंत नसावा, असा ठराव करण्यांत आला आहे. पण हा पगार ही फारच कमी आहे. आम्हांस असें वाटतें कीं कोणत्याहीं असिस्टंट मास्तरास दाहा रुपयांचे आंत पगार असूं नये, व मुख्य मास्तरास पंधरा रुपयांचे आंत असूं नये. त्याच प्रमाणें होईल तितकें करून सर्व शिक्षक ट्रेन्ड असावे. नवीन इयत्ता ज्या व्हावयाच्या आहेत, त्यांमध्यें बालोद्यान-शिक्षणपद्धती, पदार्थपाठ, शेती, ड्राईंग वगैरे विषय दाखल व्हावयाचे आहेत. तेव्हां ते उत्तम रीतीनें शिकवितां येण्यास

शिक्षकही चांगल्या प्रकारें तयार केलेले असले पाहिजेत." हे आमच्या बंधूंचे विचार आम्हांस सर्वप्रकारें मान्य आहेत. सर्व शिक्षणाचा अत्यंत महत्वाचा भाग प्राथमिक शिक्षण हा आहे. तें उत्तम रीतीनें दिल्यानेंच भावी सुशिक्षणाचा पाया भक्कम होणार आहे. आम्हीं वारंवार असें म्हटलें आहे, कीं मध्यम प्रतीचें व उच्च शिक्षण हीं मनुष्यास उद्योगधंद्यास लागण्यासाठीं व पैसे मिळविण्यासाठीं आहेत. त्यांची व्यवस्था प्रत्येकजण आपली आपण पाहीलच. परंतु प्राथमिक शिक्षण हें सर्व प्रजेस फार जरूरीचें आहे. यासाठीं सरकारचें लक्ष मुख्यतः या शिक्षणाकडेसच नेहमीं विशेष असलें पाहिजे.

---

## कै० महादेव गोविंद रानडे यांविषयीं प्रिन्सिपल सेल्बी यांचे विचार.

कै० रानडे यांचें स्मारक करण्याच्या विचारासाठीं पुण्यास जी सभा झाली होती, त्या सभेंत डेक्कन कालेजचे प्रिन्सिपाल सेल्बी यांचें फार मनोवेधक भाषण झालें. तें आमच्या वाचकांसाठीं मराठींत पुढें देतों. गुणवानाचे गूण गुणवानच वर्णूं शकतो. ह्याप्रमाणें कै० रानडे यांचे गूण प्रि० सेल्बी यांच्या तोंडून आल्यामुळें ते अक्षरशः यथार्थ होत. तसेंच त्यांनीं हें गुणवर्णन अशा रीतीनें केलें आहे, कीं तें वाचून प्रत्येकास त्याचें मनन करण्याची इच्छा उत्पन्न व्हावी. आणखी प्रि० सेल्बी यांनीं रानडे यांच्या गुणांची पाश्चिमात्य थोर पुरुषांच्या गुणांशीं तुलना केली आहे. यामुळें त्याचें भाषण फार चिंतनीय झालें आहे.

" तुमच्यापैकीं पुष्कळांचा रानडे यांशीं जसा निकट संबंध होता, तसा माझा होता असें मला म्हणतां यावयाचें नाहीं हें उघडच आहे. परंतु समानकर्तव्य व एक हेतू यांमुळें ज्याच्याशीं आपला वारंवार संबंध येतो व मनें संलग्न होतात अशाची व आपली जेवढी ओळख असते, तेवढी रानडे यांची आणि माझी पुष्कळ वर्षांपासून ओळख होती. मला

वाटतें, रानडे कसे होते, ह्याविषयीं आपणास यथातथ्य कल्पना करणें असेल, तर प्लेटोनें तत्ववेत्याचें जें वर्णन केलें आहे, तें या पुरुषास लाविलें असतां चांगल्या प्रकारें शोभेल. प्लेटोचा श्रेष्ठ पुरुष म्हणजे ज्याचें बुद्धिसामर्थ्य विशाळ आहे, किंवा सामान्य जन ज्या गोष्टींत मूढ असतात त्यांत जो निष्णात आहे, तोच केवळ नव्हे, तर, ज्याच्यामध्यें मुनी, संत आणि देशभक्त यांचे गुण एकवटलेले आहेत असा पुरुष होय.

"कै० रानडे यांचें ज्ञान निःसंशय अगाध होतें. परंतु त्यांना जे पाहात, त्यांस त्याचें जें कौतुक वाटे तें त्यांच्या थोर ज्ञानाचें वाटत नसे, तर त्या अगाध ज्ञानाचा त्यांना योग्य प्रसंगीं कसा उपयोग करितां येई, व त्यांचें ज्ञान नेहमीं कसें जय्यत असे, याचें आश्चर्य वाटे. ध्यानांत ठेवण्याजोगी दुसरी गोष्ट ही, कीं ते विवक्षित विषयाकडे वरवर न पाहतां त्याच्या मुळाशीं जाऊन त्याचें तत्त्व काय आहे, व त्याचप्रमाणें त्या तत्त्वाची खरी व्याप्ती व विस्तार केवढा आहे हेंही पाहात असत. याचीं उदाहरणें त्यांनीं हाय-कोर्टांत जे न्याय दिले आहेत, त्यांमधून एकाद्या वकीलास देतां येतील.

"आपणास त्यांचा हा गुण त्यांच्या अर्थशास्त्रासंबंधीं लेखांत विशेष दिसून येतो. अर्थशास्त्राचा त्यांनीं पूर्ण अभ्यास केला होता. त्याचें तत्व त्यांना कळून चुकलें होतें. म्हणजे त्यांतील सिद्धान्तांची इमारत कोणत्या गृहीत तत्वावर उभारलेली आहे हें ते जाणत होते व हीं तत्वें आपल्या देशाच्या वस्तुस्थितीला कितपत धरून आहेत व त्याचप्रमाणें इंग्रजी सिद्धांत आपल्या देशाला लावतांना ते किती मर्यादित केले पाहिजेत, व त्यांमध्यें किती बदल केला पाहिजे, ह्याविषयीं त्यांनीं फार विचार केला होता. हिंदुस्थानची सांपत्तिक प्रगती कोणत्या गोष्टींवर अवलंबून आहे, व ह्या बाबतींत सरकारचें व समाजाचें कर्तव्य काय आहे, ह्याविषयीं त्याचीं मतें निश्चित व संगतवार होतीं. मला वाटतें कीं आपलें ज्ञान ही एक ईश्वरी ठेव आपणाजवळ आहे, आणि तिच्या सदुपयोगाबद्दल आपण ईश्वराचे सर्वस्वी जबाबदार आहों, असें त्यांना नेहमीं वाटत असे; व रानडे

यांची धर्मश्रद्धा परमकोटींतील असल्यामुळें अशा प्रकारच्या समजुतीची कल्पना त्यांस साजण्यासारखी होती. ग्रंथवाचनानें, जननिरीक्षणानें, किंवा नानाप्रकारें जी लोकसेवा ते करीत, तिच्या अनुभवानें ज्या अगाध ज्ञानाचा संचय ते सतत करीत, त्याचा कोणत्या तरी रूपानें देशबांधवांना फायदा करून द्यावा ह्याविषयीं त्यांची नेहमीं उत्सुकता असे.

"त्यांचा स्वभाव, त्यांच्या बुद्धीचा कल व व्यासंग ह्यांना अनुरूपच होता त्याचें मन निरंतर उच्च विचार व श्रेष्ठ मनोवृत्ती यांच्या ठायीं गढून गेलेलें असल्याकारणानें ज्या क्षुद्र प्रेरणांचा व मनोविकारांचा सामान्य जनांच्या मनांवर एवढा ताबा चालतो त्यांना रानडे यांच्या वर्तनांत मुळीं ठावच सांपडत नसे. आपली मानमान्यता व्हावी ही इच्छा त्यांच्या स्वप्नींही नसे. एखादी चांगली गोष्ट सिद्धीस गेली आणि ती कोणीं घडवून आणिली हें जरी सर्वांस ठाऊक असे, तरी तीबद्दलचें यश आपण मागें राहून दुसऱ्या कोणाला तरी द्यावें, याविषयीं त्यांची नेहमीं उत्सुकता असे. "ज्ञानमंदिर तयार झालें म्हणजे झालें, तें बांधण्याच्या कामांत आपण मजूर होऊन डोक्यावर चुना-विटा आनंदानें वाहूं" असे जें बेकन यानें स्वतःबद्दल म्हटलें आहे, तें मला वाटतें कीं आपणांस माधवरावजींच्या संबंधानें म्हणतां येईल. "पदार्थाविषयीं न बोलतां केवळ व्यक्तीच बोलण्याचा विषय करण्याची संवय, यासारखें आपलें मन सुसंस्कृत नसल्याचें स्पष्ट द्योतक असें दुसरें कांहीं नाहीं," असें प्लेटोनें म्हटलें आहे. आपल्यापैकीं पुष्कळांच्या संभाषणांचा बराच मोठा भाग निरर्थक जनप्रवादांनीं भरलेला असतो. पण रानडे यांच्यासंबंधानें प्रत्येकाच्या लक्षांत आलेंच असेल, कीं त्यांच्या बोलण्यांत असल्या गोष्टींचें नांव देखील नसावयाचें. दुसऱ्यांच्या, विशेषतः प्रतिपक्षीयांच्या संबंधानें मत देतांना ते विलक्षणप्रकारें सरळ, निष्कपट, व उदार असत. पण हेच त्यांचे प्रतिपक्षी कोणासही वाईट वाटतील अशा मार्गांनीं त्यांचे विरुद्ध डाव-पेंच चालवायास पाहत असत. असो; बर्कनें थोर आणि उदार अन्तःकरणाचा मनुष्य म्हणून ज्यास म्हटलें आहे, तशा प्रकारचे रानडे हे होते. ह्या विश्वाचें राज्य परमेश्वरी शहाणपणावर व दूरदृष्टीवर

चाललें आहे, असा त्यांचा दृढ विश्वास असे; व मला वाटतें कीं त्यांचा तो अविश्रांत सतत उद्योग, व न ढळणारा निष्ठावंत भाविकपणा ह्याचें रहस्य ह्या श्रद्धेंतच आहे. जेव्हां त्यांच्या भोंवतालच्या लोकांची एकाद्या कामांत निराशा होई—आणि विशेषत: तरुणपणीं मनुष्यें अधीर असतात, व त्यांची निराशा लवकर होते—तेव्हां "अहो, अजून घाबरावयास काय झालें आहे? माझ्यासारखे वृद्ध व्हा; चांगला काळ अद्यापि पुढेंच आहे; तरुणपणाचें सार्थक वृद्धपणांतच आहे; आपलें आयुष्य ईश्वराच्या हातांत आहे व त्याचें तर असें आश्वासन आहे कीं आपण सर्व आयुष्याची नीट व्यवस्था लावून ठेविली आहे. तरुणपणांत काय फार तर निम्मे गोष्टी दिसतात; तर सर्व गोष्टी पहा; देवावर भाव ठेवा व भिऊं नका"—अशा रीतीनें रब्बी बिन इझरा नामक कवीच्या वचनाप्रमाणें त्यांना रानडे धीर देत आहेत, असें आपणास वाटत असे!

"आजपर्यंत जर कोणी देशभक्त म्हणून झाला असेल, तर माधवराव हेच खरे देशभक्त होते असें म्हटलें पाहिजे. आपल्या देशावर व लोकांवर त्यांचें कसें प्रेम होतें हें आपणा सर्वांस ठाऊकच आहे. आपल्या पूर्वजांनीं जीं थोर कृत्यें पूर्वीं केलीं आहेत, यांचा त्यांना मोठा अभिमान वाटत असे; व त्यांहून मोठ्या गोष्टी देखील आपल्या लोकांच्या हातून पुढें होतील, असा त्यांचा प्रबळ विश्वास असे. त्यांनीं ज्या ज्या म्हणून गोष्टी हातीं घेतल्या, त्यांमध्यें सर्वांत आपल्या देशाचा इतिहास लिहावा ही त्यांची मोठी आवडती गोष्ट होती. त्याचप्रमाणें स्वदेशभक्तीला जोडूनच त्यांची खरी आणि समंजसपणाची ब्रिटिश राज्याचे ठायीं स्वामिभक्ती होती. ब्रिटिश साम्राज्याच्या छायेखालीं आपल्या लोकांची बुद्धींत, नीतींत, व धर्मांत पूर्णता व्हावी असा ईश्वरी संकेत आहे, असें त्यांना वाटत असे. इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांचें नातें दर्शविण्यासाठीं ते 'शिष्यत्व' असा आपला आवडता शब्द घालीत असत, तो याच अर्थी घालीत असें मला वाटतें. आपल्यापेक्षां हिंमतदार अशा लोकांच्या सहवासानें व त्यांच्याशीं स्पर्धा केल्यानें आपलें सामर्थ्य वाढेल असें त्यांना वाटत असे; तसेंच पाश्चात्यांनीं

ज्या अनेक श्रेष्ठ कल्पना वाढविल्या आहेत, व श्रेष्ठ गोष्टी साध्य करून घेतल्या आहेत, त्यांचे अंकूर आपल्यांत नाहींत; निदान ते आपणांत कधीं काळीं असले, तरी त्यांची नीट जोपासना आपण केली नाहीं, असें त्यांना समजून चुकलेलें होतें. पाश्चात्य सुधारणेचें त्यांनीं उत्तम मनन केलें होतें; व त्यांत जें कांहीं त्यांना चांगलें दिसलें तें त्यांनीं घेतलें होतें. तें त्यांनीं नुसतें वरपांगीं घेतलें नव्हतें, तर आपल्या मनाच्या व स्वभावाच्या अंतरंगांत हें ज्ञान मिसळून आपल्या वर्तनामध्यें त्याचा एक जीव करून टाकिला होता. मनुष्यानें आजपर्यंत जें कांहीं उच्चपद साध्य केलें आहे, त्यांचे काळजीपूर्वक परीशीलन करून त्यांनीं मनुष्याच्या इतिकर्तव्याचा अंदाज बांधिला होता; व मनुष्य श्रेष्ठ पदवीस पोंचण्यास समाज कसा असावा व त्याचें काय कर्तव्य आहे ह्याची त्यांनीं निश्चित कल्पना ठरविली होती. प्लेटोप्रमाणेंच भावी समाजाच्या पूर्ण उन्नत स्वरूपावर नजर ठेऊन, व प्रत्येक गोष्ट घेऊन तिच्यामध्यें योग्य ती थोडी थोडी सुधारणा करून, मनुष्याच्या वर्तनांत ईश्वरी गुण अधिकाधिक आणण्याचा प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य होय, असें ते समजत. इंग्रजांचे जे कांहीं गुण आहेत, व जगाच्या इतिहासांत त्यांनीं जीं थोर व चांगलीं कृत्यें केलीं आहेत, त्यांची ते वेळोवेळीं तारीफ करीत. ह्या गोष्टीचा या ठिकाणीं मीं उल्लेख न केला तर अप्रशस्त होईल.

"कै० रानडे यांच्या हातांत नेहमीं पुष्कळ उद्योग असत, असें आपण वारंवार म्हणतों. मला वाटतें, कीं यांत खरोखरी कांहीं विशेष नसून हा त्यांच्या विशाल बुद्धिमत्वाचाच परिणाम होता. समाजाची जर प्रगती व्हावयाची तर ती साऱ्या समाजाची सर्व दिशांनीं एकसारखी होत गेली पाहिजे, असें त्यांचें मत होतें. राजकीय गोष्टीत त्यांचीं मतें ज्यांना आपण 'लिबरल' असें म्हणतों, तशा प्रकारचीं होतीं. लिबरल ह्या शब्दाचा अर्थ हाच कीं जेथें माणसामध्यें कर्तृत्व असेल, तेथें तें कर्तृत्व ओळखून तदनुरूप हक्क देणें हा होय. यासाठीं रानडे स्त्रीशिक्षण वाढविण्याचा उत्साहानें प्रयत्न करीत असत. स्त्रियांच्या आंगीं

समाजाची सेवा पुरुषांच्या बरोबरीनें करण्याची पात्रता आहे, मात्र मार्ग भिन्न आहेत, असें त्याचें मत होतें. तरमग पुरुषांनीं स्वतःला राजकीय हक्क मिळविण्याकरितां भांडावें व त्यांनींच स्त्रियांना मात्र, त्यांच्या पात्रतेप्रमाणें हक्क देऊं नये, हें किती अयोग्य आहे, हें ते जाणत होते. समाजानें आपल्या अर्ध्या भागाला शिक्षण न देतां त्याजकडून होणाऱ्या देशसेवेला मुकावें हें फार मूर्खपणाचें आहे असें त्यांना वाटत असे. समाजांतला एकलकोंडेपणा त्यांस मुळींच आवडत नसे. यामुळें हे समाजांतल्या कृत्रिम भेदांच्या नेहमीं विरुद्ध असत. त्यांना असें वाटे, कीं समाजव्यवस्थेंत एक जूट असावी; व सर्व समाजाचें त्यांतील एकेक व्यक्तीस, व व्यक्तिमात्राचें सर्व समाजास पाठबळ असावें. यासाठीं समाजांत अगोदर असलेले व निरंतर अधिकाधिक होत जाणारे जे पोटभेद, त्यांना ते नेहमीं विरुद्ध असत.

"सरते शेवटीं सांगावयाची गोष्ट म्हटली म्हणजे ते धर्मसुधारक होते. त्यांचें असें मत होतें कीं विचाराची जर इतर दिशेनें प्रगती होत आहे, तर धर्माच्या तेवढ्या एकाच बाबतींत विचार निश्चल कसे राहतील? सुधारक व जुन्या चालीचे लोक ह्यांचे तंटे केवळ ह्या देशांतच आहेत असे पुष्कळ लोक बोलतात. पण खरें पाहिलें असतां हा वादविवाद साऱ्या जगभर सारखा चालू आहे. तो वाद मुख्यत: हा आहे कीं, आपला धर्म मागल्या काळांतील तंत्रमंत्र वगैरे धर्मसंस्कार यांस चिकटून राहावयाचा व नवीन विचारांचा संसर्ग त्यास न होऊं दिल्याकारणानें नवीन विचारांच्या लाटेबरोबर भलतीकडेसच भटकत जावयाचा; व लाटेच्या तडाक्यानें उघड्या किनाऱ्यावर जाऊन आपटून उद्ध्वस्त व्हावयाचा, किंवा जो धर्म मूळच्या चिरन्तन अशा विश्वासावर उभारलेला आहे, त्यांत सध्याच्या ज्ञानवृद्धीला व विचारसरणीला अनुरूप असा बदल करून धर्मश्रद्धा कायम राखावयाची? या संबंधानें रानडे यांनीं दुसरा पंथ स्वीकारला होता.

"आतां एक प्रश्न फिरून फिरून अपरिहार्य रीतीनें मनांत येतो आहे. तो हा कीं, माधवरावजींनीं आजन्म केलेल्या श्रमाचें सार्थक्य काय होणार?

व त्यांनीं जें काय केलें आहे, त्यापैकीं कितीसें टिकणार ? ह्याचें उत्तर दुसऱ्या एका प्रश्नानेंच मिळावयाचें आहे. तो प्रश्न हा कीं तुम्ही जे त्यांचे देशबांधव, ते रानडे यांनीं ज्याचा आरंभ केला आहे, तें पुढें चालू ठेवावयाला कितपत तयार आहां ? त्यांनीं कित्येक उत्तम संस्था उभारल्या व त्या एका मनुष्याला जितक्या चालवितां येणें शक्य आहे तितक्या त्यांनीं चालविल्या. परंतु त्या संस्थांवर लोकांची अजून इतकी भक्ती नाहीं, कीं त्या आपोआप चालतील. तर त्यांचें काम कितीसें टिकावयाचें हें तुमच्या उद्योगावर अवलंबून आहे. त्यांनीं बीजारोपण केलेलें रोंप वाढीस लागावयाचें असेल तर तें तुमच्या प्रयत्नानेंच लागावयाचें. आतां सरतेशेवटीं एवढेंच सांगितलें पाहिजे, कीं कै० महादेवराव रानडे यांनीं परमेश्वराच्या वैभवाला व मनुष्याच्या सुखवृद्धीला वाहिलेल्या अशा एका जन्माचें सर्वोत्कृष्ट उदाहरण तुम्हांस घालून देऊन आपली इहलोकची यात्रा संपविली आहे !

---

## शिक्षकांस हितगुज *

१. शिक्षकानें वर वर टापटीप दाखवून व खुशामत करून वरीष्ठांस संतोषित ठेवण्याच्या भरीस पडूं नये. अशानें ' कसें होईल, काय होईल ? ' अशा प्रकारची भीती निरंतर मनांत असते पण आपलें काम चोख ठेवून वरीष्ठांस खूष ठेवण्याचा यत्न केला असतां कधीं ही कोणाची भीती बाळगण्याचें कारण नाहीं.

२. आपल्या धंद्यांतल्या माणसांबद्दल कधीं मनांत द्वेष अथवा मत्सर बाळगूं नये, तर त्यांच्याशीं स्नेहभावानें वागावें. दुसऱ्यामध्यें कांहीं आपल्यापेक्षां विशेष असा गूण आढळल्यास तो अवश्य घ्यावा, व दोष आढळल्यास तो युक्तीनें दाखवून देऊन तो नाहींसा करण्यास साह्य करावें. आपल्यामध्यें सर्व उत्तम गूण आहेत, व दुसऱ्यामध्यें दोष फार आहेत, अशी बुद्धी बाळगूं नये.

---

* हा लेख आगष्ट महिन्याचे ' गुजराथ शालापत्रक ' यांतून जरूरीपुरता फेरफार करून किंवा जास्त मजकूर घालून घेतला आहे.

३. नवीन जागीं बदली झाली असतां आपल्या अगोदरच्या शिक्षकाच्या पद्धतींत बदल करावासा वाटल्यास, तो बदल एकदम करूं नये; हळू हळू करावा. पण एकादा रिवाज शाळेला फार हानिकारक आहे असें दिसलें, तर त्यांत एकदम बदल करण्यासही चिंता नाहीं; मात्र दुसऱ्याचा रिवाज बदलतांना पूर्ण विचार करावा, व दुसऱ्यापेक्षां आपण शहाणे, तेव्हां दुसऱ्याचे रिवाज आपणास कशास पाहिजेत, अशी बुद्धी धरूं नये. ध्यानांत ठेवावें, कीं आपण जसे दुसऱ्याच्या जाग्यावर आलों आहों, त्याप्रमाणें दुसराही कोणी आपले जाग्यावर गेला आहे; व त्यानें आपल्या रिवाजांत बदल केल्यास आपल्यास तें सर्वप्रकारें आवडेल असें नाहीं.

४. गांवच्या लोकांशीं आढ्यतेनें न वागतां त्यांचें मित्रत्व संपादावें. पण त्यांची खुशामत करूं नये, तर आपली पायरी राखून वागावें. खेडेगांवातून असणारे मोठे मानलेले लोक ही शिक्षकापेक्षां विद्वत्तेनें पुष्कळदां बरेच कमी असतील. पण त्यांवर दिमाख मिरवूं नये, तर त्यावर छाप बसवावी, व त्यांस आपल्या विद्वत्तेपासून फायदा होईल, व आपणापेक्षां शिक्षक विद्वान आहे हें समजून ते आपणास मान देतील असें वर्तावें. मान मुद्दाम मागून मिळत नाहीं, किंवा मिळालेला टिकत नाहीं. स्वाभाविकरीत्या जो मान मिळेल, तो उशीरा मिळाला तरी कायमचा व खराखरा मिळेल.

५. राजकीय किंवा गांवकीची खटपट यांत कधीं ही पडूं नये. गांवच्या खटपटींत पडल्यानें आपण कोणाचें कांहीं तरी हित करूं असें केव्हां वाटतें खरें. पण त्यापासून कोणास ही बरें न वाटतां पुढें यांत आपण उगाच कशाला पडलों असें वाटतें, व आपला मान न राहातां उलट नुकसान होतें. म्युनिसिपाल कमेटी वगैरे सार्वजनिक कामांत शिक्षकांस शिरण्याची जरूर पडेल, तेव्हां त्यांत पडलेंच पाहिजे. पण आपल्या धंद्याच्या कामांत जसें जपून वागावयाचें, तसेंच यांत ही वागून, व्यक्तिमात्राच्या किंवा स्वतःच्या हिताहिताकडे लक्ष न ठेवितां, केवळ लोकहिताचें काम म्हणूनच असलें काम निवळ तिऱ्हाइताप्रमाणें करावें.

# मेहेरबान डायरेक्टर आफ् पब्लिक इनस्ट्रक्शन साहेब बहादूर यांनीं मंजूर केलेल्या पुस्तकांची ता० १ मे १९०१ पर्यंत दुरुस्त केलेली यादी.

## इनामें व लायब्रऱ्या ह्यांकरितां मंजूर केलेलीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| अकबर बादशहाचें चरित्र ( ह. कृ. दामले. ) | १—४—० |
| अंकगणित भाग १ ( ग. ब. लिमये. ) | ०—३—६ |
| ,, ,, २ ,, | ०—८—० |
| अंतरीक्षांतील चमत्कार ( म. खं. चिटणीस. ) | २—०—० |
| अर्थशास्त्र ( ग. ज. आगाशे. ) | २—०—० |
| अर्थशास्त्र तत्वादर्श ( गु. ना. मुजुमदार. ) | ३—८—० |
| अभिनव-कादंबरी ( पु. गो. नाडकर्णी. ) | ०—५—० |
| अलंकारदर्पण ( रा. वा. तळेकर. ) | ४—४—० |
| अलंकारविकास ( वा. ए. क्षीरसागर. ) | २—४—० |
| आकाशांतील देखावे ( दा. ग. केळकर. ) | २—०—० |
| आत्मशिक्षण ( द. कृ. दामले. ) | ०—८—० |
| आत्मारामाचें चमत्कारिक मंदिर ( इंदुप्रकाश छापखाना ) | ०—४—० |
| आरोग्यशास्त्र ( बा. बा. करकरे. ) | ०—२—६ |
| आर्यभगिनी व्हा० १ ( माणकबाई लाड ) | १—०—० |
| इंदिरा ( डा. कीर्तीकर. ) | ०—१२—० |
| उत्तम शेतकरी ( चिं. मो. आपटे. ) | ०—२—० |
| उपदेशमाला ( मो. ग. लोंढे. ) | ०—१—६ |
| उष्णता ( बा. प्र. मोडक. ) | ३—०—० |
| ऋणविमोचन ( वी. वी. आचार्य. ) | ०—४—० |
| एलफिन्स्टनचे चरित्र ( वि. वा. नाटेकर ) | २—०—० |
| औरंगजेब बादशहाचें चरित्र भाग १ ( चिं. गं. गोगटे. ) | ०—८—० |
| ,, ,, ,, उत्तरभाग ,, | १—०—० |
| किमया अथवा रसायन प्रयोग ( त्रिं. स. शिरवळकर ) | ०—६—० |
| क्रिकेट अथवा चेंडुफळी भाग १ ला. ( चि. आर. गोगटे. ) | ०—११—० |
| कुसुमांजली ( पु. गो. नाडकर्णी ) | ०—४—० |

| | |
|---|---|
| कोल्हापूर व कर्नाटक प्रांतांतील राज्यें व संस्थानें यांचा इतिहास व दक्षिणेंतील मुसलमानीं राज्यांचा इतिहास. व्हा. २ ( वा. प्र. मोडक. ) | २—०—० |
| गद्यरत्नमाला ( गो. शं. शा. बापट. ) | ०—१०—० |
| गलिव्हरचा वृत्तांत भाग १ ( ह. कृ. दामले. ) | —५—०० |
| ,, २ ,, | ०—५—० |
| ,, ३ ,, | ०—५—० |
| ,, ४ ,, | ०—६—० |
| गीतार्थसार ( वा. आ. मोडक. ) | ०—४—० |
| ग्लोब टेरेस्ट्रिअल भुगोल ( ग. दा. गद्रे ) | १—८—० |
| ,, ,, ,, ,, पेटी सुद्धां | ३—१०—० |
| चौरस रीतिसहित ( एन्. एस्. कुळकर्णी. ) | ०—१०—० |
| छोटे व्यापारी ( टी. आर. लुकतुके ) | ०—८—० |
| जॉर्ज वाशिंगटनचें चरित्र ( व्ही. एम्. वाळवेकर. ) | ०—१२—० |
| जिजीवास अथवा छत्रपती राजाराम महाराज ( लंडन मिशन ) | १—४—० |
| ज्योतिःशास्त्र ( रे. ब्रूस. ) | १—८—० |
| तरुणामित्र ( गो. ग. वाटवणेकर. ) | १—८—० |
| तुलनादर्शक शारीरशास्त्र ( रे. ब्रूस. ) | २— ०—० |
| थोरले शाहूमहाराज यांचे चरित्र ( का. ना. साने ) | ०—१२—० |
| दक्षिणेचा प्राचीन इतिहास ( ना. वि. वापट. ) | ०— ८—० |
| दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास. व्हा. ३ (वा. प्र. मो.) | १— ८—० |
| दानत भाग १ ( ग. भि. गुंजीकर ) | ०— १—६ |
| दृष्टिसंरक्षण ( डा. बुलेल ) | ०— ८—० |
| धाकटे रामराचे व धाकटे शाहूमहाराज यांचे चरित्र(का. ना. साने) | ०—१२—० |
| धौममहाबळेश्वर वर्णन ( उदास ) | ०— ८—० |
| नक्षत्रांचें पुस्तक ( वा. ग. केळकर ) | २— ०—० |
| नवीन मराठी व्याकरण ( अ. कृ. गोडबोले ) | १— ४—० |
| नशीब आणि उद्योग ( मो. ग. लोंढे ) | ०—५—६ |
| नीतिबोध ( ह. कृ. दामले ) | ०—६—० |
| नीतिमुक्ताहार ( टी. के. पित्रे ) | १— ४—० |
| नीतिशास्त्राची मूलतत्वें ( व्ही. जी. सहस्रबुद्धे ) | ०—६—० |
| नौकानयनाचा इतिहास ( गो. श. शा. बापट. ) | १—०—० |
| पदार्थवर्णन भाग १ व २ ( वा. प्र. मोडक ) प्रत्येकी . | १—०—० |

| | |
|---|---|
| पद्यात्मक लघुहितोपदेश (वि. य. वेडें) | ०— २—० |
| पाणिपतची बखर ( का. ना. साने ) | ०—६—० |
| पाणी—बालबोधशास्त्रपाठमला नं. १ ( व. भा. नगरकर ) | ०—८—० |
| पाणी—( श्री. भि. सरदेशाई ) | ०—१२—० |
| पुष्पगुच्छ ( मो. ग. लोंढे) | ०—१—६ |
| पेशव्यांची बखर ( का. ना. साने ) | १—०—० |
| पैसा ( कृ. म. जोगळेकर ) | ०—२—० |
| प्रकाशलेखन ( त्रिं. स. शिरवळर ) | ०—१२—० |
| प्रभवमालिनी आणि कलवती ( एम्. ए. नागपूरकर ) | ०—१२—० |
| पोहण्याची कला, भाग १ ला ( बी. आर. गोगटे. ) | ०—६—० |
| प्रियदर्शिका ( वि. दा. गद्रे ) | ०—८—० |
| बगीच्याचें पुस्तक ( ग. गो. गोखले ) | ३—८—० |
| बटन ( एस्. व्ही. गर्गे ) | ०—४—० |
| बालबोध पहिलें पुस्तक ( वि. कों. ओक ) | ०—१—० |
| ,, दुसरें ,, ( ,, ) | ०—२—० |
| बालसंगोपनसूचना ,, | ०—३—० |
| बाळमित्र भाग २ ,, | ०—१२—० |
| *बृहत्कथासागर भाग १ ( वा. शा. इसलामपूरकर ) | २—४—० |
| * ,, ,, २ ,, | ,, |
| * ,, ,, ३ ,, | ,, |
| * ,, ,, ४ ,, | १—८—० |
| बेकनचे निबंध ( एस्. एस्. वागळे ) | ०—८—० |
| बोधचंद्र ( जी. व्ही. टोकेकर ) | ०—४—० |
| बोधशतक ( मो. ग. लोंढे ) | ०—१—६ |
| ब्रिटिश राज्यव्यवस्था ( पु. गो. नाडकर्णी ) | ०—८—० |
| भाऊसाहेबांची बखर ( का. ना. साने ) | ०—१४—० |
| भारतस्थलादर्श ( व्ही. बी. सहस्रबुद्धे ) | १—८—० |
| भ्रान्तिकृतचमत्कार ( पु. गो. नाडकर्णी ) | ०—६—० |
| मराठ्यांची बखर ( ग्रँटडफ् ) | १—१२—० |
| महाराणीचें चरित्र १८८७ ( सांगळे, अमेरिकन मिशन ) | ०—८—० |
| महाराष्ट्र भाषेचें व्याकरणसार ( एच्. पी. वागळे ) | ०—२—० |

* विद्याखात्यांतील अधिकाऱ्यांनीं हीं पुस्तकें इनामांकरितां आणि लायब्ररीयांकरितां खरेदी केल्यास प्रत्येक भागास चार आणे कमी किंमत पडेल असें ग्रंथकारानें कळविलें आहे.

| | |
|---|---|
| महाराष्ट्र भाषेची लेखनकला ( गो. ना. साठ्ये ) | १—८—० |
| महाराष्ट्रांतील किल्ल्यांचें वर्णन भाग १ ( चिं. गं. गोगटे ) | ०१२—० |
| मुलीस सदुपदेश ( वी. आर. कोतवाल ) | ०—२—६ |
| मोरोपंती काव्य भाग १ व २ ( ज. बा. मोडक ) प्रत्येकीं | २—०—० |
| यंत्रशास्त्र ( बा. प्र. मोडक ) | २—०—० |
| रत्नमाला ( भा. दा. पाळंदे ) | ०—६—० |
| राष्ट्रीय प्रदर्शन ( आर. वी. गोखले ) | ०—६—० |
| लहान मुलांचें शिक्षण [ असगेकर ] | ०—२—० |
| लाईफ आफ् सरथामस मनरो ( बि. कों. ओक ) | ०—१२—० |
| लोकरीचें विणकाम शिकण्याचें पुस्तक भाग १ ( रुक्मिणीबाई संजगिरी ) | ०—१३—० |
| ,, ,, भाग २ ,, | १—०—० |
| लंकेचे वर्णन ( के. वी. गोखले ) | १—०—० |
| वक्तृत्वकलाविवेचन ( का. त्रिंबक खरे ) | ०—६—० |
| वाक्यमीमांसा ( गो. ग. आगरकर ) | ०—९—० |
| विक्टोरिया महाराणीचें चरित्र ( जी. वी. गुंजीकर ) | ०—३—० |
| ,, ,, ,, ( एस्. एस्. चितळे ) | ०—१०—० |
| ,, ,, डायमंड ज्युबिली चरित्र [ सांगदे ) | ०—८—० |
| विजापुरांतील प्राचीन इमारती [ एस्. आर. गायकवाड ] | ०—२—६ |
| विविधविषयसंग्रह [ गो. ग. आगरकर ] | ०—१२—० |
| विश्वचमत्कार [ के. वा. पेठे ] | ०—८—० |
| शारीर शिक्षण [ व्ही. जी. चिपळूणकर ] | ०—८—० |
| शाहू महाराजांचें चरित्र. [ चिं. गं. गोगटे. ] | १—८—० |
| शाळेतील कवाईत पुस्तक २ रें [ म. ना. जोशी ] | ०—३—० |
| शिक्षणसार [ ह. कृ. दामले ] | ०—७—० |
| शिक्षणमीमांसा [ व्ही. जी. सहस्रबुद्धे ] | ०—१२—० |
| शिवणकला भाग १ ( रुक्मिणी बाई सजगिरी ) | ०—१२—० |
| शिवछत्रपतींचें चरित्र [ का. ना. साने ] | ०—१२—० |
| शिवाजीमहाराजांची बखर. ,, | १—१२—० |
| श्रीप्रतापसिंगजी छत्रपती, महाराणा उदेपूर [ एम्. व्ही. शिधोरे ] | २—०—० |
| श्रीछत्रपती संभाजी महाराज व थोरले राजाराम महाराज यांचें चरित्र [ का. ना. साने ] | ०—१२—० |
| संगीत सुधा [ मो. ग. लोंढे ] | ०—१—६ |
| सज्जन तो सज्जन [ जी. व्ही. साठे ] | ०—४—० |
| सद्गुणमंजरी ( ग. ज. आगाशे ) | ०—८—० |

| | |
|---|---|
| सद्बोधरत्नमाला [ व्ही. एल्. काळे ] | ०—८—० |
| संसारमार्गोपदेशिका ( जं. ए. कोल्हटकर देसाई ) | ०—९—० |
| सर्पदंश भाग १ ( व्ही. जी. चिपळुणकर ) | १—८—० |
| ,, २ ,, | ४—८—० |
| सिद्धान्तन्यायमुक्तावलीचें भाषांतर ( भी० झळकीकर ) | १—८—० |
| ,, ,, ,, ,, | २—०—० |
| सिसरोक्त नीतिविषयक चार निबंध ( पु. गो. नाडकर्णी ) | ०—४—० |
| सुशिक्षणमाला ( टी. अर. लुकतुके ) | ०—४—० |
| सुशिक्षित स्त्री. ( शं. र. हतवळणे ) | ०—१२—० |
| सुंदरेची संक्रांत [ ग. उ. आगाशे ] | ०—१—६ |
| सूक्ष्मपदार्थदर्शन भाग १ [ गो. बा. वैद्य ) | ०—५—० |
| ,, २ ,, | ०—५—० |
| सृष्टिशास्त्र उत्तरार्ध भा २ [ वा. प्र. मोडक. ] | २—८—० |
| सोपीं गाणीं [ वा. दि. वैद्य ] | ०—१—० |
| स्कूल ड्रिल [ जी. वी. ओक ] | ०—१०— |
| स्वतःचा प्रयत्न ( पु. गो. नाडकर्णी ) | ०—३—० |
| स्वपराक्रम [ जी. बी. गुंजीकर ] | ०—४—० |
| हवा-वालबोधशास्त्रपाठमाला नं. २ ( व. भा. नगरकर ) | ०—६—० |
| हवा ( म. शि. गोळे ) | ०—९—० |
| हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास [ व्ही. एल्. काळे ] | ०—८—० |
| हिंदुस्थानांतील एतद्देशीय विद्यमान राज्यें, संस्थानें, जहागिरी यांचा इतिहास [ कृ. ब. गोडबोले ] | २—०—० |
| हिंदुस्थानची राज्यपद्धती [ वि. वा. नाटेकर ] | ०—६—० |
| हिंदुस्थान आणि ब्रिटिश वसाहती | ०—१२—० |
| क्षेत्रशंकुच्छेद ( एन्. एस्. कुळकर्णी ) | १—१२—० |

## लायब्ररींकरितां मंजूर केलेलीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| अंकगणित भाग १ला ( रा. भा. परदेशी ) | ०—२—० |
| ,, ,, तिसरी आवृत्ती ( गो. कृ. गोखले ) | ०—८—० |
| ,, भाग २रा ,, | ०—१२—० |
| इंग्लंडांतील प्रधानमंडळ ( ना. कृ. आगाशे ) | १—०—० |
| कुटुंबवत्सल ( पु. गो. नाडकर्णी ) | ०—२—० |
| गौतम बुद्धाचें चरित्र ( एल. पि. नागवेकर ) | १—१२—० |

| | |
|---|---|
| घोडा-गाडी ( कृ. म. जोगळेकर ) कागदी जड पुठ्ठा | १—४—० |
| ” ” ” ” कापडी बांधणी सोनेरी अक्षरांनीं नांव | २—४—० |
| चित्रलेखन मूलतत्व, पु० १लें ( डि. एम्. भाव्ये ) | ०—२—६ |
| डाक्तर बेंजामिन फ्राक्लिनचें चरित्र ( गो. गो. लिमिस ) | १—४—० |
| तुकारामचरित्र ( एल्. पी. नागवेकर ) | १—४—० |
| दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास भाग १ ला ( बा. प्र मोडक. ) | २—०—० |
| नवीन मराठी व्याकरण ( जी. आर. नवलकर ) | ०—१२—० |
| पंचांगसार ( रा. ना. घोलकर ) | २—०—० |
| प्रवेश पुस्तक ( जि. बि. वैद्य ) | ०—२—० |
| बंगाल्यातील जमिनदारी वहिवाट ( वि. म. महाजनी ) | १—४—० |
| बालगणितशिक्षण ( एम्. एन्. काळे ) | ०—५—० |
| बालशिक्षण ( ग. ज. आगाशे ) | ०—३—० |
| बोधमाला ( मो. ग. लोंढें ) | ०—१—६ |
| मनुवचन ( जावजी दादाजी ) | ०—१—० |
| मराठी भाषेचें मध्यम व्याकरण ( ह. ग. गोडबोले ) | ०—१०—० |
| मराठी व्याकरण व्याख्यानमाला भा० १ ला ( जी. ञं. जोशी ) | ०—६—० |
| मल्लविद्या प्रकाशक ( ज्ञानचक्षु छापखाना, पुणें ) | १—०—० |
| मसूरिका व तन्निवारणार्थ उपाय ( एस्. आर देसाई ) | ०—४—० |
| मुलांस वागविण्याची रीत ( सायमन बेंजामिन् ) | ०—५—० |
| * मोडीअक्षरवटिका ( प. जि. कणविंदे ) | ०—४—० |
| यंत्रस्थितिशास्त्र ( बा. प्र. मोडक ) | १—०—० |
| राजकीय दृष्टया इतिहासाचें महत्व ( एन्. के. आगाशे. ) | ०—३—० |
| राजव्यवहार-कोश ( का. ना. साने ) | ०—३—० |
| रामदासाचें रामायण व इतर विविधकाव्यें ( ज. स. मोडक ) | १—८—० |
| लघुलेखनकला ( वी. आर. माणकर ) | ०—८—० |
| लीलावती ( व्ही. पी. शास्त्री, खानापूरकर ) | २—०—० |
| लीलावती अथवा श्री भास्कराचार्यकृत अंकगणित ( देवराव उन्नाशेट ) | १—०—० |

| | |
|---|---|
| वरिष्ट प्रतीचें इंग्रजी मराठ व्याकरण ( ए. के. खेर ) | २—०—० |
| विद्यार्थी ( जावजी दादाजी ) | ०—१—६ |
| शक व सन यांची तारीख व सनवार जंत्री सन १७२८ पासून सन १८८९ पर्यंत ( बा. प्र. मोडक ) | २—८—० |
| श्रीमदध्यात्मरामायण प्राकृत टीकेसहित पूर्वार्ध व उत्तरार्ध ( ए. एम्. छत्रे ) प्रत्येकीं | १—४—० |
| साबू ( शंकर यज्ञेश्वर गर्गे ) | २—०—० |
| सुभेदार थोरले मल्हारराव होळकर यांचें चरित्र ( मु.म. अत्रे ) | १—४—० |
| सुशिक्षणकौमुदी ( जी. एन. मुजुमदार ) | १—८—० |
| सृष्टपदार्थनियम आणि सुधारणा ( शं. रा. हतवळणे ) | १—४—० |
| स्थलनामकोश ( तुकारम जावजी ) | ०—१४—० |
| हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थिति ( डेक्कन ए. सो. पुणें ) | १—८—० |
| हिंदुस्थानांतील कारागिरीचें वर्णन ( बी. ए. गुप्ते. ) | २—०—० |
| ” सांपत्तिक द्रव्यें ( एम्. आर. मुळे. ) | ३—०—० |

---

## बक्षिसाकरितां मंजूर केलेलीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| आर्यभगिनी भाग २ रा ( माणकबाई लाड ) | १—०—० |
| इसाबनीति भाग १ व २ ( ह. कृ. दामले ) सचित्र प्रत्येकीं. | ०—४—० |
| इसाबनीति ( सचित्र ) भाग १ ला व २ रा मिळून एक पुस्तक, कापडी बांधणी ( ह. कृ. दामले. ) | ०—१०—० |
| उपदेशपर मनोरंजक गोष्टी भाग १ ( साठये. ) | ०—१—९ |
| उपदेशपर मनोरंजक गोष्टी भाग २ ( साठये. ) | ०—१—६ |
| कथामृत ( जोशी ) | ०—७—० |
| कृतज्ञ गुलामाची गोष्ट ( व्हि. व्हि. साठये. ) | ०—३—० |
| क्रोध ( सायमन बेंजामिन्. ) | ०—१—० |
| चित्रयुक्त मुळाक्षरें ( रविवर्मा प्रेस, कार्ली. ) | ०—२—० |
| डा० जोनॅथन् स्विफ्ट यांचें चरित्र ( ह. कृ. दामले. ) | ०—३—० |
| डेव्हिड सिंक्लेअरकृत हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास (लुकतुके.) | ०—१०—० |

| | |
|---|---|
| थोरांच्या आख्यायिका ( ह. कृ. दामले. ) | ०—१—६ |
| दारिद्र्यविमोचन ( चौबळ. ) | ०—६—० |
| दिनार्वस ( गो. शं. शा. बापट ). | ०—१४—० |
| नवरत्नें ( ह. कृ. दामले. ) | ०—२—० |
| नवीन सचित्राक्षरबोध ( ज. म. गुर्जर. ) | ०—१—० |
| निद्रा ( लक्ष्मीबाई साळुंके. ) | १—०—० |
| निबंधमार्गादर्श भाग १ ( आर. बी. घाटपांडे. ) | ०—३—० |
| निबंधमार्गादर्श भाग १ वर्णनपर निबंधाचे मुद्दे आर. बी. ) | ०—१—६ |
| निबंधलेखन ( मिसेस टी. आर. तुकतुके. ) | ०—१०—० |
| नीतिदर्पण अथवा सद्गुण शतावळी भाग १ ( सेलापूर, सदर बाजार. ) | ०—१२—० |
| पद्यसमुच्चय ( रा. भि. जोशी ) | ०—६—० |
| फुटकळ चुटके ( वा. ना. खरे. ) | ०—४—० |
| बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचें चरित्र ( चिं. गं. गोगटे ) | ०—४—० |
| बोधसुधा ( एम्. जी. लोंढे ) | ०—१—६ |
| भूतलावरील चमत्कार व देखावे ( स. म. देशपांडे. ) | १—८—० |
| मुलांची निवड अथवा गोफणीचा खेळ ( गो. टिपणीस. ) | ०—३—० |
| मुलांचें कल्याण ( वि. कों. ओक. ) | ०—१—६ |
| मुलांस नवी देणगी ( ह. कृ. दामले. ) | ०—२—० |
| मुंबईचा वृत्तांत ( ज. म. गुर्जर. ) | २—०—० |
| लहान मुलांची कवाईत ( स. ल. आजगांवकर. ) | ०—२—० |
| वर्णबोध ( आर. जे. भिडे. ) | ०—१—० |
| शारदीय वाचनक्रम प्रथम पाठ ( पंडिता रमाबाई. ) | ०—२—० |
| सदुपदेशसंग्रह ( सायमन् बेंजमिन्. ) | ०—१४—० |
| सायंकाळची कर्मणूक ( ह. कृ. दामले ) | ०—६—० |
| साक्रेतिसाचें चरित्र ( कृष्णशास्त्री चिपळूणकर. ) | ०—४—० |
| सुबोध गोष्टी भाग १, २ व ३ ( ह. कृ. दामले. ) प्रत्येकीं | ०—२—० |
| सुभाषित पद्यमाला ( म. ना. काळे. ) | ०—२—६ |
| सोप्या व मनोरंजक गोष्टी ( वि. बा. नाटेकर. ) | ०—१—६ |

| | |
|---|---|
| सोप्या व मनोरंजक गोष्टी भाग २ ( वि. वा. नाटेकर ) | ०—१—६ |
| स्कूल ड्रिल ( एन्. जी. आपटे ) | ०—१—० |
| स्कूल ड्रिल ( स. ल. आजगेकर ) | ०—४—० |

## मुलींच्या शाळेंत बक्षिसाकरितां व उपयोगाकरितां मंजूर केलेलीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| रांगोळीचें पुस्तक भाग १ ( एम्. जी. पटवर्धन ) बक्षिसाकरितां | ०—४—० |
| व्यवहारांतील शिवणकाम ( मिस्. एस्. एन्. आब्राहाम् ) [ बक्षिसाकरितां व उपयोगाकरितां ] | ०—८—० |

## शाळांत चालविण्याकरितां मंजूर केलेलीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| अंकगणित भाग ला ( रा. ब. लिमये. ) | ०—३—६ |
| अंकगणित भाग २ ( रा. ब. लिमये ) | ०—८—० |
| ,, ,, १ ला चौथी आवृत्ति ( के. ल. छत्रे. ) | ०—३—६ |
| ,, ,, २ रा ( के. ल. छत्रे. ) | ०—६—० |
| अंकगणित भाग १ ला तिसरी आवृत्ति (गो. कृ. गोखले ) | ०—८—० |
| ,, भाग २ रा. ,, | ०—१२—० |
| चित्रयुक्त मुळाक्षरें ( रविवर्मा प्रेस, कार्ली ) | ०—२—० |
| चित्रलेखन मूलतत्व, पु. १ लें ( डि. एम्. भाटये ) | ०—२—६ |
| ट्रेसिंग बोर्ड आणि शीट आफ् बिल्डिंग पीसिस लाँगमन् ग्रीन आणि कं. मुंबई ) — ट्रेसिंग बोर्ड | ०—०—६ |
| बिल्डिंग पीसिस् | ०—२—० |
| तोंडचे हिशेब भाग १ ( रा. मो. देवकुळे ) | ०—१—३ |
| तोंडचे हिशेब भाग २ ( रा. मो. देवकुळे ) | ०—२—३ |
| नीतिबोध ( ह. कृ. दामले ) | ०—६—० |
| नीतिमंदिर ( गो. शं. शा. बापट ) | ०—१०—० |
| पद्यसमुच्चय ( रा. भि. जोशी ) | ०—६—० |

| | |
|---|---|
| बालबोध मुळक्षरांचा नकाशा ( व्ही. टी. चिपळूणकर ) | ०—८—० |
| बालबोध मुळाक्षरांचा नकाशा ( एच्. जी. मर्च ) | ०—८—० |
| बालबोध मूळाक्षरांचा नकाशा ( आर. एम्. चोणकर ) | ०—१२—० |
| भाषांतराकरितां उतारे चवथ्याइयत्तेकरितां (ह. वि. दामले.) | ०—२—६ |
| ,, पांचव्याइयत्तेकरितां ,, | ०—५—० |
| ,, सहाव्याइयत्तेकरितां ,, | ०—६—० |
| ,, सातव्याइयत्तेकरितां ,, | ०—७—० |
| भूगोलविद्येचीं मूलतत्त्वें भाग २ हिंदुस्थानचें वर्णन ( सी. वि. पटवर्धन ) | ०—१—० |
| मराठी इन्फंट प्रायमर ( जे. एस्. हेग्. ) | ०—१—० |
| मराठी मूळाक्षरांचा नकाशा ( आर. एम्. चोणकर ) | ०—१२—० |
| मराठी जगाचा नकाशा ( ज. वा. गोडबोले ) | ४—०—० |
| महत्त्वमापन ( रा. मो. देवकुळे ) | ०—४—६ |
| महाराष्ट्रदेश ( गोडबोले ) | ०—२—० |
| मोडी पहिलें पुस्तक ( सी. वि. पटवर्धन ) | ०—२—६ |
| ,, दुसरें ,, ,, | ०—३—० |
| ,, तिसरें ,, ,, | ०—५—० |
| यथादर्शन चित्रलेखन ( एन्. सी. लिंबादकर ) | १—४—० |
| लघुव्याकरण ( दादोबा पांडुरंग ) | ०—१—० |
| व्युत्पत्तिप्रदीप ( गो. शं. शा. बापट. ) | ०—३—० |
| शाळेंतील कवाईत ( एम्. एन्. जोशी. ) | ०—३—० |
| शिक्षण आणि अध्यापन ( आ. वि. काथवटे. ) | ०—१२—० |
| शिक्षणमीमांसा ( डब्ल्यू. जी. सहस्त्रबुद्धे. ) | ०—१२—० |
| हिंदुस्थानचा रहिवासी ( मॅकमिलन् कंपनी, मुंबई.) | ०—१२—० |
| हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास ( वि. कों. ओक. ) | ०—४—६ |

R. D. PRIOR.

ता० १३ जुलई, १९०१

एज्युकेशनल इन्स्पेक्टर मध्यभाग.

कागदाची अर्थात् जरूर नाहीं. ह्या रीतीनें एका ओळीचीं अक्षरें झालीं म्हणजे पुढच्या ओळीचीं अक्षरें शिकविण्यास आरंभ करावा. कांहीं दिवसांच्या सहवासानें अक्षाचें वळण ध्यानांत घेऊन त्याप्रमाणें हुबेहुब अक्षर काढण्याचें मुलांचें सामर्थ्य वाढत जातें. हें सामर्थ्य ज्या मानानें जसजसें वाढत जाईल त्या मानानें आरंभीं स्लेटीचा उपयोग न करितां अक्षराची समजूत एकदम कागदावरूनच देत गेलें तरी चालेल. मात्र कोणतेंही अक्षर शिकवितांना त्याच्या वळणाचे नियम नीट समजाऊन देण्याची फार खबरदारी घेतली पाहिजे.

कोणतीही नवी ओळ शिकवितांना पूर्वीं ज्या ओळी तयार झाल्या असतील त्या मुलांकडून नेहमीं लिहवीत असलें पाहिजे. मुलांना त्या चांगल्या काढितां येत आहेत अशा नुसत्या भरंवशावर राहूं नये. अक्षरांचा चांगुलपणा मुलांच्या ध्यानांत कितीही स्पष्टपणें आलेला असला तरी पुष्कळ लिहून घटविल्याशिवाय अक्षरामध्यें मोहकपणा अथवा सफाई येत नाहीं. शाळेंतल्या नियमित वेळामध्यें अक्षर घटविण्याचें काम होणार नाहीं. याकरितां मुलांस तयार झालेल्या ओळी घरीं पहांटेस उठून लिहिण्याची संवय सक्तीनें लाविली पाहिजे. लहान लहान मुलांकडून मात्र घरीं हे काम चांगलें होणार नाहीं, हें ध्यानांत असावें. मुलांनीं घरीं लिहून आणिलेले कागद रोज तपासावे, व प्रत्येक कागदावर खूण करावी. म्हणजे पुनः तेच कागद दाखविण्याची सवड मुलांस सांपडणार नाहीं. आरंभीं म्हणजे दुसऱ्या इयत्तेंत मुलाला ह्या पद्धतीनें शिकवून त्याचें अक्षर चांगलें झालेलें असले तर पुढच्या इयत्तेंत अक्षर तयार होण्याला फारच कमी मेहनत पडेल. दुसऱ्या इयत्तेमध्यें सर्व प्रकारच्या वळणांचीं सर्व अक्षरें शिकवून होणार नाहींत. याकरितां दुसऱ्या इयत्तेंत कोण कोणतीं अक्षरें शिकवावयाचीं तें प्रथम ठरवून तितकींच त्या इयत्तेंत शिकवावीं, व राहतील तीं सर्व तिसऱ्या इयत्तेंत शिकवावी. एकंदर सर्व प्रकारच्या निरनिराळ्या वळणांचीं अक्षरें दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तामध्यें शिकवून होण्याला हरकत नाहीं दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तेंत शिकवून झालेलीं

अक्षरें बारीक नमुन्यावर घटविण्याचें काम चौथ्या इयत्तेंत विशेष मेह- नतीनें करावें. वरील पद्धतीनें शिक्षण न मिळाल्यामुळें अथवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें कित्येक मुलांचें अक्षर वाईट असूनही तीं ह्या इय- त्तेंत असतील. अशा मुलांस पूर्वी लिहिलेल्या पद्धतीनेंच परंतु इयत्तेला जरूर असतील तितकीं लहान अक्षरें काढावयास शिकविलीं पाहिजेत. चौथ्या इयत्तेपासून पुढें प्रत्येक इयत्तेंत घरून लिहून आणण्याबद्दल सक्ती असावी. पांचव्या इयत्तेमध्यें एखादा विशेष मजकूर जुळवून तो मुलांस लिहावयास दिला असतां हितावह होईल, असें वाटतें. परंतु सर्वच शिक्षकांस असें करितां येण्याचा संभव नाहीं. अशा शिक्षकांनीं छापी कित्यांचा उपयोग केला तरी हरकत नाहीं. मात्र ह्या इयत्तेमध्यें अक्षरें एक- मेकांस जोडून सफाईनें काढण्याची संवय मुलांस लावली पाहिजे हें ध्यानांत असावें. या इयत्तेंत आल्यानंतर ही ज्या मुलांस अक्षरांचीं वळणें समजलीं नसतील त्यांस तीं ह्या इयत्तेमध्यें समजावून दिलीं पाहिजेत.

सहाव्या इयत्तेंत मुलगा आल्यानंतर त्याजकडून बारीक अक्षर लिहवावया- चें आहे. परंतु बारीक म्हणजे किरटें असें समजूं नये. बारीकच परंतु टपोरें अक्षर वळणशुद्ध व सफाईनें काढावयास शिकविलें पाहिजे. बारीक अक्षर लिहूं लागल्याबरोबर पुष्कळ मुलांस फराटे ओढून लिहिण्याची संवय लागते ती चांगली नाहीं. आरंभापासून पद्धतवार शिकलेला मुलगा असल्यास व अक्षराचें वळण त्याला चांगलें साधलेलें असल्यास, मोडी दुसरें अगर मोडी तिसरें पुस्तक सगळें त्याजकडून लिहून काढ- विलें तर त्याचें अक्षर फार चांगलें होईल. घरून लिहून आणावयाचें तें ह्या पुस्तकांतलें लिहून आणवावें. असा मजकूर लिहीत असतां मुलें वळण सोडून लिहिणार नाहींत अशाबद्दल मात्र फार सावधगिरी ठेविली पाहिजे.

---

## ४ वाचन.

—:*:—

अर्थाकडे लक्ष न देतां नुसतीं वाक्यें लवकर लवकर व न अडख- ळतां वाचतां येऊं लागलीं म्हणजे वाचन पुरें झालें असें समजण्याची

वहिवाट पुष्कळ ठिकाणीं आहे. ती चांगली नाहीं. वाचन शिकवितांना फक्त चांगलें वाचावयास शिकवेणें, यासारख्याच आणखी बऱ्याच महत्वाच्या दुसऱ्या गोष्टी हीं मुलांस शिकवावयाच्या असतात, हें शिक्षकांनीं नेहमीं ध्यानांत ठेविलें पाहिजे. वाचतांना वाचलेल्या भागांतील विषयाचें ज्ञान मुलांस झालें पाहिजे. हें सामर्थ्य त्यांच्या आंगीं आलें, तरच वाचन हा विषय शिकविण्यापासून खरा उपयोग झाला असें म्हणतां येईल.

तथापि अगदीं वरंभीं म्हणजे पहिल्या इयत्तेंत अक्षरओळख चांगली झाल्यानंतर लगा धडे वाचूं लागतो. तेव्हां अर्थज्ञानापेक्षां वाचनाची कला चाली साधण्याकडेसच जास्ती लक्ष दिलें पाहिजे. ह्या वेळीं मुलांस फक्त सुटीं अक्षरें मात्र चांगलीं वाचतां येत असतात. यानंतर त्यांस एक एक शब्द एकदम वाचावयास सांगावा. पुस्तकांतून शब्द सुटे लिहिले असतातच. एकएक शब्द एकदम कसा वाचीत जावा हें त्यांस आपण वाचून दाखवून समजावून सांगावें; व नंतर पुस्तकाचें सुमारें एकएक पान आपण त्यांजकडून समक्ष वाचून घ्यावें; व कसें वाचावयाचें, याबद्दल ह्यांची चांगली समजूत झाली म्हणजे त्यांला एक धडा नेमून देऊन तो तयार करण्यास सांगावें. दोनतीन वेळा तो धडा वाचला म्हणजे तो त्यांनीं कसा तयार केला आहे, हें आपण पहावें. कोणत्या तरी तीन चार ओळी प्रत्येक मुला-कडून वाचून घेतल्या म्हणजे ही परीक्षा होईल. अशा रीतीनें एक धडा वाचून झाला म्हणजे,दुसरा वाचावयास सांगावा; व एकामागून एक या प्रमाणें पुस्तकांतले सर्व धडे वाचून घ्यावे.

शब्द वाचतां वाचतां कदाचित् तो धडाच मुलांस पाठ म्हणतां येऊं लागेल. तसें झाल्या अक्षरें ओळखून शब्द वाचण्याच्या कामीं त्यांच्या बुद्धीला जी कसरत व्हावयाची तिला व्यत्यय येईल. तसें होणें तर अगदीं इष्ट नाहीं. याकरितां प्रत्येक धडा त्यांस वाचावयास सांगणें तो आरंभापासून शेवटाकडे एक एक शब्द वाचीत जावयास न सांगतां, प्रथम कांहीं दिवसपर्यंत, शेवटाकडून आरंभाकडे एक एक शब्द वाचीत

येण्यास सांगावें. म्हणजे धडा पाठ म्हणतां येणार नाहीं; व बुद्धीला कसरत चांगली होऊन शब्द तवढेच लवकर वाचतां येऊं लागतील. शब्द चांगले वाचतां येतात अशी खात्री झाली म्हणजे मग पत्र आरंभाकडून शेवटाकडेस वाचूं द्यावें. शब्द वाचीत असतांच त्यांस वाक्यें एकदम वाचतां येऊं लागतील. पुष्कळवेळा असें होतें कीं, वाचन शिकवितांना हा क्रम— म्हणजे प्रथम अक्षरें ओळखावयास शिकविणें, नंतर शब्द एकदम वाचावयास शिकविणें, व नंतर वाक्यें वाचावयास शिकविणें—हा बरोबर रीतीनें न पाळतां अक्षरओळख साधारण अथवा चांगली झाल्या बरोबर मुलांस एकदम सर्व मजकूर एकसारखा वाचीत जाण्यास सांगतात परंतु ही पद्धती चुकीची आहे. पुष्कळ मुलें वाचतांना अडखळतात, ह्याचें मुख्य कारण हेंच असतें. सगळा शब्द ध्यानांत आणून एकदम वाचण्याची त्यांस संवय लाविलेली नसल्यामुळें वाचनाला आरंभ करण्याबरोबर तीं एकदम सर्व मजकूर वाचावयास जातात, व शब्दांचें आकलन बरोबर होत नसल्यामुळें अडखळतात.

शब्द वाचतां वाचतांच वाक्यें अडखळल्याशिवाय वाचतां येऊं लागलीं, म्हणजे मुलांस विराम चिन्हांची माहिती करून द्यावी. व कोणत्या चिन्हापाशीं कसें व किती थांबावयाचें वगैरे आवश्यक गोष्टी त्यांस सांगाव्या. ह्या संबंधानें नुसत्या तोंडच्या माहितीवर अवलंबून न राहतां चारपांच वाक्यें प्रथम आपण मुलांस वाचून दाखवावीं. नंतर तीं एक एकाकडून वाचून घ्यावीं, व मुलगा वाचीत असतां विराम-चिन्हांशीं थांबण्याच्या संबंधानें वगैरे त्याच्या ज्या चुका होत असतील त्या सुधारून त्याजकडून पुन: तींच वाक्यें वाचवावीं. असा प्रकार मुलाला योग्य रीतीनें वाचतां येऊं लागेपर्यंत चालू ठेवावा. ह्या कामीं रोज एकसारखी मेहनत करण्याची जरूर नाहीं. निरनिराळ्या चिन्हांशीं निरनिराळ्या तऱ्हेचे उद्गार कसे काढावयाचे ही गोष्ट थोड्या दिवसांच्या एक सारख्या मेहनतीनें लवकरच त्यांच्या ध्यानांत राहील. त्या नंतर ह्या गोष्टीकडे मुलें दुर्लक्ष करीत नाहींत, इतकें आपलें लक्ष असलें

म्हणजे पुरे आहे. ह्या बाबींत विशेष चुका म्हणजे घाई घाईनें वाचीत जाणें, व पूर्णविरामाजवळ्हेल काढून वाचणें, ह्या फार होतात. याकरितां त्या न होऊं देण्यासाठीं शिष खबरदारी ध्यावी.

अशा रीतीनें वाचावें हसें हें मुलांस समजूं लागलें म्हणजे पुष्कळ मजकूर त्यांजकडून वाला जाईल अशी युक्ती शिक्षकानें योजिली पाहिजे. मुलांस घरीं वाचू आणण्यासाठीं धडा नेमून देणें, हा उपाय हल्लीं सर्वत्र चालू आहे. रंतु त्यांत चांगलें यश येत असतें असें दिसत नाहीं. मुलांस घरीं वाचून आणण्याकारितां नेमून दिकेला धडा मुलांनीं शिक्षकाच्या सांगण्याप्रमां वाचून आणिला, असें सहसा होत नाहीं. घरीं वाचून न आल्याबक्त त्यांस कितीही शिक्षा केली तरी तिचा काहीं एक उपयोग होत नाहीं वास्तविक पाहतां ह्या कामीं सक्तीचा उपयोग करणें हेंच चुकीचें आं. वाचण्याची गोडी लागल्याशिवाय मुलगा आपण होऊन वाचावया कधींही बसणार नाहीं. याकरितां वाचण्याची गोडी लावणें हाच ह्याकामीं विशेष खात्रीचा उपाय आहे. ही गोडी लागण्याचे दोन उपाय दितात- एक, वाचलेलें समजण्याचें सामर्थ्य मुलांच्या आंगीं आलें पाहिजे; व स्तरा जो धडा वाचावयाचा तो मनोरंजक असला पाहिजे. दोहोंपैकीं पहिलउपाय लवकर साध्य होण्यासारखा नाहीं. शाहण्या शिक्षकाच्या सतत प्रयत्नांनीं वाचलेला मजकूर ध्यानांत ठेवण्याचें सामर्थ्य हळू हळू वाढत जाईल ण त्याला जरा उशीरच लागेल. परंतु दुसरी गोष्ट सहज साधण्यासारखी ाहे. इसापनीतीसारखीं मनोरंजक पुस्तकें ह्या वेळेस मुलांस वाचावया दिलीं तर फार उपयोग होईल. इसापनीतीचें पुस्तक पहिल्यानें वाचायास द्यावें, व तें वाचून झाल्यानंतर बाळमित्र हें पुस्तक वाचावयास ावें. हीं दोन पुस्तकें वाचून झाल्यावर वाचनाची कला पुष्कळ चांगल्या रीतीनें साध्य होईल. शिवाय हीं दोन पुस्तकें वाचून होत तोंपर्यंत मजकूर ध्यानांत ठेवण्याचें मुलांचें सामर्थ्यही हळू हळू आपोआप वाढत जाईल.

इसापनीति व बाळमित्र हीं पुस्तकें घरीं वाचण्याचें काम चालू असतां शाळेंत मुलांकडून इयत्तेकारितां नेमिलेलें वाचनपुस्तक वाचून

घेत असावें. प्रत्येक धडा आरंभी शिक्षकानें स्वतः वर्गांत वाचावा. नंतर आरंभापासून एक एक वाक्य पुनः सावकाश व क्रमानें वाचीत जावें. व वाचतां वाचतांच ज्या शब्दाचा अर्थ मुलांस समजणार नाहीं, असें शिक्षकाला वाटेल, त्यांचा अर्थ मुलांस आणच सांगावा. शब्दाचा अर्थ सांगावयाचा म्हणजे एका शब्दाबद्दल दुसरा शब्द उच्चारिला असतां आपल्याला त्याच्या अर्थाचा जो बोध होतो तो मुलांना झाला पाहिजे. एका शब्दाबद्दल तितकाच कोण असा दुसरा शब्द घोकावयास लाविला म्हणजे काम झालें असें समजूं नये. याकरितां निरनिराळ्या युक्त्या योजून अनेक मार्गांनीं व विशेषेंकरून अनेक प्रकारचीं उदाहरणें देऊन कठीण शब्दांचा व वाक्यांचा अर्थ मुलांच्या मनांत पूर्णपणें ठसेल असे करावें. इतिहासांतले अथवा भूगोलांतले शब्द येतील तेथें त्यांच्या समजुतीकरितां बाहेरची आणखी जरूर असेल ती माहिती सांगावी. ज्या वाक्याचा अर्थ सहज ध्यानांत येण्यासारखा नसेल तें वाक्य नीट समजावून द्यावें. ह्या रीतीनें सर्व धडा एकदां वाचून झाल्यावर पुनः तोच धडा वर्गांत आपणच मोठ्यानें वाचावा; व वाचितांना त्यांतील शब्दांचा व वाक्यांचा अर्थ मुलांस विचारावा. जेथें त्यांस तो सांगतां येणार नाहीं तेथें तो पुनः सांगून बऱ्याच मुलांकडून तो वदवून घ्यावा. असें केलें म्हणजे तो धडा त्यांस चांगला समजला असें होईल.

वर लिहिलेल्या रीतीनें धड्याची चांगली समजूत झाली म्हणजे मग तो वाचून आणावयास सांगावें. धड्याचा अर्थ त्यांस समजलेला असल्यामुळें तीं तो धडा बहुधा गोडीनें वाचतील. मग दुसऱ्या दिवशीं तो वर्गांत नुसता वाचून घेण्याचेंच काम करावें. ह्या वेळीं विरामचिन्हांशीं नीट थांबणें, योग्य शब्दांवर विशेष जोर देऊन वाचणें, वगैरे गोष्टी सुधारण्याकडेच मुख्यत्वेंकरून लक्ष द्यावें. जेथें मुलांस चांगलें वाचतां येणार नाहीं तेथें नुसतें तोंडीं ' अमक्या शब्दावर जोर दे, ' ' अमक्या ठिकाणीं पुष्कळ थांब, ' ' हेल काढूं नको, ' अशा प्रकारें हुकूम बजावीत न राहतां, आपण स्वतः वाचून दाखवून कोठें कसा जोर द्यावयाचा, कसें थांबा

वधाचें, वगैरे गोष्टींची जेथ्या तेथें समजूत करून द्यावी. म्हणजे आपण ज्या गोष्टी त्यांस सांगूं त्या मुलांस लवकर समजून चांगल्या रीतीनें ध्यानांत राहतील.

वाचनाच्या पुस्तकांतील धड्यांतल्या शब्दार्थांचीं पुस्तकें हल्लीं पुष्कळ झालीं असून त्यांचा उपयोग करण्याची चाल बरीच चालू आहे. अशा पुस्तकांचा उपयोग मुलांना करूं देणें हें मुलांच्या बुद्धीला फार विघातक आहे. ह्या पुस्तकांचा उपयोग केल्यानें कदाचित् मुलाना पोपटपंची उत्तम करितां येईल, परंतु खरें अर्थ-ज्ञान खचीत होणार नाहीं. अर्थाचीं पुस्तकें जवळ असलीं म्हणजे शिक्षक व मुलें ह्या दोघांचेंही अर्थज्ञान करून देण्याच्या व घेण्याच्या कामीं फार दुर्लक्ष होत असतें. मुलांजवळ पुस्तकें आहेत ह्या भरंवशावर शिक्षक लोक अर्थ समजावून देण्याची फारशी—किंबहुन मुळींच—खटपट करीत नाहींत, व एखादा शिक्षक मुलांस अर्थ समजावून सांगूं लागला तरी आपल्या जवळ अर्थाचीं पुस्तकें आहेत, असें समजून मुलें ही शिक्षकाच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करितात. फार झालें तर मुलें पुस्तकांतून शब्दास शब्द तेवढे पाठ करून ठेवितात. परंतु वाचलेला भाग समजण्याचें मुलांचें सामर्थ्य वाढणें हा जो वाचनाचा मुख्य उद्देश तो मुळींच सिद्धीस जात नाहीं. या खेरीज हीं पुस्तकें कोणी तरी कशीं तरी छापलेलीं असतात. त्यांतले अर्थ बिनचूक व चांगले योजलेले असावे, इकडे छापणारांचें लक्ष नसतें. असें असून ही छापलेल्या पुस्तकांतील अर्थावर मुलांचा शिक्षकानें सांगितलेल्या अर्थापेक्षाही विशेष भरंसा असतो, यामुळें त्यांत असलेल्या चुकांपासून घातक परिणाम होतो. यासाठीं असलीं पुस्तकें अवश्य टाळावीं हें उत्तम

शब्दार्थांचीं पुस्तकें मुलांजवळ असूं नयेत, असें वर लिहिलें आहे, इतक्यावरून मुलांजवळ शब्दांचा अर्थ समजण्याचें कांहींच साधन असूं नये, असें मात्र समजूं नये. चौथ्या इयत्तेपासून पुढील इयत्तांमध्यें मुलांजवळ स्वतः त्यांनीं लिहिलेल्या शब्दांच्या अर्थांच्या वह्या जरूर असल्या पाहिजेत. पण त्या शिक्षकानें अर्थ सांगून मुलांकडून लिहून घ्याव्या. दुसरी व तिसरी ह्या इयत्तांत मात्र अशा तऱ्हेच्या वह्यांची जरूर नाहीं. त्या इयत्तां-

मध्यें पूर्वी लिहिलेल्या पद्धतीनें शिक्षकानें मुलांकडून वर्गांतच पुनः पुनः सांगून व विचारून शब्दांचे अर्थ तयार करून घ्यावे. यासाठीं शिक्षकानें योग्य वाटल्यास स्वतः वही तयार करावी, किंवा वर्गांत एखादा विशेष हुषार मुलगा असल्यास त्याच्याकडून तयार करवावी. वाचून तयार करण्याचा भाग ह्या इयत्तांतून थोडाच असतो. याकरितां तो वर्गांत शब्द विचारून विचारून सहज चांगला तयार होतो. शिवाय ह्या इयत्तांतल्या मुलांकडून वह्यावर शब्दांचा अर्थ नीट नेटक्या रीतीनें लिहून घेणें ही गोष्ट त्यांना अत्यंत त्रासदायक, किंबहुना त्यांच्या शक्तीच्या बाहेरची आहे. याकरितां तो विचारच मनांत आणणें चांगलें नाहीं. चौथ्या इयत्तेपासून पुढें मात्र अशा शब्दांच्या वह्या मुलांजवळ जरूर असाव्या. वाचून तयार करण्याचा नेमलेला भाग ह्या इयत्तांतून पुष्कळ असल्यामुळें दुसऱ्या अगर तिसऱ्या इयत्तेप्रमाणें केवळ वर्गांत तोंडीं सांगून व विचारून अर्थ तयार करून घेण्याचें काम होणार नाहीं. थोडा थोडा विषय घरीं तयार करून आणण्याकरितां नेमून देणें जरूर पडेल; व तसा नेमून दिल्यावर अर्थात त्यांचेपाशीं शब्दार्थांच्या वह्या असल्या पाहिजेत. ह्या वह्या तयार करविणें त्या मात्र चांगल्या काळजीनें तयार करविल्या पाहिजेत. एक एक धडा वर्गांत मोठ्यानें वाचून त्यांतील ज्या शब्दांचा अर्थ मुलांस लिहून घेणें जरूर आहे असें वाटेल, त्यांचा अर्थ त्यांस निराळा सांगावा. मुलांनीं आपल्या नोटबुकांत तो लिहून घ्यावा. एका धड्यांतले सर्व शब्द अशा रीतीनें सांगितले म्हणजे मुलांनीं ते घरीं दुसऱ्या वहीवर चांगले नीट नेटके व्यवस्थितपणें लिहून आणावे. वर्गांत शब्द सांगत असतांच शिक्षकानें प्रत्येक शब्द शुद्ध रीतीनें कसा लिहावयाचा तें सांगावें. कित्येक कठीण शब्द फळ्यावर लिहून दाखविण्याचीही जरूर पडेल. म्हणजे मुलें त्याप्रमाणें लिहून घेतील. असें केलें म्हणजे मग घरून लिहून आणिलेल्या वह्यांत फारसें अशुद्ध राहणार नाहीं. मुलांनीं घरून वह्या लिहून आणिल्यानंतर त्या शुद्ध रीतीनें लिहिल्या आहेत किंवा नाहीं तें पाहण्याकरितां त्या पुनः शाळेंत तपासाव्या.

# जाहीरखबर.

## पुणें ट्रेनिंग कॉलेजाची

## प्रवेश—परीक्षा.

—=०:*:०=—

१. पुणें ट्रेनिंग कालेजांत पाठविण्याकरितां जिल्ह्यांच्या डे. ए. इन्स्पेक्टर साहेबांनीं निवडलेल्या उमेदवारांची प्रवेश-परीक्षा चालू सालीं गुरुवार तारीख ५ दिसेंबर सन १९०१ इसवी रोजीं सुरू होईल. तर त्या दिवशीं सकाळीं मद्रास ११ वाजतां उमेदवारांनीं पुणें ट्रेनिंग कॉलेजांत हजर व्हावें. या खेपेस सुमारें ६० इसम नवीन घ्यावयाचे आहेत.

२. परीक्षा सहाव्या इयत्तेच्या विषयांत होईल. शुद्धलेखन आणि अक्षर यांकडे विशेष लक्ष दिलें जाईल.

३. उमेदवारांत दृष्टी, बोलचाल इत्यादिकांसंबंधें व्यंग नसावें. व्यंग असल्यास अशा उमेदवारांस घेतलें जाणार नाहीं.

४. उमेदवारांनीं आपल्याबरोबर चांगल्या वर्तणुकीबद्दल आपल्या हेडमास्तरांचा दाखला आणावा, आणि पब्लिक सर्व्हिस परीक्षा पास झाल्याचें सर्टिफिकीटही आणावें. हे दाखले आणण्यास चुकूं नये.

५. आंगांतील कपडे व आंथरूण पांघरूण अशीं बरोबर आणावयाचीं; त्यांत आंगाबरोबर घालावयास दोन गरम कपडे, एक जाड पासोडी व कांबळा इतकीं जरूर आणावीं.

६. त्याप्रमाणेंच पुस्तकें आणावयाचीं त्यांत पुढें लिहिलेलीं पुस्तकें अवश्य असावीं. बाळबोध पुस्तकें १ तें ४. मोडी पुस्तकें १ ते ३. हिंदुस्थानचा इतिहास—मुंबई इलाखा, हिंदुस्थान व पृथ्वी यांचीं वर्णनें.

७. वर सांगितलेल्या पुस्तकांशिवाय इतर पुस्तकें व चित्रकलेचें सामान वगैरे घेण्याकरितां प्रत्येक इसमानें परीक्षेच्या समयीं १० रुपये डिपाझिट ठेविले पाहिजेत. ज्यास कालेजांत घेतलें जाणार नाहीं, त्या इसमाचें डिपाझिट परत केलें जाईल.

पुणें, ट्रेनिंग कालेज,
ता. १३ माहे जुलई सन १९०१ इ०

*K. G. KELKAR.*
प्रिन्सिपल पुणें ट्रेनिंग कॉलेज.

मध्यें पूर्वी लिहिलेल्या पद्धतीनें शिक्षकानें मुलांकडून वर्गांतच पुनः पुनः सांगून व विचारून शब्दांचे अर्थ तयार करून घ्यावे. यासाठीं शिक्षकानें योग्य वाटल्यास स्वतः वही तयार करावी, किंवा वर्गांत एकादा विशेष हुषार मुलगा असल्यास त्याच्याकडून तयार करवावी. वाचून तयार करण्याचा भाग ह्या इयत्तांतून थोडाच असतो. याकरितां तो वर्गांत शब्द विचारून विचारून सहज चांगला तयार होतो. शिवाय ह्या इयत्तांतल्या मुलांकडून वह्यावर शब्दांचा अर्थ नीट नेटक्या रीतीनें लिहून घेणें ही गोष्ट त्यांना अत्यंत त्रासदायक, किंबहुना त्यांच्या शक्तीच्या बाहेरची आहे. याकरितां तो विचारच मनांत आणणें चांगलें नाहीं. चौथ्या इयत्तेपासून पुढें मात्र अशा शब्दांच्या वह्या मुलांजवळ जरूर असाव्या. वाचून तयार करण्याचा नेमलेला भाग ह्या इयत्तांतून पुष्कळ असल्यामुळें दुसऱ्या अगर तिसऱ्या इयत्तेप्रमाणें केवळ वर्गांत तोंडीं सांगून व विचारून अर्थ तयार करून घेण्याचें काम होणार नाहीं. थोडा थोडा विषय घरीं तयार करून आणण्याकरितां नेमून देणें जरूर पडेल; व तसा नेमून दिल्यावर अर्थात त्यांचेपाशीं शब्दार्थांच्या वह्या असल्या पाहिजेत. ह्या वह्या तयार करविणें त्या मात्र चांगल्या काळजीनें तयार करविल्या पाहिजेत. एक एक धडा वर्गांत मोठ्यानें वाचून त्यांतील ज्या शब्दांचा अर्थ मुलांस लिहून घेणें जरूर आहे असें वाटेल, त्याचा अर्थ त्यांस निराळा सांगावा. मुलांनीं आपल्या नोटबुकांत तो लिहून घ्यावा. एका धड्यांतले सर्व शब्द अशा रीतीनें सांगितले म्हणजे मुलांनीं ते घरीं दुसऱ्या वहीवर चांगले नीट नेटके व्यवस्थितपणें लिहून आणावे. वर्गांत शब्द सांगत असतांच शिक्षकानें प्रत्येक शब्द शुद्ध रीतीनें कसा लिहावयाचा तें सांगावें. कित्येक कठीण शब्द फळ्यावर लिहून दाखविण्याचीही जरूर पडेल. म्हणजे मुलें त्याप्रमाणें लिहून घेतील. असें केलें म्हणजे मग घरून लिहून आणिलेल्या वह्यांत फारसे अशुद्ध राहणार नाहीं. मुलांनीं घरून वह्या लिहून आणिल्यानंतर त्या शुद्धरीतीनें लिहिल्या आहेत किंवा नाहीं तें पाहण्याकरितां त्या पुनः शाळेंत तपासाव्या.

# जाहीरखबर.

## पुणें ट्रेनिंग कॉलेजाची

## प्रवेश—परीक्षा.

—=०:*:०=—

१. पुणें ट्रेनिंग कालेजांत पाठविण्याकरितां जिल्ह्यांच्या डे. ए. इन्स्पेक्टर साहेबांनीं निवडलेल्या उमेदवारांची प्रवेश-परीक्षा चालू सालीं गुरुवार तारीख ५ दिसेंबर सन १९०१ इसवी रोजीं सुरू होईल. तर त्या दिवशीं सकाळीं मद्रास ११ा। वाजतां उमेदवारांनीं पुणें ट्रेनिंग कॉलेजांत हजर व्हावें. या खेपेस सुमारें ६० इसम नवीन घ्यावयाचे आहेत.

२. परीक्षा सहाव्या इयत्तेच्या विषयांत होईल. शुद्धलेखन आणि अक्षर यांकडे विशेष लक्ष दिलें जाईल.

३. उमेदवारांत दृष्टी, विचार इत्यादिकांसंबंधें व्यंग नसावें. व्यंग असल्यास अशा उमेदवारांस घेतलें जाणार नाहीं.

४. उमेदवारांनीं आपल्याबरोबर चांगल्या वर्तणुकीबद्दल आपल्या हेडमास्तरांचा दाखला आणावा, आणि पब्लिक सर्व्हिस परीक्षा पास झाल्याचें सर्टिफिकीटही आणावें. हे दाखले आणण्यास चुकूं नये.

५. अंगांतील कपडे व अंथरूण पांघरूण अशीं बरोबर आणावयाचीं; त्यांत अंगाबरोबर घालावयास दोन गरम कपडे, एक जाड पासोडी व कांबळा इतकीं जरूर आणावीं.

६. त्याप्रमाणेंच पुस्तकें आणावयाचीं त्यांत पुढें लिहिलेलीं पुस्तकें अवश्य असावीं. बाळबोध पुस्तकें १ तें ४. मोडी पुस्तकें १ ते ३. हिंदुस्थानचा इतिहास—मुंबई शाखा, हिंदुस्थान व पृथ्वी यांचीं वर्णनें.

७. वर सांगितलेल्या पुस्तकांशिवाय इतर पुस्तकें व चित्रकलेचें सामान वगैरे घेण्याकरितां प्रत्येक इसमानें परीक्षेच्या समयीं १० रुपये डिपाझिट ठेविले पाहिजेत. ज्यास कालेजांत घेतलें जाणार नाहीं, त्या इसमाचें डिपाझिट परत केलें जाईल.

| | |
|---|---|
| पुणें, ट्रेनिंग कालेज, ता. १३ माहे जुलई सन १९०१ इ० | *K. G. KELKAR.* प्रिन्सिपल पुणें ट्रेनिंग कॉलेज. |

## विक्रीस तयार. किं १२ आणे.

मेहेरबान लिव्हारनर साहेब यांनीं इंग्रीत लिहिलेले सिटीझन आफ इंडिया या पुस्तकांचे मराठी भाषांतर छापून विक्रीस तयार आहे. व हे बुक डा. आ. प. ई. यांनीं मराठी ५।६ तकरितां नेमले आहे.

म्याकमिलन आणि कंपनी.
१२ ब्यॉंक स्ट्री. मुंबई.

---

## विक्रीस तयार

लांगमनचे मोडी कित्ते नंबर १-२-३-४ यांबरहुकूम लाइन पेपर तयार आहेत. लहान मुलांस त्याखालीं दिलेल्या दोन किंवा तीन रेषांवरून वळण वळविलें असतां नीट हात बसत नाहीं यासाठीं अक्षर वळविण्यास यांचा उपयोग होईल.

दर १०० कागदांस ८५.

म्यानेजर चि० शा० प्रे० पुणें.

---

## चित्रलेखन मूलतत्व (पुस्तक पहिलें)

सतत पंचवीस वर्षें ड्रॉइंग शिकविण्याच्या अनुभवावरून ज्या ज्या गोष्टी विद्यार्थ्यांस प्रथम शिकविणें अवश्य केलें त्या सर्व शास्त्रीय नियमानें पद्धतशीर बसवून हें पुस्तक तयार केलें आहे. पुस्तकाची किंमत प्रथम सहा आणे ठेविली होती. परंतु कलेचें शिक्षण व अभिरुची आपले देशांत जितकी असावी तितकी नसल्या कारणानें त्याचा प्रसार फार व्हावा व विद्यार्थ्यांस घेण्यास सुलभ जावें करितां याची किंमत अगदींच कमी म्हणजे फक्त अडीच आणे केली आहे. अशा तऱ्हेचें हें मराठींत पहिलेंच पुस्तक आहे. तेव्हां सर्वांनीं याचा उपयोग करून घ्यावा अशी आमची शिफारस आहे.

हें पुस्तक मे. विद्याखात्याचे डायरेक्टर स. बा. यांनीं मराठी शाळांकरितां व मराठी शाळांचे लायब्ऱ्यांकरितां आपले मेमो नंबर ६०९४ तारीख १. १२. १९०५ मध्यें पास केलें आहे. कळावें.

म्यानेजर चित्रशाळा छापखाना,
पुणें सिटी.



---

प्रकाशक—शंकर नरहर जोशी.

Wai Vaig Vachanalaya

September 19

Registered No B 179



पुस्तक १२ | अंक ९


सन १९०१ | माहे सप्टेंबर

# मराठी शालापत्रक

# Marathi School Paper

## विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| प्रतिमासिक स्फुट विचार.. ... ... ... ... | २०९ |
| –व्याकरण शिकविणें–मुलांस शिक्षा देणें–शिक्षण पद्धतीचा विचार— ... ... ... ... | |
| सूक्ष्मदर्शक यंत्र... ... ... ... ... ... | २१८ |
| वस्तुपाठ–घरमाशी. ... ... ... ... ... | २२४ |
| काव्य–रत्न-मंजूषा. वसंत- क्रीडा. जन्मांध मुलगा. ... | २२८ |
| पत्रव्यवहार—आकड्यांची मौज. ... ... ... | २३० |
| शिक्षकमित्र--व्याकरण--कविता ... ... ... ... | २५ ते ३२ |


आगाऊ वार्षिक वर्गणी टपालखर्चासह रु० १८२

रा. भि. जोशीकृत.

# बालबोध मराठी व्याकरण.

याची पुष्कळ जास्त माहिती घालून सुधारलेली दुसरी आवृत्ती.

चित्रशाळेंत विक्रीस तयार आहे. पृष्ठसंख्या १८०.

किंमत ८५ आणे ट० ख० ८१.

---

# जाहिरखबर.

## पुणें ट्रेनिंग कॉलेजाची

## सर्टिफिकेट—परीक्षा.

चालू सालीं पुणें ट्रेनिंग कॉलेजाची सर्टिफिकेट—परीक्षा मंगळवार तारीख १ आक्टोबर सन १९०१ इ० रोजी सकाळीं मद्रास १० वाजतां सुरू होईल. कळावें, तारीख १३ माहे जुलई सन १९०१ इ०.

*K. G. KELKAR.*

प्रिन्सिपल, पुणें ट्रेनिंग कॉलेज.

# जाहिरात.

## पुणें ट्रेनिंग कॉलेजाची

## ड्राइंगची परीक्षा.

जाहीर करण्यांत येतें कीं—मुंबई येथील स्कूल ऑफ् आर्ट कडून ट्रेनिंग कॉलेजा कारितां होणारी "फर्स्ट ग्रेड ड्राइंग" ची परीक्षा सोमवार तारीख ७ माहे आक्टोबर सन १९०१ इ० रोजीं सकाळीं ९ वाजतां पुणें येथें हायस्कुलांत सुरू होईल. तरी ज्या मास्तरांस सदर परीक्षेस बसावयाचें असेल त्यांनीं आपले अर्ज तारीख १ सप्टेंबर सन १९०१ इ० रोजीं किंवा त्यापूर्वीं आम्हाकडे पोंचतील असे पाठवावे. अर्ज पुढे आल्यास घेतले जाणार नाहींत. अर्ज आमच्या नांवचे असावे. व त्यांत अर्जदार सदर परिक्षेस पूर्वी बसला असल्यास तो कोणत्या सालच्या कोणत्या महिन्यांत बसला व कोणत्या विषयांत पास झाला हें त्यानें स्पष्ट लिहावें. त्यानें आपलें वय व जात हीं अर्जांत नमूद करावीं. कळावें.

पुणें, ट्रेनिंग कॉलेज.
ता. १३ जुलई सन १९०१ इ.

*K. G. KELKAR.*

प्रिन्सिपल, पुणें ट्रेनिंग कॉलेज.

# शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यांसी । हें अवघें सद्गुरूपाशीं।
सद्गुरू पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळां जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १५ सप्टेंबर १९०१. अंक ९.

# प्रतिमासिक स्फुट विचार.

व्याकरण शिकविणें.

आजच्या अंकांत दुसरीकडे 'शिक्षणमित्र' या विषयामध्यें व्याकरण शिकविण्याविषयीं ज्या सूचना दिल्या आहेत, त्यांमध्यें व्याकरणाच्या व्याख्या व लक्षणें मुलांकडून नुस्तीं घोकून घेण्याच्या संबंधानें जी टीका केलेली आहे, ती शिक्षकांनीं लक्षांत घेण्यासारखी आहे. व्याकरण अशा रीतीनें शिकविल्यापासून त्याच्या शिक्षणाचा जो मूळचा उद्देश तो एकीकडेसच राहून तो विषय म्हणजे एक प्रकारचें ओझेंच आहे, असें शिकणारास वाटतें. कोणत्याही विषयाच्या संबंधानें लहान शिकणारास असा बाऊ वाटूं लागणें हें फार घातक आहे. व्याकरण शिकविण्याचा मूळ उद्देश काय हें जो ध्यानांत आणील, तो अशा रीतीनें तो विषय वास्तविक कधींही शिकविणार नाहीं. स्वभाषेचें व्याकरण कशासाठीं शिकवावयाचें? स्वभाषा बोलतां येण्यास व्याकरण यावयास हवेंच असतें काय? अर्थात् नको असतें. लहान मोठे सर्व लोक व्याकरण न शिकतां स्वभाषा शुद्ध बोलतात. परंतु खरोखरी विचार करून पाहिलें तर ते व्याकरण शिकत नाहींत काय? तर शिकतात. पण बोलणारे प्रत्यक्ष व्याकरणाचे नियम

शिकत नाहींत तर त्या नियमावरून व्याकरणशुद्ध अशी जी स्वभाषेची रचना आपण संवयीनें करीत असतों, त्या रचनेवरून आपोआप व्याकरणाचे नियम शिकतात. 'तो जात्ये' असें न म्हणतां आपण 'तो जातो' असें शुद्ध म्हणतों, हें व्याकरणाचा नियम लक्षांत न आणतां सहजीं म्हणतों. पण त्यावरून व्याकरणाचा नियम आपणास ठाऊक नसतो असें होत नाहीं. शाळेमध्यें व्याकरण शिकविण्यामध्यें शिक्षकानें ही अशाच रीतीनें, आपण कांहीं नियम शिकत आहों असें शिकणारास वाटूं न देतां व्याकरण शिकविलें पाहिजे. म्हणजे जीं वाचनाचीं पुस्तकें शाळेंत शिकवावयाचीं, त्यांतील भाषेवरून व्याकरणाचे नियम दाखवून द्यावयाचे, व ते मनांत ठसतील असें करावयाचें. या कामांत वास्तविक पाहिलें तर व्याकरण या विषयावरचें ठरींव पुस्तक हें केवळ साहाय्यभूत असें 'नोटबूक' होय. कोणच्याही संसारी मनुष्यास आपणास देणें घेणें कोणाचें आहे, उभ्या वर्षांत काय जमा व्हावयाची आहे, किंवा काय खर्च करावयाचा आहे, हें उत्तम रीतीनें ठाऊक असतें, व तो आठवीत बसला तर सर्व रकमा सहज आठवून सांगेल. पण व्यवहार चोख होण्याकरितां व वेळ व्यर्थ न जाण्यासाठीं घेण्यादेण्याची खातेवही व जमाखर्चाचीं टिपणें ह्या गोष्टी अवश्य ठेवावयाच्या असतात. तद्वत व्याकरणाचीही गोष्ट आहे. व्याकरणाचें व्यवस्थित टिपण भाषेच्या व्यवहारांत उगाच गोंधळ होऊं नये व वेळ व्यर्थ जाऊं नये म्हणून केलें पाहिजे. स्वभाषेचें व्याकरण शिकण्यापासून मुख्य फायदे असे आहेतः—

१ स्वभाषा शुद्ध रीतीनें बोलतां येते.

२ ग्रंथरचनेंत साह्य होतें. नेहमींचे नाहींत असे विषय बोलतांना व लिहितांना नवीन शब्द, समास, वाक्यें वगैरे यांची जरूर असल्यास तीं चटाचट हवीं तशीं बनवितां येतात.

३. व्याकरण असल्याच्या योगानें नियम ठरवीत बसण्यांत वेळ फुकट जात नाहीं. कारण 'आतां येथें कसें बरें लिहावें?' असें आठवीत बसावयास नको असतें. आपणास ठाऊक असतात असेच नियम व्याकरणांत

व्यवस्थेनें लिहिलेले असतात. त्यांच्या साह्यानें हवी तशी भाषेची रचना आपणास करितां येते.

४. व्याकरण शिकल्यानें लहान मुलांना आरंभापासून केवळ बोलण्याच्या भाषेंतल्या उदाहरणांवरून कार्यकारणभाव दाखवून व समजूत करून देऊन विचार करण्याची व विचारशक्तीचा योग्य उपयोग करण्याची संवय लागते. यामुळें कोणीही उगाच वायफळ बोलत नाहीं किंवा लिहीत नाहीं.

५. शब्द जुळले कसे व जुळवावे कसे हें आरंभापासून कळत गेल्यानें त्यापासून प्रथमतः भाषेचा व तदनंतर भाषेंतील ग्रंथसंग्रहाचा इतिहास समजण्याची गोडी वाटूं लागते.

६. ज्यास स्वभाषेंत किंवा एखाद्या अन्य भाषेंत चांगलें निष्णात व्हावयाचें असेल त्यास व ज्याला स्वभाषेंत ग्रंथरचना कर्तव्य असेल त्याला स्वभाषेचें व्याकरण अवश्य शिकलें पाहिजे.

७. ज्याला एकादी परकी भाषा शिकणें असेल, त्याला स्वभाषेचें व्याकरण शिकल्यानें मोठेंच साह्य होईल. इतकेंच नाहीं, तर यासाठीं स्वभाषेचें व्याकरण शिकण्याची जरूरच आहे. या दृष्टीनें पुढें इंग्रजी शिकूं इच्छिणारांनी स्वभाषेचें व्याकरण अवश्य शिकलें पाहिजे.

तेव्हां स्वभाषा झाली तरी तिचें व्याकरण शिकणें अवश्य आहे. मात्र तें जीं पुस्तकें आपण वाचितों त्यांवरून कार्यकारणभावाच्या द्वारें प्रथमारंभीं शिकावें. नियम घोकीत बसून शिकूं नयें, म्हणजे त्याचा कंटाळा येणार नाहीं व तें शिकण्याचें व शिकविण्याचें खरें सार्थक्य होईल.

---

**मुलांस शिक्षा देणें.**

लहान मुलांच्या शाळेत अत्यंत कठीण गोष्ट म्हटली म्हणजे मुलांना शिक्षा देणें ही आहे. या शिक्षा देण्याची मिमांसा शिक्षक लोकांत अगदीं प्राचीन काळापासून चालू आहे, व ती कधींकाळीं संपेल अशी आशा करावयास नको. पुष्कळदां असे बिकट प्रसंग येतात, कीं शिक्षा द्यावी तर क्रौर्य पदरीं येतें, व न द्यावी तर शिस्त बिघडते. तेव्हां मग बिचाऱ्या शिक्षकानें काय करावें? या संबंधानें अनेक

भिन्न भिन्न मतें आहेत. छडीशिवाय विद्या येत नाहीं असें म्हणणारे लोक जसे आहेत, तसेच शिक्षेपासून फायदा नाहीं, तीमुळें मुलें कोडगीं, भित्रीं, खोटसाळ, अशीं होतात, असें ही म्हणणारे लोक आहेत. तेव्हां अशा अडचणीच्या विषयांतून पार पडण्याचा मार्ग म्हटला म्हणजे वेळोवेळीं दोन्ही बाजूंचे शाहणे लोक काय म्हणत आले, व काय म्हणतात याचा विचार करून तारतम्यानें आपला मार्ग ठरविणें हा आहे. यासाठीं शिक्षा देण्याच्या संबंधानें वेळो वेळीं कोण कसे विचार प्रकट करीत असतात, इकडे आपली नजर निरंतर असली पाहिजे. सध्या शिक्षेचे पुढील आठ प्रकार उपयोगांत आहेत. ते थोडक्यांत येथें सांगतों. तत्संबंधाचा सारासार विचार मात्र वाचकांवरच संपवितों.

१. **दोष देणें**—म्हणजे रागें भरणें. शिक्षकाचें वजन मुलांवर असल्यावर, व विद्यार्थी विचारशील आणि जरा पोक्त वयाचे असल्यास अगदीं हलक्या अपराधापासून मोठ्या अपराधापर्यंत या उपायाचा उपयोग होतो. परंतु हा उपाय एकंदरींत फार सौम्य आहे. उपदेश म्हटला कीं तो नेहमीं कोणासही गोड वाटत नाहीं. यामुळें पुष्कळदां हा उपाय निरर्थक होत असतो.

२. **फजीती करणें**—किंवा लाजविणें, हा उपाय प्रथमारंभीं फार उपयोगीं आहे. परंतु मोठाल्या अपराधांस उपयोगीं नाहीं. एकाद्या मुलाचा स्वभाव कसा आहे, त्यास फजीती झालेली कितपत लागते, हें पाहून, व वर्गामध्यें किंवा शाळेंत त्याची कितपत चाहा आहे, हें लक्षांत घेऊन या शिक्षेचा उपयोग करावा. एकाद्या मुलाची वारंवार फजीतीच नुस्ती करीत गेल्यानें तो कोडगा होण्याची भीती फार असते; व मग फजितीही त्यास शिक्षा अशी न वाटतां नेहमींच्या सवयीची गोष्ट होते.

३. **अडकवून ठेवणें**—लहान मुलांस खेळण्याची व मोकळेपणाची हौस असते. यासाठीं खेळण्याचे वेळीं अडकवून ठेवण्याची शिक्षा त्यांस मोठी जरब वाटते. दांडगाई, अनियमितपणा, इत्यादि अपराधांस या

शिक्षेची योजना करावी. कित्येकांचे मतें ही शिक्षा अयोग्य आहे. ही शिक्षा देण्यांत एवढेंच धोरण असलें पाहिजे कीं आपला खेळण्याचा व मौजेचा अमुक वेळ गेला, हें मुलास कळलें पाहिजे. म्हणून त्याचे सोबती दुसरीकडे खेळण्याच्या ऐन रंगांत आहेत, तोंच मुलाची सुटका करावी, म्हणजे खरी शिक्षा आपणास झाली असें मुलांस नेहमीं वाटेल.

४. **आवडता पदार्थ न देणें**—किंवा तो काहीं वेळ अडकवून ठेवणें. या शिक्षेचा असा एक प्रकार कोणीं सांगितला आहे, कीं जी एकादी वाईट गोष्ट करण्याची मुलास आवड असते, ती गोष्टच—अर्थात शक्य असल्यास—तिचा कंटाळा येईपर्यंत करावयास लावणें. उदाहरणार्थ, फौजेंतल्या शिपायास शिक्षा देण्याची अशी चाल आहे, कीं कोणी शिपाई कवायतीच्या वेळीं हंसला, तर त्यास दोन चार तास वारंवार हंसत राहा म्हणून सांगतात; व तसें त्यास करितां न आलें म्हणजे अधिक शिक्षा करितात. अशानें त्याची खोड जाते.

५. **जास्त धडा किंवा काम नेमून देणें**—ही शिक्षा नेमलेला धडा किंवा काम करून न येण्यासाठीं पुष्कळ उपयोगीं पडते. त्रास व कंटाळा ह्या या शिक्षेंतील मुख्य गोष्टी आहेत. परंतु ही वारंवार दिल्यानें शाळेंतल्या नेहमींच्या कामाचाच त्रास वाटणें व कंटाळा येणें या गोष्टींची मोठी भीती आहे.

६. **नंबर खालीं देणें**—नेहमींच्या अपराधांस ही शिक्षा सदोदित उत्तम आहे. पण वाईट कामाबद्दल नंबर खालीं जातो, त्याचप्रमाणें चांगल्या कामाबद्दल वर येतो, असें नियमितपणें ठरलेलें असावें.

७. **शारीर शिक्षा**—हिच्या संबंधानें अनेक प्रकारचीं भिन्न मतें आहेत. तथापि एवढें सर्वसंमत आहे, कीं थोबाडींत देणें, कान उपटणें, केस ओढणें, थापट मारणें, आंगठे धरून किंवा एका पायावर उभें करणें, असले प्रकार वाईट आहेत. त्याचप्रमाणें धिंड काढणें गणेश टोपी घालून शाळेभर फिरविणें, असले प्रकारही मुलांना कोडगे करणारे आहेत. शारीर शिक्षा करण्यासाठीं छडीचा उपयोग करणें हें चांगलें.

छडींचा उपयोग करणें तो ही नवीन, तरूण, रागीट शिक्षकानें करूं नये. तर ही शिक्षा देण्याचें पोक्त, अनुभविक अशा शिक्षकानें किंवा हेडमास्तरानें आपलेकडे ठेवून, आपल्यास राग येऊं न देतां केवळ दाखविण्या पुरता राग आणून गंभीरपणें करावें. त्याच प्रमाणें छड्या मारणें त्या फार थोडे वेळा मारून, अगदीं अपराधानुरूप माराव्या. हेडमास्तरानें छड्या देणें, ही गोष्ट नेहमींच्या प्रचारांतली असूं नये, तर कधीं मधीं घडणारी अशी असावी.

**८. शाळेंतून घालवून देणें**—ही अगदीं शेवटची शिक्षा असून, ती लहान मुलांच्या शाळेंत वास्तविक कधींच अंमलांत यावयाची नाहीं. कारण लहान मुलांस शाळेंतून अगदींच काढून टाकणें म्हणजे त्याच्या जन्माचें मातेरें करणें आहे; व एका अर्थीं ही शिक्षा त्यांचे पालकांस होत असते. तथापि विशेष प्रसंगी या शिक्षेचाही उपयोग करण्याची वेळ येते. ही शिक्षा देणें हें प्राथमिक शाळांच्या संबंधानें तरी जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांच्याच स्वाधीन असलें पाहिजे.

---

चालू शिक्षणपद्धतीचा विचार

आमच्या वाचकांच्या ऐकिवांत कदाचित आलेंच असेल कीं व्हाईसराय साहेब लार्ड कर्झन यांनीं सर्व देशांतला शिक्षणक्रम कसा काय चालला आहे, त्यांत सुधारणा कोणच्या करणें इष्ट आहे व फेरफार कोणचे केले पाहिजेत, याचा विचार करण्यासाठीं सर्व देशांतून विद्याखात्यांतले मोठ मोठे कामगार बोलावून सिमला येथें एक ' कान्फरन्स ' भरविलें. या ' कान्फरन्स 'च्या विचारास आरंभ होण्यापूर्वीं व्हाईसराय साहेब यांनीं भाषण करून कोणच्या गोष्टींचा विचार कर्तव्य आहे, याचें दिग्दर्शन केलें. व्हाईसराय साहेब हे स्वतः मोठे विद्वान असून इंग्लंडमधल्या प्रख्यात युनिव्हर्सिटीमधून सर्व विद्यांच्या शिक्षणक्रमांतून गेलेले आहेत. त्यांनीं आज तीन वर्षें आमच्या इकडील निरनिराळ्या

प्रांतांच्या विद्याक्रमाचें यथास्थित व बारकाईनें अवलोकन करून कशी स्थिति आहे, हें आपल्या मनाशीं ठरविलें आहे, कोणच्याही बाबतींत सुधारणा करण्याच्या संबंधानें व्हाईसराय यांची मनापासून इच्छा असते, व ते तत्संबंधानें प्रयत्न करितात, असें आजपर्यंत आपणास अनेक गोष्टींवरून दिसून आलेलें आहे. आमच्या देशांत आज सुमारें पन्नास वर्षें पाश्चिमात्य-शिक्षणरूपी वृक्षाचें बीजारोपण होऊन तो वाढत आहे. ती वाढ कशी काय चालली आहे, हें या नवीन शतकाच्या व नवीन कारकीर्दीच्या आरंभीं नीटपणें पाहून, जें चांगलें असेल तें ठेवावें, जें नको असेल तें काढून टाकावें, व जें कांहीं नवीन पाहिजे असेल तें घ्यावें, व अशा रीतीनें नवीन लोकशिक्षणपद्धती अमलांत आणावी असा व्हाईसराय यांचा उद्देश आहे. हा आपला उद्देश ते सिद्धीस नेतील यांत शंका नाहीं. व्हाईसराय साहेब यांनीं आपल्या प्राथमिक भाषणांत या सर्व उद्देशांचें दिग्दर्शन केलें आहे. त्यांतील कांहीं भागाचें टिप्पण पुढें देतों. या टिपणामध्यें आम्ही उच्च शिक्षण किंवा युनिव्हरसिटीचें शिक्षण यांच्या संबंधानें व्हाईसराय साहेब जें बोलले ह्याचा सारांश न घेतां केवळ प्राथमिक शिक्षण व एकंदर लोकसमाजाचें शिक्षण, यां संबंधाच्याच विचारांचें मात्र टिप्पण केलें आहे. " आपण अशा थरास येऊन पोंचलों आहों कीं या नवीन शतकाच्या आरंभीं मागील स्थितीचें सिंहावलोकन करून भावी काळांत कसें पाऊल टाकावयाचें हें ठरविण्याचा समय प्राप्त झाला आहे. एक विशिष्ट वर्ग आहे, तो उघड प्रतिपादन करितो कीं शिक्षणक्रम प्रथमतः सुरू करण्यांत चूक झाली व त्याचा परिणाम भयंकर झाला आहे. आमच्या हातून चुक्या झाल्या, हें दिसतच आहे; नाहीं तर परिषद् भरविण्याची अवश्यकताच उत्पन्न झाली नसती. पण आम्हीं संपादन केलेलें यश अनंत पटीनें मोठें आहे. आज आपणांस शिक्षण पद्धतींतील व्यंगांकडे लक्ष देण्यास मी सांगणार असल्यामुळें तसें करण्यांत मी निंदकाच्या पक्षांत जाऊं इच्छितों किंवा शिक्षणाची रचलेली इमारत ढासळून पाडूं इच्छितों,

असें कोणी समजूं नये. इमारतीचा जुना भाग मोडून नवीन रचना करण्याची आपली इच्छा आहे; पण आपण कोठें चुकलों व अदूरदृष्टी कशी घडली हें ठरल्याशिवाय पुनर्रचना घडणें शक्य नाहीं." यानंतर व्हाइसराय घडलेल्या चुकांचा निर्देश करितात. "आम्हीं इंग्रेजी नमुन्यांचें डोळे मिटून अनुकरण केलें व तें अनुकरण अजून पूर्णपणें सुटलें नाहीं, ही पहिली चूक. लंडन युनिव्हरसिटीची प्रतिकृती केली म्हणजे विश्वविद्यालयीन शिक्षण द्यावें तेवढें आम्ही देशास मिळवून दिलें, असें आम्हास वाटलें. अलीकडे आम्ही युरोपांतील उष्णगृहांतून लहान लहान शिक्षणरोपें इकडे रुजविण्याचा प्रयत्न धैर्यानें चालविला आहे. दुसरी चूक म्हटली म्हणजे आम्ही असें मानलें कीं स्वभाषेचें पूर्ण ज्ञान मिळविल्यापूर्वीं इंग्रेजी शिकविलें तरी काम भागेल. कांहीं विषय पाश्चिमात्य बुद्धीस आकलनीय आहेत म्हणून ते व विषय इकडील लोकांस त्याच परिभाषेंत व विधान पद्धतींत ग्रहण करितां येतील, असें आम्हास खात्रीनें सांगण्यांत आलें. तिसरी चूक अशी कीं सरकारी नोकरीचा मार्ग शिक्षण हा ठरवून शिक्षणाची कसोटी परीक्षा ही ठरविण्यांत आली." ह्या चुका दर्शवून लाट साहेब विचारासाठीं मुख्य प्रश्न असे सादर करितातः—"आम्ही बरेंच यश संपादन केलें आहे व बरीच प्रगती झाली आहे. पण आपलें पाऊल खरोखर पुढें पडत आहे काय? ब्रिटीश इंडियांतील लोकसंख्येपैकीं ४५ लक्ष व्यक्तींस आपण शिक्षण देत आहों. हें प्रमाण योग्य किंवा समाधान कारक आहे काय? फी व देणग्या यांच्या १३ लक्ष ६० हजार पौंडाशिवाय आम्ही ११ लक्ष ५० हजार पौंड पब्लीक फंडांतून गेल्यासालीं खर्च केले. ही रकम वाढविली पाहिजे काय? हिंदुस्थान सरकारची एज्युकेशन पालिशी म्हणून कांहीं ठराविक व्यवस्था आहे काय? असल्यास तिचें अवलंबन होतें काय? कोणत्या साधनांचे द्वारें तिचा अवलंब होत आहे. शिक्षणरूपी विशाल व शक्त्युत्पादक यंत्राची देखरेख कोण ठेवतो, किंवा भट्टी पेटल्यावर यंत्राचीं चाकें फिरतील

तशीं फिरतील व यंत्राचा चालक दष्टचा आदळील तसा आदळील असाच बेवंदशाई प्रकार चालला आहे कीं काय ?"

"युनिव्हर्सिटीच्या शिक्षणक्रमांत ज्यास पडावयाचें नाहीं त्यांच्याकरितां व्यापारसंबंधी किंवा इतर प्रकारचें धंदेशिक्षण द्यावयाचें, हा मूळउद्देश आहे. या बाबतींत थोडीशी सुधारणा झाली आहे, पण अडचणी पुष्कळ आहेत. मध्यम वर्गांतील लोकांस असलें शिक्षण अजून विश्वविद्यालयांतील शिक्षणाइतकें महत्वाचें वाटत नाहीं. केवळ चाकरी करण्याचा हेतू मनांत बाळगणाऱ्या किंवा पुढें धंदेशिक्षण वाढविण्याची इच्छा बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांची आपणास सोय केली पाहिजे. प्राथमिक शिक्षणाबद्दलच्या सरकारच्या वचनांचें पालन करणें झालें नाहीं. देशभाषेंतील शिक्षण वाढलें पाहिजे, म्हणजे अज्ञान नष्ट होईल, साधारण लोकसमूहाची स्थिती सुधारेल, दंगेधोपे, गुन्हे यांचें प्रमाण कमी होईल व शेतकऱ्यांचीही स्थिती सुधारेल. धंदेशिक्षणाचाही प्रश्न विचार करण्यासारखा आहे. धंदेशिक्षण म्हणजे काय व त्यापासून देशाचें कसें हित होईल, याबद्दल बराच मतभेद आहे. देशी हुन्नरांचें पुनरुज्जीवन झालें पाहिजे; शेतकीवरील उपजीविकेचें ओझें कमी झालें पाहिजे; जमीनींतील धनोत्पादक साधनांची वाढ झाली पाहिजे; इत्याद्यनेक गोष्टी धंदेशिक्षणानें साध्य करावयाच्या आहेत. अजून नीट पद्धतीवर शाळा स्थापन झाल्या नाहींत. शाळेंत विद्यार्थी आल्याबरोबर त्याला व्युत्पन्न करणार किंवा हुशार धंदेवाला करणार हें ठरवून टाकिलें पाहिजे. त्याला हुन्नरी बनवायाचा असेल तर त्याची हातकामाची गोडी नष्ट न होईल किंवा तो निरुपयोगी न होईल असें शिक्षण दिलें पाहिजे."

या सर्व विचारांवरून व्हाईसरायसाहेब यांच्या शिक्षणसंबंधाच्या हेतूंचें धोरण काय आहे, हें दिसून येईल. या हेतूंप्रमाणें त्यांच्या हातून व्यवस्था घडून आल्यास आमच्या शिक्षणक्रमांत पुष्कळ सुधारणा होऊन, तें हल्लींपेक्षां पुष्कळ ज्यास्त लोकोपयोगी होईल, यांत संशय नाहीं.

---

# सूक्ष्मदर्शक यंत्र:

अलीकडील काळांत दोन उत्कृष्ट यंत्रांनीं मनुष्यास सृष्टींतील असंख्य नवीन व अद्भुत गोष्टींची माहिती करून दिली आहे. यांतलें एक यंत्र दुर्बीण. याच्यायोगानें दूरचे पदार्थ जवळ दिसतात. दुसरें सूक्ष्मदर्शक यंत्र, याच्या योगानें अत्यंत सूक्ष्म पदार्थ दृग्गोचर होतात. या यंत्राच्या योगानें सूक्ष्म सृष्टींतील अत्यद्भुत चमत्कार दृष्टीस पडले आहेत. या यंत्रानें परमेश्वराची शक्ती केवढी अगाध आहे, त्यानें कोणच्या विलक्षण तजविजी केल्या आहेत, व आपण त्याच्या सृष्टींतील एकाद्या कणापुढें देखील कसे अनुरेणुवत् आहों, हें आपणास समजून आपला गर्व नाहींसा होतो, व आपली नास्तिक्य बुद्धी नष्ट होते. या अद्भुत यंत्राच्या रचनेची व त्याच्या उपयोगाची. माहिती प्रत्येकास थोडीशी असणें अवश्य आहे. आजच्या अंकापासून आम्ही फुरसुतीप्रमाणें कित्येक वस्तुपाट देणार आहों. त्यांतील माहिती सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साह्यानें पदार्थ अवलोकन करून दिलेली असेल. याकरितां त्या यंत्राची माहिती प्रथमारंभीं अगदीं थोडक्यांत देतों.

**प्रकाश**—सूक्ष्मदर्शक यंत्राची रचना कळण्यास प्रकाशाचे गुण व त्याची गती यांची थोडी माहिती व्हावयास पाहिजे. या सृष्टीमध्यें सर्वत्र जी पोंकळी आहे तिच्यामध्यें **ईथर** नांवाचा एक पदार्थ पसरलेला आहे. जेथें म्हणून पोकळ जागा आहे, तेथें तेथें हा असतोच. फार तर काय, एकाद्या पोकळींत निर्वात प्रदेश उत्पन्न केला, तरी तेथें देखील **ईथर** हा पदार्थ असतोच. असा हा सर्वव्यापी आहे. याला मराठींत ' आप्त ' असें नांव दिलें आहे. या **ईथर** मधून प्रकाशाच्या लाटा जात असतात. एकादा प्रकाश देणारा पदार्थ असला, कीं त्याच्यामधून प्रकाशाच्या लाटा निघून त्या **ईथर** यामधून सर्वत्र पसरत जातात. प्रकाशदायी पदार्थांपासून प्रकाशाचे किरण सरळ रेषेनें सर्व दिशांनीं पसरत जात असतात. एकाद्या अंधाऱ्या खोलींत एकाद्या खिड-

कींतून कहान फटीच्या वाटेनें प्रकाश घेतला, तर तो काळोखांतून चकचकीत सरळ रेषांनीं खोलींत गेलेला दृष्टीस पडतो, याचा अनुभव सर्वांस आहे.

अशा रीतीनें एकाद्या प्रकाशद पदार्थापासून सर्व दिशांकडे प्रकाश जात जात जितका दूर पोंचतो, तितका कमी होत जातो; व शेवटीं फार लांब अंतरावर अगदींच पोंचत नाहीं. तेव्हां अर्थात तो पदार्थ तेथें अदृश्य होतो. पदार्थांकडून येणारा प्रकाश ज्या स्थळीं पोंचेल, तेथें तो पदार्थ दिसेल; जेथें पोंचणार नाहीं, तेथें दिसणार नाहीं.

प्रकाशाच्या अंगीं दुसरा एक गूण आहे. तो गूण प्रकाशाचें परावृत्त होणें. याला **परावर्तन** असें म्हणतात. रबरी चेंडू एकाद्या ठिकाणीं आपटला तर तो परत वर उठतो. त्याचप्रमाणें प्रकाश एकाद्या ठिकाणीं जाऊन पोंचतो व त्या पदार्थामधून त्यास पलीकडे जातां न आलें म्हणजे तो आल्या मार्गाच्या सरळ रेषेशीं कोन करून त्या मार्गानें परत फिरतो. म्हणजे ईथर मधून आलेल्या प्रकाशाच्या लाटा या अपारदर्शक पदार्थांतून पलीकडे जाऊं शकल्या नाहींत, तरी त्यांच्या जाण्याचा वेग कुंठित होईपर्यंत त्या कोठें तरी जावयाच्या असतात. यासाठीं त्या तेथून पुनः परत फिरून दुसरीकडे पुढें चालू होतात. आपणास पदार्थ दिसतात म्हणजे काय होतें, तर त्या पदार्थावर सूर्याचा प्रकाश पडून तो त्या पदार्थामधून पलीकडे जाऊं शकत नाहीं, म्हणून तेथून फिरून दुसऱ्या दिशेनें जात असतां आपल्या डोळ्यांवर येऊन पडतो व तेथें थांबतो. यामुळें तो पदार्थ आपणास दिसतो. आरशांत पदार्थ कसे दिसतात, हें लक्षांत आणिलें असतां ही गोष्ट नीट समजेल. सूर्यापासून प्रकाश निघून एकाद्या पदार्थावर पडतो. त्या पदार्थांतून प्रकाशास पलीकडे जातां येत नाहीं; म्हणून तो तेथून फिरतो. त्या पदार्थाचे समोर आरसा ठेविला, म्हणजे आरशाचें भिंग अगदीं गुळगुळीत असून स्वच्छ असल्यामुळें

ह्याच्यामध्यें पारदर्शकता फार असते, व त्या आरशाच्या भिंगास पाठीकडे एकाद्या पडद्याप्रमाणें पारा लावलेला असतो व आरसा अपारदर्शक बनविलेला असतो; यामुळें ते प्रकाशाचे किरण केंद्रीभूत होऊन पदार्थाची प्रतिमा पाऱ्याच्या भिंतीवर पडते; यामुळें पहाणारास तो सर्व पदार्थ आरशांत प्रतिबिंबित झालेला दिसतो. ज्या पदार्थावर प्रकाश पडतो, त्याच्या प्रत्येक भागापासून आरशामध्यें प्रकाश-किरण परावृत्त होतात, म्हणून तो पदार्थ सबंध आपल्यास दिसतो. ज्या भागापासून किरण परावृत्त होणार नाहींत त्या भागांचें प्रतिबिंब आरशांत पडणार नाहीं.

आरशास कांच लावलेली असते याचें कारण पारदर्शक पदार्थांत कांच ही उत्तम आहे. सूक्ष्मदर्शक यंत्रांतली किंवा दुर्बिणींतली पारदर्शक कांच मुख्यतः दोन प्रकारची असते. १. मध्योन्नत (convex) म्हणजे जिची पोकळी वर्तुलाकार अशी मधोमध वर आलेली असते; व मध्यनिम्न (concave), म्हणजे जिची पोकळी मधोमध आंत गेलेली असते. अशा कांचांचे आणखी मिश्रप्रकार आहेत, ते पुढील आकृतींवरून स्पष्ट होतील:—



१ २ ३ ४ ५


१. एका बाजूला उन्नत असून दुसरीकडे सपाट. २. एका बाजूला खोल असून दुसरीकडे सपाट ३. दोन्ही बाजूंला उन्नत. ४. दोन्ही बाजूला खोल. ५. एका बाजूला उन्नत व दुसऱ्या बाजूला खोल, म्हणजे चंद्रकोरीसारखी.

मध्योन्नत कांचेमध्यें असा गुण आहे, कीं तिच्यावर किरण पडले कीं ते एकत्र होतात; व मध्यनिम्न कांचेचा गुण असा आहे, कीं तिच्यावर पडलेले किरण एकमेकांपासून दूर होऊन पसरतात किंवा फांकतात. या कांचाचे जे आणखी प्रकार आहेत, त्यांच्याठायीं वरील गुणांच्या मिश्रणानें आणखी ही गुण आलेले असतात. पण त्याचा उल्लेख येथें नको आहे. हे कांचाचे गुण पुढें सूक्ष्मदर्शक यंत्राची रचना समजण्यास उपयोगी आहेत.

**डोळयाची रचना:**—सूक्ष्मदर्शक यंत्र हें डोळयास साह्यभूत आहे, म्हणून प्रथमतः थोडक्यांत डोळयाची रचनाही सांगतों.

एकादी काळोखाची खोली आहे; तींत एका लहान छिद्रांतून आंत प्रकाश घेतला, व तो भिंतीवर पाडला, तर त्यामध्यें बाहेर समोर अललेल्या पदार्थाचें प्रतिबिंब दिसेल. अशाच तऱ्हेची कृती डोळयामध्यें होऊन आपणास पदार्थ दिसतात. आपला डोळा ही अशीच एक लहानगी काळोखाची खोली आहे. तिच्या मागल्या बाजूला काळा पडदा आहे; व समोर एक लहानसें वाटोळें छिद्र आहे. या छिद्रावर दोन्ही बाजूंस मध्योन्नत असलेलें (प्रकार ३) असें भिंग लाविलें आहे. त्यामधून प्रकाश जाऊन, त्याबरोबर समोर असलेल्या पदार्थाचें प्रतिबिंब जातें व काळया पडद्यावर पडतें. हें जें पुढलें छिद्र, यास आपण बाहुली असें म्हणतों व मागला जो काळा पडदा, त्यास जालरूप पडदा ( retina ) असें म्हणतात. कारण हा पडदा दिसण्यांत जाळयासारखा दिसतो.

सोबतच्या आकृतींत अ अ यांच्यामध्यें म्हणजे काळ्या बुबुळामध्यें क ही बाहुली आहे म हें दोन्ही बाजूंस मध्योन्नत असें भिंग आहे; व मागें प प हा पडदा असून ज्ञा हा ज्ञानतंतू आहे. हा कोणत्या पदार्थाचें प्रतिबिंब पडलें आहे हें, म्हणजे डोळयापुढें काय आलें आहे हें मस्तकांतील मेंदूला जाऊन कळवितो;— म्हणजे आपणास पदार्थ दिसतो.



**सूक्ष्मदर्शक यंत्र**—हें यंत्र दोन प्रकारचें असतें, एक साधें व दुसरें मिश्र रचनेचें.

**साधें सूक्ष्मदर्शक यंत्र**—एक कांचेचा गोल घेऊन त्यांत पाणी भरावें. त्यामधून एकादा पदार्थ पाहिला असतां तो बराच मोठा दिसतो. त्याचप्रमाणें मध्यभागीं जाड व सभोंवतीं पातळ होत गेलेलें अशा भिंगांतून पदार्थ पाहिला असतां ही मोठा दिसतो. आशाच प्रकारचें पण

बरेंच जाड असें भिंग घेऊन तें चौकटींत बसविलें कीं साधें सूक्ष्मदर्शक यंत्र झालें. असलीं सूक्ष्मदर्शक यंत्रें पुष्कळ मिळतात, व तीं पदार्थ नीट व स्पष्ट पाहण्यास उपयोगीं पडतात. भिंग मध्यें जितकें जास्त जाड असेल, तितकी त्याची पदार्थ मोठा दाखविण्याची शक्ती अधीक असेल.

एक पातळ पट्टी किंवा भिंग घेऊन मधोमध लहानसें वाटोळें छिद्र पाडावें. त्यामध्यें स्वच्छ पाण्याचा बिंदु धरावा. या बिंदूमधून पट्टी डोळयाशीं अगदीं जवळ धरून पाहिलें असतां पदार्थ मोठा दिसेल. हें ही एक सूक्ष्मदर्शक यंत्रच झालें.

**मिश्र रचनेचें सूक्ष्मदर्शक यंत्रः**—यांत निदान दोन तरी कांचा असतात. एकाला पदार्थाची कांच ( object lense ) असें म्हणतात. हिच्या मध्यें प्रथमतः पदार्थ मोठा होऊन त्याचें वाढलेलें प्रतिबिंब तयार होतें. मग डोळयाजवळ दुसरी कांच (eye-piece) असते, तीमधून तें वाढलेलें प्रतिबिंब आपणास अधीक मोठें होऊन दिसतें. अशा रीतीनें मिश्र-सूक्ष्म दर्शकाचे द्वारें आपणास मोठाच फायदा होतो. पदार्थाच्या भिंगानें मूळचा पदार्थ ४० पट वाढला, व डोळ्याजवळील भिंगाची शक्ती १० पट पदार्थ वाढविण्याची असली, तर मूळचा पदार्थ ४० x १० = ४०० पट मोठा दिसेल. या प्रमाणावर कमी-अधिक शक्तीचीं सूक्ष्मदर्शक यंत्रें बनविलेलीं असतात.


**सूक्ष्मदर्शक यंत्राचें तत्व**—मागें सांगितलेंच आहे, कीं आपल्यास पदार्थ दिसावयाचा म्हटला म्हणजे त्याचें प्रतिबिंब किंवा चित्र डोळयांतील मागल्या काळया पडद्यावर पडलें पाहिजे. या पदार्थाचें प्रतिबिंब ज्या मानानें लहानमोठें या पडद्यावर भासेल,त्या मानानें तो पदार्थ आपणास लहान किंवा मोठा दिसेल.

ज्या मनुष्याची ‘ शार्ट-साईट ’ असते, म्हणजे ज्याच्या उलट्या बाहुल्या आहेत असें आपण म्हणतों, त्याच्या डोळयांची स्थिती अशी असते, कीं त्यास दूरचे पदार्थ त्यांवर पडलेले प्रकाशकिरण फांकून मोठे

दिसतात, व सारखल्यासारखे दिसतात. ते नीट दिसावे, म्हणून ज्याच्या योगानें पदार्थांचे किरण एकत्र होऊन पदार्थ स्पष्ट दिसतील, अशा प्रकारच्या भिंगाची आरशी तो डोळ्यांना लावितो.

सूक्ष्मदर्शक यंत्रांत, अशाच प्रकारची तजवीज असते. प्रथमतः पदार्थ ज्यांतून मोठा दिसेल, अशा प्रकारची कांच लावून पदार्थाची आकृती वाढेल असें करावयाचें. मग तो पदार्थ डोळ्यांस मोठा दिसतो, पण पसरलेला किंवा सारखल्यासारखा दिसतो. मग डोळ्याजवळ दुसरें भिंग ( eye-piece ) लावून तो मोठा व स्पष्ट दिसेल अशी तजवीज करावयाची.

तेव्हां सूक्ष्मदर्शक यंत्र हें 'शार्ट-साईट' करितां लावितात अशाच प्रकारची एक आरशी आहे. सूक्ष्म चमत्कार दिसण्याच्या संबंधानें आपली 'शार्ट-साईट' आहे. तिला ही आरशी लावून पदार्थ पुष्कळ मोठा दिसेल अशी तजवीज करावयाची.



बाजूस सूक्ष्मदर्शक यंत्राचें चित्र दिलें आहे. अ येथें डोळा लावून पहावयाचें. प येथें पदार्थ ठेविला आहे. आ हा एक आरसा असून प हा पदार्थ स्पष्ट दिसण्यासाठीं त्याच्यावर प्रकाश पाडणें हा त्याचा येथें उपयोग आहे. सभोंवताली या यंत्रास साधनीभूत असे अनेक बारिक सारिक जोड दाखविले आहेत.

---


# वस्तुपाट.

—:*:—

## घर-माशी



[ माशी—सुमारे दहापट मोठी ]



[ माशीचा डोळा-सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिलेला ]

पाठासाठीं लागणारें सामान:—मोठ्या प्रमाणावर काढलेलें माशीचें व तिच्या अवयवाचें चित्र; जाड कागदावर चिकटविलेल्या कित्येक माशा; पालथ्या ग्लासाखालीं कोंडलेल्या कित्येक जिवंत माशा; ग्लासभर स्वच्छ पाणी; दोन चार भात, नाचणी किंवा गहूं याच्या ताटांच्या किंवा पेंढ्याच्या पोकळ काड्या; अथवा मुलांची खेळायाची चमड्याची किंवा रबरी नळी, जिच्यांतून मुलें पाणी ओढून घेतात.

[ आपण बारिक सारिक प्राण्यांना कीटक म्हणतों, त्यांस इंग्रजींत इन्सेक्ट्स् ( Insects ) असें नांव आहे, त्यांतला माशी हा प्राणी आहे. हें नांव अन्वर्थक आहे. याचा अर्थ, ज्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे किंवा भाग आहेत असे जीव सर्व कीटकांचीं शरीरें अशीं विभागलेलीं असतात.]

१. घरमाशी ही एक उडणारा कीटक आहे. हिच्या शरीराचे तीन भाग असतात:—( १ ) डोकें, ( २ ) छाती, व ( ३ ) पोट. मधला भाग राखेच्या रंगाचा व मागला भाग फिक्कट काळसर रंगाचा असून त्यावर मधून मधून काळे ठिपके असतात.

२. पाय;—माशीला सहा पाय असतात. प्रत्येकास तीन तीन सांधे असतात. पायांना पंजे असून खालच्या बाजूला गादी असल्यामुळें मऊ असतात, व त्यांवर केंस असतात. माशांना चालतां व धांवतां येतें, पण उडी मारितां येत नाहीं; व पायांस मऊ गादी असल्यामुळें भिंगासारख्या गुळगुळीत पदार्थांवरून, भींतीवरून किंवा छतावरून उलटें चालतां येतें.

प्रत्येक पायास दोन सूक्ष्म पंजे किंवा बोटें असतात; व दोन सूक्ष्म गाद्या असून सभोंवती पुष्कळ केंस असतात. हे केंस पोकळ असून शेवटाकडे एकाद्या नळीप्रमाणें किंवा किल्लीप्रमाणें पोकळ असतात; व त्या द्वारानें आंत वारा ओढून घेतां येतो. या तजविजीनें माशी उलट सुलट कोठें कशीही बसली तरी तिला खालचा पदार्थ ओढून धरितां येतो. ( मुलें किल्लीच्या भोकांतून वारा वर ओढून घेऊन किल्ली ओंठास कशी चिकटवितात हें दाखवावें. तशीच एकादी लोखंडी नळी चिकटवून दाखवावी; व जिवंतें माशा ग्लासाचे आंतल्या बाजूस उलट्या सुलट्या कशा चालतात तें दाखवावें. )

३. **पंख**—सर्व कीटकांस चार चार पंख असतात त्याप्रमाणें माशीसही असावें; परंतु माशीस दोनच पंख असतात. हे पंख फार पातळ व नाजूक, पण माशीच्या सूक्ष्म शरीराच्या मानानें फार चांगले बळकट असतात. ते बहुतेक पारदर्शक असतात. पंखामधून झाडाच्या पानाला असतात तशा बारीक शिरा असतात [ जपानी पंख्याप्रमाणें पंखाची रचना असते; चित्र पहा ]. माशी आपले पंख सारखे हालवीत किंवा फडफडवीत असते. त्यामुळें भोंवतालची हवा हालून 'घूं घूं' आवाज होतो. असा अजमास केला आहे, कीं माशीचे पंख एका सेकंदांत ६०० वेळ हालतात. पण ती जलदीनें उडत असल्यास अधीक वेळही हालतात. अशा प्रकारें माशी तीन मिनिटांत एक मैल प्रवास करिते असा अजमास केला आहे. उडणारे कीटक बहुधा चतुष्पक्ष असतात. पण ज्या ठिकाणीं इतर चतुष्पक्ष कीटकांचे मागले पंख असतात, तेथें माशांना दोहों बाजूंस दोन **वजनें** असतात. हीं वजनें म्हणजे दोन केसांसारखे अवयव असून त्यांच्या शेवटास जाड गांठी असतात. असें दिसतें, कीं हीं वजनें दुसऱ्या दोन निराळ्या पंखांबद्दल असतात. यांतलें एकादें मोडलें असतां माशी लंगडी होऊन बसते.

४. **डोळे**—एकंदर पांच असतात. पैकीं डोक्याच्या दोन बाजूंस दोन मोठे डोळे. असतात यांना प्रत्येकीं चार हजार भिंगें असतात, असा अजमास केला

आहे. या डोळ्याची सूक्ष्मदर्शक यंत्रांतून दिसणारी आकृती धड्याच्या आरंभी दिली आहे. ही आकृती जरी सपाट दिसते तरी वास्तविक हे डोळे ढालीसारखे, ज्यांचा मधला भाग बराच उंच आहे, असे असतात. अशा डोळ्याला इंग्रजींत संमिश्र नेत्र (Compound eyes) असें नांव देतात. या दोन डोळ्यांच्या मध्यें तीन लहान साधे डोळे असतात. प्राण्यांचे डोळे दोन प्रकारचे असताल. एक साधे, म्हणजे ज्यांत एकेकच भिंग किंवा एकावर एक चढविलेला भिंगांचा एकच जोड असतो. अशा डोळ्यानें एका बाजूस मात्र पाहातां येते. चोहींकडे पाहाण्यासाठीं या डोळ्यांमधील बुबुळें हालतात, किंवा डोकें हालवावें लागतें. मनुष्य, चतुष्पाद, व इतर मुख्य मुख्य प्राणी यांचे डोळे असे असतात. दुसरे संमिश्र किंवा खिडक्यांचे डोळे, हे चोहींकडे हालवितां येत नाहींत. परंतु त्यांच्यामध्यें इतकीं असंख्य भिंगें सगळीकडे असतात, कीं त्यामुळें प्राण्यास सर्व दिशांकडे बसल्याजागेवरून पाहतां येतें. कोळी, माशा वगैरे कीटकांना असले डोळे असतात. माशांची दृष्टी इतकी चलाख असते, कीं त्यांना धरण्याचा आपण कसाही प्रयत्न केला तरी त्या सहसा सांपडत नाहींत, याचा अनुभव आपणास नेहमींचा आहेच. [ मुलांना माशी धरण्याच्या अनुभवाची आठवण करून द्यावी ].

५. सोंड.—माशीला तोंडाचे जागीं लांब सोंड असते. हिच्या योगानें ओंठ, जीभ व दांत या तिहींचें कार्य होतें. माशीची खाण्याची पद्धत अशी आहे, कीं साखरेसारख्या पदार्थांत सोंडेमधून लाळ किंवा थुंकी घालून ते प्रथमत: ओला करावा, व मग त्यांतील द्रव सोंडेनें शोषून घ्यावा. अशा रीतीनें माशा पदार्थांत रस उत्पन्न करून तो शोषून घेतात; किंवा पदार्थांतला अगोदरच असलेला ओलावा किंवा रस शोषून घेतात. माशांना साखर, गूळ वगैरे गोड पदार्थ फार आवडतात याचें कारण असें दिसतें कीं ते चटदिशीं ओले होऊन त्यांतला रस शोषून घेतां येतो. [ सोंडेनें पदार्थ कसा शोषून घेतात, हें ताटाची किंवा पेंढ्याची काडी घेऊन तींतून पाणी शोषून घेऊन दाखवावें ].

५. **मिशा.**—डोक्याच्या दोहों बाजूस मिशा असतात. या मिशाप्रमाणें माशीला उपयोगी पडतात. आपण पाहातों कीं या मिशा सारख्या हालत असतात. यावरून हवेंतील अगदीं सूक्ष्म जंतू या मिशांच्या द्वारें निवडून घेऊन खाणें, या गोष्टीकडे यांचा उपयोग होत असेल असें दिसतें.

६. **उत्पत्ती**—माशी कोठें तरी मांसखंडामध्यें प्रत्येक वेळीं सुमारें ऐशीं बारिक बारिक अंडी घालते. हीं अंडी प्रथमतः आपणास अंड्यांची कल्पना आहे त्याप्रमाणें निर्जिवसारखीं असतात; पण मग त्याची अळी बनून सजीवपणा येतो. या अळीला पाय दृश्य नसतात. पण तिला जागेवरून हालतां येतें. ही अळी पांढऱ्या रंगाची असते; ही एकसारखें मांस खात असते, व अशा रीतीनें वाढतें. माशी मांसखंडांतच अंडीं घालिते, यांचें तरी कारण हेंच. मग त्या अळीच्या भोंवतीं एक कवच बनतें. या कवचामध्यें हें अंडें बाह्यतः दिसण्यांत हालचाल नाहीं असें असतें. पण आंतल्या बाजूस अनेक फेरबदल घडत राहून डोकें, पाय, पंख, सोंड वगैरे अवयव बनत असतात. मग थोड्या दिवसांत पूर्ण माशी बनून कवच फोडून बाहेर येते; व आपले बारके पंख उघडून उडून जाते!

७. **श्वासोच्छ्वास**—माशीच्या दोन्ही कुशींमध्यें दोन छिद्रें असतात, त्यांमधून ती श्वासोश्वास करिते. या छिद्रांच्या आंत बारीक नळया असून त्यांच्या तोंडाशीं उघड-झाप होईल अशी तजवीज असते. यामुळें माशी प्रवाही पदार्थांत पडली तर अर्थात श्वासोश्वास बंद होऊन मरेल. पण माशी इतकी चपळ असते व तिची दृष्टी इतकी सूक्ष्म असते, कीं ती सहसा पातळ पदार्थांत पडत नाहीं. माशांना सर्व शरीरभर ज्ञानतंतू असतात. त्यांना इतर मोठाल्या प्राण्यांप्रमाणेंच स्पर्श जाणणें, ऐकणें, वगैरे गोष्टींचें ज्ञान होत असतें.

८. **उपयोग**—दुसऱ्या म्हणजे अंड्यानंतरच्या अळीच्या स्थितींत माशा मृत शरीरांतील घाण खाऊन वाढतात. या योगानें असली घातक घाण फार कमी होते. माशी पूर्ण वाढल्यावर एकसारखी हवेंतील अगदीं सूक्ष्म

कृमी खात असते. ह्या कृमींपैकीं पुष्कळ विषारी व रोगोत्पादक असतात. आपण पाहातों कीं माशी एकाद्या ठिकाणीं बसून पुढील दोन पाय व मिशा या एकमेकांवर घांशीत असते. या वेळीं असले कृमी गट्ट करण्याचाच तिचा व्यापार चाललेला असतो. माशी ही कोळी व इतर बारिक जीव यांचें भक्ष्य आहे. यावरून माशा आपणास फार उपयोगीं आहेत. त्या पदार्थावर बसल्या म्हणजे आपण त्यांस हाकून लावितों. परंतु वास्तविक त्या पदार्थामधील नासका भाग किंवा घाण काढून घेऊन आपलें हितच करित असतात. एकाद्या पदार्थावर किंवा जागेवर माशा पुष्कळ झाल्या कीं तेथें खाण फार आहे असें समजावें, व ती नाहींशी कराण्याचा प्रयत्न करावा. परंतु तेथें जमलेल्या पुष्कळ माशा आपलें काम अंशतः तरी करीत आहेत हें लक्षांत ठेवून त्यांस हाकून लावू नये.

९. तात्पर्य—या वर्णनावरून माशीसारख्या क्षुद्र प्राण्यामध्यें परमेश्वरी शक्तीची केवढी करामत दृष्टीस पडते, हें लक्षांत येईल. अशा क्षुद्र प्राण्याच्या शरीररचनेंत देखील ईश्वरानें कशा विलक्षण आश्चर्यकारक तजविजी करून ठेविल्या आहेत? तसेंच त्या प्राण्याचा आपल्याला व एकंदर सृष्टीला उपयोग तरी केवढा होतो? एकाद्या आळशी, दुष्ट, दुर्व्यसनी अशा मनुष्याचा जगास उपयोग तर नाहींच, पण उलटा दुरुपयोग असतो. पण माशीसारख्या क्षुद्र प्राण्यापासून जगाच्या व्यवहारांत अशा मनुष्यापेक्षां लाखोंपट जास्त काम होतें. व इजा तर बिलकुल कसलीही होत नाहीं. तेव्हां अशा प्राण्याचें वर्णन वाचून मनुष्यानें परमेश्वरास लीन व्हावें, व आपल्या जीविताचें सार्थक करण्यास झटावें. मुलांनीं लक्षांत ठेवावें, कीं माशा धरून लंगड्या करणें, त्यांना सुतें किंवा दोरे बांधून उडविणें किंवा असले खेळ करणें, अथवा त्यांना मारणें हें क्रौर्य तर आहेच; पण खेरीज असल्या उपयुक्त प्राण्यांचा घात करून आपण सृष्टीचें मोठें नुकसान करितों. यासाठीं यांस आपण कधीं ही त्रास देऊं नये.

# काव्य-रत्न-मंजूषा.

## ( १ ). वसंत-क्रीडा.

—:-*-:—

प्रसन्न फुलल्या फुलांसंगतीं मूकबोल बोलूं ।
फुलांसम अंतरंग उमलूं ॥
मंदमंद वाऱ्याच्या झुळुकांसंगें आंदोलूं ।
वायुचा झोंपाळा झोलूं ॥
झुळुझुळु वाहे झरा त्या सवें ताल धरुन चालूं ।
झऱ्याचा सुस्वररव झेलूं ॥
कोमल-चंचल-लतापल्लवीं आनंदें डोलूं ।
पल्लवां संगातीं हेलूं ॥
निरभ्र निश्चल नभोवितानीं दृश्यसार तोलूं ।
भवाचें गूढ कुलूप खोलूं ॥
खळबळणाऱ्या लाटांसह या मनोवृत्ति घोळूं ।
जिवींच्या लाटा कल्लोळूं ॥
किलबिल किलबिल गाती खग त्यां सुस्वर संमेळूं ।
नभींचें गायन संभाळूं ॥
बागडती नाचतीं वांसरें त्यांसंगें मिसळूं ।
मानवी जडतेला चाळूं ॥
रुचिर बालकें हंसती खुलती चला त्यांत खेळूं ।
त्यांसवें चैतन्यीं लोळूं ॥
॥ खेळाया जाऊं ।वसंतीं वसंतसम पोहूं ॥

वा० ब० प०

## ( २ ). जन्मांध मुलगा.

[ साक्या ].

उजेड म्हणतां ! काय असे तो पदार्थ सांगा मातें—,
जन्मापासुनि अंध मी मला तो, मी मुकलों त्यातें.
दृष्टि सुखाची मला कल्पना नाहीं ! काय असे तें ?
डोळस हो अनुभवें जाणते सांगा या अंधातें !

सुंदर ! मोहक ! सुबक ! मनोहर ! म्हणतां दिसतें सारें,
रवि-प्रकाशें उज्वल बघतां वस्तुजात दिसणारें,
कौतुक तुमचें ! प्रकाश रविचा ! मजला काय पदार्थ,
ऊन लागतें रविचें कळतें; नुमजे तुमचा अर्थ,
दिवस रवीचा रात्र रवीची, कसें ? कुणाला ठावें ?
दिवसरात्रिशीं काय रवीला करणें, मज सांगावें.
झोपीं गेलों, रात्र जहाली, खेळें, तेव्हां दिवस;
दिवसरात्रिचा कर्त्ता मी; कां आमंत्रण सूर्यास ?
जोंवर जागा दिवस तोंवरी, रात्र मला मग नाहीं;
रमें वावरें; काय करावें सहस्र तरि सूर्यांहीं ?
कोण सूर्य तो ? कसा नेतसे तुमचा दिवस लयाला ?
न कळे ! मजवरि वाव नसे-का त्याच्या सामर्थ्याला
'गरिब बिचारा हतभागी हा !' मला पाहुनी म्हणतां,
अंधपणाचें दुःख करुनी हळहळतां कळवळतां;
परी कळेना दुःख कशाचें करतां ? कींव कशाची ?
ज्याचें नाहीं ज्ञान, कोठुनी भासे वाण तयाची;
नाहीं काय मला तें नकळे, हाव तयाची नाहीं;
खुशाल माझा काळ जातसे नाहीं तें नसतांही;
नाहीं तें नाहीं हें नमुजे; दुःख तयाचें नाहीं.
नसल्या दुःखास्तव दुःखावें कायम्हणुन जीवांहीं ?
माझें नाहीं—मला नव्हेजें—माझें नच होणारें;
त्यास्तव माझें चित न होवो उगाच विव्हळणारें.
नसल्याची जों हाव लागली नाहीं तोंच सुखांत;
अलभ्यलाभासाठीं तळमळ न करो भंग तयांत
असें आंधळा ! सुखी ! माझिया पुढें काय राजाही ?
नसल्याची जों भूक नव्हे तों उणें न मजला कांहीं. १९.

वा० व० प०

# पत्रव्यवहार.

## आकड्यांची मौज.

वि. वि. भेटीचा पहिलाच आहे प्रसंग. बालक म्हणून झिटकारून देणार नाहीं, तर मजेनें पुन्हां खेळत खेळत येईन. ह्यावेळीं येऊं द्याल अशी खात्री जाणून आलों आहें.

शाळा सोडून घरीं जात होतों. रस्त्यांत एक वृद्ध गृहस्थानें हाक मारिली. त्यानें मला एक हिशेब सांगितला तो:—" १९२२०७, पंध्रा बावीस शून्य सात, केरो पंतोजी आठी आठ " मला अर्थ समजेना, म्हणून त्यानें समजून सांगितलें कीं १९२२०७ ह्या संख्येस कोणत्या संख्येनें गुणिलें असतां गुणाकारांत सर्व आठ आठ येतील? त्या वेळीं मला कसचें सुचतें? सांगेन म्हणून घरचा रस्ता धरला. हिशेब आला नाहीं म्हणून वाईट वाटलें. भोजन झालें आणि ओट्यावर हवा घेत बसलों. मनांत हिशेबाची चर्चा चालली होती. इतक्यांत हेड-मास्तर साहेबांनीं एक नियम शिकविला होता त्याचें स्मरण झालें. नियम साधा, पण मला या वेळीं फार उपयोगी पडला. तो हा कीं " गुणाकार व गुण्य दिले असतां गुणक काढावयाचा "

**रीत:**—गुणाकारास गुणकानें भागावें, येणारा भागाकार गुणक येतो. आजोबानें फक्त गुण्य दिला होता. गुणाकार किती आठ किंवा गुणक किती आकड्यांचा हेंही सांगितलें नव्हतें. मग गेलों घरांत आणि घेतली पाटी-पेन. एक दोन गुणाकार करून पाहतां असा नियम दिसून आला कीं, कोणताही गुणाकार हा त्याच्या गुण्य-गुणकांच्या स्थानाच्या बेरजेइतका किंवा त्यापेक्षां एक कमी इतके स्थानाचा असतो. मग अशी कल्पना केली कीं जर गुणांक एकच स्थानचा असेल तर १९२२०७ यांतील ६ स्थानाइतका येईल किंवा ७ येईल व ते सर्व ८, ८, आठ येतील. अशा सर्व कल्पना मनांत आणून गुणाकारांत ८८८८८८ इतके आठ येतील अशी कल्पना केली व त्यास १९२२०७ ह्या संख्येनें भागिलें. पहिला भाग ९चा गेला बाकी राहूं लागली, तेव्हां आणखी एक आंकडा आठाचा घेतला घेतला व दुसरा भाग ८ चा बसला. पुन्हा बाकी राहिली म्हणून आणखी ८ चा आंकडा घेतला व शेवटीं ४ चा भाग

जाऊन बाकी शून्य राहिलें; व भागाकार ९८४ आला, व हाच प्रस्तुतच्या उदाहरणांतील गुणांक. तेव्हां मी ताळा करून पाहिला. १५२२०७ यास ५८४ गुणिलें तर गुणाकारांत ८,८,८ आठ आठ आलें. तेव्हां मनास आनंद झाला व तसाच उठून आजोबांकडे जाऊन रीतीसुद्धां हिशेब करून दाखविला. त्यास रीत समजली नाहीं. मी उत्तर काढून दिलें, म्हणून त्यास फार समाधान वाटलें. मला शाबासकी दिली. ती मिळाल्यापासून मला इतका हुरूप आला कीं, त्याच्या भरांत तुमचेकडे आलों. गोष्ट क्षुल्लक म्हणून तुम्ही ती मनावर घ्याल किंवा नाहीं, याबद्दल संशयच आहे. कांहीं होवो एकदां मनाला वाटलें कीं, आपणास कळवावें तें मी केलें.

पुढें आणखी घरीं आल्यानंतर १, १, एक २, २, दोन, ३, ३, तीन तीन, ४, ४ चार चार, पांच पांच असे आंकडे गुणाकारांत कसे येतील ! याचा विचार करितां थोडक्यांत सुचलें कीं खालील संख्यांनीं १५२२०७ ह्यास गुणिलें असतां गुणाकारांत १ पासून ९ पर्यंत संख्या येतात जसें:—

| | | |
|---|---|---|
| १५२२०७ | १५२२०७ | १५२२०७×३६५=५५५५५५५५ |
| ×७३ | ×१४६ | १५२२०७×४३८=६६६६६६६६ |
| ४५६६२१ | ९१३२४२ | १५२२०७×५११=७७७७७७७७ |
| १०६५४४९ | २९३०८९८ | १५२२०७×५८४=८८८८८८८८ |
| ११११११११ | २२२२२२२२ | १५२२०७×६५७=९९९९९९९९ |
| १५२२०७ | १५२२०७ | |
| ×२१९ | ×२९२ | |
| १३६९८६३ | ३०४४१४ | |
| ३१९६३४७ | ४४१४००३ | |
| ३३३३३३३३ | ४४४४४४४४ | |

कळावे लोभ असावा ही विज्ञापना.

मुकाम शाळा लासगांव जि० नासिक — उत्तमचंद बाळचंद शेट, विद्यार्थी यत्ता ५

सर्वांनीं आपल्या वह्या आपआपल्या हातांत घेऊन शिक्षकानें आपल्याजवळ एक वही घ्यावी. व त्यानें प्रत्येक शब्द मोठ्यानें वाचून तो कसा लिहावयाचा तें सांगावें, म्हणजे तपासणी लवकर होईल. अशा रीतीनें तपासल्यानंतर मग त्या वह्या शिक्षकानें पाहून त्यांवर आपल्या संक्षिप्त सह्या कराव्या.

अशा रीतीनें मुलांकडून अर्थाच्या वह्या तयार करविणें फारच उपयोगी आहे. मात्र त्या वर लिहिलेल्या रीतीनें काळजीनें तयार करून घेतल्या पाहिजेत. त्यांच्या योगानें मुलांस व्यवस्थितपणें कोणताही मजकूर लिहिण्याची संवय लागून ' एक्झरसाईज बुकें ' ठेवण्याचा जो एक मुख्य उद्देश तो सिद्धीस जाईल. दुसरें या योगानें शुद्ध लिहिण्याच्या संबंधानें बरीच सुधारणा होईल. म्हणजे अनेक प्रकारचे शब्द वारंवार हातून शुद्ध लिहिले गेल्यानें त्यांचा शुद्धपणा मुलांच्या मनांत आपोआप बिंबेल. तिसरें जे शब्द मुलें अशा रीतीनें लिहितील त्यांचा अर्थ त्यांच्या मनांत वह्या लिहीत असतां वारंवार येऊन तो बहुतेक पाठ झाल्यासारखा होईल. तेव्हां असा निरनिराळ्या तऱ्हेनें ह्या वह्या ठेवण्यांत फायदा असून शिवाय शब्दार्थ मुलांजवळ लिहिलेला असावा हा जो आरंभींचा हेतू तोही त्यांत साध्य होत आहेच. शब्दार्थाचीं आयतीं बुकें मुलांनीं विकत घेतल्यानें यांपैकीं कितीशा गोष्टी साध्य होतील याचा विचार शिक्षकांनीं जरूर करावा.

वाचनाचे धडे शिकविण्याची पद्धती पूर्वी लिहिली आहे; त्याप्रमाणें ती वरील इयत्तांतून देखील चालू असावी. म्हणजे प्रथम शब्दांचा अर्थ तयार करविणें, नंतर कठीण वाक्यें समजावून देऊन धड्याच्या एकंदर अर्थाची समजूत करून देणें, व नंतर तो धडा चांगल्या रीतीनें वाचतां येईल असें करणें. पुष्कळ ठिकाणीं अगोदर वाचन चांगलें वाचतां येण्याचा प्रयत्न करून मग अर्थ सांगण्याची पद्धती आहे, परंतु त्यापेक्षां ही वर लिहिलेली पद्धती विशेष हितावह आहे. पूर्वी अर्थाची समजूत झालेली असली म्हणजे वाचन चांगल्या रीतीनें वाचतां येण्याला चांगली मदत होते.

चौथ्या इयत्तेपासून वरील इयत्तांमध्यें वाचनाचा अर्थ मुलांस चांगला तयार करितां यावा, म्हणून आणखी एका गोष्टीची विशेष जरूर आहे. ती ही कीं प्रत्येक धडा तयार झाल्यावर शिक्षकानें त्या धड्यावर प्रश्न मुलांस लिहून द्यावे; व त्या प्रश्नांचीं उत्तरें मुलांकडून वर्गांत तयार करून घ्यावीं. विशेषेंकरून शास्त्रीय व ऐतिहासिक विषयांचे धडे असतील, ते तयार करण्याला अशा प्रकारच्या प्रश्नांचा फार उपयोग होईल. पुष्कळ प्रसंगीं मुलांस धडा वाचून त्यांतलें ध्यानांत काय ठेवावयाचें हेंच कळत नाहीं. परंतु ही अडचण अशा प्रकारचे प्रश्न जवळ असले म्हणजे सहज दूर होईल.

बालबोध वाचन शिकविण्याची जी पद्धती वर लिहिली आहे त्याच पद्धतीनें क्रमिक पुस्तकांपैकीं मोडी पुस्तकेंही शिकवावीं. मोडी पुस्तकांतील धडे मोडी लिखितांप्रमाणें अर्थाकडे लक्ष न देतां वाचून घेण्याची बहुतेक ठिकाणीं चाल आहे, परंतु तसें करण्यांत दोन प्रकारानीं नुकसान होतें. एक मोडी वाचण्याची कळा चांगली साधत नाहीं, व शिवाय त्या पुस्तकांतून जे निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर उत्तम धडे लिहिलेले आहेत, त्यांच्या ज्ञानाचा फायदा मुलांस होत नाहीं. वाचनाच्या क्रमिक पुस्तकांपैकीं बालबोध पुस्तकांवर व विशेषेंकरून पहिल्या चार पुस्तकांवर त्यांतील धडे मुलांच्या गरजेकडे लक्ष देऊन लिहिलेले नाहींत, असा मोठा आरोप आहे. परंतु मोडी क्रमिक पुस्तकांवर तसा आरोप येण्यासारखी त्या पुस्तकांचा स्थिती नाहीं. याकरितां त्यांतील विषय मुलांस समजावून देण्याची व्यवस्था शिक्षकांनीं अवश्य केली पाहिजे. आणि केवळ मोडी अक्षरें व शब्द वाचून घेण्यापेक्षां पहिल्यानें अर्थ समजावून देऊन मग ते धडे वाचून घेतल्यास मोडी वाचनही अल्पायासानें चांगलें सुधारेल. मोडी वाचतांना मुख्यतः तीन प्रकारच्या अडचणी मुलांस येतात. एक, अक्षरें एकमेकांस जोडून काढलेलीं असतात त्यामुळें त्यांचा वेगळेपणा लवकर लक्षांत येत नाहीं. दुसरें, कित्येक शब्द संक्षेपानें लिहिलेले असतात ते चांगलेसे समजत नाहींत. व तिसरें, वाचतांना जे अपरिचित

शब्द येतात ते लवकर उमगत नाहींत. ह्या तिन्ही प्रकारच्या अडचणी अगोदर अर्थाची समजूत करून दिल्यानें सहजींच दूर होतील, व त्यामुळें मोडी वाचन चांगलें सुधारेल.

चौथ्या व विशेषेंकरून पांचव्या इयत्तेपासून पुढें मोडी फायली वाचून घ्याव्या लागतात. त्या वाचतांना देखील त्यांत असलेले अपरिचित शब्द अगोदर मुलांस चांगले समजावून दिले तर फायली वाचण्याच्या कामीं मुलांस चांगली मदत होईल. फायलींतून बहुधा अशुद्ध उच्चारांचे इंग्रजी शब्द बरेच लिहिलेले असतात. याकरितां नव्या फायली वाचण्यास सुरू करितांना प्रथम त्यांतील अशा प्रकारचे शब्द शोधून काढून त्यांच्या अर्थाचें टिप्पण तयार करावें; व फायलींतील प्रत्येक कागद वाचतांना अगोदर त्यांतील अशा प्रकारचे शब्द मुलांस दाखवून त्यांचा अर्थ सांगावा, व मग त्यांस तो कागद वाचावयास सांगावा. प्रत्येक कागद दोनदां अगर तीनदां एकएका मुलानें वाचिला पाहिजे, व अशा रीतीनें फायलींतले निदान अमुक कागद तरी प्रत्येक मुलानें वाचिलेच पाहिजेत, असा नियम असावा. हल्लीं ठिकठिकाणीं मुलें वाचितात, त्यांत अनियमितपणा फार असतो. तीन चार फायली असल्यातर मुलें वाटेल ती फाईल घेऊन तींतील कोणते तरी कागद वाचीत बसतात. परंतु ह्या अनियमितपणाच्या वाचनामुळें प्रत्येक मुलानें किती वाचिलें, व काय वाचिलें, हें शिक्षकाला चांगलें समजत नाहीं; व काम झालें आहे कितीं व आणखी किती करून घेतलें पाहिजे, ह्याचें नीटसें धोरण न राहून अखेरीस मुलें मोडी वाचनांत कच्चीं राहतात. ह्याकरितां फायली वाचून घेणें त्याही वर लिहिल्याप्रमाणें पद्धतशीर वाचून घेत जाव्या.

---

## ९. व्याकरण.

—:+:—

हल्लींच्या इयत्तापत्रकाप्रमाणें तिसऱ्या इयत्तेपासून व्याकरण शिकविण्याला आरंभ होतो. तिसऱ्या इयत्तेकरितां शब्दांच्या जाती ओळखणें

इतका भाग तयार करावा लागतो. अर्थात् वर्ण, अक्षरें व शब्द ह्यांची घटना भाषेंत कशी होते, ह्या गोष्टी मुलांस ह्या इयत्तेंतच समजावून देणें जरूर आहे.

एक विशेष महत्वाची गोष्ट ह्या ठिकाणी ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती ही की, कोणत्याही विषयाची समजूत करून न देतां पुष्कळ गोष्टी मुलांकडून तोंडपाठ करून घेऊन मुलांची परीक्षेकरितां तयारी करण्याची चाल हल्लीं फार प्रचारांत आहे. ही चाल फार वाईट आहे, व ती अगोदर बंद झाली पाहिजे. मुलें ही पोपटाप्रमाणें आपण सांगूं तेवढा शब्दोच्चार करणारीं यंत्रें बनवावयाचीं नाहींत. त्यांच्या बुद्धीच्या निरनिराळ्या शक्ती वाढवावयाच्या आहेत, हीं गोष्ट नेहमीं ध्यानांत असली पाहिजे. अर्थात् जो विषय आपण त्यांस शिकवूं त्याच्या योगानें त्या विषयाचें ज्ञान त्यांस होणें, हा त्यांच्या हिताचा एक भाग आहेच, परंतु तो विषय तयार करीत असतां त्यांच्या बुद्धीस कसरत होऊन तिचें सामर्थ्य वाढत जाणें, हा जो दुसरा फायदा त्याकडे शिक्षकांचें लक्ष नेहमीं असलें पाहिजे. प्रत्येक विषय मुलांकडून केवळ तोंडपाठ करून घेण्याकडेच शिक्षकांचा नेहमी कल असला तर अर्थात् त्या योगानें मुलांस आपली स्वतःची बुद्धी चालवून नव्या नव्या गोष्टी शिकण्याची हौंस वाटणार नाहीं. बरेच दिवसपर्यंत असें होत गेल्यानें अखेरीस वाढ होण्याचें तिचें सामर्थ्य सर्वथा नाहींसें होऊन ती अगदीं खुरटून जाईल. पुष्कळ मुलांविषयीं आपण नेहमीं असें म्हणतों कीं ' अमका अमका मुलगा लहानपणीं कसा तरतरीत व हुषार होता, पण आतां अगदीं ठोंबा झाला. ' मला वाटतें मुलांची स्थिती अशी होण्याचें कारण हें मागें सांगितलें तेंच आहे. तिची तीक्ष्णता नाहींशी करण्यासारख्या गोष्टींचा एकसारखा आघात तिजवर होत राहिल्यानें अखेरीस ती पूर्णपणें बोथट होऊन जाते. याकरितां मुलांच्या बुद्धीवर असा परिणाम न होऊं देण्याची काळजी शिक्षकानें फार घेतली पाहिजे.

ह्या हेतूकडे लक्ष दिलें म्हणजे असें सहज दिसून येईल कीं व्याकरणाचे

नियम नुस्ते पाठ करून घेण्याची जी सर्वत्र चाल आहे, ती चांगली नाहीं. वर्ण म्हणजे काय, स्वर व व्यंजनें ह्यांत फरक कोणता, साधीं अक्षरें, जोडाक्षरें, व शब्द, कसे बनतात, वगैरे गोष्टींची समजूत अनेक उदाहरणांच्या योगानें मुलांस चांगली करून दिली, तर ह्या संबंधाचें जरूर असलेलें ज्ञान नुसते नियम पाठकरून घेण्यापेक्षां किती तरी चांगल्या तऱ्हेनें होईल. व्याख्यांची समजूत चांगली करून दिली म्हणजे निरनिराळे शब्द मुलांस विचारून त्यांच्या जाती कशा ओळखाव्या, हें त्या व्याख्यांच्या आधारानेंच नीट ध्यानांत आणून द्यावें. मग पुष्कळ दिव-सांच्या सहवासानें जाती चांगल्या ओळखतां येऊं लागतील. सर्वनामें व अव्ययें ह्यांच्या पोटभेदांची समजूत ह्या इयत्तेंत चांगलीशी होईल असें वाटत नाहीं. याकरितां जरूर वाटेल तर शब्दांच्या जातींची बरीचशी समजूत झाल्यानंतर सर्वनामें व अव्ययें ह्यांच्या पोटभेदांचीं उदाहरणें पुस्तकावरून पाठ करवावीं, म्हणजे ते पोटभेद सांगणें अवघड जाणार नाहीं. हे पोटभेदांचे शब्द नियमित व थोडे आहेत, व त्यांच्या लक्ष-णांची समजूत करून देऊन त्यांतला परस्पर भेद मुलांच्या ध्यानांत आणून देणें कठीण आहे. ह्या दोन कारणांमुळें हे पोटभेदाचे शब्द पाठ करून घेणेंच जास्ती सोईचें आहे.

तिसऱ्या इयत्तेंतील मुलांस व्याकरण शिकविण्याच्या संबंधानें वर लिहिल्यापेक्षां जास्त कांहीं गोष्टी सांगणें जरूर आहे असें वाटत नाहीं. चौथ्या इयत्तेपासून पुढें ग्रंथावरून व्याकरण करावयाचें असतें. ह्या संबंधानें थोडी सूचना करणें जरूर आहे. विभक्तींचीं रूपें चांगलीं ओळखतां येऊं लागणें हें ह्या इयत्तेंत विशेष आवश्यक आहे. याकरितां निरनिराळ्या प्रकारचीं बरीचशीं नामें व सर्वनामें हीं प्रथम मुलांकडून चालवून घ्यावीं, म्हणजे पुढें व्याकरण चालविण्यास चांगली मदत होईल. व्याकरण चालविणें तें पहिल्यानें अगदीं सोप्या शब्दांचें चालवून घ्यावें. वाक्यांत कठीण शब्द येतील ते सोडून द्यावे. कांहीं दिवसांच्या संवयीनें सोप्या शब्दांचें व्याकरण चांगलें करितां येऊं लागेल.

नंतर मग कठीण शब्दांचें व्याकरण सांगूं लागावें. असें केल्यानें मुलांचा घोंटाळा होणार नाहीं. सोप्या गोष्टी प्रथम चांगल्या समजलेल्या असल्यामुळें पुढील कठीण गोष्टीही लवकर व चांगल्या समजतील. विभक्तींचे अर्थ आरंभापासून सांगूं नयेत. बरीच माहिती झाल्यानंतर ते सांगावे. प्रथमा विभक्तींचे अर्थ ओळखण्याचें काम बरेंच कठीण आहे, व तें चौथ्या इयत्तेमध्यें मुलांना पूर्णपणें साधेल असें वाटत नाहीं, तथापि त्यांची साधारण ओळख ह्या इयत्तेंत करून द्यावी, म्हणजे पुढें पांचव्या इयत्तेंत हा भाग पूर्णपणें तयार करून घेण्याला बरें पडेल. मुख्य मुद्दा इतकाच कीं अगदीं सोप्या गोष्टी प्रथम सांगून त्या चांगल्या समजल्यानंतर त्यांपेक्षां कठीण असतील त्या सांगाव्या. व्याकरण हा शास्त्रीय विषय आहे, आणि तो जर मुलांच्या शक्तीचा विचार केल्याशिवाय एकदम पुष्कळसा त्यांस सांगत गेलें तर त्यांचा घोंटाळा होऊन जाईल, व त्यांस कांहीं समजणार नाहीं. एकदां खालच्या इयत्तेपासून असा कच्चेपणा राहत गेला, म्हणजे वरच्या इयत्तेंत पुढचा भाग त्यांना मुळींच समजणार नाहीं. याकरितां ह्या विषयाच्या संबंधानें ही चूक न होऊं देण्याची खबरदारी शिक्षकांनें चांगली घेतली पाहिजे. चौथी, पाचवी, व सहावी, ह्या इयत्तांतून व्याकरण किती किती शिकवावयाचें, ह्या गोष्टी बारकाईनें लक्षांत आणिल्या तर असेंच दिसून येईल कीं, ज्या मुख्य मुख्य सोप्या गोष्टी चौथ्या इयत्तेंत शिकवावयाच्या आहेत, त्याच पांचव्या इयत्तेंत जास्ती विस्तारानें सांगाव्या लागतात. व सहाव्या इयत्तेंत त्या त्याहीपेक्षां जास्ती खुलाशानें सांगाव्या लागतात. हा मुद्दा ध्यानात ठेविल्यानें प्रत्येक इयत्तेंत व्याकरण किती शिकवावयाचें ह्याचा निर्णय स्वतः शिक्षकाला चांगला करितां येईल.

---

## ६ कविता.

—:*:—

ज्या इयत्तांमध्यें कविता केवळ तोंडानें पाठ मात्र म्हणावयाच्या आहेत, त्या इयत्तांतून मुलें कविता शुद्ध म्हणतील अशी तजवीज शिक्ष-

क्षकानें करावी. दोन दोन मुलांस शिक्षकानें स्वतः कवितेचा चरण म्हणून दाखवावा, व तो त्यांजकडून म्हणवावा. मुलें कविता म्हणत असतां शब्दांच्या उच्चारांकडे चांगलें लक्ष द्यावें. ह्या मुलांना ज्या कविता म्हणावयाच्या असतात त्यांचा अर्थ त्यांस सहज समजे इतक्या त्या सोप्या असतातच. तेव्हां त्यांचा अर्थ करणें हें जरी इयत्तेंत नेमलेलें नसलें तरी त्यांच्या अर्थाकडे लक्ष पोहोंचविण्याची संवय मुलांस लावणें हें शिक्षकाचें काम आहे. तें जर त्यानें थोडें लक्ष देऊन नीट केलें तर योग्य शब्दांवर योग्य जोर देऊन मुलांस त्या कविता चांगल्या रीतीनें म्हणतां येऊं लागतील. इतकेंच नव्हे तर कवितेचा अर्थ करणें या गोष्टीचा पायाच घातल्यासारखा होईल.

दुसऱ्या इयत्तेपासून पुढें त्या त्या इयत्तेच्या मानानें कविता थोड्या थोड्या समजण्याला कठीण अशा आहेत. याकरितां त्या कवितांचा अर्थ अगोदर समजल्याशिवाय त्या मुलांकडून पाठ करवूं नयेत. इयत्तेला नेमिलेल्या कविता अगोदर पाठ करवून मग त्यांचा अर्थ सांगण्याची पद्धती बहुतेक ठिकाणीं चालू आहे ती बंद झाली पाहिजे. दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तांतील मुलांस अन्वय, व वाक्यरचना चांगली करून अर्थ सांगणें, ह्या गोष्टीची तादृश जरूर नाहीं. कवितेंतल्या कोणत्याही कठीण शब्दाचा अर्थ त्यांस समजला असला पाहिजे. कोणत्याही एका चरणाचा अर्थ अगर सर्व कवितेचा साधारण मुख्यार्थ सांगतां आला पाहिजे अन्वय व योग्यप्रकारची वाक्ययरचना करून अर्थ सांगणें, ह्या गोष्टी चौथ्या इयत्तेपासून पुढें चांगल्या साधल्या पाहिजेत.

वाचनाच्या धड्यांतील शब्दांच्या अर्थाचीं छापी पुस्तकें वापरूं नयेत असें पूर्वी सांगितलें आहे, तीच गोष्ट कवितांच्या संबंधानेंही पूर्णपणें लागू आहे. याकरितां त्याबद्दल येथें पुनः लिहिण्याचें कारण नाहीं. चौथ्या इयत्तेपासून पुढील इयत्तांतल्या मुलांजवळ वाचनाच्या अर्थाप्रमाणें कवितेंतल्या शब्दांच्या अर्थाच्या वह्या असणें आवश्यक आहे. पण त्या शिक्षकानें वर्गांत शब्दार्थ सांगितल्याप्रमाणें स्वतः तयार केलेल्या असाव्या.

आयत्या मिळतात, त्या नव्हते. दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तेकरितां असल्या वह्याची जरूर नाहीं. वाचनाच्या शब्दांच्या अर्थाप्रमाणेंच कवितांच्या शब्दांचा अर्थही ह्या इयत्तांतून शिक्षकानें वर्गांत मुलांकडून स्वत: तोंडानें तयार करून घ्यावा.

कविता शिकवितांना प्रथम शब्दार्थ तयार करविणें, नंतर इयत्तेला जरूर असेल त्याप्रमाणें त्या कवितांचा अर्थ अगर अन्वयार्थ तयार करविणें, व नंतर त्या कविता पाठ करविणें, असा क्रम असला पाहिजे.

अन्वय व अर्थ मुलांकडून पाठ करवून घेण्याची वहिवाट कित्येक ठिकाणीं आढळते ती चांगली नाहीं. कांहीं दिवसांच्या संवयीनंतर मुलांस स्वत: बुद्धी चालवून कवितांचा अन्वय जुळवितां आला पाहिजे. व अर्थ सांगतांना बिनचूक वाक्यरचना करितां आली पाहिजे. परंतु अन्वय व अर्थ पाठ करून घेऊं लागल्यास स्वतःची बुद्धी चालविण्याची संवय त्यांस लागणार नाहीं. शिक्षकानें मुलांस फक्त शब्दांचा अर्थ समजून द्यावा. व मग वाक्यरचनेच्या नियमांची समजूत करून देऊन अन्वय कसा लावावयाचा हें त्यांस समजावून द्यावें, व त्यांजकडूनच अन्वय लावून घ्यावा. तीं चुकतील तेथें मात्र त्यांची चूक आपण दुरुस्त करावी. ती चूक त्यांचेकडून कां झाली असेल ह्याचा विचार मनांत आणून ज्या गोष्टींत त्यांची समजूत चांगली झाली नसेल त्या पुन: समजावून द्याव्या. अन्वय सांगण्याची हीच पद्धती होय. म्हणजे मग कांहीं दिवसांनीं त्यांना स्वत: कल्पना चालवून अन्वय व अर्थ सांगतां येऊं लागतील.

कवितांतील शब्दांचें व्याकरण सांगण्याची वहिवाट चौथ्या इयत्तेपासून चालू ठेवावी, म्हणजे अन्वय जुळविण्याच्या कामीं मुलांस चांगली मदत होईल. चौथी इयत्ता शिकूं लागतांच आरंभीं कांहीं दिवसपर्यंत ह्या शब्दांपैकीं पुष्कळ शब्दांचें व्याकरण सांगणें त्यांस कठीण जाईल. परंतु त्या वेळीं घाई करूं नये. ज्या वेळीं जितक्या गोष्टी त्यांस समजण्यासारख्या असतील तितक्याच त्या वेळीं सांगाव्या. मग जसजशी समजूत होत जाईल तसतशा नव्या व कठीण गोष्टी मागाहून सांगाव्या.

# जाहीरखबर.
## पुणें ट्रेनिंग कॉलेजाची
## प्रवेश–परीक्षा.

---

१. पुणें ट्रेनिंग कालेजांत पाठविण्याकरितां जिल्ह्यांच्या डे. ए. इन्स्पेक्टर साहेबांनीं निवडलेल्या उमेदवारांची प्रवेश-परीक्षा चालू सालीं गुरुवार तारीख ५ दिसेंबर सन १९०१ इसवी रोजीं सुरू होईल. तर त्या दिवशीं सकाळीं मद्रास ११ वाजतां उमेदवारांनीं पुणें ट्रेनिंग कॉलेजांत हजर व्हावें. या खेपेस सुमारें ६० इसम नवीन घ्यावयाचे आहेत.

२. परीक्षा सहाव्या इयत्तेच्या विषयांत होईल. शुद्धलेखन आणि अक्षर यांकडे विशेष लक्ष दिलें जाईल.

३. उमेदवारांत दृष्टी, वर्णोच्चार इत्यादिकांसंबंधें व्यंग नसावें. व्यंग असल्यास अशा उमेदवारांस घेतलें जाणार नाहीं.

४. उमेदवारांनीं आपल्यावरोबर चांगल्या वर्तणुकीबद्दल आपल्या हेडमास्तरांचा दाखला आणावा, आणि पब्लिक सर्व्हिस परीक्षा पास झाल्याचें सर्टिफिकीटही आणावें. हे दाखले आणण्यास चुकूं नये.

५. आंगांतील कपडे व आंथरूण पांघरूण अशीं बरोबर आणावयाचीं; त्यांत आंगाबरोबर घालावयास दोन गरम कपडे, एक जाड पासोडी व कांबळा इतकीं जरूर आणावीं.

६. त्याप्रमाणेंच पुस्तकें आणावयाचीं त्यांत पुढें लिहिलेलीं पुस्तकें अवश्य असावीं. बाळबोध पुस्तकें १ ते ४. मोडी पुस्तकें १ ते ३. हिंदुस्थानचा इतिहास—मुंबई इलाखा, हिंदुस्थान व पृथ्वी यांचीं वर्णनें.

७. वर सांगितलेल्या पुस्तकाशिवाय इतर पुस्तकें व चित्रकलेचें सामान वगैरे घेण्याकरितां प्रत्येक इसमानें परीक्षेच्या समयीं १० रुपये डिपाझिट ठेविले पाहिजेत. ज्यास कालेजांत घेतलें जाणार नाहीं, त्या इसमाचें डिपाझिट परत केलें जाईल.

पुणें, ट्रेनिंग कालेज,
ता. १३ माहे जुलई सन १९०१ इ०

*K. G. KELKAR.*
प्रिन्सिपल पुणें ट्रेनिंग कॉलेज.

# रासायनिक परीक्षण
## अथवा
# व्यवहारोपयोगी रसायनशास्त्र

श्री० बाळासाहेब पटवर्धन चीफ् आफ् मिरज यांनीं खनिज-क्षारांचें पृथक्करण् करण्याकरितां हा ग्रंथ स्वतः रसायनशास्त्राचे प्रयोग करून् लिहिला आहे. आजपर्यंत मराठींत अशा प्रकारचा ग्रंथ कोणीं लिहिला नाहीं, यामुळें निवळ मराठी जाणणारास मोठी पंचाईत पडत असे. ती श्रीमंतांनीं भरून काढली या बद्दल मराठी वाचक त्यांचे फार आभारी होतील. हा ग्रंथ आमचे मराठी शाळा मास्तरांस खेडेगांवीं राहून लहान लहान प्रयोग करून पाहण्यास फार उपयोगी आहे. पुस्तकांची किंमत ८१२ आहे ती पुस्तकाचे उपयोगाचे मानानें फार नाहीं.

पुस्तकें आमचेकडे मिळतील.

म्यानेजर चित्रशाळा.

---

## जाहीरात.

**पाहिजेत.**—ज्याचें बालबोध अक्षर चांगलें असून आंकडे घटलेले आहेत अशा लोकांची चित्रशाळेंत जरूर आहे. ज्यांनीं शीला प्रेसांत लेखकाचें काम केलें असेल असे लोक असल्यास त्यांना अगोदर जागा दिली जाईल.

हस्त अक्षरांचे व आंकड्यांचे नमुने अर्जासोबत पाठवावेत.

सेकंड व थर्ड ग्रेड आर्ट स्कूलची परिक्षा पास झालेल्या लोकांचीही जरूर आहे. म्यानेजर चित्रशाळा पुणें, सिटी.

## विक्रीस तयार.

नऊ इंची पृथ्वीचा ग्लोब पेटीसुद्धां हा ग्लोब प्रत्येक शाळेस असल्यानें पृथ्वीचा आकार वगैरे शिकविण्याच्या कामीं फार उपयोगी आहे. किं० रु० २०

म्यानेजर चित्रशाळा पुणें.


---


प्रकाशक—शंकर नरहर जोशी.

Registered No B 179

श्री

पुस्तक १२. अंक १०.


सन १९०१ माहे आक्टोबर.

# मराठी शालापत्रक

# Marathi School Paper

विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| प्रतिमासिक स्फुट विचार. ... ... ... ... | २३३ |
| —'फिमेल एज्युकेशन सोसायटी.'—इंग्रजी शिकविण्यास आरंभ—फिमेल हायस्कूल— ... ... ... | |
| गीठ. ... ... ... ... ... ... ... | २३८ |
| नवीन पुस्तक. ... ... ... ... ... ... | २४४ |
| पत्रव्यवहार—शंका. ... ... ... ... ... | २४८ |
| शिक्षकमित्र—शुद्धलेखन—अंकगणित— ... ... ... | ३३ ते ४८ |

'चित्रशाळा' प्रेस, पुणे

अगाऊ वार्षिक वर्गणी टपालखर्चासह रु० १८३.

## कै० केरो लक्ष्मण छत्रेकृत

# अंकगणित

## भाग १।२।३

कै० केरो लक्ष्मण छत्रे यांचे चिरंजीव रावसाहेब निळकंठ विनायक छत्रे यांनीं पूर्वीच्या अंकगणितांत हल्लीं पुष्कळ सुधारणा करून नवीन आवृत्ती छापविल्या आहेत व ठिकाठिकाणीं जास्त उदाहरणें व व्याख्याही दिल्या आहेत. पूर्वी दुसरा भाग होता, त्याचे हल्लीं दोन भाग केले आहेत; म्हणजे एकंदर ३ भाग झाले आहेत. भाग पहिला किंमत ८=॥. भाग दुसरा किं० ।= व तिसरा भाग लवकरच छापून प्रसिद्ध होईल. शाळा-मास्तरांस कमिशन मुबलक मिळेल.

म्यानेजर चि० शा० प्रे० पुणें.

---

# सार्थ प्राकृत प्रकाश.

सदरहू पुस्तक आमचे मित्र रा. रा. **शंकर रामचंद्र हतवळणे** ह्यांनीं प्रसिद्ध प्राकृत वैयाकरण वररूची ह्याच्या ग्रंथाच्या आधारें केलें आहे. प्राकृत भाषा ही संस्कृत व हिंदुस्थानांतील अर्वाचीन भाषा ह्यांमधील एक सांखळी आहे. संस्कृतांतून प्राकृतांत व प्राकृतांतून अर्वाचीन भाषांत रूपें कशीं आलीं, हें समजल्याशिवाय शब्दांची खरी व्युत्पत्ती समजली असें ह्मणतां येत नाहीं. पुष्कळ ऐतिहासिक प्रश्नांशीं प्राकृताचा निकट संबंध आहे. तेव्हां ह्या भाषेचा चांगला परिचय असल्याशिवाय त्यांचा उलगडा करण्यास अडचण असते. शब्दांचीं रूपें कशीं बनलीं व त्यांस आचार्यांच्या सूत्राचा मूळ आधार कोणता, हें प्रस्तुतच्या पुस्तकावरून दिसून येईल. प्राकृत प्रकाशाचे एकंदर १२ परिच्छेद असून पहिल्या ९ परिच्छेदांत महाराष्ट्री जी मुख्य प्राकृत भाषा तिजविषयीं व बाकींच्या तीन परिच्छेदांत पैशाची, मागधी व शौरसेनी ह्यांच्या संबंधाच्या मुख्य मुख्य गोष्टी सांगितल्या आहेत. हें पुस्तक मराठी शिक्षक, ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थी व हायस्कुलांतील वरच्या वर्गांतून मराठी शिकणारे विद्यार्थी ह्यांस विशेषें-करून उपयोगीं पडण्यासारखें आहे. पुस्तकाची किंमत ८८ आहे. टपाल हशील शिवाय. एकदम बरींच पुस्तकें घेणारास कमिशन मुबलक मिळेल. पुस्तकें आमच्या छापखान्यांत विकत मिळतील.

म्यानेजर चित्रशाळा छापखाना.

# शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यांसी । हें श्रवणें सद्गुरूपाशीं।
सद्गुरू पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणासी ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळ जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १५ आक्टोबर १९०१. अंक १०.

## प्रतिमासिक स्फुट विचार.

‘ फीमेल एज्यूकेशनसोसायटी ’

येथील ‘ फीमेल एज्युकेशन सोसायटी ’ च्या शाळांचा गतवार्षिक कामाचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून या संस्थेचें काम चांगल्या प्रकारें चाललें आहे, असें दिसून येतें. दरवर्षास प्लेगची अडचण येत असताही विद्यार्थ्यांची संख्या थोडी थोडी वाढत्या प्रमाणावर आहे, हें मुख्यतः लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यावरून अशा प्रकारची शाळा पाहिजे असें लोकांस वाटतें असें उघड दिसतें. ही शाळा स्थापन झाल्यापासून तिच्या मुख्य अध्यापिका मिस. हरफर्ड नांवाच्या युरोपियन बाई होत्या. त्यांनीं गेल्यावर्षी पेनशन घेतल्यामुळें त्यांच्या जागीं मिस. सोरावजी यांस मुख्य नेमिलें आहे. मिस. हरफर्ड यांची शाळा चालविण्याची व मुलींना वागविण्याची पद्धत फार प्रशंसनीय होती व त्यामुळें त्या बाई शाळेंतल्या मुलींस व मुलींच्या घरच्या मंडळीस फार प्रीय असत. तोच कित्ता मिस. सोराबजी या आपल्या पुढें ठेवितील अशी आम्ही आशा करितों. या शाळेचे तीन पाटभाग आहेत;—१. फीमेल ट्रेनिंग कालेज. हें वास्तविक सरकारी असून या सोसायटीच्या देखरेखीखालीं आहे. यांत शिक्षकणी

तयार करितात. यासाठीं या कालेजच्या स्थितीवरून आमच्या लोकांच्या स्त्रीशिक्षणप्रसाराबद्दल विशेष कांहीं म्हणतां येणार नाहीं. या कालेजांत गेल्यावर्षी ४२ विद्यार्थिनी होत्या. सर्व महाराष्ट्रांत जी मुलींच्या शाळांची संख्या आहे, त्या मानानें ही संख्या वास्तविक फार लहान आहे. कारण या कालेजांतलें शिक्षण चार वर्षांचें आहे, तेव्हां प्रत्येक वर्गांत ८ मुली असतात, असें समजावयाचें; व यांतल्या सरासरी ७।८ जणी दर वर्षास शिक्षकिणी म्हणून धाडावयास तयार होतात असें प्रमाण धरिलें, तर असा प्रश्न उत्पन्न होतो, कीं सर्व मराठी जिल्हे, संस्थानें, व वऱ्हाड वगैरे प्रांत यांना मिळून वर्षास फक्त सात आठ नवीन शिक्षकिणी तयार होऊन पुरतात काय? इतके थोडे विद्यार्थी ह्या ट्रेनिंग कालेजामध्यें कां तयार होतात, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. यावरून मुलींच्या शाळांवर बायकाच शिक्षक नेमल्या पाहिजेत, असा नियम मुलींच्या शाळांतून चालू आहे असें दिसत नाहीं. या संस्थेचा दुसरा भाग प्राथमिक स्कूल. हें वास्तविक मूळचें ट्रेनिंग कालेजाचें प्राक्टिसिंग स्कूल आहे. या शाळेंत गेल्या वर्षी १४३ विद्यार्थी होते. शहरामध्यें ठिकाठिकाणीं शाळा असून येथें इतकीं मुलें आहेत, याचें कारण ही शाळा विशेष लोकप्रिय आहे हेंच होय. येथें शिक्षण चांगलें चालतें. या शाळेंत तिसऱ्या चौथ्या यत्तेपर्यंत लहान मुलगे ही शिकावयास येतात. या शाळेंत आरंभींचा इन्फंट क्लास याची व्यवस्था चांगली असते. एकंदरींत ह्या शाळांतील प्राथमिक वर्ग इतर प्राथमिक शाळांनीं कित्ता घेण्यासारखे आहेत. तिसरा भाग हायस्कूल. यामध्यें ५६ मुली होत्या. सांप्रतची शाळा ही आमच्या मुलींना मध्यमप्रतीचें शिक्षण चांगल्या प्रकारें व लोकांस जसें पाहिजे आहे तसें देण्यासाठीं म्हणून मुद्दाम स्थापन केलेली आहे. यासाठीं या शाळेबद्दल पुढें निराळा विचार करूं. या शाळेचा एकंदर खर्च चौदा-हजार रुपये आहे. यापैकीं तीन हजार रुपये सोसायटीचे असून बाकीचा खर्च सरकारी आहे. या वरून या शाळेसाठीं सरकार पुष्कळ उदारपणानें मदत करीत आहे, यांत शंका नाहीं. मात्र एक गोष्ट अशी लक्षांत

ठेविली पाहिजे, कीं फीमेल ट्रेनिंग कालेज संपूर्ण, व अंशतः प्राक्टिसिंग स्कूल हीं सरकारचींच आहेत, व एकंदर खर्चापैकीं बराचसा खर्च या दोन संस्थांकडे म्हणून होत असतो.

---

इंग्रजी शिकविण्यास आरंभ.

फीमेल हायस्कूलच्या प्राथमिक शाळेंत लहान मुलांमुलींना तिसऱ्या इयत्तेच्या आरंभापासून इंग्रजी शिकविण्यास आरंभ करितात. ही पद्धत आमच्यामतें फार चुकीची आहे. इंग्रजीसारखी परकी भाषा इतक्या लौकर शिकविणें चांगलें नाहीं असें आपण मुलांच्या संबंधानें म्हणतों. तोच प्रकार मुलीच्या संबंधानेंही लक्षांत ठेवावयास नको काय? मराठी चौथी इयत्ता झाल्यावर इंग्रजी शिकविण्यास आरंभ करावा, अशी सध्याची वहिवाट व नियम आहे. परंतु हा आरंभ सुद्धां फार लौकर होतो, म्हणून पांचवी यत्ता झाल्यावर इंग्रजी शिकण्यास आरंभ करावा असें ज्या नवीन प्राथमिक यत्ता ठरावयाच्या आहेत त्यांत ठरविलें आहे. असें असतां मुलींच्या संबंधानें इंग्रजी शिकविण्यास आरंभ उलट एकवर्ष अगोदरच केलेला चालेल असें 'फीमेल एज्युकेशन सोसायटी'स वाटतें कीं काय, हें आम्हास कळत नाहीं. कोणचीही परकी भाषा शिकण्यास आरंभ करण्यापूर्वीं स्वभाषेच्या वाक्याची ठेवण व थोडेंसें व्याकरण यांची माहिती चांगली व्हावयास पाहिजे. ती झाल्याखेरीज परकी भाषा मोठ्या वयाच्या विद्यार्थ्यांस सुद्धां कळणार नाहीं. मग तीं लहान मुलींस कळणें कठीण आहे, हें अगदीं उघड आहे. मराठीचें व्याकरण शिकविण्याचा आरंभ मुलीं तिसऱ्या इयत्तेंत होतो. त्याच इयत्तेंत फीमेल हायस्कूलच्या शाळेंत इंग्रजी शिकविण्यास ही त्या बरोबरच आरंभ करितात! ही पद्धत येथें कशी सुरू झाली आहे हें समजत नाही. दुसरी गोष्ट अशी आहे कीं आमच्या लोकांच्या मुली सरासरी लग्न होईपर्यंत किंवा आतां लग्न करावयाचें असा बेत ठरेपर्यंत शाळेंत जातात. तेथपर्यंत फारतर मराठी चौथ्या अथवा पांचव्या

इयत्तेपर्यंत मज्जल येऊन पोंचते. तेव्हां या इयत्तांमध्यें जें इंग्रजी शिकून होईल, तें पुढें लगेच नष्ट होईल. तेव्हा याप्रमाणें हा एक विषय शिकवून न शिकविल्यासारखा होतो. यासाठीं इंग्रजी शिकविण्यांत वेळ घालविण्याच्या ऐवजीं मराठमिध्येंच एकादा विषय जास्त शिकविला तर त्याचा अधीक उपयोग होणार नाहीं काय? एकतर फार लौकर इंग्रजी शिकविण्यास आरंभ होतो; व दुसरें, ज्यांना पुढें इंग्रजी शिकावयाचें नसतें व लौकरच शाळा सोडावयाची असते, त्यांच्यासाठीं हा उपद्व्याप उगाच होतो. तेव्हां इकडे सोसायटीच्या चालकांचे लक्ष जाऊन ते याबद्दलची योग्य व्यवस्था करतील अशी आम्ही आशा करितों.

---

**फिमेल हायस्कूल**

या शाळेंत एकंदर ५६ मुली गेल्या वर्षीं होत्या. यांपैकीं २२ ब्राह्मण १६ इतर हिंदू व बाकीच्या अन्यधर्मी होत्या. या मुलींमध्यें ४१ अविवाहित असून ११ विधवा होत्या व फक्त ४ विवाहित होत्या. यावरून लग्न झाल्याबरोबर मुलींना शाळेंत पाठविणें बंद होतें, असें उघड दिसून येईल. लग्न झालेल्या मुलींना इतर मुलींच्या शाळांतून पाठविणें कदाचित् लोकांना प्रशस्त वाटत नसेल. पण जी मुलींची शाळा चांगल्या व्यवस्थेनें चालविण्यासाठीं म्हणून मुद्दाम स्थापन केली, आहे व जिची व्यवस्था आपल्याच मंडळीच्या हातीं आहे, तीमध्यें मुली पाठविण्याचे संबंधानेंही असा प्रकार कां असावा, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. या संबंधानें घरगुगुती अडचणी काय असतात, याचा विचार येथें आज आम्हांस कर्तव्य नाहीं, परंतु या शाळेंतील व्यवस्थेच्या संबंधानें लोकांना ज्या अडचणी वाटत आहेत, त्यांचा येथें थोडासा विचार करूं. पहिली अडचण अशी आहे, कीं या शाळेमध्ये युनिव्हरसिटीच्या म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेसाठीं मुली तयार करावयाच्या, या धोरणावर शिक्षणक्रम ठरविलेला आहे. ही गोष्ट चुकीची आहे. आपल्या मुलीला म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेस पाठविण्याची कल्पना

अजून आमच्या लोकांपैकीं फारशी कोणाच्या मनांत येत नाहीं. व्यवहारांत उपयोगी पडण्यासारखीं चार अक्षरें मुलीला यावीं, इतकीच काय ती इच्छा असते. इतकेंच नव्हे पण या शाळेंत प्रवेश-परीक्षेकरितां मुली तयार करीत आहेत असें नुस्तें ऐकूनच लोक मुलींना शाळेंत पाठविण्यास मागें घेतात. एकादी बुद्धिवान विधवा स्त्री, जिच्या मागें संसार असण्याचा संभव नाहीं, किंवा जिला कांहीं तरी निर्वाहाचें साधन करावयास पाहिजे असतें अशी, किंवा एकादी हिंदूशिवाय इतर स्त्री जिची गृहस्थिती अगदीं निराळ्या प्रकारची आहे अशी असली, तर ती मात्र म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेस जाणार. आमच्या श्रीमंत लोकांच्या घरच्या मुलींना रिकामा वेळ असतो, व मनांत असल्यास हवें तेवढें शिकण्याची सवड असतें. यामुळें त्यांना वास्तविक युनिव्हरसिटीच्या परीक्षांवर धोरण ठेवूनही अभ्यास करण्यास हरकत नाहीं, असें म्हणतां येईल. परंतु या लोकांचें लक्ष स्त्रीशिक्षणाकडे असावें तितकें आहेस दिसत नाहीं. तेंव्हां ह्या हायस्कूलमध्यें युनिव्हर्सिटीच्या प्रवेश परीक्षेच्या धोरणावर जो विद्याक्रम ठरविला आहे हा कशाकरितां व कोणासाठीं, असा प्रश्न विचारणें भाग पडतें. असा विद्याक्रम न ठरवितां तरुण स्त्रियांना व्यवहारांत उपयोगी पडतील असे विषय इयत्तांमध्यें घालून विद्याक्रम ठरविला असतां तो अधिक लोकप्रिय होईल, व मुलीही जास्त येऊं लागतील. यावरून प्रवेश परीक्षेचे अभ्यास या शाळेंत मुळींच चालू नयेत, असें आमचें म्हणणें नाहीं. वर्षास एकाद दुसरी विद्यार्थिनी प्रवेश परीक्षेस जाणारी व पुढें मेडिकल कालेजांत किंवा आर्ट कालेजांत जाऊं इच्छिणारी असेल तर, तिची तयारी निराळी व्यवस्था करून अवश्य करावी. परंतु एकंदर अभ्यासाची व्यवस्था जेणेंकरून लोकांना शाळेंत मुली पाठविण्यास उत्तेजन येईल अशी असावी. चांगलें लेखनवाचन, चालीपुरतें गणीत; मनोरंजक रीतीनें हिंदुस्थान व इंग्लंड या देशांचा थोडा इतिहास, तशाच प्रकारची भूगोलीची माहिती, हे विषय शिकविले पाहिजेत. त्याचप्रमाणें अनेक उपयुक्त पदार्थ, व पाऊस, मेघगर्जना, वगैरे सृष्ट

चमत्कार इत्यादी गोष्टींची माहिती, थोडी खस्थ पदार्थांची माहिती, व निरानिराळ्या देशांतील प्राणी, लोक, उत्पन्नें यांची माहिती, इत्यादि उपयुक्त प्रकार वस्तुशिक्षणपद्धतीनें शिकविले पाहिजे. याप्रमाणें शिवण-काम व घरची व्यवस्था, हे विषयही आले पाहिजेत. कित्येक मुलींना ड्रॉइंग शिकणें आवडतें. त्याचीही व्यवस्था असली पाहिजे. जरा मोठ्या वयाच्या मुलींचा वर्ग होणें शक्य असल्यास बालसंगोपनाची ही थोडी माहिती झाली पाहिजे. अशा रीतीनें विषय नेमण्याची व्यवस्था केल्याखेरीज ही शाळा लोकप्रिय होणार नाहीं. दुसरी अडचण शाळेच्या वेळाचीही आहे. आमच्या तरूण मुलींना आम्ही थोडं थोडी घरांतली व्यवस्था पाहण्यास लावीत असतों, यामुळें त्यांना रोजचे रोज सहा तास शाळेंत ठेवण्याचें व त्या मानानें आणखी घरीं अभ्यासास वेळ देण्याचें मुळींच जुळत नाहीं. विशेषेंकरून लग्न झालेल्या व सासरीं असणाऱ्या मुली शाळेंत येत नाहींत याचें कारण हेंच आहे. यासाठीं या शाळेंत अशा मुलींना तीन किंवा चार तासच येऊन शिकतां येईल, व तेव्हां फक्त त्यांना पुढें उपयोगीं पडतील असे विषय शिकविले जातील अशी योजना झाली पाहिजे. हे जे दोन अडचणीचे प्रकार सांगितले, यांची व्यवस्था लागली असतां ही शाळा अधीक उपयुक्त होऊन लोकांना येथें मुली पाठवाव्या असें वाटूं लागेल, व तिची अधीक भरभराट होत जाईल असें आम्हांस वाटतें. यासाठीं शाळेचे चालक या गोष्टींचा नीट विचार करून, फीमेल हायस्कूल मूळारंभीं ज्या उद्देशानें स्थापन झालें आहे, त्या उद्देशाच्या धोरणानें चालविण्याचा यत्न करितील तर फार चांगलें होईल.

---

## मीठ.

-:+:-

संस्कृत भाषेंत 'अतिपरिचयादवज्ञा' अशी एक म्हण आहे. खाण्याच्या पदार्थांत आपल्या अत्यंत परिचयाचा असा मिठासारखा दुसरा पदार्थ नाहीं. यामुळें त्याची आपणास विशेषसी परवा वाटत नाहीं; व त्याच्या खाण्यापासून आपल्यास केवढा उपयोग होतो, व आपल्या भक्ष्य पदा-

र्थांत मिठाचें महत्व किती आहे, याचा फारसा विचार आपण कधीं करीत नाहीं. यामुळें मीठ म्हटलें म्हणजे त्याची कोणास फारशी दिक्कत नसते. अलीकडे कित्येक वर्षें आमच्या देशांत सरकारानें मिठावर बराचसा कर बसविल्यामुळें मीठ पूर्वीसारखें फार स्वस्त मिळत नाहीं; यामुळें आम्हांस त्याची त्याची थोडी बहुत जास्त काळजी वाटते खरी. परंतु आपल्या खाण्यामध्यें त्याची अवश्यकता केवढी मोठी आहे, याचा विचार आपण थोडाच करितों. पदार्थांत मीठ असल्या खेरीज पदार्थाला चव येत नसली, म्हणजे तेथें मात्र मिठाची पर्वा आपण करीत असतों.

एकाद्या प्राण्याचें रक्त घेऊन तें जाळलें तर भांड्यामध्यें खालीं तांबडसर असा पदार्थ राहातो. यांत अर्धें मीठ असतें. तेव्हां प्राण्याचें जीवितसर्वस्व असें जें शरीरांतलें रक्त, त्यांत इतकें मीठ असतें; व यावरून आपल्या शरीरपोषणास मीठ किती आवश्यक आहे, हें दिसून येईल. आपल्या खाण्याच्या पदार्थांपैकीं कांहींत, उदाहरणार्थ ताज्या भाज्यांतून, बरेंच मीठ स्वाभाविकच असतें. परंतु तेवढें आपणास पुरत नाहीं. त्यांत आणखी मीठ घातल्या खेरीज भाज्यांना चव येत नाहीं.

मीठ तीन प्रकारांनीं तयार करितात;—१ खाणींतून काढणें; २. समुद्राचें पाणी उन्हांत तापवून मीठ तयार करणें; व ३. खाऱ्या पाण्याचे झरे असतात, त्यांचें पाणी विस्तवावर अथवा उन्हांत तापवून मीठ बनविणें.

मिठाच्या खाणी पुष्कळ देशांत आहेत. खाणींतलें मीठ एकाच ठिकाणीं थरावर थर जमून सांठलेलें असतें. ह्या खाणी बहुतेक कोळशांच्या किंवा लोखंडी दगडांच्या खाणीसारख्याच असतात. आमच्या इकडे असल्या खाणी राजपुतान्यांत आहेत. युरोपांत इंग्लंड देशांत व दुसऱ्या बऱ्याच देशांत मिठाच्या खाणी आहेत. सर्वांत मोटी खाण जुना पोलंड देश व आस्त्रिया देश यांच्या सरहद्दीवर आहे. हिच्यामधून फार प्राचीन काळापासून मीठ काढीत आहेत. सांप्रत ही खाण ४१० मैल लांब २० मैल रुंद असून सध्या मिठाचा थर १२००

फूट जाडीचा दिसत आहे. ह्या खाणीची पोकळी एवढी झाली आहे, कीं हींत असलेले सर्व रस्ते, यांवरून दर तासास चाळीस मैल जाणारी आगगाडी चालविली असतां तिला सगळ्या रस्त्यांवरून जाण्यास निदान १० तास लागतील!

हें मीठ पृथ्वीच्या पोटांत आलें कसें? याचें उत्तर असें आहे की फार प्राचीन काळीं त्याठिकाणीं समुद्र होता. त्याच्यावर पृथ्वीच्या पाठीवर प्राचीन काळीं वारंवार होणाऱ्या उत्पातांनीं माती दगड, वगैरे येऊन तो दबून गेला; व पृथ्वीच्या पोटांतील उष्णतेनें पाणी आटून जाऊन खालीं मीठ राहिलें. खाणींतलें मीठ समुद्राच्या पाण्यातून काढलेल्या मिठापेक्षां दिसण्यांत व चवींत थोडें निराळें असतें. मध्य हिंदुस्थानांत जें राजपुतान्यांतल्या खाणींतलें मीठ वापरतात, तें दिसण्यांत काळसर तांबडें असून आपल्या इकडील स्वच्छ मिठासारखें चकाकत नाहीं; मंद दिसतें; व चवीला ही आपल्या मिठाइतकें खारट नसतें, असें त्याचा उपयोग करणारे सांगतात.

ज्या पाण्यापासून मीठ बनवितां येईल असे खाऱ्या पाण्याचे झरे फार थोड्या ठिकाणीं आहेत; व जे आहेत, त्यांच्या पाण्यांत मिठाचा अंश थोडा असतो. अगदीं फार खारट अशा झऱ्याच्या पाण्यांत केवळ एकचतुर्थांश मीठ असतें, असें आढळलें आहे. असले झरे इंग्लंड देशांत बरेच आहेत त्यांच्या पाण्यापासून थोडें थोडें मीठ करितात. पण याचा व्यापाराच्या कामीं उपयोग होत असेल असें दिसत नाहीं. तर हें मीठ जवळचे लोक केवळ स्वतःच्या व स्थानिक उपयोगासाठीं तयार करितात.

सागरोदकांत मिठाचा फार मोठा सांठा आहे, हें उघडच आहे हें एवढें मीठ सागरोदकामध्यें कोठून आलें, हें मागें 'समुद्राचें पाणी खारट कां?' * या लेखांत सांगितलेंच आहे. समुद्राचें एक पौंड पाणी घेतलें तर त्यांत सुमारें अर्धा औंस मीठ असतें; आणि कोणीं उद्योगी मनुष्यानें असा अजमास काढला आहे, कीं समुद्राचें पाणी जर सर्व आटून गेलें, तर त्याच्या जागीं सर्वत्र सातशें फूट जाडीचा मिठाचा थर जमेल!

* शालापत्रक, पु० १०, अंक ४, पृष्ठ ११५.

समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार करण्यासाठीं समुद्रकांठीं मोठाल्या जागा तयार केल्या असतात. त्यांना मिठागरें असें म्हणतात. या मिठागरांमध्यें लहान लहान, चौकोनीं उथळ, अशीं 'पोंडें' किंवा 'पल्वलें' एकास एक लागून तयार केलीं असतात, त्यांमध्यें समुद्राचें पाणी घ्यावयाचें. मग त्याचें सूर्याच्या उष्णतेनें बाष्पीभवन होऊन तें आटत जातें; व पोंडाचे बुडाशीं मीठ जमतें. हें मीठ वर काढून घेऊन त्या पोंडाच्या बांधांवरून त्याच्या राशी करितात; व चांगलें वाळलें म्हणजे घेऊन जातात. अशा रीतीनें आमच्या इकडे मीठ तयार करितात. पण कित्येक ठिकाणीं अशी चाल आहे, कीं पोंडांतलें पाणी आटत जाऊन बरेंच घट्ट असें त्याचें मिठवणी बनलें, कीं तें पंपाच्या योगानें मोठ्याल्या काहिलींत घ्यावयाचें; व मग त्याखालीं उष्णता लावून, त्यांतलें सर्व पाणी आटवून मीठ तयार करावयाचें. अशा रीतीनें शेवटीं कृत्रिम उष्णता लावून तयार केलेलें मीठ चवीला चांगलें असतें असें म्हणतात. कारण 'म्याग्निशिया' नांवाचा क्षार सूर्याच्या उष्णतेनें तयार झालेल्या मिठांत असतो, तो शेवटीं कढवून केलेल्या मिठांत असत नाहीं. या क्षाराची रुची किंचित कडवट असते.

उत्तर अमेरिकेमध्यें समुद्राच्या सपाटीपेक्षां ज्यांची सपाटी बरीच सखल आहे अशीं कित्येक प्रचंड मैदानें आहेत. यांमध्यें पावसाचे दिवसांत पाऊस पडून खाऱ्या पाण्याचीं मोठालीं सरोवरें बनतात. मग उन्हाळ्यामध्यें यांतल्या पाण्याची वाफ होऊन या मैदानावर मिठाचे जाड पोपडे बाधलेले असतात. असें वर्षोवर्ष होत असतें. या मिठाची कोणास फारशी जरूर नसते, यामुळें तें कोणी काढून नेत नाहीं. परंतु रानरेडे व इतर कित्येक प्राणी फार लांबच्या प्रदेशांतून येथें येऊन हे मिठाचे पोपडे चाटीत असतात. यामुळें या प्रदेशांस 'महिषलिट्' म्हणजे महिषांनीं चाटलेले प्रदेश असें लाक्षणिक नांव पडलें आहे. यावरून मनुष्येतर प्राण्यांस सुद्धां मिठाची जरूर लागते व ते मीठ मिळवितात असें दिसून येतें. पशूंप्रमाणेंच कित्येक पक्षीही मिठागरांमधून मीठ नेतांना दृष्टीस पडतात; व कित्येक पक्ष्यांच्या घरट्यांतून मिठाचा संचय केलेला सांपडतो.

मध्यआफ्रिकेमध्यें किनाऱ्यापासून फार दूर असलेल्या कित्येक

प्रदेशांतल्या लोकांना त्यांच्या देशांमध्यें मीठ मिळत नाहीं, व त्यांना दूरच्या प्रदेशांतून मीठ आणावयाचें समजत नाहीं, यामुळें तेथें मिठाची योग्यता मोठीच समजतात, गुलामांचा व्यापार जारी चालू असतां या प्रदेशांत मूटचिमूट मिठावर एक दोन माणसें मिळत; व मिठासाटीं येथचे लोक बायका पोरेंही विकीत असत. मंकोपार्क नामक प्रख्यात प्रवाशानें असें लिहिलें आहे, कीं या प्रदेशांत ज्याला नेहमीं मीठ खावयास मिळतें तो मोठा श्रीमंत असें समजतात. आमच्या इकडे मुलांना जसे आपण खडीसाखरेचे खडे खाऊ म्हणून देतों, त्याप्रमाणें तिकडे मिठाचे खडे लहान मुलांचे हातांत खाऊ म्हणून चोखावयास देतात; व ही चैन देखील केवळ श्रीमंत लोकांच्या मुलांनाच मिळावयाची!

या प्रमाणें मीठ दुर्मीळ आहे असे प्रदेश जरी कित्येक ठिकाणीं आहेत किंवा होते, तरी मीठ हें अन्नास फार जरूरीनें आहे, त्या वांचून आरोग्य बिघडेल व तें खाल्लेंच पाहिजे, ही गोष्ट प्राचीन काळा-पासून मनुष्यजातीस माहीत आहे. कित्येक ठिकाणीं मीठ हें मागें बरेंच दुर्मीळ असे, व तें मिळवून देण्याचा उद्योग देशाच्या सरका-रास करावा लागे असें ही दिसतें. युरोपांतील बहुतेक सर्व देश समुद्र-कांठीं असतांही त्या खंडांतील कित्येक प्रदेशांत असा प्रकार असे. याची कारणें अशीं दिसतात, कीं समुद्राच्या पाण्याचें मीठ करण्याचा उद्योग फारसा चालू नसावा; युरोपांतील पुष्कळ प्रदेशांत सूर्याची उष्णता फार कमी असते, म्हणून समुद्राच्या पाण्याचें मीठ करण्याचें थोड्याच ठिकाणींच जुळत असेल; व खाणीतल्या मिठाचा व्यापार नेआण करण्याची व्यवस्था सोयीवार नसल्यामुळें नीट चालत नसेल. प्राचीन रोमन लोक आपल्या कामगारांस पगारामध्यें मीठ आणून देत असत; व यामुळें त्या लोकांच्या भाषेंतून इंग्रजींतला 'पगार' याचा द्योतक salary हा शब्द आला आहे, त्याचा अर्थ मिठासाठीं द्यावयाचा पैसा असा आहे. यावरून प्रथमतः सरकार आपल्या नोकरांस मीठ मिळवून देत असे; पुढें तें लोकांना मिळण्याची सोय झाल्यावर पैसे देऊं लागले, असें दिसतें. अगदीं रानटी लोकांत सुद्धा, त्यांची चांगली माहिती जेव्हांपासून मिळते तेव्हां-पासून, मीठ उपयोगांत आहे असेंच दिसून येतें. कित्येक देशांत

प्राचीन काळीं मीठ तोडणें, म्हणजे मीठ खायेला न घालणें, ही अपराधा-बद्दल देण्याची शिक्षा असें मानलेलें आढळतें. अशा शिक्षा कित्येक देशांच्या प्राचीन कायद्यांतून लिहिलेल्या आढळतात. आमच्याइकडे कोणी मनुष्य शरीरानें स्थूल किंवा जाडें होत असल्यास, व तसें व्हावयास नको असल्यास मीठ तोडण्याची वहिवाट होती असें दिसतें.

समुद्रांतून मासे धरल्यावर ते व्यापारासाठीं कांहीं दिवस तरी राखून ठेवावयाचे असल्यास ते खारवावे लागतात. माशांच्या व्यापाराच्या वखारीजवळ ते खारवण्याचे कारखानेच असतात. आमच्या समुद्र किनाऱ्यावरील कोळी लोक मिठावर कर बसल्यापासून माशांस खारी माती लावून खारवितात. दुसऱ्या व्यापाराकरितां पाठविण्याच्या मांसांत देखील तें टिकण्यासाठीं मीठ घालितात. परंतु मिठानें खारवलेल्या मांसाचा पौष्टिकपणा कमी होतो, व तें ताज्या मांसापेक्षां पचावयास कठीण असतें. कोणताही पदार्थ टिकण्यासाठीं त्यांत मीठ घालण्याचा उद्देश असा आहे, कीं मिठाच्या अंगी नासूं न देण्याची शक्ती आहे. आमच्या इकडचीं नानातऱ्हेचीं लोणचीं याच तत्त्वावर करितात. परंतु अलीकडे मांस व दुसरे पदार्थ पुष्कळ दिवस ताजे राखण्याची दुसरी एक युक्ती निघाली आहे. ती अशी, कीं मांस विक्रीसाठीं नेण्याच्या मोठाल्या आगबोटींवर बर्फाच्या प्रचंड खोल्या केलेल्या असतात. त्यांच्या सर्व बाजूंस एकसारखें जाड बर्फ राखून त्या खोलींत निरंतर फार थंडी राहील असें करावयाचें. मग त्या खोलींत ताजीं मारलेलीं जनावरें ठेवून दूर देशांस नेतात. अशा रीतीनें आस्ट्रेलियांतून इंग्लंडास मांस पाठवितात. याच युक्तीनें त्या व दुसऱ्या देशांतून लोणीं ताजेंच्या ताजें यूरोपांत पाठवितात, व अलीकडे मुंबईहून ताजे आंबे ही पाठवितात.

कित्येक प्रकारच्या जमीनींस मिठाचें खत लागतें किंवा खतांमध्यें बरेंच मीठ लागतें. साबण वगैरे कित्येक पदार्थ तयार करण्यास मीठ लागतें. शिवाय तऱ्हेतऱ्हेचे रासायनिक पदार्थ व औषधी बनविण्यास मीठ अवश्य पाहिजे असतें. मीठ खरखरीत असून लौकर वितुळतें, यामुळें मडक्यांवर जिल्हई देण्यासाठीं त्याचा उपयोग करितात. सारांश

पाण्याच्या मागून मनुष्यास अत्यंत उपयोगी असा मिठासारखा दुसरा पदार्थ या सृष्टीमध्यें नाहीं.

मीठ हें आपल्या रक्तामध्यें किती असतें हें मागें सांगितलेंच आहे. पण मीठ हें आपल्या रक्तामध्येंच केवळ असतें असें नाहीं, तर आपल्या शरीराच्या प्रत्येक भागांत तें थोड्याबहुत प्रमाणानें असतें. मांस, मज्जा, हाडें, चर्बी वगैरे कोणचाही शरीरसंबंधी पदार्थ असा नाहीं कीं ज्यांत मीठ नाहीं. तेव्हां आपल्यास मीठ खाण्याची आवश्यकता केवढी आहे हें कोणासही सांगावयास नको. ही गोष्ट प्रत्येकाच्या अगदीं संवयीची होऊन बसली आहे; यामुळें पदार्थामध्यें मीठ पुरेसें नसलें म्हणजे त्यास चव आलीसेंच वाटत नाहीं; व मिठाचा शास्त्रीय उपयोग ठाऊक असो वा नसो, प्रत्येक मनुष्य शरीरधर्म म्हणूनच रोजचे रोज जरूर तितकें मीठ खातो.

---

## नवीन पुस्तक.

---

'रासायनिक परीक्षण' अथवा 'व्यवहारोपयोगी रसायन शास्त्र'—या नांवाचें एक नवीन पुस्तक मिरज संस्थानचे अधिपती श्रीमंत गंगाधरराव गणेश ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन यांनीं तयार केलें आहे. हें प्रथमतः कोल्हापूर येथील 'ग्रंथमाला' या मासिक पुस्तकांत भागशः प्रसिद्ध झालें होतें, तें आतां श्रीमंतांनीं निराळें छापविलें आहे. ग्रंथमालेतल्या प्रथमावृत्तीपेक्षां या दुसऱ्या आवृत्तींत पुष्कळ जास्त पाहिती आहे, असें ग्रंथकार यांनीं प्रस्तावनेंत म्हटलें आहे. या पुस्तकांत पाश्चिमात्य रसायनशास्त्रांतले जे निरानिराळे वायुरूप पदार्थ, धातू व आसिडें त्यांतील बहुतेकांचें परीक्षण कसें करावें व ते कसे ओळखावे, म्हणजे ते कोणच्याही पदार्थांत आहेत कीं नाहींत हें कसें पाहावें, त्यांचें पृथक्करण कसें करावें, व ते इतर पदार्थांशीं संयोग पावले असतां काय होतें, हें सांगितलें आहे. यांतील माहिती श्रीमंत ग्रंथकार यांनीं स्वतःच्या अनुभवानें दिली आहे. हें पुस्तक त्यांतील भाषा, विषयप्रतिपादन व विषयव्यवस्था यांच्या योगानें व त्याचें मुद्रण निर्णयसागर छापखान्यांत झाल्यामुळें चांगले झालें आहे; व नवीन रसायनशास्त्राचा अभ्यास कर-

णारास याचा फार उपयोग होईल यांत शंका नाहीं. यासाठीं या पुस्तकाचें आम्ही मनोभावानें अभिनंदन करितों

या पुस्तकाचें अभिनंदन करण्याचीं कित्येक विशेष कारणें आहेत; त्यांतलें ग्रंथकारांचें थोरपद हें मुख्य असून दुसरीं त्याचीं अंगभूत होत. आमच्या जुन्या ऐतिहासिक घराण्यांतील पुरुषांच्या कृतीचें अभिनंदन करण्याचे प्रसंग एकंदरींत थोडे येत असतात, यामुळें तसा प्रसंग आला असतां मोठा आनंद वाटतो. अलीकडे असले प्रसंग सुदैवेंकरून अधिकाधिक येत चालले आहेत, हें खरें; व तसे ते नेहमीं येत जावे अशी सर्वांची इच्छा आहे. पटवर्धन घराण्यानें जुन्या काळात स्वदेशासाठीं तरवार गाजवून प्रख्याती मिळविली आहे. इतिहासांत अशी प्रसिद्धी आहे, कीं पटवर्धन हे कारभारांत शिरल्यापासून अशी एकही लढाई झाली नाहीं, कीं जीमध्यें कोणा पटवर्धनाचें रक्त रणभूमीवर सांडलें नाहीं. आतां ज्यांचेवर तरवार गाजवावयाची असें शत्रू राहिले नाहींत. परंतु आळस व अज्ञान हे शत्रू ज्यांच्या योगानें आपलें राष्ट्र पाश्चात्य राष्ट्रांच्या मागें पडलें आहे, ते त्या जुन्या शत्रूंपेक्षांही भयंकर आहेत. त्यांवर या जुन्या तरवारबहादूर घराण्यांतील पुरुषांना लेखणी गाजवून ज्ञानसंपादनाचे पराक्रम करण्यास पाहिजे तेवढी जागा आहे. पटवर्धन घराण्यामध्यें कै० श्रीमंत बापूसाहेब कुरुंदवाडकर हे विद्याभिलाषी व ग्रंथकार होऊन गेले. त्यांचें व्रत आज बाळासाहेब यांनीं उचललें आहे. श्रीमंत बाळासाहेब यांना रसायनशास्त्र व इतर शास्त्रीय विषय यांची गोडी आहे. त्यांनीं मिरजेस स्वतःसाठीं एक रसायनशाला बनविली असून तीमध्यें ते स्वहस्तें काम करीत असतात. त्याचप्रमाणें त्यांनीं एक धंदेशिक्षणाची शाळाही मिरजेस काढली आहे. आमच्या मंडळीमध्यें युनिव्हरसिटींत शास्त्रीय विषय घेऊन पास झालेली बरीच मंडळी आजमित्तीस आहे. व वर्षोवर्ष तींत भरही पडत आहे. पण श्रीमंत बाळासाहेबांप्रमाणें आपण शिकलेल्या विषयाची निरंतर हौस बाळगून त्याचा व्यासंग करणारे कितीक आहेत ? या पुस्तकाच्या प्रसिद्धीवरून असें दिसून येतें, कीं असल्या विषयांत प्रयोग करून पाहण्यास आपल्या मंडळीस पाहिजे तितकी सोय आहे; व असे उद्योग केल्यानें पुढें नवीन शोध लागण्यास,–

निदान जे शोध अगोदरच लावलेले आहेत, त्यांचा तरी निव्यक्त्यांतून उपयोग होण्यासारखा अनुभव घेण्यास—हवी तितकी जागा आहे. तसेंच यापासून दुसरें असें दिसून येतें, कीं मराठी भाषेत अशा तऱ्हेचीं पुस्तकें लिहितां येतील. हें पुस्तक लिहिण्याचा उद्देश श्रीमंत ग्रंथकारांनीं आपल्या पुस्तकांत दोन ठिकाणीं अशा रीतीनें लिहिला आहे:—सांप्रत "जें रसायन शास्त्राचें शिक्षण दिलें जातें तें इंग्रजी भाषेत दिलेलें असतें. त्याचा केवळ मराठी जाणणाऱ्या विद्यार्थ्यांना मुळींच फायदा होत नाहीं. केवळ मराठीमध्यें शिक्षण देणाऱ्या ट्रेनिंगस्कूलसारख्या संस्थांमध्यें हे विषय शिकवीत नाहींत. इतकेंच नव्हे, तर पूर्वीच्या पुस्तकांत शास्त्रीय धडे होते तेही आतां काढून टाकले आहेत* ! अशा स्थितींत वंशपरंपरें चालत आलेले धंदे सुद्धां चालविण्याची व त्यांमध्यें इतर राष्ट्रांबरोबर बाजारांत व्यापारी टक्कर मारण्याची फार पंचाईत पडते. मग नवीन धंदे शिकण्याचें तर नांवच नको.

"मराठी वैद्यकाची सुद्धां हीच स्थिती. जुन्या मात्रा, जुनीं भस्में ह्यांचा कालांतरानें लोप होत चालला आहे. कांहीं दिवसांनीं त्या पौराणिक वस्तू होतील कीं काय अशी भीति वाटते. मग अस्सल जुनी मात्रा नमुन्यादाखल सुद्धां मिळणार नाहीं. ह्या मात्रांचें व भस्मांचें पृथक्करण करून नव्या, सोप्या, स्वस्त आणि सशास्त्र पद्धतीनें ह्या तयार करतां येतील तर वैद्यशास्त्राचें सध्याचें परावलम्बन पुष्कळ कमी होईल. तिकडेही कोणाचें लक्ष जात नाहीं. जलपरीक्षा, मूत्रपरीक्षा, विषपरीक्षा हे विषय इतके महत्वाचे आहेत कीं फाशाप्रमाणें रोग्याचा जीव हातांत घोळविणाऱ्या वैद्यकीचा धंदा करणाऱ्यांना ते अवश्य अवगत असले पाहिजेत. ह्या विषयावर इंग्रजीमध्यें असंख्य ग्रंथ झाले आहेत व होत आहेत. पण मराठीमध्यें त्यांचा अभाव असल्यामुळें ही उणीव अंशतः तरी दूर होईल तर पहावें, ह्या हेतूनें हें पुस्तक लिहिलें आहे."

---

* हें श्रीमंतांनीं लिहिलेलें बरोबर नाहीं. सध्याच्या पांचव्या व सहाव्या पुस्तकांत असले धडे पुष्कळ आहेत; व सातवें पुस्तक म्हणून नवीन झालें आहे, त्यांत केवळ शास्त्रीय विषयांवरच धडे आहेत. शा. प. कर्ते

" प्रत्येक मनुष्य, प्राणी, वनस्पती व खनिज पदार्थ म्हणजे एक एक रसायनशास्त्राची प्रयोगशाळाच आहे. या शाळेंत केव्हां कोठें काय काय चाललें आहे हें ज्याला समजतें, त्यांला म्हणतात रसायनशास्त्रवेत्ता. प्रत्येक मनुष्य स्वत:पुरता जरी रसायनशास्त्रवेत्ता होईल, तरी एकंदरींत पुष्कळ फायदा होईल. आपल्या देहांत, आंत व बाहेर जे प्रयोग चालले आहेत, उदाहरणार्थ आपण जें अन्न खातों, तें सर्व अर्थात् रसायनशास्त्राच्या तत्वावर. कारण, कोणते पदार्थ खाल्ले असतां रक्तमांसादि पदार्थ तयार होतात हें रसायनशास्त्राच्या साहाय्यानेंच कळणार. आपण रोज जेवतेवेळीं त्याचा विचार करीत नाहीं. ह्याचें कारण, विचार करण्याची तितकी जरूर पडत नाहीं. रूढीमुळें, नेहमीं दिसणाऱ्या वस्तूंपैकीं अन्न कोणतें व विष कोणतें, वगैरे थोडें थोडें प्रत्येक मनुष्यास समजतें. आपण करतों तें सशास्त्र आहे, असें जरी प्रत्येक वेळीं आपल्याला भासत नाहीं, तथापि त्यांतील सशास्त्रत्व नाहींसें होतें असें नाहीं. कोणते दोन पदार्थ अधिक एकत्र झालें असतां, त्यांजपासून कोणता पदार्थ तयार होतो, तेवढ्यानें पूर्वीच्या पदार्थाच्या स्वरूपांत, गुणधर्मांत कोठें अंतर पडतें, नवीन पदार्थांत धर्म कोणते आहेत, ह्या सर्व गोष्टींचें ज्ञान होणें किती महत्वाचें आहे, हें सांगता येणें कठिण आहे. ह्या सर्व ज्ञानास 'व्यवहारोपयोगी रसायन शास्त्र' म्हणतात, व तें सप्रयोग करून पाहतां येतें, म्हणून त्यास 'कर्तव्य रसायनशास्त्र' असेंही कोणी म्हणतात. सूपशास्त्र, औषधिशास्त्र ( Pharmacy ) हीं सर्व रसायनशास्त्राचींच अंगें असल्यामुळें, प्रत्येक मनुष्यमात्रास कर्तव्यरसायनशास्त्रापासून किती उपयोग होईल, हें निराळे लिहावयास नको. रसायनशास्त्राचें पाऊल जों जों पुढें जाईल तों तों आपल्यास उत्तम उत्तम अन्नवस्त्र मिळत जाईल, अनेक भयंकर व्याधींपासून आपलें संरक्षण होईल, व एकंदरींत आपलें ऐहिक सुख अधिक अधिक होत जाईल. हें शास्त्र जेथें वृद्धिंगत होईल, तेथेंच खरी सुधारणा होत आहे असें म्हटलें पाहिजे. "

या उद्देशांवरून सांप्रतच्या पुस्तकाची उपयुक्तता केवढी आहे हें दिसून येईल. सरते शेवटीं ह्या पुस्तकाची वाचकांस शिफारस करून, व आमच्या श्रीमंताचा या उपयुक्त शास्त्राचा असाच अभ्यास चालून त्यांचे हातून

अशा प्रकारचे आणखी पुष्कळ उपयुक्त ग्रंथ निपजतील अशी आशा धरून, आज आमच्या श्रीमंत ग्रंथकारांची आदरपूर्वक रजा घेतों.

# पत्रव्यवहार.

## शंका.

वि० वि० मागील महिन्याच्या शालापत्रकाच्या अंकांत एका विद्यार्थ्यानें लिहिलेलें पत्र पाहिलें. त्यावरून आपण विद्यार्थ्यांच्या शंकांस स्थल देतां असें वाटलें म्हणून पत्रव्यवहार करीत आहे. क्रमिक चौथ्या पुस्तकांत 'नाणें' या धड्यांत "जर कांहीं रुपये किंवा मोहरा, किंवा पुतळ्या आटवून त्यांचा गोळा केला तर त्याची किंमत रुपये मोहरा किंवा पुतळ्या ह्यांच्याहून कमी होणार नाहीं. तांब्यालाही तीच गोष्ट लागू आहे. मग तांब्याचे पैसे असोत किंवा भांडीं असोत, त्यांची किंमत त्या वेळीं जी तांब्याची किंमत बाजारांत असेल तीप्रमाणें होईल." हें महावाक्य आहे. त्यांत रुपये, मोहरा व पुतळ्या यांच्या संबंधानें जें लिहिलें आहे; तें मोहरा व पुतळ्या यांस बरोबर लागू पडतें. कारण तीं नाणीं हल्लीं प्रचारांत नाहींत, तरी वाटेल तेथें पाडितां येतात. यामुळें जर तीं शुद्ध सोन्याचीं पाडिलीं तर त्यांस वरील म्हणणें लागू पडेल. आतां वरील म्हणणें रुपयांस कसें जुळेल? दहा रुपये आटवून गोळा केला तर किंमत दहा रुपये येईल काय? आणि येईल तर कशी? याच वाक्यांत 'तांब्यालाहि तीच गोष्ट लागू आहे' असें म्हटलें आहे, तर तांब्याला तरी ती गोष्ट कशी लागू पडते? पैसे आटवून त्यांचा गोळा केला आणि त्याची किंमत बाजारभावाप्रमाणें आली म्हणून जितके पैसे आटवून तो गोळा केला तितकी येईल काय? याचा खुलासा व्हावा. हें वाक्य आमच्यामतें चुकीचें आहे. खरें असल्यास आपला एखादा वाचक सत्यता दाखवतील तर बरें; व खरें नसेल तर सदरहू पुस्तकाच्या पुढील आवृत्तीच्या वेळीं याची सुधारणा व्हावी. लोभ असावा ही विज्ञापना.

बोरगांव ता० वाळवें,
जिल्हा सातारा.

त्र्यंबक दत्तात्रय येरंडे.
शंकर भाऊ कारखाननीस.
विद्यार्थी, इयत्ता ४ थी.

## ७. शुद्धलेखन.

—:*:—

कोणताही मजकूर शुद्ध लिहितां येणें ही विद्यार्जनापैकीं एक विशेष महत्वाची गोष्ट आहे. लिहिण्या वाचण्याच्या आरंभापासून ह्या गोष्टीकडे लक्ष दिलें तरच् तींत चांगलें यश येईल. ब्राह्मण वगैरे विद्यासंपादण्याच्या कामीं पुढें सरसावलेल्या जातींतल्या मुलांचे उच्चार बहुतकरून स्वभावतःच व्याकरणाच्या नियमांस अनुसरून म्हणजे शुद्ध असतात. त्यामुळें कोणताही मजकूर शुद्ध लिहिण्याच्या कामीं त्यांजकडून फारशा चुका होत् नाहींत. परंतु इतर जातींच्या मुलांच्या संबंधानें हा विषय तयार करण्याच्या कामीं शिक्षकाला जितक्या अडचणी येतात, तितक्या दुसऱ्या कोणत्याही विषयामध्यें येत नसतील. 'न' व 'ण'; 'श,' 'ष' व 'स'; आणि 'ल' व 'ळ' ह्या अक्षरांच्या संबंधानें अशा मुलांचा जो घोंटाळा होतो तो सांगता येत नाहीं. तसेंच ऱ्हस्व, दीर्घ, आणि एकाद्या अक्षरावर अनुस्वार देणें अगर न देणें, ह्या संबंधाच्या त्यांच्या गैरसमजुती तर बहुधा अखेरपर्यंत दूर होत नाहींत. तथापि शिक्षकांचे प्रयत्न योग्य मार्गाला अनुसरून सतत चालू राहिले, तर कालावधीनें इतर जातींच्या मुलांच्या उच्चारांत व त्यामुळें लिहिण्यांत स्वभावसिद्ध शुद्धपणा बराच दिसूं लागेल यांत संशय नाहीं.

आपण जसें बोलतों तसें लिहावयाचें, हा बहुधा सर्वांचा स्वाभाविक कल असतो; व इतर जातींच्या मुलांकडून शुद्धलेखनामध्यें ज्या चुका होतात, त्या त्यांचें बोलणें अशुद्ध असतें म्हणूनच होतात. याकरितां अगोदर मुलांस शुद्ध बोलावयास शिकविलें पाहिजे, म्हणजे तीं आपोआप शुद्ध लिहूं लागतील. शुद्धलेखनाच्या संबंधाचा हा सामान्य नियम ध्यानांत ठेवून मग जे कोणते विशेष उपाय योजणें असतील ते योजावे. अगदीं आरंभीं मुलगा शाळेंत शिकूं लागला, म्हणजे तेव्हां पासून त्याच्या शुद्ध व स्पष्ट उच्चारांकडे शिक्षकाचें लक्ष असलें पाहिजे. स्पष्ट उच्चार म्हणजे कसा हें शिक्षकानें स्वतः उच्चार करून त्यांस दाखवावें. 'न' चा उच्चार करितांना जिभेचें

शेवट दांतांच्या वरच्याबाजूस दातांजवळच लागतें. परंतु 'ण' चा उच्चार करितांना तें अगदीं वर टाळूला लागतें, ह्या गोष्टी त्यांच्या ध्यानांत नीट आणून दिल्या तर 'न' व 'ण' ह्यांच्या उच्चाराच्या संबंधानें चुक्या फार कमी होऊं लागतील. नुसत्या तोंडच्या सांगण्यानें वरील फरक ध्यानांत न आल्यास आपल्या हातानें मुलाची जीभ धरून तिचें टोंक योग्य स्थळीं लावून दाखवावें, म्हणजे त्यांची तेव्हांच समजूत होईल. 'न' व 'ण' ह्यांचे उच्चार ध्यानांत आणून देण्याचा जो हा प्रकार वर लिहिला आहे, त्याचप्रमाणें 'श,' 'ष,' 'स;' व 'ल,' 'ळ;' ह्यांचे उच्चारही ध्यानांत आणून द्यावे. हे उच्चार मुलांस नीट समजावून देण्याचा हा मार्ग विशेष चांगला आहे. उच्चार कसे करावयाचे ह्याबद्दल समजूत केवळ एकदाच करून दिल्यानें काम भागणार नाहीं. वाचनाच्या वेळीं अगर केव्हांही जेव्हां जेव्हां चुकीचा उच्चार होईल, तेव्हां तेव्हां आळस न करितां तो सुधारला पाहिजे, व असें करितां करितां दोन तीन वर्षांच्या संवयीनंतर त्यांचे उच्चार पूर्णपणें चांगले होऊं लागतील.

'न,' 'ण;' 'श,' 'ष,' 'स;' व 'ल,' 'ळ;' ह्या अक्षरांच्या उच्चारांच्या गैरसजुतीमुळें तीं अक्षरें लिहितांना मुलांच्या जशा चुक्या होतात, तशाच कित्येक जोडाक्षरें लिहितांनाही गैरसमजुतीमुळें चुक्या होतात. जोडाक्षरें लिहिण्याचा जो सामान्य नियम—म्हणजे 'एकापुढें दुसरें' अगर 'एकाखालीं दुसरें' अक्षर काढणें,—त्याला अपवादक अशीं बरींच जोडाक्षरें आहे. तीं लिहितांना मुलांच्या वारंवार चुक्या होतता. याकरितां अशीं सर्व प्रकारचीं जोडाक्षरें ज्यांत येतील असे शब्द शिक्षकांनीं मुद्दाम तयार करून ते दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तेंत मुलांकडून वारंवार लिहून घेत जावें. एकादां कसें लिहावयाचें हें चांगलें समजल्यावर मग तें लिहितांना चुक्या होणार नाहींत.

आतां ऱ्हस्व, दीर्घ, व अनुस्वारयुक्त अक्षरें लिहितांना चुक्या होऊं नयेत म्हणून उपाय कोणता योजावा ह्याबद्दल विचार करावयाचा. व्याकरणास थोडा आरंभ झाल्याबरोबर अगर त्यापूर्वी देखील शुद्धलेखनाचे कांहीं

ठळक नियम मुलांस सांगून शुद्धलेखन सुधारण्याची खटपट कित्येक शिक्षक करितात. परंतु ह्या खटपटीनें यश येण्याचा मुळींच संभव नसून उलट मुलांस त्रास होऊन त्यांचा घोंटाळा होण्याचा मात्र विशेष संभव असतो. दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तेंत ह्या नियमांचा मुळींच उपयोग नाहीं. चौथ्या इयत्तेंत कदाचित थोडा उपयोग होईल, व पांचव्या इयत्तेंत मात्र बराच होईल. तथापि ते नियमच वस्तुतः अपुरे असल्यामुळें नुसते नियम सांगण्यानें पांचव्या इयत्तेंत देखील काम भागणार नाहीं. याकरितां अगदीं आरंभापासून ह्या संबंधानें एका विशेष उपायाची योजना करणें जरूर आहे. तो असा;—पुस्तकांतील मजकूर लिहावयास सांगत असतां आपले ऱ्हस्वदीर्घ उच्चार कसे होतात, व कोणत्या अक्षरांवर आपण अनुस्वार देतों, ह्या गोष्टींकडे चांगलें लक्ष देण्याची संवय शिक्षकानें मुलांस लावावी, व त्यांनीं ते उच्चार ऐकून त्याप्रमाणें लिहावें. अर्थात अशा वेळीं शिक्षकानें आपले स्वतःचे उच्चार स्पष्ट व शुद्ध करण्याविषयीं फारच काळजी घेतली पाहिजे. त्याचेच उच्चार अशुद्ध असतील तर मुलांचें शुद्धलेखन सुधारण्याची आशाच करावयास नको. मुलांना मजकूर सांगणें तो सावकाश व अगदीं स्पष्ट उच्चार करून सांगावा. तो सांगत असतांच मधून मधून मुलांस आपल्या सांगण्याकडे, म्हणजे आपण उच्चार कसे करीत आहों, ह्याकडे लक्ष देण्याविषयीं सुचवीत असावें. मजकूर सांगण्यास आरंभ करण्यापूर्वी एकदां सूचना करून ठेविली म्हणजे झालें, असें समजूं नये. मुलें लिहीत असतांना शिक्षकाकडून वारंवार त्या सूचनेचा उच्चार होत गेला पाहिजे. आपल्या उच्चाराप्रमाणें मुलें लिहीत आहेत किंवा नाहीं, हेंही त्याच वेळीं मधून मधून पाहून जेथें त्याचें लक्ष आपल्या उच्चाराकडे नाहीं असें दिसून येईल तेथें विशेष बंदोबस्तानें तें लावून घेतलें पाहिजे. म्हणजे विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट इतकीच कीं शुद्धलेखनाचा मजकूर लिहिण्याला आरंभ झाल्यापासून शुद्ध लिहिणें संपेपर्यंत मुलांचें सर्व अवधान शिक्षकाच्या सांगण्याकडे पूर्णपणें असलें पाहिजे. एकदां अशी संवय मुलांस लागली म्हणजे कांहीं काळ गेल्यानंतर त्यांच्या शुद्धलेखनांत सहजीं सुधारणा झालेली दिसेल.

शुद्धलेखन लिहीत असतां मजकूर शुद्ध लिहिविण्याकडे शिक्षकानें लक्ष देण्याची जशी आवश्यकता आहे, तशीच तो मजकूर नीटनेटक्या रीतीनें लिहविण्याकडे लक्ष देण्याची ही आवश्यकता आहे. सरळ ओळींत मजकूर लिहितां येणें, शब्द सुटे लिहिणें, व विरामचिन्हें देणें, ह्या गोष्टी मुलांस चांगल्या साधल्या पाहिजेत. याकरितां शिक्षकांनीं इकडे दुर्लक्ष करूं नये. स्लेटीवर ओळी आंखून घेऊत त्या पुसट पुसट दिसतील अशा बेतानें पुसाव्या, म्हणजे त्या ओळींतून अक्षरें लिहित गेल्यानें सरळ ओळी येऊं लागतील. दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या इयत्तेंत ओळी आखून घेण्याची ही रीति सक्तीनें चालू ठेविली म्हणजे पांचव्या इयत्तेमध्यें ओळी आंखून न घेतां आपोआप सरळ ओळींत मजकूर लिहितां येऊं लागेल. अक्षरें ठळक काढून शब्द सुटे लिहिण्याकडे व विराम चिन्हें देण्याकडे लक्ष देण्याविषयीं शिक्षकानें मजकूर सांगत असतांच सुचवीत असावें. एकाच गोष्टीची सूचना वारंवार देत गेल्यानें कांहीं दिवसांनीं सूचना करण्याची जरूर न राहतां मुलें आपण होऊनच नीटनेटकें लिहूं लागतील. " शुद्ध-लिहिणें " याचा अर्थ केवळ ऱ्हस्व दीर्घ नीट लिहिणें एवढेंच नव्हे. तर नीट नेटकें व्यवस्थित लिहिणें, ह्या गोष्टीचा समावेशही याविषयांत अवश्य केला पाहिजे.

वर लिहिलेल्या पद्धतीचा अंमल चौथी इयत्ता तयार होईपर्यंत सारखा चालू राहिला पाहिजे. म्हणजे तोंपर्यंत मुलांस शुद्ध लिहिण्याच्या संबंधानें लागलेली संवय, व पांचव्या इयत्तेंत शुद्धलेखनाबद्दल कांहीं नियम सांगावयाचे ते, ह्यांच्या योगानें कोणताही मजकूर त्यांस पुष्कळ अंशीं आपोआप शुद्ध लिहितां येऊं लागेल. पाचव्या इयत्तेमध्यें व्याकरण बरेंच शिकविलें जातें, व शब्दव्युत्पत्तीचें ज्ञानही बरेंच होतें. ह्या दोन्ही विषयांची मदत शुद्ध मजकूर लिहिण्याच्या कामीं पुष्कळ होऊन हा विषय ह्या इयत्तेंत बहुतेक पूर्णपणें तयार झाल्यासारखा होतो. धातूंस उपसर्ग व प्रत्यय लागून संस्कृत भाषेंतले शब्द कसे तयार होतात, ह्या

बद्दलची जरूर असलेली माहिती मुलांस ह्या इयत्तेंतच करून द्यावी लागते, व ती झाल्यानें शुद्धलेखन स्वभावतःच सुधारत जातें.

वाचनाच्या पुस्तकांमध्यें नेहमींच्या परिचित शब्दांखेरीज कित्येक विशेष शब्द येतात, व ते लिहिण्यांत मुलांच्या चुक्या फार होतात. इंग्लीश भाषेंतील शब्द—बहुधा विशेषनामें—हल्लीं मराठींत बरेच येऊं लागले आहेत. त्यांशिवाय इतिहास भूगोलांतील विशेष प्रकारचे शब्द, व संस्कृत भाषेंतील नेहमीं उपयोगांत न येणारे विशेष प्रकारचे शब्द हेही पुष्कळ आढळतात. याकरितां धडा वाचीत असतां जेव्हां जेव्हां असे विशेष प्रकारचे शब्द येतील, तेव्हां तेव्हां ते कसे लिहिले आहेत तें पाहून ध्यानांत ठेवण्याविषयीं मुलांस शिक्षकानें नेहमीं सुचवीत असावें. तसेंच अशा शब्दांची एक यादी शिक्षकानें आपल्याजवळ करून ठेवावी, व ते शब्द मुलांकडून वारंवार लिहून घेत जावें.

---

## ८ अंकगणित.

--:*:--

शाळांतून जे अनेक विषय शिकविले जातात त्या सर्वांमध्यें गणित विषय जास्त महत्वाचा मानिला जातो. या विषयांपैकीं कित्येक कृत्यांचा उपयोग व्यवहारांत नेहमीं होत असून शिवाय मुलांच्या कल्पनाशक्तीचा ह्या विषयाच्या तयारीशीं बराच संबंध असल्यामुळें ह्या विषयाला फार महत्व दिलें आहे व हे रास्त आहे. साधारणतः मुलाची हुशारी कशी काय आहे हें पहावयाचे असले तर बहुधा एखादें कल्पनेचें उदाहरण घालून अटकळ करितां येते. तसेंच गणित विषयांत हुशार असलेला मुलगा बहुधा इतर विषयांतही चांगला असतो असें अनुभवास येतें. परीक्षेच्या वेळीं गणित विषयांत मुलें बरीच पसार झाली म्हणजे शिक्षकाला आपल्यावरील बहुतेक भार कमी झाल्यासारखा वाटतो. गणितांत पास झालेलीं मुलें इतर विषयांत बहुतेक पास व्हावयाचीं अशी सर्व साधारण समजूत असते, व ती पुष्कळ अंशीं खरीही असते. याकरितां इतक्या

महत्वाचा हा विषय शिकविण्याच्या संबंधानें काहींसा विस्तारपूर्वक विचार करणें आवश्य आहे.

दुसऱ्या इयत्तेमध्यें अंकगणित शिकविण्याला प्रथम आरंभ करावयाचा असून अगोदर संख्या शिकवावी लागते. ती शिकवून झाल्यानंतर बेरीज, वजाबाकी, वगैरे कृत्यें शिकविण्याची वहिवाट आहे. परंतु बेरीज वगैरे कृत्यांपेक्षां संख्या बिनचूक मांडतां व वाचतां येणें हीच गोष्ट विशेष कठीण असल्यामुळें मुलाचा फार घोंटाळा होतो. पुष्कळ वेळां असें दृष्टीस पडतें कीं, मुलें गुणाकार, भागाकार, वगैरे कृत्यें देखील बिनचूक करीत असून त्यांस संख्या बिनचूक मांडतां येत नाहीं. मला वाटतें संख्या मांडण्याच्या संबंधानें शिक्षकांस मुलांची समजूत चांगली करितां येत नसल्यामुळें असें होत असावें. 'एक' पासून 'परार्ध' पर्यंत संख्या उलटी सुलटी पाठ करून घेऊन एकदम त्यांस मोठाल्या संख्या मांडावयास सांगतात. प्रत्येक स्थानाचें महत्व किती आहे, हे निरनिराळ्या स्थानांमधील परस्पर भेद कोणता, पाठ केलेल्या स्थानांपैकीं कोणत्या स्थानाचा उच्चार संख्या मांडतांना होत नाहीं वगैरे गोष्टींची समजूत नीट होत नाहीं, व त्यामुळें मुलें चुकतात. याकरितां संख्येच्या संबंधानें मुलांची समजूत चांगली करून देण्याविषयीं शिक्षकानें फार काळजी घेतली पाहिजे. नेहमींच्या अनुभवावरून सर्वांस असें दिसून येईल कीं अब्जापासून पुढील संख्येच्या स्थानांचा उपयोग करण्याची कधींच जरूर लागत नाहीं. अर्थात् ज्या गोष्टीची मुळींच कधीं जरूर लागत नाहीं, ती शिकवावयाची तरी कशाला, ह्याचा विचार प्रत्येकानें केला पाहिजे. अब्जापर्यंतच संख्येचा उपयोग होत असल्यामुळे तितकीच मुलांस शिकवावी. एकपासून अब्जापर्यंत स्थानें प्रथम क्रमानें पाठ करून घ्यावी. यांत 'शतम्' बद्दल 'शें' व 'सहस्र' याबद्दल 'हजार' हीं नावें आरंभापासूनच पाठ करवावीं. 'शतं' व 'सहस्र' ह्या शब्दांचा उपयोग संख्या मांडण्यांत व उच्चारण्यांत मुळींच करीत नसल्यामुळें ते कठीण शब्द मुद्दाम पाठ करवून मुलांचा घोंटाळा करण्याचें

कांहीं एक कारण नाहीं. सरळ स्थानें पाठ म्हणतां येऊं लागल्यावर तीं उलटीं पाठ करवितेवेळीं सर्व स्थानें पाठ न करवितां 'अब्ज,' 'कोटी' 'लक्ष,' 'हजार,' 'शें,' 'दहम्,' व 'एकम्,' इतकीं स्थानें मात्र क्रमानें पाठ करवावीं. ह्या स्थानांपैकीं देखील 'दहं' व 'एकं' ह्या स्थानांचा उच्चार संख्या मांडितांना करण्याची जरूर लागत नसल्यामुळें संख्या पाठ करितांना तीं गाळलीं तरी चालेल. ह्याप्रमाणें संख्या पाठ करून घेतल्यानंतर बरेचसे म्हणजे चार पांचशें बारीक खडे अगर गोळ्या घेऊन संख्येची समजूत करून देण्याला आरंभ करावा. एकम्, दहम्, शें, इ० ह्याक्रमानें पाठ केलेल्या स्थानांपैकीं प्रत्येक स्थानाच्या दहापटीनें त्याच्यावर पुढील स्थानाची किंमत अधीक असते, ही गोष्ट गोळ्यांच्या साह्यानें त्यांच्या अनुभवास आणून द्यावी. स्थानाचें नांव न उच्चारितां नवांपर्यंत कोणताही अंक नुसता उच्चारिला म्हणजे तो 'एकम्' स्थानाचाच समजावयाचा, असा संकेत आहे, असें त्यांस सांगावें. दहा 'एकम्' झाले म्हणजे एक दशक होतो, व त्या दशकालाच 'दहम्' असें म्हणतात. म्हणून दहा 'एकम्' झाले म्हणजे 'दहम्' च्या जागीं एक लिहून 'एकं' च्या जागीं शून्य लिहितात. ह्याप्रमाणें 'दहम्' च्या जागीं जो अंक असेल तितके दशक त्या संख्येंत असतात. असे दशक पुनः दहा झाले म्हणजे एक 'शें' होतो, म्हणून मग 'शें' च्या जागीं एक हा अंक लिहून 'दहम्' ह्या दोहोंच्याही जागीं शून्यें लिहितात. 'दहम्' व 'एकम्' ह्यांच्या जागीं शून्यें लिहिल्यास कोणती चूक होईल तें त्यांच्या नीट ध्यानांत आणून द्यावें. २,४,५ वगैरे वस्तूंच्या समुदायाला जशीं 'जोडी,' 'चौकडी,' व 'पंचकडी' अशीं नांवें ठरविलीं आहेत, तशींच 'दहं' 'शें' वगैरे नांवें 'दहा', 'शंभर' वगैरे अंकांच्या समुदायाला दिलीं आहेत. या रीतीनें नऊशें नव्याण्णव पर्यंत संख्येची चांगली समजूत करून द्यावी. प्रत्येक मुलाजवळ बऱ्याच गोळ्या एकदम देऊन त्या किती आहेत तें एक, दोन, तीन, याप्रमाणें अखेरपर्यंत मोजीत जाऊन न सांगतां, नवांपर्यंत मोजून दहा झाले कीं

' दहंच्या ' जागीं एक खडा ठेवावा, पुनः दहा झाले कीं आणखी एक खडा ' दहं 'च्या जागीं ठेवावा, अशा रीतीनें दहा ' दहं ' पुरे झाले, म्हणजे ते सगळे खडे ' दहं 'च्या' जागेवरून काढून शेंच्या जागीं एक निराळयाच प्रकारचा खडा ठेवावा. एकं, ' ' दहं, ' व ' शें ' ह्या स्थानीं ठेवण्याचे खडे निरनिराळया प्रकारचे घेण्याची व्यवस्था मुद्दाम ठेवावी म्हणजे मुलांची समजूत सुलभतेनें होईल. सर्व खडे संपत तों-पर्यंत असें करावें म्हणजे एकंदर सर्व खडे तीन स्थानांमध्यें कसे विभागले गेले, हें त्यांच्या ध्यानांत येईल, व संख्या म्हणजे काय, ह्याची खरी कल्पना त्यांस होऊं लागेल. खडे, गोळ्या, वगैरेंच्या साह्यानें इतकी कल्पना त्यांस झाली म्हणजे त्यांची मदत न घेतां वाटतील त्या कोणत्याही नुसत्या संख्याच—अर्थात तीन स्थानांच्या—फळयावर मांडून त्या मुलांकडून स्थानांप्रमाणें उच्चारून घ्यावा. कोणत्या स्थानचा अंक ' एकं, ' कोणत्या स्थानचा 'दहं,' व कोणत्या स्थानचा शें समजावयाचा, हें विचारून तीं तीं स्थानें त्यांच्या ध्यानांत आणून द्यावीं. मग तीनही स्थानीं एकच अंक असेल तेव्हां कोणत्या स्थानच्या अंकाची किंमत दुसऱ्या कोणत्या स्थानच्या अंकापेक्षां कमी अथवा जास्त असते, तें समजून सांगतां सांगतां उजवीकडून डावीकडे प्रत्येक स्थान जास्त जास्त किंमतीचें असतें ही गोष्ट समजून द्यावी. शंभरांच्या आंतील संख्येच्या स्थानांचा—म्हणजे ' दहं ' व ' एकं ' ह्या नांवांचा—उच्चार मुळींच करीत नाहींत, तथापि अशा संख्येंतल्या प्रत्येक अंकाचें स्थान कोणतें तें चांगलें ओळखतां आलें पाहिजे. ' शें'चा आंकडा उच्चारून पुढें एक अंकाची संख्या उच्चारिली असतां ती ( एक अंकाची संख्या ) ' एकं ' स्थानची असते. व ' दहं ' स्थानची संख्या मुळींच नसल्यामुळें तो अंक व ' शें ' स्थानचा अंक ह्यांच्यामध्यें शून्य द्यावें लागतें, हें चांगलें ध्यानांत आणून द्यावें.

तीन स्थानांच्या संख्येची इतकी समजूत झाल्यानंतर पुढें जास्त स्थानांची संख्या मांडावयास शिकवावी. परंतु महिना पंधरा दिवस संवय होऊन पूर्वीची संख्या मुलांच्या मनांत उत्तम प्रकारें ठसल्याशिवाय पुढें शिकवि-

ण्याची घाई करूं नये. ह्या मधल्या अवकाशामध्यें मुलांस बेरीजवजाबाकीचीं फळें शिकविण्याला आरंभ करावा म्हणजे बेरीजवजाबाकीची समजूत व संख्या घटविण्याचें काम हीं बरोबरच चालतील.

' शें ' स्थानापर्यंतची संख्या चांगल्या रीतीनें मांडितां व वाचतां येऊं लागल्यावर पुढील स्थानांची समजूत करून देण्याला फारसे प्रयास पड-णार नाहींत. तथापि पुढील सर्व स्थानांची एकदम समजूत करून न देतां पहिल्यानें ' हजार ' व ' दशसहस्र ' ह्या स्थानांची समजूत करून देऊन तीं घटल्यावर कांहीं दिवसांनीं पुढचीं सर्व स्थानें सांगावीं. ' दशसहस्र ' व ' हजार ' ह्या दोन्ही स्थानांची मिळून संख्या एकदम उच्चारितात, व तिला ' हजार ' हें एकच नांव देतात. त्यांत डावी-कडचा अंक ' दशसहस्र ' स्थानचा असून उजवीकडचा ' हजार ' ह्या स्थानचा असतो, व एकच अंक असल्यास तो ' हजार ' ह्या स्थानचा असून ' दशसहस्र ' स्थानीं शून्य द्यावें लागतें, वगैरे प्रकारची समजूत नीट करून द्यावी. ' हजार ' आणि ' दशसहस्र ' ह्या स्थानांमध्यें जसा हा परस्पर संबंध आहे, तसाच तो ' लक्ष ' व ' दशलक्ष ' आणि ' कोटी ' व ' दशकोटी ' ह्या स्थानांमध्येंही आहे ही गोष्ट मुलांस त्या त्या स्थानांच्या समजुतीच्या वेळीं सांगावी. कोणतीही पुष्कळ स्थानांची संख्या मांडितांना प्रत्येक स्थानाचा उच्चार झाल्यावर त्या स्थानापुढें—म्हणजे त्याच्या उजवीकडे—आणखी किती स्थानें असावयाचीं, हें मुलांस पक्कें समजलें पाहिजे. म्हणजे सांगितलेल्या सर्व स्थानांच्या संख्या मांडून, उच्चार न केलेल्या कोणकोणत्या स्थानीं शून्यें द्यावयाचीं हें त्यांस कळूं लागेल.

संख्येची याप्रमाणें बरीच समजूत झाल्यानंतर एक ' कोटी ' म्हणजे, किती 'लक्ष,' किती 'हजार' अगर किती ' शें ', तसेंच ' सवाकोटी, पावणेचार लक्ष, अडीचशें,' ही संख्या मांडणें वगैरे—अशा प्रकारची सर्व विशेष प्रकारची माहिती मुलांस सांगावी. दुसऱ्या इयत्तेंत ह्या गोष्टींची समजूत कदाचित् चांगली होणार नाहीं, याकरितां मुलें तिसऱ्या इयत्तेंत

गेल्यावर ती सांगितली तरी चालेल. परंतु असली संख्या कशी मांडावी हें मुळींच सांगण्याचे मात्र राहतां उपयोगी नाहीं.

संख्या शिकविण्याला आरंभ केला म्हणजे तिच्याच बरोबरीनें बेरीज व वजाबाकी हे प्रकार शिकविण्यालाही आरंभ करावा. हा आरंभ करणें म्हणजे एकदम पुष्कळ स्थानांच्या चारपांच संख्या घेऊन बेरीज सांगावयास लागणें, असें मात्र समजूं नये. संख्यांच्या बेरजा वजाबाक्या करितां येऊं लागण्यापूर्वी कोणत्याही एक अगर दोन अंकांच्या संख्येंत नवांपर्यंत कोणताही अंक मिळविणें, व विसांपर्यंच्या कोणत्याही संख्येंतून दाहापर्यंत कोणताही अंक वजा करून बाकी सांगणें ह्या दोहों प्रकारच्या कृत्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें मुलांस लवकर देतां येऊं लागलीं पाहिजेत. उजळणी शिकविण्याची जी पद्धती पूर्वी लिहिली आहे, त्या पद्धतीनें शिकविणें झालें असेल, तर अशीं उत्तरें देणें मुलांस दुसऱ्या इयत्तेंत कठीण जाणार नाहीं. परंतु जर कोणत्याही कारणानें त्यांस तीं उत्तरें देतां येत नसतील, तर दुसऱ्या इयत्तेंत आरंभीं ह्या संबंधानें विशेष मेहनत घेतली पाहिजे. हीं कृत्यें तयार करवितांना प्रथमतः अगदीं सोप्या गोष्टीपासून आरंभ केला पाहिजे, कोणत्याही संख्येंत एक मिळविला म्हणजे तिचा तिच्यापुढचा अंक होतो, व एक वजा केला असतां मागचा अंक होतो, ही गोष्ट त्यांच्या फारच लवकर लक्षांत येईल. मग तसें प्रश्न विचारतां विचारतां 'दोन' मिळविले अगर वजा केले म्हणजे काय होतें, तें ध्यानांत आणून देऊन त्याबद्दलचे प्रश्न एकसारखे विचारीत रहावें. म्हणजे पुष्कळशा सहवासानें ती गोष्ट त्यांच्या मनांत पक्की ठसेल. मग 'तीन' मिळविण्याची व वजा करण्याची संवय लावावी. व अशा रीतीनें जसजशी मागील समजूत चांगली होत जाईल तसतशी पुढें दहांपर्यंतची समजूत करून द्यावी, म्हणजे सर्व गोष्टी मुलांस सुलभतेनें समजतील.

वर लिहिलेल्या पद्धतीनें बेरजा शिकवितांना दोन विशेष प्रकार आढळून येतील. 'एकम्' स्थानच्या अंकांची बेरीज केव्हां नांवच्या

आंत असेल, व केव्हां नवांपेक्षा जास्त होऊन त्यामुळें 'दहम्' स्थानाच्या अंकांत एक हातचा मिळवावा लागेल. ५+४, २७+१, १२+५ इत्यादी ह्या पहिल्या प्रकारच्या बेरजा आहेत, व ८+७, ४७+९, ८९+४ इत्यादी ह्या दुसऱ्या प्रकारच्या बेरजा आहेत. ह्यांत पहिल्या प्रकारच्या बेरजांचीं उत्तरें लवकर सांगणें फारसें कठीण जाणार नाहीं. परंतु दुसऱ्या प्रकारच्या बेरजा लवकर करितां येणार नाहींत. अशा बेरजा करितांना 'एकम्' स्थानच्या अंकांची बेरीज प्रथम मनांत आणावी लागते. ती नवांपेक्षां जास्त होत असेल तेव्हा त्या ( म्हणजे 'एकम्' स्थानाच्या अंकांच्या ) बेरजेपैकीं 'एकम्' स्थानचा अंक उत्तरामध्यें 'दहम्' स्थानीं ठेवावा लागतो, म्हणजे त्यांची बेरीज होते. ही गोष्ट अनेक उदाहरणाच्या योगानें मुलांच्या पक्की ध्यानांत आणून दिली तर तोंडी बेरजा मुलांस फार लवकर करितां येऊं लागतील.

हल्लीं बेरीज शिकविण्यापूर्वी मुलांस मिळवण्या शिकविण्याची सर्वत्र वहिवाट आहे. तोंडी लवकर बेरजा करितां येऊं लागण्याला मिळवण्यांचा पुष्कळ उपयोग होतो यांत संशय नाहीं. तथापि वर लिहिलेल्या पद्धतीनें शिकविल्यास तेंच कार्य विशेष समजुतीनें होईल. तसेंच मिळवण्या शिकविणें त्या हल्लीं चालू असलेल्या पद्धतीनें—म्हणजे पाड्यांच्या मिळवण्या न शिकवितां देवकुळेकृत तोंडच्या हिशेबांच्या पहिल्या पुस्तकांत 'शिक्षकांस सूचना' ह्या प्रकरणांत ज्या प्रकारच्या मिळवण्या शिकविण्याविषयीं लिहिलें आहे त्या—म्हणजे 'एकांतल्या बेरजा,' 'दोहोंतल्या बेरजा,' इत्यादि ह्या शिकवाव्या.

बेरीज व वजाबाकी शिकविण्यापूर्वी ज्या प्रमाणें कित्येक लहान संख्यांच्या बेरजा व वजाबाक्या तोंडीं सांगतां येणें जरूर आहे, त्याप्रमाणेंच गुणाकार व भागाकार शिकविण्यापूर्वी कांहीं लहान संख्यांचे गुणाकार मुलांस तोंडीं करितां आले पाहिजेत. पाडे व पावकीं, निमकीं इत्यादि प्रकारची उजळणी हे अशाच प्रकारचे गुणाकार आहेत. तथापि हल्लींच्या उजळणी शिकविण्याच्या पद्धतीप्रमाणें जरी मुलांस सर्व उज-

ळणी सारखी म्हणत गेल्यास बिनचूक म्हणतां येते, तरी उलट सुलट विचारिलेल्या प्रश्नाचीं उत्तरें एकदम देणें त्यांस बरेंच कठीण जातें. याकरितां अशा प्रश्नांचीं उत्तरें लवकर देतां येण्याची संवय मुलांस जरूर लाविली पाहिजे. आळस न करितां रोज एक सारखे प्रश्न विचारीत गेल्यानें ती संवय मुलांस लागेल.

तिसांपर्यंत पाड्यांशा अशा प्रकारच्या प्रश्नाचीं उत्तरें मुलांस चांगली देतां येत असलीं, तर गुणाकार भागाकार करितांना मुलांस चांगली मदत होते. म्हणजे तीं कृत्यें त्यांस लवकर व बिनचूक करितां येतात. परंतु नवांपर्यंत पाड्यांचीं अशीं उत्तरें जर मुलांस देतां आली नाहींत, तर त्यांस गुणाकाराचीं व भागाकाराचीं कृत्यें मुळींच करितां येणार नाहींत. याकरितां निदान तितकीं म्हणजे नवांपर्यंत पाड्यांचीं उत्तरें तरी चांगल्या रीतीनें देतां येण्यासाठीं शिक्षकानें फार यत्न केला पाहिजे व तीं उत्तरें चांगली देतां येऊं लागण्यापूर्वी गुणाकार अगर भागाकार शिकविण्याला मुळींच आरंभ करूं नये.

कोणताही विषय मुलांस शिकवितांना एकाच वेळीं अगदीं थोडा भाग शिकवावा. तसेंच सोप्या गोष्टी प्रथम सांगून त्या चांगल्या समजल्यावर पुढल्या त्यापेक्षां कठीण गोष्टी सांगाव्या. अशा रीतीनें कोणताही विषय शिकवीत गेलें तरच तो विषय मुलांस चांगला समजेल. त्याचप्रमाणें एखादी नवीन गोष्ट सांगतांना तिचा कोणच्या तरी पूर्वीं शिकविलेल्या जुन्या गोष्टीशीं संबंध जोडून द्यावा. गणितासारख्या विषयांत तर ह्या गोष्टींकडे अगदीं दुर्लक्ष होतां कामा नये. परंतु अनुभवावरून असें दिसून येते कीं, पुष्कळ शिक्षकांचें ह्या संबंधानें फार दुर्लक्ष होत असतें. त्यांची अशी समजूत असतें कीं एकदां लवकर सगळा विषय मुलांस शिकवून टाकावा, आणि मग सावकाशपणें पूर्वी शिकविलेल्या विषयाची पुनः पुनः उजळणी करीत रहावें, म्हणजे तो विषय चांगला तयार होईल. परंतु ही समजूत अगदीं चुकीची आहे. शिकविलेल्या भागाची जितकी जितकी जास्ती उजळणी होत जाईल. तितक्या तितक्या मानानें मुलें त्या विषयांत जास्ती वाकब

होतील यांत संशय नाहीं.—व याच समजुतीनें पुष्कळ शिक्षक एकदां विषय कसातरी मुलांस समजावून देऊन मग एकसारखें त्या विषयाची उजळणी करून घेण्याच्या उद्योगाला लागतात. म्हणजे पुष्कळशीं उदाहरणें त्यांस घालीत सुटतात.—परंतु पुढें कोणत्या एका विषयाची उजळणी करणें विशेष जरूरीचें आहे, म्हणून अगोदर त्या विषयाची समजूत करून देण्याच्या कामीं घाई करून अर्धवट समजूत झाली न झाली तोंच उजळणीच्या पाठीस लागणें, हें मात्र कोणत्याही दृष्टीनें हितावह नाहीं. याकरितां थोडा व अगदीं सोपा भाग प्रथम सांगून नंतर मुलांची समजूत जसजशी दृढ होत जाईल, तसतसा पुढील त्यापेक्षां कठीण भाग थोडा थोडाच सांगत जाण्याची वहिवाट शिक्षकांनीं अवश्य ठेविली पाहिजे. हीच पद्धती विशेषेंकरून गणितासारख्या विषयांत मुलांच्या हिताची आहे.

वरील विवेचनावरून असें सहज लक्षांत येईल कीं, बेरीज शिकवितांना पहिल्यानें तीन किंवा चार स्थानांच्या दोन दोन संख्या सांगून त्यांची बेरीज करविणें जास्त सुलभ जाईल. तीं चांगलीं येऊं लागल्यावर मग एकदोन जास्त जास्त स्थानांच्या तीन संख्या सांगून बेरीज करवावी, व पुढें जरूरीप्रमाणें पाहिजे तेवढ्या व पाहिजे तितक्या संख्या सांगाव्या. तसेंच वजाबाकी शिकवितांना प्रथम दोन किंवा तीन स्थानांच्या संख्यांची वजाबाकी शिकवावी, व त्यांतही मोठ्या संख्येंतले अंक असे मोजावे कीं धाकट्या संख्येंतले अंक त्यांतून वजा करितांना 'हातचा' येण्याचा प्रसंगच येऊं नये. असें करितां करितां मोठ्या संख्येपैकीं एखादा अंक लहान संख्येच्या (त्यांतून वजा करण्याच्या) अंकापेक्षां लहान असेल अशी संख्या सांगावी. अशा प्रसंगीं वजाबाकी कशी करावयाची ह्याबद्दलची विशेष समजूत करून द्यावी. ही समजूत चांगली होईपर्यंत मोठ्या संख्येंतले अंक धाकट्या संख्येंतल्या त्यांतून वजा करावयाच्या अंकापेक्षां लहान असावयाचे ते एकापेक्षां जास्त सहसा असूं देऊं नये. चांगली समजूत झाल्यावर मग तसे अंक जास्त घालावे, व तीन स्थानांच्या अशा संख्यांची वजाबाकी चांगली येऊं लागल्यावर जास्त

स्थानांचा संख्या घालाव्या. गुणाकार शिकवितांना प्रथम तीन स्थानांच्या संख्येला नवांपर्यंतच्या अंकानें गुणावयास शिकवावें, व गुण्यामध्यें शून्य असूं देऊं नये. तितकी समजूत चांगली झाल्यावर गुण्य संख्या जास्त स्थानांची सांगावी, व मग तींत एखादें शून्य असेल अशी सांगावी. यानंतर गुणक संख्या दोन स्थानांची सांगून गुणाकार शिकवावा; व अखेरीस गुणक संख्या दोहोंपेक्षां अधिक स्थानांची सांगून त्यांत शून्याची योजना करावी. हेंच धोरण लक्षांत ठेवून भागाकारही क्रमाक्रमानें शिकवावा.

बेरीज, वजाबाकी इत्यादि कृत्यें मुलांस साधारणतः बऱ्या रीतीनें करितां येऊं लागली म्हणजे मुलांकडून उदाहरणें करून घेणें ती दोन प्रकारचीं करून घेतलीं पाहिजेत. हीं कृत्यें चांगलीं घडण्याकरितां साध्या ( भाववाचक ) संख्या घालून उदाहरणें करविणें, हा एक प्रकार; व तीं कृत्यें प्रत्यक्ष करावयास न सांगतां उदाहरणांच्या मजकुरावरून कोणती कृत्यें करावयाचीं हें मुलांनीं ओळखून त्या प्रश्नांचीं उत्तरें काढणें—म्हणजे ज्यांना कल्पनेचीं उदाहरणें म्हणतात तीं—हा दुसरा प्रकार. ह्यांपैकीं पहिल्या प्रकारचीं उदाहरणें मात्र पुष्कळशीं करून घेण्याची सर्वत्र वहिवाट आहे. दुसऱ्या प्रकारच्या उदाहरणांकडे विशेषेंकरून दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तेमध्यें शिक्षकांचें फार दुर्लक्ष होतें. परंतु दुसऱ्या इयत्तेपासूनच कल्पनेचीं उदाहरणें सोडविण्याची संवय मुलांस असली म्हणजे कल्पना चालविण्याच्या कामीं त्यांच्या बुद्धीला कसरत होऊन पुढें चौथ्या व पांचव्या इयत्तांमध्यें त्यांना कल्पनेच्या उदाहरणांचा जो एकदम बाऊ वाटतो तो वाटणार नाहीं. अशा तऱ्हेचीं उदाहरणें मुलांस दुसऱ्या इयत्तेंत सांगितल्यानें मुलांच्या कल्पनाशक्तीवर त्यांच्या वयाच्या मानानें जास्त ताण बसतो असें कित्येकांचें म्हणणें आहे, परंतु प्रत्यक्ष अनुभवावरून तसें वाटत नाहीं. इतकेंच नव्हे, तर उलट अशीं उदाहरणें मुलांस जसजशीं समजत जातात तसतसा त्यांस आनंद वाटून त्यांची जिज्ञासा जास्त वाढत जाते. अंकगणिताच्या निरनिराळ्या पुस्तकांतून हल्लीं अशा प्रकारच्या उदाहरणांचा बराच संग्रह असतो. शिक्षकांनीं तीं पुस्तकें

आळगावीं हें चांगलें. परंतु पुस्तकें जवळ बाळगण्यांत जर कांहीं अडचण वाटत असेल, तर निदान निरनिराळ्या पुस्तकांतील अशा तऱ्हेची अनेक उदाहरणें एका वहींत टिपून घेऊन ती वही तरी जवळ बाळगण्याची तजवीज अवश्य ठेवावी. हीं उदाहरणें मुलांस शिकवितांना अगदीं सोपीं असतील तीं पाहिल्यानें सांगून पुढें कठीण कठीण सांगत जावें. तसेंच पहिल्यानें बेरीज, वजाबाकी, गुणाकार, वगैरे कोणतेंही एकच कृत्य करण्याची ज्यांत जरूर असेल अशीं उदाहरणें शिकवून तीं चांगली समजूं लागल्यावर ज्यांत ह्यापैकीं एक, दोन अगर तीन कृत्यें करण्याची जरूर लागेल अशीं जास्त कठीण उदाहरणें सांगावीं. आळस न करितां विशेष झटून दुसऱ्याइयत्तेपासून कल्पनेचीं उदाहरणे मुलांकडून करून घेत गेल्यास हल्लीं विशेष रीतीनें भासत असलेलें गणित विषयाचें काठिण्य पुष्कळ अंशीं दूर होईल.

संख्या, बेरीज इत्यादि चार मुख्य कृत्यें शिकविण्याच्या संबंधानें जो वर इतका विस्तार केला आहे, तितका तो तिसऱ्या इयत्तेपासून पुढील प्रत्येक विषय शिकविण्याच्या संबंधानें करण्याची जरूर आहे असें वाटत नाहीं. सोप्या व थोड्या थोड्या गोष्टी पाहिल्यानें शिकवीत जाणें, ही त्यांत मुख्यत्वेंकरून ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. गणित विषयाचा कोणताही भाग शिकवितांना तिचें विस्मरण होऊं देऊं नये.

विविध परिमाणांच्या संख्यांचें गणित शिकवितांना आरंभीं कोष्टकें शिकवावयाचीं, तीं नुसतीं तोंडपाठ करविण्याची सर्वत्र वहिवाट आहे. हीं पाठ केलेलीं कोष्टकें मुलें पुढें पांचव्या सहाव्या इयत्तेपर्यंत देखील चुकत असतात. कोष्टकांची समजूत कांहीं निराळ्या रीतीनें करून दिली तर असें होणार नाहीं. कोण कोणत्या कोष्टकांचा उपयोग व्यवहारांत कोणकोणत्या कामीं होतो, व एकाच जातीच्या निरनिराळ्या परिमाणांचा परस्पर संबंध काय, ह्या बद्दलचें ज्ञान मुलांस बऱ्याच वस्तू प्रत्यक्ष दाखवून करून देतां येईल. तोळा, शेर, मण; अगर चवली, पावली, रुपया; ह्या परिमाणांचीं नुसतीं कोष्टकें पाठ करून घेण्यापेक्षां

त्या वस्तू मुलांस प्रत्यक्ष दाखवून त्यांचा परस्पर संबंध त्यांस समजून सांगितला तर त्यांची समजूत विशेष दृढ होईल. ह्याकरितां कोष्टकांची समजूत सावेल तितकी ह्या रीतीनें करून देणें विशेष हितावह आहे.

चौथ्या इयत्तेपासून पुढें कल्पनेचीं उदाहरणें शिकवितांना कित्येक विशेष गोष्टी ध्यानांत ठेविल्या पाहिजेत. मुलांकडून हीं उदाहरणें करून घेतांना प्रत्येक उदाहरणाचें स्पष्टीकरण त्यांजकडून पूर्णपणें लिहवावें. एकामागून एक गुणाकार, भागाकार वगैरे जरूर असलेलीं कृत्यें करून अखेरीस उत्तर काढून दाखवावयाचें, अशी बहुतेक ठिकाणीं चाल आहे. कोणतें कृत्य कां केलें, हा बोध त्यापासून होत नाहीं, पण तो झाला पाहिजे. स्पष्टीकरण पूर्णपणें लिहविण्याची आरंभापासूनच संवय लाविल्यानें स्वतःची कल्पना चालवून नवीं नवीं उदाहरणें सोडविण्याची मुलांस जास्त संवय लागेल; व त्या योगानें त्यांची कल्पनाशक्ती वाढत जाईल.

दुसरी गोष्ट अशी कीं, कल्पनेचीं उदाहरणें विशेषेंकरून पुढच्या इयत्तांमध्यें मुलांस फार अडतात, व ती अडल्याबरोबर एकदम सर्व उदाहरण मुलांस समजावून देण्याची पुष्कळांची पद्धत असते. परंतु ती पद्धत चांगली नाहीं. कोणतेंही उदाहरण मुलांस अडलें म्हणजे तें सर्व उदाहरण त्यांस समजावून न देतां कल्पनेचा थोडासा भाग त्यांस सुचवून देऊन पुढें त्यांचें त्यांसच तें करावयास सांगावें, म्हणजे त्या सूचनेच्या आधारानें बरींच मुलें तें उदाहरण स्वतः सोडवितील. अशा रीतीनें त्यांची कल्पना वाढत जाईल. आपल्या अर्धवट दिलेल्या सूचनेनें त्यांना उदाहरण सुटलें नाहीं, तर मात्र पुढें जास्ती सांगावें. मुद्दा इतकाच कीं त्यांची कल्पनाशक्ती वाढविण्याच्या कामीं आपण त्यांस मदत केली पाहिजे. प्रत्येक अडलेलें उदाहरण त्यांस पूर्णपणें सांगत गेल्यानें तीं उदाहरणें जरी चांगलीं समजलीं तरी त्यांची कल्पनाशक्ती जशी पाहिजे तशी वाढणार नाहीं यांत संशय नाहीं. तसेंच पुढें पुढें म्हणजे पांचव्या व विशेषेंकरून सहाव्या इयत्तेमध्यें कल्पनेचीं बरींच उदाहरणें शिक्षकानें स्वतः मुलींच समजावून देऊं नयेत. ती त्यांनाच स्वतःची कल्पना चालवून

**अंकगणित भाग ३ रा**—विद्याखात्यानें सर्व शाळांत चालविण्याकरितां पसंत केलेला मराठी सहाव्या इयत्तेतील व ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांकरितां अति मेहनतीनें तयार केलेला. हा खालीं सहीकरणाराकडे रोख किंमतीनें अगर व्हिपीनें मिळेल. दहा रु० किंमतीच्या पुस्तकांवर शेंकडा२५ कमिशन दिलें जाईल. किंमत ८१४, टपाल हशील ८१८६.

नं० ४८, बुधवार पेठ, पुणें. **गणेश बळवंत लिमये.**

---

## चित्रलेखन मूलतत्व (पुस्तक पहिलें)

सतत पंचवीस वर्षे ड्रॉईंग शिकविण्याच्या अनुभवावरून ज्या ज्या गोष्टी विद्यार्थ्यांस प्रथम शिकविणें अवश्य वाटलें त्या सर्व शास्त्रीय नियमानें पद्धतशीर बसवून हें पुस्तक तयार केलें आहे. पुस्तकाची किंमत प्रथम सहा आणे ठेविली होती. परंतु कलेचें शिक्षण व अभिरुची आपले देशांत जितकी असावी तितकी नसल्या कारणानें व त्याचा प्रसार फार व्हावा व विद्यार्थ्यांस घेण्यास सुलभ जावें करितां याची किंमत अगदींच कमी म्हणजे फक्त अडीच आणे केली आहे. अशा तऱ्हेचें हें मराठींत पहिलेंच पुस्तक आहे. तेव्हां सर्वांनीं याचा उपयोग करून घ्यावा अशी आमची शिफारस आहे.

हें पुस्तक मे. विद्याखात्याचे डायरेक्टर सा. बा. यांनीं मराठी शाळांकरितां व मराठी शाळांचे लायब्रऱ्यांकरितां आपलें मेमो नंबर १०९४ तारीख १. १२. १९०० मध्यें पास केलें आहे. कळावें.

**म्यानेजर चित्रशाळा छापखाना,**
**पुणें सिटी.**

---

**पद्यसमुच्चयः**—आंग्लोव्हरनाक्युलर पहिल्या तीन इयत्तांकरितां व मराठी ४।५।६ या यत्तांकरितां मे० डायरेक्टर साहेब यांनीं मंजूर केलेलें मराठी कवितेच्या वेंच्यांचें पुस्तक. शेवटीं समजुतीच्या भरपूर टीपा व कोश आहेत. आवृत्ती पांचवी. किं० ८६ ट. ख. ८१.

**पुस्तकें पुणें येथें चित्रशाळेंत मिळतील.**

विक्रीस तयार. किं. १२ आणे.

मेहेरबान लिव्हारनर साहेब यांनीं इंग्रजींत लिहिलेले सिटीझन आफ इंडिया या पुस्तकांचे मराठी भाषांतर छापवून विक्रीस तयार आहे. व हें बुक डा. आ. प. ई. यांनीं मराठी ५।६ यत्तेकरितां नेमकें आहे.

म्याकमिलन आणि कंपनी.

१२ ब्यॉंक स्ट्री. मुंबई.

---

रा. भि. जोशीकृत.

**बालबोध मराठी व्याकरण.**

याची पुष्कळ जास्त माहिती घालून सुधारलेली दुसरी आवृत्ती.

चित्रशाळेंत विक्रीस तयार आहे. पृष्ठसंख्या १८०.

किंमत ०५ आणे ट० ख० ०१

**विक्रीस तयार**

लांगमनचे मोडी कित्ते नंबर १—२—३—४ यांबरहुकूम लाइन पेपर तयार आहेत. लहान मुलांस कित्त्याखालीं दिलेल्या दोन किंवा तीन रेघांवरून वळण वळविलें असतां नीट हात बसत नाहीं यासाठीं अक्षर वळविण्यास यांचा उपयोग होईल.

दर १०० कागदांस ०५. म्या० चि० शा० प्रे० पुणें.

---

**विक्रीस तयार.**

नऊ इंची पृथ्वीचा ग्लोब पेटीसुद्धां, हा ग्लोब प्रत्येक शाळेस असल्यानें पृथ्वीचा आकार वगैरे शिकविण्याच्या कामीं फार उपयोग होईल. किं० रु० २०

म्यानेजर. चित्रशाळा पुणें.


---


प्रकाशक—शंकर नरहर जोशी.

Registered No B 179

पुस्तक १२. श्री अंक ११.

सन १९०१ माहे नोव्हेंबर.

# मराठी शालापत्रक

# Marathi School Paper

विषयक्रम.

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| वनस्पतिशास्त्र. ... ... ... ... ... | २४१ |
| काव्यरत्न-मंजूषा. ... ... ... ... | २५७ |
| मुलांसाठीं प्रात:स्मरण–सायं-प्रार्थना–संतांचीं वचनें ... ... ... ... ... ... | |
| पुणें ट्रेनिंग कॉलेजची वार्षिक परीक्षा.... ... | २५९ |
| पास झालेल्या इसमांची याद– ... ... | |
| शिक्षकमित्र:—तोंडचे हिशेब–इतिहास व भूगोल–सामान्य विचार– .. ... ... | ४१ते६४ |

'चित्रशाळा' प्रेस, पुणें

अगाऊ वार्षिक वर्गणी टपालखर्चासह रु० १८२

कै० केरो लक्ष्मण छत्रेकृत

# अंकगणित

भाग १।२।३

कै० केरो लक्ष्मण छत्रे यांचे चिरंजीव रावसाहेब निळकंठ विनायक छत्रे यांनीं पूर्वींच्या अंकगणितांत हल्लीं पुष्कळ सुधारणा करून नवीन आवृत्ती छापविल्या आहेत व ठिकाठिकाणीं जास्त उदाहरणें व व्याख्याही दिल्या आहेत. पूर्वीं दुसरा भाग होता, त्याचे हल्लीं दोन भाग केले आहेत; म्हणजे एकंदर ३ भाग झाले आहेत. भाग पहिला किंमत ८=॥ भाग दुसरा किं० ।= व तिसरा भाग लवकरच छापून प्रसिद्ध होईल. शाळा-मास्तरांस कमिशन मुबलक मिळेल.

म्यानेजर चि० शा० प्रे० पुणें.

---

# सार्थ प्राकृत प्रकाश.

सदरहू पुस्तक आमचे मित्र रा. रा. **शंकर रामचंद्र हतवळणे** ह्यांनीं प्रसिद्ध प्राकृत वैयाकरण वररूची ह्याच्या ग्रंथाच्या आधारें केलें आहे. प्राकृत भाषा ही संस्कृत व हिंदुस्थानांतील अर्वाचीन भाषा ह्यांमधील एक सांखळी आहे. संस्कृतांतून प्राकृतांत व प्राकृतांतून अर्वाचीन भाषांत रूपें कशीं आलीं, हें समजल्याशिवाय शब्दांची खरी व्युत्पत्ती समजली असें ह्मणतां येत नाहीं. पुष्कळ ऐतिहासिक प्रश्नांशीं प्राकृताचा निकट संबंध आहे. तेव्हां ह्या भाषेचा चांगला परिचय असल्याशिवाय त्यांचा उलगडा करण्यास अडचण असते. शब्दांचीं रूपें कशीं बनलीं व त्यांस आचार्यांच्या सूत्राचा मूळ आधार कोणता, हें प्रस्तुतच्या पुस्तकावरून दिसून येईल. प्राकृत प्रकाशाचे एकंदर १२ परिच्छेद असून पहिल्या ९ परिच्छेदांत महाराष्ट्री जी मुख्य प्राकृत भाषा तिजविषयीं व बाकींच्या तीन परिच्छेदांत पैशाची, मागधी व शौरसेनी ह्यांच्या संबंधाच्या मुख्य मुख्य गोष्टी सांगितल्या आहेत. हें पुस्तक मराठी शिक्षक, ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थी व हायस्कुलांतील वरच्या वर्गांतून मराठी शिकणारे विद्यार्थी ह्यांस विशेषेंकरून उपयोगीं पडण्यासारखें आहे. पुस्तकाची किंमत ८( आहे. टपाल हशील शिवाय. एकदम बरींच पुस्तकें घेणारास कमिशन मुबलक मिळेल. पुस्तकें आमच्या छापखान्यांत विकत मिळतील.

# शालापत्रक.

येथें शुद्र नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं।
सद्गुरू पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळां जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १९ नोव्हेंबर १९०१. अंक ११.

## वनस्पतिशास्त्र.

—:-o :—

अलीकडे पाश्चात्य देशांतील शिक्षणक्रमांत शास्त्रीय विषयांचा समावेश अधिकाधिक होत चालला आहे व त्यामुळें लोकांना सृष्टपदार्थांच्या अनेक गुणांची माहिती होऊन त्या मानानें मनुष्याच्या सुखामध्यें भर पडत आहे. आमच्या इकडेही अशीच तऱ्हा थोडी फार उत्तरोत्तर होत चालली आहे, परंतु अनेक अडचणींमुळें अजून शास्त्रीय ज्ञानाचा तितका प्रसार आमच्याकडे झाला नाहीं व झपाट्यानें होतही नाहीं. यांतली मुख्य अडचण ही आहे, कीं शास्त्रीय ज्ञानाचे सर्व ग्रंथ परक्या भाषेंत लिहिलेले असतात; व ज्या एकंदर जनसमजास त्यांची माहिती करून द्यावयाची त्याला स्वभाषे शिवाय दुसरी भाषा कळणें शक्य नाहीं. त्यांच्यासाठीं शास्त्रीय ज्ञान स्वभाषेंत आणण्याचे प्रयत्न अजून तितके कोणी करीत नाहीं. दुसरी अडचण अशी आहे, कीं आमची विद्यार्जनाची जुनी पद्धत पंडितगिरी मिळविण्याची आहे. आम्ही आपलें डोकें सज्ञान करण्याची जितकी काळजी वाहतों, तितकी हातांना चपळाई आणण्याची वाहत नाहीं, यामुळें हस्तकौशल्याचें मूळभूत असें जें सृष्टवस्तूचें ज्ञान, त्याची आवड अजुन

आम्हांस तितकी वाटत नाहीं. परंतु उत्तरोत्तर जुना मनू फिरत चालला आहे. या औद्योगिक युगांत हस्तपादादि अवयवांस चपळाई आणल्या खेरीज गती नाहीं, याची प्रतीती आपल्यास येत चालली आहे. ही प्रचीती जसजशी जास्त येत जाईल, तसतसे आपण या उपयुक्त ज्ञानार्जनाच्या अधिकाधिक पाठीस लागूं हें उघडच आहे.

इंग्लंडांत व इतर कित्येक युरोपियन देशांत अगदीं लहान मुलांना सुद्धां शास्त्रीय गोष्टी शिकवितात. हें ऐकूनच कित्येकांस मोठें आश्चर्य वाटेल, कीं ज्या गोष्टी आमच्या इकडे मोठ्या माणसांनाही समजण्यास कठीण वाटतात, त्या लहान मुलांना कशा समजतील? हें आश्चर्य वाटणें साहजिक आहे. परंतु हें शास्त्रीय ज्ञान लहान मुलांसही देण्यासाठीं ज्या तजविजी त्या देशांत करीत आहेत, त्या पाहिल्या म्हणजे हें ज्ञान लहान मुलांना कसें करून देत असतील, असें आश्चर्य वाटण्याचें कारण राहाणार नाहीं. अगोदर सृष्टपदार्थांचें ज्ञान हें मनोरंजक व विस्मयकारक असतें. शिवाय प्रत्येक शास्त्रांत अत्यंत सोपीं अशीं गोष्टींचीं पुस्तकें तयार केलीं आहेत. तीं शाळेंत वाचवितात, व त्यांच्यावरून सहजीं शास्त्रीय ज्ञानाची माहिती होत जाते. दुर्दैवेंकरून आमच्या शिक्षक लोकांना इंग्रजी येत नाहीं. तेवढें जर येत असतें, तर या पुस्तकांचा त्यांना सहज व मनोरंजक रीतीनें शास्त्रीय ज्ञान करून घेण्यांत व मुलांस शिकविण्यांत उपयोग झाला असता. असलीं पुस्तकें आमच्या इकडे देशीभाषांत कधीं होतील तीं होवोत! हें आमच्या पुढें एक इंग्रजी भाषेंत लिहिलेलें असलें वाचनाचें शास्त्रीय पुस्तक पडलें आहे, यांत 'कुत्र्यांच्या राजाची निवड' अशी एक गोष्ट आहे. तींत अशी कल्पना केली आहे, कीं कुत्र्यांना आपला राजा निवडावयाचा आहे व त्यासाठीं सर्व कुत्र्यांची सभा भरलेली आहे. व त्या सभेंतील भाषणांमध्यें गुणदोषविवेचनाच्या रूपानें पृथ्वींतील एकंदर कुत्र्यांच्या भेदांचें सुंदर रीतीनें वर्णन केलें आहे. सरतेंशेवटीं असें दाखविलें आहे, कीं कुत्रा हा प्राणी माणसाची तऱ्हेतऱ्हेची नोकरी बजावण्यासाठीं परमेश्वरानें उत्पन्न केला आहे, व त्याचा स्वामी मनुष्य आहे;

तेव्हां कुत्र्यांना राजाची निवड करण्याची जरूरी नाहीं. दुसऱ्या एका गोष्टींत मुलें नेहमीं घरमाशा धरितात, हा मुलांचा खेळ लक्षांत घेऊन, व एक मुलगा व एक घरमाशी यांच्या झटापटीवर एक गोष्ट रचून तींत सहज-गत्या घरमाशीचें वर्णन केलें आहे; आणि सरते शेवटीं त्या गोष्टींत असें आणलें आहे, कीं माशी मारणाऱ्या मुलाला माशीचे उपयोग ठाऊक नव्हते ते कळल्यावर त्याला आपण असला उपयोगी प्राणी मारल्याबद्दल फार पश्चात्ताप झाला आहे. याच पुस्तकांत घरांत बाळगिलेल्या मांजराचा व कुत्र्याचा संवाद आहे. त्या संवादांत केवळ मनोरंजक रीतीनें दोन्हीं प्राण्यांची शरीररचना व त्यांचे आंगचे गुणदोष व त्यांच्या चालीरीती व संवयी, यांचें वर्णन केलें आहे. हें जें शास्त्रीय विषय शिकविण्याच्या तऱ्हेचें वर्णन केलें आहे, त्यावरून हे कठीण मानलेले विषय लहान मुलांना सुद्धां अशा तजविजींनीं कसे सुलभ होत असतील, हें उघड दिसून येईल. असल्या कित्येक गोष्टींचे मासले आम्ही केव्हां केव्हां वाचकांसाठीं देऊं. पण आमच्या लहानशा शालापत्रकांत असल्या गोष्टी कितीशा लिहितां येणार? या विषयांवर स्वतंत्र पुस्तकेंच झालीं पाहिजेत.

आम्हीं मागें अनेक वेळा शिक्षक लोकांना असें सुचविलें आहे, कीं शिक्षकांनीं वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करणें व आपल्या शाळेजवळच्या मोकळ्या जागेंत चार झाडें लावणें, यासारखी दुसरी कर्मणूक नाहीं. हें काम त्यांस मुलांच्या मदतीनें व बहुतेक बिनखर्चानें करितां येणार आहे. वनस्पतिशास्त्र हें आपल्या आयुष्यक्रमाला अत्यंत उपयोगी आहे, हें कोणासही सांगावयास नको. शिवाय त्याचें ज्ञान होण्याच्या जशा सोयी आहेत, तशा दुसऱ्या कोणत्याही शास्त्राच्या संबंधानें सांपडणार नाहींत. घराबाहेर पडलें कीं, जिकडे तिकडे वनस्पती पसरलेल्या असतात व त्यांजकडे पाहाण्याची शास्त्रीय नजर एकाद्यास प्राप्त झालेली असली, म्हणजे मग त्या माणसाच्या आनंदास सीमा नाहीं! या वनस्पतिशास्त्रावरही अनेक अत्यंत सुलभ असे ग्रंथ इंग्रजींत झाले आहेत. त्यांसारखे आपल्या देशी भाषांत तयार होण्याची फार अवश्यकता आहे.

शिक्षक लोकांना वनस्पतिशास्त्राची मौज वाटावी व त्यांचे मनांत वनस्पती तयार करण्याची आवड व्हावी यासाठीं शालापत्रकांत मधून मधून कांहीं लेख लिहिण्याचें योजिलें आहे. शाळागृहाच्या जवळ लावण्यासारख्या व थोड्याशाच खटपटीनें मिळणाऱ्या अशा वनस्पती कोणच्या व तशा वनस्पती कशा तयार कराव्या, याची माहिती आमच्या लेखांत येईल. त्यासाठीं वनस्पतीशास्त्राच्या माहितीचे दोन तक्ते तयार केले आहेत, ते पुढल्या अंकाबरोबर येतील. त्याचप्रमाणे वनस्पती शास्त्राच्या मूलतत्वांची माहिती थोडक्यांत आरंभीं देऊं, म्हणजे पुढील विषय समजण्यास ठीक पडेल.

वनस्पतिशास्त्राचे मुख्य दोन भाग आहेत. एकांत वनस्पतींची शरीररचना, त्यांचे भिन्नभिन्न अवयव व आकार व त्यांचीं स्थित्यंतरें यांचा विचार केला असतो. या शास्त्रास इंग्रजींत 'मारफालजी' [Morphology] असें म्हणतात. दुसऱ्या भागांत वनस्पतींच्या वर्गीकरणाचा म्हणजे वनस्पतींच्या निरनिराळ्या जाती कोणच्या आहेत, त्यांचे गुणधर्म काय, परस्परांचे संबंध कोणचे व त्यांचा उपयोग काय, याचा विचार असतो. याला वनस्पतींचें वर्गीकरण असें म्हणतात. इंग्रजींत याला 'क्लासिफिकेशन [ Classification ] असें नांव देतात. वनस्पतिशास्त्राच्या पहिल्या भागाची माहिती होण्यासाठीं एक तक्ता तयार केला आहे, व दुसरा तक्ता वर्गीकरण्याच्या संबंधाचा आहे. हे तक्ते तूर्त आमच्या वाचककांनीं जाड पुठ्यावर चिकटवून नकाशांसारखे संग्रहास ठेवावे. पुढें सवडीसवडीनें वनस्पतीशास्त्राच्या माहितीवर शालापत्रकांत लेख येतील तेव्हां त्यांचा उपयोग होईल. या खेपेस वनस्पतिशास्त्राच्या साधारण माहितीच्या संबंधानें कांहीं टिपणें देतों.

वनस्पती लहानमोठ्या अशा नानाप्रकारच्या आहेत. तसेंच त्या दिसण्यांत, उपयोगांत व वाढण्यांतही नाना तऱ्हेच्या आहेत. परंतु सर्वांच्या गुणधर्मांच्या संबंधानें मुख्य गोष्ट ही, कीं वनस्पती सजीव पदार्थ आहेत. अर्थात

त्यांची कोणच्या तरी मूळ बीजापासून उत्पत्ती आहे, त्यांना वाढ आहे, व लय किंवा मृत्यू आहे. त्यांची वाढ आहे असें म्हटलें म्हणजे अर्थात त्यांना पोषण लागतें. पृथ्वींतले आपल्या फार माहितींतले असे सजीव पदार्थ प्राणी. तेव्हां प्राण्यांमध्यें उत्पत्ती, स्थिती म्हणजे जगणें व लय यांसाठीं जशी त्यांच्यामध्यें निरनिराळे अवयव व त्यांचा उपयोग यांची योजना केलेली आहे, तशीच योजना वनस्पतींच्या संबंधानेंही आहे. असे जे वनस्पतींचे मुख्य अवयव त्यांची सर्व वनस्पतींस साधारणतः जुळणारी अशी माहिती प्रथमतः थोडक्यांत येथें सांगतों. विशेष माहिती वेळोवेळीं प्रसंगानुसार येईल. वनस्पतींचे जे निरनिराळे अवयव त्यांचें विशेष वर्णन पुढें स्थळावकाशानें करूं.

आतां प्रथमतः वनस्पतींच्या अवयवांच्या संबंधांच्या लक्षांत ठेवावयाच्या कांहीं गोष्टी सांगतों.

**मुळें**:—वनस्पतीचीं मुळें हीं दोऱ्यासारखीं अगदीं बारीक बारिक असतात, किंवा केव्हां त्यांचेवर गीर असून तीं जाडही असतात; अथवा झाडांच्या खोडासारखींच असतात. पानांचा जसा बहुधा हिरवा रंग असतो तसा यांचा नसतो. मुळांचा रंग बहुधा पांढरा असतो. क्वचित् इतर रंगांचीं मुळें असतात. मुळें नेहमीं खालीं जमिनींत खोल जातात. तीं सूर्याच्या उजेडाच्या अन्य बाजूला जातात. मुळांच्या शेवटांस च त्या पिशव्यांचीं टोपणें असतात. मुळांस पानांचे किंवा फुलांचे डोळे किंवा फांद्या सहसा येत नाहींत, आल्यास तर क्वचित येतात.



झाड, त्यांचीं मुळें, खोड, पानें व फुलें.

खोड—हें बहुधा आपल्या माहितींतल्या सर्व झाडांना असतें. याचें काम झाडें वर उचलून धरून उंच वाढविण्याचें असतें. यामुळें तें उजेडाच्या बाजूकडे म्हणजे वर वाढत जातें. तथापि सर्वच झाडाचीं खोडें सरळ वर जातात असें नाहीं. कांहीं सरळ, उंच वाढत जातात; कांहीं दुसऱ्या झाडांस वेटाळत वाढतात; अशा वनस्पतींना वेल असें म्हणतात. कांहींचीं खोडें जमीनीवर ही पसरत जातात, म्हणजे ही झाडें जमीनीवर पसरणारे वेल असतात. कांहींचीं खोडें भरींव असतात, कांहींचीं पोकळ असतात, व कांहींचीं वाटोळीं (उ०—ऊंस) किंवा तिकोनी (उ०—त्रिधारी निवडुंग) किंवा चौकोनी (उ०—तुळस) असतात. झाडास उचलून धरून वरतीं हवेंकडे नेणें हें खोडाचें काम होय. प्राण्यांच्या आंगावरील चामड्याप्रमाणें कांहीं खोडांवर साल असते. तिचा रंग अमुकच असतो असें सांगतां येणार नाहीं.

पानें—खोडाला शाखा फुटून किंवा न फुटतां एकेका कांड्यापासून पानें येतात. हीं एकाच जागीं एकेक असतात, दोन दोन असतात, किंवा जास्तही असतात. पानांचे आकार तऱ्हे तऱ्हेचे असतात. कित्येक पानें गुळगुळींत, कित्येक खरखरीत, अशीं असतात. कित्येकांच्या कडा सबंध व कित्येकांच्या सुंदर रीतीनें कातरलेल्या असतात. पानांचा रंग बहुतेक हिरवा असतो, परंतु इतर रंगांचीं ही पानें असतात. पानांचा उपयोग असा आहे, कीं तीं हवेंतून झाडांच्या पोषणास लागणारा जो कारबानिक आसिड नामक वायू म्हणजे कारबन व आक्सिजन यांचें रसायनिक मिश्रण, तो शोषून घेतात. शिवाय यांच्याच द्वारें सूर्यकिरणांतील उष्णतेचें झाडांवर कार्य घडतें. त्याचप्रमाणें झाडांच्या मुळांच्या द्वारें मिळणारें पाणी झाडाच्या सर्व शरीरांत पानांच्या द्वारेंच खेळतें; व पाणी आणि कारबन वायू यांच्या मिश्रणानें तयार झालेला झाडांचा अन्नरस झाडांच्या अवयवांस मिळतो. झाडांना जें नको असेल, तें मुख्यत्वें पानांमधूनच झाडें सोडून देतात; म्हणजे झाडें पानांचे द्वारें श्वासोच्छ्वास करितात. अर्थात पानें हीं झाडांना फुप्फुस, तोंड व अन्न-

पचनाचा अवयव म्हणजे कोठा यांच्या जागीं आहेत. पान जेथें खोडास देंटानें किंवा देंटाशिवाय चिकटलेलें असतें, तेथें केव्हां कांहीं विवक्षित वनस्पतींस पानांसारखे, कांड्यांसारखे किंवा टोपणांसारखे अवयव असतात, हे वनस्पतींचें वर्गीकरण करण्यास उपयोगी पडतात. यांस इंग्रजींत ' ब्राक्ट्स् ' ( Bracts ) असें म्हणतात.

फुलें.—हीं सर्व झाडांना असतात असें नाहीं. फुलांचे आकार, रंग, शोभा वगैरे गोष्टी भिन्नभिन्न प्रकारच्या असतात. फुलांचा उपयोग पुढें बीज उत्पन्न करण्याचा किंवा बनविण्याचा असतो. फुलाचे चार अवयव असतात; दोन आच्छादनें, पुंकेसर व स्त्रीकेसर. आच्छादनें हे आवश्यक अवयव नाहींत, परंतु ते बीज परिपक्व होण्याच्या क्रियेस साह्यकारी व फुलाचे संरक्षक असतात. पुंकेसर व स्त्रीकेसर हे पुढील बीजोत्पत्तीस आवश्यक आहेत. परंतु हे चारी अवयव प्रत्येक झाडाच्या फुलांत असतातच असें नाहीं. कांहीं फुलांत हे चारी अवयव असतात, तेव्हां त्यास पूर्ण फूल म्हणतात. उदा०—जास्वंद, वाटाणा, इ०. कांहीं फुलांत दोन आच्छादनें, व पुंकेसर किंवा स्त्रीकेसर यांपैकीं कोणचे तरी एक, असे तीन अवयव असतात. उदा०—भोपळा, कांकडी, इ०. अशी स्थिती असली म्हणजे ज्या एका जातीचे केसर असतील त्यांना भेटण्यासाठीं दुसऱ्या जातीचे केसर जेथें असतील तेथून त्यांतील पराग यावे लागतात. हे वाऱ्याच्या योगानें किंवा भुंगे, मधमाशा फुलपाखरें, इत्यादि कीटकांबरोबर किंवा अन्यद्वारें येतात. याप्रकारें दोन्ही जातींच्या केसरांचें संमेलन होण्याच्या कित्येक फार मजेदार, मनोरंजक व अत्यंत आश्चर्यकारक युक्त्या परमेश्वरानें योजून ठेविल्या आहेत. त्यांचें वर्णन पुढें विस्तारेंकरून होईल. कांहीं फुलांत एकच आच्छादन असतें. उदा०—एरंड, अंजीर, इ०. कांहींत मुळींच आच्छादन नसतें, उदा०—वाळूंज. फुलांचे सर्व निरानिराळे भाग हे पानांचीच परिस्थिती होऊन बनलेले आहेत.

**कांटे**:—हे कांहीं वनस्पतींना असतात. हे पानांचे किंवा पानांच्या अवयवांचे, खोडांचे किंवा सालींचे बनलेले असतात.

**धागे**:—ब-याच वनस्पतींना धागे असतात. हे पानांच्या शेवटांचे ( उदा०—वाटाणा ) किंवा फांद्यांचे ( उदा०—द्राक्षा ) होतात.

**फळ आणि बीज**:—या अत्यंत महत्वाच्या व पुष्कळदां मनुष्यास अत्यंत उपयोगी अशा अवयवांबद्दलअगदीं थोडक्यांत असेंकांहींच सांगतां येणार नाहीं, यासाठीं ह्या संबंधाचा सर्व विषय पुढें विस्तृत लेखासाठींच राखून ठेवितों. येथें तूर्त एवढेंच सांगितलें पाहिजे, कीं वंश पुढें चालण्याचें साधनापैकीं एक साधन असें जें बीज, त्याची उत्पत्ती, त्याची वाढ, त्याचे संरक्षण त्याचा प्रसार व त्यापासून उत्तरोत्तर त्या त्या वनस्पती अधिकाधिक होत जाणें, या गोष्टींच्या तजविजीसाठीं जगत्कर्त्यानें ज्या विलक्षण योजना केल्या आहेत, त्या फारच आश्चर्यकारक आहेत, व त्यांपासून मनुष्यास अनेक प्रकारचें शहाणपण शिकून आपलें ज्ञान वाढविण्याची, संसारांतील आपल्या गरजा भागविण्याची आपल्या सुखसाधनांच्या सोयी वाढविण्याची, आपलें मनोरंजन करण्याची व आपलें आयुष्य उत्तम रीतीनें घालविण्याची उत्कृष्ट प्रकारची सोय आहे.

हे झाडांचे निराळे अवयव थोडक्यांत सांगितले. यांचें विशेष वर्णन पुढें करूं. हें जें येथें थोडक्यांत टिप्पण केलें आहे, हें पुढील वर्णनाच्या समजुतीकरितां जरूर पडेल म्हणून केलें आहे,

---

# काव्यरत्न-मंजूषा.

——:*:——

## ( ३ ) मुलांसाठीं प्रातःस्मरण.

( घनःश्याम सुंदरा-या भूपाळीच्यां चालीवर. ),

प्रातःकाळीं उठुनी करितों वंदन प्रभुराया,
एक रात्र आणखी उलटली तव कवनें गाया ॥ धृ० ॥
माथां राहो तुझ्या कृपेचा हात सदा देवा !
करावयाचा भाग आजचा मज करवीं व्हावा.
तुला, मनाला, गुरुपितरांला आठवुनी घ्यावा—
धडा नवा हा कर्तव्याचा, साङ्ग पुरा व्हावा.
अज्ञानाची रात्र जाऊनी उजळे दिवस नवा,
सत्कर्माचा प्रसन्न उगवे प्रसंग साधावा.
सरळ जीव हे साधे खगमृग जुपले कामाला,
मीच आपलें कार्य न करणें; कारण लज्जेला;
म्हणुन वाहतों कर्तव्याचे पायीं चित्ताला,
प्रसाद भाकुनी तव हा घेतों मार्ग असा दिसला.
साधो अथवा फसो कार्य हें, भाव तुझे पायां;
यश-अपशय तें तुझें, राबणें माझें या ठायां !

## ( ४ ) सायं-प्रार्थना.

दिवस मावळे, संध्या फांके, अंधाराचें छत पसरे,
प्रवास मोठा अंत तयाचा न कळे टप्पा एक सरे, धृ०
केलें, आलें जसें तसें या दिवसभराचें काम पुरें,
कर्तव्यास्तव चित्त वाहिलें, होवो माझें भलें-बुरें;
परमेशानें दिला कराया कार्यभाग अंगावरतीं,
धमक असो वा नसो, घेतला प्रभातकाळीं मीं हातीं.

ब्रीद आपुलें स्मरुन उजळला, पडोत पडले कष्ट किती,
देवा वेई, अर्पण करितों चरणीं वाहुनि तुझ्या मिठी !
पातक झालें असेल कांहीं, चुकलें मुकलें यांत तरी,
प्रभो भाकतों करुणा त्यास्तव, अविकउण्याची क्षमाकरीं !
तुझ्यापासुनी कर्ज घेतलें शरीर-मन, त्यां बहु जपलों,
करावयाचें करावयाला त्यासाठीं नाहीं चुकलों.
अपंगतेनें दोष राहिला ! व्यंग दिसेना ! मी भुललों !
असेल देवा ! कळोन नाहीं धनी चुकांलागीं झालों.
कपटहीन हे खग.गण आले, त्यां सांगातीं प्रेमभरें.
गोड विसांवा तव चरणीं निशि ध्याया परता जीव फिरे.

## ( ५ ) संतांचीं वचनें

१

### अभंग.

बोलावें जें खरें, आचरावा धर्म । अभ्यासाचें काम चुकों नये. १
सत्य, धर्म, देह-स्वास्थ्य यां जपावें। अंतर न व्हावें हितकामीं; २
प्रकृती, शरीर निकोप ठेवावें । अंतर न व्हावें यांत कधीं; ३
देवपितरांचें कार्य संभाळावें । अंतर न व्हावें यांत कधीं; ४
आईबाप-गुरु- अभ्यागत, देव । यांत दुजाभाव पाहों नये, ५
इतर नव्हेत करायाचीं कर्मे । वंद्य तींच धर्मे आचरावीं; ६
ऋण उपकार नित्य आठवावे । कृतघ्न न व्हावें कोणासवें; ७
उपनिषदादि बोध हाच देती । सांठवूनी चित्तीं धन्य व्हावें. ८

२

आईबाप यांसीं सादर भजावें । सार्थकीं वाढावें जन्म तेणें; १
मारूं नये जीवें कोणाही जीवांला । देवराय ज्याला प्रेमें निर्मी; २
आपलें नाहीं तें आपण न घ्यावें । कांहीं न चोरावें कोणाचेंही; ३
घरदार पैसा दुसऱ्याचा व्हावा । ऐसा न धरावा लोभ जीवीं; ४

कोणावरी व्यर्थ कुभांड न घ्यावें । कांहीं न करावें खोटें काम; ५
आपणा तसेच इतरां पहावें । सरळ वागावें सर्वांसवें; ६
सर्वभूतांसांठीं प्रेम सांठवावें । हित तें करावें सर्वांजनीं ७
उपनिषदादि बोध हाच देती । सांठवूनी चित्तीं धन्य व्हावें. ८

---

# पुणें ट्रेनिंग कालेजची वार्षिक परीक्षा.

## आक्टोबर सन १९०१.

## पास झालेल्या इसमांची याद.

### वर्ष ३.

| नं. | नांव. | शेंकडा मार्क.+ | जिल्हा. |
|---|---|---|---|
| १ | नारायण सिद्धेश्वर देव. | ७१·४५ | पुणें. |
| २ | नीळकंठ वामन आंबिके* | ७१· ३ | सातारा. |
| ३ | कमरुद्दीन अमिरुद्दीन काजी | ७०·५५ | खानदेश. |
| ४ | विनायक महादेव महाजन | ६८· | पुणें. |
| ५ | बाळकृष्ण गणेश कुळकर्णी | ६६·८५ | खानदेश. |
| ६ | दिनकर नरहर कुबेर | ६५·५५ | सोलापूर. |
| ७ | अण्णाजी यादव कुळकर्णी | ६५·२५ | खानदेश. |
| ८ | भिकाजी मोरेश्वर मांदुस्कर | ६३· २ | ठाणें. |
| ९ | गणेश विश्वनाथ पटवर्धन | ६२· ७ | कुलाबा |
| १० | विष्णु बळवंत घरवुडे | ६१· ३ | नाशिक. |
| ११ | वासुदेव भास्कर साने | ६०· ७ | कुलाबा. |

+ तिसऱ्या वर्षी ज्यांना शेंकडा साठ किंवा साठांच्या वर मार्क मिळतात, त्यांस पंचविसांचें सर्टिफिकीट मिळतें व बाकीच्यांस विसांचें मिळतें. दुसऱ्या वर्षांत ज्यांना साठ किंवा साठांचेवर मार्क मिळतात, त्यांस पंधरांचें, व बाकीच्यांस बारांचें मिळतें. पहिल्या वर्षी पास झालेल्यांस नवांचें सर्टिफिकीट मिळतें. शा० प० कर्वे.

| | | |
|---|---|---|
| १२ नरहर बाजी कुळकर्णी | ६०·०५ | बेळगांव. |
| १३ सोमा कामा धोबी | ६०·०५ | खानदेश. |
| १४ गजानन नीळकंठ बोकील | ५९· ३ | नगर. |
| १५ शेखलाल फत्ते महंमद | ५७. ४ | खानदेश. |
| १६ बाळकृष्ण नारायण जोशी* | ५५· २ | मुंबई. |
| १७ गंगाधर श्रीधर कुळकर्णी | ५४· ३ | नगर. |
| १८ नारायण दत्तात्रय जोशी | ५३· ९ | सातारा. |
| १९ नारायण आबाजी कुळकर्णी | ५३·७५ | सातारा. |
| २९ शहाबुद्दिन इमामभाई | ५३ | मुंबई. |
| २१ गदाधर धोंडदेव गरूड | ५२· ६ | नाशिक. |
| २२ सदाशिव भास्कर पटवर्धन | ५२· ४ | रत्नांगिरी. |
| २३ महादेव विश्वेश्वर जेस्ते | ५१· ८ | पुणें. |
| २४ विष्णु बाळकृष्ण खेडकर | ५१· ७ | पुणें. |
| २५ गोविंद शंकर ठिगळे | ५०·१५ | नाशिक. |
| २६ त्र्यंबक रघुनाथ घाणेकर | ४९· २ | ठाणें. |
| २७ बापु सिधु कुचेकर | ४७·८५ | कुलाबा. |
| २८ नारायण कृष्ण काळे | ४७·८५ | पुणें. |
| २९ विष्णु गोपाळ वाळिंबे | ४४.०५ | सातारा. |
| ३० उद्धव नानाजी वैद्य | ४३· ८ | पुणें. |

## वर्ष २.

| | | |
|---|---|---|
| १ यशवंत गणेश फके | ७८· १ | कुलाबा. |
| २ महादेव भिकाजी केळकर | ७१· ७ | ठाणें. |
| ३ मनोहर सखाराम फणसे | ६८· ७. | सातारा. |
| ४ दत्तो विष्णु कुळकर्णी | ६८ | सातारा. |
| ५ केशव बाजी देशमूख | ६७· ५ | नगर. |
| ६ पांडुरंग विठ्ठल आंठवले | ६७·. ४ | कुलाबा. |
| ७ काशिनाथ बळवंत नेने* | ६७. २ | कुलाबा. |

| | | |
|---|---|---|
| ८ नारायण गणेश जोशी | ६६· ५ | सातारा. |
| ९ विठू विश्राम नानवडी | ६६· ४ | ठाणें. |
| १० गंगाधर लाडको देसाई* | ६४· ५ | मुंबई. |
| ११ श्रीपाद नारायण आफळे | ६४· १ | सातारा. |
| १२ कोंडो नारायण वाळवेकर | ६३· ४ | नगर. |
| १३ वासुदेव वामन म्हाळ्हेरे | ६३· १ | सातारा. |
| १४ गोविंद सदाशिव नापट | ६२·९५ | कुलाबा. |
| १५ रामचंद्र श्रीधर कुळकर्णी* | ६२· ६ | नगर. |
| १६ लक्ष्मण गणेश मराठे | ६२· ४ | मुंबई. |
| १७ गणेश मोरेश्वर जोशी* | ६२· ३ | जंजिरा. |
| १८ सांवळाराम दाजी कुळकर्णी | ६१· ६ | नगर. |
| १९ हरी कृष्ण कासार | ६१· २ | पुणें. |
| २० दामोदर भिकाजी म्हसकर | ६०· ५ | कुलाबा. |
| २१ वासुदेव विनायक पटवर्धन | ६०· १ | मुंबई. |
| २२ गोपाळ गोविंद शिरगुप्पी* | ५७· ५ | सोलापूर. |
| २३ वामन दिनकर लोहोकरे | ५७· ४ | पुणें. |
| २४ विष्णु सदाशिव भिडे | ५७· ३ | मुंबई. |
| २५ महंमदबेग कासमबेग* | ५७· ३ | नगर. |
| २६ शंकर सिताराम कुळकर्णी | ५६· ८ | पुणें. |
| २७ लक्ष्मण अंबाजी पोवार | ५६· ३ | ठाणें. |
| २८ गणेश बळवंत देशपांडे* | ५५· ८ | सातारा. |
| २९ नागेश बळवंत सबनीस* | ५५· ७ | ठाणें. |
| ३० सिद्धेश्वर गोपाळ रामनवमीवाले* | ५४· | सोलापूर. |
| ३१ वामन लक्ष्मण डोंगरे | ५३· ७ | कुलाबा. |
| ३२ कृष्णाजी विष्णु देशपांडे | ५३· ७ | सातारा. |
| ३३ विष्णु खंडेराव कुळकर्णी* | ५३· १ | सोलापूर. |
| ३४ शंकर मनोहर पाठक | ५२· ४ | पुणें. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | वासुदेव गोविंद मुळे | ५२· | नगर. |
| ३६ | दिगंबर श्रीपत देशपांडे | ५२· | पुणें. |
| ३७ | राघोजी गोविंद फाटक* | ५१· ८ | रत्नागिरी. |
| ३८ | अनंत भास्कर गांगल* | ५१· ६ | ठाणें. |
| ३९ | अबदुल अजीझ् इब्राहिम खतीब* | ५१· २ | सातारा. |
| ४० | गणेश ज्ञानेश्वर रहाणे | ५१· १ | नगर. |
| ४१ | राजाराम सदाशिव देसाई | ५१· | रत्नागिरी. |
| ४२ | रामचंद्र बलभीम कुळकर्णी* | ५०·८५ | सोलापूर. |
| ४३ | तुकाराम गणेश देसाई* | ५०·७५ | सातारा. |
| ४४ | सिताराम भिकाजी पेंडुरकर | ५०· ७ | मुंबई. |
| ४५ | महादेव पांडुरंग कुळकर्णी* | ५०· ६ | जंजिरा. |
| ४६ | पुरुशोत्तम पंढरिनाथ खिस्ती* | ४९·८३ | नगर. |
| ४७ | विष्णु दत्तात्रय कुळकर्णी | ४८. ८ | सातारा. |
| ४८ | गुंडो गोविंद जोशी | ४८·०५ | पुणें. |
| ४९ | श्रीधर सखाराम उदास | ४७· ४ | पुणें. |
| ५० | नारायण गणेश परांजपे* | ४७ | कुलाबा. |
| ५१ | केशव वामन पाळंदे | ४६· ८ | कुलाबा. |
| ५२ | बाळा विठू बुमोरे | ४५· ४ | पुणें. |
| ५३ | शंकर राजाराम क्षीरसागर* | ४४· ६ | मुंबई. |
| ५४ | मारुती सुभाना खामकर* | ४४·३३ | सोलापूर. |
| ५५ | अमीरखां नाजेखां आतार* | ४४· ३ | नगर |
| ५६ | रामचंद्र गोविंद नातू* | ४३· ९ | कुलाबा. |
| ५७ | शंकर बालाजी कुलकर्णी | ४३· ५ | सोलापूर. |
| ५८ | हरी पांडुरंग मेंगदे | ४३· ३ | सातारा. |
| ५९ | व्यंकटेश बळवंत पतके | ४३. १ | सातारा. |
| ६० | नारायण विष्णु जोशी | ४२· १ | सातारा. |

वर्ष १.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनार्दन कृष्ण गोडबोले | ७१·८ | कुलाबा. |
| २ | दत्तात्रय दामोदर शालिग्राम * | ७२·९ | नगर. |
| ३ | गणेश तात्या अरगडे * | ७२·५५ | सोलापूर. |
| ४ | गोपाळ आबा भगत | ७१·३५ | जंजिरा. |
| ५ | रामचंद्र गोविंद बापट * | ७०·६५ | सातारा. |
| ६ | दत्तात्रय अनंत लिमये * | ७०·३ | सोलापूर. |
| ७ | केशव महादेव जोशी | ६९·५५ | पुणें. |
| ८ | केशव वामन राहाळकर | ६९·५ | ठाणें. |
| ९ | केशव हरी फळसणकर * | ६९·३ | कुलाबा. |
| १० | विनायक गणेश पोतदार * | ६९·०५ | ठाणें. |
| ११ | शांताप्पा बाळाप्पा कांसार * | ६८·८ | बेळगांव. |
| १२ | बाळकृष्ण एकनाथ गोसावी * | ६८·८ | मुंबई. |
| १३ | रामचंद्र गणेश मेहेंदळे | ६८·१ | ठाणें. |
| १४ | केशव पांडुरंग करमरकर | ६७·३ | पुणें. |
| १५ | पांडुरंग विनायक कुळकर्णी * | ६७·१५ | नगर. |
| १६ | रामचंद्र बाळकृष्ण सोहोनी | ६६·७५ | कुलाबा. |
| १७ | त्रिंबक काशिनाथ गद्रे * | ६६·७५ | सातारा. |
| १८ | शेखलाल शेख दावल * | ६६·०५ | नगर. |
| १९ | दामोदर सदाशिव भिडे * | ६५·८ | नगर. |
| २० | सदाशिव जनार्दन नेने * | ६५·५५ | ठाणें. |
| २१ | कृष्णाजी वामन आकोलकर * | ६५·२५ | पुणें. |
| २२ | पांडुरंग वामन तिनईकर * | ६४·४५ | बेळगांव. |
| २३ | महादेव बाळकृष्ण राखे * | ६४·१५ | पुणें. |
| २४ | महादेव विष्णू साने * | ६४ | सोलापूर. |
| २५ | गोविंद गोपाळ महार * | ६३·३५ | सोलापूर. |
| २६ | शेखहुसेन महंमद मुलानी * | ६३·२५ | सोलापूर. |
| २७ | दिनकर सखाराम देवधर * | ६२·७ | ठाणें. |

| | | |
|---|---|---|
| २८ हरी केशव गोखले* | ६२· ६ | कुलाबा. |
| २९ लक्ष्मण गोविंद कुंभार* | ६१· ७ | कुलाबा. |
| ३० केशव गोविंद सोनार* | ६०· ९० | ठाणें. |
| ३१ वासुदेव नारायण खांडेकर* | ६०·८५ | ठाणें. |
| ३२ गणेश शिवाजी घाणेकर* | ६०· ३० | ठाणें. |
| ३३ पांडुरंग कृष्णाजी गुंजीकर* | ५९· १ | बेळगांव. |
| ३४ नारायण गणेश कुळकर्णी* | ५७· ६ | सातारा. |
| ३५ मोहसम अल्ली तुराबअल्ली* | ५६· ९ | पुणें. |
| ३६ बाळाजी गोविंद जोगळेकर* | ५६· ६ | सातारा. |
| ३७ कृष्णाजी पांडुरंग अरगडे* | ५४·५५ | सोलापूर. |
| ३८ शहाउद्दीन महमदअल्ली नकूतारे | ५४· ४ | कुलाबा. |
| ३९ शेखजमाल साहेबजी* | ५४·१५ | सोलापूर. |
| ४० अब्दुल वजीरखान पठाण* | ५०·४७ | सोलापूर. |
| ४१ इमाम अब्दुल मुलानी* | ५०· २ | सातारा. |
| ४२ पांडुरंग महादेव कुळकर्णी* | ५०·०५ | ठाणें. |
| ४३ इब्राहिम यासीन इनामदार* | ४८·७५ | पुणें. |
| ४४ बाळकृष्ण गणेश वाडकर | ४७· ४ | रत्नागिरी. |
| ४५ गणेश बाबाजी दंडवते | ४४·९५ | पुणें. |
| ४६ शिवराम कृष्ण गुरव | ४४· ५ | सोलापूर. |
| ४७ रामचंद्र दिनकर केतकर | ४१· ५ | कुलाबा. |
| ४८ शेख कादर सिलेमान | ४१· ४ | पुणें. |
| ४९ प्रभाकर दिनकर गाडगीळ* | (१९००) | मुंबई. |
| ५० सदाशिव विठ्ठल कर्वे* | (१९००) | कुलाबा. |

टीप:—ड्राइंगमध्यें नापास असल्याबद्दल * अशी खूण केली आहे.

पुणें ट्रेनिंग कॉलेज्,
ता. १२ नव्हेंबर १९०१

*K. G. KELKER.*
प्रिन्सिपल.

सोडविण्यास सांगावीं. असें केल्यानें एखादें उदाहरण दोन दोन दिवसपर्यंत अगर मुळींच सुटणार नाहीं. परंतु तसें झालें तरी देखील तें त्यांस शिक्षकानें समजावून न देतां मध्यें कांहीं दिवस गेल्यानंतर पुनः सोडवावयास सांगावें. असें केलें असतां तें उदाहरण बहुधा त्यांचें त्यांस सुटल्याशिवाय राहणार नाहीं. मुलांच्या कल्पनाशक्तीची चांगली वाढ होण्याच्या कामीं ह्या संवयीचा विशेष उपयोग होतो. स्वतः कल्पना चालवून उदाहरणें सोडविण्याची संवय लावून न घेतां मुलें जर नेहमीं शिक्षकाच्या सांगण्यावरच अवलंबून राहूं लागलीं, तर अखेरपर्यंत तीं तशींच पंगू राहतील. ह्या गोष्टीचा विचार शिक्षकांनीं अवश्य केला पाहिजे.

## ९. तोंडचे हिशेब.

—:-*-:—

देवकुळेकृत तोंडचे हिशेबांच्या पहिल्या पुस्तकामध्यें ‘ शिक्षकांस सूचना ’ म्हणून जो भाग लिहिला आहे, तो विशेष विस्तारपूर्वक लिहिला असल्यामुळें सदरहू विषयाच्या संबंधानें येथें फारसा विचार करण्याची जरूर दिसत नाहीं. असें आहे तरी त्या सूचना लक्षपूर्वक वाचून त्यांच्या धोरणानें तोंडचे हिशेब शिकविण्याची पद्धत चालू ठेवणारे असे शिक्षक फार थोडे आढळतील. याकरितां ज्यांनीं त्या सूचना अद्यापि वाचल्या नसतील त्यांनीं त्या एकदां तरी लक्षपूर्वक वाचून पहाव्या, म्हणजे त्यांस त्यांत घेण्यासारख्या पुष्कळ गोष्टी खातरीनें आढळून येतील. त्यांतील विशेष गोष्टींची पुनरुक्ति करण्याचें हें स्थळ नव्हे. तथापि त्या विषयाच्या संबंधानें जी सामान्य सूचना तेथें प्रथमारंभींच केली आहे, ती विशेष ध्यानांत ठेवण्याजोगी आहे असें वाटत असल्यामुळें ती जशीची तशीच येथें उतरून घेतों:—

“ हिशेब तोंडानें लवकर व बिनचूक करितां येणें ह्याचा अर्थ वस्तुतः बेरीज, वजाबाकी, गुणाकार, व भागाकार हीं कृत्यें तोंडानें लवकर व बिनचूक करितां येणें हा होय. हीं कृत्यें तोंडानें करणें ज्याला अगदींच

साधत नाहीं त्यानें तोंडचे हिशेबांच्या कितीही चाली पाठ केल्या तरी त्यांपासून त्याला फारसा उपयोग व्हावयाचा नाहीं. ह्या करितां लहान लहान (म्हणजे ज्यांमध्यें दोन दोन, तीन तीन स्थानें आहेत अशा) संख्यांची बेरीज आणि वजाबाकी करणें, व अशा लहान संख्यांना २० पर्यंत कोणत्याही संख्येनें गुणणें आणि भागणें, हीं कृत्यें तोंडानें करणें, हा 'तोंडचे हिशेब' ह्या विषयांचा मुख्य भाग समजून, त्याचा अभ्यास मुलांकडून शिक्षकांनीं आरंभीं अवश्य करवावा."

तोंडचे हिशेब शिकवावयाचे म्हणजे दुसऱ्या इयत्तेंत आंब्याकेळयांचे हिशेब सांगावयाचे, व पुढील इयत्तांतून कांहीं ठरींव तोंडचे हिशेबांच्या चाली सांगून हिशेब करून घ्यावयाचे, अशी जी हल्लीं बहुतेक सर्वत्र पद्धत आहे, ती कितीशी हितावह आहे हें वरील उताऱ्यावरून सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. अंकगणित शिकवीत असतां ज्याप्रकारचीं अनेक उदाहरणें आपण मुलांस घालितों, त्याच प्रकारचीं परंतु ज्यांत बेरीज इत्यादि कृत्यें अगदीं सोपीं असतील अशीं उदाहरणें मुलांकडून तोंडीं करून घेण्याची पद्धत सुरू केली तर मुलें तोंडचे हिशेबांत चांगलीं तयार होतील. हल्लींच्या पद्धतीमुळें तोंडचे हिशेबांच्या संबंधानें मुलांची समजूत देखील कांहीं चमत्कारिक झालेली असते. त्यांना ज्या प्रकारच्या चाली शिकविलेल्या असतात त्याप्रकारचा हिशेब घातला तर मात्र तो 'तोंडचा हिशेब.' अशी त्यांची समजूत असल्यामुळें त्या चालींहून भिन्न असें एखादें सोपेंसें उदाहरण जरी तोंडीं करावयास सांगितलें तरी लागलींच तीं गोंधळतात. याकरितां ही खोटी समजूत अगदीं नाहींशी करून, पाहिजे तें सोपें उदाहरण तोंडीं करण्याची संवय शिक्षकांनीं मुलांस अवश्य लावून द्यावी. म्हणजे हा विषय शिकविण्याचा खरा फायदा मुलांस होऊं लागेल. सोपीं सोपीं उदाहरणें तोंडीं करण्याची संवय असली, म्हणजे कोणी एखादा हिशेब तोंडीं करावयास घातला, आणि त्याची ठरलेली चाल जरी माहित नसली तरी दुसऱ्या रीतीनें—म्हणजे अंकगणितांत उदाहरणें सोडविण्याच्या रीतीनें—मुलें तो हिशेब सहज करूं शकतील.

वारंवार असें अनुभवास येतें कीं, चालीवरून जे हिशेब करावयाचे त्यांत रेघांचे गुणाकार भागाकार करितां येत नसल्यामुळें चाली चांगल्या माहीत असूनही मुलें तें हिशेब चुकतात. आणि शिक्षकांचा तर बहुतेक कल चाली शिकविण्याकडे असतो. यामुळें कितीही पराकाष्टेची मेहनत केली तरी मुलें तोंडचे हिशेबांत कच्चीं राहतात. किंबहुना ही चुकीची पद्धत सर्वत्र अबाधित चालू असल्यामुळें तोंडचे हिशेब शिकविण्यांत यश येत नाहीं. असें पाहून कित्येक शिक्षक निरुत्साह झालेले देखील आढळतात. याकरितां वर लिहिलेला उद्देश ध्यानांत ठेऊन हल्लींच्या पद्धतींतच बदल करावा. तो कसा हें मागें सांगितलेंच आहे असें केलें म्हणजे अपयशाची इतकी भीति राहणार नाहीं.

तोंडचे हिशेब शिकविण्यांत आणखी एक महत्वाची चूक सर्वत्र होत असते, तिचा विचार करणें अवश्य आहे. हिशेब शिकविण्याची बहुतेक शिक्षकांची चाल अशी असते कीं, एखादी चाल मुलांस प्रथम सांगून अथवा त्याजकडून पाठ करून घेऊन मग त्या चालीचा एखादा हिशेब घालावा. कांहीं वेळ गेल्यानंतर उत्तर मांडावयास सांगून पाट्या तपासाव्या, व एखाद्या मुलाकडून तो हिशेब मोठ्यानें करून घेऊन पुनः दुसरा हिशेब घालावा, व तोही पहिल्या हिशेबाप्रमाणेंच तपासावा. ह्या पद्धतींत बराच दोष आहे. पुष्कळ मुलांस हिशेब कसा करावयाचा तेंच समजत नसतें; व मुक्यानें हिशेब करावयाचे असल्यामुळें त्याला हिशेब करण्याची रीत माहीत आहे किंवा नाहीं, व हिशेब करण्याकडे लक्ष लावण्याच त्यांला साधतें किंवा नाहीं, हें शिक्षकांस समजत नाहीं. हे सर्व दोष वरील पद्धतींत झांकलें जातात, व ते तर अवश्य दूर झाले पाहिजेत. हिशेब करितांना लक्ष एकसारखें तिकडे गुंतविण्याची सवय नसली, व हिशेब कशा रीतीनें करीत जावयाचा तें मुलांस माहीत नसलें तर त्यांना तोंडीं हिशेब कधींच करितां येणार नाहींत. म्हणून सर्व मुलांस एकदम एक हिशेब करावयास घालावयाचा, व त्यानीं तो केल्यावर तपासून पुनः दुसरा घालावयाचा," ही पद्धत बंद करून एक

एक हिशेब एक एका मुलाकडून वर्गांत मोठ्यानें करून घेण्याची पद्धत सुरू करावी. हिशेब घातला म्हणजे तो एका मुलाला मोठ्यानें करावयास सांगावा. तो मुलगा हिशेब करीत असतां सर्व मुलांचें लक्ष तिकडे गुंतलेलें रहावें, म्हणून वाटेल त्या दुसऱ्या मुलाला मध्येंच तो पुढें करावयास सांगावें. म्हणजे थोड्या वेळांत हिशेब पुष्कळ होतील, ते कसे करावयाचे हें सर्व मुलांस कळेल, व लक्ष देण्याची संवय ही लागेल. तोंडचे हिशेबांत मुलें चांगली तयार करण्याची ही पद्धत विशेष हितावह आहे, अशी अनुभवानें शिक्षकांची खात्री झाल्यावांचून खचीत राहणार नाहीं. शिकविलेला विषय मुलांस कसा काय येत आहे ह्याची परीक्षा पाहण्याकरितां मात्र— हल्लींच्या पद्धतीचा उपयोग आहे. खुद्द विषय प्रथमतः नीट शिकविण्याला तिचा तादृश उपयोग नाहीं.

सरकारी शाळांतून उजळणी शिकविण्याकडे फार दुर्लक्ष होतें असा सर्वसाधारण समज आहे. जुन्या तऱ्हेच्या खासगी शाळांतून जशी मुलांस पहिल्यानें सर्व उजळणी शिकवून ती तयार झाल्यावर वाचन वगैरे दुसरे विषय शिकविण्याची चाल आहे, तशी सरकारी शाळांत नसून एकंदर सर्व उजळणी पहिल्या तीन इयत्तांमध्यें विभागली आहे, व त्यामुळें कांहीं अंशीं लोकांचा वर लिहिल्याप्रमाणें समज झालेला आहे. वास्तविक उजळणीकडे सरकारी शाळांतील शिक्षकांचें असावें तितकें लक्ष नसतें, हें ही खरेंच आहे. प्रत्येक इयत्तेकरितां जी थोडी उजळणी नेमिलेली आहे, ती देखील त्या त्या इयत्तेंत चांगली तयार करून घेण्याकडे शिक्षक विशेष लक्ष देत नाहींत; व त्यामुळें विशेषेंकरून तोंडचे हिशेब करितांना मुलांस फार अडचण पडते. पाडे व आळ्यांवरची उजळणी ह्यांशिवाय बाकीच्या, म्हणजे सवायकीं, दिडकीं वगैरे ह्या उजळणीचा, उपयोग होतो तो बहुधा 'तोंडचे हिशेब' ह्या विषयांमध्येंच होतो. ती उजळणी चांगली अवगत असली तर तोंडचे हिशेब फारच सुलभ रीतीनें करितां येतात. ह्याकरितां उजळणी चांगली तयार करून घेण्याकडे शिक्षकांनीं विशेष लक्ष देणें अवश्य आहे. एकें दिवस पावकीं, निमकीं, तर

दुसऱ्या दिवशीं सव्वायकीं दिडकीं, अशीं थोडी थोडी उजळणी पूर्व दिवशीं नेमून देऊन दुसऱ्या दिवशीं एकएका मुलाकडून वाटेल तो एक एक धडा म्हणून घेण्याची जर रोज नियमानें वहिवाट ठेविली तर फारसे प्रयास न पडतां व वेळही फारसा न मोडतां मुलांची उजळणी चांगली तरतरीत राहील यांत संशय नाहीं. त्याचप्रमाणें रोज नियमितपणें उजळणी म्हणून घेण्याचा म्हणजे परवाड्याचा क्रमही सुटतां उपयोगी नाहीं.

## १०. इतिहास व भूगोल.

--!*:--

हल्लीं शाळांतून जे अनेक विषय शिकविले जातात त्या सर्वांत इतिहास व भूगोल हे विषय शिकविण्याकडे शिक्षक जितकें दुर्लक्ष करितात, तितकें दुसऱ्या कोणत्याही विषयाकडे करीत नाहींत. साधारण सर्व लोकांचा व बहुतेक शिक्षकांचा असा समज आहे कीं, इतिहास व भूगोल हे विषय शाळांतून व्यर्थ शिकविले जातात. ह्या समजुतीमुळें च बहुधा हे विषय विशेष काळजीनें शिकविले जात नाहींत. आणि लेखन, वाचन, व गणित, ह्या विषयांचा उपयोग जसा स्पष्टपणें ध्यानांत येतो, तसा ह्या विषयांचा येत नसल्यामुळें असें होणें स्वाभाविकही आहे. शरीर सुस्थितींत राखण्याला जशी अन्नपाण्याची आवश्यकता आहे, तशीच स्वच्छ हवा व व्यायाम यांचीही आहे, परंतु अन्नपाण्याप्रमाणें स्वच्छ हवा व व्यायाम ह्यांचा उपयोग स्पष्टपणें ध्यानांत येत नसल्यामुळें पुष्कळ लोक तिकडे ' म्हणजे स्वच्छ हवा व व्यायाम ह्यांकडे ' दुर्लक्ष करितात. तशीच गोष्ट इतिहास व भूगोल ह्या विषयांची ही आहे. परंतु त्यांचा स्पष्टपणें उपयोग ध्यानांत येत नाहीं, एवढ्यावरून ते विषय निरुपयोगी आहेत, असें मात्र म्हणतां येणार नाहीं. हल्लींच्या सुधारणेच्या काळांत प्रत्येक मनुष्याला त्याच्या व्यावहारिक कृत्यांपैकीं किती तरी कृत्यें चांगलीं करतां येण्याला, 'आपली राजकीय स्थिती कशी आहे, ती कशी प्राप्त होत गेली, यापूर्वीची स्थिती कशी होती, हल्लींची स्थिती जशी पाहिजे तशी आहे किंवा तींत कांहीं फेरफार करून ती ज्यास्त

सुखावह करून घेणें अवश्यक आहे, आणि फेरफार करून घेणें इष्ट असेल तर तो कोणत्या योग्य उपायांनीं करून घेतां येईल, इत्यादि अनेक गोष्टींचें ज्ञान असणें फार जरूर आहे. इतिहास व भूगोल हे विषय शिकल्यानें हें ज्ञान साहजिकपणें प्राप्त होतें. तसेंच इतिहासांतल्या शूर, धाडसी राज्यकारस्थानी, स्वदेशनिष्ठ अशा उपयुक्त गुणसंपन्न पुरुषांच्या गोष्टी ऐकून त्यांच्या गुणांचें अनुकरण करण्याची सहज प्रवृत्ती होते. याकरितां हे विषय निरुपयोगी आहेत, व म्हणून शिक्षणाच्या विषयांतून ते अजी कमी करावे, असें म्हणणें अगदीं अविचाराचें होईल. त्यांचा पाया लहान मुलांच्या शिक्षणक्रमांत आरंभीं पडलाच पाहिजे.

कित्येकांच्या मतें इतिहास व भूगोल हे विषय शाळांतून निराळे न शिकवितां वाचनपुस्तकांतच त्या विषयांवर मनोरंजक धडे घालावे, व ते धडे मात्र वाचनपुस्तक शिकवितांना मुलांकडून चांगलें तयार करून घ्यावे; म्हणजे हल्लीं भाराभर विषय शाळांतून शिकविण्याचा जो एक प्रकारचा बोजा वाटतो तो न वाटतां ह्या विषयांचें जरूर असलेलें ज्ञान मुलांस साहजिकपणें होईल. मला वाटतें, हें मत विशेष विचार करण्यासारखें आहे. इतिहासभूगोलाचे धडे वाचनपुस्तकांतून घातले असतां त्या विषयांचें ज्ञान होण्याच्या संबंधानें मुलांचें यत्किंचित् नुकसान न होतां इतर विषयांच्या तयारीला थोडा जास्त वेळ सांपडूं लागेल. परंतु अशा रीतीनें इतिहास-भूगोलाचे धडे वाचनाच्या पुस्तकांत घातल्यानें ‘ सकट घोडे बारा टक्के ’ या न्यायानें या विषयांचें महत्व वाटेनासें होईल कीं काय हेंही पाहिलें पाहिजे; ह्या विषयांना निराळें महत्व द्यावें मात्र त्यांचीं पुस्तकें पाहिजे तर वाचनपुस्तकांचे तऱ्हेवर असावीं, अशी व्यवस्था माझे मतें बरी. असो; हे विषय शाळेंत पृथकपणें शिकवावे किंवा त्यांचे धडे वाचनपुस्तकांतून असावे, ह्या गोष्टीचा विशेष विचार करण्याचें हें स्थळ नसल्यामुळें हा विचार येथें इतकाच सोडून मुख्य विषयाकडे वळणें जरूर आहे.

इतिहासासारख्या विषयाचें अध्ययन मुलांकडून करविणें म्हणजे त्या त्या प्रांतांत निरनिराळ्या कालीं जे अनेक राजकीय पुरुष होऊन गेले

त्यांचें वर्तन कसें होतें, राजकारभाराची त्यांची पद्धती कशी होती, व तिचे परिणाम कसे झाले, वगैरे गोष्टींचा विचार करण्याची मुलांस संवय लाविली पाहिजे. ह्या मुख्य हेतू चांगल्या रीतीनें साध्य होण्याकरितां त्या त्या पुरुषांच्या कारकीर्दीचे सन, त्यांच्या कारकीर्दींत घडलेल्या महत्वाच्या गोष्टी, व त्या गोष्टी कधीं घडल्या ते सन, इत्यादि प्रकारची माहिती कमी अधिक मानानें करून द्यावी लागते. ही माहिती चांगली असली म्हणजे त्या गोष्टींच्या संबंधानें चांगला विचार करण्याला बरीच अनुकूलता प्राप्त होते. हल्लीं शाळांतून इतिहास शिकवितात तो वर लिहिलेले हेतू लक्षांत आणून मुळींच शिकवीत नाहींत. निरनिराळ्या राजकीय पुरुषांच्या कारकीर्दींतल्या अनेक गोष्टींची सनवार माहिती करून देणें. एवढाच इतिहास शिकविण्याचा हेतू समजून ती माहिती तेवढी मुलांस करून देतात, हें त्यांचें करणें सर्वथा निरुपयोगी होतें असें मात्र नाहीं. कारण जी माहिती ते मुलांस करून देतात, तीवरूनच पुढें निरनिराळीं अनुमानें काढावयाचीं असल्यामुळें तीं अनुमानें काढण्याला जरी त्यांस आपण मुद्दाम शिकविलें नाहीं, तरी विचार करण्याचें त्यांचें सामर्थ्य जसजसें वाढत जातें, तस तसा मनुष्यस्वभावाच्या स्वाभाविक कलाला अनुसरून ह्या गोष्टींचा विचार त्यांच्या मनांत आपोआपच होऊं लागतो. अशा रीतीनें इतिहास शिकण्यापासून जो फायदा व्हावयाचा तो थोडाबहूत तरी झाल्याशिवाय राहत नाहीं. याकरितां इतिहासाची जी माहिती हल्लीं शिक्षक लोक मुलांस करून देतात ती तर चांगली करून दिलीच पाहिजे. परंतु ती माहिती सांगत असतांच अगर ती चांगली झाल्यानंतर जर त्या त्या कारकीर्दींवर मुलांच्या शक्तीच्या मानानें जास्त विवरणपूर्वक टीका केली, तर मुलांसही त्या कारकीर्दींच्या संबंधानें विचार करण्याची हौस वाटेल व स्वतःचीं अनुमानें करण्याची त्यांस बरीच संवय लागेल. विशेषेंकरून सहाव्या इयत्तेंतील मुलांस अशा रीतीनें इतिहास शिकविणें जास्त अगत्याचें आहे.

हल्लीं मुलांस इतिहास शिकविणें तो कांहीं भाग मुलांना घरून तयार करून आणण्यासाठीं म्हणून नेमून देऊन तो नेमिलेल्या वेळीं मुलांस

विचारावयाचा, अशा रीतीनें शिकवितात. ही पद्धती मुलांना विशेष त्रासदायक असून तिच्या योगानें मुलांचा हा विषय मुळींच तयार होत नाहीं असें म्हटलें तरी चालेल. कोणताही विषय स्वतः वाचून ध्यानांत ठेवण्याचें सामर्थ्य त्यांच्या आंगीं आलेलें नसल्यामुळें नेमून दिलेला भाग अर्थात त्यांच्यानें तयार होत नाहीं. याकरितां ह्या पद्धतीनें शिकविण्याचें सोडून दिलें पाहिजे. जो थोडासा भाग मुलांकडून तयार करावयाचा असेल, त्याची प्रथमतः वर्गांत गोष्टीच्या रूपानें मुलांस माहिती सांगावी. ह्या माहितीचें नुसतें एकदां व्याख्यान दिलें म्हणजे झालें असें न समजतां प्रश्नोत्तर रूपानें ती त्याच वेळीं घटविलीही पाहिजे. एक तासपर्यंत अशा रीतीनें तो थोडासा भाग शिकवीत राहिलें तर तितक्या वेळांत तो मुलांस बराच अवगत होईल. मग पुढच्या वेळेला त्यांस तो घरून तयार करून आणण्यास सांगावा, म्हणजे त्यांना तो चांगला तयार करितां येईल. पुढच्या नेमिलेल्या वेळीं तो भाग मुलांस विचारावा म्हणजे तो कित्येक मुलांचा जरी तयार झालेला नसला तरी देखील आपल्या विचारण्यानें तो वर्गांतल्या वर्गांत सहजीं तयार होईल. इतिहास शिकविण्याची ही पद्धती चांगली आहे असें पुष्कळ शिक्षकांस माहीत असूनही ते ह्या पद्धतीनें न शिकवितां पूर्वी लिहिलेल्या पद्धतीनेंच शिकवितात. मुलांस वर्गांत गोष्टीप्रमाणें इतिहासाची माहिती सांगण्याला स्वतः शिक्षकाला तो चांगला अवगत असला पाहिजे. परंतु मुलांस शिकविण्याचे वेळीं शिक्षकांचा इतिहास तितका तयार नसतो. वास्तविकपणें पाहतां इतकी खडान खडा माहिती अशा वेळीं मुखोद्गत नसली तरी त्यांत शिक्षकांकडे कोणत्याही प्रकारें दोष आहे असें मुळींच नाहीं. परंतु कित्येक शिक्षकांना तो दोष आहे असें वाटून तो झांकण्याचा ते प्रयत्न करितात. म्हणजे मुलांस अगोदर माहिती सांगण्याचें मुळींच सोडून देऊन फक्त त्यांनाच ती घरीं तयार करून आणण्याकरितां नेमून देतात. व मग वर्गांत पुस्तकावरून मुलांस विचारीत बसतात. परंतु असें न करितां थोडें जास्त धोरण ठेवून जो भाग मुलांस सांगावयाचा तो

अगोदर एकदां दोनदां लक्षपूर्वक वाचून ठेविला, तर टाळाटाळी करण्याचें हें संकट सहजीं दूर होऊन शिक्षकाला ती माहिती हुशारीनें सांगतां येईल, व मुलांकडून तयार ही चांगली करून घेतां येईल. पुस्तकावरून पाहत विचारण्याची शिक्षकांना मनांत लाज वाटत असते ह्यांत संशय नाहीं; परंतु आळसानें ते ती वेळ कशी तरी मारून नेतात. मला वाटतें थोडीशी तसदी घेतली असतां अशा शिक्षकांना हा अपमानकारक प्रसंग सहज टाळतां येईल. याला उत्तम उपाय म्हटला म्हणजे धड्यांचीं टिपणें करून ठेवणें हा होय. टिपणें केलीं असतां शिकवितांनां कधींही पंचाईत पडणार नाहीं; व टिपणें ही शिकवितांना वारंवार पाहाण्यास मुळींच हरकत नसते.

वर्गांत मुलांस विचारून विचारून त्यांजकडून इतिहास तयार करून घेण्याचा जो मार्ग वर सांगितला आहे, तो विशेष ध्यानांत ठेविला पाहिजे. मुलांस पूर्वी माहिती सांगून मग ती त्यांस घरून तयार करून आणण्याला सांगितली तरी तयार करून आणण्याचें काम त्यांजकडून चांगलें होईल असें वाटत नाहीं. कांहीं मुलें कदाचित् तयार करितील, परंतु बहुतेक मुलें तयार करीत नाहींत असेंच अनुभवास येतें. अशा प्रसंगीं शिक्षेचा उपयोग करणें, हा एक सर्वत्र ठरींव मार्ग बनलेला आहे, परंतु तो मुलांच्या हिताचा नसून उलट शिक्षकाला मात्र त्रास उत्पन्न करणारा आहे. मराठी शाळांतून ज्या मुलांस शिकवावयाचें असतें ती प्रौढ नसून शिक्षेच्या धाकानें देखील त्यांजकडून घरीं विषयाची तयारी होत नाहीं. याकरितां अशा स्थितींत घरून विषय तयार करून आणिला नाहीं म्हणून त्यांस शिक्षा केली तरी तिचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं, हें उघड आहे. मुलांकडून घरून विषय तयार करून आणविण्याचा दुराग्रह सोडून देऊन वर्गांतच पुनः पुनः विचारून व मुलांच्या तोंडून उत्तरें वदवून तो विषय घटविण्याची वहिवाट ठेविली तर शिक्षा करण्यापासून स्वतः शिक्षकाच्या मनाला होणारा त्रास नाहींसा होऊन मुलांची तयारी त्या विषयांत फारच चांगली होईल. खेरीज शिक्षकावर मुलांचे प्रेम व विश्वासही असतील हें निराळेंच.

इतिहास शिकवितांना आणखी एका गोष्टीकडे शिक्षकांनीं विशेष लक्ष दिलें पाहिजे. ती ही कीं सर्व इतिहासाचे भागवार अनेक प्रकारचे प्रश्न काढून त्यांची वही शिक्षकानें आपल्या जवळ बाळगावी. हे प्रश्न अशा तऱ्हेचे असावे कीं त्यांच्या उत्तरांमध्यें पुस्तकांतल्या बारीक सारीक गोष्टींचा देखील समावेश व्हावा. ज्याचीं उत्तरें लांबलचक द्यावीं लागतील असे ते नसावे. व एकमेकांशीं अशा रीतीनें जोडलेले असावे कीं, त्यांचीं उत्तरें क्रमानें देत गेल्यास सर्व इतिहास वाचल्याप्रमाणें त्याची उजळणी होऊन जाईल. मुलांकडून हे प्रश्न उतरून घेववावे, व जेव्हां जेव्हां इतिहासाचा कोणताही भाग घरून वाचून येण्यासाठीं नेमून द्यावयाचा असेल, तेव्हां तेव्हां तो वाचून त्यावरील ह्या प्रश्नांचीं उत्तरें ही तयार करण्यास त्यांस सांगावें. अशा प्रकारचे प्रश्न काढिलेले नसले तर मुलांस इतिहास चांगला तयार करितां येत नाहीं. नेमून दिलेला इतिहास त्यांनीं पुष्कळ वेळां वाचिला तरी तो नीट ध्यानांत राहत नसल्यामुळें त्यांस कंटाळा येतो. परंतु प्रश्न काढिलेले असले म्हणजे त्याचीं लहान लहान उत्तरें तयार करण्याची त्यांस हौस वाटून सर्व इतिहास अल्पायासानें तयार होतो. याकरितां अशा तऱ्हेचे प्रश्न काढून त्यांचा उपयोग करण्याची तजवीज शिक्षकांनीं अवश्य केली पाहिजे.

भूगोल शिकवितांना त्या त्या इयत्तेकरितां नेमिलेलीं पुस्तकें मुलांकडून पाठ करून घेण्याची चाल आहे, ती फार वाईट आहे. भूगोल शिकविण्याला नकाशासारखीं उत्तम साधनें असूनही शिक्षकांचा कल पुस्तकें पाठ करून घेण्याकडे असावा, हें मोठें आश्चर्य आहे. मुलांस नकाशा पाहण्याची फार हौस वाटते. याकरितां त्या हौसेचा उपयोग करून घेऊन ह्या विषयाची आवश्यक अशी माहिती नकाशाच्या साह्यानें करून दिली तर भूगोल शिकविण्याचें काम फार चांगलें होईल. आरंभींच्या इयत्तांतून भूगोलासंबंधीं कित्येक व्याख्या मुलांस समजणें अवश्य आहे. त्या व्याख्या प्रथम चांगल्या समजावून देऊन मुलांस त्यांची बरोबर कल्पना झाल्यानंतर त्या त्यांजवळून पाठ करून घ्याव्या. नाहीं

त्र्यक्षर ... ९०

तर 'डोंगराची' व्याख्या तोंडपाठ असूनही डोंगराच्या पायथ्याशीं राह-णाऱ्या मुलाला 'तूं कधीं डोंगर पाहिला आहेस काय?' असा प्रश्न विचारला असतां 'नाहीं' असें उत्तर त्याच्या तोंडून निघण्याचा प्रसंग यावयाचा !

नकाशावरून भूगोल शिकविणाऱ्या कित्येक शिक्षकांची समजूत, शहरें, नद्या, पर्वत वगैरे हीं मुलांस नकाशावरून चांगलीं दाखवितां येऊं लागलीं म्हणजे झालें, अशी असते, ती बरोबर नाहीं. जिल्ह्याचा अगर इलाख्याचा भूगोल शिकवीत असतां तालुक्यांतील अगर जिल्ह्यांतील सरकारी अधिकारी कोण कोण असतात ही माहिती त्यांस सांगावी. प्रांतांतील एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं जाणें झाल्यास कोणत्या मार्गानें कसें जावयाचें हें माहीत असलें पाहिजे. म्हणजे अर्थात आगगाडीचे व आगबोटीचे रस्ते कोठून कसे जातात वगैरे प्रकारची माहिती त्यांस करून दिली पाहिजे. तसेंच निरनिराळ्या प्रांतांत उत्पन्न होणारे मुख्यपदार्थ, त्या प्रांतांत चालू असणाऱ्या भाषा, व निरनिराळ्या देशांत चालू असलेले धर्म, व तेथील राज्यपद्धती, वगैरे हरएक प्रकारची माहिती जितकी ज्या इयत्तेमध्यें करून देतां येण्यासारखी असेल तितकी करून द्यावी. अशा प्रकारची माहिती मुलांकडून पाठ करून न घेतां इतिहासाप्रमाणें शिक्षकानें ती त्यांस गोष्टींच्या रूपानें सांगावी, व पुनः पुनः विचारून त्यांजकडून उत्तरें वदवून ती घटवावी. भूगोलांतील स्थळें ध्यानांत राहण्यास ह्या स्थळाच्या संबंधाची एक तरी चमत्कारिक किंवा विशेष गोष्ट सांगून ठेवणें, हा मार्ग फार उत्तम आहे. तशी माहिती मुलांस झाली असतां तीं भूगोलांतलीं स्थळें सहसा विसरणार नाहींत.

---

## ११. सामान्यविचार.

—०*०—

येथपर्यंत हल्लीं शाळांतून जे निरनिराळे विषय शिकविले जातात त्यांच्या संबंधानें क्रमशः विचार केला. भूमिती, जमाखर्च वगैरे मुख्यत्वें करून सहाव्याच इयत्तेंत शिकविण्याच्या विषयांबद्दल येथें विचार केला

नाहीं. कारण ते विषय शिकविणाऱ्या शिक्षकांस ट्रेनिंग कालेजांतील शिक्षण पूर्णपणें मिळालेलें असल्यामुळें ह्या लेखांतल्यासारख्या सूचनांपासून त्यांना कांहीं विशेष घेण्यासारखें असेल असें वाटत नाहीं. प्रत्येक विषय शिकविण्याच्या संबंधानें विशेष विचार जेथल्या तेथें झाला आहेच. परंतु कांहीं गोष्टी अशा आहेत कीं त्यांचा कोणत्याही एका विशेष विषयांशींच संबंध नसून सामान्यतः कोणताही विषय शिकवावयाचा असला तरी त्यांकडे लक्ष देणें जरूर आहे, अशा कित्येक गोष्टींचा विचार ह्या भागांत करण्याचें योजिलें आहे.

**शिक्षकानें स्वतः मुलांकडून अभ्यास करून घेतला पाहिजे.**— हल्लीं बहुतेक शिक्षकाचा कल मुलांकडून धडे पाठ करून घेण्याकडे फार असतो. चालू शिक्षणपद्धतींत अनेक दोष आहेत, असें जें कित्येक लोकांच्या बोलण्यांत वारंवार येतें, त्याचें बीज मुख्यत्वेंकरून ह्या चुकीच्या पद्धतींतच आहे. कोणत्याही विषयाची मुलांस चांगली समजूत करून देऊन तो शिक्षकानें स्वतःच मुलांकडून तयार करून घेण्याची पद्धत सर्वत्र चालू झाली असतां हल्लीं मिळत असलेलें शिक्षण विशेष फलद्रूप झाल्याशिवाय राहणार नाहीं. भाराभर अभ्यास घरीं तयार करून आणण्यासाठीं नेमून द्यावयाचे ते मुलांनीं तयार केले नाहींत तर शाळेंत त्यांस शिक्षा करून पुनः पूर्ववत घरून तयार करून आणण्यासाठीं दुसरे दिवशीं धडे नेमून द्यावयाचे, व अशा रीतीनें पुस्तकें त्यांजकडून पाठ करून घ्यावयाचीं, असा क्रम आज कितीतरी वर्षें सारखा चालू असल्यामुळें शिकणारांचें अनेक प्रकारें नुकसान झालें आहे, व होत आहे. नुसतीं पुस्तकें पाठ करीत गेल्यानें मुलांच्या मानसिक शक्तींचा विकास व्हावा तसा होत नाहीं, विषयाची समजूत चांगली झाली नसल्यामुळें जास्त ज्ञानप्राप्ती करून घेण्याची त्यांची इच्छा नाहींशी होऊन दिवसेंदिवस अभ्यास करण्याचा अधिकाधिक कंटाळा वाटूं लागतो, व माराच्या धाकानें अगर मनाच्या स्वाभाविक काळजीमुळें जीं कित्येक मुलें घरींदारीं सर्वकाळ हाडांचीं काडें करून शिक्षकांनीं तयार करण्या-

साठीं दिलेले धडे पाठ करीत बसतात, त्यांच्या शरीरांतील सर्व जोम नाहींसा होऊन, त्यामुळें तीं आयुष्यांतल्या भावी सुखांस बहुतेक अंतरतात. ह्या दोषयुक्त पद्धतीपासून जर कांहीं हित होतच असेल, तर तें वार्षिक परीक्षेच्या वेळीं एक तृतीयांशापेक्षां कमी मुलें पास होण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून शिक्षकाचा बचाव करण्याच्या कामीं मात्र होत असेल. परंतु ह्या अत्यंत क्षुल्लक व व्यक्तिविषयक हिताकरितां शाळांनिहाय शिकणाऱ्या एकंदर शिष्यवर्गाचें भयंकर नुकसान व्हावें ही विलक्षण खेदजनक गोष्ट आहे. बुद्धीच्या अपूर्व कर्तृत्वानें ज्यांनीं आपल्या देशाला पुढें उर्जित दशा आणावयाची, त्या भावी महापुरुषांच्या बुद्धीचा व शरीराचा त्यांच्या अल्पवयांतच असा चुराडा होणें अत्यंत हानिकर आहे. याकरितां ज्या चुकीच्या पद्धतीमुळें हे सर्व भावी अनर्थ ओढवण्याचा विशेष संभव दिसतो ती बंद करून दुसरी हितावह पद्धती अवश्य अमलांत आणिली पाहिजे. हल्लींच्या शिक्षणक्रमांत अनेक गोष्टींचा एक समयावच्छेदेंकरून समावेश केला असल्यामुळें मुलांच्या मनावर व शरीरावर त्या शिक्षणाचा फार अनिष्ट परिणाम घडतो, असा एकसारखा बोभाटा हल्लीं चालू आहे. वरीष्टप्रतीच्या शिक्षणासंबंधानें ह्या बोभाट्यांत कांहीं अर्थ असेल तर त्याचा विचार येथें करावयाचा नाहीं, परंतु प्राथमिक शिक्षणापुरताच विचार केला असतां त्या बोभाट्यांत विशेष अर्थ आहेसें दिसत नाहीं. प्राथमिक शिक्षणाच्या शाळांतून हल्लीं शिकविले जाणारे विषय म्हणजे विशेषेंकरून लेखन, वाचन व जरूरी पुरतें गणित, हेच आहेत. पुढें कोणत्याही धंद्यांत शिरावयाचें असलें तरी कोणाला म्हणजे ह्यांपैकीं अमुक एक विषय शिकण्याची गरज नाहीं असें कोणाच्यानेंही म्हणवणार नाहीं. तेव्हां पुष्कळसे विषय शिकावे लागत असल्यामुळें फार नुकसान होतें हा आरोप निदान प्राथमिक शिक्षणास तरी लागू होण्यासारखा नाहीं, यांत संशय नाहीं. थोडेसेच परंतु अवश्यक असे जे विषय हल्लीं शाळांतुन शिकविले जातात, ते शिकविण्याच्या पद्धतींतच वर लिहिल्याप्रकारचा दोष असल्यामुळें नुकसान होत आहे, व त्याचा विचार अवश्य झाला पाहिजे.

मुलांस घरून तयार करून आणण्यासाठीं अमुक विषय नेमून देऊन तो त्यांजकडून तयार करवूं, ह्या भरंवशावर शिक्षकानें अगदीं राहूं नये. शाळेंत कोणत्याही विषयाची प्रथम चांगली समजूत करून देऊन नंतर त्याची तयारी ही शाळेंत आपणच करीत गेल्यास मुलांस त्या विषयाकडे घरीं पहावें ही न लागतां तो चांगला तयार होईल. मुलांस विषय चांगला समजलेला नसतो, त्यांचें लक्ष स्वभावतःच खेळण्याकडे असल्यामुळें धाकानें तीं घरीं वाचावयास वगैरे बसलीं तरी त्याचें लक्ष तिकडे बहुधा नसतें, व शिवाय अभ्यास कसा करावा हेंच त्यांस मुळीं समजत नसतें. तेव्हां घरीं अभ्यास करण्यास नेमून देऊन इतक्या व्यर्थ त्रासांत त्यांना पाडण्यापेक्षां शाळेंतच आपण त्यांजकडून अभ्यास करविणें सर्वथा हिताचें आहे यांत संशय नाहीं. असें करीत गेल्यानें एका वर्षांत नमिलेले अभ्यास पुरे होणार नाहींत असा आक्षेप कित्येकांकडून येईल. परंतु तो आक्षेप केवळ काल्पनिक आहे. अनुभवानंतर तो व्यर्थ आहे अशी खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं. शाळेंत मुलांकडून धडा तयार करून घेत असतां एकदां सांगून मुलाला आलें नाहीं तर फार संताप येतो हें खरें, परंतु थोडी जास्त सहनशीलता धरून संताप न करितां व मुलांस शिक्षा न करितां तीच गोष्ट मुलांस पुनः सांगितली, व तत्संबंधाचीं अनेक प्रकारचीं उत्तरें मुलांकडून पुनः पुनः वदवून घेतलीं तर सर्व त्रास चुकून चांगली तयारी झाल्याशिवाय खचीत राहणार नाहीं, व हीच पद्धत सर्वांत चागली आहे असें मग वाटूं लागेल. शाळेंत शिकविण्याचा वेळ हल्लीं एकंदर सहा तास ठरविलेला आहे. इतक्या वेळाचा जर योग्य रीतीनें उपयोग केला तर धड्यांच्या तयारी करितां म्हणून मुलांस घरीं वेळ मोडण्याचें बहुधा कारण राहणार नाहीं. व शाळेंत होणाऱ्या अभ्यासाच्या श्रमानंतर विश्रांतीकरितां घरचा वेळ शरीर प्रकृतीला हितावह असे खेळ खेळण्यांत घालविणें हेंच विशेष आवश्यक होईल.

**कोणताही विषय शिकविणें तो थोडा थोडा शिकवून प्रश्नोत्तरपद्धतीनें शिकवावा**--पुष्कळ विषय मुलांस एकदम व्याख्यानपद्ध-

तीनें शिकविण्याची पुष्कळ शिक्षकांचीं चाल असते. त्या पद्धतीनें शिकविण्यांत त्यांस विशेष कौतुक वाटतें. परंतु ती पद्धत मुलांस अतिशय घोंटाळ्यांत पाडणारी आहे, हें नेहमीं ध्यानांत ठेविलें पाहिजे. व्याख्यान रूपानें आपली विद्वत्ता मुलांपुढें कितीही ओतिली तरी त्यांपासून मुलांचें तादृश हित होणार नाहीं. याकरितां नेहमीं अगदीं थोडें थोडें शिकवीत रहावें, व तेंही प्रश्नोत्तरपद्धतीनें शिकवावें. शिकवीत असतां मुलांस जसजसा विषय समजत जाईल तसतसे, मागील माहीतीच्या आधारावर त्यांसच उत्तरें देतां येतील असे प्रश्न त्यांस विचारावे, व त्यांजकडूनच त्यांचीं उत्तरें घेऊन तो विषय समजावून द्यावा. ह्या प्रश्नोत्तर-पद्धतींत देखील कित्येक शिक्षकांची एक चूक होत असते म्हणजे ह्या पद्धतीनें शिकवीत असतां ते मुलास प्रश्न विचारतात. परंतु शिकविण्याच्या नादांत गढून गेले असल्यामुळें म्हणा, किंवा त्यांना तशी संवयच लागून गेली असल्यामुळें म्हणा, त्या प्रश्नांची उत्तरें मुलांकडूनच घेतली पाहिजेत ह्या गोष्टींचा त्यांस विसर पडून ते स्वतःच त्या प्रश्नाचीं उत्तरें देतात व पुढें शिकवीत जातात. लक्षांत न येतां जी ही चूक शिक्षकांकडून होते तीमुळें नुकसान फार होतें. याकरितां ती न होऊं देण्यासाठीं फार सावध असलें पाहिजे.

**शिकवितांना गैरहुशार व मागसलेले अशा मुलांकडे जास्ती लक्ष असावें**—बहुतेक शिक्षकांचें ह्या गोष्टीकडे फार दुर्लक्ष होतें. हुशार मुलें प्रश्नांचीं उत्तरें देण्याला नेहमीं तत्पर असतात, व त्यांजकडून मिळणारीं उत्तरें बहुतेक प्रसंगीं चुकीचीं नसतात यामुळें शिक्षकांचा स्वाभाविक ओढा त्या मुलांकडे जास्त असतोच, त्यांतही गैरहुशार व मागसलेल्या मुलांस कोणताही विषय समजावून देतांना फार त्रास होत असल्यामुळें शिक्षक त्यास शिकविण्याचा विशेष कंटाळा करितात. परंतु असें करणें अगदीं इष्ट नाहीं. आरंभापासूनच याकामीं चांगली काळजी घेतली तर वर लिहिलेला त्रास शिक्षकांस फारसा होणार नाहीं. पहिल्यापासूनच अगदीं थोडा थोडा विषय समजावून

देण्याची पद्धत ठेवावी, व तो सर्व मुलांना चांगला समजल्या-शिवाय पुढें शिकवावयाचें नाहीं, असा निश्चय करावा, म्हणजे हुशार व गैरहुशार अथवा मागसलेल्या मुलांमध्यें जें पुढें बरेंच अंतर पडतें तें पडणार नाहीं, व त्यामुळें मग त्यांस शिकविण्याचा तितका कंटाळाही वाटणार नाहीं. प्रत्येक विषय नेहमीं त्याच गैरहुशार मुलांस शिकवीत असावें, व हरएक प्रकारच्या प्रश्नांचीं उत्तरें मुलांकडून घ्यावयाचीं तीं ही अशाच मुलांकडून घ्यावीं. म्हणजे हा कमीजास्तीपणाचा भेद अगदीं नाहींसा होऊन पहिल्या मुलापासून शेवटच्या मुलापर्यंत सर्व वर्ग बहुतेक सारखाच तयार राहील.

**उदाहरणें करितांना व लेखी प्रश्नांचीं उत्तरें लिहितांना मुलांनीं दुसऱ्याचें पाहूं नये, अशी संवय लावण्याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे.**—पुष्कळ शिक्षक ह्या गोष्टीकडे द्यावें तितकें लक्ष देत नाहींत, व त्यामुळें फार नुकसान होतें. स्लेटीवर अथवा कागदावर प्रश्नाचें उत्तर लिहितांना दुसऱ्या मुलानें काय लिहिलें आहे हें पाहण्याची इच्छा मुलांस सहजींच होते. दुसऱ्याचें पाहून उत्तर लिहिलें असतां त्यांत आपलें किती नुकसान आहे ह्याची कल्पना त्यांस मुळींच नसते. परंतु शिक्षकांनीं ह्या कामीं अतिशय सक्तीची नजर ठेविली पाहिजे. एकतर असें करणें नीतिदृष्ट्या अत्यंत अश्लाध्य आहे; आणि शिवाय मुलांस दुसऱ्याचें पाहून लिहिण्याची संवय एकदा लागली, तर पुढें शिक्षकानें कितीही उरस्फोड करून त्यांस शिकविलें तरी त्याच्या श्रमांचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं. दुसऱ्याचें पाहून लिहिण्याची संवय असली म्हणजे मुलांचें लक्ष शिक्षकाच्या सांगण्याकडे लागत नाहीं, आणि आपण शिकविल्यापैकीं मुलांस समजलें किती व समजावयाचें राहिलें किती हेंही शिक्षकास कळत नाहीं. अर्थात कोणत्या मुलाला काय येतें अगर काय येत नाहीं ह्या मुख्य गोष्टीचेंच खरें ज्ञान जर शिक्षकाला झालें नाहीं तर त्याचें सर्व शिकविणें चुकीच्या पायावर होऊन त्यापासून फलप्राप्ती कांहीं होणार नाहीं. याकरितां हरएक प्रयत्न करून शिक्षकांनीं ही खोड मुलांस लागूं देऊं नये.

**अंकगणित भाग ३ रा**—विद्याखात्यानें सर्व शाळांत चालविण्याकरितां पसंत केलेला मराठी सहाव्या इयत्तेतील व ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांकरितां अति मेहनतीनें तयार केलेला. हा खालीं सहीकरणाराकडे रोख किंमतीनें अगर व्हिपीनें मिळेल. दहा रु० किंमतीच्या पुस्तकांवर शेकडा २५ कमिशन दिलें जाईल. किंमत ८१४, टपाल हशील ८१८६.

नं० ४८, बुधवार पेठ, पुणें. **गणेश बळवंत लिमये.**

---

## चित्रलेखन मूलतत्व (पुस्तक पहिलें)

सतत पंचवीस वर्षे ड्रॉईंग शिकविण्याच्या अनुभवावरून ज्या ज्या गोष्टी विद्यार्थ्यांस प्रथम शिकविणें अवश्य वाटलें त्या सर्व शास्त्रीय नियमानें पद्धतशीर बसवून हें पुस्तक तयार केलें आहे. पुस्तकाची किंमत प्रथम सहा आणे ठेविली होती. परंतु कलेचें शिक्षण व अभिरुची आपले देशांत जितकी असावी तितकी नसल्या कारणानें व त्याचा प्रसार फार व्हावा व विद्यार्थ्यांस घेण्यास सुलभ जावें करितां याची किंमत अगदींच कमी म्हणजे फक्त अडीच आणे केली आहे. अशा तऱ्हेचें हें मराठींत पहिलेंच पुस्तक आहे. तेव्हां सर्वांनीं याचा उपयोग करून घ्यावा अशी आमची शिफारस आहे.

हें पुस्तक मे. विद्याखात्याचे डायरेक्टर सा. बा. यांनीं मराठी शाळांकरितां व मराठी शाळांचे लायब्ररींकरितां आपलें मेमो नंबर ६०९४ तारीख १. १२. १९०० मध्यें पास केलें आहे. कळावें.

**म्यानेजर चित्रशाळा छापखाना,**
**पुणें सिटी.**

---

**पद्यसमुच्चयः**—ॲंग्लोव्हरनाक्युलर पहिल्या तीन इयत्तांकरितां व मराठी ४।५।६ या० यत्तांकरितां मे० डायरेक्टर साहेब यांनीं मंजूर केलेलें मराठी कवितेच्या वेंच्यांचें पुस्तक. शेवटीं समजुतीच्या भरपूर टीपा व कोश आहेत. आवृत्ती पांचवी. किं० ८६. ट. ख. ८१.

**पुस्तकें पुणें येथें चित्रशाळेंत मिळतील.**

## विक्रीस तयार. किं. १२ आणे.

मेहेरबान लिव्हारनर साहेब यांनीं इंग्रजींत लिहिलेले सिटीझन आफ इंडिया या पुस्तकांचे मराठी भाषांतर छापवून विक्रीस तयार आहे. व हे बुक डा. आ. प. ई. यांनीं मराठी ५।६ यत्तेकरितां नेमले आहे.

म्याकमिलन् आणि कंपनी.

१२ ब्यॉं रुट्री. मुंबई.

---

रा. भि. जोशीकृत.

# बालबोध मराठी व्याकरण.

**याची पुष्कळ जास्त माहिती घालून सुधारलेली दुसरी आवृती,**

चित्रशाळेंत विक्रीस तयार आहे. पृष्ठसंख्या १८०.

किंमत ८५ आणे ट० ख० ८१

---

## विक्रीस तयार.

आरेबियन नाईट भाग १ ते ९. एकदम नऊ भाग घेणारास किंमत २८८ पडेल. व शिवाय बंगीचार्ज व टपालखर्च पडेल. प्रती फारच थोड्या शिल्लक आहेत करितां मागणारानीं त्वरा करावी. बुकें खालील पत्यावर विकत मिळतील.

म्यानेजर चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ पुणें.

---

## विक्रीस तयार.

नऊ इंची पृथ्वीचा ग्लोब पेटीसुद्धां, हा ग्लोब प्रत्येक शाळेस असल्यानें पृथ्वीचा आकार वगैरे शिकविण्याच्या कामीं फार उपयोग होईल. किं० रु० २०

म्यानेजर चित्रशाळा पुणें.


---

प्रकाशक—शंकर नरहर जोशी.

पुस्तक १७.



*Registered No B 179*

अंक १२.


सन १९०१. माहे डिसेंबर.

# मराठी शाळापत्रक

# Marathi School Paper

## विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| जाहिराती... ... ... ... ... ... | २६५ |
| मेरी कारपेंठर बाईच्या स्कालरशिपा—मुंबई येथील न्याशनल इंडियन असोसिशनच्या सभ्य स्त्रियांनीं दिलेल्या ज्यादा स्कालरशिपा. | |
| शिक्षकमित्र—शारीर-शिक्षण व नीति-शिक्षण— | ६५ ते ८० |
| वनस्पतीचे अवयव व त्यांचे आकार वर्णनाचा तक्ता—वनस्पतींच्या अवयवासंबंधीं लक्षांत ठेवण्याच्या गोष्टी. ... ... ... ... | |


अगाऊ वार्षिक वर्गणी टपालखर्चासह रु० १६२

## शालापत्रक-कर्त्यांच्या सूचना.

( १ ) वनस्पतीशास्त्राचे दोन तक्ते तयार केले आहेत; परंतु टपालखर्च जास्त लागूं नये म्हणून या अंकाबरोबर एकच तक्ता पाठविला आहे. दुसरा पुढील अंकाबरोबर येईल.

( २ ) गेल्या अंकांत पृष्ठ २९९ ओळ ९ येथें ' ब्राक्टस् ' याबद्दल Stipule ( उपपर्ण ) असें पाहिजे; व पुढील कलमाच्या शेवटीं " कांहीं फुलांत उपाच्छादन असतें; त्यास Involucre ( इन्व्होल्युकर ) असें म्हणतात; व त्याच्या प्रत्येक दलास ' ब्राक्टस् ' असें म्हणतात " असें पाहिजे.

---

# बॉम्बे ब्रँच नॅशनल इंडियन ॲसोसिएशन.

## स्त्रीशिक्षणाला उत्तेजन देण्याकरितां नॅशनल इंडियन आसोसिएशनच्या मुंबईशाखेकडून होणारी योजना.

:-*-:

स्त्रियांना आपला अभ्यास वाढविण्यास उत्तेजन मिळावें, व त्यामध्यें उपयोगी ज्ञानाचा प्रसार व्हावा ह्या हेतूनें सदर सभेकडून खालीं लिहिलेलीं बक्षिसें देण्याची योजना झाली आहे.

### निबंधांबद्दल बक्षिसें.

**बक्षिस पहिलें**—रु. २९, सर्व स्त्रियांकरितां प्रोफेसर मॉक्सम्युलर ह्यांच्या नांवानें कोणी लाइफ मेंबर ह्यांनीं हें बक्षिस दिलें आहे. विषयः— " आपल्या सुशिक्षित स्त्रिया रिकामा वेळ कोणत्या रीतीनें घालवितात, व तो त्यांनीं वस्तुतः कसा घालवावा." हा निबंध कोणीही स्त्रीनें मराठी भाषेंत लिहावा. निबंध निदान ४००० शब्द, अगर १० फुलस्केप पानें, इतका असावा. बक्षिसाचा निबंध विशेष चांगला ठरल्यास नॅशनल ऑसोसिएशन तर्फे रुपये १९ चें इनाम शिवाय देण्यांत येईल.

**बक्षिस दुसरें**—रु. २०, स्त्रीशिक्षकांकरितां. डाक्टर आर. जी. भांडारकर ह्यांच्या नांवानें कोणी लाईफ मेंबर ह्यांनीं हें बक्षीस दिलें आहे. विषयः—"स्त्रीशिक्षकांची हल्लींची स्थिति कशी आहे, व ती कोणत्या

# शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यांसी । हें अवघें सद्गुरुपाशीं।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळां जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १५ डिसेंबर १९०१. अंक १२.

## जाहिराती.

### १. मेरी कारपेंटरबाईच्या स्कालरशिपा.

१. लंडन एथील न्याशनल इंडियन असोशिएशन सभेनें मुंबई बेटांतील मराठी, हिंदुस्थानी, गुजराथी, मुलींच्या शाळांत शिकणाऱ्या मुलींकरितां 'मेरी कारपेंटर स्कालरशिपा' या नांवानें पांच स्क शिपा ठेविल्या असल्यामुळें सन १९०२ सालांकरितां पुढील नियम करण्यांत आले आहेत.

२. ह्या स्कालरशिपा किती रुपयांच्या व कोणत्या शर्तींवर दिल्या जातील तें पुढील कलमांवरून कळेल. मुंबईंतील मराठी, हिंदुस्थानी, गुजराथी, प्रायमरी व मिडल ह्या दोन्ही प्रकारच्या शाळा, मग त्या म्युनीसिपालिटीच्या असोत, मदत मिळणाऱ्या असोत किंवा नुसत्या खासगी असोत, त्यांत वास्तविक अभ्यास करणाऱ्या सर्व मुलींस या स्कालरशिपा मिळविण्याच्या परीक्षेस बसतां येईल. मात्र ज्या मुलींना स्कालरशिप मिळण्याचा मुळींच संभव नाहीं, अशा मुलींस परीक्षेस न पाठविण्याविषयीं खबरदारी घ्यावी. कारण पुष्कळसे नालायक उमेदवार पाठविल्यानें शाळेची पत वाढण्यापेक्षां नापत मात्र होते.

३. मुलींच्या शाळांकरितां नेमिलेल्या इयत्तांपैकीं सहाव्या इयत्तेच्या अभ्यासांत ज्या दोन मुलींची परीक्षा उत्तम उतरेल त्यांस प्रत्येकीं दरमाहा ५ रुपयांची स्कालरशिप देण्यांत येईल. या दोन स्कालरशिपा मिळालेल्या मुलींना, शाळाखात्याकडून ज्या शाळेची तपासणी होत असेल अशा शाळेमध्यें त्यांस स्कालरशिप मिळत आहे तों पर्यंत प्यूपिल टीचर या नात्यानें काम करावें लागेल. व त्यांचें काम त्या शाळेच्या व्यवस्थापकांना व शाळा तपासणाऱ्या सरकारी अमलदारांस पसंत पडलें पाहिजे. ज्या मुलींचा व्हर्न्याक्युलर ( मराठी, हिंदुस्थानी, गुजराथी ) सहावे इयत्तेचा अभ्यास पुरा झाला असेल व ज्या इंग्रजी तिसऱ्या इयत्तेहून वरच्या इयत्तेंत शिकत नसतील अशाच मुली परीक्षेस बसण्यास लायक समजल्या जातील.

४. मुलींच्या शाळांकरितां नेमिलेल्या इयत्तांपैकीं ५ वे इयत्तेचा अभ्यासांत ज्या दोन मुलींची परीक्षा उत्तम उतरेल त्यांस प्रत्येकीं दरमहा ४ चार रुपयांची स्कालरशिप दिली जाईल अशा स्कालरशिप मिळालेल्या मुलींनीं ज्या शाळेची सरकारी अमलदारांकडून तपासणी होते अशा शाळेंत राहून व्हर्न्याक्युलर सहाव्या इयत्तेंत किंवा इंग्रजी दुसरे इयत्तेंत चांगला अभ्यास केला पाहिजे. ज्या मुलींचा व्हर्न्याक्युलर पांचवे इयत्तेचा अगर इंग्रजी पहिले इयत्तेचा अभ्यास पुरा झाला असून ज्या व्हर्न्याक्युलर सहाव्या किंवा इंग्रजी २ ऱ्या इयत्तेहून वरच्या इयत्तेंत शिकत नसतील त्या मुली मात्र ह्या स्कालरशिपांकरितां परीक्षेस बसूं शकतील.

५. वरील प्रमाणेंच शर्तीवर जी मुलगी व्हर्न्याक्युलर चौथ्या इयत्तेच्या परीक्षेंत उत्तम उतरेल त्या मुलीस दरमहा ३ रुपयांची एक स्कालरशिप देण्यांत येईल. ज्या मुलींचा अभ्यास व्हर्न्याक्युलर चौथ्या इयत्तेचा अभ्यास पुरा होऊन ज्या व्हर्न्याक्युलर पांचव्या किंवा इंग्रजी पहिल्या इयत्तेपेक्षां जास्त वरच्या इयत्तेंत शिकत नसतील त्या मुली मात्र या परीक्षेस बसण्यास लायक समजल्या जातील.

६. ह्या स्कालरशिपा तारीख १ जानुआरी १९०२ पासून एक वर्ष पर्यंत मिळतील. ह्या स्कालरशिपा मिळविण्याकरितां परीक्षेस येणाऱ्या

मुली कोणत्या तरी एका मराठी, हिंदुस्तानी, गुजराथी, प्रायमरी किंवा मिडल शाळेमध्यें परीक्षेच्या वेळेपासून पूर्वी ६ महिने अभ्यास करीत असल्या पाहिजेत; व त्यांची वर्तणुक चांगली आहे, व त्या नियमानें शाळेंत येत असतात अशा बद्दलचा त्या त्या शाळेच्या अधिकाऱ्यांचा दाखला त्यांनीं आणिला पाहिजे.

७. ज्या मुलीला एकदां एक स्कालरशिप मिळाली असेल तिला पुन्हा त्याच स्कालरशिप परीक्षेस बसतां येणार नाहीं पण तिनें हवें तर तिला मिळालेल्या स्कालरशिपेपेक्षां अधिक दर्जाच्या स्कालरशिपेच्या परीक्षेस बसावें.

८. स्कालरशिपा देण्याकरितां एका कमेटीकडून परीक्षा घेतली जाईल. त्या कमेटीचे अध्यक्ष एल्फिन्स्टन हायस्कूलचे प्रिन्सिपाल हे असतील. परीक्षा एलफिन्स्टन हायस्कूलचे दिवाणखान्यांत सोमवार तारीख ६ जानुआरी १९०२ रोजीं सकाळचें ११ वाजतां ( मुंबई-टाईम ) होईल. परीक्षेस येऊं इच्छिणाऱ्या मुलींनीं आपली व आपल्या शाळांचीं नांवें मुंबईतील डेप्युटी इन्स्पेक्टरांपैकीं कोणत्याही एकाकडे तारीख १९ डिसेंबर १९०१ या दिवशीं अगर त्या पूर्वी लिहून पाठवावीं.

पुणें, तारीख १४ नोवेंबर १९०१. } ( सही ) आर. डी. मायर.
एज्युकेशनल इन्सपेक्टर.
मध्यभाग.

---

## २. मुंबई येथील न्याशनल इंडियन असोसिएशनच्या सभ्य स्त्रियांनीं दिलेल्या ज्यादा स्कालरशिपा.

१. सदरहू ठिकाणींच व सदरहू वेळींच मुंबई येथील न्याशनल इंडियन असोसिएशनच्या सभ्य स्त्रियांनीं दिलेल्या आणखी पांच स्कालरशिपा ठरविण्याकरितां परीक्षा घेतली जाईल.

२. या पांचांपैकीं एक स्कालरशिप १० रुपयांची असेल. दोन ६ रुपयांच्या व दोन ३ रुपयांच्या असतील. त्या एक वर्ष पर्यंत मिळतील. व त्यांच्या शर्ती वरील प्रमाणेंच असतील. मात्र त्यांत पुढील गोष्टींत फेर पडेल.

३. ज्या मुलींच्या शाळांत अगर युरोपियन मुलींच्या शाळांत एकादी देशभाषा शिकविली जात असेल, त्याच शाळांतील मुलींस या ज्यादा स्कालरशिपा मिळूं शकतील.

४. सहा रुपयांच्या ज्या दोन स्कालरशिपा देण्यांत येतील त्यांपैकीं एक इंग्रजी ( अँग्लोव्हर्न्याक्युलर ) सहाव्या इयत्तेंत जी मुलगी उत्तम पास होईल तिला दिली जाईल. आणि दुसरी जी इंग्रजी पांचव्या इयत्तेंत उत्तम पास होईल तिला दिली जाईल; व तीन रुपयांची स्कालरशिप द्यावयाची ती वरील जाहिरातींत ५ व्या कलमांत नमूद केल्याप्रमाणें परीक्षा घेऊन देण्यांत येईल, दहा रुपयांची स्कालरशिप युरोपियन किंवा इंग्रजी शिकविणाऱ्या शाळेंत शिकणाऱ्या मुलींपैकीं जी मुलगी युरोपियन सहाव्या इयत्तेच्या सर्व विषयांत परीक्षा होऊन उत्तम ठरेल तिला दिली जाईल. मात्र तिनें चौथ्या सदरांत मुंबईत चालू असलेल्या देशभाषांपैकीं एकादी घेऊन पास झालें पाहिजे.

५ सदर १० रुपयांच्या स्कालरशिपेकरितां जर कोणी योग्य मुलगी निवडली जाणार नाहीं, तर एज्युकेशनल इन्स्पेक्टर मध्यभाग हे मुंबईतील इंग्रजींत शिक्षण देणाऱ्या कोणत्याही फीमेल नार्मल स्कूलमधील ज्या उत्तम अभ्यास करणाऱ्या मुलीची शिफारस करितील तीस ती देण्यांत येईल.

६. 'मेरी कारपेंटर स्कालरशिपा' ज्या रीतीनें व ज्या वेळीं दिल्या जातील त्याच वेळेस ह्या ज्यादा स्कालरशिपाही देण्यांत येतील.

पुणें तारीख १४ नोव्हेंबर १९०१. } (सही) आर. डी. प्रायर.
एज्युकेशनल इन्स्पेक्टर
मध्यभाग.

---

# शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यांसी । हें अवघें सद्गुरूपाशीं।
सद्गुरू पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शाहाणें करून सोडावें । सकळां जनां ॥

रामदास.

पुस्तक १२. ता० १५ डिसेंबर १९०१. अंक १२.


## जाहिराती.

### १. मेरी कारपेंटरबाईच्या स्कालरशिपा.

१. लंडन एथील न्याशनल इंडियन असोशिएशन सभेनें मुंबई बेटांतील मराठी, हिंदुस्थानी, गुजराथी, मुलींच्या शाळांत शिकणाऱ्या मुलींकरितां 'मेरी कारपेंटर स्कालरशिपा' या नांवानें पांच स्कालरशिपा ठेविल्या असल्यामुळें सन १९०२ सालांकरितां पुढील नियम करण्यांत आले आहेत.

२. ह्या स्कालरशिपा किती रुपयांच्या व कोणत्या शर्तीवर दिल्या जातील तें पुढील कलमांवरून कळेल. मुंबईतील मराठी, हिंदुस्थानी, गुजराथी, प्रायमरी व मिडल ह्या दोन्ही प्रकारच्या शाळा, मग त्या म्युनिसिपालिटीच्या असोत, मदत मिळणाऱ्या असोत किंवा नुसत्या खातगी असोत, त्यांत वास्तविक अभ्यास करणाऱ्या सर्व मुलींस या स्कालरशिपा मिळविण्याच्या परीक्षेस बसतां येईल. मात्र ज्या मुलींना स्कालरशिप मिळण्याचा मुळींच संभव नाहीं, अशा मुलींस परीक्षेस न पाठविण्याविषयीं खबरदारी घ्यावी. कारण पुष्कळसे नालायक उमेदवार पाठविल्यानें शाळेची पत वाढण्यापेक्षां नापत मात्र होते.

३. मुलींच्या शाळांकरितां नेमिलेल्या इयत्तांपैकीं सहाव्या इयत्तेच्या अभ्यासांत ज्या दोन मुलींची परीक्षा उत्तम उतरेल त्यांस प्रत्येकीं दरमाहा ५ रुपयांची स्कालरशिप देण्यांत येईल. या दोन स्कालरशिपा मिळालेल्या मुलींना, शाळाखात्याकडून ज्या शाळेची तपासणी होत असेल अशा शाळेमध्यें त्यांस स्कालरशिप मिळत आहे तों पर्यंत प्यूपिल टीचर या नात्यानें काम करावें लागेल. व त्यांचें काम त्या शाळेच्या व्यवस्थापकांना व शाळा तपासणाऱ्या सरकारी अमलदारांस पसंत पडलें पाहिजे. ज्या मुलींचा व्हर्न्याक्युलर ( मराठी, हिंदुस्थानी, गुजराथी ) सहावे इयत्तेचा अभ्यास पुरा झाला असेल व ज्या इंग्रजी तिसऱ्या इयत्तेहून वरच्या इयत्तेंत शिकत नसतील अशाच मुली परीक्षेस बसण्यास लायक समजल्या जातील.

४. मुलींच्या शाळांकरितां नेमिलेल्या इयत्तांपैकीं ५ वे इयत्तेचा अभ्यासांत ज्या दोन मुलींची परीक्षा उत्तम उतरेल त्यांस प्रत्येकीं दरमहा ४ चार रुपयांची स्कालरशिप दिली जाईल अशा स्कालरशिप मिळालेल्या मुलींनीं ज्या शाळेची सरकारी अमलदारांकडून तपासणी होते अशा शाळेंत राहून व्हर्न्याक्युलर सहाव्या इयत्तेंत किंवा इंग्रजी दुसरे इयत्तेंत चांगला अभ्यास केला पाहिजे. ज्या मुलींचा व्हर्न्याक्युलर पांचवे इयत्तेचा अगर इंग्रजी पहिले इयत्तेचा अभ्यास पुरा झाला असून ज्या व्हर्न्याक्युलर सहाव्या किंवा इंग्रजी २ ऱ्या इयत्तेहून वरच्या इयत्तेंत शिकत नसतील त्या मुली मात्र ह्या स्कालरशिपांकरितां परिक्षेस बसूं शकतील.

५. वरील प्रमाणेंच शर्तींवर जी मुलगी व्हर्न्याक्युलर चौथ्या इयत्तेच्या परीक्षेंत उत्तम उतरेल त्या मुलीस दरमहा ३ रुपयांची एक स्कालरशिप देण्यांत येईल. ज्या मुलींचा अभ्यास व्हर्न्याक्युलर चौथ्या इयत्तेचा अभ्यास पुरा होऊन ज्या व्हर्न्याक्युलर पांचव्या किंवा इंग्रजी पहिल्या इयत्तेपेक्षां जास्त वरच्या इयत्तेंत शिकत नसतील त्या मुली मात्र या परीक्षेस बसण्यास लायक समजल्या जातील.

६. ह्या स्कालरशिपा तारीख १ जानुआरी १९०२ पासून एक वर्ष पर्यंत मिळतील. ह्या स्कालरशिपा मिळण्याकरितां परीक्षेस येणाऱ्या

मुली कोणत्या तरी एका मराठी, हिंदुस्तानी, गुजराथी, प्रायमरी किंवा मिडल शाळेमध्यें परीक्षेच्या वेळेपासून पूर्वी ६ महिने अभ्यास करीत असल्या पाहिजेत; व त्यांची वर्तणूक चांगली आहे, व त्या नियमानें शाळेंत येत असतात अशा बद्दलचा त्या त्या शाळेच्या अधिकाऱ्यांचा दाखला त्यांनीं आणिला पाहिजे.

७. ज्या मुलीला एकदां एक स्कालरशिप मिळाली असेल तिला पुन्हा त्याच स्कालरशिप परीक्षेस बसतां येणार नाहीं पण तिनें हवें तर तिला मिळालेल्या स्कालरशिपेपेक्षां अधिक दर्जाच्या स्कालरशिपेच्या परीक्षेस बसावें.

८. स्कालरशिपा देण्याकरितां एका कमेटीकडून परीक्षा घेतली जाईल. त्या कमेटीचे अध्यक्ष एलफिन्स्टन हायस्कूलचे प्रिन्सिपाल हे असतील. परीक्षा एलफिन्स्टन हायस्कूलचे दिवाणखान्यांत सोमवार तारीख ६ जानुआरी १९०२ रोजीं सकाळचें ११ वाजतां ( मुंबई-टाईम ) होईल. परीक्षेस येऊं इच्छिणाऱ्या मुलींनीं आपली व आपल्या शाळांचीं नांवें मुंबईतील डेप्युटी इन्स्पेक्टरांपैकीं कोणत्याही एकाकडे तारीख १९ डिसेंबर १९०१ या दिवशीं अगर त्या पूर्वीं लिहून पाठवावीं.

पुणें, तारीख १४ नोवेंबर १९०१.

( सही ) आर. डी. प्रायर.
एज्युकेशनल इन्सपेक्टर.
मध्यभाग.

---

## २. मुंबई येथील न्याशनल इंडियन असोसिएशनच्या सभ्य स्त्रियांनीं दिलेल्या ज्यादा स्कालरशिपा.

१. सदरहू ठिकाणींच व सदरहू वेळींच मुंबई येथील न्याशनल इंडियन असोसिएशनच्या सभ्य स्त्रियांनीं दिलेल्या आणखी पांच स्कालरशिपा ठरविण्याकरितां परीक्षा घेतली जाईल.

२. या पांचांपैकीं एक स्कालरशिप १० रुपयांची असेल. दोन ६ रुपयांच्या व दोन ३ रुपयांच्या असतील. त्या एक वर्ष पर्यंत मिळतील. व त्यांच्या शर्ती वरील प्रमाणेंच असतील. मात्र त्यांत पुढील गोष्टींत फेर पडेल.

३. ज्या मुलींच्या शाळांत अगर युरोपियन मुलींच्या शाळांत एकादी देशभाषा शिकविली जात असेल, त्याच शाळांतील मुलींस या ज्यादा स्कालरशिपा मिळूं शकतील.

४. सहा रुपयांच्या ज्या दोन स्कालरशिपा देण्यांत येतील त्यांपैकीं एक इंग्रजी ( अँग्लो व्हर्न्याक्युलर ) सहाव्या इयत्तेंत जी मुलगी उत्तम पास होईल तिला दिली जाईल. आणि दुसरी जी इंग्रजी पांचव्या इयत्तेंत उत्तम पास होईल तिला दिली जाईल; व तीन रुपयांची स्कालरशिप द्यावयाची ती वरील जाहिरातींत ९ व्या कलमांत नमूद केल्याप्रमाणें परीक्षा घेऊन देण्यांत येईल; दहा रुपयांची स्कालरशिप युरोपियन किंवा इंग्रजी शिकविणाऱ्या शाळेंत शिकणाऱ्या मुलींपैकीं जी मुलगी युरोपियन सहाव्या इयत्तेच्या सर्व विषयांत परीक्षा होऊन उत्तम ठरेल तिला दिली जाईल. मात्र तिनें चौथ्या सदरांत मुंबईंत चालू असलेल्या देशभाषांपैकीं एकादी घेऊन पास झालें पाहिजे.

५ सदर १० रुपयांच्या स्कालरशिपेकरितां जर कोणी योग्य मुलगी निवडली जाणार नाहीं, तर एज्युकेशनल इन्स्पेक्टर मध्यभाग हे मुंबईंतील इंग्रजींत शिक्षण देणाऱ्या कोणत्याही फीमेल नार्मल स्कूलमधील ज्या उत्तम अभ्यास करणाऱ्या मुलीची शिफारस करितील तीस ती देण्यांत येईल.

६. ' मेरी कारपेंटर स्कालरशिपा ' ज्या रीतीनें व ज्या वेळीं दिल्या जातील त्याच वेळेस ह्या ज्यादा स्कालरशिपाही देण्यांत येतील.

पुणें तारीख १४ नोव्हेंबर १९०१. (सही) आर. डी. प्रायर.
एज्युकेशनल इन्स्पेक्टर
मध्यभाग.

**प्रत्येक महिन्यांत मुलांस कोणता विषय किती शिकवाव-याचा हें पूर्वी ठरविलेलें असावें.**—प्रत्येक महिन्यांत कोणता विषय किती शिकवावयाचा हें ठरलेलें नसलें तर शिकविण्याचें धोरण न राहून फार अव्यवस्था होते. एखादे वेळीं एकदम पुष्कळ विषय शिकविला जाऊन तो मुलांस चांगला समजत नाहीं, व एखादे वेळीं अगदीं थोडा विषय शिकविला गेल्यामुळें पुढें नियमित वेळांत विषय पुरा होण्याला अडचण पडते. याकरितां प्रत्येक विषयाचे महिनेवार शिकविण्याचे भाग पाडलेलें असणें फार अवश्य आहे. बारा महिन्यांत एक इयत्ता पुरी करावयाची असते. ह्या मुदतीपैकीं शेवटच्या महिन्यांत बहुधा परीक्षा व्हावयाची असल्यामुळें अभ्यास करून घेण्याच्या काळांत त्याची गणना करून उपयोगीं नाहीं. म्हणजे बाकी राहिलेल्या अकरा महिन्यांतच परीक्षेची सर्व तयारी करावयास पाहिजे असते. एक महिनापर्यंत नवीन विषय न शिकवितां सर्व विषयांची उजळणी करीत राहाणें हेंही परीक्षेच्या तयारीकरितां अवश्य आहे. याकरितां दहा महिन्यांत सर्व अभ्यास शिकवून पुरे होतील अशा धोरणानें सर्व अभ्यासांचे दहा भाग करून त्यांचें एक टांचण शिक्षकानें आपल्या जवळ ठेवावें व त्याप्रमाणें नेहमीं शिकवावें. शिकवून झालेल्या भागांत मुलांची तयारी ज्या मानानें कमी जास्ती होईल, त्या मानानें हें भागशः विषय शिकविण्याचें काम सर्वथा नियमितपणें चालवितां येईल असें जरी म्हणतां येत नाहीं, तरी ह्या भागांची शिक्षकाला फार मदत होईल यांत संशय नाहीं, वर्षांत जें एकंदर काम करावयाचें त्यापैकीं झालें किती व व्हावयाचें राहिलें किती ह्याचें स्वरूप त्याच्या नजरेपुढें नेहमीं राहून त्यामुळें त्याला आपलें काम विशेष सावधगिरीनें करितां येईल. तीन तीन महिन्यांत शिकविण्याच्या विषयाचा एक भाग याप्रमाणें एकंदर चार भाग करून वर्षांत सर्व अभ्यास पुरे करण्याची वहिवाट हल्लीं कित्येक ठिकाणीं चालू आहे. परंतु तीपेक्षां वर लिहिलेली पद्धत जास्त सोईची आहे असें अनुभवास आलें आहे. तीन महिन्यांत किती शिकवावयाचें हें माहित असण्यापेक्षां दरमहा काय शिकवावयाचें

तें समजलेलें असलें, तर जास्त सावधगिरी ठेवितां येते. तसेंच ह्या दरमहाच्या पद्धतींत सर्व अभ्यास दहा महिन्यांत पुरे होत असल्यामुळें परीक्षेपर्यंतचा पुढील सर्व वेळ उजळणीला सांपडून त्यामुळें सर्व विषयांची तयारी चांगली करितां येते. तीन महिन्यांत शिकविण्याच्या विषयाचा एक भाग याप्रमाणें चार भाग केले असतां शिक्षकाला परीक्षेची वेळ येईपर्यंत नवीन विषय शिकवीत राहावें लागतें, व त्याच वेळीं परीक्षेच्या तयारीकरितां मागील विषयाची उजळणीही करावी लागते त्यामुळें त्याचा अगदीं घोंटाळा होतो. याकरितां मुळींच सर्व अभ्यास दहा महिन्यांत संपवून मग राहिलेला वेळ उजळणी करण्याकडे खर्च करणें खचीत जास्ती सोईचें आहे.

**शिकवून झालेल्या विषयांत मुलांची परीक्षा दरमहाचे दरमहा घ्यावी:—** शिकविलेला विषय मुलांस कसा काय येत आहे, हें समजण्याकरितां दरमहा परीक्षा घेणें अवश्य आहे. ह्या परीक्षेच्या योगानें कोणत्याही प्रकारचा कमीपणा जेव्हांचा तेव्हांच्या ध्यानांत येऊन तो लागलाच दूर करितां येतो. शिकविणें बंद ठेवून परीक्षा घेण्यांत वेळ मोडणें चांगलें नाहीं असें कित्येकांस वाटेल. परंतु एकतर लहान शाळांतून हा वेळ विशेष मोडेल असें नाहीं; आणि शिवाय ह्या परीक्षेच्या योगानें मुलांमध्यें व आपल्या शिकविण्यामध्यें दोष कोणते आहेत ते कळून येऊन पुढच्या शिकविण्याचें धोरण जर चांगलें ठेवितां आलें तर थोडासा वेळ मोडला म्हणून तरी काय हरकत आहे? आपण शिकविलेलें मुलांस कसें काय येत आहे, ह्याचा निकाल आपणच परीक्षा घेतल्यानें जसा होतो त्यापेक्षां दुसऱ्या कोणीं परीक्षा घेतली असतां तो जास्त चांगला होतो. याकरितां जेथें एकापेक्षां जास्त शिक्षक असतील, तेथें मुख्य शिक्षकानें स्वतः सर्व वर्गांची दरमहा परीक्षा घेत जावी, व त्या परीक्षेंत प्रत्येक वर्गामध्यें जीं व्यंगें आढळून येतील, तीं त्या त्या वर्गाच्या शिक्षकास कळवावीं; म्हणजे त्यांस आपला वर्ग तयार करण्याला चांगली मदत होईल. मोठ्या शाळांतून मुख्य शिक्षकानें आपला वर्ग शिकविण्याचें काम करून शिवाय वर लिहिल्या

प्रमाणें सर्व शाळेच्या परीक्षेचें ही काम कसें करावें, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे यांत संशय नाहीं, परंतु कांहीं तरी सवड करून त्यानें हें परीक्षेचें काम अव्याहत चालविलें पाहिजे यांतही संशय नाहीं. त्याच्या सोयीस येईल त्याप्रमाणें त्यानें याकामीं आपल्या योग्य असिस्टंटाची मदत घेण्यालाही हरकत नाहीं, परंतु परीक्षेच्या कामीं सहसा हयगय करूं नये. दर तीन महिन्यांनीं परीक्षा घेण्याची चाल कित्येक ठिकाणीं असून तिजपासून बराच उपयोग होतो, परंतु दरमहा परीक्षा घेतल्यानें त्यापेक्षां विशेष फायदा आहे; पांचव्या व विशेषें करून सहाव्या इयत्तें-तील मुलांची ही परीक्षा लेखी घेण्याची वहिवाट असावी, म्हणजे त्यांस व्यवस्थेशीर उत्तर लिहिण्याची माहिती होऊन पाब्लिक सर्व्हिस परीक्षेच्या वेळीं त्यांस अडचण पडणार नाहीं. चौथ्या इयत्तेंत देखील केव्हां केव्हां ही परीक्षा लेखी घेण्याची वहिवाट ठेविली तर जपून लिहिण्याची त्यांस तेव्हांपासून संवय लागून बराच फायदा होईल— मनांतील विचार कागदावर पूर्णपणें लिहून काढण्याचें काम बरीच संवय झाल्याखेरीज साधणें शक्य नाहीं, व म्हणून हळू हळू ही संवय मुलांस लावणें हें शिक्षकाचें काम आहे.

**मुलांस जो धडा शिकवावयाचा असेल तो स्वतः शिक्षकाला चांगला समजलेला असला पाहिजेः**—ही गोष्ट इतकी महत्वाची व स्पष्ट आहे कीं तिचा येथें उल्लेख करण्याचें देखील वास्तविक पाहतां कारण नाहीं. शिक्षकाच्या धंद्यांतली ही अगदीं प्रथमची मुख्य गोष्ट आहे. तथापि बहुतेक अन्ट्रेन्ड शिक्षकांचें व कित्येक ट्रेन्ड शिक्षकांचें देखील व्याकरण, कविता, वाचनापैकीं कठीण धडे, व अंकगणितापैकीं कित्येक भाग ह्यांच्यासंबंधानें पुष्कळ अज्ञान असतें. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं तें अज्ञान दूर करण्याकरितां ते कोणत्याही सरळ मार्गाचें अवलंबन न करितां टाळाटाळी करून कव्हां कांहीं तरी खोटी नाटी माहिती देखील मुलांस सांगतात, व म्हणूनच ह्या गोष्टीचा उल्लेख येथें करणें अवश्य आहे असें वाटलें. आपल्याला विषय समजत नाहीं असें दुसऱ्याच्या नजरेस न

येऊं देण्याविषयीं शिक्षकाचा एकसारखा प्रयत्न चाललेला असतो. परंतु वास्तविक पाहतां आपलें अज्ञान अशा रीतीनें झांकून ठेवण्याचें कांहींच कारण नाहीं. जी गोष्ट त्याला नीटशी समजत नसेल ती त्यानें दुसऱ्या कोणातरी जाणत्या मनुष्याला विचारून चांगली समजूत घ्यावी, व नंतर मुलांस सांगावी. असें केल्यानें आपली मान्यता कमी होईल असें जर कोणाला वाटत असेल तर तें अगदीं चुकीचें आहे. सोप्या व साध्या गोष्टी मुलांस सांगतांना आपलें अज्ञान लपवून ठेवीत असतां मनाला जी एक प्रकारची शरम वाटते ती तो विषय नीट समजून घेतल्यावर, वाटण्याचें कारण राहणार नाहीं, व मुलांसही त्याचें खरें ज्ञान होईल.

---

## १२. शारीर-शिक्षण व नीति-शिक्षण.

जो मुख्य हेतू मनांत आणून हे लेख लिहिण्याला आरंभ केला होता, तो येथपर्यंतच्या लिहिण्यानें बहुतेक पुरा झाला. शाळानिहाय मुलांस शिकवितांना विषय शिकविण्याच्या संबंधानें शिक्षकांस ज्या अडचणी येतात त्या, ह्या लेखांत केलेल्या सूचनांप्रमाणें ते विषय शिकविले असतां अंशतः तरी दूर होतील अशी फार उमेद आहे. तथापि इयत्तावार नेमून दिलेले विषय मुलांस चांगले शिकविले म्हणजे शिक्षकांचें कर्तव्य पूर्णपणें बजावलें गेलें असें मात्र समजावयाचें नाहीं. हल्लीं प्राथमिक शिक्षणाच्या शाळांतून जें शिक्षण दिलें जातें, त्याला **सामान्य शिक्षण** असें म्हटल्यास चालेल. म्हणजे मुलगा मोठा झाल्यानंतर पुढें तो कोणताही धंदा करूं लागला तरी हें शिक्षण त्याला मिळालें असलें तर त्यापासून त्याचा धंदा व व्यवहार चालविण्याला त्याला चांगली मदत होईल. तथापि **सामान्य शिक्षण** ह्या शब्दाची यथार्थता केवळ इयत्तावार नेमिलेले विषय शिकवून पुरे केल्यानेंच होईल असें वाटत नाहीं. शिक्षणाचीं शरीरवर्धक, नीतिवर्धक व बुद्धिवर्धक अशीं तीन निरनिराळीं अंगें असून त्या तिहींचीही योग्य रीतीनें जोपासना होत गेली तरच मनुष्याला आपल्या आयुष्यांतील नानाप्रकारचे

व्यवहार सुखावह अशा रीतीनें चालवितां येतील. म्हणून कोणत्याही धंद्यांत शिरण्यापूर्वी ह्या तिन्ही अंगांची वाढ चांगल्या प्रकारें होईल अशी व्यवस्था ठेवणें हाच **सामान्य शिक्षण** देण्याचा मुख्य हेतु समजला पाहिजे. म्हणजे शारीरशिक्षण, नीतीशिक्षण व बुद्धिविकास करणारें शिक्षण ह्या तिन्ही प्रकारच्या शिक्षणांची व्यवस्था मुलांच्या लहान वयापासून ( म्हणजे **सामान्यशिक्षण** अथवा **प्राथमिकशिक्षण**-देण्याच्या काळांत ) केली पाहिजे. शाळांतून तिन्ही प्रकारच्या शिक्षणांची व्यवस्था सवडीप्रमाणें नीटपणें केलेली आहे. पण लोकांना बहुतेक बुद्धिवर्धक शिक्षणाचें मात्र महत्व वाटत असतें. हा प्रकार सर्वथा अनिष्ट व घातक आहे. " इंग्रजी राज्य झाल्यापासून विद्या अतिशय फैलावल्यामुळें दिवसें दिवस नवीन होणारी प्रजा अगदीं अशक्त व खुरटी होत चालली आहे व स्वतंत्रेचें मिथ्या वारें प्रत्येकाच्या मनांत संचारून कोणी कोणाची पर्वा करीनासा झाला आहे. मुलें पुढें मोठी झाल्यावर आपल्या आईबापांची अमर्यादा करूं लागतात व गुरूच्या उपदेशाचें महत्व त्यांस वाटेनासें होतें व सभ्यतेची वागणूक सुटल्यामुळें संमाननीय अशा इतर सद्गृहस्थांचा त्यांजकडून वारंवार उपमर्द होऊं लागतो. इ० " अशा तऱ्हेचा मोठा जबर आक्षेप हल्लींच्या समजावर आलेला आहे. या आरोपांमध्यें जरी अतिशयोक्तीचा भाग पुष्कळ आहे हें खास, तरी सूक्ष्म विचार केला असतां त्यांत सत्याचा अंश नाहीं असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. परंतु अशी स्थिति शाळेंत शिकविण्याची जी पद्धत सांप्रत चालू आहे ती मुळें होत आहे, हें म्हणणें मात्र बरोबर नाहीं. वरील आक्षेपांत लिहिलेले जे दोष हल्लीं समाजांत शिरले आहेत ते इकडे इंग्रजी विद्या फैलावल्यामुळें शिरले असें म्हणण्यापेक्षां शिक्षण हें सर्व शाळेंतच मिळालें पाहिजे, त्यासंबंधानें घरच्या माणसांचें कर्तव्य कांहीं नाहीं, या चुकीच्या समजुतीमुळें शिरले आहेत. शिक्षणाच्या तीन मुख्य अंगांपैकीं एकाकडेच विशेष लक्ष देऊन त्याची तेवढी नीट वाढ करीत गेल्यास दुसरीं अंगें निःसंशय लुळीं पडतील. नुसतें बुद्धिविकासक शिक्षणच देत गेल्यानें शरीर कसें कमकुवत होतें ह्यांचीं उदाहरणें तर आपल्या दृष्टीपुढें पाहिजे तितकीं आहेतच. परंतु त्याप्रमाणें नुसतें

शारीर शिक्षण देऊन नीतिशिक्षणाकडे अथवा बुद्धिविकासक शिक्षणाकडे मुळींच दुर्लक्ष केलें तर काय परिणाम होतो तेंही ठिकठिकाणच्या तालमेच्या आखाड्यांतील तालीमबाज मल्लांच्या वर्तनाकडे दृष्टि दिली असतां सहज लक्षांत येण्यासारखें आहे. त्या तालीम-बाज-गड्यांना फक्त उत्तम प्रकारच्या पौष्टिक अन्नाचें सेवन करणें, नेहमीं शारीरिक व्यायामांत निमग्न असणें, सामने-वाल्याशीं कुस्ती करणें, व अल्पस्वल्प कारणांनीं क्रोधवश होऊन एकदम लट्ठालट्ठी करूं लागणें, ह्या गोष्टी मात्र अत्यंत प्रिय असतात. परंतु नीतिमूलक बऱ्या वाईट गोष्टींचा विचार, अथवा विद्याविषयक हरएक प्रकारचा व्यासंग, ह्यांचे ते पक्के द्वेष्टे असतात. याकरितां नुसतें एकदेशीय शिक्षण—मग तें कोणत्याहीं प्रकारचें असो—व्यवहाराला बहुतेक निरुपयोगी आहे यांत संशय नाहीं. केवळ एकदेशीय शिक्षण मिळालेल्या लोकांपेक्षां ज्यांस कोणत्याच प्रकारचें शिक्षण मुद्दाम दिलेलें नाहीं असे, म्हणजे ज्यांस आपण सामान्यतः अशिक्षित म्हणतों असे लोक देखील पुष्कळ वेळा जास्त सुख अनुभवीत असलेले दृष्टीस पडतात. ह्या अशि-क्षित म्हटले जाणाऱ्या लोकांना मुद्दाम म्हणून जरी कोणतेंही शिक्षण दिलेलें नसलें तरी समाजांतील त्यांच्या नित्याच्या वागणुकींतच त्यांचे बेताचे व्यवहार चालविण्यापुरतें तिन्ही प्रकारचें जरूरीचें शिक्षण त्यांस आपोआपच मिळत असतें. समाज अथवा त्या समाजाची चालरीत हाच यांचा शिक्षक समजावयाचा. ह्या शिक्षकाकडून तिन्ही प्रकारचें शिक्षण त्यांस थोडें थोडेंच परंतु सारखें मिळत जातें, त्यामुळें सुधारलेल्या समा-जांतील एकदेशी शिक्षणाप्रमाणें एकाचेंच प्राबल्य होऊन दुसरें अंग लुलें पडत नाहीं. व त्यामुळें एकंदरींत ते लोक सुखानें आयुष्य कंठितात.

वरील एकंदर विवेचनावरून अशी सहज खात्री होईल कीं, सध्या आमच्या मुलांस फक्त बुद्धिविकासक शिक्षण चांगलें मिळून दुसऱ्या दोन प्रकारच्या शिक्षणांडे दुर्लक्ष होत आहे. पण हें कोणाच्या हातून होत आहे, याचा विचार सर्वांनीं करावा. याचा मुख्य दोष घराकडे येतो. घरीं नीतिशिक्षणाचा आरंभ झाला, म्हणजे शाळेंतल्या शिक-

खिण्यामध्यें आलेले प्रसंग शिक्षक फुकट जाऊं देत नाहींत. परंतु बुद्धि वर्धक शिक्षण जसें शाळेंत होतें तसें हेंही शाळेंच पाहिजे, असें मानून स्वस्थ बसून उपयोगीं नाहीं. युरोपातल्या सुधारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीनें आपल्याला पुढें जावयाचें असल्यामुळें हा भलता विचार मनांत आणणें कधींच हितावह होणार नाहीं. बुद्धिविकासक शिक्षण तर दिलेंच पाहिजे, परंतु ते देत असतां शारीर-शिक्षण व नीति-शिक्षण ह्यांकडे मुळींच दुर्लक्ष करितां कामा नये. असें केलेंतरच ह्या सुधारणेच्या युगांत सुखानें आयुष्य घालवितां येणार आहे.

आतां शारीर शिक्षण शाळांतून कसें द्यावें ह्याचा थोडा विचार करूं. हें शिक्षण सामान्यतः दोन प्रकारांनीं देतां येतें. एक मलखांब, बार, यांवरची कसरत मुलांकडून करविणें; व दुसरा आट्यापाट्या, चेंडूदांडू, खोपाणी, वगैरे खेळ त्यांजकडून खेळाविणें, व कवाईत करविणें. ह्यापैकीं जास्त हितावह प्रकार कोणता, अगर दोन्ही प्रकार सारखेच हितावह व आवश्यक आहेत, ह्या गोष्टीचा विचार केला पाहिजे. दोन्ही प्रकार शरीराला हितावह असून सारख्याच जरूरीचे जरी आहेत, तरी प्रत्येक प्रकाराला त्याच्या दृष्टीनें निरानिराळें महत्व आहे यांत संशय नाहीं. शरीराच्या निरनिराळ्या अवयवांना निरानिराळ्या प्रकारची कसरत मिळून त्यांची ठेवण सुरेख बांधेसूद होण्याला पहिल्या प्रकारच्या व्यायामाची जशी जरूर आहे, तशीच शरीराबरोबर मनही परस्पर स्पर्धेच्या योगानें उत्पन्न होणाऱ्या ईर्षेच्या आनंदांत गढून जात असल्यामुळें दुसऱ्या प्रकारच्या व्यायामाचीही तितकीच आवश्यकता आहे. तथापि पहिल्या प्रकारचा व्यायाम मुलांकडून करविण्याला हल्लीं बऱ्याच अडचणी आहेत. हा व्यायाम करण्याला विशेष प्रकारच्या सामानाची जरूर असून ती खर्चाची बाबत असल्यामुळें आज एकदम सर्व ठिकाणीं तें सामान मिळण्याचा संभव नाहीं. शिवाय हा व्यायाम शिकविणारांची देखील आज तितकी तयारी नाहीं. शाळांनिहाय ट्रेन्ड शिक्षकांची योजना जरी

बरीच झालेली आहे, तरी जेथें अन्ट्रेड शिक्षकांकडूनच सर्व काम चालतें, अशा शाळा देखील अजून पुष्कळ आहेत; आणि ज्या कित्येक ठिकाणीं ट्रेन्ड शिक्षक असतात तेथें तरी ते सर्वच ह्या प्रकारचा व्यायाम मुलांस शिकविण्याला लायक असतात असें नाहीं. कसरत करणें हा जरी ट्रेनिंग कालेजांत आवश्यक विषयांपैकीं एक विषय आहे, तरी तिकडे दुर्लक्ष करावें अशी आजपर्यंतची चाल होती. त्या विषयाला परिक्षेंत चांगलें महत्व मिळून तो अलीकडेसच पुढें आला आहे. तालमेप्रमाणेंच मुलांना कवाईत शिकविण्याचें शिक्षणही सांप्रत शिक्षकांना मिळत असतें. तेव्हां अलीकडले मास्तरलोक जरी हा विषय चांगल्या प्रकारें शिकलेले असतात, तरी ते अजून थोडेच आहेत. दुसरें असें आहे, शिक्षक लोक स्वतः गरीब, थोडाच पगार मिळणारे असल्यामुळें केवळ त्यांच्याच प्रयत्नांनीं मुलांच्या घरच्या मंडळीवर वजन पडून हा विषय शाळांत शिकविण्यास उत्तेजन येईल असें मुळींच नाहीं. घरची मंडळी मुलांकडून हा व्यायाम करून घेण्यास नेहमीं विरुद्ध असतात. एकाद्या उद्योगी शिक्षकानें कोठें तालीम, कवाईत वगैरे सुरू केल्यास घराहून कशा तक्रारी येतात, तें सर्वांस माहीत असेलच. "आमच्या मुलांकडून तालीम करवूं नका, तो अशक्त आहे. हातपाय मोडला तर उगीच पंचाईत होईल; तालीम करून त्याला घरीं दूध वगैरे देण्याची सोय नसल्यामुळें तिची आम्हाला मुळींच जरूर नाहीं." असे एकना दोन अनेक निरोप मास्तराकडे एकसारखे येत असतात. तेव्हां इतर सर्व प्रकारच्या सोई असूनही स्वतः तालीम करणारांचीच जर अशी स्थिती आहे तर त्या सर्व सोई असून नसून सारख्याच समजल्या पाहिजेत. याकरितां तूर्त ह्या प्रकारच्या व्यायामाची विशेष सक्ती न करितां जेथें जितकी अनुकूलता असेल तितक्या मानानें थोडी बहुत कसरत तेथें शिकवून लोकांत आस्था उत्पन्न करण्याचें काम प्रथम केलें पाहिजे.

कवाइतीच्या व्यायामाची मात्र वर लिहिल्याप्रमाणें स्थिती नाहीं. त्याला अडचणी मुळींच नाहींत असें म्हटलें तरी चालेल. सामानासाठीं

[illegible]
ता.........
मिति

